# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार

## The Complete Discipleship Evangelism

## स्तर १

**Levels 1-3**


ॲन्ड्रयू वोमॅक

आणि

डॉन क्रो

द्वारा लिखीत

The Complete Discipleship Evangelism
48-Lesson Course
Level 1 (16 Lessons)

Copyright ©2012, Andrew Wommack
Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs, CO 80934-333
www.awmi.net

Title in Marathi: संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार
©2021 Andrew Wommack Ministries India
www.awmindia.net
info@awmindia.net

Item Code: MA 417-1/3

Published and sold in India by Charis Initiatives Pvt. Ltd.
www.charisinitiatives.com

Permission is granted to duplicate or reproduce for discipleship purposes on the condition that it is distributed free of charge.

# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार

## विषय सूची

### स्तर १
### Level 1


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | सार्वकालिक जीवन | ५ | ... | 5 |
| २. | कृपेद्वारा उ़ध्दार | १२ | ... | 12 |
| ३. | कृपेद्वारा धार्मिकता | २० | ... | 20 |
| ४. | परमेश्वराशी नाते | २६ | ... | 26 |
| ५. | परमेश्वराचा स्वभाव | ३४ | ... | 34 |
| ६. | पश्चाताप | ४२ | ... | 42 |
| ७. | समर्पण | ५१ | ... | 51 |
| ८. | पाण्याचा बाप्तिस्मा | ५८ | ... | 58 |
| ९. | ख्रिस्तामध्ये ओळख – भाग १ | ६४ | ... | 64 |
| १०. | ख्रिस्तामध्ये ओळख – भाग २ | ७१ | ... | 71 |
| ११. | विश्वासीगण पाप करतात तेव्हा काय होते | ७८ | ... | 78 |
| १२. | परमेश्वरीय वचनांची विश्वासार्हता | ८४ | ... | 84 |
| १३. | परमेश्वर दोषी नाही | ९१ | ... | 91 |
| १४. | आत्म्याने भरलेल्या जीवनाचे सामर्थ्य | ९९ | ... | 99 |
| १५. | पवित्र आत्म्याला कसे प्राप्त करावे | १०७ | ... | 107 |
| १६. | अन्य भाषा बोलण्याचे लाभ | ११५ | ... | 115 |

# पाठ क्रमांक १

# सार्वकालिक जीवन

*अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

योहान ३:१६ हे एक सर्वात जास्त परिचयाचे वचन आहे. प्रत्येकाला अगदी लहानपणापासूनच हे वचन माहीत आहे, तरीही मला वाटते ह्या वचनाविषयी खरोखरच आपलात गैरसमज आहे आणि ते चुकीच्यां रीतीने वापरलही जाते. योहान ३:१६ म्हणते की , *"देवांने जगावर एवढी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सावकालिक जीवन प्राप्त व्हावे."*

वाडवडिलांपासून, ह्यां वचना विषयी आपल्याला शिकविले जाते की येशू आला आणि आपल्या पापांसाठी मरण पावला अश्यासाठी की आपला नाश होऊ नये. खरे सांगायचे झाल्यास, हे वचन अश्या प्रकारे म्हणते की येशूचे पृथ्वीवर येण्याचे एकमात्र ध्येय हेच होते की त्याने आपल्यासाठी स्वःताचा प्राण द्यावा जेणेकरून आपल्याला अनंत जीवन प्राप्त व्हावे. हे अश्यासाठी घडले की आपली पापे, आपल्या व ह्या सार्वकालिक जीवनामध्ये अडसर म्हणून उ़भी होती.

हे सत्य आहे की येशू आमच्या पापांसाठी मरण पावला, आणि हे ही तितकेच खरे आहे की जे येशूवर विश्वास ठेवतात त्यांचा नाश होणार नाही, परंतु सुसमाचारात तर ह्याही पेक्षा बरंच काही आहे. सुसमाचारातला खरा संदेष हा आहे की देव आपल्याला सार्वकालिक जीवन देऊ इच्छितो. चला आता तुम्हाला हे समजावून सांगू देत.

क्रूसावर जाण्याच्या आदल्या रात्री , येशू प्रार्थना करित होता , आणि तो म्हणाला, "सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला , व ज्याला तू पाठविले त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे." (योहान १७ : ३) हे वचन असे म्हणते

की सार्वकालिक जीवन म्हणजे पित्याला ओळखणे, केवळ एकमात्र सत्य देवाला, येशू ख्रिस्ताला ओळखणे, ज्याला त्याने पाठविले त्यांला ओळखिणे. हेच सार्वकालिक जीवन होय. पुष्कळ लोक विचार करतात की सार्वकालिक जीवन म्हणजे सदासर्वकाळासाठी जिवंत असणे. बरे तर प्रत्येक व्यक्ति अनंतकालासाठी जिवंत रहातेच. असा विचार करणे की एखादा व्यक्ति मरण पावला की त्याचे अस्तित्वच संपृष्टात येते, हा एक गैरसमज आहे. आत्मा आणि प्राण पुन्हा देवाकडे जातो. शरीर कबरेत कुजते. सत्य हे आहे की जो कोणी पृथ्वीवर जन्मेल तो आत्मिक दशेत सदा जिवंत राहील. म्हणजेच असे म्हणणे की सार्वकालिक जीवन म्हणजे सदासर्वकाळासाठी जिवंत रहाणे हे पूर्ण सत्य नाही – प्रत्येक जण सदासर्वकाळासाठी जिंवत रहातो ; हे वचन हे स्पष्ट करते की देवाने प्रत्येकाला आपोआपच अनंतकालीन जीवन देऊ केले आहे.

काही जण म्हणतील, "सार्वकांलिक जीवन हे सदासर्वकाळासाठी स्वर्गा विरूध्द सदासर्वकाळासाठी नरक होय." परंतु अनंतकालीन जीवन हे आहे जे येशुने सांगितले योहान १७ : ३ मध्ये – देवाला आणि येशूला ओळखणे . हे आहे बुध्दि पलिकडचे ज्ञान. "ओळखणे" हा शब्द संपूर्ण वचनात वर्णन करतो तुमच्याशी असलेले खूप जवळचे, घनिष्ट, व्यक्तिगत नात्याचे.

उध्दाराचा खरा हेतू सदासर्वकाळासाठी स्वर्गात जगणे नाही , हे सर्वात महत्तम असेल. उध्दाराचा खराखुरा हेतू आहे जवळीक – प्रभु देवाशी एक व्यक्तिगत नाते असणे. कित्येक लोक असे असतील की त्यांनी त्यांच्या पापांसाठी टाहो फोडत क्षमायाचना मागितली तर असेल पण त्यांचा उद्देष कधीही देवाशी व्यक्तिगत नाते जोडणे नसेल.

तारणाचा खरा हेतू स्पष्ट न करता , आपण सुसमाचाराशी स्वैराचार करतो. जेव्हा आपण ऊध्दाराला फक्त आत्मिक स्वरुपात मांडतो ज्याचा फायदा आपल्याला केवळ येणाऱ्या भविष्यामध्ये, अनंतकाळात होईल,तेव्हा आपण लोकांना मदत करीत नाही. ह्या पृथ्वीवर आजही लोक अक्षरशः नरकात जगत आहेत. बहुतेक लोक नैराष्येत, दारिद्रयात, कलहात, धिक्कारात, अपयशात आणि विस्कटलेल्यां सहजीवनात जगत आहेत. लोक नुसतेच जीवनाचे गाडे हाकत आहेत. अगदी नाकातोंडा पर्यत पोहचलेल्या पाण्यातून डोके वर काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. तारणाचा संबंध भविष्याशी जोडत, बहुतांशी लोक त्यासंबंधीच्या निर्णयाला तिलांजली देतात कारण रोजच्या जगण्याच्या धडपडीत ते व्यस्त होऊन जातात.

सत्य तर हे आहे की येषू नुसत्याच आपल्या अनंतकालीन शग्याला प्रभावित करायला आला नाही जेणेकरुन आपण नरकाच्या शापातून, यातनातून सुटून स्वर्गाच्या आर्शिवादात सदासर्वकाळासाठी रहावे, तर येशू ह्या दुष्ट जगापासून आपणास मुक्त करण्यास आला. (गलती १ : ४) आज येशू आला आहे आपले देवपित्याषी जवळीक आणि वैयक्तिक नाते स्थापित करावयास.

येशू तुमच्याबरोबर निजी व्यक्तिगत संबंध पुर्नस्थापित करावयास आला. येशू तुमच्यावर प्रेम करतो. येशूला तुम्हाला जाणून घ्यायचे आहे. येशू तुम्हाला दर्जेदार आयुष्य देण्यासाठी आला असे सर्वोत्तम आयुष्य जे इतर कोणत्याही मार्गाने तुम्ही प्राप्त करुन घेऊ शकत नाही.

येशू योहान १० : १० मध्ये हे अश्या प्रकारे सांगतो की *"चोर येतो* (सैतानाला उद्देषून) *तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवन प्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे."* (मला उद्देषून) परमेश्वर तुम्हाला सार्वकालिक जीवन देऊ इच्छितो. परमेश्वर तुम्हाला भरपूर जीवन देऊ इच्छितो, आणि आज तुम्हाला त्याची आवश्यकता आहे – तुम्हाला त्याची गरज आहे. येशू केवळ तुमच्या पापक्षमेसाठी नाही, तर तुम्हाला त्याच्या जवळ आणावयासही मरण पावला. जर तुम्ही प्रभूला ओळखत नसाल तर तुम्हाला ह्या उद्देषाने त्याला ओळखावयास हवे. जर आपला नवीन जन्म झाला असेल,तर तुम्हाला आपली पापे क्षमा करुन घेण्याच्याही पलिकडे जाऊन पित्याबरोबरच्या अनंतजीवनात प्रवेश करावयास हवा.

## सार्वकालिक जीवनाबद्दलचे सत्य

अ. सुसमाचाराचा हेतू आहे सर्वकाळचे जीवन (योहान ३ : १६)
ब. सर्वकाळचे जीवन म्हणजे देवाला ओळखणे (योहान १७ : ३)
क. देवाला ओळखणे म्हणजे देवाबरोबर जवळचे घनिष्ट नाते (करिन्थकरांस पहिले पत्र 6 : १६– १७)
ड. सर्वकाळचे जीवन आता उपलब्ध आहे.(योहानाचे पहिले पत्र ५: १२)
ई. परमेष्वर तुमच्याषी व्यक्तिगत नाते प्रस्थापित करु इच्छितो. (प्रकाषितवाक्य ३:२०)

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा योहान ३:१६. येशूला जगात पाठविण्यात देवाचा कांय हेतू होता?

**योहान ३ : १६** – *देवांने जगावर एवढी प्रिती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सावकालिक जीवन प्राप्त व्हावे.*

२. पवित्र शास्त्रानुसार देवाला "ओळखणे " म्हणजे देवाबरोबर आपले जवळचे नाते, व्यक्तिबरोबर वैयक्तिक संबंध (उत्पति ४:१). वाचा योहान १७ : ३ ह्या वचनानुसार सार्वकाळचे / अनंतकाळचे जीवन म्हणजे काय?

**उत्पति ४ : १** – *आदामाने आपली स्त्री हव्वा हिला जाणिले; ती गर्भवती होऊन तिने काइनास जन्म दिला; ती म्हणाली परमेश्वराच्या साहाय्याने मला पुत्रसंतान लाभले आहे.*

**योहान १७ : ३** – *सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला,व ज्याला तू पाठविले त्या येशू ख्रिस्ताला ( मी ) त्यांनी ओळखावे.*

३. वाचा योहानाचे पहिले पत्र ५ : ११ – १२. ह्या वचनानुसार अनंतकाळाचे, सार्वकाळचे जीवन केव्हां सुरु होते ?

**योहानाचे पहिले पत्र ५ : ११ - १२** – *ती साक्ष हीच आहे की , देवाने आपल्याला सार्वकालिक जीवन दिले आणि हे जीवन पुत्राच्या ठायी आहे. ( १२ ) ज्याला तो पुत्र लाभला आहे; ज्याला देवाचा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही.*

४. वाचा योहान १० : १०. आपल्याला येशू कश्याप्रकारचे जीवन देण्यासाठी आला?

**योहान १० : १०.** – *चोर येतो (सैतानाला उद्देशून) तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवन प्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.*

५ . आपल्या शब्दात विपुल जीवनाचे गुणधर्म सांगा.

६. आपला विश्वास आहे का की देवाने स्वतःच्या पुत्राला समस्त मानवजातीच्या पापासाठी मृत्युदंड दिला, म्हणजे जे त्याच्यावर विश्वास ठेवतील त्यांना सार्वकाळचे जीवन प्राप्त होइल?

७. तुम्हाला हे स्पष्ट झाले आहे का की (सार्वकाळचे जीवन ) हे नुसतेच; अंनतकाळासाठी अमर्याद समयाचे  नसून गुणात्मक दर्जेदार आणि विपुल प्रमाणात सुध्दा आहे?

# उत्तरावली

१. वाचा योहान ३ : १६. येशूला जगात पाठविण्यात देवाचा कांय हेतू होता?

*जगाच्या तारणासाठी, येशूवर विश्वास ठेवण्यासाठी पापदंड दूर करुन सार्वकाळचे जीवन देण्यासाठी*

२. पवित्र शास्त्रानुसार देवाला "ओळखणे "/जाणणे म्हणजे देवाबरोबर आपले जवळचे नाते, व्यक्तिबरोबर वैयक्तिक संबंध (उत्पति ४:१) वाचा योहान १७ : ३. ह्या वचनानुसार सर्वकाळचे जीवन म्हणजे काय?

*सर्वकाळचे जीवन म्हणजे देवाला व येशू ख्रिस्ताला ओळखणे; (शारीरिक रित्या नाही परतु घनिश्ट संबंधाने)*

३. वाचा योहानाचे पहिले पत्र ५ : ११ – १२ ह्या वचनानुसार अनंतकाळाचे, सार्वकाळचे जीवन केव्हां सुरु होते?

*जेव्हा आपण पुत्राला ; ( येशू ख्रिस्ताला ), जीवनात ग्रहण करु*

४. वाचा योहान १० : १० येशू कश्याप्रकांरचे जीवन देण्यासाठी आला?

*विपुल जीवन!*

५. स्वतःच्या शब्दात विपुल जीवनाचा दर्जा किंवा गुणधर्म स्पष्ट करा

*विपुल जीवन हे त्या जीवनाच्या उलट असेल जे चोर आपल्या जीवनात करतो जसे येशूने सांगितले.*

६. आपला विश्वास आहे का की देवाने स्वतःच्या पुत्राला समस्त मानवजातीच्या पापासाठी मृत्युदंड दिला, म्हणजे जे त्याच्यावर विश्वास ठेवतील त्यांना सार्वकाळचे जीवन प्राप्त होइल?

*होय*

७. तुम्हाला हे स्पष्ट झाले आहे का की सार्वकाळचे जीवन हे नुसतेच अंनतकाळासाठी अमर्याद समयाचे नसून गुणात्मक दर्जेदार आणि विपुल प्रमाणात सुध्दा आहे?

*होय*

# पाठ क्रमांक २

# कृपे़द्वारा उ़ध्दार

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

येशूने बहुतेक वेळा आत्मिक सत्य सांगण्यासाठी दाखल्यांचा, गोष्टींचा उपयोग केला. लूक १८ : ६ – १४ अश्या प्रकारे सुरु करते की, *"आपण धार्मिक आहो असा भरवसा धरुन इतर सर्वास तुच्छ मानीत होते त्यांनाहि त्याने एक दाखला सांगितला. तो असा;"* येशू विशिष्ट श्रोत्यांवर निशाना साधत होता.: जे स्वतःस धार्मिक मानत अनायासे इतर सर्वाचा. द्वेष करीत आणि सर्वास तुच्छ मानीत. हा दाखला तो अश्यांसाठी सांगत आहे जे स्वतः केलेल्या चांगल्या कृत्यावर भरवसा ठेवून आहेत. आपण त्यांना स्वतःची धार्मिकता म्हणतो, म्हणूनच येशू बोलताना म्हणाला की जेव्हा ते इतरांना तुच्छ लेखतात तेव्हा असे म्हणतात की, "मी तर इतरांपेक्षा चांगला आहे!"

वचन १०, मध्ये येशू म्हणाला की, *"एक परुशी आणि एक जकातदार असे दोघे जण प्रार्थना करावयास वर मंदिरात गेले"* आताच्या काळात समजूया की ते प्रार्थनेसाठी चर्चला गेले, त्यातील एक परुशी आहे परुशी मोठा धार्मिक मनुष्य होता. शब्दशः "इतरांपेक्षा वेगळा," इतका धार्मिक मनुष्य की तो म्हणत असे," मला शिवू नका! माझ्या वाऱ्यालाही उभे राहू नका. मी काही अैरागैरा नाही! मी तुमच्या सर्वाहून श्रेष्ठ आहे!" दुसऱ्या माणसाविषयी येशू म्हणतो की तो एक सामान्य कर वसुली करणारा होता. तो एक जकातदार होता आणि जकातदार फारच दुष्ट म्हणून ओळखले जाई, असा पापी माणूस जो दुसऱ्यांना फसवी आणि दगाबाजी करी. ज्या ज्या मार्गानी तो कर वसुल करु शकेल त्या त्या मार्गानी तो वसूल करी. खोऱ्याने पैसे लुबाडी आणि स्वतः च्या तिजोऱ्या भरत असे, आणि त्यातून काही रोमी शासनाला देत, म्हणूनच त्यांच्या लोकांना जकातदार आवडत नसत.

वचन ११ मध्ये गोष्ट पुढे सरकते, *“परुश्याने उभे राहून स्वतः शी अशी प्रार्थना केली; हे देवा. इतर माणसे लुबाडणारी ,अधर्मी , व्यभीचारी आहेत. त्यांच्यासारखा किंवा ह्या जकातदारासारखाहि मी नाही, म्हणून मी तुझे आभार मानतो.”* येथे लक्षात घ्या. तो कोणाला प्रार्थना करतो आहे ? खरं पाहिस तर जरी तो “देवाचे” नाव घेत आणि योग्य शब्दात प्रार्थना करत आहे तरी तो स्वतःलाच पूजत आहे, देव त्याची प्रार्थना मान्य करत नाही, असे का ते आपण नंतर पाहू .त्याच्या प्रार्थनेकडे लक्ष द्या, “देवा मी तुझा आभारी आहे की मी त्यांच्यासारखा नाही.” हा परुशी धार्मिक मनुष्य बोलत आहे, “मी दुसऱ्यांसारखा नाही. मी पापी नाही. मी लुबाडणारा नाही,. अधर्मी नाही, व्यभीचारी नाही. मी ह्या प्रार्थना करणाऱ्या जकातदारासारखा नाही.” पाहिलत तो दुसऱ्यांना हीन लेखत आहे कारण तो स्वतःला त्यांच्यापेक्षा उच्च समझत आहे.

वचन १२ मध्ये परुशी बोलत आहे, *“मी आठवडयातून दोनदा उपास करतो; जे मला मिळते त्या सर्वाचा दशांश देतो.”* तो म्हणत आहे, “माझ्या कार्याकडे लक्ष द्या” तुम्हाला खरा उपवास ठाऊक आहे का? ह्याचा खरा अर्थ काहीही अन्न सेवन न करता राहणे. तो चर्चला पैसे देतो. तो अश्या लोकांपैकी आहे जे म्हणतात, *“माझे तर सर्व यथायोग्य आहे! मी शुध्द जीवन जगतो! मी दानधर्म करतो! चर्चला दशांश देतो!”*

आता वचन १३, मध्ये आपण जकातदाराला ऐकतो : *“जकातदार दूर उभा राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यास देखील न धजता आपला ऊर बडवीत म्हणाला , हे देवा मज पाप्यावर दया कर..”* त्याच्यां देहबोली कडे लक्ष द्याः *“दूर उभा राहून”* तो चर्चमध्ये जाण्यास सुध्दा धजला नाही. त्याला आपल्यां जीवना विषयी आणि त्याने केलेल्या कृत्याविषयी इतकी लाज वाटत होती की तो दूर उभा होता व तो वर मान करुन, स्वर्गाकडे बघण्यास ही तयार नव्हता, तो तर आपला ऊर बडवत राहिला. जुना करारात जेव्हा ऊर बडविण्या बाबत बोलले जाते तेव्हा पुष्कळदा असे करताना लोक अंगावरची वस्त्र फाडत, असे करताना ते म्हणत, “माझ्या कृत्यांबद्दल मी क्षमा मागत आहे!” हे होते पश्चातापाचे चिन्ह, एक भग्न ह्रदय, छिन्न विछिन्न आत्मा. कर वसूल करणारा, स्वतः पापी मनुष्य मानत तो देवाजवळ टाहो फोडत अश्या प्रकारे प्रार्थना करीत आहे की, “देवा मज पाप्यावर दया कर, मी पापी आहे!”

आता वचन १४ म्हणते की *“मी तुम्हास सांगतो, त्या दुसऱ्यापेक्षा हा नीतिमान ठरुन खाली आपल्या घरी गेला; कारण जो कोणी आपणाला उंच करतो तो नमविला जाईल, आणि जो कोणी आपणाला नमवितो तो उंच केला जाईल”* जकातदार

नीतिमान ठरुन घरी ंगेला, देवासमोर धर्मी ठरुन, पापक्षमा झालेला. त्याला क्षमादान का मिळाले़? का धार्मिक परुशी नाही तर जकातदार देवासमोर नीतिमान ठरला? कारण परुश्याने स्वतःला असे म्हणत उंचाविले की, "मी दुसऱ्यांपे़क्षा धर्मी आहे! मी पापी नाही! मी इतरांपे़क्षा चांगला आहे" जकातदार जाणून होता की देवासमोर उभी राहण्याची त्याची पात्रता नाही, तो काहीही देवाला देऊ शकणार नाही. तो एक पापी मनुष्य आहे. पवित्र शास्त्र म्हणते येशू धर्मी लोकांस तारावयास आला, आणि आपण सर्वानी पाप केले आहे आणि देवाच्या गौरवाला उणे पडलो आहोत. ह्या जकातदाराने स्वतःला नम्र करुन त्याने देवाकडून क्षमा मिळाली आणि  त्याला पापमुक्ती मिळाली.

आपण कृपेद्वारा उध्दार ह्या विषयी बोलत आहोत. कृपा हा अदभुत शब्द आहे, मी ह्याची सर्वमान्य व्याख्या तुम्हाला सांगतो, परंतु कृपा ह्या पेक्षा बरेच काही आहे. नवा नियम ज्या ग्रीक भांषेत लिहिला गेला, त्या ग्रीक भंाषेत शब्द आहे Charis- कृपेची सर्वमान्य व्याख्या आहेः फुकट, लायकी नसताना परमेश्वरापासून मनुष्यावर कृपा. जकातदाराला देवाकडून काहीही मिळण्यासारखे नव्हते, परंतु त्याला परमेश्वरीय अनुग्रह प्राप्त झाला कारण त्याने स्वतःला नम्र केले. ग्रीक भंाषेतील आणखीन एक शब्द आहे, Charismaa जे आहे  Charis  ज्याचा शेवट suffix-ma ह्या शब्दाने होतो. त्याचा अर्थ देवाकडून अनुग्रहाचे विशिष्ट प्रगटीकरण, आणि जकातदाराला नितिमत्त्व प्राप्त झाले. देवासमोर धर्मी, धार्मिकता देवाकडून फुकट भेट म्हणून.

रोमकरांस पत्र ५ः १७ म्हणते *"तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरुन त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करितील."* देव मला व तुम्हाला भेट म्हणून त्याच्या समोर नीतिमान ठरवितो, आपल्या परिच्छेदा प्रमाणे जकातदाराला नीतिमान आणि धार्मिकतेचे बक्षीस मिळाले. जे केवळ येशू ख्रिस्ताद्वारे प्राप्त झाले. पवित्र शास्त्र योहान १ : १७ मध्ये म्हणते "कारण नियमशास्त्र मोशेच्या द्वारे देण्यात आले होते; कृपा व सत्य ही येशू ख्रिस्ताच्या द्वारे आली." ही कृपा फक्त अश्याच एका लोकांसाठी आहे – जे स्वतःला नम्र करतात आणि हे मान्य करतात की ते देवासमोर नीतिमान ठरु शकत नाही, म्हणून ते देवाकडे दयेची याचना करतात. अश्या सर्वाना देवाकडून क्षमा आणि अनुग्रह प्राप्त होतो.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा लूक १८ : ६ दाखले म्हणजे काय?

**लूक १८ : ६ - १२** - *" आपण धार्मिक आहो असा भरवसा धरुन इतर सर्वास तुच्छ मानीत होते त्यांनाहि त्याने एक दाखला सांगितला. तो असा ;" {१०}" एक परुशी आणि एक जकातदार असे दोघे जण प्रार्थना करावयास वर मंदिरात गेले" {११}" परुश्याने उभे राहून स्वतः शी अशी प्रार्थना केली ; हे देवा. इतर माणसे लुबाडणारी, अधर्मी, व्यभीचारी आहेत. त्यांच्यासारखा किंवा ह्या जकातदारासारखाहि मी नाही, म्हणून मी तुझे आभार मानतो. " "{१२}, " मी आठवडयातून दोनदा उपास करतो; जे मला मिळते त्या सर्वाचा दशांश देतो. "*

२. वाचा लूक १८ : ६ येशू ह्या दाखल्याद्वारा कोणाला निर्देशित करत आहे?

३. वाचा लूक १८ : ६ (वचनातील शेवटचा भाग ) स्वतःला धार्मिक समजणारे लोकांची वागणूक दुसऱ्याशी कशी असते ? लूक १८ : ६ प्रमाणे ती वागणूक म्हणजे काय?

अ. त्यांना दुसरी लोक आवडतात.

ब. ते इतरांना तुच्छ लेखतात आणि क्षुद्र समजतात.

क. ते इतरांवर प्रेम करतात.

४. वाचा लूक १८ : १० दोन लोक प्रार्थना करावयास गेले; आताच्या काळानुसार ते प्रार्थनेसाठी कोठे गेले?

५. वाचा लूक १८ : १० ही दोन लोक कोण होती?

६. वाचा लूक १८ : ११ परुश्याची प्रार्थना काय होती?

७. वाचा लूक १८ : १२ उपासाचा अर्थ काय?

८. वाचा लूक १८ : १२ दशांश देणे म्हणजे?

९. वाचा लूक १८ : १३ जकातदार कोठे उभा होता ? कंशासाठी?

**लूक १८ : १३ - १४** – *जकातदार दूर उभा राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यास देखील न धजता आपला ऊर बडवीत म्हणाला , हे देवा मज पाप्यावर दया कर. {१४} मी तुम्हास सांगतो, त्या दुसऱ्यापेक्षा हा नीतिमान ठरुन खाली आपल्या घरी गेला; कारण जो कोणी आपणाला उंच करतो तो नमविला जाईल, आणि जो कोणी आपणाला नमवितो तो उंच केला जाईल*

१०. वाचा लूक १८ : १३ जकातदाराने मान खाली का घातली आणि तो वर स्वर्गाकडे बघण्यास का धजत नव्हता?

११. वाचा लूक १८ : १३ जकातदाराची प्रार्थना काय होती?

१२. वाचा लूक १८ : १४ दोघांपैकी कोण देवासमोर नीतिमान ठरुन घरी गेला?

१३. वाचा लूक १८ : १४ परुशी नाही तर जकातदार का धर्मी ठरवला गेला?

१४. वाचा लूक १८ : १४ देवाने जकातदाराला क्षमा केली का?

१५. वाचा रोम १० : १३ जर आता तुम्ही गुडघ्यावर येऊन मनापासून देवाला अशी विणवनी केली की" देवा मज पाप्यावर दया कर, मी . पापी आहे ! तर देव जकातदाराशी जसा वागला अगदी तसेच तुमच्याशी वागेल का?

**रोम १० : १३** – *कारण जो कोणी प्रभूचे नाव घेऊन त्याचा धावा करील त्यांचे तारण होईल.*

**१ योहान १ : ८ - ९** - *आपल्या ठायी पाप नाही असे जर आपण म्हणत असलो, तर आपण स्वतःला फसवितो व आपल्या ठायी सत्य नाही.{९}जर आपण आपली पापें पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुध्द करील.*

# उत्तरावली

१. वाचा लूक १८ : ६ दाखले म्हणजे काय?

*पवित्र शास्त्रतील दाखले जे आत्मिक सत्य दर्शवितात.*

२. वाचा लूक १८ : ६ येशू ह्या दाखल्याद्वारा कोणाला निर्देशित करत आहे?

*अश्यांसाठी की जे स्वतःच्या धार्मिकतेवर भरवसा ठेवून ; स्वतला धर्मी म्हणवतात.*

३. वाचा लूक १८ : ६ (वचनातील शेवटचा भाग) स्वतःला धार्मिक समजणारे लोकांची वागणूक दुसऱ्याशी कशी असते?
लूक १८ : ६ प्रमाणे वागणूक म्हणजे काय?

*ब. ते इतरांना तुच्छ लेखतात आणि क्षुद्र समजतात.*

४. वाचा लूक १८ : १० दोन लोक प्रार्थना करावयास गेले; आताच्या काळानुसार ते प्रार्थनेसाठी कोठे गेले?

*चर्चला गेले.*

५. वाचा लूक १८ : १० ही दोन लोक कोण होती?

*परुशी आणि जकातदार/कर वसुल करणारा.*

६. वाचा लूक १८ : ११ परुश्याची प्रार्थना काय होती?

*"परुश्याने उभे राहून स्वतः शी अशी प्रार्थना केली ; हे देवा. इतर माणसे लुबाडण ाारी ,अधर्मी , व्यभीचारी आहेत. त्यांच्यासारखा किंवा ह्या जकातदारासारखाहि मी नाही, म्हणून मी तुझे आभार मानतो."*

७. वाचा लूक १८ : १२ उपासाचा अर्थ काय?

*काहीही अन्न सेवन न करता राहणे.*

८. वाचा लूक १८ : १२ दशांश देणे म्हणजे?

*रक्कमेतून दहावा हिस्सा देणे.*

९. वाचा लूक १८ : १३ जकातदार कोठे उभा होता ? कंशासाठी?

*चर्चपासून दूर उभा होता.*

कंशासाठी?

*त्याला चर्चमध्ये (सभास्थानात) जाण्यास लाज वाटत होती कारण तो महापापी होता, म्हणून तो दूर उभा होता.*

१०. वाचा लूक १८ : १३ जकातदाराने मान खाली का घातली आणि तो वर स्वर्गाकडे बघण्यास का धजत नव्हता?

*त्याला लाज वाटत होती.*

तुमच्या हातून चुक घडली आणि म्हणून समोरच्या व्यक्तिला तोंड दाखविण्याची ही तुम्हाला लाज वाटत होती; असे कधी झाले आहे?

११. वाचा लूक १८ : १३ जकातदाराची प्रार्थना काय होती?

*"देवा मज पाप्यावर दया कर, मी. पापी आहे!"*

१२. वाचा लूक १८ : १४ दोघांपैकी कोण देवासमोर नीतिमान ठरुन घरी गेला?

*जकातदार*

१३. वाचा लूक १८ : १४ परुशी नाही तर जकातदार का धर्मी ठरवला गेला?

*कारण त्याने स्वतःला देवासमोर नम्र केले. परुश्याला स्वतः बद्दल गर्व होता. त्याला तारणाची आवश्यकता नव्हती.*

१४. वाचा लूक १८ : १४ देवाने जकातदाराला क्षमा केली का?

*होय*

१५. वाचा रोम १० : १३ जर आता तुम्ही गुडघ्यावर येऊन मनापासून देवाला अशी विणवनी केली की "देवा मज पाप्यावर दया कर, मी पापी आहे! तर देव जकातदाराशी वागला अगदी तसेच तुमच्याशी वागेल का?

***होय. तो करेल. तो आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुध्द करील.***

बघा योहानाचे पहिले पत्र १ : ८ – ९

# पाठ क्रमांक ३

# कृपेद्वारा धार्मिकता

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

आज आपण कृपेद्वारा धार्मिकता या विषयावर बोलणार आहोत, रोम ३ : २१ –२३ म्हणते, *"आता तर नियमशास्त्राव्यतिरिक्त असे जे देवाचे नीतिमत्व ते प्रगट झाले आहे; त्याला नियमशास्त्राची व संदेष्टयांची साक्ष आहे; हे देवाचे नीतिमत्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वासाठी आहे ; त्यात भेदभाव नाही. कारण सर्वानी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे* { अपूरे} *पडले आहेत."* (मी )

लक्ष द्या वचन म्हणते, *"आता तर नियमशास्त्राव्यतिरिक्त असे जे देवाचे नीतिमत्व ते प्रगट झाले आहे;"* मी एकदा एका माणसाला विचारले की, " स्वर्गात जाण्यासाठी काय करावे लागेल असे तुम्हाला वाटते? "त्याचे उत्तर होते दहा आज्ञा पाळणे, बायकोशी प्रामाणिक राहणे, नैतिकता बाळगणे, आणि इतर अनेक योग्य बाबी. मी म्हणालो," तुम्हाला जाणून घ्यायचे आहे का की स्वर्गात जाण्यासाठी; देवाच्या सानिध्यात किंवा त्याच्या राज्यासाठी काय करावे लागेल? त्यासाठी आपल्यापाशी देवा एवढीच धार्मिकता असायला हवी. " तो म्हणाला, "क्षमा असावी ? देवा एवढी धार्मिकता तर कोणाजवळही नाही. एकाच मानवापाशी एवढी धार्मिकता आहे आणि तो आहे येशू ख्रिस्त. "मी म्हणालो, "तुमच्या बोलण्यात तथ्य तर आहे! "हे तर निर्विवाद सत्य आहे! आपल्यात कोणीही आज्ञा किंवा नियमशास्त्र तंतोतंत पाळू शकणारा नाही अंतःकरणातूनही नाही की व्यवहारतही नाही, तथापि देवापुढे स्विकृती हेतू आपल्यापाशी त्याच्या तोलामोलाची धार्मिकता असणे अगत्याचे आहे."

वचन २१ –२२ नेमके हेच म्हणते, *"आता तर नियमशास्त्राव्यतिरिक्त असे जे देवाचे नीतिमत्व ते प्रगट झाले आहे; त्याला नियमशास्त्राची व संदेष्टयांची साक्ष आहे;*

*हे देवाचे नीतिमत्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वासाठी आहे."* ज्या प्रकारची धार्मिकता देव मला आणि तुम्हाला देऊ करतो ती आहे "येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे" विश्वास ठेवणाऱ्या सर्वासाठी आहे .येथे दोन प्रकारची धार्मिकता आहे – मनुष्याची धार्मिकता आणि देवाची धार्मिकता. मनुष्याची धार्मिकता म्हणजे त्यांची उत्तम कार्ये आणि त्यांचे सर्वोतम सदाचरण, परंतु त्याने आपण देवाला मान्य होणार नाही. आपल्याकडे देवाच्या तुल्य धार्मिकता हवी आहे, आणि ती तो आपल्याला देत आहे – नियमशास्त्राविरहीत देवाची धार्मिकता

ग्रीक भाषेत, विशिष्ट व्यंजन नाही, ह्याचा अर्थ हे वाक्य खऱ्या अर्थाने असे म्हणते की देव नियमशास्त्राविरहीत त्याची धार्मिकता देऊ करत आहे. नियमशास्त्राप्रमाणे धार्मिकता म्हणजे कार्य, स्वत कमावलेली आणि देवाला आपली कार्ये मान्य व्हावीत म्हणून चाललेली खटाटोप. शब्द "सुसमाचार " म्हणजे "चांगली बातमी" आणि सुसमाचारात चांगली बातमी ही आहे की देव स्वतःची धार्मिकता देऊ करत आहे – एकाच शर्तीवर येशू ख्रिस्ताद्वारे जे प्राप्त झाले; ते म्हणजे आपल्या पापांसाठी त्याचे क्रुसावरचे बलिदान, त्यावर विश्वास ठेवून स्विकारणाऱ्या सर्वाना – नियमशास्त्राप्रमाणे धार्मिकता प्रदान करणे. ही आहे देवाची धार्मिकता नियमशास्त्रापेक्षा वेगळी, आपल्या कर्मानी नाही, कमवलेली नाही, मिळवलेली नाही; तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे मिळालेली.

लक्ष द्या वचन २२ म्हणते, हे देवाचे नीतिमत्व जे येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वासाठी व सर्वाकरिता आहे. असे का की परमेश्वर प्रत्येकासाठी धार्मिकता उपलब्ध करुन देत आहे ? *त्यात भेदभाव नाही. कारण सर्वानी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे {*अपूरे*} पडले आहेत."* मी पाप केले आहे, तुम्ही पाप केले आहे, आपण सर्वच देवाच्या स्तराला आणि सिध्दतेला उणे भरलो आहोत. आमच्या पापांमुळे, सर्वात महत्वाची बाब म्हणजे देवाने आपला स्विकार करायला पाहिजे, देवा बरोबर आमचा संबंध प्रस्थापित व्हायला हवा......, आणि हे देव आपल्याला नियमशास्त्राच्या कार्याद्वारे नाही तथापि येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे देऊ करतो. देवाची धार्मिकता आपल्या कर्मानुसार, खटाटोपानुसार, आपल्या कमवल्याने, आपण मिळवल्याचा अट्टाहास केल्याने मिळत नाही; ती तर देवावर विश्वास ठेवून, विसंबून, आणि येशू ख्रिस्तावरील भरवशामुळे प्राप्त होते.

लक्ष दया कशा प्रकारे अब्राहामाचा (यहूदयांच्या पूर्वजाचा) उध्दार झाला? पवित्र शास्त्र म्हणते त्याने देवावर विश्वास ठेवला – देवाने दिलेल्या अभिवचनावर विश्वास ठेवला – आणि हे त्याच्यासाठी नीतिमत्व गणल गेले. वास्तविकता ही होती की अब्राहाम एकमेव त्याच्या देवावरील विश्वासाच्या द्वारे नीतिमान नाही ठरला. आपण रोम ३:२१–२२ मनुष्य येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे नीतिमान ठरतो. पवित्र शास्त्र म्हणते की ख्रिस्ताने क्रुसावर रक्त वाहले , त्याने आपल्या पापांची खंडणी भरली, म्हणून केवळ ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला वैयक्तिकपणे (देवासमोर नीतिमान) धर्मी गणले गेले.

रोम ५:१७ म्हणते, *"कारण जर त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्वाचें दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरुन त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करितील."* देव तुम्हाला धार्मिकतेची भेट देत आहे, देवासमोर निर्दोष उभे राहण्यासाठी भेटवस्तुची किंमत तर मोजावी लागते पण ज्याला ती मिळते त्याला नाही. जर तुम्ही मला भेटवस्तु दिली आणि किंमत ही माझ्याकडूनच वसूल केली तर ती भेटवस्तु असणारच नाही, परतु देण्याऱ्याला मोल देऊन ती विकत द्यावी लागेल. परमेश्वराने मला आणि तुम्हाला धार्मिकता भेट म्हणून उपलब्ध करुन दिली , आणि हीच धार्मिकतेची भेट आहे, निर्दोष सोडावयास, येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे देवासमोर न्यायी ठरावयास.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा तीताला पत्र ३: ५. आपणास आपण निर्माण केलेली धार्मिकता हवी आहे का?

**तीताला पत्र ३ : ५** *–तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीनीकरण ह्याच्याद्वारें त्याने आपल्या दयेनुसार आपणास तारिले.*

२. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५ : २१. आपणास कश्याप्रकारची धार्मिकता हवी आहे?

**करिंथकरांस दुसरे पत्र ५ : २१** – *ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्यासाठी पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे.*

३. वाचा रोमकरांस पत्र ३ : २२ – आपणास धार्मिकता कशी प्राप्त होईल?

**रोमकरांस पत्र ३ : २२** – *हे देवाचे नीतिमत्व तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्व ारे विश्वास ठेवणाऱ्या सर्वासाठी आहे ; त्यात भेदभाव नाही. कारण सर्वानी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत. "*

४. वाचा फिलिप्पैकरांस पत्र ३ : ६. नीतिमत्वाची धार्मिकता म्हणजे काय?

***फिलिप्पैकरांस पत्र ३ : ६*** *– हे देवाचे आणि मी त्याच्या ठायी आढळावे आणि माझे नीतिमत्व – माझे स्वतःचे नव्हे म्हणजे नियमशास्त्राच्या योगे प्राप्त होणारे नीतिमत्व नव्हे – तर ते ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे प्राप्त होणारे म्हणजे देवापासून प्राप्त होणारे नीतिमत्व असे असावे.*

५. वाचा गलतीकरांस पत्र २ : २१. आपण देवाची कृपा कशी व्यर्थ करु शकतो?

**गलतीकरास पत्र २ : २१** – *मी देवाची कृपा व्यर्थ करीत नाही, कारण जर नीतिमत्व नियमशास्त्राच्या द्वारे असेल तर ख्रिस्ताचे मरण विनाकारण झाले.*

६. वाचा रोम ५: १७ देवाचे नीतिमत्व आपणास काय म्हणून मिळते?

**रोम ५ : १७** – *कारण जर त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्वाचें दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरुन त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करितील.*

# उत्तरावली

१. वाचा तीताला पत्र ३: ५ . आपणास आपण निर्माण केलेली धार्मिकता हवी आहे का?

*नाही*

२. वाचा २ करिंथकरांस ५:२१. आपणास कश्या प्रकारची धार्मिकता हवी आहे?

*देवाची धार्मिकता ( जी ख्रिस्ताकडून येते)*

३. वाचा ३ : २२. आपणास धार्मिकता कशी प्राप्त होईल?

*येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे*

४. वाचा फिलिप्पै ३ : ६ नीतिमत्वाची धार्मिकता म्हणजे काय?

*माझे स्वत:चे नीतिमत्व - मी केलेली चांगली धार्मिकतेची कामे*

५. वाचा गलती २ : २१. आपण देवाची कृपा कशी व्यर्थ करु शकतो?

*गलती २ : २१ - उध्दारासाठी ख्रिस्तावर आणि ख्रिस्ताच्या मरणावर विश्वास ठेवण्या ऐवजी स्वत:च्या चांगल्या कर्मावर भरवसा ठेवून आपण देवाची कृपा व्यर्थ करु शकतो.*

६. वाचा रोम ५ : १७ देवाचे नीतिमत्व आपणास काय म्हणून मिळते?

*एक भेट म्हणून*

# पाठ क्रमांक ४

# परमेश्वराशी नाते

*अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

नात्यातील अविभाज्य भाग हा आहे की ज्याच्याशी आपले नाते जुळले आहे त्या व्यक्तिला जाणणे आणि हेच देवाविषयीही लागू पडते. आपलेही देवाशी निकोप नाते प्रस्थापित होण्यासाठी देवाच्या चरित्र व स्वभावाबद्दल जाणून घेणे गरजेचे आहे. देवाच्या स्वभाव व चरित्रा बद्दल असलेला गैरसमजामुळे कित्येक लोक देवाशी निसंशय नाते ठेवू शकत नाही. आदाम व हव्वेबरोबर नेमक हेच एदेन बागेत झाले. जेव्हा सर्पाद्वारा त्यांना फसविले गेले. ते भुलवले गेले, शेवटी त्यांनी देवाची आज्ञा मोडली, आणि त्यांनी अखंड मानवजातिला पापात ओढले. ह्या भुल पडण्याच्या मुळात होते देवाच्या स्वभावाविषयी असलेले तोकडे ज्ञान.

उत्पत्ति ३ : १ – ५ तील गोष्ट सर्वानाच माहित असेलच : *"परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरात सर्प फार धूर्त होता, तो स्त्रीला म्हणाला, तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांस सांगितले हे खरे आहे काय? स्त्रीने सर्पास म्हटले, बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे. पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडांच्या फळांविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शहि करु नका, कराल तर मराल. सर्प स्त्रीला म्हणाला, तुम्ही खरोखर मरणार नाही ; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील आणि तुम्ही {मी}देवासारखे {परमेश्वरासमान }बरेवाईट जाणणारे व्हाल."*

येथे सैताना कडून एक मार्मिक वाक्य हे आहे की खरं पहाता परमेश्वर चांगला नाही........ तो आदाम व हव्वेपासन काहीतरी राखून ठेवत आहे.......जेणेकडून ते त्यांच्या सर्वोत्तमापर्यत पोहचू शकत नाही....... त्याला वाटत नाही की त्यांनी त्याच्यासमान

व्हावे......हेच कारण आहे. त्याने असा नियम बनवला की चांगले आणि वाईटाच्या ज्ञानाच्या झाडाचे फळ खाऊ नका. हा नियम फक्त त्यांना रोकण्यास किंवा त्यांना त्रास देण्यासाठी परमेश्वराने केलेला आहे. एका अर्थाने, सैतान देवाच्या स्वभाव व चरित्राच्या विरोधात गेला जेव्हा त्याने त्याला असे बोलून विकृति निर्माण केली की देवाला तुम्ही सर्वोत्तम नको आहात. आणि अगदी असेच आज लोकाबरोबर घडतय. सैतान त्यांना असे सांगतो की, *"जर तुम्ही देवाला भजता आणि ह्या सगळ्या गोष्टि पाळत नाही तर तुम्ही त्याच्या वचनाच्या विरोधात जाता, तर तुम्हाला खरा आनंद कधीही मिळणार नाही तुमचे जीवन कधीही सुखी होणार नाही. तुम्हाला जीवन नकोसे होऊन जाईल."* असे एक भीषण वास्तव हे आहे की लोकांना व्यसन,दारुबाजी, शरीरसुख, भोगविलास, कामधंदयात यश मिळूनही आत्मसंतृष्टि मिळत नाही ज्या घडीला त्यांना हे उमगते, तो पर्यत त्यांचे आयुष्य, कुटुंब, आणि शरीरस्वास्थ उध्वस्त झालेले असते.

सत्य हे आहे की परमेश्वर चांगला आहे, आणि आपल्या विषयी त्याची इच्छा चांगली आहे. पण आजही सैतान आदाम व हव्वे बरोबर केलेली हीच फसवणूक आपल्याशीही करतो, आपला हा समज करुन देऊन की देव चांगला नाही. पवित्र शास्त्राचे अल्पस ज्ञान असणारे अशी धारणा ठेवतात. कारण वचनात अश्या कितीतरी घटना सापडतात जेव्हा देव लोकांबरोबर क्रुरतेने,कठोरतेने वागला, गणना १५ : ३२ – ३६ मध्ये, एक मनुष्य शब्बाथवारी लाकडे गोळा करताना आढळला तेव्हा त्याला दगडमार करुन जीवे मारण्यात आले. ही तर किती क्रुरता वाटते, पण अश्या शिक्षेच्या मागे उद्देश आढळतो, वरवर पवित्र शास्त्राचे वाचन करणाऱ्या वाचकांना असे वाटणे साहजिकच आहे. तरी जुन्या करारातील नियमांचा निरिक्षण पूर्वक अभ्यास केल्यावर कळून येते की नियम असे देण्यात आले की हातून घडलेले पाप अत्याधिक पापमय ठरावे , ज्या प्रमाणे पौलुस रोम ७ : १३ मघ्ये म्हणतो.उद्देश हाच होता की त्यांचे उल्लंघन किती विनाशकारी आहे हे त्यांनी ओळखावे आणि असे की त्यांनी देवाच्या विरोधात पाप केले आहे. त्यांनी आपसातच एकमेकांशी तुलना करण्याची चूक केली आणि त्यांनी दुसऱ्यांच्या वागणुकीवरुन स्वतःची वागणूक मोजली.

जर कोणी एकाने पाप केले आणि त्याला मरण आले नाही तर त्यांनी विचार केला पाप करणे काही इतके वाईट असूच शकत नाही आणि अशाप्रकारे त्यांच्या मुल्यांचा ऱ्हास झाला. अशाने मग त्यांचा काय चूक आणि काय बरोबर ह्या कडे बघण्याचा दृष्टिकोनच हरपून गेला, देवाला मानवजातीला मूळ पदावर आणावयाचे होते, एका योग्य जीवनस्तरावर, जेणेकरुन ते सैतान व त्याच्या प्रलोभाला नाकारतील

आणि अयोग्य निवडीचे अंतिम परिणाम काय होतील ते ओळखतील. मग जेव्हा ते अश्यप्रकारं वागले तेव्हा त्यांच्यावर त्याने केलेले नियम लागू केले गेले.

देवाने जुन्या करारातील आज्ञा त्याचा असा उद्देश बोलून दाखवण्यासाठी नाही दिल्या की, " जो पर्यत तुम्ही असे वागणार नाही तो पर्यत मी तुमचा स्विकार करणार नाही. "असा त्याचा स्वभाव व चरित्र नाही उलटपक्षी त्याने आपल्यातील बऱ्या व वाईटाची संवेदना अधिकच प्रखर होण्यासाठी आणि आपल्याला उध्दारकाची गरज आहे ह्या सत्याकडे पूर्ववत आणण्याकरिता असे केले. समस्या ही आहे की लोक असा विचार करतात की देवाने त्यांच्यावर प्रेम करण्यासाठी त्यांच्याकडे सिध्दता असणे जरुरीचे आहे, म्हणूनच ते सरळसरळ स्वतःच्या कार्याच्या प्रमाणात त्याच्या प्रेमाला तोलतात.त्यांना वाटते की जो पर्यत त्यांच्या हातून सर्वकाही चांगलेच घडणार नाही तो पर्यत देवाला ते स्विकारार्थ होणार नाही, आणि पवित्र शास्त्राचा संदेश तर अशा प्रकारचा नाही.

देवाचे हृदय मानवाचा न्याय करावयास ..... त्यांची पापे मोजावयास ......... त्यांच्या पापांसाठी त्यांना शासन करावयास नाही. तर मानवाला त्याच्याबरोबर पुर्नस्थापित करावयाचा आहे. पवित्र शास्त्रातील परमेश्वराचे मानवासाठी हे हृदय आहे आणि आज तुमच्यासाठी ही हेच हृदय आहे. तुम्ही त्याच्या खऱ्या हृदयाला ओळखायला हवे की "देव प्रीती आहे." (योहानाचे पहिले पत्र ४ : ८) तो तुमची पापे घेण्यास ईच्छुक आहे आणि सगळेच जे तुम्हाला त्याच्यापासून दूर करते. त्याने अगोदरच येशू द्वारा हे केलेले आहे, आज तो तुमच्याशी नाते जोडू इच्छितो, तुमच्या कार्याच्या बळावर नाही; तर येशूने माझी पापे वाहिली ह्या तुमच्या विश्वासाच्या आधारावर. जीवनात अपयशी असलात तरीही आज तुम्ही देवाशी नाते जोडू शकाल. त्याला एवढेच हवे आहे की तुम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवावा.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा उत्पत्ति ३: १ सैतानाने हव्वेला काय विचारले?

**उत्पत्ति ३ : १** – *परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरात सर्प फार धूर्त होता, तो स्त्रीला म्हणाला, तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांस सांगितले हे खरे आहे काय?*

२. वाचा उत्पत्ति २ : १७ आणि ३ : ३ देवाने आदामाला वास्तविक बोललेल्या वाक्यात हव्वेने कोणते शब्द किंवा वाक्य जोडले?

**उत्पत्ति २ : १७** – *पण बऱ्यावाईटाचे ज्ञान करुन देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.*

**उत्पत्ति ३ : ३** – *पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडांच्या फळांविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शहि करु नका, कराल तर मराल.*

३. वाचा उत्पत्ति ३: ६. एकदाचा सैतानाने देवाच्या वचनाविषयी हव्वेच्या मनात संदेह सोडला , तेव्हा या वचनात तीने काय केले?

**उत्पत्ति ३ : ६** – *त्या झाडाचे फळं खाण्यास चांगले , दिसण्यात मनोहर आणि शहाणे करण्यात इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले व आपल्याबरोबर आपल्या पतीसहि ते दिले; व त्याने ते खाल्ले.*

४. वाचा उत्पत्ति ३: ८ –१० आदाम व हव्वेने पाप केल्यानंतरही, देव त्यांच्याबरोबर बोलत राहिला आणि त्यांच्याशी नाते ठेवून होता का?.

**उत्पत्ति ३ : ८ –१०** – *तेव्हा परमेश्वर देवाने आदामास हाक मारुन म्हटले, तू कोठे आहेस ? {१०} तो म्हणाला, मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.*

५. वाचा उत्पत्ति ३ : २२ – २४. देवाने आदाम व हव्वेला बागेतून काढून का टाकले?

**उत्पत्ति ३ : २२ - २४** - *त्या मग परमेश्वर देव बोलला पाहा, मनुष्याला बरेवाईट कळू लागून तो आमच्यातल्या एकासमान झाला आहे; तर आता कदाचित तो आपला हात जीवनाच्या झाडाला लावून त्याचेहि फळ काढून खाईल व सर्वकाळ जिवंत राहील. { २३} यास्तव ज्या जमिनीतून त्यास उत्पन्न केले होते, तिची मशागत करावी म्हणून परमेश्वर देवाने त्यास एदेन बागेतून बाहेर काढून लाविले { २५} देवाने मनुष्यास बाहेर घालविले आणि जीवनाच्या झाडांकडे जाणाऱ्या मार्गाची राखण करण्यासाठी एदेन बागेच्या पूर्वभागी करुबीम व गरगर फिरणारी ज्वालारुपी तरवार ठेवली.*

६. शिक्षेऐवजी दया दाखविण्याचे देवाचे वागणे तुम्ही पाहिलत का?

७. वाचा रोमकरास पत्र ५:१७. आपण देवाची विपूल दया आणि धार्मिकतेची भेट कशी प्राप्त करु शकतो?

अ. विकत घेऊन

ब. कमवून

क. स्विकारुन

**रोमकरास पत्र ५ : १७** - *कारण जर त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्वाचें दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरुन त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करितील.*

८. वाचा रोमकरास पत्र ६ : २३. पाप केल्यावर आपण कश्या प्रकारच्या शिक्षेस पा़त्र ठरतो?

**रोमकरास पत्र ६ : २३** - *" कारण पापाचे वेतन मरण आहे,पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशु ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे.*

९. कृपेद्वारे पर्याय म्हणून देव आपल्याला काय देतो?

१०. वाचा रोमकरास पत्र १० : ३ जर आपण देवापूढे स्वतःची धार्मिकता स्थापित करण्याचा प्रयत्न करु तर काय करण्यास चुकणार?

**रोमकरास पत्र १० : ३** – *कारण त्यांना देवाच्या नीतिमत्त्वाची जाणीव नसल्यामुळे व ते आपलेच नीतिमत्त्व स्थापावयास पाहत असल्यामुळे देवाच्या नीतिमत्त्वाला ते वश झाले नाहीत.*

११. वाचा योहानाचे पहिले पत्र १ : ६ आणि रोमकरांस पत्र ४ : ३ देवाच्या अभिवचनानुसार जर आपण फक्त देवावर विश्वास ठेवला तर तो आपल्या सर्व पापांनां आणि अशूध्दतेला काय करेल?

**योहानाचे पहिले पत्र १ : ६** – *जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अनीतीपासून शुध्द करील.*

**रोमकरास पत्र ४ : ३** – *कारण शास्त्र काय सांगते? अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि तें त्याला नीतिमत्त्व असे गणण्यांत आले.*

१२. देवाच्या चारित्र्याविषयी हे तुम्हाला काय सांगते?

# उत्तरावली

१. वाचा उत्पत्ति ३ : १ सैतानाने हव्वेला काय विचारले?

*“तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांस सांगितले हे खरे आहे काय?”*

२. वाचा उत्पत्ति २ : १७ आणि ३ : ३ देवाने आदामाला वास्तविक बोललेल्या वाक्यात हव्वेने कोणते शब्द किंवा वाक्य जोडले?

*त्याला स्पर्शहि करु नका, कराल तर मराल.*

३. वाचा उत्पत्ति ३ : ६. एकदाचा सैतानाने देवाच्या वचनाविषयी हव्वेच्या मनात संदेह सोडला , तेव्हा या वचनात तीने काय केले?

*तिने त्याचे फळ काढून खाल्ले.*

४. वाचा उत्पत्ति ३ : ६ –१० आदाम व हव्वेने पाप केल्यानंतरही, देव त्यांच्याबरोबर बोलत राहिला आणि त्यांच्याशी नाते ठेवून होता का?.

*होय*

५. वाचा उत्पत्ति ३ : २२ – २४. देवाने आदाम व हव्वेला बागेतून काढून का टाकले?

*त्यांनी जीवनाच्या झाडाचे फळ खाऊ नये आणि अनंतकाळासाठी पापमय दशेत राहू नये म्हणून .*

६. शिक्षेऐवजी दया दाखविण्याचे देवाचे वागणे तुम्ही पाहिलेत का?

*होय*

७. वाचा रोमकरांस पत्र ५ : १७ आपण देवाची विपूल दया आणि धार्मिकतेची भेट कशी प्राप्त करु शकतो?

*क. स्विकारुन*

८. वाचा रोमकरास पत्र ६ : २३ पाप केल्यावर आपण कश्या प्रकारच्या शिक्षेस पा़त्र ठरतो?

*मरणाच्या*

९. कृपेद्वारे पर्याय म्हणून देव आपल्याला काय देतो?

*येशू मध्ये सार्वकालिक जीवन*

१०. वाचा रोमकरास पत्र १० : ३ जर आपण देवापूढे स्वतःची धार्मिकता स्थापित करण्याचा प्रयत्न करु तर काय करण्यास चुकणार?

*येशूला आपली धार्मिकता म्हणून स्विकारण्यास*

११. वाचा योहानाचे पहिले पत्र १ : ९ आणि रोमकरांस पत्र ४ः ३ देवाचे अभिवचनानुसार जर आपण फक्त देवावर विश्वास ठेवला तर तो आपल्या सर्व पापांना आणि अशूद्धतेला काय करेल?

*त्यांना काढून टाकतो, स्मरणात आणत नाही, त्यांना विसरुन जातो.*

१२. देवाच्या चारित्र्याविषयी हे तुम्हाला काय सांगते?

*तो दयाळू आणि प्रेमळ आहे.*

# पाठ क्रमांक ५

# परमेश्वराचा स्वभाव

*ॲन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

परमेश्वराशी निकोप नाते असण्यासाठी, आपल्याला त्याचा स्वभाव आणि चरित्र जाणून घेणे आवश्यक आहे. आपल्या पापांमुळे तो आपल्यावर रुष्ट होतो का, की तो एक दयाळू देव आहे जो त्याचे जीवन व आर्शिवाद आपल्याला देण्यासाठी आपल्या कृतीवर विसंबून राहत नाही? वचन तर ह्या विषयीचे वास्तववादी असे दोन वेगळे दृष्टिकोन आपल्या पुढे मांडते, ह्यात त्याच्यात कधी बदल झालेला किंवा त्याने कार्यात तफावत केलेली आढळून आलेली नाही. असाही काळ होऊन गेला त्यात पवित्र शास्त्रात अशीही भाषा वापरलेली आढळते की, देवाने ”मानवाच्या विरोधात ते पाप ठरविले.”

लेकरांचे संगोपण करताना जे करावे लागते त्याबरोबर ह्याची तुलना आपण करु शकतो, जेव्हा मुले लहान असतात, तेव्हा त्यांच्याशी वादविवाद घालण्यात त्यांना पटवून देण्यात की कश्याप्रकारे चांगले वागावे किंवा आपल्या भावंडांची खेळणी हिसकावून घेऊन एकटयानेच वापरु नयेत ह्यात काहीही अर्थ नसतो. म्हणून  जरी त्यांना देव आणि सैतानाविषयी काहिच माहित नसते तरी त्यांच्यावर निर्बध आणावेच लागतात, किंवा मग स्वार्थी होऊन ते सैतानाला जणू आपल्या जीवनात वाव देत आहेत. त्यांना त्यांच्या अश्या वागण्यामागचा बोध लक्षात येत नाही, पण आता पर्यत त्यांच्या लक्षात आलेले असते की पुन्हा जर आपण असे वागलो तर आपल्याला शिक्षा मिळेलच.

ह्याच अर्थाचे, देवाचे जुन्या करारातील वर्तन होते. नव्याने जन्मण्याच्या पूर्वी, त्यांच्याकडे आपल्याकडे असलेला नवीन करारामधील आत्मिक दृष्टिकोन नव्हता, म्हणूनच त्यांच्यावर निर्बध लादून त्यांना शिक्षा देणे अनिवार्य होते, कित्येक वेळा मृत्युदंड देखील, पापापासून परावृत्त करण्यासाठी. कारण सैतान पांपा द्वारे लोकांचा नाश करत

होता, पापांवर संयम ठेवणे आवश्यकच होते, म्हणूनच नियम लावणे आवश्यक होते. जरी अशामुळे लोकांमध्ये देवाविषयीची अशी प्रतिमा तयार होत होती की देव खरे सांगायचे झाल्यास आमच्या पापांमुळे आमच्यावर प्रिती करत नाही, अशी शिकवण तर देवाचे वचन देत नाही, रोम ५ : १३ म्हणते, "कारण नियमशास्त्रापूर्वी पाप जगात होतेच; पण नियमशास्त्र नसले म्हणजे पाप गणण्यात येत नाही." जेथे नियमशास्त्र नाही तेथे देवाचे चरित्र गणण्यात आले नाही. यहूदी राष्ट्राला "नियमशास्त्रापूर्वी" मोशेच्या दिवसापर्यंत" देवाने दहा आज्ञा दिल्या आणि अन्य उत्सव साजरीकरणाचे नियम लावून दिले. त्या वेळेपर्यंत, जगात पाप तर होते पण ते पाप म्हणून गणले गेले नाही. "गणणे" हा जमाखर्च मांडताना वापरला जाणारा शब्द आहे. उदाहरणार्थ आपण दुकानातून वस्तू खरेदी केली आणि दुकानदाराला सांगितले की, "खात्यात मांडून टाक" जेव्हा माझ्या खात्यात पैसे मांडले जातात आणि माझ्या खात्यातून घेतले जातात, तेव्हा मी खरेदी केली आहे असे मानले जाते. जर खात्यातच मांडले नाही गेले तर, माझ्या खात्यातून पैसे घेतले जाणार नाहीत आणि मी खरेदी केली असे मानले जाणार नाही.

हे वचन म्हणत आहे की दहा आज्ञा देण्याच्या पूर्वीच्या समयी, लोकांसाठी पाप म्हणून गणले जात नव्हते. हे एक अद्‌भुत वाक्य आहे. उत्पत्ति ३ आणि ४ पाहा. बहुतांशी लोकांची अशी धारणा आहे की जेव्हा आदाम व हव्वेने परमेश्वराविरुध्द पाप केले, कारण तो तर पवित्र आहे आणि मानव तर पापी आहे, पापी मानवजातीशी त्याचे काहीही देण–घेण नाही. त्यांच्या मते देवाने पापी मानवजातीला बागेतून हाकून टाकले व त्याच्या सानिध्यातून दूर लोटले कारण पवित्र देवाचा अशुध्द मानवाशी काहीही संबंध नाही. पुढे जाऊन ते असा विचार करतात की जो पर्यत चांगले कर्म करुन आपण स्वतःला शुध्द ठेवत नाही, तो पर्यत देवाशी आपले संबंध पूर्ववत होणार नाही. हा तर येशूने आणलेल्या संदेशाच्या उलट आहे. रोमकरांस पत्र ५ :८ म्हणते देवाने तर आपल्यावरच्या प्रेमाचे प्रमाण दिलेले आहे की आपण पापी असतानाच, ख्रिस्ताने आमच्यासाठी प्राण दिला; तर मग नवीन करार असे शिकवतो की आपण पापमय जीवन जगत असतानाच देवाने आपणावर प्रेम प्रगट केले; तुम्ही तुमची कार्य शुध्द केल्यावर नाही. सुसमाचाराचे एक महान सत्य जे तुमचे जीवन बदलून टाकेल ते हे जाणून घेणे की तुम्ही जसे आहात तसेच देवाला आवडतात. त्याचे तुमच्यावर इतके प्रेम आहे की एकदा तुम्ही त्याचे प्रेम स्विकारल्यावर पूर्वी सारखे रहाणारच नाही. तुमच्यात बदल होईल पण तुम्ही देवाचे प्रेम मिळविण्यासाठी नाही तर त्याच्या प्रितीने तुम्ही परावर्तित व्हाल.

उत्पत्ति ४ मध्ये आपण पाहतो की देव अजूनही मानवाशी साहचार्याने होता. अजूनही आदाम व हव्वेने पाप केल्यावरही तो त्यांच्या बरोबर संभाषण करीत होता. त्याने काईन आणि हाबेलाशी अर्पणाच्या वेळेस ही संभाषण केले, तो तर ऐकू येईल अश्या आवाजात त्यांच्याशी संभाषण करी. त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरुन असे कळते की तो आवाज त्यांच्या सवयीचाच होता, आणि त्यांना त्या आवजाची दहशत वाटत नसे. जेव्हा काईनाने स्वतःच्या भावाला जीवानीशी मारले आणि तो पृथ्वीवरचा प्रथम खुनी ठरला, कानाला ऐकू जाईल असा देवाचा आवाज स्वर्गातून आलाः "तुझा भाऊ हाबेल कोठे आहे?" काईन परमेश्वराशी खोटे बोलला, अगदी राजरोसपणे कोणतीही खंत न बाळगता. हे असे तेव्हाच घडू शकते, जेव्हा त्या व्यक्तिसाठी देवाचा आवाज इतका सवयीचा असेल की ते त्या देवाच्या असलेल्या आवाजाला गृहितच धरुन चालतील आणि त्या आवाजाची भितीच त्यांना उरणार नाही. हे सगळे हेच सांगते की अजूनही देव मानवजातीशी मैत्रीच्या नात्यात होता आणि जसे सर्वाचा समज आहे त्याप्रमाणे त्यांचा संबंध तूटला नव्हता. तो मानवांची पापे त्याच्यापाशी मोजत नव्हता. ह्याचा अर्थ असा होतो का की तो त्यांची पापे क्षमा करीत होता किंवा ते काही चुकीचे वागत नव्हते? नाही ह्याच कारणास्तव अखेरीस त्याने नियम दिले. मानवाला फिरुन पुन्हा योग्य पातळीवर आणण्यासाठी त्याने नियमशास्त्र दिले. देवाला मानवाला दाखवून देणे जरुरीचे होते की त्यांना उध्दारकर्ताची आवश्यकता आहे व त्याने स्वतःला नम्र करावे आणि क्षमादानाचा स्विकार करावा. खेदाची बाब ही आहे की धर्माने ह्याला विकृत करुन व परीस्थितीला वळवून असे शिक्षण दिले की नियम आपणास पाळावयास दिलेले आहेत जेणेकरुन आपल्याला देव क्षमा करील व स्विकारेल. नाही! जुन्या करारातील नियम शास्त्राचा उद्देश हा की तुमची पापे इतक्या व्यापक स्तरावर दाखवावी की तुम्ही स्वतःला त्यापासून वाचवावयास हतबल व्हाल आणि म्हणाल, "देवा जर तुझी पवित्रतेचा स्तर हा आहे तर, मी तितका गाठू शकतच नाही. मला क्षमा कर, माझ्यावर दया कर." देवाचा एकूणच चिरस्थायी स्वभाव प्रितीच आहे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा रोमकरांस पत्र ५: १३: गणणे ह्या शब्दाचा अर्थ काय आहे?

**रोमकरांस पत्र ५ : १३** – *कारण नियमशास्त्रापूर्वी पाप जगात होतेच ; पण नियमशास्त्र नसले म्हणजे पाप गणण्यात येत नाही."*

२. वाचा रोमकरांस पत्र ७ : ७. नियमशास्त्र देण्यामागचा उद्देश कोणता होता?

**रोमकरांस पत्र ७ : ७** – *तर मग आपण काय म्हणावे? नियमशास्त्र पाप! कदाचित नाही! तरीही पापाची ओळख मला नियमशास्त्रावांचून कशानेच झाली नसती. 'लोभ धरु नको,' असे नियमशास्त्रात सांगितले नसते तर मला लोभाचे ज्ञान झाले नसते.*

३. वाचा गलतीकरांस पत्र ३ : २४ ह्या वचनाप्रमाणे , नियमशास्त्र देण्यामागे हेतू कोणता होता?

**गलतीकरांस पत्र ३ : २४** – *ह्यावरुन आपण विश्वासाने नीतिमान ठरविले जावें म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्ताकडे पोहचविणारे बालरक्षक होते.*

४. वाचा योहान ८ : १ –११ व्यभिचार करीत असताना पकडलेल्या स्त्रीशी येशू कसा वागला?

**योहान ८ : १ –११** – *पण येशू जैतूनांच्या डोंगराकडे गेला. { २} नंतर पहाटेस तो पुन्हा मंदिरात आला तेव्हा सर्व लोक त्याच्याकडे आले आणि तो बसून त्यांना शिकवू लागला. { ३} त्यावेळी व्यभिचार करीत असताना धरलेल्या एका स्त्रीला शास्त्री व परुशी ह्यांनी त्याच्याकडे आणिले व तिला मध्ये उभे करुन ते त्याला म्हणाले , { ४} गुरुजी , ही स्त्री व्यभिचार करीत असताना धरण्यात आली. { ५} मोशेने नियमशास्त्रात आम्हाला अशी आज्ञा दिली आहे की ,अशांना दगडमार करावा; तर आपण हिच्याविषयी काय म्हणतां? {६} त्याला दोष लावावयाला आपणांस काहीतरी मिळावे म्हणून त्याची परीक्षा पाहण्यासाठी ते असे म्हणाले , येशू तर खाली ओणावून बोटाने जमिनीवर लिहू लागला; {७} आणि ते त्याला एकसारखे विचारीत असता तो उठून त्यांना म्हणाला, तुम्हांमध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा. { ८} मग तो पुन्हा*

*खाली ओणवून जमिनीवर लिहू लागला. { ९} हे शब्द ऐकून वृद्धांतल्या वृद्धांपासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले; येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती. { १०} नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी असे पाहून तिला म्हणाला ,बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरविला नाही काय? { ११} ती म्हणाली , प्रभुजी, 'कोणी नाही.' तेव्हा येशू तिला म्हणाला, मीहि तुला दंड ठरवीत नाही; जा; ह्यापुढे पाप करु नको.*

५. येशूचे शब्द आणि वागणूक देवाच्या स्वभावाला प्रतिबिंबित करतात का?
पाहा योहान ३ : ३४

**योहान ३ : ३४** – *कारण ज्याला देवाने पाठविले तो देवाची वचने बोलतो; कारण तो आत्मा मोजून मापून देत नाही.*

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ४ : ८ ह्या वचनानुसार , देवाचा खरा स्वभाव कसा आहे?

**योहानाचे पहिले पत्र ४ : ८** – *कारण जो प्रीती करीत नाही तो देवाला ओळखीत नाही ; कारण देव प्रीती आहे.*

७. वाचा रोमकरास पत्र ५ : ६ आपण काय असताना देवाचे प्रेम आपल्याकडे आले?

**रोमकरांस पत्र ५ : ६** – *आपण दुर्बळ असतांनाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला.*

८. वाचा रोमकरास पत्र ५ : ८ आपण काय असतानाच देव आपणावर प्रीती केली?

**रोमकरांस पत्र ५ : ८** – *परंतु देव आपणांवरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हें देतो की , आपण पापी असतांनाच ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला.*

९. वाचा रोमकरास ५ : १० आपण काय असतानाच देवाने आमच्यावर प्रेम केले?

**रोमकरांस पत्र ५ : १०** – *कारण आपण शत्रु असता देवाबरोबर त्याच्या पुत्राच्या मृत्यूद्वारें आपला समेट झाला,तर आतां समेट झालेला असतां त्याच्या जीवनानें आपण विशेषकरुन तारले जाणार आहों;*

१०. जर आपण येशू ख्रिस्ताची क्षमा मागितली आणि त्याला प्रभु उध्दारक मानून, त्याने आपल्या पापांसाठी खंडणी भरली अश्या प्रकारच्या विश्वास धरला, तर देव दया व अनुग्रह हा त्याचा खरा स्वभाव आपणास दाखविल का?

# उत्तरावली

१. वाचा रोमकरांस पत्र ५ : १३. गणणे ह्या शब्दाचा अर्थ काय आहे?

*एखादयाच्या खात्यात मांडणे*

२. वाचा रोमकरांस पत्र ७ : ७. नियमशास्त्र देण्यामागचा उद्देश कोणता होता?

*पापाची ओळख होणे.*

३. वाचा गलतीकरास पत्र ३: २४ ह्या वचनाप्रमाणे, नियमशास्त्र देण्यामागे हेतू कोणता होता?

*मांनवजातीला उध्दारक येशूची गरज दाखविणे*

४. वाचा योहान ८ : १ –११ व्यभिचार करीत असताना पकडलेल्या स्त्रीशी येशू कसा वागला?

*दयेने आणि कृपेने*

५. येशूचे शब्द आणि वागणूक देवाच्या स्वभावाला प्रतिबिंबित करतात का? पाहा योहान ३: ३४

*होय*

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ४ : ८ ह्या वचनानुसार , देवाचा खरा स्वभाव कसा आहे?

*प्रीती आहे.*

७. वाचा रोमकरास पत्र ५ : ६ आपण काय असताना देवाच प्रेम आपल्याकडे आले?

*दुर्बळ असहाय आणि अधमी*

८. वाचा रोमकरास पत्र ५ : ८ आपण काय असतानाच देव आपणावर प्रीती केली?

*पापी*

९. वाचा रोम ५ : १० आपण काय असतानाच देवाने आमच्यावर प्रेम केले?

*शत्रु*

१०. जर आपण येशू ख्रिस्ताची क्षमा मागितली आणि त्याला प्रभु उध्दारक मानून, त्याने आपल्या पापांसाठी खंडणी भरली अश्या प्रकारच्या विश्वास धरला, तर देव दया व अनुग्रह हा त्याचा खरा स्वभाव आपणास दाखविल का?

*होय*

# पाठ क्रमांक ६

# पश्चाताप

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

काही लोकांना पश्चाताप म्हणजे काय ह्या विषयी गैरसमज असतो. पश्चाताप म्हणजे सिध्दता नाही परंतु वाट बदलणे होय. आपण उधळ्या मुलगा किंवा हरवलेल्या पुत्राविषयी बोलणार आहोत. येशू अशी एक गोष्ट सांगत आहे जी एका माणसाने पश्चाताप करणे म्हणजे काय ह्याचे तंतोतंत स्पष्टिकरण देते. लूक १५ :११ – १२ मध्ये येशू म्हणतो, *"आणखी तो म्हणाला, कोणाएका मनुष्याला दोन मुलगे होते; त्यापैकी धाकटा बापाला म्हणाला, बाबा मालमत्तेचा माझा वांटा मला द्या. तेव्हा त्याने मिळकतीची त्यांच्यात वाटणी केली."*

धाकटया मुलाला त्याच्या पित्याच्या मृत्यु अगोदरच वारसाहक्क हवा होता, हे खूपच जगावेगंळ होते, पण त्याच्या वडिलाने त्याची ही इच्छा पूर्ण केली आणि त्याला त्याचा वाटा देऊन टाकला. वचन १३ म्हणते, *"मग फार दिवस झाले नाहीत तोच धाकटा मुलगा सर्व काही जमा करुन दूर देशी निघून गेला; आणि तेथे त्याने चैनबाजी करुन आपली मालमत्ता उधळून लावली."* धाकटयाने त्याची संपत्ती घेतली, त्याच्या हिस्साची वाटणी, दूर शहरात निघून गेला, आणि संकटाला आमंत्रण देणारे जीवन जगत संपत्ती उधळून टाकली. एक भाषांतर असे लिहीते की *"चैनबाजी करुन वेश्यांवर आपली संपत्ती फुकुन टाकली."*

वचन १४– १५ म्हणते, *"त्याने आपले सर्व खर्चून टाकल्यावर त्या देशांत मोठा दुष्काळ पडला; तेव्हा त्याला अडचण पडू लागली; मग तो त्या देशांतील एका रहिवाश्याजवळ जाऊन त्याला चिकटून राहिला, त्याने त्याला आपल्या शेतांत डुकरे चारावयास पाठविले."* त्याला इतकी भूख लागायची की, तो भूखबळी व्हायचा आणि मग तो म्हणायचा *"मला काही नाही तर डुकरांची टरफले तरी खाण्यासाटी द्या,"*

पण त्याला कोणीच काही देत नसे. त्याने तर आपली सर्व संपत्ती उधळून टाकलेली होती. पुढे, *"नंतर तो शुद्धीवर येऊन म्हणाला," माझ्या बापाच्या किती तरी मोलकऱ्यांस भाकरीची रेलचेल आहे! आणि मी तर येथे भुकेनें मरतो आहे."* आणखीन एक भाषांतर असे लिहीते की "जेव्हा तो भानावर आला" अश्या अर्थाने की, त्याच्या पित्याकडच्या नोकरांनाही पोट भरुन खाण्यास मिळते, आणि मी अन्नावाचून मरत आहे.

त्याने निर्णय घेतला – त्याला पश्चाताप झाला. पश्चाताप म्हणजे मन बदलणे, असे हृदय परिवर्तन की जे माणसाला बदलते आणि त्याची दिशा बदलते. वचन १८ –१९ मध्ये तो असे म्हणतो, *"मी उठून आपल्या बापाकडे जाईन व त्याला म्हणेन, बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्या विरुद्ध पाप केले आहे ; आता तुमचा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही; आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणे मला ठेवा."* "फक्त एका नोकरासारखे, बाबा. मी तुमच्या विरोधात पाप केले आहे, तुमची मालमत्ता उधळली आहे, आणि देवाविरोधात पाप केले आहे. मला नुसतेच नोकर बनून राहू द्या." मग तो उठला आणि पित्याकडे गेला. पश्चाताप करणे हे निव्वळ वागणूक बदलण्यापेक्षा बरंच काही आहे, मन बदलणे, हृदय परिवर्तन होणे; हे मनुष्याला त्याने ठेवलेल्या आशेवर कार्य करायला लावते, तो आपली दिशा बदलतो आणि नवीन मार्ग अनुसरतो. आपण सर्व देवापासून दूर गेलो होतो, आपल्या पित्यापासून, स्वर्गापासून, आपल्या घरापासून. पवित्र शास्त्र यशया ५३ : ६ मध्ये म्हणते की *"आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो; आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता; अशा आम्हां सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादिले."* परंतु देवाने त्याच्या दयेने आमची पापे घेतली आणि येशूवर लादली.

गोष्ट पुढे वचन २० – २४ पर्यत चालते. "मग तो उठला आणि पित्याकडे गेला." एके दिवशी ही गोष्ट मी पहिल्यांदाच ऐकण्याऱ्या माणसाला ऐकवत होतो, आणि त्याला पक्के माहित होते की जेव्हा मुलगा बापाकडे फिरुन येईल, तेव्हा त्याचा पिता त्याला असे सुनावेल की, "मुला, तुझ्या हातून काय घडले ते बघ. मी जन्मभर जमवलेली संपत्ति तू उधळलीस. माझा नोकर बनून येथे रहा." बहुतांशी जगातील पिता भडकून असेच वागले असते, पण त्याच्या वडीलाची वागणूकीकडे लक्ष द्याः "तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले आणि त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळ्यात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले. मुलगा त्याला म्हणाला, बाबा मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्याविरुद्ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही; पण बापानें आपल्या दासांना सांगितले, लवकर उत्तम झगा आणून ह्याला घाला, ह्याच्या हातांत अंगठी व पायांत जोडा घाला, पुष्ट वासरुं आणून कापा; आपण

खाऊ आणि आनंदोत्सव करु; कारण हा माझा मुलगा मेला होता, तो पुन्हा जिवंत झाला आहे; हरवला होता, तो  सापडला आहे, मग ते आनंदोत्सव करु लागले."

मी हे सगळे त्या माणसाला सांगितले तो म्हणाला , "मी ऐकले येशू काय म्हणाला ते. जर मी दयेसाठी स्वर्गीय पित्याकडे गेलो आणि म्हणालो की 'पित्या मी तुझ्या विरोधात पाप केले आहे, मी तुझा पुत्र होण्याच्या लायकीचा नाही,' तर तो माझा स्विकार करेल." आपल्या स्वर्गीय पित्याला कळवळा येतो, आणि तो तुम्हाला नोकर नाही म्हणणार. तो तुम्हाला त्याचा पुत्र बोलावून त्याच्याशी पुर्नस्थापित करेल, परमेश्वर वाट पाहातो आहे तुमच्या फिरण्याची. तुम्ही वळाल का? आज तुम्ही देवाकडे का नाही वळत तुमच्या पित्याकडे आणि स्वर्गाकडे,तुमच्या स्वगृहाकडे?

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. पश्चातापाची व्याख्या करा.

२. वाचा लूक १३ : १ – ५. नाश न होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे?

**लूक १३ : १ - ५** - *तर त्याच वेळी तेथे असलेल्या कित्येकांनी त्याला,ज्या गालीलकरांचे रक्त पिलाताने त्यांच्या यज्ञात मिसळले होते, त्यांच्याविषयी सांगितले { २} मग त्याने त्यास उत्तर देऊन म्हटले, ह्या गालीलकरांनी असे दुःख भोगले ह्यावरुन बाकीच्या सर्व गालीलकरांपेक्षा ते अधिक पापी होते असे तुम्हास वाटते काय? { ३} मी तुम्हास सांगतो, नव्हते; तरी पण जर तुम्ही पश्चाताप केला नाही तर तूम्हा सर्वाचा त्यांच्यासारखा नाश होईल. { ४} किंवा ज्या अठरा जणांवर शिलोहांतील बुरुज पडला आणि ते ठार झाले, ते यरुशलेमेत राहणाऱ्या सर्व माणसांपेक्षा अधिक अपराधी होते असे तुम्हास वाटते काय? { ५} मी तुम्हास सांगतो, नव्हते पण जर तुम्ही पश्चाताप केला नाही तर तूम्हा सर्वाचा त्यांच्यासारखा नाश होईल*

३. वाचा पेत्राचे दुसरे पत्र ३ः ९ सर्व लोकांसाठी देवाची इच्छा काय आहे?

**पेत्राचे दुसरे पत्र ३ : ९** - *कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभु आपल्या वचनाविषयी करीत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करितो; कोण ााचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वानी पश्चाताप करावा अशी आहे.*

४. वाचा लूक १६ः १९ –३१ . लूक १६ः २८ मध्ये श्रीमंत माणसाला का वाटत होते की कोणीतरी मरणातून उठावे आणि त्याच्या भावंडाला सुसमाचार सांगावा?

**लूक १६ः १९ -३१** - *कोणी एक श्रीमंत मनुष्य होता; तो जांभळी व तलम वस्त्रे घालीत असे , आणि दररोज थाटामाटाने ख्यालीखुशाली करीत असे. {२०} त्याच्या दरवाजाजवळ फोडांनी भरलेला लाजर नांवाचा एक दरिद्री माणूस टाकण्यात आला होता; {२१} त्या श्रीमंताच्या मेजावरुन खाली पडेल त्यावर आपले पोट भरावे अशी त्याची इच्छा असे; शिवाय कुत्री येऊन त्याचे फोड चाटीत असत. {२३} पुढे असे झाले की, तो दरिद्री माणूस मेला आणि देवदूतांनी त्याला अब्राहामाच्या उराशी नेऊन ठेवले ; श्रीमंतहि मेला व त्याची उत्तरक्रिया करण्यात आली. तो अधोलोकांत यातना*

*भोगीत असताना त्याने आपली दृष्टि वर करुन अब्राहाम व त्याच्या उराशी बसलेला लाजर ह्यांना दुरुन पाहिले. {२४} तेव्हा त्याने हांक मारुन म्हटले, हे बापा अब्राहामा, माझ्यावर दया करुन लाजाराला पाठीव , ह्यासाठी की त्याने आपल्या बोटाचें टोक पाण्यांत बुडवून माझी जीभ थंड करावी; कारण ह्या जाळांत मी क्लेश भोगीत आहे. {२६} अब्राहाम म्हणाला, मुला, तू आपल्या आयुष्यांत आपले सुख भरुन पावलास, तसा लाजर आपले दुःख भरुन पावला, ह्याची आठवण कर; आता ह्याला येथे समाधान मिळत आहे व तू क्लेश भोगीत आहेस; {२७} एवढेच नव्हे तर जे इकडून तुम्हांकडे पार जाऊ पाहतात त्यांस जाता येऊ नये म्हणून आमच्या व तुमच्यामध्ये मोठा दरा स्थापिलेला आहे. {२८} मग तो म्हणाला,तर बापा, मी विनंती करितों, त्याला माझ्या बापाच्या घरी पाठव; {२६} कारण मला पाच भाऊ आहेत, त्यांनी तरी ह्या यातनेच्या स्थळी येऊ नये म्हणून त्याने त्यांस इकडची साक्ष द्यावी. {२६} पण अब्राहामाने त्याला म्हटले, त्याच्याजवळ मोशे व संदेष्टे आहेत, त्यांचे त्यांनी ऐकावे. {३०} तो म्हणाला , हे बापा अब्राहामा, असें नाही ; पण मेलेल्यांमधून कोणी त्यांच्याकडे गेला तर ते पश्चाताप करतील. {३१} तेव्हा त्याने त्याला म्हटले, ते मोशेचे व संदेष्टयांचे ऐकत नसतील तर मेलेल्यांमधूनहि कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाही.*

५. वाचा लूक १६:३० यातनेचे स्थळ (नरक) ह्यात न पडण्यासाठी त्याच्या भावंडांना काय करणे महत्वाचे आहे?

६. वाचा प्रेषितांची कृत्ये २६ : १८. ही वचने तसे पाहाता, प्रामुख्याने पश्चातापावर भाष्य करीत नाहीत. पश्चाताप करणाऱ्या बरोबर काय होते?

**प्रेषितांची कृत्ये २६ : १८** – *मी तुला त्यांच्याकडे पाठवतो ; ह्यासाठी की त्यांनी अंधारांतून उजेडाकडे व सैतानाच्या अधिकारांतून देवाकडे वळावे ; म्हणून तू त्यांचे डोळे उघडावे, आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी आणि माझ्यावरील विश्वासाने पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळावे.*

७. वाचा प्रेषितांची कृत्ये २६ : २०. ह्या वचनांतील शेवटच्या भागात अन्यजातिच्या लोकांनी करावयाची तीन कामे दिलेली आहेत. ती तीन कार्ये कोणती?

**प्रेषितांची कृत्ये २६ : २०** – *तर पहिल्याने दिमिष्कंतील लोकांना व यरुशलेमेंत, अवघ्या यहूदिया देशात व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करीत आलो की, पश्चाताप करा आणि पश्चातापाला शोभतील अशी कृत्ये करुन देवाकडे वळा.*

८. वाचा मत्तय ७ : २१ : २३. देवाची इच्छा न करता लोक कोणती वेगळी कामे करतात असे येशू म्हणाला?

**मत्तय ७ : २१ : २३.** – *मला प्रभुजी , प्रभुजी ,असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गीय राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल. त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, प्रभो , प्रभो आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला; तुझ्या नावाने भुते घालविली, व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृते केली नाहीत काय? तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, मला तूमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.*

९. देवासमक्ष केवळ ओठाने केलेल्या सेवाकार्याच्या विपरीत खऱ्या पश्चातापाचे महत्व कसे दर्शविले आहे?

१०. वाचा यशया ५५: ७ दुर्जनानी काय करावे?

**यशया ५५ : ७** – *तर दुर्जन आपला मार्ग सोडो , अधर्मी आपल्या कल्पनांच्या त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील.*

११. अधर्मी जनाने कोणत्या दोन गोष्टी करणे आगत्याचे आहे?

१२. वरील सांगितलेल्या गोष्टी करणाऱ्या लोकांबरोबर देव काय करतो?

१३. वाचा लूक १५ : ७. एखादया पाप्याने पश्चाताप केल्यावर स्वर्ग काय करतो?

**लूक १५ : ७** – *त्याप्रमाणे ज्यांना पश्चातापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चाताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो.*

१४. वाचा प्रेषितांची कृत्ये ३ : १९ जर तुम्ही पश्चाताप कराल आणि फिराल तर तुमची पापे काय होतील ?

**प्रेषितांची कृत्ये ३ : १९** – *तेव्हा तुमची पापें पुसून टाकली जावी म्हणून पश्चाताप करा व वळा; अशासाठी की, विश्रांतीचे समय प्रभूजवळ यावे*

# उत्तरावली

१. पश्चातापाची व्याख्या करा.

*अ. एका नव्या संकल्पनेसाठी दिशा बदलणे.*

*ब. मनाचे नवीकरण*

*क. हृदय परिवर्तन ज्याचा परिणाम देवाकडे वळणे होय. जुना मार्ग त्यागून देवाच्या मार्गाकडे वळणे*

*ड. दिशा बदलणे, परिपूर्ण होणे नाही*

*इ. असा निर्णय जो जीवनाचा मार्ग बदलतो*

*ई. जुन्या मार्गाविरुन वळणे आणि आपले जीवन पूर्णतः देव व त्याच्या इच्छेनुसार सर्मपण करणे.*

*उ. येशू द्वारा माणसाचे देवाकडे वळणे*

२. वाचा लूक १३: १ – ५. नाश न होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे?

*पश्चाताप करणे*

३. वाचा पेत्राचे दुसरे पत्र ३: ९. सर्व लोकांसाठी देवाची इच्छा काय आहे?

*सर्वानी पश्चाताप करावा*

४. वाचा लूक १६: १९ –३१ . लूक १६: २८. मध्ये श्रीमंत माणसाला का वाटत होते की कोणीतरी मरणातून उठावे आणि त्याच्या भावंडाला सुसमाचार सांगावा?

*कारण त्यांनी यातनेच्या स्थळी पडू नये.*

५. वाचा लूक १6 : ३०. यातनेचे स्थळ (नरक) ह्यात न पडण्यासाठी त्याच्या भावंडांना काय करने महत्वाचे आहे?

*पश्चाताप करणे अगत्याचे आहे.*

६. वाचा प्रेषितांची कृत्ये २6 : १८. ही वचने तसे पाहाता, प्रामुख्याने पश्चातापावर भाष्य करीत नाहीत. पश्चाताप करणाऱ्या बरोबर काय होते?

*अ. त्यांचे डोळे उघडावे*

*ब. अंधारांतून उजेडाकडे जावे*

*क. सैतानाच्या वर्चस्वातून सुटून देवाच्या अधिपत्याखाली यावे*

*ड. पापांची क्षमा होते.*

*इ. वतन मिळते.*

७. वाचा प्रेषितांची कृत्ये २6 : २० ह्या वचनांतील शेवटच्या भागात, अन्यजातिच्या लोकांनी करावयाची तीन कामे दिलेली आहेत. ती तीन कार्ये कोणती?

*अ. पश्चाताप*

*ब. देवाकडे वळणे*

*क. पश्चातापाला शोभतील अशी कार्ये*

८. वाचा मत्तय ७ : २१ : २३. देवाची इच्छा न करता लोक कोणती वेगळी कामे करतात असे येशू म्हणाला?

*अशुध्दता आणि अर्धम*

९. देवासमक्ष केवळ ओठाने केलेल्या सेवाकार्याच्या विपरीत खऱ्या पश्चातापाचे महत्व कसे दर्शविले आहे?

*उध्दार अंत:करणातून होतो, केवळ ओठाने नाही.*

१०. वाचा यशया ५५: ७ दुर्जनानी काय करावे?

*आपला मार्ग सोडावा*

११. अधर्मी जनाने कोणत्या दोन गोष्टी करणे आगत्याचे आहे?

*त्यांचे विचार सोडावे आणि देवाकडे वळावे*

१२. वरील सांगितलेल्या गोष्टी करणाऱ्या लोकांबरोबर देव काय करतो?

*दया करतो आणि विपुलतेने क्षमा करतो.*

१३. वाचा लूक १५ : ७. एखादया पाप्याने पश्चाताप केल्यावर स्वर्ग काय करतो?

*स्वर्गात आनंद साजरा केला जातो.*

१४. वाचा प्रेषितांची कृत्ये ३ : १६ जर तुम्ही पश्चाताप कराल आणि फिराल तर तुमची पापे काय होतील?

*माझी पापें पुसून टाकली जातील.*

# पाठ क्रमांक ७

# समर्पण

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

**लूक १४ : २५ –:२६ – त्याच्याबरोबर मोठमोठे लोकसमुदाय चालले होते; तेव्हा तो त्यांच्याकडे वळून म्हणाला, जर कोणी माझ्याकडे येईल, पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ व बहिणी ह्यांच्या आणि आपल्या जिवाचाहि द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही.**

*"याच्याबरोबर मोठमोठे लोकसमुदाय चालले होते ; तेव्हा तो त्यांच्याकडे वळून म्हणाला,"* (लूक १४ : २५) येशूच्या सेवाकार्याच्या त्या वेळेत बहुसंख्य लोक येशूच्या मागे जात असत. इंग्रजी भाषेत हे स्पष्टपणे सांगतले नाही, परंतू ग्रीक भाषेत आहे हे वाक्य एक अपूर्णकाळ आहे. ह्याचा अर्थ ह्या समयी मोठया संख्येने वारंवार आणि सातत्याने लोक येशूच्या मागे जात असत. कदाचित तो आश्चर्यकर्म करी किंवा त्यांना जेवण देत असेल म्हणून, आपल्याला अचूक कारण ठाऊक नाही, परंतू बहुसंख्य लोक त्याच्या मागोमाग जात असत.ही एक वेळ अशी होती की, येशू त्यांचाकडे बघून जाणूनबुजून असे काहीतरी म्हणाला, तेणेकरुन कित्येक लोक तेथून निघून गेले आणि पुन्हा त्याच्यामागे चालले नाहीत.

*"जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई , बायको, मुले ,भाऊ व बहिणी ह्यांच्या आणि आपल्या जिवाचाहि द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही."* (लूक १४ : २६, मी) जेव्हा मी ह्या वचनाकडे पाहतो, मी विचार करतो, प्रभू तुला असे म्हणायचे नसेल. *"द्वेष" ह्या शब्दाचा अर्थ काय? ह्याचा अर्थ म्हणजे कमी प्रेम किंवा ह्याच अर्थाचे काहीतरी. जसे जसे मी अध्ययन करु लागलो, तसे मला कळून आले की "द्वेष" हा शब्दश त्याच अर्थाने वापरला गेला आहे.*

येशू सर्वात जालीम शब्द वापरुन मुद्दयावर जोर देत आहे. तो म्हणतो जो पर्यत तुम्ही तुमचा बाप, तुमची आई, तुमची बहीण, तुमचा भाऊ, तुमच्या स्वतःच्या जीवाचाही द्वेष करत नाही, तो पर्यत तुम्ही त्याचे शिष्य होऊ शकत नाही. मी तुम्हाला काहीतरी विचारु इच्छितोः ह्या जगात तुमची सर्वात प्रिय व्यक्ति कोण आहे? तुमची आई वडील किंवा तुमचा जोडीदार आणि मुलेबाळे. काय होईल जर तुमचा बायकोशी तुमचे पटेनासे झाले आणि तुमचा घटस्फोट झाला किंवा आई वडीलांचा मृत्यू झाला? तुमचे भाऊ आणि बहीणही असेच वागतील तर. येशू म्हणाला जो पर्यत तुम्ही त्यांचा द्वेष करणार नाही तो पर्यत तुम्ही त्याचे शिष्य होऊ शकत नाही. तो काय म्हणत आहे?

येशू तुमच्या अगदी प्रिय व्यक्तिविषयी बोलत आहे. तो तुमचे सर्मपण मागत आहे, असे सर्मंपण ज्यात तो अग्रगण्य आहे. त्याला हवे आहे तुमच्या जीवनात प्रथम क्रमांक. ह्या जगात तुमच्या अगदी जवळच्या व्यक्तिशी तुलना तो त्याच्याशी तुमचे असलेल्या नात्याशी करत आहे. "द्वेष" एक रुपक आहे, एक तुलनात्मक शव्द, येशू म्हणत आहे," माझे तुमच्याशी नाते इतके मोलाचे आहे की पृथ्वीवरील सर्व नात्यांपेक्षा हे सर्वात उच्चतम आहे." एक असा व्यक्ति ज्याच्यावर तुम्ही स्वतःची बायको ,मुले , बाप , आई , भाऊ व बहिणी ह्यांच्यापेक्षा अधिक प्रेम करता. तुम्हाला ठाऊक आहे का तो कोण आहे? तो देव नाही ......... ते तुम्ही स्वतः आहात. तुम्ही स्वतःवर इतरांपेक्षा म्हणजे अगदी तुमच्या अत्यंत प्रिय व्यक्ति पेक्षाही जास्त प्रेम करता.

लग्न का तुटतात ? घटस्फोट का होतात ? कारण त्यांचे जोडीदारापेक्षा स्वतःवर जास्त प्रेम असते. "तू माझ्या म्हणण्याप्रमाणे वागत नाही, म्हणून मी तुला सोडून जात आहे."

येशू म्हणाला ह्या सर्वापेक्षा वरचे नाते मला तुमच्याशी हवे आहे – ते तुमचे स्वतः चे निस्वार्थी जीवन. हे आहे खरेखुरे शिष्यत्व. तो किंमत मोजावी न लागणाऱ्या नात्याबद्दल बोलत नाही. तो आपल्याला त्याला अनुसरण्यास सांगत आहे. तो तुमच्या जीवनात त्याला अग्रगण्य स्थान मागत आहे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा लूक ६: ५७–६२. ह्या लेखांशाच्या शिकवणीनुसार ख्रिस्ताला अनुसरण्यासाठी कोणत्या स्तरावरचे समर्पण अभिप्रेत आहे?

**लूक ६ : ५७– ६२** – *तेव्हा असें झाले की ते वाटेने चालत असता कोणाएकाने त्याला म्हटले , आपण जेथे कोठे जाल तेथे मी आपल्या मागें येईन. {५८} येशू त्याला म्हणाला, खोकडांस बिळे व आकाशांतल्या पाखरांस घरटी आहेत; परंतु मनुष्याच्या पुत्राला डोके टेकावयास टिकाण नाही. { ५६} त्साने दुसऱ्या एकाला म्हटले, माझ्यामागे ये ; परंतु तो म्हणाला, प्रभुजी, पहिल्याने मला माझ्या बापाला पुरावयास जाऊ द्या.. {६०} तो त्याला म्हणाला, मेलेल्यांना आपल्या मेलेल्यांस पुरु दे; तू जाऊन देवाच्या राज्याची घोषणा कर. {६१} त्यावर आणखी एकाने म्हटले, प्रभुजी, मी आपल्यामागे येईन; परंतु पहिल्याने मला माझ्या घरच्या माणसांचा निरोप घेऊ द्या. {६2.} येशूने त्याला म्हटले , जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागे पाहतो तो देवाच्या राज्यात उपयोगी नाही.*

२. वाचा लूक ८: १३ –१४. काही लोक ख्रिस्ती विश्वासापासून दूर जाताना किवा मागे गेल्याचे का पाहतो?

**लूक ८ : १३ – १४** – *खडकाळीवर असलेले हे आहेत की ते ऐकतात तेव्हा वचन आनंदाने ग्रहण करितात; पण त्यांस मूळ नसते; ते काही वेळपर्यंत विश्वास टेवतात व परीक्षेच्या वेळी गळून पडतात, कांटेरी झाडांमध्यें पडलेले हे आहेत की, ते ऐकतात, आणि संसाराच्या चिंता, धन, व विषयसुख ह्यात आयुष्यक्रमण करीत असता त्याची वाढ खुंटते व ते पक्व फळ देत नाहीत. चांगल्या मातीत पडलेले हे आहेत की ते वचन ऐकून सालस व चांगल्या अतःकरणांत धरुन टेवतात आणि धीराने फळ देत जातात.*

३. वाचा यहेज्केल १६ : ८. देवाने त्याच्या लोकांशी असलेला संबंध दर्शविताना विवाहसंबंधाच्या उदाहरणाचे वर्णन केले.आहे . ह्या संबंधात मालकी कोणत्या नात्याची आहे?

**यहेज्केल १६ : ८** – *मग तुजजवळून जातांना मी तुला पाहिले ,तो ती वेळ तुझ्या प्रेमविकासाची होती ; तेव्हा मी तुजवर पदर घालून तुझी नग्नता झाकिली , प्रभु परमेश्वर म्हणतो ,तेव्हा मी शपथ वाहून तुजबरोबर करार केला व तू माझी झालीस.*

४. वाचा करिथकरांस पहिले पत्र ६ : १६. तुम्ही कोणाच्या मालकीचे आहात?

**करिथकरांस पहिले पत्र ६ : १६ – २०** – *तुमचे शरीर, तुम्हांमध्ये वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हांला मिळाला आहे त्याचें मंदिर आहे हे तुम्हांस ठाऊक नाही काय ? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही {२०} ; कारण तुम्ही मोलाने विकत घेतलेले आहां ; म्हणून तुम्ही आपल्या शरीराने देवाचे गौरव करा.*

५. वाचा करिथकरांस पहिले पत्र ६ : २०. तुमचा शरीर आणि आत्मा ही कोणाच्या मालकीचे आहेत?

६. वाचा याकोबाचे पत्र ४ : ४ आपण देवा विरुध्द आत्मिक व्यभिचार करु शकतो का?

**याकोबाचे पत्र ४ : ४** – *अहो अविश्वासू लोकांनो ,जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हांस ठाऊक नाही काय? जो कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे.*

७. देवाच्या दृष्टिने आत्मिक व्यभिचार कसा घडतो? पाहा रोम १ : २५

**रोम १ : २५** – *त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकत्याऐवजी निर्मितांची भक्ति व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन.*

८. वाचा योहान २ :२३ – २५ ह्या वचनातून सर्मपण आणि विश्वासाविषयी काय शिकाल?

**योहान २ :२३ – २५** – *वल्हांडणाच्या सणांत यरुशलेम येथें असताना जी चिन्हे तो करीत होता ती पाहून पुष्कळांनी त्याच्या नावांवर विश्वास ठेवला {२४} पण येशू*

*सर्वांना ओळखून असल्यामुळे त्याला स्वतःला त्यांचा भरंवसा नव्हता; {२५} शिवाय मनुष्याविषयी कोणीहि साक्ष द्यावी ह्याची त्याला जरुरी नव्हती , कारण मनुष्यांत काय आहे हे त्याला स्वतःला ठाऊक होते.*

६. वाचा लूक १४ : २८ — ३०. तुम्हाला ख्रिस्ताला अनुसरण्याची किंमत मोजावी लागली का ?

**लूक १४ : २८ -३०** - *तुमच्यामध्ये असा कोण आहे की त्याला बुरुज बांधावयाची इच्छा असता तो अगोदर बसून व खर्चाचा अंदाज करुन आपल्याजवळ तो पुरा करण्याइतकी ऐपत आहे की नाही हे पाहात नाही ? {२६} नाही तर कदाचित पाया घातल्यावर त्याला जर तो पुरा करिता आला नाही तर पाहणारे सर्व लोक त्याचा उपहास करुन म्हणतील. {३०}हा मनुष्य बांधू लागला खरा,परंतु ह्याला तो पुरा करता आला नाही*

# उत्तरावली

१. वाचा लूक ६: ५७ – ६२. ह्या लेखांशाच्या शिकवणीनुसार ख्रिस्ताला अनुसरण्यासाठी कोणत्या स्तरावरचे समर्पण अभिप्रेत आहे?

*परिपूर्ण सर्मपण*

२. वाचा लूक ८: १३ –१४. काही लोक ख्रिस्ती विश्वासापासून दूर जाताना किंवा मागे गेल्याचे का पाहतो?

*त्यांच्यामध्ये देवाच्या वचनाने मुळ पकडले नाही.*
*संसाराच्या चिंता , धन , व विषयसुखाने ते दूर केले.*

३. वाचा यहेज्केल १६ : ८. देवाने त्याच्या लोकांशी असलेला संबंध दर्शविताना विवाहसंबंधाच्या उदाहरणाचे वर्णन केले. ह्या संबंधात मालकी कोणत्या नात्याची आहे?

*देवाच्या*

४. वाचा करिथकरांस पहिले पत्र ६:१९. तुम्ही कोणाच्या मालकीचे आहात?

*देवाच्या*

५. वाचा करिथकरांस पहिले पत्र ६: २०. तुमचा शरीर आणि आत्मा ही कोणाच्या मालकीचे आहेत?

*देवाच्या*

६. वाचा याकोबाचे पत्र ४:४. आपण देवा विरुध्द आत्मिक व्यभिचार करु शकतो का?

*होय*

७. देवाच्या दृष्टिने आत्मिक व्यभिचार कसा घडतो ? पाहा रोम १ : २५

*हृदय जे त्याला सोडून मूर्तिपूजेच्या मागे लागते ( देवापेक्षा प्रिय मानलेल्या तुमच्या गोष्टि )*

पाहा रोमकरांस पत्र १ : २५.

८. वाचा योहान २ :२३ – २५. ह्या वचनातून सर्मपण आणि विश्वासाविषयी काय शिकाल?

*देवाला तुमचे परिपूर्ण सर्मपण हवे आहे.*

९. तुम्हाला ख्रिस्ताला अनुसरण्याची किंमत मोजावी लागली का?

# पाठ क्रमांक ८

# पाण्याचा बाप्तिस्मा

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

**प्रश्न:** "मला जाणून घ्यायचे आहे की स्वर्गात जाण्यासाठी मला बाप्तिस्मा घेणे जरुरीचे आहे. मी देवावर प्रेम करतो आणि वयाच्या सातव्या वर्षीच माझा बाप्तिस्मा झाला आहे. माझे वय आता अठरा वर्षे आहे, आणि मला धार्मिक सांप्रदायिक पंथाला न अनुसरणाऱ्या एका मंडळीने मला सांगितले की एवढया लहान वयात माझा उद्धार होऊ शकत नाही आणि एवढया लहान वयात मी बाप्तिस्माही घेऊ शकत नाही. ते म्हणतात मला स्वर्गात जाण्यासाठी बाप्तिस्मा घ्यावाच लागेल, पण माझी बापटिस् मंडळी म्हणते तुला बाप्तिस्म्याची गरज नाही .मला स्वर्गात जायचंच आहे. माझ्याच्याने होईल तितके मी देवाच्या सानिध्यात चालण्याचा प्रयत्न करतो, पण मला जाणून घ्यायचे आहे की आता माझे बाप्तिस्मा घेण्याचे वय असताना स्वर्गात जाण्यासाठी मला पुन्हा बाप्तिस्मा घेणे जरुरीचे आहे. मला तातडीने मदत हवी आहे. देव तुम्हाला आर्शीवाद देवो. धन्यवाद."

**उत्तर:** येशु ख्रिस्तावरील विश्वासाने उद्धार व पापांची क्षमा मोफत मिळते. प्रेषितांची कृत्ये १० : ४३ *"आणि विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नांवाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात."* उद्धार विश्वास ठेवल्याने होतो; येशूवर आणि त्याने देवासमोर आपणास धर्मी ठरवण्यास स्वतःचे रक्त वाहिले त्यावर भरवसा आणि विसंबून रहाण्याने. प्रेषितांची कृत्ये १० : ४४ – ४८, विश्वास ठेवणाऱ्याला बाप्तिस्मा होण्याच्या अगोदरच (उद्धाराची खात्री) म्हणून पवित्र आत्मा देण्यात आला होता.

हे जरी खरे असले तरी, दुसऱ्या जागी असे दिसून आले की बाप्तिस्माच्या वेळी पापांची क्षमा झाली (प्रेषितांची कृत्ये २ : ३८) हे अशासाठी आहे की बाप्तिस्मा हे एक

अश्या वेळेचे विश्वासाचे दर्शक, किंवा एक कृती जेव्हा तो पश्चाताप आणि विश्वासाने येशूकडे वळतो. (मार्क १६ : १६ म्हणते , *"जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरित नाही तो शिक्षेस पात्र ठरेल."* ) हे प्रभुला शुद्ध चित्ताने हाक मारण्याचा पण मार्ग आहे. (प्रेषितांची कृत्ये २२: १६ आणि पेत्राचे पहिले पत्र ३ : २१)

जर तुम्ही वयाच्या सातव्या वर्षी मनापासून येशूकडे वळलात आणि बाप्तिस्मा घेतलात, तर परमेश्वर तुमच्या बाळकासमान विश्वासाचा स्विकार करील. बाप्तिस्माच्यासाठीही मागण्या आहेत. एक मागणी आहे पश्चाताप. काय तुमचे अंतकरण आणि तुमच्या मनाचे परिवर्तन झाले आहे त्याच्या परिणामस्वरुप तुम्ही पापांपासून परावृत होऊन आणि त्याचे क्षमादान प्राप्त केले आहे का? (प्रेषितांची कृत्ये २ : ३८ , २० : २१ आणि १७ : ३०) काय तुम्ही येशुला प्रभु आणि उद्धारकर्ता म्हणून स्विकारले आहे का? (मार्क १६ : १६, योहान ३ : १६ आणि रोम १० : ६ – १०) जर नाही, तर आताच येशूकडे या, तुमच्या पापांचा पश्चाताप करा, क्षमा होण्यासाठी त्याच्या कृपेकडे वळा, पाण्याच्या बाप्तिस्माने त्याला अनुसरणाचा तुमचा निर्णय बाप्तिस्माने शिक्कामोर्तब करा.

**बाप्तिस्मा येशूवर एखादयाने विश्वास ठेवल्याचे दर्शक आहे.** विश्वास न ठेवता केलेल्या कृतीला काहीच अर्थ नाही. ज्या लोकांनी येशूकडे वळून येशूला प्रभु आणि उद्धारकर्ता मानले ते त्यांच्या विश्वासाचे उघड प्रर्दशन करत सर्वासमोर येशूला स्विकारण्याची इच्छा दाखवितात. जे लोक येशूच्या आज्ञेस "नाही" म्हणतात, ते काही प्रमाणात मृत विश्वास दाखवत आहेत. **जेव्हा लोक विश्वासाला स्विकारण्यास तयार होत नाहीत त्यांचा विश्वास मृत ठरतो.** (याकोबाचे पत्र २ : १८ – १९) केवळ विश्वासच उद्धार करु शकतो, परंतू उद्धारासाठीचा विश्वास मात्र केव्हाही एकल नसतो. तो नेहमीच स्वतःला दर्शविण्याची इच्छा धरीतो. पाण्याचा बाप्तिस्मा हा मार्ग आहे विश्वास दर्शविण्याचा. **बाप्तिस्मा उद्धार करत नाही ; येशू करतो. पाणी पापे धुवून टाकत नाही ; येशूचे रक्त धुवून टाकते.** परंतू विश्वास येशूचे रक्त तुम्हावर घोषित करते. काही वेळेस बाप्तिस्मा घेत असताना व्यक्ति आपला विश्वास व्यक्त करतो . (प्रेषितांची कृत्ये २२ : १६) प्रश्न हा आहे की तुम्ही पश्चाताप केला आहे का? तुम्ही त्याच्यावर (येशूवर) विश्वास ठेवला आहे का ? जर असेल तर उशिर का करता – उठा आणि बाप्तिस्मा घ्या.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. तरुण कोणता प्रश्न विचारत होता?

२. प्रेषितांची कृत्ये १० : ४३. च्या अनुसार, आपण उद्धार कसा होतो?

**प्रेषितांची कृत्ये १० : ४३** – *"आणि विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नांवान पापांची क्षमा मिळेल अशी .साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात."*

३. बाप्तिस्मा हे एक विश्वासाचे दर्शक आहे जे सामान्यपणे उद्धाराच्या वेळेस होते . प्रेषितांची कृत्ये २.: ३८ हे ह्या सत्याला कसे दर्शविते?

**प्रेषितांची कृत्ये २ : ३८** – *पेत्र त्यांना म्हणाला, पश्चाताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावानें बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.*

४. मार्क १६ : १६. हे सत्य कसे प्रगट करते?

**मार्क १६ : १६ म्हणते** – *"जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरित नाही तो शिक्षेस पात्र ठरेल.*

५. बाप्तिस्मा हा प्रभूचा धावा करण्याचा मार्ग आहे. प्रेषितांची कृत्ये २२ : १६ हे सत्य कसे प्रगट करते?

**प्रेषितांची कृत्ये २२ : १६** – *तर आता उशिर का करितोस ? ऊठ, त्याच्या नावांचा धांवा करुन बाप्तिस्मा घे आणि आपल्या पातकांचे क्षालन कर.*

६. बाप्तिस्मा हा शुद्ध मनाने प्रभुचा धावा करण्याचा मार्ग आहे. पेत्राचे पहिले पत्र ३ : २१ हे वचन ह्या सत्याला दूजोरा देते काय?

**पेत्राचे पहिले पत्र ३ : २१** – *त्याच्या लाक्षणिक अर्थाने आता बाप्तिस्मा येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या द्वारें तुमचे तारण करीत आहे. त्याचा अर्थ (केवळ देहाचा मळ धुऊन टाकणे नव्हे, तर शुद्ध भावाने देवाचे ऐकणे ,असा आहे.)*

७. प्रेषितांची कृत्ये २ः ३८. प्रमाणे बाप्तिस्मासाठी जरुरीचे काय आहे?

८. मार्क १६ : १६. च्या अनुसार बाप्तिस्मासाठी काय आवश्यक आहे?

९. काय तान्हे बाळ पश्चाताप करु शकतात?

१०. काय तान्हे बाळ विश्वास ठेवू शकतात?

११. प्रेषितांची कृत्ये १०.: ४३–४८. ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानंतर विश्वासी व्यक्तिचे पुढले पाऊल कोणते?

**प्रेषितांची कृत्ये १० : ४३ - ४८** *"आणि विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नांवान पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात. {४४} पेत्राचे हे भाषण चालू असतांनाच वचन ऐकणाऱ्या सर्वावर पवित्र आत्मा उतरला. {४५} मग परराष्ट्रीयांवरहि पवित्र आत्म्याच्या दानाचा वर्षाव झाला आहे असें पाहून पेत्राबरोबर आलेल्या विश्वास ठेवणाऱ्या व सुंता झालेल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटले; {४६} कारण त्यांनी त्यांना अनेक भाषांतून बोलताना व देवाची थोरवी गातांना ऐकले. {४७} तेव्हा पेत्राने म्हटले, आम्हाला मिळाला तसा पवित्र आत्मा ज्यांना मिळाला आहे त्यांचा बाप्तिस्मा होऊ नये म्हणून कोणाच्याने पाण्याची मनाई करवेल? {४८} मग येशू ख्रिस्ताच्या नांवांत त्यांचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्यानें आज्ञा केली. तेव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली.*

# उत्तरावली

१. तरुण कोणता प्रश्न विचारत होता?

*स्वर्गात जाण्यासाठी त्याला बाप्तिस्माची आवश्यकता आहे*

२. प्रेषितांची कृत्ये १० : ४३. च्या अनुसार, आपला उद्धार कसा होतो?

*फुकट, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवूल्याने भेट म्हणून.*

३. बाप्तिस्मा हे एक विश्वासाचे दर्शक आहे जे सामान्यपणे उद्धाराच्या वेळेस होते . प्रेषितांची कृत्ये २.:३८ हे ह्या सत्याला कसे दर्शविते?

*पतरस म्हणतो "पश्चाताप करा आणि बाप्तिस्मा घ्या."*

४. मार्क १६ : १६. हे सत्य कसे प्रगट करते?

*येशू म्हणाला, "जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल ; ह्याचाच अर्थ हे त्याच वेळी घडते.*

५. बाप्तिस्मा हा प्रभूचा धावा करण्याचा मार्ग आहे. प्रेषितांची कृत्ये २२ : १६ हे सत्य कसे प्रगट करते?

*हे वचन म्हणते की जो कोणी प्रभूच्या नावाचा धावा करतो, त्यांच्या पातकांचे क्षालन होते. असे दिसते की जो कोणी मुखाने प्रभूचे नाव पुकारतो (लूक १८ : १३) किंवा बाप्तिस्मा घेण्याच्या कृतीने, जसे वचनामध्ये आढळते.*

६. बाप्तिस्मा हा शुद्ध मनाने प्रभुचा धावा करण्याचा मार्ग आहे. पेत्राचे पहिले पत्र ३ : २१ हे वचन ह्या सत्याला दूजोरा देते काय?

*होय*

७. प्रेषितांची कृत्ये २: ३८. प्रमाणे बाप्तिस्मासाठी जरुरीचे काय आहे?

*पश्चाताप*

८. मार्क १६ : १६. च्या अनुसार बाप्तिस्मासाठी काय आवश्यक आहे?

*व्यक्तिचा विश्वास महत्वाचा*

९. काय तान्हे बाळ पश्चाताप करु शकतात?

*नाही*

१०. काय तान्हे बाळ विश्वास ठेवू शकतात?

*नाही*

११. प्रेषितांची कृत्ये १०.: ४३ – ४८. ख्रिस्तावर विश्वास ठेवल्यानंतर विश्वासी व्यक्तिचे पुढले पाऊल कोणते?

*पाण्याचा बाप्तिस्मा*

# पाठ क्रमांक ६

# ख्रिस्तामध्ये ओळख - भाग १

*ॲन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखीत*

करिंथकरांस दुसरे पत्र ५: १७ म्हणते, *"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ति आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे."* *"ख्रिस्ताच्या ठायी"* हा शव्द प्रयोग जवळजवळ ३०० वेळा नव्या नियमामध्ये वापरण्यात आलेला आहे, प्रत्येक वेळा महत्वाच्या संर्दभासाठी, परमेश्वराशी एकरुप झालेल्या नात्याला दर्शवणारे. हे घडले तर तुम्ही नवी सृष्टि बनता. काही भाषांतर "नवी उत्पत्ति" थेट ह्याच शव्दाचा उपयोग करतात.

माझ्यामते हे एक अश्या गंभीर मुद्दयाच्या दिशेने नेते की ख्रिस्ताच्या ठायी तुमची नवी उत्पत्ति आहे हे समजावून घेणे अत्यावश्यक होते. हे काही शारीरिक स्तरावर घडत नाही. हे शरीराविषयी म्हणत नाही, की संपूर्ण शरीर बदलून जाईल. तुम्ही वेगळे दिसाल असे. उ़द्धार होण्यापूर्वी मनुष्य जर जाड असेल तर त्याने जेवणावर बंधन घातले नाही तर तो जाडच राहिल. हे तुमच्या बौद्धिक किंवा मानसिक भागाविषयी बोलत नाही – जसे काही लोक हे वास्तव "त्यांचेच" असल्याचे समजतात. उ़द्धार होण्यापूर्वीच्या पूर्वी जर तुम्ही खूप हुशार नसाल, तर उ़द्धार झाल्यानंतर तुम्ही खूप हुशार होणार नाही, परंतु तुमच्या मनात अजूनही त्याच पूर्वीच्या आठवणी व विचार असतील.

हा आहे तिसरा भाग, आणि ह्या वचनानुसार, वगळणाच्या प्रक्रियेत, आपला हा भाग जो बदलावयास हवा – आपला आत्मिक मनुष्य – थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र ५: २३ येथे पौल थेस्सलनीकाकरांच्या मंडळीसाठी प्रार्थना करत आहे, *"शांतीचा देव स्वतः तुम्हांस परिपूर्णपणें पवित्र करो; आणि आपला प्रभु येशू ख्रिस्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा, जीव, व शरीर निर्दोष अशी संपूर्णपणें राखली जावोत."*

हा परिच्छेद दाखवतो की आमच्याकडे आत्मा, जीव, आणि शरीर आहेत. शरीर हा बाह्यदर्शनी भाग आहे. असा भाग जो आपण पाहू शकतो, आपले बाह्य मनुष्यत्व. आपण सगळे जाणतां की ह्याच्याहि पलिकडचा भाग आहे – आपल्या भावनिक, बौद्धिक भावविश्वाचा भाग – ज्याला वचन जीव म्हणते. आपणास ठाऊक आहे की जरी माणूस शरीराने आपल्याला स्पर्श करत नाही तरी तो शब्दाच्या द्वारे आपल्याला स्पर्शून जातोच, मग ते सकारात्मक किंवा नकारात्मक असू दे. बहुतांशी लोक शरीर आणि जीव ह्या भागांच्या संर्पकात असतात, परंतु वचनानुसार, अजुनही एक भाग आहे, तो आहे आत्मा.

आपल्यातला आत्मा हा असा भाग आहे जो बदलतो आणि उद्धार झाल्यानंतर नवा होतो. हा खरे पाहता जीवनदायी भाग आहे. याकोबाचे पत्र २:२६ म्हणते, *"म्हणून जसे शरीर आत्म्यावांचून निर्जीव आहे तसा विश्वासहि क्रियांवांचून निर्जीव आहे."* हे असे दर्शवितो की हा आहे आत्मा जो आपल्या भौतिक शरीरात जीवनाचा श्वास फुंकतो. येथून आपले जीवन येते. उत्पत्ति २ मध्ये जेव्हा देवाने आदाम व हव्वेला निर्माण केले, आदामाचे शरीर पूर्ण होते, परंतु नंतर परमेश्वराने जीवनाचा श्वास त्याच्यात फुंकला. जुन्या करारातील हिब्रु भाषेतील वापरण्यात आलेल्या "श्वास" शव्दाचा अर्थ सुद्धा तंतोतंत श्वास असाच आहे, आणि एका ठिकाणी ह्याचे भाषांतर "आत्मा" असा आहे. परमेश्वराने भौतिक शरीर आणि आत्मिक मनुष्य असा आदाम निर्माण केला, परंतु नंतर त्याने त्यात जीवनाचा श्वास फुंकला आणि तो जिवंत जीव बनला. आपल्यामधील आत्मा हा असा भाग आहे जो जीवनदायी आहे.

उ़द्धाराच्या अगोदर, माणसाने आपल्या जीवनाचे संपूर्ण सर्मपण करण्याच्या आधीच जेणेकरुन परमेश्वर त्यांच्यामध्ये येईल, त्यांच्या आत असलेला आत्मा मृतवत होता. इफिसकरांस पत्र २ : १ म्हणते, *"तुम्ही* {मी} *आपले अपराध व आपली पातकें ह्यामुळे मृत झालेला होतां"* {जीवंत करण्यात आले}. आपणास ठाऊक आहे की आपला नव्याने जन्म झाल्यापूर्वीही आपण जीवंत होतो, परंतु मृत हा शब्द आत्म्यासाठी बोलला गेला. पवित्र शास्त्रातील मरणाचा अर्थ अस्तित्व नाहिसे होणे असा नाही ,जसे काही लोक विचार करतात. ह्याचा शब्दशः अर्थ आहे " वेगळे होणे." मरणाने. जेव्हा व्यक्ति शरीराने मरण पावतो, त्यांचे अस्तित्व नष्ट होत नाही. पवित्र शास्त्र सांगते की ते लगेचच देवाच्या सानिध्यात किंवा नरकात जातात. जीव व आत्मा जिवंतच रहातो, परंतु तेथे भौतिक शरीरापासून वेगळे होणे आहे ज्याला मरणे आणि कुजणे म्हणतात.

उत्पत्ति २ : १७ म्हणते, *"कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील."* ह्याचा अर्थ असा नाही की ते शरीराने मरण पावतील परंतु ते आत्म्याने परमेश्वराशी वेगळे होतील. जो आपला भाग आत्मा; ज्यात देवाने श्वास फुंकला, तो खरे पाहाता जीवन स्फूर्ति देणारा आहे. तो देवाच्या अलौकिक जीवनापासून वेगळा झाला ...... त्याच्या पवित्र आणि परिपूर्ण जीवनातून ........ पवित्र शास्त्रातील जीवन किंवा "परिपूर्ण किंवा विपुल जीवन." मग मानवाच्या अधःपतनाला सुरुवात झाली. आजही आत्मा क्रियाशील आहे, पण तो स्वईच्छेने कार्य करतो, देवापासून अलिप्त राहून. हेच आपल्या जीवनातील समस्येचे मूळ कारण आहे ........ भावनिक तानतनाव.

जेव्हा मनुष्य प्रभूकडे येतो, त्यांना नवा आत्मा मिळतो आणि त्यांचा नव्याने जन्म होतो, अश्या प्रकारची परिभाषा येशू योहान ३ : ५ मध्ये वापरतो. त्याच प्रकारे मनुष्याचा जेव्हा नवा जन्म होतो तेव्हा त्याला ख्रिस्ताचा आत्मा मिळून तो शरीरासमेत आत्मा, प्राण, शरीर असे जन्मतो. गलती ४ : ६ म्हणते, *"तुम्ही पुत्र आहा, म्हणून देवाने अब्बा, बापा, अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्या आमच्या अंतकरणात पाठविले आहे."* देवाने अक्षरशः त्याचा आत्मा आपल्या आत ठेवला, आणि आता आपल्याकडे नवे गुणवत्तापूर्ण जीवन आहे, एक नवी ओळख, आणि आम्ही आत्म्यामध्ये पूर्णपणे नवा मनुष्यत्व धारण करतो.

तुमचे उर्वरित विश्वांसी जीवन, जे काही तुमच्या आत्म्यात घडते त्याची शिक्षा तुम्हाला तुमच्या जीवात्मा आणि भावनिक क्षेत्रात देत असते. वास्तव हे आहे की येशू ख्रिस्ताला प्रभु म्हणून स्विकारताच तुमचा एक तृतीयांश उ़द्धार पूर्ण होतो. तुमचा आत्मा संपूर्णतः परिवर्तित होतो. संपूर्ण अनंतकाळासाठी तुमचा आत्मा असाच असेल. ज्यात अगोदरच प्रीती, शांती, आनंद आणि विपुलपणे देवाची उपस्थिती आहे. तुमच्या आत्म्यात काहीही उणीव किंवा कमतरता नाही, पण तुम्हाला त्याचे आकलन झाले पाहिजे. ह्याच कारणाने विश्वासी जीवनात देवाच्या वचनाचा अभ्यास करणे महत्वपूर्ण आहे. तुम्ही संपूर्णतः कोरे करकरीत नवे व्यक्ति आहात, परंतु जो पर्यत तुम्हाला त्याचे ज्ञान गवसत नाही, तो पर्यत तुम्ही बदलणार नाही. ख्रिस्ती जीवन तेव्हाच विजयी होते जेव्हा तुम्ही वचनात पाहाता, जे आत्मा व जीवन अशी आहेत, पाहा तुम्ही कोण आहात ते, पाहा देवाने काय केले ते, आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्यास सुरु करा.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५ : १७. म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो काय आहेत?

**करिंथकरांस दुसरे पत्र ५ : १७** – *"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ति आहे; जुने ते होऊन गेले ; पाहा,ते नवे झाले आहे "*

२. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५ : १७. जुन्या गोष्टीचे काय होते?

३. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५ : १७. कोणत्या गोष्टी नव्या बनल्या आहेत

४. वाचा इफिस २ : १. नव्याने जन्मण्याच्या पूर्वी किंवा नवे जीवन मिळण्याआधी तुमची स्थिती कशी होती?

**इफिस २ : १ – ५** – *"तुम्ही आपले अपराध व आपली पातकें ह्यामुळे मृत झालेले होतो; {२} त्या पातकांमध्ये तुम्ही पूर्वी चालत होता; अर्थात ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षांतील राज्याचा अधिपति म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याच्या अधिपति ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होता; {३} त्या लोकांत आम्हीही सर्व पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरुप असे वागलो, आपल्या देहाच्या व मनांच्या इच्छांप्रमाणे करीत होतो व स्वभावतः इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो; {४} तरी देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालेले असतांहि त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे, {५} ख्रिस्ताबरोबर आपणांला जिवंत केले, (कृपेने तुमचे तारण झालेले आहे)"*

५. वाचा इफिस २ : २. तुम्ही अविश्वासी होता तेव्हा तुमचे जीवन कसे होते किंवा तुम्ही कसे जगत होता?

६. वाचा इफिस २ : ३ – ५. देव कशात संपन्न आहे?

७. वाचा इफिस २ : ४. देव इतका दयासंपन्न का आहे?

८. वाचा इफिस २ : ५. आपण अर्धमात आणि आपल्या पापांत मृतवत असतानाच देवाने आपल्यासाठी काय केले?

९. वाचा इफिस २ : ५. देवाने आपल्याला कसे वाचविले?

१०. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ९ – १०. ह्या यादीतील वर्णन तुमच्याशी संबंधीत आहेत का?

**करिंथकरांस पहिले पत्र ६ : ९ – ११** – *" अनीतिमान माणसांना देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाही हे तुम्हाला ठाऊक नाही काय? फसूं नका; जारकर्मी , मूर्तिपूजक, व्यभिचारी, स्त्री सारखा संभोग देणारे, पुरुषासंभोग घेणारे {१०} चोर , लोभी, मद्यपी, चहाड व वित्त हरण करणारे ह्यांना देवाच्या राज्याचे वतन मिळणार नाही {११} आणि तुम्हांपैकी कित्येक तसे होते; तरी तुम्ही प्रभु येशू ख्रिस्ताच्या नांवात व आपल्या देवाच्या आत्म्यांत धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेले असे झाला.*

११. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. " कित्येक तसे होते" हे वाक्य वर्तमानकाळ, भुतकाळ, भविष्यकाळाच्या अवस्थेसाठी आहे?

१२. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. नव्याने जन्मल्यावर "कोणत्या तीन गोष्टि तुम्हाबरोबर होतात?

१३. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. काय ही अवस्था वर्तमानकाळ, भुतकाळ, भविष्यकाळाच्यासाठी आहे का?

१४. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : १७. "परंतु जो प्रभूशी जडला तो व प्रभू ........ ............... आहेत."

**करिंथकरांस पहिले पत्र ६ : १७** – *"परंतु जो प्रभूशी जडला तो व प्रभू एक आत्मा आहेत."*

# उत्तरावली

१. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५: १७. "म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो काय आहेत?

*नवी उत्पत्ति आहे.*

२. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५: १७. जुन्या गोष्टीचे काय होते?

*त्या निघून जातात.*

३. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५: १७ . कोणत्या गोष्टी नव्या बनल्या आहेत

*सर्व गोष्टी*

४. वाचा इफिस २ : १. नव्याने जन्मण्याच्या पूर्वी किंवा नवे जीवन मिळण्याआधी तुमची स्थिती कशी होती?

*मी माझे अपराध व आपली पातकें ह्यामुळे मृत झालेले होतो.*

५. वाचा इफिस २ : २. तुम्ही अविश्वासी होता तेव्हा तुमचे जीवन कसे होते किंवा तुम्ही कसे जगत होता?

*मी ह्या जगाच्या रहाटीप्रमाणे अंतरिक्षांतील राज्याचा अधिपति म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याच्या अधिपति ह्याच्या धोरणाप्रमाणे चालत होतो.*

६. वाचा इफिस २ : ३–५. देव कशात संपन्न आहे?

*दयासंपन्न*

७. वाचा इफिस २ : ४. देव इतका दयासंपन्न का आहे?

*त्याचे आपल्यावर असलेल्या महान प्रेमापोटी*

८. वाचा इफिस २ : ५. आपण अर्धमात आणि आपल्या पापांत मृतवत असतानाच देवाने आपल्यासाठी काय केले?

*ख्रिस्ताबरोबर आपणांला जिवंत केले.*

९. वाचा इफिस २ : ५. देवाने आपल्याला कसे वाचविले?

*त्याच्या कृपेने*

१०. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ९ – १०. ह्या यादीतील वर्णन तुमच्याशी संबंधीत आहेत का?

*होय*

११. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. कित्येक तसे होते हे वाक्य वर्तमानकाळ, भुतकाळ, भविष्यकाळाच्या अवस्थेसाठी आहे का?

*भुतकाळाच्या अवस्थेसाठी*

१२. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. नव्याने जन्मल्यावर "कोणत्या तीन गोष्टि तुम्हाबरोबर होतात?

*आपण देवाच्या आत्म्यांत धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेले असे झाला.*

१३. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : ११. काय ही अवस्था वर्तमानकाळ, भुतकाळ, भविष्यकाळाच्यासाठी आहे का?

*वर्तमानकाळाची*

१४. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६ : १७. " परंतु जो प्रभूशी जडला तो व प्रभू ..... ........ आहेत."

*एक आत्मा*

# पाठ क्रमांक १०

# ख्रिस्तामध्ये ओळख – भाग २

*ॲन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

आपल्या शेवटच्या धडयात, आपण नव्याने जन्मल्यावर आपल्या आत्म्यात, आपल्या हृदयातील परिवर्तन  ह्याविषयी चर्चा केली होती. आपण करिंथकरांस दुसरे पत्र ५: १७ उपयोगात आणतो, जे म्हणते, *"म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ति आहे. जुने ते होऊन गेले; पाहा तें नवे झाले आहे."* आपण पाहावयास सुरुवात केली की जेव्हा आपण नव्याने जन्मतो, तेव्हा आपल्या आत्मात परिपूर्ण रीतीने परिवर्तन होते, आणि देवाचे वचन हा एकमेव मार्ग आहे आपल्या आत्म्यात काय बदल झाला आहे हे जाणून घेण्याचा. आपल्याला बाहेरील गोष्टिद्वारे ह्याचे आकलन होत नाही, आणि आपल्या भावनांनी ह्याचे आकलन होत नाही कारण हे आत्मिक क्षेंत्र आहे. परंतु आपला आत्मिक भाग पूर्णपणे परिवर्तित होतो.

मी वचनांच्या आधारे व्यक्तिने येशूला आपल्या जीवनात स्विकारल्यावर कोणत्या गोष्टि होतात ह्या संर्दभात काही वचने देऊ इच्छितो. इफिसकरांस पत्र ४:२४, म्हणते, *"आणि सत्यापासून निर्माण होणारे नीतिमत्व व पवित्रता ह्यांनी युक्त असा देव सदृश निर्माण केलेला नवा मनुष्य धारण करावा."* जेव्हा व्यक्ति नव्याने जन्मतो, त्यांचा आत्मा धर्मी आणि खराखुरा पवित्र बनतो. वास्तवात पवित्र शास्त्र दोन प्रकारच्या धार्मिकतेबद्दल बोलते.

एक धार्मिकता जी तुम्ही तुमच्या कृत्याने उत्पन्न करता, आणि दुसऱ्या लोकांशी वागताना तुम्हाला अश्या तऱ्हेची धार्मिकता ठेवणे आगत्याचे आहे. जर तुम्ही योग्य वागलात नाहीत आणि योग्य ते केले नाही तर आपला मालक आपल्यावर रागवेल आणि आपला जोडीदारही आपल्याशी घटस्फोंट घेईल; ह्यासाठी आपणास स्वतःची

धार्मिकता गरजेची आहे. तथापि, परमेश्वर तुम्हाला तुमच्या बाहेरील धार्मिकतेवर स्विकारीत नाही. परमेश्वर अक्षरशः त्याची धार्मिकता तुम्हाला देतो.

करिंथकरांस दुसरे पत्र ५ : २१ म्हणते की पित्या परमेश्वराने आपल्या स्वतःच्या पुत्राला पाप असे केले जेणेकरुन आपणास त्याच्यामधे असलेली धार्मिकता प्राप्त व्हावी. तर मग अशी धार्मिकता आहे जी आपल्या बाह्य स्वरुपी धार्मिकतेच्या पलिकडली आहे आणि ती देवाने आपणासाठी काय केले ह्यावर आधारित आहे. आपल्याला शब्दशः ख्रिस्तावर विश्वासाच्या द्वारे देवाची धार्मिकता प्राप्त होते. आपण धार्मिकता आणि खऱ्या पवित्रतेत निर्माण झालेले आहोत. आपण धार्मिकतेत उन्नती करीत नाही; तर आपण पहिल्यापासूनच धार्मिक आहोत. सरल व्याख्या ही आहे की आपण पहिल्यापासूनच देवासमोर नीतिमान आहोत.

ख्रिस्तामुळे देव आपणावर प्रसन्न आहे, इतर कश्यामुळे नाही तर आपला आत्मा जो परावर्तित होतो. आपण पहिल्यापासूनच धार्मिकतेत आणि खऱ्या पवित्रतेत आणि एक कोरीकरकरीत निर्मिती आहोत. इफिसकरांस पत्र २ : १०, म्हणते, *"आणि आपण सत्कृत्यें करावी म्हणून ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृति आहोत."* आपल्या आत्म्यात आम्ही परिपूर्ण आणि अखंड आहोत. तेथे पाप किवा उणीव नाही. इफिसकरांस पत्र १ : १३, म्हणते, *"त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुम्हांवर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे."*

काहीजण विचार करतील की, ठीक आहे, पहिल्यांदाच जेव्हा मी प्रभुवर विश्वास ठेवला, तेव्हाच माझी पापे धुतली गेली आणि मी पूर्णपणे शुद्ध झालो आणि सर्वकाही यथायोग्य झाले. परंतु त्यानंतर मी पाप केले, मी परत देवाला खाली पाडले. जर तुमच्याबरोबर असे घडले असेल, तुमची वागणूक आणि बौद्धिक व मानसिकरीत्या चुकीची झाली असेल, परंतु तुमचा आत्मा पाप करीत नाही. हे ह्या प्रकारे आहे की एखादी स्त्री बाटलीत फळ ठेवून ती बाटलीच्या तोडाशी कागद लावून हवाबंद करते ज्यामुळे अशुद्धता बाहेरच राहिल. परमेश्वर तुम्हावर शिक्का मारतो, जेणेकरुन जेव्हा तुम्ही नव्याने जन्मता, तेव्हा तुम्हाला नवा आत्मा मिळतो, आणि पाप तुमच्या आत्म्याला कलुषित करु शकत नाही. तुम्हाला नवीन ओळख मिळते. देवाबरोबर नाते ठेवण्यासाठी, देवाबरोबर संगती ठेवण्यासाठी आणि आराधना जी तुमच्या शरीराने नाही तर तुमच्या आत्म्यातून होईल.

ख्रिस्ती जीवनामधील हे वास्तवात आलेले महान सत्य आहे, की एखादयाची ओळखच बदलते. तुमचा परमेश्वराशी संबंध हा तुमच्या भौतिक क्षेत्रात जे काही तुम्ही करता, मनात कश्या प्रकारचा विचार करता ह्यावर अवलंबून नसून तुम्ही जे आत्म्यात आहात ,त्याने तुमच्यासाठी जे केले त्यावर अवलंबून आहे. ते आहे परिपूर्ण कार्य, जे कधीही वर खाली होत नाही (मागे–पुढे होऊन बदलणारे) तुम्ही नीतिमान व निऱ्या सत्यात निर्माण झाले आहात. तो तुमचा आत्मिक भाग आहे, आणि परमेश्वराशी संगंती, तुम्हाला आत्म्यात आणि सत्यात त्याची आराधना करायची आहे. आपण ख्रिस्तात कोण आहोत ह्या ओळखीने आपणास उभे रहायचे आहे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६: १७. देवाचे वचन हा एकमेव मार्ग आहे आपल्या आत्म्यात परिपूर्ण परिवर्तन झाला आहे हे जाणून घेण्याचा. आपणाबरोबर काय घडते असे वचन सांगते?

**करिंथकरांस पहिले पत्र ६ : १७** – *"परंतु जो प्रभूशी जडला तो व प्रभू एक आत्मा आहेत."*

२. वाचा इफिसकरांस पत्र ३ : १७. आता ख्रिस्ताचे निवासस्थान कोठे आहे?

***इफिसकरांस पत्र ३ : १७*** – *ख्रिस्ताने तुमच्या अंतकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून*

३. वाचा इफिसकरांस पत्र ३ : १७. हे कसे घडते?

४. वाचा योहानाचे पहिले पत्र ५ : १२. उद्धारासाठी आपल्याकडे कोण हवे?

**योहानाचे पहिले पत्र ५ : १२** – *ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे ; ज्याला देवाचा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही.*

५. वाचा कलस्सैकरांस पत्र १ : २६ – २७. कोणते रहस्य युगानुयुग पिढयानपिढया गुप्त ठेवलेले होते, परंतु आता प्रगट करण्यात आले?

**कलस्सैकरांस पत्र १ : २६ – २७** – *जे रहस्य युगानुयुग पिढयानपिढया गुप्त ठेवलेले होते, परंतु आता त्यांच्या पवित्र जनांना प्रगट झाले ते हे वचन होय ; {२७} ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ति परराष्ट्रीयांमध्ये काय आहे हे आपल्या पवित्र जनांना कळविणे देवाला बरे वाटले ; गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुम्हांमध्ये आहे तो ते रहस्य आहे.*

६. वाचा इफिसकरांस पत्र ४ : २३ – २४. कोणाला धार्मिकतेत आणि निऱ्या सत्यात निर्माण केले आहे?

**इफिसकरांस पत्र ४ : २३ - २४ -** *म्हणते , " आणि तुम्ही आपल्या मनोवृतीत नवे केले जावे. { २४} आणि सत्यापासून निर्माण होणारे नीतिमत्व व पवित्रता ह्यांनी युक्त असा देव सदृश निर्माण केलेला नवा मनुष्य धारण करावा.*

७. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५: २१. कोणाची धार्मिकता आम्हाला मिळाली आहे?

**करिंथकरांस दुसरे पत्र ५ : २१ -** *"ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्याआमच्याकरिता पाप असे केले ; ह्यासाठी की , आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्व असे व्हावे.*

८. वाचा इफिसकरांस पत्र १ : ४. परमेश्वरासमोर आपण कसे उभे असतो?

**इफिसकरांस पत्र १ : ४ -** *त्याप्रमाणे आपण त्याच्या समक्षतेंत पवित्र व निर्दोष असावे , म्हणून त्याने जगाच्या स्थापनेपूर्वी आपल्याला ख्रिस्ताच्या ठायी निवडून घेतले.*

९. वाचा इफिसकरांस पत्र १ : ६. आपल्याला कसे स्विकारण्यात आले?

**इफिसकरांस पत्र १ :६ -** *म्हणते, "त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुति व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्याच्या ठायी विपुलतेने केली आहे.*

# उत्तरावली

१. वाचा करिंथकरांस पहिले पत्र ६: १७. देवाचे वचन हा एकमेव मार्ग आहे आपल्या आत्म्यात परिपूर्ण परिवर्तन झाला आहे हे जाणून घेण्याचा. आपणाबरोबर काय घडते असे वचन सांगते?

*आमचा आत्मा प्रभूशी जोडला जातो*

२. वाचा इफिसकरांस पत्र ३ : १७. आता ख्रिस्ताचे निवासस्थान कोठे आहे?

*आपल्या अंतकरणामध्ये*

३. वाचा इफिसकरांस पत्र ३ :१७. हे कसे घडते?

*विश्वासाने*

४. वाचा योहानाचे पहिले पत्र ५ :१२. उद्धारासाठी आपल्याकडे कोण हवे?

*पुत्र (येशू ख्रिस्त)*

५. वाचा कलस्सैकरांस पत्र १ : २६–२७. कोणते रहस्य युगानुयुग पिढयानपिढया गुप्त ठेवलेले होते, परंतु आता प्रगट करण्यात आले?

*आपल्यामध्ये असलेला ख्रिस्त जो गौरवाची आशा*

६. वाचा इफिसकरांस पत्र ४ : २३– २४. कोणाला धार्मिकतेत आणि निऱ्या सत्यात निर्माण केले आहे?

*नवा मनुष्य (नवीन जन्मलेला आत्मा )*

७. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ५ : २१. कोणाची धार्मिकता आम्हाला मिळाली आहे?

*ख्रिस्ताच्या ठायी देवाचे नीतिमत्व*

८. वाचा इफिसकरांस पत्र १ : ४. परमेश्वरासमोर आपण कसे उभे असतो?

*पवित्र व निर्दोष*

९. वाचा इफिसकरांस पत्र १ : ६. आपल्याला कसे स्विकारण्यात आले?

*प्रिय (येशू ख्रिस्ता) मध्ये*

# पाठ क्रमांक ११

# विश्वासीगण पाप करतात तेव्हा काय होते

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

आज आपण ह्या विषयाकडे बघणार आहोत की "जेव्हा विश्वासणारे पाप करतात तेव्हा काय होते?" पवित्र शास्त्र योहानाचे पहिले पत्र १ : ८ – ६ मध्ये सांगते, *आपल्या ठायी पाप नाही असे जर आपण म्हणत असलो, तर आपण स्वतःला फसवितो व आपल्या ठायी सत्य नाही. {६} जर आपण आपली पापें पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुध्द करील.* विश्वासी असूनही आपण अडखळणार आणि कालांतराने आपल्या हातून पाप घडणारच. मग परिवर्तन होण्याच्या आधीचा आणि नंतरचा फरक हाच की आता आपल्याकडे नवा स्वभाव आहे. पापाविषयी खेद करणारा. आपल्याला पाप करायचे नसते; आम्हाला तर पवित्र जीवन जगायचे असते. पण मग जेव्हा आम्ही पाप करतो तेव्हा काय घडते ? तेव्हा तुम्हाला पुन्हा उद्धाराची गरज आहे का? अश्या प्रकारची शिकवण पवित्र शास्त्र देते का? अश्या स्थितीत आपण आशाहीन आहोत, एका अर्थाने आपण जगापेक्षा महादययनीय आहोत. किमान जगातल्या लोकांना पाप केल्यावर खंत तर वाटत नाही. विश्वासी होण्याच्या नात्याने पाप करणे हे आपल्या केद्रस्थानी नसते. इब्री लोकांस पत्र १० : २ म्हणते येशूच्या बलिदानाच्या द्वारे, विश्वासणाऱ्यांवर पापांचे नियंत्रण नाही, पाप हे आपल्या जीवनाच्या केद्रस्थानी नाही.

रोमकरांस पत्र ४ : २ म्हणते, *कारण अब्राहाम कर्मांनी नीतिमान* (धर्मी) *ठरला असला तर त्याला अभिमान बाळगण्यास कारण आहे; तरी देवासमोर नाही* (कंस माझे). जर तारण आमच्या गुणवत्तेवर आधारित असते, आपण ज्या गोष्टी करतो त्यावर, तर आपण अभिमान बाळगू शकतो. आपण म्हणू शकतो, "हे देवा, तू जे क्रुसावर केलेस

त्याबद्दल मी तुझी बढाई करतो, पण मी केलेल्या गोष्टिही स्मरणात आण!" अशाप्रकारे संपूर्ण अनंतकाळासाठी आपण येशूची पाठ थोपटु आणि स्वतःचीही पाठ थोपटु आम्ही मिळून केलेल्या गोष्टिंसाठी. नाही, देवाने उद्धाराला अश्या तऱ्हेने आकार दिला आहे की कोणीही फुशारकी किंवा मानवाच्या वाटयाला गौरव येऊ नये. महिमा आणि गौरव केवळ प्रभु येशू ख्रिस्ताचा असावा. (रोमकरांस पत्र ३ : २७) अनंतकालिन जीवनाची भेट ही खरीखुरी भेट आहे जी कमवू नाही शकत. (रोमकरांस पत्र ६ : २३)

रोमकरांस पत्र ४:२ म्हणते की जर अब्राहाम स्वतःच्या कार्यानी नीतिमान झाला असता, तर त्याला त्या विषयी बढाई मारावयास जागा असती, पण असे काहीही झाले नाही. वचन काय म्हणते की मनुष्याचा उ़द्धार कसा होतो? त्याच्या स्वतःच्या कामगिरीवर का? तो जे कार्य करतो त्याच्यावर काय? त्याने ज्या गोष्टी केल्या त्याच्यावर का? अब्राहाम कशाने नीतिमान गणला गेला, किंवा धर्मी घोषित झाला? त्याने केलेल्या किंवा न केलेल्या गोष्टींद्वारे, किंवा निव्वळ त्याने विश्वास ठेवला, त्याने देववार श्रद्धा ठेवली किंवा विश्वासाने परमेश्वरावर भरवसा ठेवल्या द्वारे का? पवित्र शास्त्र रोमकरांस पत्र ४:३ म्हणते, *"कारण शास्त्र काय सांगते? अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्त्व असे गणण्यांत आले."*

कोण मला त्या श्रेणित नेऊन ठेवतो व नाशापासून राखतो, अश्या समयी सुद्धा जेव्हा मी चुकतो आणि पाप करतो? हे अशा मुळे की ख्रिस्ताने माझी सारी पापे क्रूसावर वाहिली, आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्याद्वारे (माझ्या स्वतःच्या कार्यावर नाही), मी धर्मी बनलो (परमेश्वरासमक्ष नीतिमान झालो).

रोमकरांस पत्र ४ : ६ म्हणते, *"हयाप्रमाणे ज्या माणसाकडे देव कर्मावाचून नीतिमत्व गणितो त्याच्या धन्यतेचे वर्णन दाविदहि करितो."* जुन्या करारातील दाविदचे म्हणणे नवा नियम नवा दिवस घेऊन येणार जेव्हा परमेश्वर मनुष्याच्या कार्याविनाच त्याच्या हिशेबी धार्मिकता मांडेल. मग तो नंतरच्या वचन ७ मध्ये म्हणतो ते असेः *"ज्यांच्या अपराधांची क्षमा झाली आहे व ज्यांच्या पापांवर पांघरुन घातले आहे ते धन्य"* ह्यात एक जोडबंद आहेः *"ज्या माणसाला हिशेबी प्रभु पाप लावित नाही, तो धन्य."* (रोमकरांस पत्र ४ : ८) तो असे म्हणत नाही की तो करेल किंवा करणार नाही, कधीतरी तो करेल कधीतरी करणार नाही. हे म्हणते, *"ज्या माणसाला हिशेबी प्रभु पाप लावित नाही, तो धन्य."* ग्रीक मध्ये ज्याला स्पष्ट नकारार्थी म्हणतात. ह्याचा अर्थ तो कधीही नाही, कधीही तुमच्या हिशोबी पाप लावणार नाही. ही आहे नवीन करारातील चांगली

बातमी. इब्री लोकांस पत्र १० : १६, *"परमेश्वर म्हणतो, त्या दिवसांनंतर जो करार मी त्यांच्याबरोबर करीन तो हाः मी आपले नियम त्यांच्या मनांत घालीन, आणि ते त्याच्या हृदयपटंवर लिहीन."* (माझ्या) आणि त्या करारीतील भागात वचन १७ मध्ये परमेश्वर म्हणतो कीः "आणि त्याची पापे व त्यांचे स्वैराचार मी ह्यापुढे आठवणारच नाही."

तर मग ते काय जे तुम्हाला परमेश्वरासमक्ष धर्मी आणि नीतिमानाच्या श्रेणीत बसविते, तेव्हा सुद्धा जेव्हा तुम्ही पाप करता आणि त्याची कबूली करण्या इतपत ही तुमच्या जवळ वेळ नसतो? ही आहे तुमचा येशू ख्रिस्तावरील विश्वास. त्याचे नाव येशू आहे, आणि तो लोकांना त्यांच्या पापांपासून वाचविल (मत्तय १ :२१)

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा रोमकरांस पत्र ४:५, देव ................नीतिमाना (धर्मी) लेखतो.

**रोमकरांस पत्र ४ : ५ - ६** - *पण जो काम करीत नाही तर अभक्ताला नीतिमान ठरविण ाऱ्यावर विश्वास ठेवतो त्याचा विश्वास नीतिमत्व असा गणण्यांत येतो..{६}ह्याप्रमाण े ज्या माणसाकडे देव कर्मावांचून नीतिमत्व गणितो त्याच्या धन्यतेचे वर्णन दावीदहि करितो.*

२. वाचा रोमकरांस पत्र ४ : २ – ३ : देव अब्राहामाच्या हिशोबी काहीतरी गणतो (जेव्हा तो विश्वास ठेवतो) जे त्याच्याकडे पूर्वी नव्हते. ते काय होते?

**रोमकरांस पत्र ४ :२ - ३** - *कारण अब्राहाम कर्मानी नीतिमान ठरला असला तर त्याला अभिमान बाळगण्यास कारण आहे ; तरी देवासमोर नाही...{३} कारण शास्त्र काय सांगते ? अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्व असे गणण्यांत आले.*

३. वाचा रोमकरांस पत्र ४ : २२ – २४. अब्राहामाप्रमाणे आपणही विश्वास ठेवला तर, देव आपल्या हिशेबी काय लावेल?

*रोमकरांस पत्र ४ :२२ – २४. " म्हणूनच ते त्याला नीतिमत्व असे गणण्यांत आले. {२३} ते त्याच्याकडे गणण्यांत आले, हे केवळ त्याच्यासाठी नव्हे. {२४} तर आपल्या प्रभु येशूला ज्याने मेलेल्यांमधून उठविले त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आपणांसाठीहि ते लिहिलेले आहे, त्या आपणांलाहि ते गणिले जाणार आहे.."*

४. वाचा रोम ४ : ६. देव नीतिमत्व (धार्मिकता ) मनुष्याच्या हिशेबी गणतोः

अ. त्यांच्या कार्यानुसार

ब. त्यांच्या कार्या व्यतिरिक्त

क. ह्यावर की ते किती चांगले आहेत

५. वाचा इब्री लोकांस पत्र १० : १४ . विश्वासीगण किती काळापर्यंत परमेश्वरा समक्ष परिपूर्ण राहतात?

**इब्री लाकांस पत्र १० : १४** – *"कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचें पूर्ण केले आहे."*

६. वाचा रोम ५:१७ नीतिमत्त्व ...... मिळते

अ. कमवल्याने

ब. एक भेट म्हणून

क. त्यासाठी कार्य करुन

**रोम ५ : १७** – *म्हणते, "कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारें, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषकरुन त्या एकाच येशू ख्रिस्ताच्याद्वारे जीवनांत राज्य करितील."*

७. "भेट " हा शव्द कशाला दर्शवितो?

८. वैयक्तिक उद्धारकर्ता म्हणून येशूवर विश्वास ठेवणे, तुम्ही विश्वास ठेवता की तो तुम्हाला थेट घेऊन जाईल

अ. चर्चला

ब. स्वर्गात

क. रशियात

# उत्तरावली

१. वाचा रोमकरांस पत्र ४ : ५, देव धर्मी (नीतिमाना) ................ लेखतो.

*अभक्ताला*

२. वाचा रोमकरांस पत्र ४ : २ – ३ : देव अब्राहामाच्या हिशोबी काहीतरी गणतो (जेव्हा तो विश्वास ठेवतो) जे त्याच्याकडे पूर्वी नव्हते. ते काय होते?

*नीतिमान किंवा परमेश्वरासमक्ष धर्मी*

३. वाचा रोमकरांस पत्र ४ : २२ – २४. अब्राहामाप्रमाणे आपणही विश्वास ठेवला तर, देव आपल्या हिशेबी काय लावेल?

*नीतिमान किंवा परमेश्वरासमक्ष धर्मी*

४. वाचा रोमकरांस पत्र ४ : ६. देव नीतिमत्त्व (धार्मिकता) मनुष्याच्या हिशेबी गणतो

*ब. त्यांच्या कार्याव्यतिरिक्त*

५. वाचा इब्री लोकांस पत्र १० : १४. विश्वासीगण किती काळापर्यत परमेश्वरा समक्ष परिपूर्ण राहतात?

*अनंतकाळासाठी*

६. वाचा  रोम ५ : १७ . नीतिमत्त्व मिळते

*ब. एक भेट म्हणून*

७. "भेट " हा शव्द कशाला दर्शवितो?

*किंमत न मोजता, फुकट माणसाला मिळालेले*

८. वैयक्तिक उद्धारकर्ता म्हणून येशूवर विश्वास ठेवणे , तुम्ही विश्वास ठेवता की तो तुम्हाला थेट घेऊन जाईल

*ब. स्वर्गात*

# पाठ क्रमांक १२

# परमेश्वरीय वचनांची विश्वासार्हता

*ॲन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखीत*

मार्क ४ हा देवाच्या वचनाच्या खरेपणाविषयीचा विलक्षण अध्याय आहे – सामर्थ, चरित्र, आणि विश्वास ह्यात अंर्तभूत आहे. ह्या एका दिवसात किमान १० दाखले तरी शिकवण्यात आले. तुम्ही मार्क ४ ची तुलना मत्तय १३ आणि लूक ८ शी करुन हे पाहू शकता. त्यात अनेक दाखले होते, त्यातील एक म्हणजे पेरणाऱ्याचा दाखला आहे. मार्क ४ :२६ मध्ये तो म्हणतो, *"कारण आणखी तो म्हणाला, परमेश्वराचे राज्य असें आहे की, जणू काय एखादा माणूस जमिनीत बी टाकतो."* लक्ष द्या वचन १४ मध्ये म्हटले आहे हे बीज म्हणजे देवाचे वचन. देव तुम्हाला शेतकरी कसे व्हावे हे काही सांगत नाही, परंतु तो नैसर्गिक वस्तूंचा वापर आत्मिक सत्याचा उलघडा करण्यासाठी असे करतो. वचन २७ म्हणते, *"आणि ते बी रुजते व वाढते पण हे कसें होते हे त्याला कळत नाही."* त्यात माझ्या मते हे महत्वाचे आहे. हे सांगते की माणसाला खरे तर कळत नाही. तो समजू शकत नाही की हे कसे घडते.

काही लोक म्हणतील, "तुम्ही कश्याविषयी बोलत आहात हे मला कळत नाही. कश्या प्रकारे देवाचे वचन मला बदलेल आणि कश्यातऱ्हेने देवाचे जीवन माझ्यामध्ये वस्ती करेल?" मला अजिबातच कळत नाही, पण एवढे मी जाणतो की हे कार्य करते. मला कळत नाही आपण जमीनीखाली एक इवंलस बीज टाकतो आणि सगळीकडे त्याच्यातून धान्यांनी भरलेली टपोरी रोपे दिसू लागतात आणि शंभर पट्टीने त्यांची निर्मिती होते. कोणालाही हे पूर्णपणे कळालेले नाही, पण ही क्रिया घडते. मी सांगू शकतो की कार्य होते. देवाचे वचन वाचल्याने आणि आपल्या हृदयात भरुन ठेवल्याने आपली वागणूक बदलते, आपले अनुभव विश्व, आणि आपली समजशक्ती बदलते.

वचन २८ म्हणते, *"आणि जमीन आपोआप पीक देते;"* जमीन बीजाला रुजवण्यासाठी आणि वाढवून जीवन देण्यास दिली आहे. तुमचे हृदय ही देवाच्या वचनासाठी बनवले होते – हे सत्य होते. देवाचे वचन तुमच्या हृदयात टाकण्यासाठी बनवले आहे. फक्त पवित्र शास्त्र घेऊन छातीशी कवटाळणे, टेबलावर ठेवणे ह्यामुळे तुमच्यात काहीही गुण येणार नाही. अश्याने तुमचे जीवन सामर्थ्यशाली होणार नाही. तुम्हाला देवाचे वचन घ्यावे लागेल, त्याला बीज बनवावे लागेल, व तुमच्या अंतःकरणात रुजवावे लागेल. जेव्हा तुम्ही हे कराल, तुमचे हृदय आपोआपच फळ उपजविण्यासाठी तयार होईल. आपोआपच हे आपल्या जीवनातील कार्याला बदलुन टाकतील. वचन पुढे म्हणते, *"पहिल्याने अंकुर मग कणीस, मग कणसात भरलेला दाणा."* हे दर्शवितात की येथे वाढण्याच्या आणि परिपक्व होण्याच्या पायऱ्या किंवा चरण आहेत. प्रत्येक वेळा लोक माझ्याकडे हे सांगत येतात की ते देवाकडून खरोखरच काहीतरी चांगले होण्याची अपेक्षा करतात. दैवीय गोष्टी. मी तुमच्याशी सहमत आहे परंतु तुम्ही कधी काहीच केले नाही, जर तुम्ही कोणत्याही व्यक्तिला सुसमाचार सांगत नाही तर मी तुम्हाला हमी देत म्हणतो की पुढच्या काळात तुमच्याकडे टेलीव्हिजन किंवा रेडियोचे सेवाकार्य नसेल.

आपल्याला टप्याटप्यात गोष्टी कराव्या लागतील. देवाकडून प्राप्त करण्याचाही टप्पा असेल, आणि ह्याचेच वर्णन हा दाखला करीत आहे. सर्वप्रथम आपल्याला सुरुवात करावी लागेल, मग अपेक्षा पल्लवित होतील, मग विश्वाास येईल. मग त्याचा परिणाम पुढे येईल. नेहमीच विजयासाठीच्या पायऱ्या असतात. कोणीही एका क्षणात शून्यावरुन ताशी हजार मैल जाऊ शकत नाही. जरी ही दैवीय इच्छा असेल तरीही अशाच प्रकारे कार्यान्वित होत जाईल. हे वचन दर्शविते की देवाचे राज्य एखादया बीजाप्रमाणे आहे. वचने तुमच्या हृदयात रुजावयास हवीत, कालांतराने वाढ होईल. पहिले अंकुर, मग कणीस, मग कणसाने भरलेला दाणा. नंतरचे वचन म्हणते, *"पीक तयार झाल्यावर तो लागलाच विळा घालतो. कारण कापणीची वेळ आली आहे."* तेथेही टप्पे आहेत, परंतु अखेरीस फलदायीतेची आणि परिपक्वतेचा समय येतोच.

त्याने वचन ३५ मध्ये मुद्दा उचलला, *"त्याच दिवशी संध्याकाळ झाल्यावर तो त्यांना म्हणाला, आपण पलीकडे जाऊ या."* येशू संपूर्ण दिवस देवाच्या वचनाच्या सामर्थ्याविषयी शिकवित होता, कसे देवाचे वचन एका बीजाप्रमाणे आहे, कश्या तऱ्हेने ते देवाचे जीवन तुमच्या जीवनात प्रदान करते. तो ही शिकवण कमीत कमी १० दाखले देत करत आहे, मग येथे तो त्यांची परीक्षा घेत आहे. तो त्यांना म्हणाला, "चला मग आता देवाच्या वचनानुसार आपण – सरोवराच्या पलीकडे जाऊ." तो असे नाही

म्हणाला, "मचव्यात चढुन, सरोवराच्या मध्यभागी जाऊ आणि बुडु." परंतु तो एवढेच म्हणाला, "चला पलिकडे जाऊ" मग तो मचव्यात चढला आणि झोपी गेला. गोष्टीत पुढे मोठे वादळ येते आणि बोट पाण्याने भरते. लक्षात असु द्या की हे काही केबिन समुद्रपर्यटन वाले जहाज नव्हते ज्यात येशू खालच्या मजल्यावर जाऊन न भिजताच निजला असेल. इतका बेदखल की त्याला बाहेरच्या वातावरणाची काहीच जाणीव होऊच शकणार नाही. ही तर एक उघडी बोट होती आणि येशू तिच्यात झोपला होता, चहू बाजूंनी खवळलेले पाणी . हे ह्या कारणासाठी महत्वाचे आहे की त्याला काय चाललंय ह्याची कल्पना होती, तरी पण तो झोपण्याचा प्रयत्न करीत होता. शिष्य हवालदिल होऊन त्याच्याकडे आले, आणि म्हणाले "गुरुजी, आम्ही बुडतो आहे ह्याचे तुम्हाला काहीच वाटत नाही का?" दुसऱ्या भाषेत बोलायचे तर ते म्हणत होते "काहीतरी करा! बादली घ्या आणि पाणी काढा, बोट वल्हवा, काहीतरी करा! तुमचे वजन मचव्याला पेलवणार नाही!"

आजही बहुतेक वेळा लोक परमेश्वराशी असेच करतात आणि म्हणतात, "देवा तू काहीच का करीत नाहीस?" देवाने केलेले आहे. त्याने प्रभू येशूच्या भरपाई द्वारा आपल्याला गरजेच्या सर्व गोष्टी दिलेल्या आहेत. त्याने आपली वचने उत्पादित केली आणि आपल्याला सगळी बीजे दिली. आता त्यांना अंतकरणात रुजवणे हे आमचे काम आहे. त्याने आपल्याला वचने दिलेली आहेत. आणि आपले काम आहे हे बीज घेण्याचे, आपल्या अंतकरणात घ्यायचे आणि जो पर्यत त्यातून जीवन उत्पन्न होत नाही तोवर त्यावर मनन करणे. परंतु शिष्यांना येशूला जागे करुन असे बोलायचे होते की "तू काहीच का करीत नाहीस?" तो उठला, त्याने वारा आणि लाटांना दटाविले, ते शांत झाले. नंतर तो शिष्यांकडे वळून त्यांना म्हणाला, "तुम्ही इतके भित्रे कसे? असे कसे की तुमचा विश्वासच नाही?" तो असे नाही म्हणाला, "मित्रांनो मला क्षमा करा. मला काहीतरी करायला हवे होते." नाही, त्याचा वाटा होता त्यांना शिकवणे व अभिवचने देणे, आणि त्यांचा वाटा होता वचनांना ग्रहण करणे आणि अभिवचनावर विश्वास ठेवणे. देवाने येशूच्या जगात येण्याद्वारे सर्वकाही देऊ केलेले आहे. वचनरुपी बीजाने आपल्याला जीवनातील प्रत्येक क्षेत्रात उन्नत होण्यासाठी सर्वकाही देऊ केले आहे. तुम्हाला देवाच्या वचनाचे वचनरुपी बीज घेऊन, त्यावर मनन आणि चिंतन करुन आणि त्याला तुमच्या अंतकरणात मूळ पकडू द्यावयास हवे. जसे तुम्ही हे कराल, तेव्हा तुम्ही उगे राहात तुमच्या जीवनातील वादळ शांत करण्यास सक्षम व्हाल.

माझ्या मते देवाच्या दृष्टिने ह्या शिष्यांसाठी हे उत्तम होते की त्यांनी त्या दिवशी येशूने दिलेली शिकवण आत्मसात केली असती आणि म्हणाले असते की, "चला पलिकडे पोहचू." ते असे म्हणाले असते, "आज त्याने आपल्याला जे सगळे शिकवले, ते आपले अभिवचन आहे. हा जो सृष्टिकर्ता त्याने आपल्याला म्हटले आहे की चला पलिकडे जाऊ, असे नाही की मध्यावर बुडून जाऊ. त्यांनी जर ते वाक्य आत्मसात केले असते, विश्वासात ते घोळवले असते तर त्यांना देखिल वारा आणि लाटांना दटावता आले असते." हेच नेमके येशू म्हणालाः *"तुम्ही इतके भित्रे कसे? तुम्हाला विश्वास कसा नाही?"* आता तुम्हाला ठाऊक आहे ना? देवाच्या वचनावर विश्वास ठेवा आणि विश्वासाला क्रियाशील करा.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मत्तय २३ १६. जर आपण देवाचे वचन आपल्या अंतकरणात रुजू दिले नाही. तर काय होईल?

**मत्तय १३ : १६** – *कोणी राज्याचे वचन ऐकतो पण ते त्याला समजत नाही, तेव्हा तो दुष्ट येऊन त्याच्या अतःकरणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे.*

२. वाचा यहोशवा १ : ८ आपणास देवाच्या वचनाचे मनन कधी करायला हवे?

**यहोशवा १ : ८** – *नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे ; त्यांत जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यशप्राप्ति घडेल.*

३. वाचा योहान ६ः ६३. ह्या वचनाप्रमाणे, देवाचे वचन आहे.........................................

**योहान ६: ६३** – *आत्मा हा जिवंत करणारा आहे , देहापासून काही लाभ नाही ; मी जी वचनें तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत;*

४. वाचा मत्तय ५ : ५. मानव केवळ भाकरीने नव्हे तर .......................................................

**मत्तय ४ : ४** – *परंतु त्याने उत्तर दिले की. ' मनुष्य केवळ भाकरीने नव्हे , तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल,' असा शास्त्रलेख आहे.*

५. वाचा इफिसकरांस ६ : १७. देवाचे वचन कश्या प्रकारचे शस्त्र आहे?

**इफिसकरांस ६ : १७** – *तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तरवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या.*

६. तरवार शत्रूला ईजा करु शकते का?

७. वाचा रोमकरांस पत्र ८ : ६. जेव्हा आपण आपल्या हृदयात देवाच्या वचनाला योग्य स्थान देऊ, तेव्हा आपल्याकडे ................................ असेल.

**रोमकरांस पत्र ८ : ६** – *कारण देहस्वभावाचे चिंतन हे मरण ; पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांती आहे.*

८. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ३ : १८ – आपण ज्यावर लक्ष्य केंद्रित करु ते संपूण ीरित्या बनु आपल्याला आपले लक्ष्य कशावर केद्रित करायला हवे?

**करिंथकरांस दुसरे पत्र ३ : १८** – *परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे 'प्रभूच्या वैभवाचे' प्रतिबिंब पाडीत आहो; आणि प्रभु जो आत्मा त्याच्या द्वारें , तेजस्वितेच्या परंपरेने आपले रुपांतर होत असता आपण त्याच्याशी समरुप होत आहों.*

# उत्तरावली

१. वाचा मत्तय २३ १६. जर आपण देवाचे वचन आपल्या अंतकरणात रुजू दिले नाही. तर काय होईल?

*तेव्हा तो दुष्ट येऊन ते हिरावून घेईल जेणेकरुन ते आपल्या जीवनात वाढू शकणार नाही.*

२. वाचा यहोशवा १ : ८. आपणास देवाच्या वचनाचे मनन कधी करायला हवे?

*रात्रंदिवस*

३. वाचा योहान ६: ६३. ह्या वचनाप्रमाणे, देवाचे वचन आहे ..................................

*आत्मा व जीवन*

४. वाचा मत्तय ५ : ५. मानव केवळ भाकरीने नव्हे तर ..................................................

*परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल*

५. वाचा इफिसकरांस ६ :१७. देवाचे वचन कश्या प्रकारचे शस्त्र आहे?

*तरवार*

६. तरवार शत्रूला ईजा करु शकते का?

*होय*

७. वाचा रोमकरांस पत्र ८ : ६. जेव्हा आपण आपल्या हृदयात देवाच्या वचनाला योग्य स्थान देऊ,तेव्हा आपल्याकडे .................................. असेल.

*जीवन आणि शांती*

८. वाचा करिंथकरांस दुसरे पत्र ३ : १८. आपण ज्यावर लक्ष्य केद्रित करु ते संपूर्णरित्या बनु आपल्याला आपले लक्ष्य कशावर केद्रित करायला हवे?

*प्रभू आणि त्याच्या वैभवावर*

# पाठ क्रमांक १३

# परमेश्वर दोषी नाही

*ॲन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

.

आज देवाने माझ्या जीवनात केलेली अतिशय महत्वाची बाब तुमच्याशी वाटु इच्छितो. मला असे वाटते की लोक जे सर्व काही घडते ते देवाकडूनच होते ह्यावर ओघानेच विश्वास ठेवतात, की देव सर्व नियंत्रित करतो. ह्याची कारणमिमांसी ही आहे की देव सार्वभौमिक आणि सर्व शक्तिमान आहे, आणि ते आपणहून समजून घेतात की तो त्यांच्या जीवनात घडणाऱ्या हरेक बाबी नियंत्रित करतो. अन्य जातीचे लोकांचा पण विश्वास असाच असतो. असे बहुतेक ख्रिस्ती आहेत ते ह्याच तत्वज्ञानाला दुजोरा देतात,आणि हे त्यांच्या जीवनात अगदीच भिनले गेले आहे. मी विश्वास करतो वचनावर जे ह्याच्या अगदी उलट आपल्याला शिकवते, आणि आपल्या जीवनासाठी आपल्याला हा धडा शिकणे महत्वाचे आहे.याकोबाचे पत्र १ :१३ – १७, म्हणते *"कोणाची परीक्षा होत असता, देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टीचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडीत नाही; तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलविला जातो तेव्हा मोहांत पडतो. मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजविते. माझ्या प्रिय बंधूंनो , फसू नका; प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरुन आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेंत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते."*

हे वचन स्पष्ट करते की देव हा चांगल्या गोष्टींचा लेखक आहे. येशूने योहान १० : १० म्हटले *"चोर येतो तो केवळ चोरी,घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवन प्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे."* जर चांगले आहे तर ते देवाकडून आहे; जर वाईट आहे तर सैतानाकडून आहे. हे आहे साधे सरळ तत्वज्ञान. हे ह्यासाठी क्लिष्ट आहे की याकोबाचे पत्र ४ : ७ म्हणते, *"म्हणून देवाच्या अधीन*

*व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हांपासून पळून जाईल."* हे सांगते की आम्हाला समर्पित व्हायचे आहे किंवा देवाच्या स्वाधीन करायचे आहे आणि सैतानाला आडवायचे आहे. "अडवणे" हा शब्द म्हणजे शरीराने लढाई करणे.

जेव्हा लोक विश्वास ठेवतात की जीवनात जे काही घडत ते देवाकडूनच घडते– उदाहरणार्थ , आजार ,व्यवसायात अपयश, नोकरी जाणे, न ऐकणारी लेकरे , किंवा घटस्फोट – हे त्याना निष्क्रियण अवस्थेत घेऊन जाते. ते जर खरंच असा विचार करतात की देवच नशीब लिहितो आणि त्याच्या माध्यमाने त्यांना शिक्षा देतो किंवा त्यांच्यात बदल घडवून आणतो, जर ते त्याच्या विरोधात गेले तर त्यांना झगडावे लागेल. तरीही याकूब ४ :७ म्हणते, सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हांपासून पळून जाईल. तुम्हाला स्वतःला देवाला समर्पित करावे लागेल. हे दाखविते की काही गोष्टी देवाच्या आहेत आणि काही गोष्टी सैतानाच्या आहेत. जगात दुष्ट शक्ती आहे, तुमच्या जीवनात जे काही होते ते सगळेच्या सगळे देवाकडून येत नाही. जर तुम्हाला हे कळत नसेल तर सैतानाच्या आहारी जाऊन नाश पावाल आणि प्रत्यक्षात सैतानाला बलवंत बनवाल.

मला रोमकरास पत्रातील परिच्छेद पुढे आणू दे कारण ह्याचा नेहमीच गैरवापर होताना दिसून येतो. मी अशा अंतयात्रेला गेलो होतो जेथे लोकांना देवाबद्दलची काहीच माहीती नव्हती, ते कधी चर्चला जात नसत, वचनाबद्दल तर त्यांना नगण्य ठाऊक होते, पण त्यांना हे वचन मात्र ठाऊक होते. रोमकरांस पत्र ८ : २८ म्हणते, *"परंतु आपल्याला ठाऊक आहे की ,देवावर प्रीति करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात."* पण ह्याचा अर्थ ते असा काढतात की जे काही तुमच्या जीवनात घडते, ते परमेश्वर घडवितो आणि कसेही करुन तो ते आपल्या भल्यासाठीच करतो. मी अशा तरुण आणि तरुणीच्या अंतयात्रेला गेलो होतो ज्यांनी दारु व मादक पदार्थाचे मिश्रण करुन सेवन केले, अश्या अवस्थेत कार मध्ये बसले आणि निसरडया रस्त्यावरुन भरधाव वेगाने कार चालवली, आणि एका वळणावर कार घसरली, टेलीफोनच्या खांबाला जाऊन धडकली आणि दोघे मृत्यू मुखी पडले. आणि संदेश देणाऱ्यांनी ह्या वचनाचा उल्लेख केला, "आपल्याला ठाऊक आहे की सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात." आणि म्हणाले देवाचा निश्चित ह्या मागे काहीतरी हेतू असेल. देवाने तर त्या तरुण – तरुणीला नाही मारले. आणि एका अर्थाने तुम्ही हे ही म्हणू शकत नाही की त्यांना सैतानाने मारले. ते तर नवयुवक होते. मला ह्याची खात्री आहे की सैतानाने त्यांना

आईवडील व थोऱ्यामोठयांच्या शिकवणीच्या विरोधात जाण्यासाठी भुलवले तर असेलच, पण सरतेशेवटी हा त्याचाच निर्णय होता. ते दारु व अंमली पदार्थाच्या अंमलाखाली गेले; हे तर नैसर्गिक आहे आणि ह्या संबंधात देव काय ह्या घटनेचा कर्ताधर्ता नाही.

हे कोणत्या अर्थाने असे म्हटले आहे *"परंतु आपल्याला ठाऊक आहे की , देवावर प्रीति करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात."* सर्वप्रथम हे काही सांगत नाही की सगळ्याच गोष्टी परमेश्वराकडून होतात आणि सर्व मिळून भले करतात. वचन म्हणते सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात पण ह्यासाठी पात्रता ठेवण्यात आली आहेः *"देवावर प्रीति करणाऱ्यांस"* हे वचन अश्या व्यक्तिसाठी कार्य करणार नाही जो देवावर प्रिती करणार नाही. आणि हे तर उघडच आहे त्यात काहीच वाद नाही, परंतु नवल ह्याचे आहे की कसे लोक दारु आणि अंमली पदार्थाच्या आहारी जाणाऱ्या व परमेश्वर व त्याच्या सिंद्धाता विरोधात जाणाऱ्या तरुणांसाठी हे लागू करतात वचन म्हणते केवळ देवावर प्रिती करणाऱ्यासाठीच आणि देवाच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांसाठीच सर्व गोष्टी मिळून चांगुलपणा उत्पन्न करतात.

योहानाचे पहिले पत्र ३ : ८ म्हणते *"पाप करणारा सैतानाचा आहे. कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे.सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रगट झाला."* देवाने स्वतःला प्रगट केले; सैतानाची कामे नष्ट करण्यासाठी. हा त्याचा उद्देश आहे आणि हे देवावर प्रिती करणाऱ्यांवर आणि देवाच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांसाठीच सर्व गोष्टी मिळून चांगुलपणा उत्पन्न करतील. जे देवाच्या पाचारणानुसार जीवनक्रमीत करणारे, सैतानाला मज्जाव करणारे आणि त्याची कामे नष्ट करणारे अश्याच्यासाठी. ज्यांच्या जीवनात सैतान काहीही करु देत ते मात्र सैतानाला विरोध करीत देवासाठी आयुष्य जगतात, देव त्या सर्व गोष्टी पलटून त्यांच्या हितासाठी होऊ देतो.

आपल्याला हे ओळखण्यास सुरुवात करावयास हवी की आमच्या जिवनातील सगळीच क्षेत्रावर परमेश्वर नियंत्रित करीत नाही. एक असा शत्रू आहे जो चोरी, घात व नाश करावयास आला आहे, परंतु येशू जीवन देण्यास आला आहे. आपणास जीवन निवडून घ्यायचे आहे आणि स्वतःहून मान्य करायचे आहे की आपल्या जीवनात आपल्याबरोबर घडणाऱ्या एकूणएक गोष्टींसाठी परमेश्वर दोषी नसतो.

जर देवाने शारीरिक रुप धारण करुन मानव होऊन असे काही केले असते तर तो लोकांना कर्करोग, दुर्धर व्याधी, निराशा, दुःख व वेदना देण्यासाठी दंडीत झाला असता. तरीही आम्ही देवाविषयी असा विचार करतो जो की आपल्या जीवनात आलेल्या सर्व मनुष्यांपेक्षा सर्वोच्च दयावंत होय, तो काय असा लोकांना मारत फिरेल आणि हे सगळे करेल. काही सैतानी हल्ले असतात आणि काही प्राकृतिक असतात पण सगळ्याच विपत्ती देव आज्ञेनुसार नसतात. जीवनविमा उतरविण्याऱ्या कंपन्या पॉलिसी देताना लिहितात की "दैवीय प्रकोप जसे भूकंप व प्लेग." नाही. परमेश्वर एकूणएक गोष्टीचा विधाता नाही.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा याकोबाचे पत्र १ : १३. काय देव वाईट गोष्टीसाठी मनुष्यांला परीक्षेत टाकतो का?

**याकोबाचे पत्र १ : १३** – *कोणाची परीक्षा होत असता , देवाने मला मोहात घातले, असे त्याने म्हणू नये; कारण देवाला वाईट गोष्टीचा मोह होत नाही आणि तो स्वतः कोणाला मोहात पाडीत नाही.*

२. वाचा याकोबाचे पत्र १ : १७. उत्तम देणग्या कोंठून येतात?

**याकोबाचे पत्र १ : १७** – *"माझ्या प्रिय बंधूंनो , फसू नका; प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरुन आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेंत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते."*

३. वाचा योहान १० : १०. चोर कोंण आहे?

**योहान १० : १०** – *"चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करावयास येतो; मी तर त्यांना जीवन प्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे."*

४. वाचा योहान १० : १० त्याचा हेतू काय आहे?

५. वाचा योहान १० : १० कोणती उद्देश पूर्ति करावयास येशू आला?

६. वाचा याकोबाचे पत्र ४ : ७ .देवाच्या अधिन होण्याचे आणि सैतानाला अडविण्याचे परिणाम काय होतात?

**याकोबाचे पत्र ४ :७** – *म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हांपासून पळून जाईल.*

७. वाचा रोमकरांस पत्र ८ : २८. रोमकरांस पत्र ८ : २८ असे म्हणते की सर्वच गोष्टी देवाकडून होतात?

**रोमकरांस पत्र ८ : २८** – *म्हणते, परंतु आपल्याला ठाऊक आहे की,देवावर प्रीति करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात.*

८. वाचा प्रेषितांची कृत्ये १० : ३८. काय आजार देवाकडून येतात?

**प्रेषितांची कृत्ये १० : ३८** – *नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरें करीत फिरला ; कारण देव त्याच्याबरोबर होता;*

९. वाचा योहानाचे पहिले पत्र ३ : ८. देवाच्या पुत्राचे प्रगट होणाचा उद्देश काय होता?

**योहानाचे पहिले पत्र ३ : ८** – *"पाप करणारा सैतानाचा आहे. कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे.सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रगट झाला."*

# उत्तरावली

१. वाचा याकोबाचे पत्र १ : १३. काय देव वाईट गोष्टीसाठी मनुष्यांला परीक्षेत टाकतो का?

*नाही*

२. वाचा याकोबाचे पत्र १ : १७ण उत्तम देणग्या कोंठून येतात?

*ज्योति मंडळाचा पिता*

३. वाचा  योहान १० : १० चोर कोंण आहे?

*सैतान*

४. वाचा  योहान १० : १० त्याचा हेतू काय आहे?

*चोरी , घात व नाश करावयला*

५. वाचा  योहान १० : १० कोणती उद्देश पूर्ति करावयास येशू आला?

*विपुल जीवन देण्याचा*

६. वाचा  याकोबाचे पत्र ४ : ७ .देवाच्या अधिन होण्याचे आणि सैतानाला अडविण्याचे परिणाम काय होतात?

*तो तुम्हांपासून पळून जाईल.*

७. वाचा रोमकरांस पत्र ८ : २८ . रोमकरांस पत्र ८ : २८  असे म्हणते की सर्वच गोष्टी देवाकडून होतात?

*नही*

८. वाचा  प्रेषितांची कृत्ये १० : ३८  काय आजार देवाकडून येतात?

*नही*

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ३ : ८. देवाच्या पुत्राचा प्रगट होणाचा उद्देश काय होता?

*सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठी*

# पाठ क्रमांक १४

# आत्म्याने भरलेल्या जीवनाचे सामर्थ्य

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

मार्क १६ : १५ – १६ ही येशूने शिष्यांना दिलेली महान आज्ञा म्हणून आपण ओळखतो. *"मग त्याने त्यांना सांगितले की सर्व जगांत जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिषेस पात्र ठरेल."* प्रेषितांची कृत्ये ८ , वचन ५ आणि १२ मध्ये आपण पाहतो की ही आज्ञा फिलिप्प ह्याने केलेल्या सुर्वातेच्या द्वारे शोमरोनात कार्यरत झाली, *"आणि फिलिप्पाने शोमरोन शहरी जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली.........तरी पण फिलिप्प देवाचे राज्य व येशू ख्रिस्ताचे नाव ह्याविषयीची सुवार्ता सांगत असता लोकांचा विश्वास बसला आणि पुरुष व स्त्रिया ह्यांचा बाप्तिस्मा झाला."*

मग प्रश्न असा आहे की मार्क १६ : १५ –१६ च्या अनुसार काय शोमरोनचे लोक ख्रिस्ती झाले? हो ते झाले. फिलिप्प शोमरोन शहरात गेला, येशू ख्रिस्ताची घोषणा केली, ख्रिस्तावर विश्वासाच्या द्वारे, स्त्री व पुरुष ह्या दोघांनी बाप्तिस्मा घेतला. महान आज्ञेनुसार आपण पाहातो की, लोकांचा उद्धार झाला, पण काय त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला?

पवित्र शास्त्र सांगते योहानाकडून पाण्याचा बाप्तिस्मा मिळाला, एकमात्र येशूच पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा देतो. वचनानुसार, लोक विश्वास करतात, त्यांचा उद्धार होतो, आणि ते पाण्याचा बाप्तिस्मा घेतात, परंतु त्यांना कधीही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळत नाही. प्रेषितांची कृत्ये ८ : १४ – १७ म्हणते, *"मग शोमरोनाने देवाचें वचन स्वीकारले असे यरुशलेमेंतल्या प्रेषितांनी ऐकून त्यांच्याकडे पेत्र व योहान ह्यांना पाठवले; ते तेथे आल्यावर त्यांनी त्यांस पवित्र आत्मा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना केली; कारण तोपर्यत त्यांच्यापैकी कोणावरहि तो उतरला नव्हता. प्रभू येशूच्या नांवांत त्यांचा*

*बाप्तिस्मा मात्र झाला होता. तेव्हा त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला."*

वचनांवरुन आपण पाहतो की केवळ व्यक्तिने विश्वास ठेवल्याने, बाप्तिस्मा घेतल्याने, त्यांचा उद्धार झाला ह्याचा अर्थ असा होत नाही. की त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला. पवित्र आत्मा त्यांच्या जीवनात आला – योहान २० : २२ मध्ये आपण बघतो की पवित्र आत्म्याने शिष्यांना पुर्नरुज्जित केले – परंतु तो होता पेन्टेकॉस्टचा दिवस. त्या दिवशी ते पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने भरले.उद्धारच्या दिवशी एखादयावर पवित्र आत्मा उतरणे व एखादयाला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळणे ह्यात फरक आहे. व्यक्ति पवित्र आत्माने परिपूर्ण होतो आणि त्यांना सामर्थ्य प्राप्त होते. जरी व्यक्तिचा उद्धार झाला असेल तरीही ह्याचा अर्थ असा होत नाही की त्यांना पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला.

प्रेषितांची कृत्ये १६ : १ – २ सांगते की, *"मग असे झाले की अपुल्लो करिंथात असता पौल वरच्या प्रांतांमधून जाऊन इफिसास पोहचला , तेथे कित्येक शिष्य त्याला आढळले; त्यांना तो म्हणाला, तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हांस पवित्र आत्मा मिळाला काय? त्यांनी त्याला म्हटले, पवित्र आत्मा आहे की काय हे आम्ही ऐकलेहि नाही."* पौल त्यांना म्हणाला, "विश्वास ठेवल्यावर तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला का?" ते म्हणाले, "आम्हाला पवित्र आत्म्याविषयी काहीच ठाऊक नाही." पौल त्यांना म्हणाला, जर विश्वास ठेवल्यावर तुम्हाला पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला नाही तर तुम्हाला कशाचा बाप्तिस्मा मिळाला? ते म्हणाले, "आम्हाला योहानाचा बाप्तिस्मा मिळाला," माझ्यामते पौलाने अगदी सर्मपक पणे स्पष्टिकरण दिले की येशू हा ख्रिस्त असण्याचे आणि मग बाप्तिस्म्याद्वारे विश्वासी येशूबरोबर ओळखले जाऊ लागले. वचन ६–७ म्हणते, *"आणि पौलाने त्यांच्यावर हात ठेवले, तेव्हा त्यांच्यावर पवित्र आत्मा आला, ते वेगवेगळ्या भाषा बोलू लागले व ईश्वरी संदेश देऊ लागले .ते सगळे सुमारे बारा पुरुष होते."*

जरी हे लोक ख्रिस्त जो येणार होता त्यावर विश्वास ठेवणारे शिष्य होते, त्यांचा पवित्र आत्माने  बाप्तिस्मा झाला नव्हता. व्यक्तिचा नव्याने जन्म होऊ शकतो पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाल्याविना तो पाण्याचा बाप्तिस्मा घेऊ शकतो. पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळणे हा परिवर्तनापेक्षा निराळा आणि खास अनुभव आहे.

जरी मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा करु शकतो, तरी मी त्यांना पवित्र आत्माचा बाप्तिस्मा देऊ शकणार नाही. जर तुम्ही कधीही येशूला तुमचा पवित्र आत्माने बाप्तिस्मा करण्यास सांगितले नसेल तर, आताच तुम्ही तो का मागत नाही? लूक ११ :१३ म्हणते, *"तुम्ही वाईट असतांहि तुम्हाला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या द्यावयाचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषकरुन पवित्र आत्मा देईल?"* आज तुम्ही त्याला का नाही मागत?

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मार्क १६ : १६. आणि प्रेषितांची कृत्ये ८ , वचन ५ आणि १२. प्रेषितांची कृत्ये ८ : १२ मध्ये ज्या लोकाचा उल्लेख आढळतो ते विश्वासी झाले का?

**मार्क १६ : १६** – *जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल."*

**प्रेषितांची कृत्ये ८ : ५** – *फिलिप्पाने शोमरोन शहरी जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली.*

**प्रेषितांची कृत्ये ८ : १२** – *तरी पण फिलिप्प देवाचे राज्य व येशू ख्रिस्ताचे नाव ह्याविषयीची सुवार्ता सांगत असता लोकांचा विश्वास बसला आणि पुरुष व स्त्रिया ह्यांचा बाप्तिस्मा झाला."*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ८ : १४ – १६. काय ह्या लोकांना पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला?

**प्रेषितांची कृत्ये ८ : १४ – १६** – *म्हणते, "मग शोमरोनाने देवाचें वचन स्वीकारले असे यरुशलेमेंतल्या प्रेषितांनी ऐकून त्यांच्याकडे पेत्र व योहान ह्यांना पाठवले; {१५} ते तेथे आल्यावर त्यांनी त्यांस पवित्र आत्मा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना केली; {१६} कारण तोपर्यत त्यांच्यापैकी कोणावरहि तो उतरला नव्हता. प्रभू येशूच्या नांवांत त्यांचा बाप्तिस्मा मात्र झाला होता. {१७} तेव्हा त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला."*

३. वाचा प्रेषितांची कृत्ये १९ : १ – ५. ही लोक विश्वासी होती का?

**प्रेषितांची कृत्ये १९ : १ – ५** – *"मग असे झाले की अपुल्लो करिंथात असता पौल वरच्या प्रांतांमधून जाऊन इफिसास पोहचला , तेथे कित्येक शिष्य त्याला आढळले; {२} त्यांना तो म्हणाला, तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हांस पवित्र आत्मा मिळाला काय? त्यांनी त्याला म्हटले, पवित्र आत्मा आहे की काय हे आम्ही ऐकलेहि नाही. {३} तो त्यांना म्हणाला, तर तुम्ही कसला बाप्तिस्मा घेतला? ते म्हणाले, योहानाचा बाप्तिस्मा*

*{४}पौलाने म्हटले, योहान पश्चातापाचा बाप्तिस्मा देत असे ; तो लोकांना सांगत असे की,माझ्यामागून येणाऱ्यावर म्हणजे येशूवर तुम्ही विश्वास ठेवावा. {५} हे ऐकून त्यांनी प्रभू येशूच्या नांवाने बाप्तिस्मा घेतला.*

४. वाचा प्रेषितांची कृत्ये १६ : ६ – ७. त्यांना पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला का?

**प्रेषितांची कृत्ये १६ : ६ - ७** - *"आणि पौलाने त्यांच्यावर हात ठेवले ,तेव्हा त्यांच्यावर पवित्र आत्मा आला, ते वेगवेगळ्या भाषा बोलू लागले व ईश्वरी संदेश देऊ लागले . {७} ते सगळे सुमारे बारा पुरुष होते.*

५. वाचा लूक ११ : १३. पवित्र आत्मा मिळण्यासाठी लूक ११ :१३ं आपणास काय करायला सांगते?

**लूक ११ : १३** - *"तुम्ही वाईट असतांहि तुम्हाला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या द्यावयाचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषकरुन पवित्र आत्मा देईल?*

६. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो ?

**करिथकरांस पहिले पत्र १४ : २** - *कारण भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे, तर देवाबरोबर बोलतो; कारण ते माणसाला समजत नाही; तो आत्म्याने गूढ गोष्टि बोलतो.*

७. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : १४. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो ?

**करिथकरांस पहिले पत्र १४ : १४** - *कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रार्थना करितो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणाला होत नाही.*

८. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : १६ – १७. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो ?

**करिंथकरांस पहिले पत्र १४ : १६ - १७** - *तू केवळ आत्म्याने धन्यवाद केला तर जो अशिक्षित लोकांपैकी आहे तो तुझ्या उपकारस्तुतिला आमेन कसे म्हणेल? कारण तू जे*

*बोलतोस ते त्याला समजत नाही. {१७} कारण तुझे उपकारस्तुति करणे चांगले असेल, तरी त्याने दुसऱ्याची उन्नती होत नाही.*

६. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत बोलतो, तेव्हा तो पवित्र आत्म्यात बोलत असतो की स्वतःशीच बोलत असतो?

**प्रेषितांची कृत्ये २ : ४** – *तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले.*

१०. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. मनुष्याला निरनिराळ्या वाचा कोण देते?

# उत्तरावली

१. वाचा मार्क १६ : १६. आणि प्रेषितांची कृत्ये ८ : वचन ५ आणि १२. प्रेषितांची कृत्ये ८ : १२ मध्ये ज्या लोकांचा उल्लेख आढळतो ते विश्वासी झाले का?

*होय*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ८ : १४–१६. काय ह्या लोकांना पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला?

*नाही*

३. वाचा प्रेषितांची कृत्ये १६ : १ – ५. ही लोक विश्वासी होती का?

*होय*

४. वाचा प्रेषितांची कृत्ये १६ : ६ – ७ . त्यांना पवित्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला का?

*नाही*

टिप्पणी : हे दर्शविते की हा अनुभव उद्धारापेक्षा भिन्न आहे.

५. वाचा लूक ११ :१३. पवित्र आत्मा मिळण्यासाठी लूक ११ :१३ं आपणास काय करायला सांगते?

*मागणी करावयास*

६. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो?

*देवाबरोबर बोलतो; आणि गूढ गोष्टि बोलतो.*

७. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : १४. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो?

*त्यांचा आत्मा देवापाशी प्रार्थना करितो*

८. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : १६ –१७. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत प्रार्थना करत असतो तेव्हा तो काय करत असतो?

*आत्म्याने धन्यवाद करतो आणि उपकारस्तुति करतो*

९. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. जेव्हा मनुष्य अन्य भाषेत बोलतो, तेव्हा पवित्र आत्मा बोलत असतो की तो स्वतः बोलत असतो?

*तो स्वतः बोलत असतो*

१०. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. मनुष्याला निरनिराळ्या वाचा कोण देते?

*पवित्र आत्मा*

# पाठ क्रमांक १५

# पवित्र आत्म्याला कसे प्राप्त करावे

*डॉन क्रो द्वारा लिखीत*

आज आपण पवित्र आत्मा कसा प्राप्त करावा ह्या विषयी चर्चा करणार आहोत. प्रेषितांची कृत्ये १०:१ म्हणतो, *"कैसरीया येथे कर्नेल नांवाचा कोणी एक पुरुष इटलिक म्हटलेल्या पलटणीत शताधिपति होता." वचन २ पुढे म्हणते," तो नीतिमान व आपल्या घराण्यांतील सर्वासह देवाचे भय बाळगणारा, लोकांस फार दानधर्म करणारा व देवाची नित्य प्रार्थना करणारा असा होता."* तो धार्मिक पुरुष होता, सत्कृत्ये करणारा होता, देवभीरु होता, गरजवंताला मदत करणारा होता,आणि पवित्र शास्त्र सांगते तो नित्य देवाची प्रार्थना करीत असे. पण आपण जे शोधून काढणार आहोत ते तुम्हाला बुचकळ्यात पाडेल. जरी तो उचित गोष्टी करीत होता, जरी तो पापभीरु होता आणि त्याचे जीवन भक्तीचे होते, तरी त्याचे येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाशी वैयक्तिक नाते नव्हते.

वचन ३ – ६ मध्ये म्हटले आहे की , *"त्याने दिवसाच्या सुमारे तिसऱ्या प्रहरी दृष्टांतात असे स्पष्टपणे पाहिले की, आपणाकडे देवाचा दूत येत असून कर्नेल्या,अशी आपणास हाक मारीत आहे. {४} तेव्हा तो त्याच्याकडे निरखून पाहून भयभीत होऊन म्हणाला,काय, महाराज? त्याने त्याला म्हटले, तुझ्या प्रार्थना व तुझे दानधर्म देवासमोर स्मरणार्थ आले आहेत. {५} तर आता यापोस माणसें पाठीव आणि शिमोन नांवाच्या माणसाला बोलावून आण; त्याला पेत्रहि म्हणतात. {६} तो शिमोन नांवाच्या कोणाएका कातडे कमावणाऱ्या चांभाराच्या येथे उतरला आहे; त्याचे घर समुद्राच्या किनाऱ्यास आहे."*

हा मनुष्य, जरी देवाला भिऊन वागणारा, नीतिमान, जमेल तेवढया योग्य गोष्टी करणारा, आणि देवापुढे नित्य नेमाने उपासना करणारा होता, त्याच्याकडे देवदूताला

पाठविले आणि देवदूताने त्याला शिमोन पेत्राला बोलावून आणायला सांगितले म्हणजे पेत्र त्याला काय करणे अगत्याचे आहे ते सांगेल. आपण पाहतो प्रेषितांची कृत्ये १० : ४३ मध्ये बघतो की पेत्राला तेथे जाऊन तंतोतंत काय सांगायचे आहे हे त्याला सूचित करण्यात आलेः *"आणि विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या* {प्रभू येशू ख्रिस्ताच्या} *नांवाने* (कंस माझे) *पापांची क्षमा मिळेल अशी .साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात." हे काय आश्चर्यचकित करणारे नाही?*

आता पाहा येथे काय घडलय. *"पेत्राचे हे भाषण चालू असतांनाच वचन ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला.* (प्रेषितांची कृत्ये १० : ४४) कर्नेलने ख्रिस्तावरील विश्वासाविषयी ऐकताच ग्रहण केले, आणि त्याच्या पापक्षमेसाठी त्याने त्याचा विश्वास ख्रिस्तावर ठेवला. त्वरीत, घरी जमलेल्या प्रत्येकांवर पवित्र आत्मा उतरला.वचन ४५ मध्ये म्हटले आहे की, *"मग परराष्ट्रीयांवरहि पवित्र आत्म्याच्या दानाचा वर्षाव झाला आहे असे पाहून पेत्राबरोबर आलेल्या विश्वास ठेवणाऱ्या व सुंता झालेल्या सर्व लोकांना आश्चर्य वाटले;"* त्यांना ते कसे ठाऊक झाले? *"कारण त्यांनी त्यांना अनेक भाषांतून बोलतांना व देवाची थोरवी गातांना ऐकले"* (वचन ४६).

नवीन करारात प्रत्येक वेळी जेव्हा व्यक्तिवर पवित्र आत्मा उतरला, पवित्र आत्म्याच्या दानाचा वर्षाव झाला आणि ह्याचा परिणाम त्यांना पवित्र आत्मा मिळाला ते आत्म्याने भरले. नवीन करारात ते नेहमीच अन्य भाषा बोलले किंवा त्यांनी भविष्यद्वाणी केली.

टेक्सासच्या, डेलास, मधल्या एका सायंकाळी मी गुडघावर आलो आणि देवाला म्हणालो? "देवा लोक ज्या मला अन्य भाषेविषयी आणि पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्माविषयी बोलतात त्याबाबत मला काहीही माहीत नाही, पण असा एखादा मार्ग आहे का की, ज्यात माझ्या मानवी भाषेच्या पलिकडे जाऊन मी तुझी स्तुती करु शकतो. तुला उचावू शकतो, मला तो मार्ग हवा आहे." मी देवाची आराधना करु लागलो, जशी मी स्तुती करीत गेलो, आत्म्याने मला निरनिराळ्या भाषा दिल्या ज्या मी कधीच शिकलो नव्हतो. पवित्र शास्त्र प्रेषितांची कृत्ये २ : ४ मध्ये म्हणते, *"तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले."* कोंण बोलत होते. ते बोलत होते. वाचा कोणी दिली? पवित्र आत्म्याने.

लूक ११ : १३ म्हणते, *"तुम्ही वाईट असतांहि तुम्हाला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या द्यावयाचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषकरुन पवित्र आत्मा देईल?"* आता आपल्याला फक्त मागायचंय, ते प्राप्त झाले आहे असा विश्वास ठेवायचा आहे, स्वतःला देवाच्या स्वाधीन करत, आराधनेत जायचे आहे, आणि तो तुम्हाला आराधनेसाठी आणि त्याची स्तुती करण्यासाठी अशी भाषा देईल जी तुम्ही कधीही शिकला नसाल.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. अशा काही शब्दांचे वर्णन करा ज्यांना पवित्र शास्त्रात उद्धारासाठी वापरण्यात आलेल्या काही शब्दांचे वर्णन करा.

**योहान ३ : ३** – *"येशू त्याला म्हणाला, मी तुम्हांला खचित सांगतो , नव्याने जन्मल्यावांचून कोणालाहि देवाचे राज्य पाहता येत नाही."*

**प्रेषितांची कृत्ये ३ :१६** – *" तेव्हा तुमची पापें पुसून टाकली जावी म्हणून पश्चाताप करा व वळा ; अशासाठी की , विश्रांतीचे समय प्रभूजवळ यावे."*

**मार्क १६ : १६,** – *"जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र होईल."*

**कलस्सैकरांस पत्र २ : १३** – *"जे तुम्ही आपल्या अपराधांनी व देहस्वभाची सुंता न झाल्याने मेलेले होता त्या तुम्हांस त्याने त्याच्याबरोबर जिवंत केले ; त्याने आपल्या सर्व अपराधांची क्षमा केली."*

**रोमकरांस पत्र ८ : ६** – *"परंतु तुम्हांमध्ये जर देवाचा आत्मा वसति करीत आहे, तर तुम्ही देहाच्या अधीन नाही, आत्म्याच्या अधीन आहां. जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला नसेल तर तो ख्रिस्ताचा नाही."*

**मत्तय २५ : ४६** – *"ते तर सार्वकालिक शिक्षा भोगावयास जातील; आणि नीतिमान सार्वकालिक जीवन उपभोगावयास जातील."*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ११ : १५. कश्या प्रकारे ही वचने पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्माच्या अनुभवांचे वर्णन करतात?

**प्रेषितांची कृत्ये ११ : १५** –*"मी बोलू लागलो तो, जसा आरंभी आपल्यावर तसा त्यांच्यावरही पवि़त्र आत्मा उतरला."*

३. येशूच्या शिष्यांना पवित्र आत्मा मिळाला (योहान २० : २२), परंतु काही दिवसांनी त्यांना खरोखरचाच पवि़त्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला (प्रेषितांची कृत्ये २ : १ – ४), पाहा आणि दोघांची तुलना करा (योहान २० : २२ आणि प्रेषितांची कृत्ये २ : १ – ४).

**योहान २० : २२** – *असे बोलून त्याने त्यांच्यावर फुंकर टाकला आणि त्यांना म्हटले, पवि़त्र आत्माचा स्वीकार करा;*

**प्रेषितांची कृत्ये २ : ४** – *नंतर पेंटेकॉस्ट म्हणजे पन्नासावा दिवस आला तेव्हा ते सर्व एकत्र जमले असतांना {२} अकस्मात मोठया वाऱ्याचा सुसाटयासारखा आकाशांतून नाद झाला व ज्या घरांत ते बसले होते ते सर्व त्याने भरले. {३} आणि वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभांसारख्या जिभा त्यांना दिसल्या व प्रत्येकावर त्या एकएक अशा बसल्या {४} तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले."*

४. वाचा प्रेषितांची कृत्ये १ : ८. पवित्र आत्माच्या बाप्तिस्माचा उद्देश काय आहे?

**प्रेषितांची कृत्ये १ : ८** – *परंतु पवि़त्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल,आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनांत व पृथ्वीच्या शेवटापर्यत तुम्ही माझे साक्षी व्हाल.*

५. वाचा प्रेषितांची कृत्ये प्रेषितांची कृत्ये २: ३८ –३९. आणि करिथकरांस पहिले पत्र १ : ७. आज काय पवित्र आत्माच्या बाप्तिस्मा आमच्यासाठी आहे?

**प्रेषितांची कृत्ये २: ३८ - ३९** – *पेत्र त्यांना म्हणाला, पश्चाताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हाला पवि़त्र आत्माचे दान प्राप्त होईल. {३९} कारण हे वचन तुम्हांला, तुमच्या मुलांबाळांना व जे दूर आहेत त्या सर्वांना म्हणजे जितक्यांनां परमेश्वर आपला देव स्वतःकडे बोलाविले तितक्यांना दिले आहे.*

**करिथकरांस पहिले पत्र १ : ७** – *तो त्यांना म्हणाला, जे काळ व समय पित्यानें स्वतःच्या अधिकारांत ठेवले आहेतं ते जाणणे तुम्हांकडे नाही.*

६. वाचा लूक ११ :१३ जर आपल्याला पवि़त्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला नाही तर आपण काय करावे?

**लूक ११ :१३ म्हणते,** – *तुम्ही वाईट असतांहि तुम्हाला आपल्या मुलांना चांगल्या देणग्या द्यावयाचे कळते, तर मग स्वर्गीय पित्याजवळ जे मागतात त्यांस तो किती विशेषकरुन पवित्र आत्मा देईल?*

७. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४ काय तुम्ही मागाल , प्राप्त कराल आणि देवाने देऊ केलेल्या भाषेत अन्य भाषेतून देवाची आराधना कराल?

**प्रेषितांची कृत्ये २ : ४** – *तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले.*

# उत्तरावली

१. अशा काही शब्दांचे वर्णन करा ज्यांना पवित्र शास्त्रात उद्धारासाठी वापरण्यात आलेल्या काही शब्दांचे वर्णन करा.

*नव्याने जन्मणे (योहान ३ : ३) , प्रभूजवळ यावे. (प्रेषितांची कृत्ये ३: १६) विश्वास ध रणे व बाप्तिस्मा घेणे (मार्क १६ : १६), सर्व अपराधांची क्षमा केली गेली (कलस्सैकरांस पत्र २ : १३) , ख्रिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला .(रोमन ८ : ६) , सार्वकालिक जीवन (मत्तय २५ : ४६)*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ११ : १५. कश्या प्रकारे ही वचने पवित्र आत्म्याचा बाप्तिस्माच्या अनुभवांचे वर्णन करतात?

*व्यक्तिवर पवि़त्र आत्मा उतरला.*

३. येशूच्या शिष्यांना पवित्र आत्मा मिळाला (योहान २० : २२),परंतु काही दिवसांनी त्यांना खरोखरचाच पवि़त्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला (प्रेषितांची कृत्ये २ : १ – ४), पाहा आणि दोघांची तुलना करा (योहान २० : २२ आणि प्रेषितांची कृत्ये २ : १ – ४)

*योहान २० : २२ मध्ये शिष्यांना पवि़त्र आत्मा मिळाला. प्रेषितांची कृत्ये २ : १ – ४, मध्ये हेच सगळे शिष्य पवि़त्र आत्म्याने भरले.(हे आहे आतून व बाहेरुन पाण्यात डुंबणे)*

पाहा प्रेषितांची कृत्ये १ : ८

४. वाचा प्रेषितांची कृत्ये १ : ८ पवित्र आत्माच्या बाप्तिस्माचा उद्देश काय आहे?

*सेवेसाठी किंवा साक्षीसाठी सामर्थ्य प्रदान करणे*

५. वाचा प्रेषितांची कृत्ये प्रेषितांची कृत्ये २:३८ –३६ आणि करिथकरांस पहिले पत्र १ : ७. आज काय पवित्र आत्माच्या बाप्तिस्मा आमच्यासाठी उपलब्ध आहे?

*होय. ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाने पवित्र आत्माच्या दानाची समाप्ती होईल. त्यापूर्वी नाही.*

६. वाचा लूक ११ :१३ जर आपल्याला पवि़त्र आत्माचा बाप्तिस्मा मिळाला नाही तर आपण काय करावे?

*त्याची मागणी करा*

७. वाचा प्रेषितांची कृत्ये २:४ काय तुम्ही मागाल, प्राप्त कराल आणि देवाने देऊ केलेल्या अन्य भाषेतून देवाची आराधना कराल?

*होय, मी बोलेन, परंतु पवित्र आत्मा मला वाचा देईल. (निरनिराळ्या भाषा)*

# पाठ क्रमांक १६

# अन्य भाषा बोलण्याचे लाभ

*ॲन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

सर्वात प्रथम जेव्हा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला तेव्हा एक गोष्ट ही घडली की ते अन्य भाषेत बोलू लागले. प्रेषितांची कृत्ये २ : ४ म्हणते की पेन्टिकॉस्टच्या दिवशी, ते पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले. प्रेषितांची कृत्ये ह्या संपूर्ण पुस्तकात अविरतपणे, जेव्हा लोकांना पवित्र आत्मा प्रदान केला गेला तेव्हा तेव्हा परमेश्वरीय उपस्थितीचे प्रर्दशन झाले.

अर्थातच पवित्र आत्मा प्रदान होणे यात अन्य भाषेत बोलण्याशिवाय बरंच काही आहे, पण हे एक महत्वपूर्ण प्रदर्शन होय. करिथकरांस पहिले पत्र १४ : १३ – १४ *"भाषा बोलणाऱ्याने आपणाला अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी. कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रार्थना करितो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणाला होत नाही."* जेव्हा तुम्ही अन्य भाषेत बोलता तेव्हा तुमचा आत्मा प्रार्थना करतो, प्रार्थना करा की तुम्हाला तिचा अर्थही सांगता यावा जेणेकरुन ती लाभदायक होईल.

मी माझ्या स्वतःचा अनुभव सांगतो जेव्हा मला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला तेव्हा मी अन्य भाषेत बोलू लागलो , ह्यामुळे माझे जीवन नाटकीय रितीने बदलले. मला खात्री आहे जेव्हा माझा नव्याने जन्म झाला, तेव्हा ख्रिस्त माझ्यात वास करु लागला आणि त्याने सर्वकाही माझ्या हृदयात ठेवले, परंतु जेव्हा पवित्र आत्मा माझ्यावर आला, तो स्वतः मला आणि दुसऱ्यानाही त्याचे अस्तित्व दाखवू लागला. काही गोष्टी घडू लागल्या. पहिल्या वर्षी जेव्हा मी अन्य भाषेत प्रार्थना करु लागलो तेव्हा मला तो वेडापणा आणि हे जे मी करतो आहे ते म्हणजे नुसताच वेळ वाया घालवणे आहे

वाटायचा. ह्याच कारणाने यहूदा २० म्हणते तुम्ही तुमच्या आत्म्याची उन्नती करता. जे तुमचे स्वाभाविक विचारं तर्कविर्तक काढतात आणि तुम्हाला विश्वासाचा अलौकिक क्षेत्रात घेऊन जातात.

दुसरी गोष्ट मी अनुभवली ती ही की जेव्हा मी अन्य भाषेत प्रार्थना करु लागलो, तेव्हा इतक्या वर्षात कधीही न आठवणारे लोक मला आता आठवू लागले, मी त्यांच्यासाठी प्रार्थना करु लागलो, आणि एक दोन दिवसातच, ते माझ्याशी संपर्क साधत आणि मला समजून आले की काहीतरी चमत्कारी घडत होते. हे असे इतक्या वेळा घडत गेले की मी ह्या सगळ्याचा आढावा घेतला आणि मला कळले की जेव्हा मी अन्य भाषेत प्रार्थना करीत होतो तेव्हा अश्या ज्ञानात प्रार्थना करत होतो जे माझ्या बुद्धी सामर्थ्याच्या पलीकडले होते. माझा आत्मा जो सर्व गोष्टी जाणून होता आणि ज्याला ख्रिस्ताचे मन होते ते लोकांसाठी अश्या पद्धतीने प्रार्थना जी मला माझ्या स्वाभाविक समजबुद्धीने कधीच करता आली नसती.

एके दिवशी मी अन्य भाषेत प्रार्थना करीत होतो – जसं मी म्हणालो, मला अन्य भाषेत प्रार्थना करण्याकरिता विश्वास लागला – माझ्या मनात अश्या विचारांचे द्वंद सुरु होते, *तू जिब्ररीश भाषेतून बोलण्याऐवजी इंग्रजी भाषेत प्रार्थना करुन काहीतरी अर्थपूर्ण साध्य करु शकतोस.* मला ह्या विचारांना सामोरे जावे लागले आणि त्यांना दाबून ठेवावे लागले, मी प्रार्थना करणे सुरुच ठेवले. मला चार वर्षापर्यत कधीही न भेटलेला माणुस एके दिवशी माझ्या दरवाज्यात उभा होता. तो आत आला, त्याने मला पुरते अभिवादन सुद्धा केले नाही, तो तडक आत येऊन बसला आणि रडायलाच लागला, त्याने माझ्यापाशी आपले मन मोकळे केले कारण तो पुष्कळ समस्येतून जात होता. मी विचारात पडलो, बेटा मला इंग्रजीमध्ये प्रार्थना करायला हवी होती. माझा दूसरा विचार होता.मला कसे कळेल कश्याबाबत प्रार्थना करावी कारण मी तर चार वर्षापासून त्याला बघितले सुद्धा नाही? एकदाची मला जाग आली की मी प्रार्थनाच करत होतो की, आणि देव मला तयार करत होता. मी त्याच्यासाठी अश्या पद्धतीने प्रार्थनेत मध्यस्थी करत होतो की जी मी माझ्या समजबुद्धीने कधीच करु शकलो नसतो. अचानक मला प्रकाशन मिळू लागले आणि मी त्याला सांगितले, "मी तुझी समस्या काय आहे ती सांगतो." मी त्याला सर्वकाही सांगितले आणि त्यावर समाधान ही दिले.

तुम्हाला समजून घेण्याची गरज आहे की हे मी जेव्हा वेगळ्या धार्मिक संप्रदायाच्या चर्चमध्ये होतो तेव्हाचे आहे. त्याला माझ्याबरोबर काय घडत आहे हे कळत नव्हत आणि मला सुद्धा आत्मविश्वास नव्हता. हे आमच्या दोघांनाही हादरुन सोडणारे होते. पण हे तर देवाच्या सामर्थ्याचे प्रकाशन होते, आणि त्याने अद्‌भुत तऱ्हेने मला वापरले. हे ह्या अर्थाने आहेः जेव्हा तुम्ही अन्य भाषेत प्रार्थना करता, तेव्हा तुमचा आत्मा प्रार्थना करीत असतो. तुमच्या आत्म्याचा नवाने जन्म झालेला आहे, ज्याला ख्रिस्ताचे मन आहे, आणि त्याला निश्चित काय करायचे हे ठाऊक आहे. हा आहे परमेश्वराकडून एक अभिषेक, (ईश्वरी मस्सा) जेणेकरुन तुम्हास सर्व गोष्टी समजून येतील, तुम्हाला आत्म्यात काहीच मर्यादा राहू नयेत. जर तुम्ही सामर्थ्यात आणि आत्म्याच्या प्रकाशनात चालाल, तर हे तुमच्या शारीरिक जीवनात परिवर्तन घेऊन यईल. हे करण्याचा एक मार्ग आहे, जरी तोच एकमेव मार्ग नाही, तो हा की अन्य भाषा बोलावयास लागा. ओळखा आणि विश्वास ठेवा की जेव्हा तुम्ही असे करता तेव्हा तुम्ही तुमच्या विश्वासाची उभारणी परम पावित्र्यात करीत आहात की तुमचा आत्मा, देवाचे ज्ञान प्रगट करतो .आणि देवाकडून परिपूर्ण प्रकाशन येते. मग करिथकरांस पहिले पत्र १४ : १३ प्रमाणे प्रार्थना करा की तुम्हाला अर्थ सांगता यावा. ह्याचा अर्थ असा नाही की तुम्हाला अन्य भाषेत प्रार्थना करणे बंद करुन अर्थ कळण्यासाठी इंग्रजी मध्ये प्रार्थना करावयाची आहे. ह्याचा अर्थ असा आहे तुम्हाला अर्थ समजण्याचा फायदा मिळावा.

जर तुम्ही चर्चमध्ये अन्य भाषेत संदेश दिला तर तुम्हाला थांबून त्याचे इंग्रजी मध्ये भाषांतर करावे लागेल. जेव्हा मी वैयक्तिक प्रार्थना करतो तेव्हा मी अन्य भाषेत प्रार्थना करतो आणि विश्वास करतो की देव मला प्रकाशन देईल. कधी माझी वृत्ती बदलते. माझ्याकडे विशिष्ट शब्द नसतात, मग अचानक सगळे स्पष्ट दिसू लागते आणि मला एक वेगळाच दृष्टिकोण गवसतो. कधी कधी पूर्ण प्रकाशन आठवडयाने मिळते, परंतु मी विश्वास करतो की अन्य भाषेत प्रार्थना करण्यात घालविलेला वेळ आणि त्यासाठी ठेवलेला विश्वास हे अर्थ समजण्याचाच भाग आहे.

अनेक कारणांमुळे अन्य भाषेत बोलणे अतिशय महत्वाचे आहे, सर्वात आधी म्हणजे पवित्र आत्मा मिळाल्याची ही खात्री आहे. हा आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. हे असे संर्पकाचे साधन आहे जे सरळ सरळ,आपल्याू डोक्यातून शंकाकुशंका आणि भय दूर सारुन आपले अंतःकरण देवापुढे मांडते. ही आपल्याला परम पवित्र शुद्ध विश्वासात उभारते आणि देवाचे गुप्त ज्ञान प्रदान करते. माझी प्रार्थना असेल की आपण सगळे ह्यात चालु, आपला विश्वास ठेवून, आणि अन्य भाषेचे पूर्ण लाभ मिळवू.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा यहूदाचें पत्र १ : २०. पवित्र आत्मात प्रार्थना करण्याने कांणते महान फायदे मिळविता येतात?

**यहूदाचें पत्र १ : २०** – *प्रियजनहो, तुम्ही तर आपल्या परमपवित्र विश्वासावर स्वतःची रचना करा; पवित्र आत्म्याने प्रार्थना करा.*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. किती लोक पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले?

**प्रेषितांची कृत्ये २ : ४** – *तेव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले."*

३. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. पवित्र आत्म्याने भरल्याचा त्यांच्यावर काय परिणाम झाला?

४. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : १४. जेव्हा तुम्ही अन्य भाषेत प्रार्थना करता तेव्हा तुमचा कोणता भाग प्रार्थना करिता असतो?

**करिंथकरांस पहिले पत्र १४ : १४** – *कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रार्थना करितो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणाला होत नाही.*

५. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत बोलतो, तेव्हा तो कोणाशी बोलत असतो?

**करिंथकरांस पहिले पत्र १४ : २** – *कारण भाषा बोलणारा माणसांबरोबर नव्हे, तर देवाबरोबर बोलतो; कारण ते माणसाला समजत नाही, तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो.*

६. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत बोलतो, तेव्हा ते काय बोलतात ते लोकांना समजते का?

७. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत प्रार्थना करते, तेव्हा तुमचा आत्मा काय बोलत असतो?

८. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : ४. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत प्रार्थना करता, तेव्हा तूम्ही काय करता?

**करिथकरांस पहिले पत्र १४ : ४** – *भाषा बोलणारा स्वतःचीच उन्नती करितो, संदेष्टा मंडळीची उन्नती करितो,*

**करिथकरांस पहिले पत्र १४ : १६** – *तू केवळ आत्म्याने धन्यवाद केला तर जो अशिक्षित लोकांपैकी आहे तो तुझ्या उपकारस्तुतिला आमेन कसे म्हणेल? कारण तू जे बोलतोस ते त्याला समजत नाही.*

# उत्तरावली

१. वाचा यहूदाचें पत्र १ : २०. पवित्र आत्मात प्रार्थना करण्याने कांणते महान फायदे मिळविता येतात?

*जेव्हा मी पवित्र आत्मात प्रार्थना करतो तेव्हा स्वत:ची रचना करतो.*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. किती लोक पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले?

*सर्व जणांना*

३. वाचा प्रेषितांची कृत्ये २ : ४. पवित्र आत्म्याने भरल्याचा त्यांच्यावर काय परिणाम झाला ?

*ते अन्य भाषेत बोलू लागले*

४. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : १४. जेव्हा तुम्ही अन्य भाषेत प्रार्थना करता तेव्हा तुमचा कोणता भाग प्रार्थना करिता असतो?

*माझा आत्मा प्रार्थना करितो*

५. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत बोलतो, तेव्हा तो कोणाशी बोलत असतो?

*देवाशी*

६. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत बोलतो, तेव्हा ते लोकांना समजते का?

*नाही*

७. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४ : २. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत प्रार्थना करते, तेव्हा तुमचा आत्मा काय बोलत असतो?

*तो आत्म्याने गूढ गोष्टी बोलतो. फक्त देव आणि तोच बोलतो (संदेश)*

८. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : ४. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत प्रार्थना करता, तेव्हा तूम्ही काय करता?

*स्वत:चीच उन्नती करितो*

९. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १४ : १६. जेव्हा व्यक्ति अन्य भाषेत प्रार्थना करता असता, तेव्हा तुम्ही काय करत असता?

*देवाची स्तुती आणि त्याला धन्यवाद देत असतो.*

# CONTACT DETAILS

## INDIA

www.awmindia.net info@awmindia.net

## Locations:

### Hyderabad

42-343/1/188, Near Flora Hotel, Maruthi Nagar
A S Rao Nagar, Hyderabad 500 040, INDIA.
Ph: (040) 4028 0718

### Chennai

72-D, Nandhini Mahal, I Floor, Velachery Main Road
Velachery, Chennai 600 042, INDIA.
Ph: (044) 4202 1820

### Mumbai

Bethel, Plot No 305/E, Mith Chowky, Near Girdhar Park
Malad (W), Mumbai 400 064, INDIA.
Ph: +91 8976549515

### Delhi

Phone: +91 9560591787

## USA

Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs CO 80934-3333
www.awmi.net

## UK

Andrew Wommack Ministries - Europe
PO Box 4392, Walsall, WS1 9AR, ENGLAND
www.awme.net

# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार
## The Complete Discipleship Evangelism

### स्तर २
**(Level 2)**

ॲन्ड्र्यू वोमॅक
आणि
डॉन क्रो
द्वारा लिखीत

The Complete Discipleship Evangelism
48-Lesson Course
Level 2 (16 Lessons)

Copyright ©2012, Andrew Wommack
Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs, CO 80934-333
www.awmi.net

Title in Marathi: संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार
©2022 Andrew Wommack Ministries India
www.awmindia.net
info@awmindia.net

Item Code: MA 417-2/3

Published and sold in India by Charis Initiatives Pvt. Ltd.
www.charisinitiatives.com

Permission is granted to duplicate or reproduce for discipleship purposes on the condition that it is distributed free of charge.

# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार

## विषय सूची

## स्तर - २ (Level 2)


१. स्व-केंद्रीतपणा: सर्व दु:खांचा उगम ५ - 5

२. देवाच्या वचनांवर मनन कसे करावे १३ - 13

३. मनाचे नविनीकरण १८ - 18

४. ख्रिस्ताच्या मंडळीचे महत्व २६ - 26

५. मुक्तता ३८ - 38

६. विश्वासणाऱ्यांचा अधिकार ४७ - 47

७. भरपाई मध्ये आरोग्यदान सामावलेले आहे ५७ - 57

८. आरोग्य प्राप्ती होण्यास आडकाठी ६६ - 66

९. दुसऱ्यांना क्षमा करणे ७७ - 77

१०. विवाह - भाग १ ८९ - 89

११. विवाह - भाग २ ९७ - 97

१२. परमेश्वरीय प्रकाराची प्रीति - भाग १ १०९ - 109

१३. परमेश्वरीय प्रकाराची प्रीति - भाग २ ११९ - 119

१४. वित्त - भाग १ १२९ - 129

१५. वित्त - भाग २ १३६ - 136

१६. जेव्हा आपल्या प्रार्थनांचे उत्तर मिळत नाही तेव्हा काय करावे १४३ - 143

# पाठ १

# स्व-केंद्रीतपणा: सर्व दुःखांचा उगम

## *अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

स्व-केंद्रीतपणा हा बऱ्याच गोष्टींचा उगम आहे जो आपण अनुभवतो.नीतिसूत्रे १३ मध्ये एक वचन आहे जे आपण खरोखर पाहिल पाहिजे, कारण आपण ते आपल्या स्वतःच्या पवित्र शास्त्रामध्ये वाचले नाही तर आपण त्यावर विश्वास ठेवणार नाही. वचन १० सांगत, *"गर्वामुळे मतभेद मात्र उत्पन्न होतात, पण जो चांगला सल्ला ऐकतो त्याच्याजवळ ज्ञान असते."* यावर बरेच लोक पहले हा मुद्दा घेतील आणि म्हणतील, "एक मिनिट थांबा. केवळ गर्वामुळे मतभेद किंवा कलह होऊ शकत नाहीत. नीतिसूत्रे १७:१४ सांगत की मतभेद ही कलहाची सुरुवात आहे, म्हणून कलह फक्त गर्वापेक्षा जास्त कारणीभूत असतात. माझ्याशी या - या- व्यक्तीने असे केले आहे." इतर म्हणतील, "तुम्हाला समजत नाही; अश्याच प्रकारचा व्यक्ती मी आहे." नाही, शास्त्र सांगते की केवळ गर्वामुळे मतभेद होतात. हे प्रमुख कारणांपैकी एक कारण नाही; तर हेच एकमेव कारण आहे. काही लोक पुन्हा मुद्दा घेतील आणि म्हणतील, "मला सर्व प्रकारच्या समस्या आहेत, परंतु गर्व हा त्यापैकी एक नाही. जर काही असेल तर ,माझा इतका कमी - आत्मसन्मान आहे, कोणीही मला गर्विष्ठ असल्याचा दोष देवू शकत नाही."

गर्व म्हणजे काय हे आपल्याला पुन्हा परिभाषित करावे लागेल. हे फक्त आपण इतरांपेक्षा चांगले आहोत असा विचार करणे नाही,पण सोप्या भाषेत सांगायचे तर,ते स्वतःला प्रत्येक गोष्टीचे केंद्र म्हणून पाहणे आहे. स्व-केंद्रितपणा हेच खरे सर्व गर्वाचे मूळ आहे. गणना १२: २ मध्ये, मिरियम आणि अहरोन, मोशेची बहीण आणि भाऊ, त्याच्या

विरोधात आले, त्यांनी आंतरजातीय विवाहामुळे त्याच्यावर टीका केली आणि म्हटले, *"प्रभु खरोखरच फक्त मोशेशी बोलला आहे का? तो आमच्याद्वारे देखील बोलला नाही का?"* पवित्र शास्त्र नंतर वचन ३ मधील कंसात सांगत की मोशे हा भुतलावरचा सर्वात नम्र पुरूष होता. त्यांच्या बोलण्यावर नाराज होण्याऐवजी तो त्यांच्यासाठी प्रार्थना आणि मध्यस्थी करू लागला.

जेव्हा असे म्हटले जाते की मोशे हा पृथ्वीवरचा सर्वात नम्र माणूस होता,थांबा आणि त्याबद्दल विचार करा. पृथ्वीवर किती लोक होते हे आम्हाला माहित नाही, परंतु नक्कीच लाखो लोक होते आणि या सर्व लोकांमध्ये मोशे सर्वात नम्र माणूस होता. ह्या विधानाला खरच आश्चर्यकारक काय बनवत की हे लिहणारा तोच एक होता. बहुतेक लोकांना वाटते की तुम्ही खरोखर नम्र किंवा दीन आहात तर तुम्हाला ते कळणारही नाही.उन्मत्तपणा काय आहे हयाचा तो चुकीचा छाप आहे. गर्व म्हणजे फक्त आपण इतर सर्वांपेक्षा चांगले आहोत असा विचार करणेच नाही तर ते स्व-केंद्रितपणा आहे. हे एका बाजूला अहंकार आणि दुसऱ्या बाजूला कमीआत्मसन्मान बाळगण्यासारखे आहे. त्या एकाच बाजूच्या विरुद्ध अभिव्यक्ती आहेत, परंतु ते दोनही एकाच काठीवर आहेत. हा स्व-केंद्रिततपणा आहे. यात काही फरक पडत नाही की,तुम्ही इतरांपेक्षा चांगले आहात किंवा इतरांपेक्षा वाईट आहात असे तुम्हाला वाटत असेल, तुम्ही पूर्णपणे स्व-केंद्रित आहात. त्यामधुन सर्व काही वेगळे होते.एक भित्रा,लाजाळू माणूस खूप गर्विष्ठ आणि स्व-केंद्रित असतो, फक्त स्वतःबद्दल विचार करतो.

जो मुद्दा मी मांडत आहे तो हा की,स्व-केंद्रितपणा हाच सर्व गर्वाचे मूळ आहे,आणि जर तुम्ही ते परत नीतिसूत्रे १३:१० मध्ये जोडले तर, *"गर्वामुळे मतभेद मात्र उत्पन्न होतात,"* हे काय सांगत की आपल्याला राग येतो आपल्या स्वतःच्या स्व-केंद्रीपणामुळे, यामुळे नाही की लोक आपल्या सोबत काय करतात. ही आपली स्वतःची स्व-केंद्रितता आहे ज्या कारणाने आपण लोक जे करतात त्यावर प्रतिक्रिया देतो. तुम्ही लोकांचे तुम्हाला चुकीच्या पद्धतीने सतावणे कधीही बंद करु शकणार नाही; असे होऊ शकत नाही. विश्वास म्हणजे इतर लोकांवर नियंत्रण ठेवणे नव्हे तर तुम्हाला स्वतः ला हाताळण्यास मदत करण्यासाठी

आणि तुमच्या आत असलेल्या गोष्टी हाताळण्यासाठी.त्यामुळे लोक तुमच्याशी काय करतात याने काही फरक पडत नाही.

येशूला वधस्तंभावर खिळले जात असताना,तो अशा लोकांकडे वळू शकला जे त्याला वधस्तंभावर खिळत होतेआणि म्हटले, "बापा, त्यांना माफ कर, कारण ते काय करतात हे त्यांना माहित नाही." तो त्या लोकांवर नियंत्रण ठेवत नाही तर त्याऐवजी त्याचे स्वतःवर नियंत्रण होते. हा स्वकेंद्रीतपणा आहे जो आपल्याला क्रोधीत करतो. येशू येथे स्वतः साठी आला नाही, पण त्याने जगावर इतके प्रेम केले की तो आपल्यासाठी येथे आला. जेव्हा तो वधस्तंभावर लटकत होता तेव्हा त्याने आपल्या आईचा विचार केला आणि आपल्या शिष्यांपैकी एकाला तिची काळजी घेण्याबद्दल बोलला.तीव्र यातना,अन्याय आणि त्याच्या मार्गावर आलेल्या सर्व गोष्टींमध्ये येशू क्षमा करण्यास आणि प्रेमाने कार्य करण्यास सक्षम होता - कारण तो स्व-केंद्रित नव्हता.

तो तुमचा स्वतःचा स्वार्थ आहे ज्यामुळे तुम्हाला राग येतो, तरी शास्त्र सांगते की तुम्ही स्वतःला स्वत: साठी मेलेले असे समजावे. जर माझ्यासमोर प्रेत असते तर मी त्याचा अपमान करू शकतो, लाथ मारून, धुंकू शकतो किंवा त्याकडे दुर्लक्ष करू शकतो, पण जर ते खरोखर एक प्रेत असेल तर ते प्रतिसाद देणार नाही. तुम्ही तुमच्या सभोवतालच्या गोष्टींना ज्या प्रकारे प्रतिसाद देता ते कारण त्या बाह्य गोष्टींमुळे नाही तर तुमच्या आत असणा - या गोष्टींमुळे देता.तुम्ही इतके बलवान कधीच होणार नाही, तुम्ही विश्वासात इतके मजबूत कधीच होणार नाही की तुम्ही सर्व अडथळे आणि तुम्हाला चुकीच्या पद्धतीने सतावणारी प्रत्येक गोष्ट दूर करू शकाल, पण तुम्ही स्वतःला हाताळु शकता. तुम्ही अशा ठिकाणी येऊ शकता जिथे तुम्ही येशूला तुमच्या जीवनाचा प्रभु बनवता आणि त्याच्यावर, त्याच्या राज्यावर आणि इतर लोकांवर स्वतः पेक्षा जास्त प्रीति करता. जेव्हा तुम्ही असे कराल आणि स्वतः ला हाताळाल तेव्हा तुमच्या जीवनातील कलह आणि मतभेद संपलेत असे तुम्हाला दिसून येईल.

देवाने केलेल्या या सर्व गोष्टी तुमच्या जीवनात लागू करण्यासाठी एक उत्तम किल्ली ही आहे की त्याने तुम्हाला हे राज्य स्वार्थी हेतूंसाठी दिलेले नाही याची जाणीव होणे.फक्त तुमच्या प्रत्येक गरजा

पुरवता याव्या याकरिता त्याने या गोष्टी केल्या नाहीत. तुम्हाला हे शिकण्याची गरज आहे की ते स्वतःला नाकारण्यात आणि तुमचे जीवन गमावण्यामध्ये आहे की तुम्ही खरोखरच जीवन म्हणजे काय हे शोधण्यास सुरुवात करता.हे इतर लोकांवर आणि देवावर स्वतःपेक्षा जास्त प्रीति करण्यामध्ये आहे की तुम्ही तुमचा क्रोध आणि दुःख, तुमच्या आत असलेल्या सर्व गोष्टी निकामी करण्यास सुरुवात कराल.

मी प्रार्थना करतो की देव मी सांगितलेल्या या काही गोष्टी घेईल आणि तुमचे अंतःकरण उघडण्यासाठी त्यांचा उपयोग करेल ही जाणीव होण्यासाठी की तो तुमचा स्वतःचा स्व-केंद्रितपणा आहे जे तुमच्या दुःखाच कारण आहे.दोष कुठेतरी देण्याऐवजी, तुम्ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे, त्यास सामोरे जावे, देवासमोर स्वत: ला नम्र करावे आणि त्याला अंतःकरणात येण्यास सांगावे आणि आपल्या जीवनात त्याला-स्वत: ला मोठे करावे. तुमचा विजयात चालण्याचा तो मार्ग आहे.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा मार्क ९:३३-३४. कफर्णहूमला जात असताना शिष्य कशावरून वाद घालत होते?

**मार्क ९:३३-३५ -** *येशू व त्याचे शिष्य कफर्णाहूमास आले. येशू घरात असता त्याने त्यांना विचारले, "वाटेत तुम्ही कशाविषयी चर्चा करीत होता?" ३४ परंतु ते गप्प राहिले कारण वाटेत त्यांनी सर्वांत मोठा कोण याविषयी चर्चा केली होती. ३५ मग येशू खाली बसला, त्याने बारा जणांना बोलावून त्यांना म्हटले, "जर कोणाला पहिले व्हावयाचे असेल तर त्याने शेवटले झाले पाहिजे आणि सर्वांचा सेवक झाले पाहिजे."*

२. यातून आपल्या सर्वांमधील स्वार्थ दिसून येतो का?

३. वाचा मार्क ९:३३-३५. या शास्त्रवचना नुसार, जर एखाद्याला प्रथम व्हायचे असेल तर त्यांनी काय बनले पाहिजे?

४. लूक २२:२४-२७ मध्ये येशूच्या शिकवणुकीचे सविस्तरपणे स्पष्ट करा.

**लूक २२:२४-२७ -** *तसेच, त्यांच्यामध्ये अशासंबंधी वाद निर्माण झाला की, त्यांच्यामध्ये सर्वांत श्रेष्ठ कोण आहे. [२५] पण येशू त्यांना म्हणाला, विदेश्यांचे राजे त्यांच्या लोकांवर (प्रजेवर) सत्ता गाजवितात. इतर लोकांवर अधिकार असणारी माणसे लोकांनी त्यांना लोकांचे उपकारकर्ते म्हणण्यास भाग पाडतात. (स्वतःला उपकारकर्ते म्हणवून घेतात.) २६ परंतु तुम्ही तसे नाही. त्याऐवजी तुमच्यातील सर्वांत मोठा असलेल्याने सर्वांत लहान व्हावे व जो अधिकारी आहे त्याने सेवक व्हावे. २७ तेव्हा मोठा कोण: जो मेजावर बसतो तो की जो सेवा करतो तो? जो मेजावर बसतो तो नाही का? परंतु मी तुम्हांमध्ये सेवा करणारासारखा आहे.*

५. वाचा नीतिसूत्रे १३:१०. मतभेदास कारणीभूत असणारी एकमेव गोष्ट कोणती आहे?

**नीतिसूत्रे १३:१० -** *गर्वामुळे भांडण मात्र उत्पन्न होतात, पण जो चांगला सल्ला ऐकतो त्याच्याजवळ ज्ञान असते.*

६. वाचा गलतीकर २:२०. आपण आपले जीवन कसे जगले पाहिजे?

**गलतीकर २:२० -** *यासाठी की यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्यामध्ये जगतो, आता देहामध्ये जेजीवन मी जगतो ते मी ज्याने माझ्यावर प्रीती केली आणि माझ्याऐवाजी स्वतः ला दिले त्या देवाच्या पुत्रावरील विश्वासानेजगतो.*

७. वाचा मत्तय ७:१२. आत्मकेंद्रिततेवर उपाय काय आहे?

**मत्तय ७:१२ -** *यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या असे तुम्हाला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा. कारण नियमशास्त्राच्या व संदेष्टेयांच्या शिकवणीचे सार हेच आहे.*

# उत्तरावली

१. वाचा मार्क ९:३३-३४. कफर्णहूमला जात असताना शिष्य कशावरून वाद घालत होते?

*सर्वात मोठा कोण याविषयी त्यांनी वाद घातला*

२. यातून आपल्या सर्वांमधील स्वार्थ दिसून येतो का?

*होय*

३. वाचा मार्क ९:३३-३५. या शास्त्रवचना नुसार, जर एखाद्याला प्रथम व्हायचे असेल तर त्यांनी काय बनले पाहिजे?

*सर्वांचा सेवक*

४. लूक २२:२४-२७ मध्ये येशूच्या शिकवणुकीचे सविस्तरपणे स्पष्ट करा.

*तसेच, त्यांच्यामध्ये अशासंबंधी वाद निर्माण झाला की, त्यांच्यामध्ये सर्वांत श्रेष्ठ कोण आहे. [२५] पण येशू त्यांना म्हणाला, विदेश्यांचे राजे त्यांच्या लोकांवर (प्रजेवर) सत्ता गाजवितात. इतर लोकांवर अधिकार असणारी माणसे लोकांनी त्यांना लोकांचे उपकारकर्ते म्हणण्यास भाग पाडतात. (स्वतःला उपकारकर्ते म्हणवून घेतात.) २६/ परंतु तुम्ही तसे नाही. त्याऐवजी तुमच्यातील सर्वांत मोठा असलेल्याने सर्वांत लहान व्हावे व जो अधिकारी आहे त्याने सेवक व्हावे. २७/ तेव्हा मोठा कोण: जो मेजावर बसतो तो की जो सेवा करतो तो? जो मेजावर बसतो तो नाही का? परंतु मी तुम्हांमध्ये सेवा करणारासारखा आहे. (लूक २२: २४-२७)*

५. वाचा नीतिसूत्रे १३:१०. मतभेदास कारणीभूत असणारी एकमेव गोष्ट कोणती आहे?

*गर्व*

६. वाचा गलतीकर २:२०. आपण आपले जीवन कसे जगले पाहिजे?

***ख्रिस्ताच्या विश्वासाने (किंवा ख्रिस्तावरील विश्वासाने), आपल्या स्वतःच्या सामर्थ्यांवर किंवा दुर्बलतेवर केंद्रित न होता***

७. वाचा मत्तय ७:१२. आत्मकेंद्रिततेवर उपाय काय आहे?

***देव केंद्रित आणि इतर केंद्रीत असणे जसे इतरानी तुमच्याशी वागावे अशी तुमची इच्छा आहे तसे तुम्हीही त्यांच्यासोबत वागावे.***

# पाठ २

# देवाच्या वचनांवर मनन कसे करावे

## *डॉन क्रो द्‌वारा लिखित*

*मनन* शब्दाचा अर्थ "चिंतन करणे, मनन करणे मनात घोळविणे, मनात योजणे, उद्देश किंवा लक्ष्य." ग्रीक भाषेत हा शब्द दर्शवितो मनात काहीतरी घोळवणे, चिंतन करणे “आणि कल्पना करणे असे पण म्हणतात.”

पवित्र शास्त्रावर मनन करण्याची दोन कारणे" योग्य ज्ञानाचे चिंतन करणे, मनाचे नविनीकरण करणे आणि प्रार्थना, स्तुती व चिंतनाच्या द्‌वारे देवा सोबत वचनाच्या प्रतिबिंबात जुडणे म्हणुन देखील हे दर्शविते; म्हणजेच चिंतन करणे, मनात ठेवणे, आणि त्याचा विषयी विचार करणे.

*प्रचलित विषयावरील अभ्यास क्रमावरुनही मनन करता येते.* - मननासाठी एखादा विषय निवडुन. उदाहरणार्थ: बाप्तिस्मा. ग्रीक, हिब्रु किवा एखादया चांगल्या शब्दकोशातून शब्दाचा अर्थ स्पष्ट करणे. ज्या मूळ शब्दातून हा प्रचलित शब्द आला असेल त्याचा शोध घेणे. वचनांच्या संदर्भ लावणे व त्यावर मनन करणे. त्यातून तुम्ही त्याच्याशी संलग्न असलेल्या विषयांवर अभ्यास करावयास प्रवृत होता, जसे क्षमादान (प्रेषितांची कृत्ये २ :३८), पश्चाताप (प्रेषितांची कृत्ये २:३८), विश्वास (मार्क १६:१६), विवेक (पेत्राचे पहिले पत्र ३:२१), प्रभुचा धावा (प्रेषितांची कृत्ये २२:१६) इत्यादी.

वचनां मुळे निर्माण झालेले किंवा त्यामुळे तुम्हाला पडलेल्या प्रश्नांवर मनन करण्याची गरज आहे, जसे बाप्तिस्मा घेण्यासाठी काही योग्यता असावी लागते का? बाप्तिस्मा करण्यामागचा उद्देश काय? हा केव्हा करायचा? तो कधी पर्यत करता येतो?

*मनन विवरणात्मक अभ्यास क्रमाद्‌वारेही करता येते; म्हणजेच पवित्र शास्त्रातील अध्यायावर एक एक वचनाद्‌वारे अध्ययन करणे.* एखाद्‌या

पुस्तकावर जास्त वेळ पर्यत चिंतन व विचार करणे ही किल्ली आहे की तुम्ही त्याच्या विषयसूचीशी परिचीत होता. (वचने आणि अध्याय)

*मनन हे शब्दांच्या अध्यायनाद्वारेही करता येते.* ठरावीक शब्दांचा नेमका अर्थ कोणता? विश्वास हयाचा अर्थ काय? प्रभु हया शब्दाचा अर्थ काय? येशू हया शब्दाचा अर्थ काय? ख्रिस्त हया शब्दाचा अर्थ काय? निर्दोष असणे हया शब्दाचा नेमका अर्थ काय? इत्यादी.

*पवित्र शास्त्राच्या परिच्छेदा वरुनही तुम्ही मनन करु शकता एक परिच्छेद हा तुम्ही एक लिखीत स्वरुपातील विचाराचा संच आहे ज्यामध्ये सहसा अनेक वाक्ये असतात.* नवीन विषयावर भर देण्यासाठी लेखक नेहमीच नवीन परिच्छेदा पासुन सुरुवात करतो.

जेव्हा वचनांवरुन मनन करता,तेव्हा त्यातील विरामचिन्हांकडेही लक्ष दया जसे प्रश्नचिन्ह असा प्रश्न का विचारला गेला? संदभाशी हा कसा संबंधित आहे, इत्यादी?

पवित्र शास्त्राचे मनन म्हणजे नुसतेच वचने पाहणे नाही, पण वचनामागच्या देवाला पाहणे होय.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. "मनन" करणे हया शब्दाचा अर्थ काय?

२. पवित्र शास्त्राचे मनन करण्याची दोन कारणे कोणती?

३. प्रचलित विषयाचा अभ्यासक्रम म्हणजे काय?

४. वचनांचा विवरणात्मक अभ्यासक्रम म्हणजे काय?

५. वाचा लूक ६:४६. “प्रभू" हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

**लूक ६:४६ -** *तुम्ही मला प्रभू, प्रभू म्हणता, पण मी जे सांगतो ते का करीत नाही?*

६. वाचा मत्तय १:२१. "येशू" हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

**मत्तय १:२१ -** *तिला पुत्र होईल ,त्याचे नाव तू येशू असे ठेव , कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील.*

७. वाचा लूक २३:१-२. "ख्रिस्त" हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

**लूक २३:१-२ -** *नंतर ती सर्व मंडळी उठली व त्यांनी त्याला पिलाताजवळ नेले. (२) आणि ते त्याच्यावर असा आरोप करु लागले की, हा आमच्या राष्ट्राला फितवितांना, कैसराला कर देण्याची मनाई करिताना आणि मी स्वत: खिस्त राजा आहे असे म्हणताना आम्हाला आढळला.*

८. परिच्छेद म्हणजे काय?

९. पवित्र शास्त्राचे मनन म्हणजे नुसतेच वचनांकडे पाहणे नाही पण ______________________.

# उत्तरावली

१. मनन करणे हया शब्दाचा अर्थ काय?

***चिंतन करणे, मनात करणे, एखाद्याच्या मनात काहीतरी घोळत असणे***

२. पवित्र शास्त्राचे मनन करण्याची दोन कारणे कोणती?

***योग्य ज्ञानाचे चिंतन करणे, (मनाचे नविनीकरण करणे) व चितन करणे,मनात ठेवणे, आणि त्या विषयी विचार करण्याच्या द्वारे वचनाच्या प्रतिबिंबात देवाची भेट घेणे हे दर्शविते.***

३. प्रचलित विषयाचा अभ्यासक्रम म्हणजे काय?

***पवित्र शास्त्रातून अध्ययनासाठी आणि चिंतन करण्यासाठी एक विषय निवडणे.***

४. वचनांचा विवरणात्मक अभ्यासक्रम म्हणजे काय?

***एकेका वचनाद्वारे पवित्र शास्त्राचे अध्ययन करणे.***

५. वाचा लूक ६:४६. “प्रभू” हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

***ज्याच्या आपण आज्ञा पाळतो ( मालकाप्रमाणे)***

६. वाचा मत्तय १:२१. “येशू” हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

***उद्धारकर्ता जो इतरांना त्यांच्या पापांपासून तारतो***

७. वाचा लूक २३:१-२. “ख्रिस्त” हया शब्दाचा अर्थ तुमच्या मते काय असावा?

***राजा म्हणून अभिषिक्त***

८. परिच्छेद म्हणजे काय?

***एक विचाराचा लिखित संच***

९. पवित्र शास्त्राचे मनन म्हणजे नुसतेच वचनांकडे पाहणे नाही पण ____________________.

***वचनामागच्या देवाशी जुळणे होय***

# पाठ ३
# मनाचे नविनीकरण

## *डॉन क्रो द्वारा लिखीत*

आज आपण मनाचे नविनीकरण करणे या विषयावर बोलणार आहोत, मला हे दोन परिच्छेद वाचायला आवडेल. सर्वप्रथम फिलिप्पैकरांस ४:८ सांगते, *"बधूंनो शेवटी इतके सांगतो की, जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही न्याय, जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सदगुण जी काही स्तुती त्याचे मनन करा."* प्रेषित पौल स्पष्टपणे आपल्याला सांगत आहे की अशा काही गोष्टी आहेत ज्याचा आपण विचार केला पाहिजे. दुसऱ्या शब्दात, आपण आपले विचार निवडू शकतो. आता मला ठाऊक आहे की आपल्या मनात असे कितीतरी विचार येतात जे देवाच्या वचनांचा विरोधात असतात, रोमकरांस पत्र, अध्याय ७ वचने २२ आणि २३ प्रमाणे. पापाचा नियम आपल्या मनावर हल्ला करुन आपल्या बरोबर लढतो. पण पवित्र शास्त्र फिलिप्पैकरांस मध्ये सांगते की आपल्याला त्या विचाराचे मनन करुन त्यांना मनात घरटे करु दयायचे नाही, कारण की आपण कोणता विचार करावा हे आपल्याला निवडता येते. पवित्र शास्त्र आपल्याला हे ही सांगते की मनुष्य जसा आपल्या हृदयात विचार करतो तसाच तो असतो. (नीतिसूत्रे २३:७) त्यामुळे आपण काय विचार करतो हे खरोखर महत्वाचे आहे.

रोमकरांस पत्र १२:१ आणि २ मध्ये पवित्र शास्त्र सांगते, *"म्हणून बंधुंजनहो, मी देवाच्या करुणेमुळे तुम्हांला विनविती की, तुम्ही आपली*

*शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून सर्मपण करावी- ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे. हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून हया युगाबरोबर समरुप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतः चे रुपांतर होऊ द्या."* पवित्र शास्त्र सांगते, मनाच्या नवीकरणाने आपले रुपांतर होऊ शकते. तुम्हाला माहित आहे का जेव्हा अपोलो अंतराळयान अंतराळात गेले, तेव्हा त्यांना दर दहा मिनिटांना गतिमार्गात सुधार करावा लागला? चंद्रावर ते यान वाकडी- तिकडी वळणे घेत गेले. सरतेशेवटी जेव्हा ते तेथे उतरले, त्याच्याजवळ उतरण्यास ५०० मील इतके नियुक्त अवतरण क्षेत्र होते. त्यानी नियुक्त अवतरण क्षेत्राच्या काही फूटाच्या अंतरावर जेमतेम ते उतरवण्यास यश मिळवले. तरीही सम्पुर्ण उड्डाण यशस्वी झाले. आपल्याला ही मार्ग निर्धारित करावा लागेल आणि जिवंत बलिदान होऊन प्रभू येशू ख्रिस्ताच्या चरणी स्वतः ला पूर्णतः समर्पित करावे लागेल. जिवंत बलिदानाची समस्या ही असते की काही वेळा वेदीपासून रांगत दूर जावेसे वाटते, म्हणून आपल्याला विचाराचा गतिमार्ग बरोबर करावा लागेल. आपल्याकडे असे म्हणणारे हृदय असायला हवे की, "देवा मला तू आणि तुझा मार्ग हवा आहे."

आपल्याला केवळ संपूर्ण समर्पित करणेच आवश्यक नाही तर विजयी ख्रिस्ती जीवनात भागिदार म्हणून आपल्याला पुढचे पाऊल उचलावे लागेल आणि आपल्या मनाचे नविनीकरण करीत रुपांतरीत व्हावे लागेल. जर जगासारखी आपली दशा व्हावयास नको असेल तर आपले विचार जगासारखे नकोत. जसे आपण फिलिप्पैकरांस ४ :८ मध्ये वाचतो, मनन कश्यावर करायचे हयाची निवड आपण करु शकतो. जे काही प्रशंसनीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती त्याचे मनन करा. जुन्या करारात ते असे करायचे की देवाची वचने घ्यायचे आणि कपडयांवर आणि त्यांच्या दरवाज्यांवर लावायचे. ती सतत त्यांच्या नजरे समोर असायचे. देवाने त्यांना सुचना दिली होती की त्यांनी रात्र न दिवस देवाच्या वचनांबद्दल बोलावे जेणेकरुन त्यात जे सांगितले आहे त्याप्रमाणे ते वागु शकतील आणि त्यांनी हया सर्व गोष्टी त्यांच्या मुलाबाळांनाही सांगाव्यात. आपण कशाविषयी मनन करतो हे अत्यंत महत्वाचे आहे. हे अत्यंत महत्वाचे आहे की आपल्याला खरोखरच विजयी जीवन जगण्यासाठी सर्व वेळ देवाचे वचन समोर ठेवायला हवे. जे काही शुद्ध, जे काही प्रशंसनीय,

जे काही श्रवणीय, जो काही सद्‌गुण, जी काही स्तुती हयाच्या विरुद्ध मनन करणे म्हणजे देवाच्या व आत्म्याच्या गोष्टींचे चिंतन न करणे. रोमकरास पत्र ८:६ सांगते *"देहस्वभावाचे चिंतन हे मरण आहे."* पण हयाच वचनाचा नंतरचा भाग सांगतो की, *"पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांति आहे."* देवाच्या व आत्म्याच्या गोष्टीवर मनन करणे हयात जीवन आणि शाति आहे पण जर आपण व्यभिचार, जगिक गोष्टी, पैसा, लबाडी आणि इतर गोष्टीचा विचार करु लागतोत तर आपल्या जीवनात काय होईल ठाऊक आहे का? मनुष्य जसा आपल्या हृदयात विचार करतो तसाच तो होतो. आपण त्या गोष्टींवर अंमलबजावणी करायला लागू. त्या गोष्टी आपल्या जीवनात दिसतील, आणि त्याने आपले आयुष्य उध्वस्त होईल. हे बघा, विश्वासणाऱ्यांसाठी खरे आत्मिक युध्द सर्ववेळ सैतानाला फटकारणे आणि अडविणे नाही, तरीही असा काही समय असतो त्यावेळेस आपल्याला असेही करण्याची गरज भासते. तथापि आपण जे चिंतन करतो आणि जे विचार आपल्या मनात घर करुन बसतात त्यासाठी आत्मिक युध्द करावे लागते.

यशया २६:३ मध्ये पवित्र शास्त्र सांगते की ज्याचे मन परमेश्वराच्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तो पूर्ण शांति देतो. रोमकरास पत्र १२ मध्ये सांगितल्याप्रमाणे दिवसातून अनेक वेळा आपल्याला मार्गाची दुरुस्ती करावी लागते. आपल्याला म्हणावे लागेल की, “देवा, ते अयोग्य विचार आहेत. मला त्यापासून परावृत होण्याची आणि मनाचे नविनीकरणाची आणि अश्या गोष्टी ज्या प्रशंसनीय, श्रवणीय, सद्‌गुण, स्तुती, त्याचे मनन करण्याची गरज आहे."

तर मग जर तुमच्या मनात विचारांचा पगडा बसला असेल, जर तुम्ही बंधनात असाल, ज्या गोष्टींचा विचार करायचा नाही अशाच गोष्टीचा विचार करीत असाल तर तुम्हाला ताबडतोब स्वःताला आवर घालण्याची गरज आहे. पवित्र शास्त्र सांगते जर आपण देवाला जवळ गेलो तर तो आपल्याला त्याच्या जवळ ओढेल. जर आपण शत्रुचा सामना करू, तर तो आपल्या पासून निघून जाईल. माझ्या जीवनात ही असे कितीतरी क्षण आले जेव्हा मी काही गोष्टी जाऊ दिल्या आणि निराशेच्या गर्तेत बुडालो. त्या समयी, पवित्र शास्त्र उचलणे व खाली बसून आणि परिच्छेद काढून वाचत असे म्हणणे की, “देवा हे तू माझ्याविषयी बोलतो. तू जे बोलतोस तो मी आहे. तू माझे

बल आहेस. "हे असे करणे कठिण वाटत होते. तुम्हाला ठाऊक आहे का तुमचा विजय इतका सोपा आहे? तुम्हाला म्हणायचे आहे, “शत्रु माझ्याशी आता जे काही करु पाहतोय त्याला मी अडवतो. मी बसून माझे पवित्र शास्त्र उघडीन आणि त्यातील पानेच फक्त चाळत बसणार नाही; परंतु हया वचनांच्या माध्यमाने मी देवाशी संर्पक साधेन. मी त्याच्यावर माझे मन स्थिर करीन. आणि प्रभु, तू माझ्याविषयी असे बोलतोस, तू म्हणतोस मला क्षमा करण्यात आले आहे. तू म्हणतोस मला शुद्ध करण्यात आले आहे. तू म्हणतोस तूझ्या प्रेमापासून मला कोणीच वेगळे करु शकणार नाही" जेव्हा तुम्ही शांत बसून देवाने तुमच्या जीवनात केलेल्या चांगल्या कार्याचा विचार कराल, क्षणभरातच तुम्हाला अन्य इतर गोष्टीचा विसर पडेल.

मला एक उदाहरण देऊ द्या. एकदा एका माणसाला बोलताना मी ऐकले. तो म्हणत होता की मी आता तुम्हाला सल्ला देत आहे की पुढच्या १० मिनिटापर्यंत गुलाबी हत्तीचा विचारच करायचा नाही. मग असे काही घडले की पुढच्या १० मिनिटापर्यंत आम्ही सर्वजण गुलाबी हत्तीचाच विचार करत राहिलो. नंतर तो म्हणाला, "स्टॅचू ऑफ लिबटी कोणत्या रंगाचा आहे? "कोणीतरी उत्तर दिले हिरवा. मग त्याने विचारले," ठीक, स्टॅचू ऑफ लिंबटीचा कोणता हात उंचावलेला आहे? आणि कोणीतरी म्हणाले "उजवा हात. नंतर त्या माणसाने पुन्हा विचारले" स्टॅचू ऑफ लिबटीच्या हातात काय आहे? "आणि कोणीतरी म्हणाले ती मशाल आहे. मग त्या गृहस्थाने विचारले, “तुमच्या मनातील गुलाबी हत्ती बद्दलच्या विचाराचे काय झाले? "ते नाहिसे झाले. पाहिलत हे नुसतेच" आता त्या बाबत विचारच करायचाच नाही. "असे बोलून होणारे नव्हते कारण तुम्हाला ठाऊक आहे की तुम्ही विचार करालच. वचन आपल्याला वास्तविकता सांगते की तसे विचार तुम्हाला देवाच्या विचारांनी बदलायचे आहेत. जेव्हा आपणास दिसेल की हे सगळे तुमच्या विरोधात येत आहे. आणि आपल्याला ज्याचा विचार करायचा नाही नेमका तोच विचार आपण करत आहोत, तर ताबडतोब आपली नवी ओळख आपल्याला आठवायची आहे. ताबडतोब आपल्याला देवाकडे वळण्याची गरज आहे, त्याच्याशी जुळण्याची, फक्त पानांवरच्या वचनांशी नाही, तर त्या वचनांच्या मागे असणाऱ्या देवाशी जुळण्याची रोमकरांस पत्र ८:६ मध्ये पवित्र शास्त्र सांगते आपण जेव्हा असे करतो, आपण आपले जीवन परिवर्तित झालेले

पाहतो आणि देवाने दिलेली शांति अनुभवतो.जेव्हा आपण आपले मन त्याच्यावर व आत्म्याच्या गोष्टीवर स्थिरावतो, त्याचे चिंतन करतो. माझ्या प्रियजनहो, आजच ख्रिस्ताने तुमच्यासाठी मोल देऊन विकत घेतलेल्या मुक्ततेत आणि स्वतंत्रतेत चाला.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचन

१. वाचा रोमकरांस पत्र १२:१. आपण आपल्या शरीराला काय करायला हवे?

**रोमकरांस पत्र १२:१-२ -** *म्हणून बंधुंजनहो, मी देवाच्या करुणेमुळे तुम्हांला विनवितो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून सर्मपण करावी - ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. (२) देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे. हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून हया युगाबरोबर समरुप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वतः चे रुपांतर होऊ द्या. तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आल्याने केलेले नवीकरण ह्याच्याद्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपणास तारिले.*

२. वाचा रोमकरांस पत्र १२:२. वचन आपणाला सांगते की आपण या ______________________ समरुप होऊ नये.

३. वाचा प्रेषितांची कृत्ये १७:११. आपण आपले विचार समांतर करायलाच हवी?

**प्रेषितांची कृत्ये १७:११ -** *तेथील या लोकांपेक्षा मोठया मनाचे होते, त्यांनी मोठया उत्सुकतेने वचनाचा स्विकार केला, आणि हया गोष्टी अशाच आहेत की काय हयाविषयी ते शास्त्रांत दररोज शोध करीत गेले.*

४. वाचा रोमकरांस पत्र ८:५-६. आत्मिक मनाचे होणे म्हणजे ______

**रोमकरांस पत्र ८:५-६ -** *कारण जे देहस्वभावाचे आहेत ते दैहिक गोष्टीकडे चित्त लावतात; आणि जे आध्यात्मिक मार्गानुसारी आहेत*

*ते आध्यात्मिक गोष्टीकडे चित्त लावतात (६) कारण देहस्वभावाचे चिंतन हे मरण; पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांति आहे.*

५. वाचा रोमकरांस पत्र १२:१-२. हया वचनांप्रमाणे आपल्याला कोणत्या दोन गोष्टी करण्याची गरज आहे?

६. वाचा यशया २६:३. पूर्ण शांतीत आपण कसे राहू शकू?

**यशया २६:३-४ -** *ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्यास तू पूर्ण शांति देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो. (४) परमेश्वरावर सर्व काळ भाव ठेवा, कारण प्रभु परमेश्वर हा सनातन आश्रयदुर्ग आहे..*

७. वाचा यशया २६:३. प्रभूवर चित्त ठेवण्याचे कोणते मार्ग हयात सांगितले आहेत?

# उत्तरावली

१. वाचा रोमकरांस पत्र १२:१. आपल्या शरीराला आपण काय करायला हवे?

***शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून सर्मपण करावी.***

२. वाचा रोमकरांस पत्र १२:२. वचन आपणाला सांगते की आपण या ________________ समरुप होऊ नये.

***युगाबरोबर किंवा अविश्वासणाऱ्यांबरोबर***

३. वाचा प्रेषितांची कृत्ये १७:११. आपण आपले विचार समांतर करायलाच हवी?

***देवाच्या वचनाबरोबर***

४. वाचा रोमकरांस पत्र ८:५-६. आत्मिक मनाचे होणे म्हणजे. ______________________

***जीवन व शांति***

५. वाचा रोमकरांस पत्र १२:१-२. हया वचनांप्रमाणे आपल्याला कोणत्या दोन गोष्टी करण्याची गरज आहे?

***आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून सर्मपण करण्याची आणि आपल्या मनाचे नविनीकरण करण्याची.***

६. वाचा यशया २६:३. पूर्ण शांतीत आपण कसे राहू शकू?

***परमेश्वरावर आपले चित्त ठेवून***

७. वाचा यशया २६:३. देवावर चित्त ठेवण्याचे कोणते मार्ग हयात सांगितले आहेत?

***प्रार्थना, स्तुती, वचनांचे मनन करणे, धन्यवाद देणे, इत्यादी.***

# पाठ ४

# ख्रिस्ताच्या मंडळीचे महत्व

## *डॉन क्रो द्वारा लिखीत*

आज आपण ख्रिस्ताच्या मंडळीच्या महत्वाबाबत बोलणार आहोत. मी एक वचन वाचू इच्छितो, इब्री लोकांस पत्र १०:२५ वचन सांगते की, *“आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकांना बोध करावा, आणि तो दिवस जसाजसा जवळ येत असल्याचे तुम्हाला दिसते तसातसा तो अधिक करावा."* जसे आपण ख्रिस्ताच्या मंडळीच्या महत्वावर लक्ष केंद्रित करत आहोत, तेव्हा माझा प्रश्न आहे की, "मंडळी म्हणजे काय?"

मी कोलोराडो स्थित, कोलोराडो स्प्रिंग्स स्थानिक मंडळयांमध्ये अनुयायीत्व सुवार्तेचा कार्यक्रम घेतला. आम्ही लोकांना कश्या त-हेने हे वापरावे, बाहेर जाऊन कसे उपयोगात आणावे हयाचे प्रशिक्षण दिले. स्थानिक मंडळयांसोबत सहा आठवडे यावर काम करुन, आम्ही स्थानिक मंडळयांच्या व्यतिरिक्त बाहेर जाऊन पवित्र शास्त्राच्या अध्ययनाचे वीस वर्ग स्थापित केले. अनेक महिने आम्ही त्या लोकांबरोबर पवित्र शास्त्राच्या अध्ययनाचे वर्ग चालवले. एके दिवशी पाळक साहेबांनी असे म्हणत मला बुचकळयात टाकले की, "तुम्हाला माहित आहे पवित्र शास्त्र असे सांगते की प्रभु रोज उद्धार होण्याऱ्यांना मंडळीत घेऊन येतो. मग आपणास का नाही दिसत की ही सारी लोक पवित्र शास्त्राच्या अध्ययना द्वारे मंडळीत येताना?"

जेव्हा आम्ही बाहेर कार्य करत होतो, लोकांचा उद्धार होताना पाहिला आणि त्यांना शिष्य ही बनवले गेले आणि त्यांची सेवकाईही

करण्यात आली. परतुं वास्तविक रीतीने पाळक साहेब असे म्हणत होते की, "ही सगळी जण रविवार सकाळच्या उपासनेसाठी हया चर्चच्या इमारतीत का नाही एकत्र येत? "मंडळी विषयीची माझीही संकल्पना थोडी दूरवरची होती. पाळक साहेब जे म्हणाले त्याने मी विचलित झालो, आणि मला काय करावे ते सूचेच ना. मी विचार करु लागलो *काय हा अनुयायीत्व सुवार्तेचा कार्यक्रम कार्य करतोय? काय आम्ही खरच लोकांच्या जीवनाला स्पर्श करतोय?* मला ठाऊक होते की आम्ही बहुतांशी लोकांपर्यत पोहचतोय, पण मी पुरता गोधंळात हया मुळे पडलो की ते सर्व रविवार सकाळी उपासना सभेसाठी का येत नसावेत बरे.

मी "मंडळी" हया शब्दाचे अध्ययन करण्याचे ठरवले. हया पाठात मला जे गवसले ते येथे समाविष्ट आहे. रोमकरांस पत्र १६:३, करिथकरांस पहिले पत्र १६:१६, कलसैकरांस पत्र ४:१५, फिलेमोनाला पत्र २ प्रेषितांची कृत्ये ५:४२ आणि प्रेषितांची कृत्ये २०:२०, मध्ये पवित्र शास्त्र मूलतः कोणाच्या तरी घरात भरलेल्या नवीन करारातील सुरुवातीच्या मंडळी विषयी बोलत आहे. सर्व प्रकारच्या मंडळयाविषयी मला माहिती आहे. घरात भरविण्यात येणाऱ्या, संख्येने लहान व मोठया मंडळया, आणि संख्येने अवाढव्य असलेल्या मंडळया असलेले चर्च. पण एका गोष्टिने माझे लक्ष वेधले की नव्या करारातील मंडळया छोटया छोटया संख्येने लोकांच्या घरात एकत्र येत असत.

लेखक लॉरेन्स ओ. रिर्चड (Lawrence O. Richards) पवित्र शास्त्रातील वचनांचा विवरणात्मक भाषाकोशातील *(The Expository Dictionary of the Bible Words)* (पृष्ठ क्र. १६४) वर लिहितात, "मंडळी" हया शब्दाच्या अर्थ सांगताना थोडया फार प्रमाणात गोंधळून जाणे साहजिकच आहे; हा शब्द आपण कित्येक अर्थाने वापरतो. हयाचा अर्थ एखादी इमारत (उदा : ४ रस्तावरील मंडळी) संघटित पंथाचे चर्च (रीफॉम्ड चर्चेस इन अमेरिका किंवा बॅपटिस्ट चर्च) रविवारची सभा (उदा : काय आज तुम्ही रविवारच्या सकाळच्या सभेला गेला होता.) हयापैकी कोणताच उल्लेख पवित्र शास्त्रात दिसून येत नाही." मी मात्र विचार करु लागलो. *हयाचा नेमका अर्थ काय लावावा? मंडळी हयाचा नेमका अर्थ कोणता?* पुढे लिहिताना ते लिहितात, "बहुधा बहुतांशी लोक आराधना करण्यासाठी एकत्रित आलेल्या मंडळी ऐवजी धार्मिक कार्यासाठी एखादया इमारतीत एकत्र येणाऱ्यानाच मंडळी मानतात,

रेखाटलेली प्रस्तुत मंडळी दिशाभुल करणारी असू शकते." "मंडळी" साठी ग्रीक भाषेतील शब्द आहे *एक्कलेसिया (ekklesia)* आणि हयाचा शब्दशः अर्थ आहे आराधना, प्रार्थना किवा केवळ देवाला न्याहळण्याच्या उद्देशाने एकत्रित आलेला जमाव. मी इथे आणखीन काही वाचवून दाखवतो. ते म्हणते, “नव्या करारा मधील ऐकलेशियात कितीही विश्वासी समावू शकतात.” हयात थोडेसेच लोक घरात एकत्र येऊ शकतात. (रोमकरांस पत्र१६:५) मोठया शहरात राहणारे विश्वासी एकत्र येऊ शकतात. (प्रेषितांची कृत्ये ११:२२) किंवा एका मोठा भौगोलिक जिल्हातून, ज्याप्रमाणे आशिया किंवा गलाति. "आणखी पुढे म्हणते," मंडळीची नमूनेदार सभा म्हणजे घरी होणारी. जेव्हा मंडळी एकत्र मिळतात तेव्हा प्रत्येक जण [होत] कोणी स्तोत्र गाण्यात, कोणी शिक्षण देण्यास कोणी प्रकटीकरण सांगण्यास, कोण अन्य भाषेतून बोलणारा आणि कोणी तिचा अर्थ सांगणारा असतो. (करिथकरांस पहिले पत्र १४:२६) दोघे तिघे संदेश देतात व इतर निर्णय देतात. (करिथकरांस पहिले पत्र १४:२६) ... विश्वासणाऱ्यांचा समूह म्हणुन मंडळीच्या अस्तित्वासाठी अश्या प्रकारच्या रितीची देवाणघेवाण अत्यावश्यक होती ... प्रत्येक मनुष्याकडून योगदानाची अपेक्षा होती आणि तिच्या किवा त्यांच्या आत्मिक दानाने सेवा होत होती."

इब्री लोकांस पत्र १०:२५ वचन सांगते की, *"आपले एकत्र मिळणे न सोडता."* मंडळी म्हणजे लोकांचा जमाव जो येशूला पाहण्याकरता, प्रभूची स्तुति करण्याकरता, देवाकडून मार्गदर्शन मिळवण्याकरता, त्या दिशेने मार्गक्रमण करावयास एकत्रित आलेला. सुरुवातीच्या नव्या करारातील मंडळीचा प्राथमिक उद्देश होता उन्नती करण्याचा. ते एकमेकांना विश्वासात वाढवण्याच्या उद्देशाने एकत्र जमत होते.

सुरुवातीची मंडळी सुर्वाता प्रसार करणारी होती. लोक सगळीकडे विखरुन, येशू ख्रिस्तावरील त्यांच्या विश्वासाची साक्ष देत असत, आणि ते हया प्रमाणे करत असताना, देव अजून लोकांची भर मंडळीत घालत असे. - इमारतीत नाही - पण देवाच्या लोकांमध्ये जसजसे ते पश्चाताप करत व विश्वास ठेवत. मग ते एकमेकांना उत्तेजना देण्यासाठी एकत्रित येत, आत्मिक दानांना कार्यशील करण्यासाठी, एकमेकांची सेवा करण्यासाठी, एकत्रित भोजन करुन एकामेकांशी सहभागीतेत वेळ घालविण्यासाठी. जेव्हा ते एकत्र येत असत, ते एकमेकांना उत्तेजना

देण्यासाठी त्यांच्या आत्मिक दानांचा वापर करत असत. त्यानंतर ते बाहेर पडत आणि जगाला सुर्वाता सांगत, आणि असेच चक्र पुन्हा नव्याने सूरु होत असे. ते प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवत, आणि ते स्वतःला एकत्र जमवित. ते कोठे एकत्र जमत त्याने काहीही फरक पडत नसे. मग ती एखादी इमारत असू देत की घर. मग तेथे खूप प्रमाणात लोक जमा होत की घरात एकत्र मिळण्यासाठी आलेले थोडेसेच लोक असोत. हया सर्वामुळे काहीच फरक पडत नसे जोपर्यंत लोक प्रभूच्या नावाने त्यांच्या वरदानांचा उपयोग करण्यासाठी, एकमेकांना उत्तेजित करण्यासाठी, एकमेकांच्या सहवासात वेळ घालविण्यासाठी शेवटी त्याचा परिणाम उत्तेजना किंवा एकमेकांना ऊंचावणे होय अश्यासाठी एकत्रित होत.

मला कळून आले की आम्ही अनुयायीत्व सुवार्ताचे कार्यक्रम सुरुवातीला नमूद केलेल्या स्थानिय मंडळीच्या द्वारा करत होतो, संपूर्ण शहरामधील वेगवेगळया वीस पवित्र शास्त्राच्या अध्ययनाचे वर्ग चालवत होतो. आम्ही वीस वेगवेगळया सभाना भेट देत होतो ते आम्ही 20 वेगवेगळ्या चर्च मध्ये भेटत होतो आज ज्याला मंडळी म्हटले जाते तशी ती नव्हती, परंतु आम्ही तर "मंडळीला" भेट देत होतो, एका आठवडयात वीस वेळा, कारण आम्ही प्रभु येशूच्या नावाने एकमेकांस उत्तेजित करण्यास, येशूला पाहण्याकरता, प्रभु येशूच्या वचनांचे शिक्षण देण्यास, आत्मिक दानांचा वापर करण्यास एकत्रित भेटत होतो.

तुम्ही कोणत्या मंडळीत जाता हयाने काहीही फरक पडत नाही - काही फरक पडत नाही तुम्ही कोठल्या पंथाशी निगडीत आहात की नाही, मोठया मंडळीत जाता की घरात भरत असलेल्या थोडयाशा लोकांत - वचन आपल्याला सांगते की जसा तो दिवस जवळ येताना दिसतो, जसजसे पाप वाढत जाते,तसतसे देवाची क्रुपा अधिक वाढते. ही कृपा देवाच्या लोकांच्या संगतीत विपुलतेने दिसेल. मंडळीत जेथे येशू ख्रिस्ताच्या सेवेत प्रत्येक विश्वासणाऱ्यासाठी कार्यभाग आहे, तुम्ही एकमेकांची सेवा करु शकता, एकमेकांना ऊंचावू शकता आणि एकदुसऱ्यांसाठी आत्मिक दानांचा वापर करीत एकमेकांना उत्तेजित करु शकता.

अश्या प्रकारच्या विश्वासणाऱ्यांचा गट आम्हा सर्वासाठीच फायदेशीर ठरतो. दोघे किंवा तिघे प्रभु येशूच्या नावाने एकत्र जमत असतील, तरी त्याच्या भेटण्यात नियमितपणा हवा. आपल्या आत्मिक दानांचा उपयोग करण्यासाठी, एकमेकांना बोध करण्यासाठी, एकमेकांना प्रोत्साहित करण्यासाठी, एकत्रित पणे येशूकडे पाहण्यासाठी, आणि एकमेकांसाठी प्रार्थना करण्यासाठी हे उत्तम आहे. मंडळी विषयी बरंच काही बोलता येईल. आपण वडील लोकाबद्दल बोलू शकतो,देखभाल करणाऱ्याविषयी, पाळकांविषयी, मंडळीच्या कारभाराविषयी, परंतु हा हया शिक्षणाचा विषय नाही. हया शिक्षणाचा उद्देश मंडळीच्या उद्देशाविषयी जाणून घेणे आहे आणि हे जाणून घ्यायचे आहे की आपल्याला एकांतवासात एखादया टापूवर राहणाऱ्या माणसासारखे स्वतःला वेगळे करायचे नाही आपण तसे जगु शकत नाही. जेव्हा आपला उद्धार होतो, परमेश्वर आपल्याला ख्रिस्ताच्या देहात जोडतो - एकच विश्वव्यापी शरीर विश्वासणाऱ्यांचा. आपल्याला एकदुसऱ्यांची गरज आहे. आणि आपल्याला देवाच्या मंडळीत एकमेकांना प्रोत्साहित करण्यासाठी, परमेश्वराने देऊ केलेल्या आत्मिक दाना सोबत एकमेकांची सेवा करण्यासाठी एकत्रित येण्याची आवश्यकता आहे. मी तुम्हाला देवाच्या लोकांबरोबर संगती करण्यासाठी प्रोत्साहित करतो.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा इब्रीकरांस पत्र १०:२५. आपल्याला काय सोडायचे नाही?

**इब्रीकरांस पत्र १०:२५ -** *“ परमेश्वर आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकांना बोध करावा, आणि तो दिवस जसाजसा जवळ येत असल्याचे तुम्हाला दिसते तसातसा तो अधिक करावा.*

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ५:४२. दररोज मंदिरात आणि घरोघरी येशु बद्धल ______________

**प्रेषितांची कृत्ये ५:४२ -** *आणि दररोज मंदिरात आणि घरोघर शिकविण्याचे व येशू हाच खिस्त आहे ही सर्वाता गाजविण्याचे त्यांनी सोडले नाही.*

३. वाचा प्रेषितांची कृत्ये २:४२. सुरुवातीच्या मंडळया कोणती चार कार्ये नियमित पणे करायची?

**प्रेषितांची कृत्ये २:४२ -** *ते प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासांत, भाकर मोडण्यांत व प्रार्थना करण्यात तत्पर असत.*

४. वाचा प्रेषितांची कृत्ये २:४४-४५. सत्य की असत्य: सुरुवातीची गंडळी चर्चच्या इमारतीत गाडया पार्क करण्यासाठी जागा बांधावयास भरपूर पैसा देत.

**प्रेषितांची कृत्ये २:४४-४५ -** *तेव्हा विश्वास ठेवणारे सर्व एकत्र होते, आणि त्यांचे सर्वकाही समाईक होते. (४५) ते आपआपली जमीन व मालमत्ता विकून जसजशी प्रत्येकाला गरज लागत असे तसतसे सर्वांना वाटून देत असत.*

५. वाचा करिथकरांस पहिले पत्र १२:२८. देवाने त्याच्या मंडळीला प्रदान केलेल्या आठ दानांची यादी तयार करा.

**करिथकरांस पहिले पत्र १२:२८ -** *तसे देवाने मंडळीत कित्येकांना नेमले आहे; प्रथम प्रेषित, दुसरे संदेष्टे, तिसरे शिक्षक, शिवाय अद्भुत कृत्ये करणारे, निरोगी करण्याची कृपादाने, विचारपूस करणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्न भिन्न भाषा बोलणारे असे नेमले आहेत.*

६. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४:२६. जेव्हा देवाचे लोक मंडळीत एकत्र जमतात, तेथे दाने मुक्तपणे प्रकट होताना दिसतात. त्यांच्या एकत्रित संगतीत प्रकट झालेली पाच गोष्टींची नावे लिहा.

**करिथकरांस पहिले पत्र १४:२६ -** *बंधुजनहो तर मग काय? तुम्ही उपासनेसाठी एकत्र जमता तेव्हा तुमच्या पैकी प्रत्येक जण, कोणी स्तोत्र गाण्यास ,कोणी शिक्षण देण्यास, कोणी प्रकटीकरण सांगण्यास, कोणी भाषेतून बोलण्यास तर कोणी तिचा अर्थ सांगण्यास तयार असतो; सर्व काही उन्नतीसाठी असावे.*

७. वाचा प्रेषितांची कृत्ये ६:१. सुरुवाती नवीन नियमाची मंडळी रोजचे भोजन ________________________ वाटत असत.

**प्रेषितांची कृत्ये ६:१ -** *त्या दिवसात शिष्यांची संख्या वाढत चालली असता हेल्लेणी यहूद्यांची इब्री लोकांविरुद्ध कुरकुर सुरु झाली; कारण रोजच्या वाटणीत त्यांच्या विधवांची उपेक्षा होत असे.*

८. वाचा याकोबाचे पत्र १:२७. देवाच्या दृष्टिने फक्त एकच धर्माचरण आहे ते म्हणजे ______________________

**याकोबाचे पत्र १:२७ -** *देवपित्याच्या दृष्टिने शुद्ध व निर्मळ धर्माचरण म्हणजे अनाथाचा व विधवांचा त्यांच्या संकटात समाचार घेणे; व स्वतःला जगापासून निष्कलंक ठेवणे हे आहे.*

९. वाचा तीमथ्याला पहिले पत्र ५:९-११. सुरुवातीच्या नव्या नियमांच्या मंडळीकडून मदत मिळविण्यासाठी विधवांकडे कोणत्या प्रकारची पात्रता असायला हवी होती?

**तीमथ्याला पहिले पत्र ५:९-११ -** *जी साठ वर्षाच्या आत नसून एकाच पतीची स्त्री झाली असेल. ( १०) जी चांगल्या कृत्यांसाठी नावाजलेली असेल म्हणजे जिने मुलाबाळांचा प्रतिपाळ केला असेल, पाहुणचार केला असेल, पवित्र जनांचे पाय धुतले असतील, सकटात पडलेल्या लोकांची गरज भागवली असेल. सर्व प्रकारच्या चांगल्या कृत्यांस अनुसरली असेल, अशी नावाजलेली विधवा यादीत नोंदण्यात यावी. (११) परतु नवीन विधवांस नोंदू नये. जेव्हा त्या कामुक होऊन खिस्ताला सोडतात तेव्हा त्या लग्न करावयास पाहतात.*

१०. वाचा करिथकरांस पहिले ९:१४. मंडळी अनाथ, विधवा, आणि गरीबांच्या बरोबर हयांनाही मदत करीत असत.

**करिथकरांस पहिले ९:१४ -** *त्याप्रमाणे प्रभूने नेमले आहे की, जे सुर्वाता सांगतात त्यांनी सुवार्तेवर आपली उपजीविका करावी.*

११. वाचा मत्तय २५:३५-४०. देवाला दान देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे दानपेटी असा विचार लोक का करतात?

**मत्तय २५:३५-४० -** *कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खावयास दिलें, तान्हेला होतो तेव्हा मला प्यावयास दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, (३६) उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आला, बंदिशाळेत होतो तेव्ही तुम्ही माझ्याकडे आला. (३७) त्यावेळेस नीतिमान उत्तर देतील की, प्रभुजी, आम्ही तुम्हांला केव्हा भुकेले पाहून खावयास दिले? केव्हा तान्हेला पाहून प्यावयास दिले? (३८) तुम्हांला परके पाहून केव्हा घरांत घेतले? उघडे पाहून वस्त्र दिले? (३९) आणि तुम्हांला आजारी अथवा बंदिशाळेत पाहून केव्हा आम्ही तुमच्याकडे आलो? (४०) तेव्हा राजा त्यांस उत्तरे देईल, मी तुम्हांस खचित सांगतो की, ज्याअर्थी तुम्ही हया माझ्या कनिष्ठ बंधूपैकी एकाला केले, त्याअर्थी ते मला केले आहे.*

१२. वाचा प्रेषितांची कृत्ये ४:३२-३५ आणि नीतिसूत्रे ३:९-१०. सुरुवातीच्या नव्या नियमांच्या मंडळीचे वडीलजण आणि प्रेषित पैसा कश्या त-हेने वापरत?

**प्रेषितांची कृत्ये ४:३२-३५ -** *तेव्हा विश्वास धरणाऱ्यांचा समुदाय एकदिलाचा व एकजिवाचा होता. कोणीहि आपल्या मालमत्तेतील काहीही स्वतःचे आहे असे म्हणत नसे, तर त्याचे सर्व काही समाईक होते. (३३ ) प्रेषित मोठया सामर्थ्याने प्रभु येशूच्या पुनरुत्थानाविषयी साक्ष देत होती. (३४) त्यांच्यातील कोणालाहि उणे नव्हते, कारण जमिनीचे किंवा घरांचे जितके मालक होते तितके ती विकीत आणि विकलेत्या वस्तूंचे मोल आणून (३५) प्रेषितांच्या चरणापाशी ठेवीत; मग ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणे प्रत्येकाला वाटून देण्यात येत असे.*

**नीतिसूत्रे ३:९-१० -** *तू आपल्या द्रव्याने व आपल्या सर्व उत्पन्नाच्या प्रथम फळाने परमेश्वराचा सन्मान कर (१०) म्हणजे तुझी कोठारे समृद्धीने भरतील, तुझी कुंडे नव्या द्राक्षरसाने भरुन वाहतील.*

# उत्तरावली

१. वाचा इब्रीकरांस पत्र १०:२५. आपल्याला काय सोडायचे नाही?

***आपली विश्वासणाऱ्या बरोबर असणारी संगती***

२. वाचा प्रेषितांची कृत्ये ५:४२. दररोज मंदिरात आणि घरोघरी येशु बद्धल

***शिकविले व सुर्वाता गाजविली***

३. वाचा प्रेषितांची कृत्ये २:४२. सुरुवातीच्या मंडळया कोणती चार कार्ये नियमित पणे करायची?

***प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासांत, भाकर मोडण्यांत (एकत्र जेवण्यात आणी प्रभु भोज घेण्यात )व तत्परतेने प्रार्थना करण्यांत***

४. वाचा प्रेषितांची कृत्ये २:४४-४५. सत्य की असत्य: सुरुवातीची गंडळी चर्चच्या इमारतीत गाडया पार्क करण्यासाठी जागा बांधावयास भरपूर पैसा देत.

***असत्य***

५. वाचा करिथकरांस पहिले पत्र १२:२८. देवाने त्याच्या मंडळीला प्रदान केलेल्या आठ दानांची यादी तयार करा.

***प्रेषित, संदेष्टे, शिक्षक, अद्भुत कृत्ये करणारे, निरोगी करण्याची कृपादाने असणारे, विचारपूस करणारे, व्यवस्था पाहणारे, भिन्न भिन्न भाषा बोलणारे***

६. वाचा करिथकरांस पहिले पत्र १४:२६. जेव्हा देवाचे लोक मंडळीत एकत्र जमतात, तेथे मुक्तपणे दाने प्रकट होताना दिसतात. त्यांच्या एकत्रित संगतीत प्रकट झालेली पाच गोष्टींची नावे लिहा.

***कोणी स्तोत्र गाण्यास, कोणी शिक्षण देण्यास, कोणी प्रकटीकरण सांगण्यास, कोणी भाषेतून बोलण्यास, तर कोणी तिचा अर्थ सांगण्यास तयार असतो .***

७. वाचा प्रेषितांची कृत्ये ६:१. सुरुवाती नवीन नियमाची मंडळी रोजचे भोजन

***विधवांबरोबर वाटत असत.***

८. वाचा याकोबाचे पत्र १:२७. देवाच्या दृष्टिने फक्त एकच धर्माचरण आहे ते म्हणजे ______________________

***संकटात असलेल्या अनाथांचा व विधवांचा समाचार घेणे***

९. वाचा तीमथ्याला पहिले पत्र ५ ९-११. सुरुवातीच्या नव्या नियमांच्या मंडळीकडून मदत मिळविण्यासाठी विधवांकडे कोणत्या प्रकारची पात्रता असायला हवी होती?

***"जी साठ वर्षाच्या आत नसून एकाच पतीची स्त्री झाली असेल, जी चांगल्या कृत्यांसाठी नावाजलेली असेल म्हणजे जिने मुलांबाळांचा प्रतिपाळ केला असेल, पाहुणचार केला असेल, पवित्र जनांचे पाय धुतले असतील, सकटात पडलेल्या लोकांची गरज भागवली असेल. सर्व प्रकारच्या चांगल्या कृत्यांस अनुसरली असेल, अशी नावाजलेली विधवा यादीत नोंदण्यात यावी. परतु नवीन विधवांस नोंदू नये. जेव्हा त्या कामुक होऊन खिस्ताला सोडतात तेव्हा त्या लग्न करावयास पाहतात. "***

१०. वाचा करिथकरांस पहिले ६:१४. मंडळी अनाथ, विधवा, आणि गरीबांच्या बरोबर हयांनाही मदत करीत असत

***देवाच्या वचनांची सर्वाता सांगणाऱ्यांची***

११. वाचा मत्तय २५:३५ ४०. देवाला दान देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे दानपेटी असा विचार लोक का करतात?

***कारण त्यांना त्याच प्रकारचे शिक्षण दिले जाते***

१२. वाचा प्रेषितांची कृत्ये ४:३२-३५ आणि नीतिसूत्रे ३:९-१०. सुरुवातीच्या नव्या नियमांच्या मंडळीचे वडीलजण आणि प्रेषित पैसा कश्या त-हेने वापरत?

***गरजवंतांना देत. दानाद्वारे प्रभूचे गौरव करीत***

# पाठ ५

# मुक्तता

### ***डॉन क्रो द्‌वारा लिखीत***

आज आपण अशुद्ध आत्म्याच्या सिद्धांताविषयी बोलणार आहोत. येशुने पृथ्वीवरील त्याचे सेवाकार्य दृष्टात्म्याला काढत, आजारांना बरे करत, मेलेल्यांना उठवत, आणि आश्चर्यकर्म करीत पूर्ण केले. त्याच्या सेवाकार्याचा जवळजवळ पाव हिस्सा त्याने लोकांच्यातील अशुद्ध आत्मे काढण्यात घालवला. पवित्र शास्त्र प्रेषितांची कृत्ये १०:३८ मध्ये सांगते, *"नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करीत फिरला; कारण देव त्याच्याबरोबर होता."* आणखीन योहानाचे पहिले पत्र ३:८ सांगते, "पाप करणारा सैतानाचा आहेकारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठींच देवाचा पुत्र प्रगट झाला." अशद्ध आत्म्याच्या सिद्धांतवादा बद्दल माझी वेगवेगळी मते होती - सैतान, दृष्टात्मे, अशुद्ध आत्मे, दुष्ट, असे कोणतेही नाव तुम्ही द्‌याल. - हे केवळ भारत किंवा तिसऱ्या जगातील देशात दिसून येतात; जेथे लोक खऱ्या आणि जिवंत देवाची उपासना न करता मूर्तींची करतात. पण मी हयाविषयी चुकत होतो.

डेलास, टेक्सास येथला काही वर्षापूर्वीचा माझा अनुभव तुम्हाला सांगतो. सगळी जण आराधनेत मग्न होती आणि अचानकच एक मुलगी जमिनीवर कोसळली. असे भासत होते की तिला आकडी आली असावी. तेथे डॉ.राइस होते ते चिकित्सक म्हणून काम करीत होते. मंडळीतील काही जणाची घरे चर्च पासून एक इमारत सोडूनच होती, मग डॉक्टरांनी तिचा इलाज करण्यासाठी तेथे घेऊन जाण्यास

सांगितले. जेव्हा आम्ही तिला त्या घरात घेऊन आलो, तेव्ही ती मुलगी रानटी मांजरासारखी भासू लागली, तिचे डोळे गरगरा फिरायला लागले, आणि त्या कोवळ्या वयाच्या, १०० पौडापेक्षा कमी वजनाच्या मुलीच्या तोंडातून एक राकट,दांडग्या माणसाचा आवाज निघू लागला. अचानकपणे ती बोलण्याद्वारे माझ्यावर आक्रमण करु लागली, असे म्हणत की, “तू नरकात जाशील! "मी म्हणालो" नाही, मी नाही जाणार." मी पुरता घाबरलेलो कारण मी असे कधीच काही बघितले नव्हते. ते म्हणत होते, "होय, तू नरकातच जाशील." आणि मी म्हणत राहिलो "नाही, मी नाही जाणार." असे वाटत होते कोणीतरी माझ्यावर वर्चस्व करु पाहात होते, आणि काय करावे किंवा त्या मुलीमध्ये असणाऱ्याला कसे हाताळू ते मला कळत नव्हते.

माझ्या बरोबरचा एक मित्र इतका घाबरला की त्याने पळ काढला. मी तेथे एकटाच उरलो. मी विचार केला, *मी हया नैसर्गिक स्थितीत काय करु शकतो?* त्या मुलीत तर अनैसर्गिक ताकत आहे आणि मग ती जर्मन भाषेसारखी भाषा बोलू लागली जी ती कधीच शिकली नव्हती - तिच्याद्वारे सगळेच सैतानाचे पाशवी प्रदर्शन होत होते. तिला दृष्टत्म्याने झपाटले होते, अशात काय करायच हे मला ठाऊक नसले तरीही माझी नेहमीच अशी श्रद्धा होती की पवित्र शास्त्रात सामर्थ्य आहे. हे लहान असताना बघितलेल्या भीतिदायक ड्रैकुला सिनेमा सारखे वाटले. वैम्पायर माणसाच्या दिशेने येत आहे, आणि अचानक त्या माणसाने ड्रैकुलाच्या समोर क्रॉस दाखवला आणि ड्रैकुलाचा "मेलो मेलो!" म्हणत थरकाप उडाला. मी पवित्र शास्त्राचा अश्या प्रकारे विचार करतो. मला माहित होते की यात सामर्थ्य आहे, परनु पवित्र शास्त्राचे हे सामर्थ्य कश्या त-हेने उपयोगात आणायचे हे मला ठाऊक नव्हते. परमेश्वराच्या कृपेने मदत केली, कारण मी आयुष्यात कधीही असे काही अनुभवले नव्हते. मी माझे पवित्र शास्त्र उघडले आणि नकळतच फिलिपैकरांस पत्र समोर उघडले गेले. मी अध्याय २ आणि वचने ८-११ वाचू लागलो: *“आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण, आणि तेहि वधस्तंभावरचे मरण सोसले, येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वतःला लीन केले. हयामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ ते त्याला दिले; हयात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा,*

*आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभु आहे असे कबूल करावे."*

दृष्टात्मा म्हणाला, "हे म्हणू नकोस! मला हे शब्द ऐकवत नाहीत! नको म्हणूस हे शब्द!" मी म्हणालो काय ही प्रतिक्रिया! तर मी म्हणालो, "येशूच्या नावाने प्रत्येक गुडघा टेकला जाईल - स्वर्गात, पृथ्वीवर, आणि पृथ्वीखाली." हे म्हणू नकोस! मी हे शब्द ऐकू शकत नाही, नको म्हणूस!" ती किंचाळली. मी विचार केला, *हया मुलीतला दृष्टात्मा पिसाळला आहे, आणि मी तर देवाचे वचन वाचत आहे! आणि मी परत वाचायला सुरुवात केली, आणि मनुष्य प्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण, आणि तेहि वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वतःला लीन केले. हयामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ ते त्याला दिले; हयात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा, आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभु आहे असे कबूल करावे."* परत तशीच प्रतिक्रिया आली;" हे म्हणू नकोस! मी हे शब्द ऐकू शकत नाही! "दृष्टात्माने मुलीचे कान पिळवटले आणि ती म्हणाली." हे म्हणू नकोस! मी हे शब्द ऐकू शकत नाही!, म्हणू नकोस! "दृष्टात्माने मुलीला माझ्या समोर खाली आपटले, आणि ती येशूच्या नावापुढे गुडघे टेकू लागली. आणि मी म्हणालो, येशूच्या नावाने स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा टेकला जाईल."

काही क्षणापूर्वीच सैतानाचे माझ्यावर वर्चस्व आणि जोर होता. मला वाटत होते तो मला मारेल, झोडून काढेल, मला तेथून फेकून देईल - मला ठाऊक नव्हते! मला फक्त एवढेच ठाऊक होते की पवित्र शास्त्रात सामर्थ्य आहे, आणि मी ते उघडून वाचू लागलो. पवित्र शास्त्र इफिसकरांस पत्र ६:१७ मध्ये सांगते, *"आत्म्याची तरवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या."* हे पहा हे आहे तरवारी समान चढाई करावयाचे शस्त्र जे शत्रूचे तुकडे करते आणि शत्रूला मरणाधीन करते. ही आहे आत्म्याची तरवार, परमेश्वराचे वचन. तुम्हाला आठवतेय का जेव्हा येशूची परीक्षा झाली? सैतान त्याच्याकडे आला आणि म्हणाला, "जर तु पाया पडुन मला नमन करशील तर हे सारे तुला देईन, तेव्हा येशू त्याला म्हणाला, *अरे सैताना, चालता हो, कारण असा शास्त्रलेख*

*आहे की, 'परमेश्वर तुझा देव हयाला नमन कर,* व त्याचीच उपासना कर.' (मत्तय ४:१०) *मग सैतानाने त्याला परिक्षेत पाडले, आणि पुन्हा परिक्षेत पाडले आणि येशू म्हणाला, "अरे सैताना असे लिहिले आहे की ... असा शास्त्रलेख आहे,"* मग त्याने देवाचे वचन ऐकवले. त्याने आत्म्याची तरवार वापरली, आणि पवित्र शास्त्र म्हणते सैतान काही काळापर्यंत त्याला सोडून गेला.

शत्रुला पराभूत करण्याचे एकच शस्त्र म्हणजे आत्म्याची तरवार, जे आहे परमेश्वराचे वचन. मी त्यातून काय शिकलो ते तुला माहीत आहे का? मी हे शिकलो: प्रत्येक वेळी जेव्हा मी देवाच्या वचनांचे अध्ययन करावयास पाहतो, तेव्हा मी असा विचार करतो की मी किती भूकेला आहे आणि मला काहीतरी खावयास हवे आहे, किंवा मग त्या दिवशी न केलेल्या गोष्टींना आठवतो. मला माहित आहे की अनुयायीत्व वर्गातील सर्वाकडे येथे न असण्याचा बहाणाही असेल. शेवटी मी असे का हयाचा छडा लावला. पवित्र शास्त्रात असे काही आहे जे आपण जाणून घ्यावे अशी परमेश्वरीय इच्छा आहे आणि सैतानाची ही मनसा आहे की ते आपणास कळूच नये. मग जेव्हा प्रत्येक वेळेला तुम्ही देवाच्या वचनांचे अध्ययन करावयास सरसावता किंवा अनुयायीत्व वर्गात येण्यास, तेव्हा देवाच्या वचनांत असे काही आहे ते आपण कळून घ्यावे हे शत्रुला मान्य नाही - त्याला तुम्हाला कळू दयायचे नाही की हया वचनांमध्ये येशू आहे.

अधंकाराचेही राज्य आहे, आणि परमेश्वराच्या प्रिय पुत्राचेही राज्य आहे. कलस्सैकरांस पत्र १:१३, मध्ये *“त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून ठेवले."* तुम्ही कोणत्या राज्यात आहात? एक राज्य ज्यात कोणीतरी शासन आणि हुकुमत चालवतो. येशू ख्रिस्त राजा आहे. काय तुम्ही त्याला तुमचे जीवन दिले? काय आज तुम्ही त्याला अनुसरता, किंवा मग अन्य गोष्टींना तुम्ही तुमच्या जीवनात प्राधान्य देता? येशू लूका ६:४६ मध्ये म्हणाला: *“तुम्ही मला प्रभू, प्रभू म्हणता, पण मी जे सांगतों तें कां करीत नाही?"* त्याची इच्छा आहे की तो आपल्या आयुष्यात अग्रक्रमी असावा, नंबर एक वर. अंधकाराचे राज्य त्याला अग्रक्रमी होण्यापासून दूर ठेवते, तुमच्या जीवनात शासन करण्याच्या स्थानापासून. हयाचे कारण की शत्रुला हवे आहे की तो आपल्या आयुष्यात प्रथम स्थाना

पर्यत पोहोचावा. आजच पूर्ण हृदयाने येशूकडे वळा, आणि ओळखा आपला एक शत्रु आहे. त्याचे नाव सैतान आहे आणि त्याच्याकडे सैतानी ताकद आहे, परंतु पवित्र शास्त्र सांगते की त्याच्यावर आपला अधिकार चालतो.

येशू मत्तय १०:८ मध्ये म्हणाला *“रोग्यांस बरे करा, मेलेल्यांस उठवा, कुष्ठयांस शुद्ध करा, भुतें काढा, तुम्हांला फुकट मिळाले, फुकट द्या.”* देवाच्या राज्याचा प्रचार करा, आणि जसे तुम्ही हे कराल तुम्हाला शत्रुवर अधिकार आहे. येथून पुढे देवाने जे तुमच्या जीवना साठी ठेवले आहे त्यावर शत्रुला भाष्य करु देऊ नका. येशूला तुमच्या जीवनाचा राजा बनवून अग्रस्थानी विराजमान करा. आपल्याला हयाचा कधीही पश्चाताप होणार नाही.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा इफिसकरांस पत्र ६:१२. सैतानी क्षेत्रात आपल्या चाललेल्या आत्मिक संघर्षाला हे वचन कश्यात-हेने वर्णित करते?

**इफिसकरांस पत्र ६:१२ -** *कारण आपले झगडण रक्तमांसाबरोबर नव्हे, तर रक्तमांसाबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर, आकाशातल्या दुरात्म्याबरोबर आहे.*

२. वाचा मार्क १६:१७. विश्वासणाऱ्यांच्या अधिकाराबद्दल हे वचन आपणास काय सांगते?

**मार्क १६:१७ -** *आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील नव्या नव्या भाषा बोलतील.*

३. वाचा याकोबाचें पत्र ४:७. सैतानापासून मुक्त होण्यासाठी मनुष्याने काय करणे आवश्यक आहे?

**याकोबाचें पत्र ४:७ -** *म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुम्हांपासून पळून जाईल.*

४. वाचा याकोबाचे पत्र १-१४. वाईट गोष्टी योग्य बनवत सैतान आपल्याला कश्यात-हेने भुलवतो? याकोबाचे पत्र १-१४ - तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलविला जातो तेव्हा मोहात पडतो.

५. वाचा रोमकरांस पत्र ६:१३. जर मनुष्याने आपले जीवन ख्रिस्ताच्या गोष्टींनी भरले, अश्याने सैतान अस्वस्थ होतो आणि स्वःतहूनच त्याला सोडून जातो. हे वचन आपल्याला काय सांगते?

**रोमकरांस पत्र ६:१३ -** *आणि तुम्ही आपले अवयव अनीतीची साधने होण्याकरिता पापाला समर्पण करीत राहू नका; तर मेलेल्यातून जिवंत झालेले असे स्वतःस देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतीची साधने होण्याकरिता देवाला समर्पण करा.*

६. वाचा रोमकरांस पत्र १३:१४. सैतान देहाच्या कामामुळे पोसला जाता, तेव्हा त्याला देवाच्या प्रितीच्या आणि शुद्धतेच्या मार्गाने चालून त्याला उपाशी ठेवा. आपल्याला देहवासना ________________ करायच्या नाहीत.

**रोमकरांस पत्र १३:१४ -** *तर तुम्ही प्रभु येशू ख्रिस्ताला परिधान करा, आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करु नका.*

७. वाचा लूक १०:१७-१९. येशूने कधिही अशुद्ध आत्म्यांना काढण्यासाठी प्रार्थना करावयास सांगितलेली नाही. त्याने आपल्याला त्यांच्यावर अधिकार दिला आहे. हे वचन आपल्याला सांगते आपल्याला ______________ सामर्थ्य व अधिकार दिला आहे.

**लूक १०:१७-१९ -** *नंतर ते बहात्तर जण आनंदाने परत येऊन म्हणाले, प्रभुजी, आपल्या नावाने भुतें देखील आम्हांला वश होतात. तेव्हा त्याने त्याला म्हटले, सैतान आकाशांतून विजेसारखा पडला हे मी पाहिले, पाहा, मी तुम्हांला साप आणि विंचू हयांना तुडविण्याचा व शत्रूच्या सर्व शक्तीवरचा अधिकार दिला आहे, तुम्हाला काहीएक बाधणार नाही.*

# उत्तरावली

१. वाचा इफिसकरांस पत्र ६:१२. सैतानी क्षेत्रात आपल्या चाललेल्या आत्मिक झगडयाला हे वचन कश्यात-हेने वर्णित करते?

***एखादया कुस्तीप्रमाणे***

२. वाचा मार्क १६:१७. विश्वासणाऱ्यांच्या अधिकाराबद्दल हे वचन आपणास काय सांगते?

***येशूच्या नावाने अशुद्ध आत्म्यांना घालविण्याचा अधिकार आपल्याला दिला आहे***

३. वाचा याकोबाचे पत्र ४:७. सैतानापासून मुक्त होण्यासाठी मनुष्याने काय करणे आवश्यक आहे?

***देवाच्या अधीन व्हा आणि सैतानाला अडवा***

४. वाचा याकोबाचे पत्र १-१४. वाईट गोष्टी योग्य बनवत सैतान आपल्याला कश्यात-हेने भुलवतो?

***तो आपल्याला वासनेत ओढतो (वाईट गोष्टी योग्य बनवत )***

५. वाचा रोमकरांस पत्र ६:१३. जर मानवाने आपले जीवन ख्रिस्ताच्या गोष्टींनी भरले, अश्याने सैतान अस्वस्थ होतो आणि स्वःतहूनच त्याला सोडून जातो द्द हे वचन आपल्याला काय सांगते?

***पापाला वश होऊ नका तर देवाला वश व्हा. आपल्या शरीराचे अवयव नीतीच्या कार्याची साधने बनवा***

६. वाचा रोमकरांस पत्र १३:१४. सैतान देहाच्या कामामुळे पोसला जातो, तेव्हा त्याला देवाच्या प्रितीच्या आणि शुद्धतेच्या मार्गाने चालून त्याला उपाशी ठेवा.

***आपल्याला देहवासना तृप्त करायच्या नाहीत.***

७. वाचा लूक १०:१७-१९. येशूने अशुद्ध आत्म्यांना काढण्यासाठी प्रार्थना करावयास सांगितलेली नाही . त्याने आपल्याला त्यांच्यावर अधिकार दिला आहे. हे वचन आपल्याला सांगते आपल्याला................ सामर्थ्य व अधिकार दिला आहे.

***शत्रूच्या सर्व सामर्थ्यावर***

# पाठ ६

# विश्वासणाऱ्यांचा अधिकार

## *अॅन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखीत*

विश्वासी होण्याच्या नाते देवाने आपल्याला अधिकार दिला आहे. हे संबोधित करण्यासाठी, आपल्याला केवळ आपल्या अधिकाराशी नाही तर सैतानाच्या अधिकाराकडे ही पहावयास हवे. त्याला प्रमाणाच्या बाहेर फुगविले गेले आहे. ख्रिस्ती लोकांना असा विश्वास ठेवण्यास भाग पाडले आहे की आपण अश्या कोण्यातरी सजीवासोबत युद्ध करत आहोत; ज्याचे सामर्थ्य आपल्यापेक्षा अधिक आहे, आणि आपण त्याच्या समोर तग धरु शकत नाही. असे काही वचन आपल्याला सांगत नाही. ते इफिसकरांस पत्र ६:१२ मध्ये सांगते, *"कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्याबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतीबरोबर, आकाशातल्या दुरात्म्याबरोबर आहे." मग सैतान एक घटक आहे.* तो अस्तित्वात आहे. त्याच्याकडे अधिपतींच्या आणि शक्तीच्या पदक्रम आहेत अशाच्या सामोरी आपल्याला जायचे आहे, परंतु हया वचनाच्या अगोदरचे वचन म्हणते की आपल्याला सैतानाच्या कपटाचा - फसवणूकीचा सामना करायचा आहे. आपल्या विरुद्ध सैतानाकडे एकच शक्ती आहे ती म्हणजे धोखेबाजी. आपल्यावर वर्चस्व करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे नाही.

उत्पत्ति ३ मध्ये आपण पाहतो की जेव्हा आदाम व हव्वा यांच्या विरोधात प्रथम प्रलोभन आले, तेव्हा सैतान अगडबंब प्राण्याचे वाहान किंवा एखादया हत्तीवरुन येत आदामाच्या डोक्यावर पाय ठेवत त्यांना धमकावत असे बोलला नाही की, "माझी पूजा कर नाहीतर...," त्याने सर्पाला हाताशी धरले. परमेश्वर निर्मित सजीवातील सगळयात धूर्त

प्राणी. “धूर्त" हया शब्दाचा अर्थ "कपटी, फसवणारा किंवा कावेबाज.” सैतानाचे कोणाच्यातरी सहाय्याने येण्याचे कारण की आदाम व हब्वेकडून जबरदस्तीने काहीही करवून घेण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे नव्हते. तो केवळ धोखेबाजी करु शकत होता. तो देवाच्या स्वभाव व चरित्राच्या विरोधात आला आणि असे म्हणत त्याची निंदा करु लागला की, "देव तुमच्यावर खरेखुरे प्रेम करत नाही - तो तुमच्यापासून लपवून ठेवत आहे." त्याने फसवणुक करुन परमेश्वरा विरुद्ध आदाम व हवेला मोहात अडकविले. हे असे होते की त्यांच्याकडे सगळा अधिकार होता, आणि हयाच कारणामुळे सैतानाला असे करावे लागले कारण परमेश्वरा विरुद्ध त्याच्याकडे कोणतेच सामर्थ्य नव्हते.

कितीतरी सांगण्यासारखे आहे पण आणखी खोलात जाण्यासाठी माझ्याकडे वेळ नाही, पण विश्वासणाऱ्यांच्या अधिकाराविषयीचे महत्वाचे मुद्दे मला मांडायचे आहे. तुम्हाला हे जाणून घ्यायचे आहे की सैतानाजवळ शून्य सामर्थ्य आहे आणि त्याला तुमच्यावर शून्य अधिकार आहे. तो पराभूत झालेला शत्रु आहे. त्याच्याकडे तुमच्या विरोधात एवढेच सामर्थ्य आहे की खोटेपणाने आणि फसवणुकीने तुमच्या विरोधात येणे. जर तुमचे जीवन उध्वस्त झालेले असेल तर तुम्ही म्हणाल "सैतानाने हया गोळया माझ्यावर फेकल्या." पण तुम्हीच त्याला ही शस्त्रे पुरवलीत ना. त्याच्या खोटेपणाला आणि फसवणुकीला तुम्हालाच प्रतिसाद दयायचा आहे. जर तुम्ही सैतानापुढे झुकला नसता तर त्याला तुमच्या विरोधात येण्याचा रस्ता किंवा शक्तीच मिळाली नसती. करिंथकरांस दुसरें पत्र १०:३-५ सांगते, *"कारण आम्ही देहात चालणारे असूनही आम्ही देहस्वभाप्रमाणे युद्ध करीत नसतो. कारण आमच्या युद्धाची शस्त्रे दैहिक नाहीत, तर तटबंदी जमीनदोस्त करण्यास ती देवाच्या दृष्टिने समर्थ आहेत. तकवितर्क व देवविषयक ज्ञानाविरुद्ध उंच उभारलेले असे सर्व काही पाडून टाकून आम्ही प्रत्येक कल्पना अंकित करुन तिला खिस्तापुढे मान वाकविण्यास लावतो."* ही वचने तुमच्या युद्धाच्या शस्त्रांविषयी सांगतात, आणि येथे सांगण्यात आलेले प्रत्येक शस्त्र तुमच्या विचाराना हाताळन, मनाच्या सर्दभात भाष्य करते, तुम्हाला तुमच्या विचारांसंबधी भुलविण्याचे सोडता सैतानाकडे तुम्हाला काहीही करण्याचे सामर्थ्य नाही.

मला पटकन काही गोष्टींची उजळणी करायची आहे. प्रारंभी अर्थातच देवच सर्वाधिकारी होता. सर्व अधिकार व सामर्थ्य त्याच्यामधूनच निघाले कारण तोच होता ज्याच्या आत सामर्थ्य होते. सर्व काही त्याने नियुक्त केले होते. जेव्हा त्याने आकाश व पृथ्वाची निर्मिती केली, तेव्हा त्याच्या कडे सर्व सामर्थ्य व अधिकार होता. मग उत्पत्ति १:२६ मध्ये, जेव्हा त्याने आदाम व हवेची निर्मिती केली तेव्हा तो म्हणाला, *"मग देव बोलला, आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण निर्माण करु; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशु, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी यावर ते सत्ता चालवितील."* हे स्तोत्रसंहिता ११५:१६ शी जोडून पाहिले असता ते असे सांगते की, *"स्वर्ग तर परमेश्वराचा आहे. पण पृथ्वी त्याने मानवजातीला दिली आहे."* निर्माणकर्ताच्या अधिकाराने परमेश्वराला सर्वाधिकार आहे, पण त्याने पृथ्वीवरील सत्ता, किंवा अधिकार शारीरिक मानवाला देऊ केली. सैतानाला कधीही पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार व सामर्थ्य नव्हत. त्याने तो मनुष्याला भुलवून त्यांच्याकडून घेतला. परमेश्वराने तो अधिकार मानवजातीला दिला होता, जेव्हा मानवाचे पतन झाले, त्याने परमेश्वराने देऊ केलेला अधिकार व सामर्थ्य सैतानाच्या हाती सोपविले. सैतानाला देवाकडून मानवाला सतावण्याचे अथवा पृथ्वीवर राज्य करण्याचे सामर्थ्य कधीही मिळाले नव्हते.

वचन असे म्हणते की सैतान हया जगाचा अधिपती आहे हे हयामुळे नाही की देवाने त्याला हया विश्वाचा अधिपती बनविले आहे. देवाने कधीही मानवाच्या वर सैतानाला दर्जा दिलेला नाही. त्याने मानवाला पृथ्वीवरची सत्ता व अधिकार दिला. सैतानाकडून लोकांच्या पिळवणूकीचे, त्यांच्यावर अधिकार चालविण्याचे किंवा समस्येत टाकण्याचे एकमेव कारण म्हणजे मानवाला देवाने देऊ केलेला अधिकार मानवाने सैतानाला दिला. ही देवासमोर खरी समस्या उभी ठाकली. देव हा एक आत्मा आहे. त्याने देहधारी मानवास पृथ्वीवरील सर्व अधिकार देऊ केले. केवळ देहधारण केलेला मानवच आपल्या अधिपत्य व अधिकाराचा वापर करुन पृथ्वीला प्रभावित करु शकत होता. सैतानाला आपल्याकडे येवुन आणि आपण त्याला अधिकार देऊन टाकू असे करायचे होते. हयाच कारणामुळे त्याला शरीरात ठाण मांडायला आवडते. वचनामध्ये, अशुद्ध आत्म्यांना झपाटण्यासाठी शरीर हवे असते कारण सैतान मानवी शरीर हया माध्यमाचा वापर केल्याशिवाय कोणतेच कार्य

करु शकत नाही. कारण परमेश्वर आत्मा आहे आणि देहधारी मानवाला त्याने अधिकार देऊ केलेला आहे, हया अर्थाने तर त्याचे हात बांधलेले आहेत. असे नाही की परमेश्वराला काहीही अधिकार किंवा सामर्थ्य नाही पण कारण हे की त्याचा प्रामाणिकपणा त्याने देहधारी मानवाला अधिकार दिला, आणि त्याच्या स्वतःच्या वचनावर अटळ राहण्यासाठी तो ते परत घेत असे म्हणू शकत नाही की, "मला असे नको होते; वेळ निघून गेली, थांबा. आता सगळेच संपवून टाकू या." नाही, परमेश्वर आपल्या स्वतःच्या वचनांशी बद्ध आहे. संपूर्ण इतिहासात तो अश्या कोणाकडे पाहात होता की त्याला त्या माध्यमातून पुढे जाता येईल, पण समस्या ही होती की सगळी मानवजात भ्रष्ट होती आणि त्यांनी स्वतःला सैतानाच्या स्वाधीन केले होते. मग तो काय करणार होता?

सरतेशेवटी देव स्वतः पृथ्वीवर आला आणि मानव झाला. हे जर तुम्ही जाणून घेतले तर मोठे विलक्षण आहे कारण आता सैतान भयंकर अश्या संकटात होता. तो तर मानवजातीच्या सामर्थ्याचा उपयोग करत होता आणि देव थेटपणे हया सर्व संकटात मध्यस्थी करु शकत नव्हता, कारण मानवाने स्वइच्छेने, कायदयाने परमेश्वराने त्यांना देऊ केलेले अधिकार सैतानाला सोपविले होते. सैतानाने जे काही केले होते ते चुकीचे होते, परंतु मानवाने त्यांना देऊ केलेले अधिकार व सामर्थ्य त्याला बहाल केले होते. पण आता येथे परमेश्वर आला होता. आणि आता तो काही नुसताच आत्म्यात नव्हता पण तो तर आता देहधारी झालेला होता. हयामुळे सैतान मोठया पेचात सापडला, कारण देवाला आता केवळ स्वर्गातच अधिकार नव्हता, पण तो मानवही झाला होता त्याला पृथ्वीवरचा पण अधिकार होता. येशू योहान ५:२६-२७ मध्ये म्हणाला, *"कारण पित्याच्या ठायी जसे स्वतःचे जीवन असावे असे दिले आणि तो मनुष्याचा पुत्र आहे, हया कारणास्तव न्यायनिवाडा करण्याचा अधिकारहि त्यांला दिला."*

येशू आला आणि त्याने देवाने दिलेल्या अधिकाराचा वापर केला. सैतानाने त्याला मोहात फसविण्याचा प्रयत्न केला, आणि येशू कधीही त्याला शरण गेला नाही. सैतान त्याच्याबरोबर प्रत्येक युद्ध हरला. मग येशूने आमची पापे घेतली, आमच्यासाठी मरण पावला, नरकात गेला, आणि पुन्हा उठला, आणि मत्तय २८ : १८ म्हणते, *"तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलतांना म्हणाला, स्वर्गात व पृथ्वीवर सर्व अधिकार*

*मला दिलेला आहे."* त्याने देवाने मानवाला दिलेला अधिकार पुन्हा जिंकला, ज्याचा गैरवापर मानवाने केला होता, आणि मानव देहधारीत देवाकडे, येशूकडे आता स्वर्ग आणि पृथ्वीचे सर्व अधिकार होते. आता लागोलागचे वचन सांगते" आता तुम्ही जा आणि हया सगळया गोष्टी करा, “परिणामस्वरुपी तो सांगत आहे की," आता माझ्याकडे स्वर्ग आणि पृथ्वीचे सर्व अधिकार आहेत, आणि आता मी ते तुम्हाबरोबर वाटत आहे. “या वेळी मात्र देवाकडून पुन्हा प्राप्त झालेल्या अधिकारात एक निराळाच वेगळेपणा आहे. हा आहे सह अधिकार- आपल्या व प्रभू येशू ख्रिस्तामध्ये. आदाम आणि हव्वेप्रमाणे तो आता एकटयालाच मिळालेला नाही. नाहीतर ते अधिकार देऊन टाकतील, सैतानाला त्यांना छळण्यास अनुमती देतील, आणि मग आशाहीन होतील, पण आज आपला अधिकार येशू सोबत वाटलेला आहे. हे एखादया जॉईन्ट खातेधारकांसारखे आहे ज्यातून चेक किंवा पैसे वटविण्यासाठी दोघाचेही हस्ताक्षर असावे लागतात. आपला अधिकार येशू बरोबर वाटला गेला आहे, आणि त्याचा अधिकार मंडळी बरोबर वाटला गेला आहे.

जरी आपण चुकू, तरीही देव पुन्हा सैतानाला अधिकारचे हस्तातर करु देणार नाही. सैतान संपूर्णपणे सामर्थ्यहीन आहे. त्याला तुमच्या जीवनात काहीही करण्याची क्षमता नाही हया व्यतिरिक्त की ज्यात तो तुम्हाला भुलवु शकेल आणि ज्यात तुम्ही स्वइच्छेने त्याला शरण जाल. तुम्ही त्याला अधिकार सोपवून वैयक्तिक रीतीने त्यासाठी दुखे भोगाल, पण मानवाला देवाकडून मिळालेला अधिकार कधीही एकाधिकाराने सैतानाकडे परत जाणार नाही. आता हा आपल्यात व प्रभु येशू ख्रिस्ता मध्ये वाटला गेलेला आहे, आणि काहीही झाले तरीही तो हयाबाबत विश्वासयोग्य राहिलच. तुम्हाला ओळखण्याची गरज आहे की तुमच्याकडे सामर्थ्य व अधिकार आहे. सैतान तुमच्या विचारांशी युद्ध करतो आणि तुमचे हत्यार असे आहेत की तुम्ही विचाराना बंदी करु शकता. तुम्ही हे ओळखू शकता की सैतानाने तुम्हाला शारीरिकरित्या सतावणे चुकीचे आहे आणि त्यातून मुक्त होण्यासाठी वचन काय सांगते ते पाहा. योहान ८:३२ म्हणते, *"तुम्हाला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंध मुक्त करील."* तुमच्याकडे सामर्थ्य व अधिकार आहे. देवाने तुम्हाला देऊ केलेला, आणि केवळ एकच बाब तुम्हाला ती वापरण्यापासून दूर ठेवते ती म्हणजे तुम्ही तुमच्या विचारांना बंदिवान करीत नाही. तुम्ही ही आत्मिक हत्यारे मनाचे

नवीनीकरण करण्यासाठी आणि ही हत्यारे तुमच्याच जवळ आहेत हे ओळखीत त्यांना उपयोगात आणित नाहीत. हे जाणणे उत्साहवर्धक आहे की ते तुम्हीच आहात ज्यांच्याकडे अधिकार व सामर्थ्य आहे.

मी प्रार्थना करतो की तुम्ही हे घ्याल, ह्यावर मनन कराल, आणि परमेश्वर तुम्हाला प्रकाशन देईल की तुम्हीच ज्याला सैतान थरथर कापतो, कारण तुम्हालाच परमेश्वराने सामर्थ्य व अधिकार देऊ केलेले आहेत. जर तुम्ही सैतानाला अडवाल, तर तो तुमच्यासमोरुन पळून जाईल (याकोब ४:७).

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचन

१. वाचा उत्पत्ति ३:१. सैतानाचे अस्तित्व आहे, परंतु आपल्याला भुलविण्याच्या त्याच्या क्षमतेत त्याची खरी ताकत आहे. हवेला प्रश्नाच्या कात्रीत पकडण्यासाठी सर्पाने (सैतानाने ) कश्याप्रकारचे प्रयत्न केले?

**उत्पत्ति ३:१ -** *परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरांत सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, तुम्ही बागेतल्या कोणत्याहि झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हास सांगितले हे खरे काय?*

२. वाचा उत्पत्ति ३:१. तुमच्या मते सैतान कपटाचा उपयोग का करतो?

३. वाचा उत्पत्ति १:२६,२८. मनुष्याला त्याचा अधिकार कोणी दिला?

**उत्पत्ति १:२६ -** *मग देव बोलला, आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण निर्माण करु; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशु, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी यावर ते सत्ता चालवितील."*

**उत्पत्ति १:२८ -** *देवाने त्यास आशीर्वाद दिला; देव त्यांस म्हणाला फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेखाली आणा; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणी यावर सत्ता चालवा.*

४. वाचा स्तोत्रसंहिता ८:४-८. देवाने मनुष्याची निर्मिती कशी केली?

**स्तोत्रसंहिता ८:४-८ -** *मर्त्य मनुष्य तो काय की तू त्याची आठवण करावी? मानव तो काय की तू त्याची आठवण करावी? तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहे. त्याला गौरव व थोरवी हयांनी मुकुटमंडित केले आहे. तू त्याला आपल्या हातच्या कृत्यांवरचे प्रभुत्व दिले आहे, तू सर्वकाही त्याच्या पायाखाली ठेविले*

*आहे. शेरमेढरे, गुरेढोरे ही सारी, तसेच वनपशु आकाशातील पांखरे, समुद्रातील मासे व जलांत संचार करणारे सर्व प्राणी.*

५. वाचा करिथकरांस दुसरे पत्र ४:४. काय घडतयं असे वचन दर्शविते?

**करिथकरांस दुसरे पत्र ४:४ -** *त्याची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने हया युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या तेजाच्या सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये.*

६. वाचा मत्तय ४:८-९. काय ही वचने हया मुद्दाला बळ देतात का?

**मत्तय ४:८-९ -** *पुढे सैतानाने त्याला अतिशय उंच डोंगरावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये व त्यांचे वैभव आणि त्याला म्हटले, तू पाया पडून मला नमन करशील तर मी हे सगळे काही तुला देईन.*

७. वाचा मत्तय २८:१८. येशूच्या मृत्यूच्या आणि पुनरुत्थानाच्या पश्चात आता स्वर्ग आणि पृथ्वीवर कोणाचा अधिकार आहे?

**मत्तय २८:१८-१९ -** *तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्यापाशी बोलताना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे, तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा; त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या.*

८. मत्तय २८:१८-१९. हया वचनांप्रमाणे, अधिकार कोणाला देण्यात आला आहे?

९. वाचा इफिसकरांस पत्र १:१९ देवाचे अपार सामर्थ्य कोणासाठी आहे?

**इफिसकरांस पत्र १:१९ -** *आणि आपण जे विश्वास ठेवणारे त्या आपणांविषयीच्या त्याच्या सामर्थ्याचे अपार महत्व ते काय हे तुम्ही त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवरुन ओळखून घ्यावे.*

# उत्तरावली

१. वाचा उत्पत्ति ३:१. सैतानाचे अस्तित्व आहे, परंतु आपल्याला भुलविण्याच्या त्याच्या क्षमतेत त्याची खरी ताकत आहे. हवेला प्रश्नाच्या कात्रीत पकडण्यासाठी सर्पाने (सैतानाने) कश्याप्रकारचे प्रयत्न केले?

***परमेश्वराच्या वचनाने (काय परमेश्वर खरेच असेच बोलला?)***

२. वाचा उत्पत्ति ३:१. तुमच्या मते सैतान कपटाचा उपयोग का करतो?

***तो बळाचा वापर करुन त्यांना आज्ञाभंग करायला लावू शकत नव्हता. आपण अधिकार सोडावा हयासाठी त्यांना फसवायला हवे होते.***

३. वाचा उत्पत्ति १:२६,२८. मनुष्याला त्याचा अधिकार कोणी दिला?

***देवाने***

४. वाचा स्तोत्रसंहिता ८:४-८. देवाने मनुष्याची निर्मिती कशी केली?

***त्याच्या (देवाच्या) हस्ते निर्माण केलेल्या निर्मितीवर अधिकार गाजवण्याससाठी***

५. वाचा करिथकरांस दुसरे पत्र ४:४. काय घडतयं असे वचन दर्शविते?

***सैतानाने मानवाचा अधिकार घेतला आणि आणि तो हया जगाचा अधिपती झाला. (यंत्रणेचा किंवा युगाचा)***

६. वाचा मत्तय ४:८-९. काय ही वचने हया मुद्दाला बळ देतात का?

***होय***

७. वाचा मत्तय २८:१८. येशूच्या मृत्यूच्या आणि पुनरुत्थानाच्या पश्चात आता स्वर्ग आणि पृथ्वीवर कोणाचा अधिकार आहे?

***येशूचा***

८. वाचा मत्तय २८:१८-१९. हया वचनांप्रमाणे, अधिकार कोणाला देण्यात आला आहे?

***विश्वासणाऱ्यांना***

९. वाचा इफिसकरांस पत्र १:१९. देवाचे अपार सामर्थ्य कोणासाठी आहे?

***आम्हासाठी विश्वास ठेवणाऱ्यांना***

# पाठ ७

# भरपाई मध्ये आरोग्यदान सामावलेले आहे

## *अॅन्ड्रयू वोमॅक द्‌वारा लिखीत*

येशूने अगोदरच आमच्यासाठी आरोग्यदान विकत घेतले आहे. मार्क २ आणि लूक ५ मध्ये येशू ज्या घरात शिक्षण देत होता ते माणसांनी इतके गच्च भरलेले की लकवा मारलेल्या माणसाच्या मित्रांना छत उचकटून त्याला खाली सोडावे लागले आणि येशूने अद्भुत रित्या त्याला आरोग्यदान दिले. मत्तय ८:१४-१६ मध्ये त्याने लोकांना बरे केल्यानंतर, पवित्र शास्त्र सांगते, *"नंतर येशू पेत्राच्या घरी गेल्यावर त्याची सासू तापाने पडली आहे असे त्याने पाहिले. तेव्हा त्याने तिच्या हाताला स्पर्श केला व तिचा ताप निघाला; आणि ती उठून त्याची सेवा करु लागली. मग संध्याकाळ झाल्यावर लोकांनी पुष्कळ भूतग्रसस्तांना त्याच्याकडे आणिले तेव्हा त्याने शब्दानेच घालविली व सर्व दुखणाइतांना बरे केले."* मग वचन १७ असे होण्यामागचे कारण सांगते *"त्याने स्वतः आमचे विकार घेतले आणि आमचे रोग वाहिले, असे जे यशया संदेष्टयाच्या द्‌वारे सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले."* हया वेळी येशू बहुसंख्य लोकांना आरोग्य प्रदान करीत आहे आणि विशेष मागील संदर्भ देत यशया ५३:३-५ *"तुच्छ मानिलेला, मनुष्यांनी टाकिलेला, क्लेशानी व्यापिलेला व व्याधीशी परिचित असलेला ही येशू खिस्ताविषयची भविष्यवाणी आहे. असा हा पुरुष पाहून लोक तोंडे फिरवीत, व त्याला तुच्छ लेखीत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखरच आमचे व्याधि त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले, तरी त्यास ताडण केलेले, देवाने*

*त्यावर प्रहार केलेले, व त्याला पीडिलेले असे आम्ही त्याला लेखिले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधामुळे घायाळ झाला , आमच्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला; आम्हाला शांति देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस (मला) आरोग्य प्राप्त झाले."* अश्या त-हेचा उल्लेख करीत आहे.

ही सामर्थी वचने आहेत. काही लोक त्यांना घेतात आणि म्हणतात, "जरा थाबा, हे तर आत्मिक अर्थाने म्हटले गेले आहे." ज्या मंडळीत मी वाढलो ती शारिरीक आरोग्यलाभावर विश्वास ठेवत नव्हती. ते हे वचन घ्यायचे आणि त्याला आत्मिक स्तरावर बघायचे. असे म्हणत की आम्ही सगळेच भावनावेगाने घायाळ झालो होतो, आणि जेव्हा आम्ही आमचे जीवन प्रभूला समर्पित करतो, तेव्हा तो आम्हाला बरे करतो. पण आपण हया वचनांना आपल्या सुरुवातीच्या वचनांशी जोडले तर हया वचनाचे लागू होणे संपुष्टात येते. हे खरे आहे की येशू आम्हाला भावनिक आणि अन्य बाबींमध्येही आरोग्य देतो तथापि हे वचन शरीराने बरे होण्याविषयी सांगत आहे. आपण असे पाहू शकतो कारण मत्तय ८:१७, हे आरोग्यदान यशया द्वारे बोलल्या गेलेल्या भविष्यद्वाणीची पूर्तता व्हावी म्हणून झाले. आपण आताच वाचले, *"त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले."* हे वचन पूर्ण झाले त्याने आपली व्याधि घेतली आणि आमचे आजार वाहिले. हे शारिरीक आजार, दुखणे आणि वेदने संबंधात बोलत आहे. येशूने शारिरीक रित्या लोकांना निरोगी केले जेणेकडून त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले हया वचनाची पूर्तता व्हावी.

पेत्राचे पहिले पत्र २:२४, *"त्याने स्वतः तुमची आमची पापें स्वदेही वाहून खाबावर नेली, हयासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या माराने तुम्ही निरोगी झाला आहात."* हे भूतकाळात आहे. येशू आला आणि त्याने आपल्या शारिरीक व्याधींना बरे करण्याचा जो भाग होता तो त्याने केला. तो आपल्या पापांची क्षमा देखील करावयास आला हया मुद्दयाला मी कमी लेखीत नाही. हे महत्वाचेच आहे आणि पापांची क्षमा हे एका दरवाज्या समान, अन्य सगळयासाठीचे द्वार, पण तो केवळ आपल्या पापांची क्षमा व्हावी म्हणूनच आला नाही. तर तो आमच्या शरिराला आरोग्य देण्यासाठीही आला. नव्या करारात ग्रीक भाषेत "उद्धार" यासाठी सोझो

शष्द वापरण्यात आला, अनेक भिन्न गोष्टिंना लागू पडणारा अर्थाने वापरला जाणारा एक शब्द पण जर तुम्ही वर पहाल तर हया शब्दाचे भाषातर शारिरीक आरोग्य असे करण्यात आलेले आहे. (याकोब ५:१४-१५) दर्शवत, *"तुमच्यापैकी कोणी आजारी आहे काय? त्याने मंडळीतील वडिलांना बोलवावे व त्यांना त्याच्यासाठी प्रार्थना करण्यास सांगावे आणि प्रभूच्या नावाने त्याच्यावर तेल लावावे. विश्वासाने केलेली प्रार्थना आजारी मनुष्याला बरे करील आणि प्रभु त्याला उठवील, आणि त्याने पाप केली असली तर त्याला क्षमा होईल."* येथे ग्रीक भाषेत "बरे" यासाठी सोझो शष्द वापरण्यात आला आणि हे आजारी त्यांच्या शरीरात शारीरिकरित्या बरे होत असल्याबद्दल बोलत आहे. हाच शब्द नवीन करारात शेकडो वेळा पापांची क्षमा तसेच आजारापासून मुक्तता हया अर्थाने तो भाषातरित केला गेला आहे.

मत्तय १० मध्ये जेव्हा येशूने त्याच्या शिष्यांना पाठविले. तेव्हा त्यांना रोग्यांना निरोगी करायला कुष्ठरोगास शुद्ध करावयास, व अशुद्ध आत्मे काढावयास सांगितले. पापांच्या क्षमे इतकीच आरोग्यदानाच्या भागाचीही पूर्तता करण्यास येशू तुमच्या जीवनात आला.

अश्याच त-हेने असाही विचार कधी करु नये की प्रभु इच्छितो की तुम्ही पाप करावे जेणेकरुन पाप करण्याद्वारे तुम्हाला काहीतरी तुमच्या पापाद्वारे शिकायला मिळावे. तुम्ही दुखणाईत असावे अशी त्याची कधीच इच्छा नाही. तुमच्या जीवनात रोग लिहून ठेवले नाहीत. देव तुमच्या जीवनातील आजाराचा जनक नाही. काही वेळा लोक अश्या प्रकारे म्हणतात, "देवाकडुन, हा आजार माझ्यासाठी आर्शिवादित ठरला कारण तेणेकरुन मी प्रभुकडे वळलो." हे खरे आहे की कष्टाच्या समयी लोक प्रभूकडे वळतात, परंतु तो काहीतरी शिकविण्यासाठी तुमच्यावर आजार आणत नाही. तो असे कधीच करणार नाही की तुमच्यावरच तुमची पापे लादील. पापात राहून काहीतरी शिकण्यासारखे असे असू शकते का? जर तुम्ही व्यभिचारात आणि समलैंगिकतेत जीवन जगत असाल तर तुम्हाला काही रोग लागेल मग तुम्ही शिकाल का की तुमचे जगणे चुकीचे होते म्हणून? नक्कीच तुम्ही करु शकता, परंतु देवाने तुम्हाला अशी जीवनशैली जगायला लावली नाही. तो तुमच्या आयुष्यात कधीही पाप ठेवत नाही, यद्यपि तुम्ही पापा द्वारे ही शिकू शकता. तुम्ही तुमचे डोके भितीला आपटत म्हणू शकाल की हे करणे

बरोबर नाही, पण हे तर तुम्ही भितीला डोके न फोडता सुद्धा शिकू शकता. तुम्हाला ठोसे खातच सगळकाही शिकण्याची गरज नाही. देव कधीही तुमच्या आयुष्यात तुम्हाला नम्र करण्यासाठी आणि धडा शिकविण्यासाठी आजार घेऊन येत नाही. तुमच्या पापांची क्षमा व्हावी आणि तुमची आजारापासून मुक्तता व्हावी म्हणून येशू मरण पावला त्याने तुमचे रोग स्वतःच्या शरीरावर वाहीले आणि त्याला बसलेल्या फटक्यांनी तुम्हाला आरोग्य प्राप्त झाले.

परमेश्वरीय अदभुत दैवीय आरोग्य आपल्या सर्वांसाठी उपलब्ध आहे. आणि हा आहे भरपाईचा भाग ज्याला उत्पन्न करावयास येशू मरण पावला. जर तुम्हाला आरोग्य मिळाले नसेल तर, देव तुमच्यावर रागावलेला नाही. देवावर प्रेम करण्यासाठी तुम्हाला बरे होण्याची गरज नाही. तुम्ही पूर्ण मनाने त्याच्यावर प्रेम करु शकता, आरोग्यदानावर विश्वास न ठेवता, तरीसुद्धा स्वर्गात जाऊ शकता. वस्तुस्थिती असेल की तुम्ही लवकरच स्वर्गात जाणार कारण आरोग्यात कसे चालावे हे तुम्ही शिकला नाहीत. पण तुम्हाला हे ठाऊक आहे का की - ते तुमच्यासाठी उपलब्ध आहे. हयाच्या उत्पन्न करण्यासाठी तो मरण पावला. परमेश्वराची इच्छा आहे की तुम्ही स्वस्थ असावे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मत्तय ८:१६-१७. येशूने किती लोकांना बरे केले?

**मत्तय ८:१६-१७ -** *मग संध्याकाळ झाल्यावर लोकांनी पुष्कळ भूतग्रस्तांना त्याच्याकडे आणिले; तेव्हा त्याने भुते शब्दानेंच घालविली व सर्व दुखणाइतांना बरे केले.त्याने स्वतः आमचे विकार घेतले आणि आमचे रोग वाहिले, असे जे यशया संदेष्टयाच्या द्वारे सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.*

२. वाचा यशयाह ५३:३-५. ही वचने कोणत्या प्रकारच्या आरोग्याविषयी बोलत आहेत?

**यशयाह ५३:३-५ -** *तुच्छ मानिलेला, मनुष्यांनी टाकिलेला, क्लेशानी व्यापिलेला व व्याधीशी परिचित असलेला ही येशू खिस्ताविषयची भविष्यवाणी आहे.असा हा पुरुष पाहून लोक तोंडे फिरवीत, व त्याला तुच्छ ले खीत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखरच आमचे व्याधि त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले, तरी त्यास ताडण केलेले, देवाने त्यावर प्रहार केलेले, व त्याला पीडिलेले असे आम्ही त्याला लेखिले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधामुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मामुळे ठेचला गेला; आम्हाला शाति देणारी अशी शिक्षा त्यास झाली; त्यास बसलेल्या फटक्यांनी आम्हांस आरोग्य प्राप्त झाले."*

३. वाचा मत्तय ८:१७. आमच्या विकारांना व रोंगाचे काय झाले?

४. वाचा पेत्राचे पहिले पत्र २:२४. येशूने केलेल्या कोणत्या दोन गोष्टींविषयी हया वचनांत सांगितले आहे?

**पेत्राचे पहिले पत्र २:२४ -** *" त्याने स्वतः तुमची आमची पापें स्वदेही वाहून खाबावर नेली, हयासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या माराने तुम्ही निरोगी झाला आहात."*

५. वाचा याकोबाचे पत्र ५:१४-१५. वचन १५ मध्ये आलेला क्षमा हा शब्द ग्रीक भाषेतील सोझो हया शब्दासाठी लिहिलेला आहे. त्याचे भाषांतर, “मुक्त करणे, संरक्षण करणे, निरोगी करणे, संभाळून ठेवणे, सपूर्ण करणे.” हयाच शब्दाला पवित्र शास्त्र "उद्धार" म्हणून संबोधिते. हया वचनांनुसार आणि ग्रीक नुसार उद्धाराच्या व्याख्येत, काय समाविष्ट आहे?

**याकोबाचे पत्र ५:१४-१५ -** *तुम्हीपैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दु:खणाइतास वांचवील आणि प्रभु त्याला उठवील, आणि त्याने पापें केली असली तर त्याला क्षमा होईल.*

६. वाचा मत्तय १०:७ - जेव्हा येशूने शिष्यांना पाठविले तेव्हा त्याने त्यांना काय सांगितले?

**मत्तय १०:७-८ -** *जात असताना अशी धोषणा करीत जा की, स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. रोग्यांस बरे करा, मेलेल्यांस उठवा, कुष्ठयांस शुद्ध करा, भुते काढा, तुम्हाला फुकट मिळाले, फुकट द्या.*

७. वाचा मत्तय १०:८. येशने त्यांना काय करण्यास सांगितले?

८. वाचा मार्क १६:१५. येशूने त्याच्या शिष्यांना काय करण्यास सांगितले?

**मार्क १६:१५-१८ -** *.मग त्याने त्यांना सांगितले की सर्व जगांत जाऊन सुवार्तेची घोषणा करा. जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल ; जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल. आणि विश्वास धरण्याऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील: ते माझ्या नावाने भुते काढतील नव्यानव्या भाषा बोलतील, सर्प उचलतील, व कोणताहि प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही, त्यांनी दुखणाइतांवर हात ठेविले म्हणजे ते बरे होतील.*

९. वाचा मार्क १६:१६. जे सुवार्तेवर विश्वास ठेवतील ते काय करतील?

१०. वाचा मार्क १६:१७. विश्वासणाऱ्यांना बरोबर कोणती चिन्हे असत जातील?

११. वाचा मार्क १६:१८ विश्वासणाऱ्यांना बरोबर अन्य कोणती चिन्हे असत जातील?

# उत्तरावली

१. वाचा मत्तय ८:१६-१७. येशूने किती लोकांना बरे केले?

***जेवढे त्याच्या कडे आले त्या सर्वांना***

२. वाचा यशयाह ५३:३-५. ही वचने कोंठल्या प्रकारच्या आरोग्याविषयी बोलत आहेत?

***सर्व प्रकारचे आरोग्य त्यात (शारिरीक आरोग्य समाविष्ट आहे)***

३. वाचा मत्तय ८:१७. आमच्या विकारांना व रोंगाचे काय झाले?

***येशूने स्वदेही वाहिले***

४. वाचा पेत्राचे पहिले पत्र २:२४ येशूने केलेल्या कोणत्या दोन गोष्टींविषयी हया वचनांत सांगितले आहे?

***त्याने आपली पापें स्वदेही वाहिली आणि आमच्या आरोग्यासाठी फटके सहन केले***

५. वाचा याकोबाचे पत्र ५:१४-१५. वचन १५ मध्ये आलेला क्षमा हा शब्द ग्रीक भाषेतील सोझो हया शब्दासाठी लिहिलेला आहे. त्याचे भाषांतर, "मुक्त करणे, संरक्षण करणे, निरोगी करणे, संभाळून ठेवणे, सपूर्ण करणे." हयाच शब्दाला पवित्र शास्त्र “उद्धार" म्हणून संबोधिते. हया वचनांनुसार आणि ग्रीक नुसार उद्धाराच्या व्याख्येत, काय समाविष्ट आहे?

***निरोगी करणे***

६. वाचा मत्तय १०:७. जेव्हा येशूने शिष्यांना पाठविले तेव्हा त्याने त्यांना काय सांगितले?

***स्वर्गाचे राज्य आपल्या हाती आहे***

७. वाचा मत्तय १०:८. येशूने त्यांना काय करण्यास सांगितले?

***रोग्यास बरे करा, मेलेल्यांना उठवा, आणि भुते काढा***

८. वाचा मार्क १६:१५. येशूने त्याच्या शिष्यांना काय करण्यास सांगितले?

***सर्व जगांत जा आणि सर्वांना सुवार्तेची घोषणा करा***

९. वाचा मार्क १६:१६. जे सूतेवर विश्वास ठेवतील ते काय करतील?

***विश्वास ठेवतील आणि बाप्तिस्मा घेतील***

१०. वाचा मार्क १६:१७. विश्वासणाऱ्यांना बरोबर कोणती चिन्हे असत जातील?

***ते भुते काढतील,नव्यानव्या भाषा बोलतील***

११. वाचा मार्क १६:१८. विश्वासणाऱ्यांना बरोबर अन्य कोणती चिन्हे असत जातील?

***ते आजाऱ्यांवर हात ठेवतील आणि ते बरे होतील***

# पाठ ८

# आरोग्य प्राप्ती होण्यास आडकाठी

## *अॅन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखीत*

मागच्या पाठात मी हया वास्तविकतेवर बोललो की निरोगी व्हावे ही देवाची इच्छा आहे, आणि आरोग्य प्राप्त होणे हा भरपाईचाच भाग आहे. पुष्कळसे सांगता येईल, पण जरी तुम्ही ती स्विकारली असेल आणि वचनांत पाहिले असेल तरीही त्याबाबत खूपच प्रश्न उभे ठाकतात जसे, “जर आरोग्य देण्याची देवाची इच्छा आहे तर मग सगळेच बरे का नाही होत?" त्याला खूप कारणे आहेत, पण मला जेवढी ठाऊक आहेत तितकीच वरवरची मी तुम्हाला सांगतो. बरीच माहिती माझ्या जवळ आहे ती येथे तुम्हाला सांगता येणार नाही, पण बरे होणे ही देवाची इच्छा आहेच तर मग लोक बरे का होत नाहीत हया विषयाला मी हात घालीन. एक कारण आहे अज्ञानता. तुम्हाला ज्या विषयी माहिती नाही किंवा ज्याची समझच नाही ती गोष्ट आपण करु शकत नाही आणि माझ्या जिवनाविषयी म्हणाल हे खरोखरच असेच आहे.

दैवीय इच्छा आपोआप पूर्ण होईल असा प्रकारचा विश्वास ठेवण्यास मला तरबेज करण्यात आले होते आणि मला काही अधिकार व सामर्थ्य नाही असे बरेच काही. हयाच अज्ञानतेमुळे, पुष्कळश्या गोष्टी घडल्या. मी बारा वर्षाचा असताना माझे वडील वारले आणि माझ्या वयाच्या एकवीस वर्षापर्यंत माझ्या समोर आणखीन दोन तीन अन्य लोकही वारली. मी त्या सर्वांना आरोग्य मिळावे म्हणून प्रार्थना करत होतो, परंतु मी त्यांना निरोगी होताना पाहू शकत नव्हतो, हया कारणामुळे नाही की ही देवाची इच्छा नव्हती, पण केवळ माझ्या अज्ञानते मुळे. अज्ञानता हया कारणाने सगळे झाले, पण ही काही सबब

नव्हती. हे आहे गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणे: माणूस असा म्हणू शकतो की, "मी दहाव्या मजल्यावरुन पडल्याने मरेन हे मी ओळखलच नाही." आपल्या विरोधात कार्य करण्यासाठी त्या नियमाचा संपूर्ण प्रभाव जाणून घेण्याची तुम्हाला आवश्यकता नाही. लोक देवाच्या काही नियमाविषयी अज्ञान आहेत. त्यांना ही आरोग्याची यंत्रणा कशी चालते हे ठाऊकच नाही, तर मग अज्ञानता पुष्कळांना मृत्युमुखी पाडीत आहे.

आरोग्य बहाल न होण्याचे आणखीन एक कारण आहे पाप. असे म्हणताच लोकांना आवडत नाही, कारण असे म्हणण्याचा अर्थ असेल सगळेच आजार आपल्या काही पापांचे परिणाम होत, आणि हे सत्य नाही. मी असे काहीच म्हणत नाही. योहान ९ मध्ये एक अशी घटना आहे जेव्हा येशू मंदिरातून बाहेर येत होता, आणि शिष्य अश्या एका जन्मांध माणसाकडे बोट दाखवित होते. त्याचे शिष्य वचन २ मध्ये म्हणाले, *“तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले, गुरुजी, कोणाच्या पापामुळे हा असा आंधळा जन्माला आला? हयाच्या की हयाच्या आईबाबांच्या?"* दुसऱ्या शब्दात ते सरळसरळ त्याच्या आजार पणाला पापांशी जोडत होते, असे विचारत की हयाने पाप केले की हयाच्या आईवडीलांनी केले. ज्यामुळे हा आजार त्याला झाला. येशूचे उत्तर होते दोघांपैकी कोणीही नाही. तेव्हा त्याचे म्हणणे असे नव्हते की मुलाच्या आईवडीलांनी कधीच पाप केले नव्हते पण त्यांच्या पापांचा थेट संबंध त्याचा जन्माध होण्याशी नव्हता. असे विधान करणे असत्याचे आहे की सगळेच आजार पापांशी निगडीत असतात. परंतु असेही विधान करणे असत्याचे ठरेल की पाप हा एक कारणीभूत घटक नाही.

योहान ५ मध्ये एक घटना आहे जेव्हा येशू बेथशेमेच्या तळयाजवळ होता आणि त्याने एका माणसाला अदभूत रीत्या आरोग्य दान दिले. त्या ठिकाणी तर लोकसमूदाय जमला होता आणि केवळ एकच व्यक्ति बरा झाला. नंतर वचनात आपण बघतो की वचन १२ मध्ये जेव्हा यहूदांनी त्याला विचारले की तुला कोंणी बरे केले तर त्याला बरे करण्याऱ्याचे नावही माहित नव्हते, *"त्यांनी त्याला विचारले, आपली बाज उचलून चाल, असे त्याने तुला सांगितले, तो कोण माणूस आहे?* वचन १३-१४ मध्ये पुढे, *"तो कोण आहे हे त्या बऱ्या झालेल्या माणसाला ठाऊक नव्हते, कारण त्या ठिकाणी लोकसमुदाय असल्यामुळे येशू निसटून गेला होता. त्यानंतर तो मंदिरांत येशूला भेटला तेव्हा*

*तो त्याला म्हणाला, पाहा, तू बरा झाला आहेस; आतांपासून पाप करु नको; करशील तर तुझे पूर्वीपेक्षा अधिक वाईट होईल."* येशू येथे ताबडतोब बोलत आहे की पाप हे तुझ्यावर आलेल्या पंगुपणापेक्षा ही भयंकर अनर्थ आणेल. त्याने आजाराच्या परिणामाला पापाबरोबर जोडले. त्याने योहान ९ मध्ये असेही म्हटले की कोणाचाही पापांचा परीणाम म्हणून हा जन्मांध झालेला नाही.

काही वेळा घटना ओघानेच घडतात, पण अशीही वेळ येते जेव्हा आजार, रोगराई, किंवा समस्या थेट पापांचे परीणाम असतात. अश्या प्रकारच्या हया घटना आपल्या बरोबर देवच घडवून आणतो असे नाही. पाहा. जर माणूस समलैंगिकतेत जगत असेल तर, ते निर्सगाच्या विरुद्ध आहे. मानवी शरीराची रचनाच तश्या प्रकारची नाही. लैंगिक मार्गाने संक्रमण होणाऱ्या रोगांची लागण त्यामुळे होईल. परमेश्वर अश्या आजारांचा जनक नाही - हा केवळ नैसर्गिक कोप होय कारण अश्या प्रकारच्या जगण्यासाठी त्यांची स्थापना झालेली नाही. उदा: तुम्ही बाहेर जाऊन उलट-सुलट खाऊन आलात, तुमचे शरीर त्यावर प्रतिक्रिया करेल आणि हे काही देवाने तुमच्याबरोबर केलेले नाही. काही नैसर्गिक नियम आहेत, येथे नैसर्गिक घटक आहेत. म्हणजेच हे ही खरे आहे की पाप ही कारणीभूत आहेत ज्यामुळे लोक बरे होत नाहीत.

जर तुमच्या जिवनातील पाप तुम्हाला ठाऊक आहे आणि त्यापासून तुमची सुटका करुन घेण्यासाठी तुम्ही देवावर विसंबून आहात तर तुम्हाला ते पाप करणे बंद करावे लागेल, कारण त्याच्याद्वारे तुम्ही सरळसरळ सैतानाला तुमच्या जीवनात शिरकाव देत आहात. ज्यामुळे परमेश्वर जे तुमच्या जीवनात करत आहे ते तुमच्या पर्यंत पोहचण्यास अटकाव होत आहे. रोमकरांस पत्र ६:१६ म्हणते, *"आज्ञापालनाकरिता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करिता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहां ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम, किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहा, हे तुम्हांला ठाऊक नाही काय?"* हे हया अर्थाने म्हणत नाही की सैतान तुमचा मालक होईल म्हणजे तुम्ही तुमचा उद्धार हरवून बसाल आणि नरकात जाल, पण हे असे म्हणते की तुम्ही ख्रिस्ती असाल किंवा नसाल - जर तुम्ही पापात जगत असाल - तर तुम्ही सैतानाला तुमचे आयुष्य चालवायला सांगत

आहात. योहान १०:१० म्हणते चोर एकाच उद्देशाने येतो चोरी करायला, घात करायला व नाश करायला. तर तुमच्या जवळ येशू आहे जो तुम्हाला जीवन व आरोग्य देण्याचा प्रयत्न करतो; पण तुमच्या जवळ सैतानही आहे जो तुम्हाला आजार देण्याच्या प्रयत्नातही असतो. जर पापाद्वारे तुम्ही स्वतःला सैतानाच्या अधिन करुन टाकले तर, तुम्ही त्याला शक्तिशाली बनवत आहात आणि तुमच्या जीवनात त्याला संधी देत आहात. तुम्ही प्रार्थना करु शकता आणि तुमची निरोगी होण्याची इच्छा आहे हे ही गा-हाणे देवासमोर मांडू शकता, पण तुमचे वागणे सैतानाला आत प्रवेश देते आणि आजार आणते. तर मग जर आपण पापांत जगत असाल तर, तुम्हाला तसे वागणे बंद करावे लागेल.

मला हयात आणखी जोडू दया की तुम्ही इतके अंतर्मुख होऊन म्हणाल की "मी त्या लायकीचाच नाही." आणि मग अश्या स्थानीही याल जेथे तुम्ही विश्वासही ठेवाल की येशू तुम्हाला आरोग्य देऊ शकतो. पण तुमचा विश्वास असेल की तो करणार नाही कारण तुम्ही त्या लायकीचे नाही. आणि मग हे तर निश्चितपणे चुकीचेच आहे. कोणीही लायक आहेत म्हणून देवाकडून रोगमुक्त होणार नाही. आजपर्यंत देवाच्या कार्यासाठी कोणीही गुणवत्ता मिळवली नाही. तर मग देवाला तुमच्या जीवनात कार्य करण्यासाठी तुम्हाला त्याच्याबरोबर संलग्न राहून तुमची कर्तबगारी, तुमची पवित्रतेची गरज नाही. हे हयावर टिकले असल्याची आवश्यकता आहे की तुमच्यासाठी येशूने जे कार्य केले आहे आणि तुमचा त्यावरील विश्वास. असे करत असतानाच तुम्हाला तुमच्या वर्तनाकडे काना डोळा करीत आणि सैतानाला तुमच्या जीवनात शिरकाव देत तुमच्या जीवनात बाधा आणू देणार नाही. जर तुम्ही पश्चाताप कराल आणि जे काही तुम्ही करत असाल त्यापासून वळाल तर तुम्हाला दिसून येईल की तुमच्या जीवनात आरोग्यदान किती सुकर व सुलभ बनेल. आणि त्यामुळे तुम्ही तुमच्या जीवनात सैतानाला कोणतीच भेग देणार नाही.

अजूनही एक असा घटक जो आरोग्यदानाशी निगडीत आहे तो म्हणजे लोक दुसऱ्यांच्या नकारात्मतेचा आणि अविश्वासाचा प्रभाव किती जास्त असतो हयाविषयी विचार करत नाही. हयाचे दर्जेदार उदाहरण मार्क ६ मध्ये पहावयास मिळते. ज्यात येशू आपल्या स्वगावी आहे, आणि लोक त्याचा आदर करित नाहीत कारण ते तर त्याला लहान

मुलगा असल्यापासून ओळखत होते. ते त्याच्या आईवडीलं, बहीण आणि भाऊ हया सर्वांना ओळखित होते आणि दुसऱ्या लोकांप्रमाणे त्याला आदरही देत नसत. ते त्याच्या विरोधात येत असे म्हणत त्याची टिका करु लागले की, मार्क ६:४-६, *"तेव्हा येशू त्यांना म्हणाला ,संदेष्टयाचा सन्मान होत नाही असे नाही; मात्र त्याच्या देशांत, त्याच्या आप्तेष्टांत अथवा त्याच्या घरच्या मंडळीत त्याचा सन्मान होत नसतो. थोडयाशाच रोग्यांवर हात ठेवून त्याने त्यांस बरे केले, हयाशिवाय दुसरे कोणतेहि महत्कृत्य त्याला तेथे करता आले नाही. त्यांच्या अविश्वासामुळे त्याला आश्चर्य वाटले मग तो शिक्षण देत देत गांवोगांव फिरला."* हयाचा अर्थ असा होत नाही की येशू काहीच सामर्थी  कार्ये करु शकत नव्हता, पण त्याला करता आले नाहीत, येथे येशू, देवाचा पुत्र, जो मानवरुप धारण करुन धरतीवर आला, ज्याच्याकडे विश्वासाची कमतरताच नव्हती. आणि निश्चितपणे त्याच्या जीवनात पापाला काही स्थान नव्हते. असे असताना देखील त्यांच्या अविश्वासामुळे तेथे त्याला दुसऱ्यांसाठी मोजकीच कार्य करता आली. हे सगळे मत्तीं १३:५८ मध्ये एकत्रित पणे पाहात असता ते अश्याप्रकारे सांगते, *"तेथे त्यांच्या अविश्वासामुळे त्याने फारशी अद्भुत कृत्ये केली नाहीत,"* आणि आपण येथे पाहतो येशूला स्वतःसंबंधीत काहीच मर्यादा नव्हत्या आणि निश्चितपणे सैतानाला वाव मिळण्यासारखे त्याच्या जीवनात काही नव्हते, त्याला मर्यादित अद्भुत कार्ये करावी लागली हयाला कारण त्याच्या आसपास असणारी माणसे होत.

हे समजणे अतिशय महत्वाचे आहे की: सदासर्वकाळासाठी परमेश्वराची इच्छा हीच आहे की सर्वांना आरोग्य दयावे. मग जर तुम्ही हयावर विश्वास ठेवाल तर तुम्ही बहुधा एखादया रुग्णालयाला भेट देत आणि सगळया रुग्णांनी भरलेल्या खाटा रिकाम्या करण्याचा चुकीचा प्रयत्न कराल कारण तुमचा विश्वास असा आहे की परमेश्वराची इच्छा आहे की सर्वांना आरोग्य मिळावे.परमेश्वरीय इच्छा हीच आहे की त्यांना आरोग्य मिळावे परंतु तो त्यांच्या स्वतःच्या इच्छेविरुद्ध असे करु शकत नाही. देव त्यांच्या आजारी राहण्याच्या अधिकाराला साम्भाळेल, आणि त्यांच्या निरोगी न होण्याच्या अधिकारालाही. त्यांना कोणीही बरे होण्यासाठी जबरदस्ती करु शकत नाही - आणि दुसऱ्या कोणाच्याही विश्वासाने ते आरोग्य प्राप्त करुन घेऊ शकत नाही. जर ते संघर्ष करत असतील तर दुसऱ्यांचा विश्वास त्यांना मदत

करु शकेल, पण त्यांच्यासाठी कोणी काहीही करु शकत नाही. जेव्हा गाडी न्यूट्रल मोड मध्ये असते तेव्हा तुम्ही तिला ओढू शकता, परंतु तिला पार्क किंवा तिला रीर्वस करु शकणार नाही. जर माणसाची मानसिकता आरोग्य दानाच्या विरोधाची असेल तर तुम्ही त्यावर मात करणार नाही. आणि ह्याच कारणावरुन, रुग्णालयाला रिक्त करु शकणार नाही किंवा त्यांच्या संहकार्या शिवाय चर्चमध्ये जाऊन सर्वच लोकांना रोगमुक्त करु शकणार नाही. हया विषयी बरेच काही बोलता येण्यासारखे आहे. जेव्हा येशूने लोकांना बरे केले, मरणातून सुद्धा उठविले, तो कोणाकडेही जाऊन त्यांना बोलू शकतो की "रडू नकोस." तो मातेला सांगू शकतो रडू नकोस आणि मग तिच्या मुलाला तिरडीवरुन उठवू शकतो. एखाद्याचा विश्वास कोठेतरी वापरला जाणे आवश्यक आहे. आपल्याकडे विश्वास असायला हवा आणि आरोग्यदान प्राप्त होण्यासाठी आणखीही खूप खूप काही गोष्टी त्यात असणे आवश्यक आहे. मी येथे थोडक्याच बाबींविषयी बोललो आहे, आणि आशा आहे की त्या तुमच्या उपयोगी पडतील, पण हया सगळयातून एक प्रमुख सार निघते की देव विश्वासयोग्य आहे. तुमच्याविषयी त्याची इच्छा आहे की तुम्ही निरोगी व्हावे, पण तुम्हाला शिकावयास हवे की कश्याप्रकारे त्याच्याशी सहकार्य करावे. तो तुमच्यासाठीही हे करु शकत नाही; तर त्याला ते तुमच्याद्वारे करावे लागेल. ते तुमच्या आतूनच उमडून येईल.

मी प्रार्थना करतो की हया सर्व गोष्टी तुम्हाला स्वतःला तयार होण्यास मदत करतील, आणि परमेश्वरीय सामर्थ्य तुमच्या मधून वाहावयास शक्य करतील आणि तुम्ही त्याच्या अलौकिक आरोग्यात वाटचाल कराल.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१.वाचा मत्तय ८:१७. आपल्याला आरोग्य मिळण्यासाठी येशूने काय केले?

**मत्तय ८:१७ -** *त्याने स्वतः आमचे विकार घेतले आणि आमचे रोग वाहिले, असे जे यशया संदेष्टयाच्या द्वारे सांगितले होते ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले.*

२. वाचा होशेय ४:६. काही लोक बरे होत नाहीत कारण:

अ. ते अज्ञानी असतात ( ज्ञानाचा अभाव )

ब. ते चर्चला जात नाहीत

क. ते योग्यतेचे नसतात

**होशेय ४:६ -** *ज्ञानाच्या अभावी माझ्या लोकांचा नाश झाला आहे. तू ज्ञानाचा अव्हेर केला म्हणून मीही तुझा अव्हेर करीन; म्हणजे अर्थात मी याजकाचे काम तुला करु देणार नाही; तू आपल्या देवाचे धर्मशास्त्र विसरला म्हणून मीहि तुझ्या मुलांस विसरेन.*

३. वाचा योहान ९:१-३. माणसाचे जन्मांधळे होण्यामागचे काय कारण असावे असे शिष्यांना वाटत होते? हे कारण योग्य होते का?

**योहान ९:१-३ -** *"तो तिकडून जात असता एक जन्मांध माणूस त्यांच्या दृष्टिस पडला. तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले, गुरुजी, कोणाच्या पापामुळे हा असा आंधळा जन्माला आला? हयाच्या की हयाच्या आईबाबांच्या? येशूने उत्तर दिले,हयाने किंवा हयाच्या आईबापांनी पाप केले नाही, तर हयाच्या ठायी देवाची कार्ये प्रगट व्हावी म्हणून हा असा जन्मास आला."*

४. वाचा योहान ५:१४. पाप आजारासाठी द्‌वार खुले करते, परंतु नेहमीच नाही. आजाराव्यतिरिक्त ही पाप मनुष्यात काय काय उत्पन्न करु शकते?

**योहान ५:१४ -** *यानंतर तो मंदिरांत येशूला भेटला तेव्हा तो त्याला म्हणाला, पाहा, तू बरा झाला आहेस; आतांपासून पाप करु नको; करशील तर तुझे पूर्वीपेक्षा अधिक वाईट होईल.*

५. वाचा रोमकरांस पत्र ५:१२-१४. जर आजाराचे कारण सर्वदा पापच नसेल तर अन्य कोणती कारणे आहेत?

**रोमकरांस पत्र ५:१२-१४ -** *एका माणसाच्या द्‌वारे पाप जगांत शिरले आणि पापाच्या द्‌वारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशा प्रकारे मरण पसरले.कारण नियमशास्त्रापूर्वी पाप जगांत होतेच; पण नियमशास्त्र नसले म्हणजे पाप गणण्यांत येत नाही. तथापि, आदामापासून मोशेपर्यंत मरणाने राज्य केले. ज्यांनी आदामाच्या उल्लंघनाच्या प्रकाराप्रमाणे पाप केले नाही त्यांच्यावरहि त्याने राज्य केले; आदाम तर जो येणार होता त्याचे प्रतिरुप आहे.*

६. वाचा प्रेषितांची कृत्ये १०:३८. प्रेषितांची कृत्ये १०:३८ प्रमाणे आजाराचे कारण हे ही असू शकते?

**प्रेषितांची कृत्ये १०:३८ -** *नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करीत फिरला, कारण देव त्याच्याबरोबर होता.*

७. वाचा मत्तय १३:५८. आरोग्य प्राप्ती होण्यास आडकाठी आणणारा?

**मत्तय १३:५८ -** *तेथे त्यांच्या अविश्वासामुळे त्याने फारशी अद्भुत कृत्ये केली नाहीत.*

८. वाचा याकोबाचे पत्र ५:१५. रोग्यांस काय वाचवील?

**याकोबाचे पत्र ५:१५ -** *विश्वासाची प्रार्थना दुःखणाईस वाचवील आणि प्रभु त्याला उठवील, आणि त्याने पापे केली असली तर त्याला क्षमा होईल.*

# उत्तरावली

१. वाचा मत्तय ८:१७. आपल्याला आरोग्य मिळण्यासाठी येशूने काय केले?

*त्याने आमचे विकार घेतले आणि आमचे रोग वाहिले*

२. वाचा होशेय ४:६. काही लोक बरे होत नाहीत कारण:

*अ. ते अज्ञानी असतात (ज्ञानाचा अभाव)*

३. वाचा योहान ९:१-३. माणसाचे जन्मांधळे होण्यामागचे काय कारण असावे असे शिष्यांना वाटत होते?

*पाप*

हे कारण योग्य होते का?

*नाही*

४. वाचा योहान ५:१४. पाप आजारासाठी द्वार खुले करते, परंतु नेहमीच नाही. आजाराव्यतिरिक्त ही पाप मनुष्यात काय काय उत्पन्न करु शकते?

*पुष्कळश्या अश्या पूर्वीपेक्षा अधिक वाईट गोष्टी,अगदी मृत्यू देखील (रोमकरांस पत्र ६:२३)*

५. वाचा रोमकरांस पत्र ५:१२-१४. जर आजाराचे कारण सर्वदा पापच नसेल तर अन्य कोणती कारणे आहेत?

*अधपतन (उत्पत्ति ३). आदामाने त्याच्या आज्ञा उल्लंघनाने सगळया मानवजातीत पाप आणि आजारपण आणले*

६. वाचा प्रेषितांची कृत्ये १०:३८. प्रेषितांची कृत्ये १०:३८ प्रमाणे आजाराचे कारण हे ही असू शकते?

***सैतानाने ग्रसीत असल्यामुळे***

७. वाचा मत्तय १३:५८. आरोग्य प्राप्ती होण्यास आडकाठी आणणारा?

***अविश्वास***

८. वाचा याकोबाचे पत्र ५:१५ रोग्यांस काय वाचवील?

***विश्वासाची प्रार्थना***

# पाठ ९

# दुसऱ्यांना क्षमा करणे

## *डॉन क्रो द्वारा लिखीत*

मत्तय १८:२१-२२ सांगते, *"तेव्हा पेत्र त्याच्याकडे (येशूकडे) येऊन म्हणाला, प्रभुजी, माझ्या भावाने किती वेळा माझा अपराध केला असता मी त्याला क्षमा करावी? सात वेळा काय? येशू त्याला म्हणाला, सात वेळा असें मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळा"* (कंस माझे) मला वाटते येथे पेत्र स्वत:ला थोर मनाचा मानूनच विचारतो आहे की किती वेळा त्याच्या विरोधात पाप करणाऱ्यांना त्याने क्षमा करावी. "दिवसागणीक सात वेळा का, तुमचे काय मत आहे?" येशू म्हणाला, "पेत्रा सातच वेळा नाही तर साताच्या सत्तर वेळा." म्हणजे ४९० वेळा, परंतु हयाचा अर्थ असा नाही की ४९० वेळी केल्यानंतर तुम्ही क्षमा करायची नाही. एका दिवसात एखादया मनुष्या कडून येशूने सांगितलेल्या आकडया एवढे अपराध होणे अशक्य आहे. तो म्हणत आहे क्षमा करण्यात सातत्य असण अगत्याचे आहे, म्हणजेच करतच-करतच राहावयास हवे. क्षमाशिलता हा ख्रिस्ती लोकांचा खरा स्वभावच असावयास हवा. येशू लूका २३:३४ मध्ये म्हणाला, *"हे बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करितात हे त्यांना समजत नाही."* आणि हुतात्मा झालेला स्तेफन प्रेषितांची कृत्ये ७:६० मध्ये म्हणतो, *"हे प्रभू, हे पाप त्यांच्याकडे मोजू नको."* सगळेच लोक क्षमेचा स्वीकार करणार नाहीत, पण एका ख्रिस्ती व्यक्तिच्या हृदयात क्षमा देउ शकण्याची वृत्ती असावी.

येशू क्षमेविषयीच्या दाखला सांगत असताना तो मत्तय १८ तील वचन २३ मध्ये पुढे म्हणतो, *"म्हणूनच स्वर्गाचे राज्य कोणाएका*

*राजासारखे आहे, त्या राजाला आपल्या दासांपासून हिशेब घ्यावा असे वाटले. आणि तो हिशेब घेऊ लागला तेव्हा लक्षावधी रुपयांचा कर्जदाराला त्याच्याकडे आणिले. त्याच्याजवळ फेड करावयास काही नसल्यामुळे धन्याने हुकूम केला की, तो, त्याची बायको व मुले आणि त्यांचे जे काही असेल ते विकून फेड करुन घ्यावी. तेव्हा त्या दासाने त्याच्या पाया पडून विनविले, मला वागवून घ्या, म्हणजे मी आपली सर्व फेड करीन.*" आता येथे एक परिस्थिती आहे: एका माणसाचे त्याच्या धन्याला लक्षावधी रुपयांचे देणे लागते. कोठल्याही मार्गाने ते तो फेडू शकत नाही - त्याला ही ठाऊक आहे की तो परतफेड करु शकत नाही आणि मालाकाला सुद्धा माहीत आहे की तो देऊ शकणारच नाही. त्या काळी तुम्ही स्वतःला कर्जबाजारी म्हणून घोषित करु शकत नव्हते जसे तुम्ही युनाईटेट स्टेट मध्ये करु शकता - ते तुम्हाला, तुमच्या बायकोला, तुमच्या मुलाबाळांना विकतील, आणि तुमच्याकडे जे काही आहे ते सर्व, आणि तुम्हाला गुलामगिरीत जावे लागेल. संपूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत तुम्हाला तुरुंगात रहावे लागेल, जर तुम्ही फेडलेच नाही तर तुम्हाला आजीवन तुरुगातच राहावे लागेल. त्या माणसाने ठाऊक असणारी एकच गोष्ट केली: त्याने गुडघे टेकले आणि दयेसाठी टाहो फोडला, "मालक, कृपया मला वागवून घ्या! कृपा करा, मी याचना करतो. मी तुमचे सगळे पैसे फेडून टाकीन. मला संभाळून घ्या!" लक्ष दया वचन २७ मध्ये काय होतय ते. वचन सांगते मालकाला कळवळा आला आणि त्याने त्याचे सगळे कर्ज माफ केले.

आपल्यावरही कर्ज होते जे आपण फेडू शकतच नव्हतो. पवित्र शास्त्र सांगते पापाचे वेतन मरण आहे. (रोमकरांस पत्र ६:२३) अनंतकाळासाठी परमेश्वरापासून वेगळे - जगामधील सगळया चांदी व सोन्याने ही आपली मुक्तता होऊ शकणारी नव्हती. मग देवाने त्याच्या दयेने आणि कृपेने त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताला आपले ऋण फेडण्यासाठी जगात पाठविले जे आपणास फेडता आले नसते. देवाने कळवळा व दयेने आपल्याकडे पाहिले आणि म्हणाला, "मी तुझे ऋण फेडतो."

हया ज्या माणसाचे नुकतेच लक्षावधीचे कर्ज माफ करण्यात आले होते त्यालाही सहकार्याकडून शंभर रुपये येणे होते. त्याने त्याला गाठले आणि तो त्याला म्हणाला, "माझे लक्षावधीचे कर्ज माफ झाले आहे तर मग तुझे शंभर रुपयाचे देणे ते काय? माझ्या प्रमाणे तू ही

ऋणमुक्त हो! चल मी तुला कर्जातून मोकळे करतो... कारण मी ही लक्षावधी रुपयांच्या कर्जातून सुटलेलो आहे!" हे असे व्हावयास हवे होते, पण असे झाले नाही. चला वचन २८-३१ वाचू मूळात काय घडले ते. *"तोच दास बाहेर गेल्यावर त्याला आपल्या सोबतीचा एक दास भेटला, त्याच्याकडे त्याचे शंभर रुपये येणे होते; तेव्हा तो त्याला धरुन त्याची नरडी आवळून म्हणाला, तुझ्याकडे माझे येणे आहे ते देऊन टाक. हयावरुन त्याच्या सोबतीचा दास त्याच्या पाया पडून गयावया करुन म्हणाला मला वागवून घे, म्हणजे मी तुझी फेड करीन."* त्याने शंभर रुपयासाठी त्या माणसाला तुरुंगात टाकले याचे लक्षावधीचे कर्ज माफ झाल्यावर अगदी लागलीच! तुम्ही कल्पना करु शकाल?

वचन ३२-३४ सांगते, *"तेव्हा त्याच्या धन्याने त्याला बोलावून म्हटले, अरे दुष्ट दासा, तू गयावया केल्यामुळ मी ते सर्व देणे तुला सोडिले होते; मी जशी तुझ्यावर दया केली तशी तूहि आपल्या सोबतीच्या दासावर दया करावयाची नव्हतीस काय? मग त्याच्या धन्याने त्याच्यावर रागावून तो सर्व देणे फेडीपर्यत त्याला हालहाल करणाऱ्यांच्या हाती दिले."* त्या माणसाला त्याचा सहकार्याला अशी वागणूक दिली म्हणून तुरुंगात त्याला टाकण्यात आले, आणि अश्या प्रकारे तो त्याला मिळलेली क्षमा गमावून बसला. येशू वचन ३५ मध्ये म्हणतो, *"म्हणून जर तुम्ही प्रत्येक जण आपआपल्या बंधूला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताहि त्याप्रमाणेच तुमचे करील."* हा मूर्खपणा नाही का? सगळया पापांची क्षमा झाली असता - ज्याची मजूरी होती मरण आणि अनंतकाळासाठी देवापासून वेगळे - इतराना क्षमा करण्यास नाकारणे? आपण परमेश्वराकडे दया याचना करत म्हणतो "मला क्षमा कर आणि येशू ख्रिस्ताच्या द्वारे माझी क्षमा कर," क्षमा मिळवतो, मग नंतर फिरता आणि शुल्लक बाबींना आम्ही मोठया बनवतो आणि दुसऱ्यांना क्षमा करत नाही.- आपण केलेल्या सगळया गोष्टिविषयी क्षमा मिळविल्या नंतरही परमेश्वर हयालाच दुष्टता म्हणतो.

मी काही वर्षापूर्वी मंडळीचा पाळक होतो, आणि माझ्या मंडळीत भविष्य पाहू शकणारी एक तरुणी होती. ती एके दिवशी माझ्याकडे येऊन म्हणाली, "मला काय पवित्र आत्मा येऊन भविष्यात होण्याऱ्या सगळया गोष्टी कळवतो? जेव्हा लोक मरणार असतात आणि जेव्हा

कोणाची कार बिघडते आणि अशाच बऱ्याच घटना." मी म्हणालो, "तुला माझे उत्तर आवडणार नाही, पण माझा विश्वास आहे की हे पवित्र आत्म्याचे कार्य नाही. मला वाटते हा भावी सांगणारा आत्मा आहे. प्रेषितांची कृत्ये १६ मध्ये प्रेषित पौलाचा पिच्छा पुरवणारा आत्मा. शेवटी पौलाने त्याला दटाविले आणि त्या मुलीच्या अंगातून निघून जाण्याची आज्ञा केली आणि मग तिने आपली भावी भविष्य सांगण्याची शक्ती गमावली." “मी तिला समजाविण्याचा प्रयत्न करत होतो की मी काही देव नाही.” आणि तिला म्हणालो, “तू येशू कडे जा आणि त्याला विचार,माझा उद्धार होण्यापूर्वीपासूनच मला हया गोष्टी सांगत होता आणि मला माहीती पुरवित होता? हा पवित्र आत्मा आहे की आणखी कोणी?" एके दिवशी ती माझ्याकडे आली आणि म्हणाली, "मी प्रभूला या विषयी विचारले आणि मला वाटते हे ठीक आहे. मी म्हणालो, "देव जे काही बोलला तेच खरे असते - मी काही येशू सारखा उत्तम मेंढपाळ नाही."

ही १९८६ च्या सुरुवातीची घटना होय आणि तुम्हाला माहितच आहे ना १९८६ साली काय झाले ते? आपल्या कडे चॅलैजर नावाचे अंतराळ यान होते आणि त्यात ८ अंतराळवीर होती. त्यात एका शिक्षिकेचा पण समावेश होता. आणि ही तरुणी टि.व्ही पाहात होती, आणि तिने त्या स्त्रिला बोलताना पाहिले की उदया मी चॅलैजर मधून अंतराळात जाईन, "आणि त्या विषयी बोलत होती, तो आत्मा तिला म्हणाला, "ती उदया मरणार, ती मरणार.” दुसऱ्या दिवशी चॅलैजर आकाशात झेपावले. आणि सगळया जगाने त्याच्या चिंधडया उडालेल्या पाहील्या, सगळे प्रवासी नष्ट झाले. मग ती तरुण मुलगी येऊन माझ्याशी बोलली, "डॉन भाऊ, मला असे वाटते की जे माझ्याशी बोलून मला घडणाऱ्या घटनांविषयी सांगतो ते काही पवित्र आत्म्याचे कार्य नसावे. तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करणार का? त्या रात्रिच्या सभेत सगळे जण गेल्यावर मी तिचा हात हातात घेतला आणि म्हणालो," तू भावी सांगणारा अशुद्ध आत्मा, हिच्यातून बाहेर निघ! काहीच घडले नाही. एके दिवशी येशूचे शिष्य ही एका तरुणाची अशुद्ध आत्म्यापासून सुटका करण्यास पाहात होते. पण त्यांना शक्य झाले नाही. येशू म्हणाला, "त्याला माझ्याकडे आणा." मग मी म्हणालो, "प्रभू, मला ठाऊक आहे येथे काय चाललय ते, पण मी हया स्त्रीला तुझ्यापाशी आणतो. काय होतय ते मला दाखव." माझी पत्नी ही माझ्याबरोबर

प्रार्थना करत होती आणि देवाने तिला बुद्धिचे वचन दिले. ती म्हणाली "हे हिच्या आईशी निगडीत आहे." मी त्या स्त्रीला म्हणालो, "तू तुझ्या आईला क्षमा केली आहेस का?" मी असे म्हणताच तिच्या तोंडातून किंकाळी फुटली, "**नाही!** तिने मला सोडून दिले!" नंतर मी म्हणालो, “अशुद्ध आत्म्या मी तुला बांधतो." आणि परत त्या तरुणीला विचारले की ती आईला क्षमा करेल का? मग तिने आईला क्षमा केली. आणि तिच्या आईला बंधमुक्त केले. आणि तिच्यासाठी परमेश्वरीय अनुग्रह व साहाय्य मागितले.माफ करण्याचा निर्णय घेऊन ती हे सोडू शकली आणि मग तिने मुक्तता आणि स्वातंत्र मिळविले.

मत्तय १८ च्या दाखल्यात येशने सांगितल्याप्रमाणे माझे म्हणणे आहे की आपल्या स्वर्गीय पित्याने आपते इतके प्रचंड कर्ज माफ केल्यावर जर आपण मनापासून दुसऱ्यांना क्षमा करत नाही तर तो आपल्याला छळ करणाऱ्याच्या हाती देईल. छळ करणारे म्हणजे काय? सगळया प्रकारच्या गोष्टी - सैतानी बंधने, पिळवणूक, आजार, नैराश्य, रोगराई, आणि अन्य बराचश्या गोष्टी. हयाचे मूळ आहे क्षमा न करणे. आपल्याला क्षमा मिळाल्यानंतरही क्षमा न करणे, हे सैतानाला आपल्या जीवनात भक्कम पाय रोवून उभे राहण्यास संमती देते. पवित्र शास्त्र सांगते तुम्हाला क्षमा करण्याचा निर्णय घ्यायला हवा. प्रभूच्या प्रार्थनेत (मत्तय ६:९-११) मध्ये, येशू म्हणाला क्षमा करा जशी तुमची क्षमा झाली आहे.

मार्क ११:२५-२६ सांगते की जेव्हा तुम्ही प्रार्थना करता, जर कोणाच्या विरोधात काही असेल तर, त्याची क्षमा करा. हयाचा अर्थ काय? अक्षमा आपल्या मनात किती काळ असायला हवी? प्रभु कडे जाऊन प्रार्थना करे पर्यतच. आणि जर आपल्या हृदयात तसूभरही कोणाच्या विरोधात अक्षमाशिलता असेल तर, आपल्याला त्याना मोकळ कराव लागेल आणि अश्याप्रकारे म्हणाव लागेल की, "मी त्यांना क्षमा करतो. मी हा निर्णय घेतो कारण परमेश्वरा तू माझ खुप मोठ कर्ज माफ केल आहेस."

*"प्रभू, मी प्रार्थना करतो जो कोणी हा पाठ वाचत असेल आणि त्यांच्या आयुष्यात त्यांनी जर कोणाला क्षमा केली नसेल तर, हयाच क्षणी त्यांनी निर्णय घ्यावा आणि त्या व्यक्तिला मोकळे करावे, मग*

*ते जिवंत वा मृत असो त्यांना क्षमा करावी. मी प्रार्थना करतो त्यांनी त्यांना बंधमुक्त करावे. त्याची जखम तुझ्या सामर्थ्याने आणि कृपेने भरुन निघावी. प्रभू मी तुझेआभार मानितो. येशूच्या नावाने. आमेन."*

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मत्तय १८:२१ - पेत्राने किती वेळाला क्षमा करण्याचा प्रस्ताव ठेवला?

**मत्तय १८:२१-२७ -** *"तेव्हा पेत्र त्याच्याकडे येऊन म्हणाला, प्रभुजी, माझ्या भावाने किती वेळा माझा अपराध केला असता मी त्याला क्षमा करावी? सात वेळा काय? येशू त्याला म्हणाला, सात वेळा असें मी तुला म्हणत नाही, तर साताच्या सत्तर वेळा." "म्हणूनच स्वर्गाचे राज्य कोणाएका राजासारखे आहे, त्या राजाला आपल्या दासांपासून हिशेब घ्यावा असे वाटले. आणि तो हिशेब घेऊ लागला तेव्हा लक्षावधी रुपयांचा कर्जदाराला त्याच्याकडे आणिले. त्याच्याजवळ फेड करावयास काही नसल्यामुळे धन्याने हुकूम केला की, तो, त्याची बायको व मुले आणि त्यांचे जे काहीं असेल ते विकून फेड करुन घ्यावी. तेव्हा त्या दासाने त्याच्या पाया पडून विनविले, मला वागवून घ्या, म्हणजे मी आपली सर्व फेड करीन. तेव्हा त्या दासाच्या धन्याला त्याची दया येऊन त्याने त्याला मोकळे केले व त्याचे कर्ज सोडिले.*

२. वाचा मत्तय १८:२२. किती वेळा आपण क्षमा करावी असे येशू म्हणतो?

३. वाचा मत्तय १८:२३-२४. सेवकाच्या डोक्यावर मालकाचे किती कर्ज होते?

४. वाचा मत्तय १८:२५. सेवक स्वतःला कर्जबाजारी घोषित करु शकत नव्हता तर मग काय होणार होते?

५. वाचा मत्तय १८:२६. सेवकाने कोणती विनंती केली होती? तो काय त्याचे कर्ज फेडू शकला असता?

६. वाचा मत्तय १८:२७. मालकाने सेवकाशी कसे वर्तन केले? देवाने आपल्याशी व आपल्या कर्जाविषयी (पापांविषयी) कसे वर्तन केले?

७. वाचा मत्तय १८:२८. ज्या सेवकाचे कर्ज माफ झाले होते त्याला आपल्या सोबतीच्या दासाकडून किती येणे होते?

**मत्तय १८:२८-३५ -** *"तोच दास बाहेर गेल्यावर त्याला आपल्या सोबतीचा एक दास भेटला, त्याच्याकडे त्याचे शंभर रुपये देणे होते, तेव्हा तो त्याला धरून त्याची नरडी आवळून म्हणाला, तुझ्याकडे माझे येणे आहे ते देऊन टाक. हयावरुन त्याच्या सोबतीचा दास त्याच्या पाया पडून गयावया करुन म्हणाला मला वागवून घे, म्हणजे मी तुझी फेड करीन. पण त्याचे न ऐकता तो गेला आणि तो ते देणे फेडीपर्यंत त्याने त्याला तुरुंगात टाकले.तेव्हा घडलेला हा प्रकार पाहून त्याचे सोबतीचे दास अतिशय दुःखी झाले आणि त्यांनी येऊन सर्व काही आपल्या धन्याला स्पष्ट सांगितले. तेव्हा त्याच्या धन्याने त्याला बोलावून म्हटले, अरे दुष्ट दासा, तू गयावया केल्यामुळे मी ते सर्व देणे तुला सोडिले होते; मी जशी तुझ्यावर दया केली तशी तूहि आपल्या सोबतीच्या दासावर दया करावयाची नव्हतीस काय? मग त्याच्या धन्याने त्याच्यावर रागावून तो सर्व देणे फेडीपर्यंत त्याला हालहाल करणाऱ्यांच्या हाती दिले. म्हणून जर तुम्ही प्रत्येक जण आपआपल्या बंधूला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताहि त्याप्रमाणेच तुमचे करील."*

८. वाचा मत्तय १८:२८. सेवकाचे आपल्या सोबतीच्या सेवकाबरोबरचे वागणे कसे होते?

९. वाचा मत्तय १८:२९-३०. हया सेवकाने आपल्या सोबतीच्या सेवकाला काय केले?

१०. वाचा मत्तय १८:३१-३३. मालकाने अक्षमाशील सेवकाला काय संबोधिले?

११. वाचा मत्तय १८:३३. मालकाने सेवकाला त्याच्या सेवकाशी प्रत्यक्ष कसे वागावयास पाहिजे होते असे सांगितले?

१२. वाचा मत्तय १८:३४. जेव्हा घडलेला सर्व प्रकार मालकाच्या कानी आला, तेव्हा त्याचे भाव कसे पालटले?

१३. वाचा मत्तय १८:३४. काय हया अक्षमाशील सेवकाने आपल्या वागणूकीने किवा निर्णयाने त्याला मूळात मिळालेले क्षमादान गमावले?

१४. वाचा मत्तय १८:३५. दाखल्याचा मुद्दा काय आहे

# उत्तरावली

१. वाचा मत्तय १८:२१. पेत्राने किती वेळाला क्षमा करण्याचा प्रस्ताव ठेवला?

***सात वेळा***

२. वाचा मत्तय १८:२२. किती वेळा आपण क्षमा करावी असे येशू म्हणतो?

***साताच्या सत्तर वेळा, चारशे नव्वद वेळा (म्हणजे अंतहिन, सतत)***

३. वाचा मत्तय १८:२३-२४. सेवकाच्या डोक्यावर मालकाचे किती कर्ज होते?

***लक्षावधी रुपये (इतके की त्याला ते फेडणे शक्यच नव्हते)***

४. वाचा मत्तय १८:२५. सेवक स्वतःला दिवाळखोर घोषित करु नव्हता तर मग काय होणार होते?

***तो, त्याची बायको, त्याची मुलेबाळे, आणि जे काही त्याच्या मालकीचे आहे त्याची बाजारात बोली लागणार होती आणि त्याला सगळया रक्कमेची परतफेड करावी लागणार होती.***

५. वाचा मत्तय १८:२६ सेवकाने कोणती विनंती केली होती?

***मला थोडा अवधी दे म्हणजे मी तुझे सर्व कर्ज फेडून टाकीन.***

तो काय त्याचे कर्ज फेडू शकला असता?

***कदाचित नाही***

६. वाचा मत्तय १८:२७. मालकाने सेवकाशी कसे वर्तन केले?

***कळवळयाचे आणि क्षमाशिलतेचे***

देवाने आपल्याशी व आपल्या कर्जाविषयी (पापांविषयी )कसे वर्तन केले?

***कळवळयाचे आणि क्षमाशिलतेचे***

७. वाचा मत्तय १८:२८. ज्या सेवकाचे कर्ज माफ झाले होते त्याला आपल्या सोबतीच्या दासाकडून किती येणे होते?

***शंभर रुपये (एका दिवसाची मजूरी)***

८. वाचा मत्तय १८:२८. सेवकाचे आपल्या सोबतीच्या सेवकाबरोबरचे वागणे कसे होते?

***असंयमशील, हिंसेचे आणि क्षमा न करण्याचे***

९. वाचा मत्तय १८:२९-३०. हया सेवकाने आपल्या सोबतीच्या सेवकाला काय केले?

***शुल्लक कर्जाची फेड न केल्यामुळे त्याला तुरुंगात टाकले***

१०. वाचा मत्तय १८:३१-३३. मालकाने अक्षमाशील सेवकाला काय संबोधिले?

***“कृतघ्न चाकर”***

११. वाचा मत्तय १८:३३. मालकाने सेवकाला त्याच्या सेवकाशी प्रत्यक्ष कसे वागावयास पाहिजे होते असे सांगितले?

***त्याने त्याच्या सोबतीच्या दासावर दया दाखवयास हवी होती ज्याप्रमाणे त्याच्यावर दाखविली गेली. त्याने त्याला मोकळे करावयाचे होते आणि त्याला क्षमा करावयाची होती.***

१२. वाचा मत्तय १८:३४. जेव्हा घडलेला सर्व प्रकार मालकाच्या कानी आला, तेव्हा त्याचे भाव कसे पालटले?

***तो क्रोधित झाला***

१३. वाचा मत्तय १८:३४. काय हया अक्षमाशील सेवकाने आपल्या वागणूकीने किवा निर्णयाने त्याला मूळात मिळालेले क्षमादान गमावले?

***होय***

१४. वाचा मत्तय १८:३५. दाखल्याचा मुद्दा काय आहे?

***"म्हणून जर तुम्ही प्रत्येक जण आपआपल्या बंधूला मनापासून क्षमा करणार नाही तर माझा स्वर्गातील पिताहि त्याप्रमाणेच तुमचे करील." (मत्तय १८:३५)***

# पाठ १०

# विवाह - भाग १

### *डॉन क्रो द्‍वारा लिखीत*

आज आपण विवाहा बद्दल बोलणार आहोत. सर्वप्रथम, मी तुम्हाला काही आकडे देत आहे. ७५ टक्के कुटुंबांना कोणत्यातरी वैवाहिक सल्लेगाराची गरज भासते. दोघा लग्नांपैकी एका लग्नाचा अंत घटस्फोटाने होतो. ५० टक्के लग्नानंतर पाच वर्षापर्यंतही त्यांचा जोडीदार त्यांच्याशी एकनिष्ठ राहात नाही. ख्रिस्ती वर्तुळातही म्हटले जाते की ३० टक्के मंडळीचे सेवकांचे त्यांच्या मंडळीच्या सदस्याशी अनैतिक संबंध आहेत. जर हया आकडयांच्या आसपासही आपण आहोत तर मग असे स्पष्टपणे दिसून येते की पवित्र शास्त्रातील सिद्धांत आपल्याला समजलेले नाहीत. आपण विवाह हा विषय आणि त्याबद्दल देवाचे काय म्हणणे आहे हया गोष्टी बघणार आहोत - कश्या प्रकारे तुम्ही आपले वैवाहिक नातेसंबंध मजबूत करु शकता.

विवाह ही देवाची संकल्पना होय. त्याने ह्याची आखणी केली. उत्पत्ति २:१८ सांगते, *"मग परमेश्वर देव बोलला, मनुष्य एकटा असावा हे बरे नाही, तर त्याच्यासाठी अनुरुप सहाय्यक मी करीन."* उत्पत्ति १:३१ ही सांगते, *"आपण केलेले सर्व फार चांगले आहे असे देवाने पाहिले. संध्याकाळ झाली व सकाळ झाली. हा सहावा दिवस."* आपणास लक्षात ठेवले पाहिजे की ही एक परिपूर्ण रचना होती. देव यायचा आणि मानवाशी संगती करायचा. त्याची मानवाशी अद्भुत संगती होती. प्रतिदिनी शितल संध्याकाळच्या समयी तो आदाम व हव्वेबरोबर संगती करायचा. कित्येक वेळेला आपणास वाटते की जर देवाबरोबर आपले नाते परिपूर्ण होते तर मग आपल्याला दुसऱ्या

कोणाचीही गरजच काय होती, परंतु हयात सत्य नाही. परमेश्वर उत्पत्ति १:३१ त्याने बनविलेल्या त्याच्या निर्मितीच्या संबंधी तो बोलतो, *"आपण केलेले सर्व फार चांगले आहे."* प्रथमच परमेश्वर असे म्हणाला होता की "हे बरे नाही." ते उत्पत्ति २:१८ मध्ये आपण पाहतो की, *"मनुष्य एकटा असावा हे बरे नाही."* मग मानवाची जी गरज होती ती भागवण्यासाठी देवाची विवाह ही संकल्पना आहे, मानव आपल्या जीवनात अनुभवत असणाऱ्या त्याच्या एकाकीपणाच्या समस्येसंबंधी त्याला मदत करण्यासाठी. विवाह, जर आपण नियम पुस्तिकेचे अनुसरण केले आणि देवाला जे अभिप्रेत आहे ते पाहिले तर त्याचा अर्थ आहे आनंद आणणे आणि दुःख नाही.

उत्पत्ति २:२४ मध्ये प्रथमच पवित्र शास्त्र खूप काही विवाहाविषयी बोलते.वचन सांगते, *“यास्तव पुरुष आपल्या आईबापास सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील, ती दोघे एकदेह होतील."* विवाह हे इतर सर्व नात्यांना मागे सोडून तुमचे लक्ष एका व्यक्तिवर क्रेंद्रीत करणे आणि देवाने त्याच प्रकारचा ढाचा बनविला आहे. हे जणू त्रिएक नाते आहे. विवाह संबंधात जेव्हा आदाम व हव्वेला देवाने एकत्रित पाचारण केले, तेव्हा ते फक्त देवाबरोबर आदामाचे नाते किंवा देवाबरोबर हव्वेचेच नाते असे नव्हते. आता तर ते होते आदाम व हव्वा एकक होऊन, परमेश्वराशी संबध ठेवण्याच्या उदिष्टाच्या ऐक्यात. पवित्र शास्त्र पेत्राचे पहिले पत्र ३:७ वचन सांगते, *"पतीनो, तसेच तुम्हीहि आपल्या स्त्रियांबरोबर, त्या (तुमची पत्नी) अधिक नाजूक व्यक्ति आहेत म्हणून सुज्ञतेने सहवास ठेवा, तुम्ही उभयंता जीवनरुपी कृपादानाचे समाईक वतनदार आहां, म्हणून तुम्ही त्यांना मान द्या; म्हणजे तुमच्या प्रार्थनांत व्यत्यय येणार नाही."* (कंस माझे) उत्पत्ति ५:१-२ एक महान वचन जे म्हणते, *"आदामाच्या वंशावळीची नोंद येणेप्रमाणे. देवाने मनुष्य उत्पन्न केला त्यावेळी त्याने तो आपल्याशी सदृश केला. त्याने त्यांस नर व नारी अशी उत्पन्न केली व त्यांस आशीर्वाद दिला; आणि त्यांस उत्पन्न केले त्यावेळी त्यास आदाम हे नांव दिले."* लक्षात घ्या आदामाने हव्वेला नाव दिले, पण देव तर आदाम आणि हव्वा ह्या दोघाना एकच संबोधित आदाम असे बोलावित होता. वैवाहिक संबंधात मी आणि देव किंवा देव व ती स्त्री असे नाही - मी आणि माझी पत्नी उभयंता, जीवनरुपी कृपादानाचे सामाईक रित्या वतनदार ज्यांना

देवाच्या सेवेसाठी पाचारण करण्यात आलेले आहेत, ऐक्यात आणि एकजुटीत मार्ग क्रमण करण्यास.

उत्पत्ति २:२४, जे आपण आताच वाचले आहे त्यात पुरुष आपल्या आईवडीलांना सोडून पत्नीला जडेल आणि ते दोघे एकदेह होतील. शब्द "जडेल" चा अर्थ चिकटणे किंवा बिलगणे, एकदेह होणे, उद्देशासाठी एकत्रित होणे. तुमच्या वैवाहिक जीवनात समस्या असतील तर मला तुम्हाला काही प्रश्न विचारु द्या: जे काही तुम्ही करता, तुमच्या जोडीदाराशी वागता, जे तुम्ही त्याला बोलता, ते तुमच्यात ऐक्य साधण्यास कारणीभूत ठरुन तुम्ही एकमेकांच्या अधिकच जवळ येता का? किंवा मग ते तुमच्या मध्ये फूट आणि दुराव्याला कारणीभूत ठरते का? वचनात विवाहासंबंधी आज्ञा आहे की जडणे, चिटकणे. मग काय तुम्ही जे काही करता त्यामुळे तुमचे नाते अधिकच दृढ होते किंवा तूटते? हया काही गोष्टीकडे तुम्हाला लक्ष दयायला हवे.

लोकांना वाटते प्रेम म्हणजे केवळ भावना : "मी तुझ्यावर प्रेम करत होतो, पण आता मला तुझ्याविषयी प्रेम वाटत नाही - मी आता तुझ्यावर प्रेम करत नाही." समजा तुम्ही विभक्त कुटंबातून आला असाल. तुम्ही सेवकाकडे किंवा न्यायाधिशाच्या साक्षीने विवाह करता; तुम्ही तुमचे आयुष्य त्या मनुष्यासाठी समर्पित करता; आणि तुम्हाला मनापासून वाटते की मरणाशिवाय आम्ही कधीही विभक्त होऊ नये. परंतु तुम्ही विभक्त कुटंबातून आल्या कारणाने तुम्हाला कधी प्रेम करणे ठाऊकच नसते. तुमच्या कुटंबातून कधीही ते व्यक्त होताना तुम्ही पाहिलेले नाही, तुमच्या आईवडीलांनी एकमेकांच्या सानिध्यात घालविलेले प्रेमाचे उबदार क्षण तुम्हाला कधीच अनुभवता आले नाहीत. तुमचा जोडीदार अश्या कुटुंबातून आलेला असेल ज्यात प्रेम भरभरुन व्यक्त केले जाते. पण तुम्हाला ते कसे व्यक्त करावे ते येत नाही. मग जरी तुम्ही ज्या व्यक्तिला जीवन अर्पण केले आहे त्याच्यावर प्रेम करण्याची तुमची इच्छा तर आहे, परंतु तुम्ही स्वतःचे इतके विलीगिकरण करुन घेतले असल्या कारणामुळे, आणि हयापूर्वी कधीही प्रेम व्यक्त होताना पाहिलेले नसल्यामुळे, तुम्ही कदाचित त्यात अपयशी ठराल. असेही शक्यता असेल की तुम्ही काही वर्षातच सल्लागारकडे जाणार आणि त्यांना विचाराल, "आम्ही एकत्र राहू शकत नाही. मी त्यांच्यावर आता प्रेम करत नाही. "आज माझ्याकडे तुमच्यासाठी एक

चांगली बातमी आहे. जर तुम्हाला वैवाहिक समस्या आहे तर असे काहीतरी आहे जे त्याचे निराकरण करु शकेल.

जेव्हा तुम्ही नवीन खरेदी केलेला फिज बिघडतो, तेव्हा तुम्ही त्याची सुचना पुस्तिका पाहाल. ती पुस्तिका तुम्हाला सांगेल काय बिगाड झालाय तो, किंवा मग तुम्ही दुरुस्ती करणाऱ्याशी संपर्क करा अशी सूचना देईल. विवाहात सुद्धा अशीच सूचना पुस्तिका आहे. तिच्या दुरुस्ती साठी. हे आहे देवाचे वचन आणि पवित्र शास्त्र तीताला पत्र २:४ मध्ये सांगते की प्रेम ही अशी गोष्ट आहे जी शिकवता येते, असे काही जे आपल्याला शिकता येते. जर तुम्ही विभक्त कुटुंबातून आलेले असाल आणि तुम्हाला तुमच्या जोडीदारावर कसे प्रेम करावे हे कळत नसेल तर - तुमच्या विवाह तुटत जाईल - एक आनंदाची बातमी आहे. योहानाचे पहिले पत्र ५:३ म्हणते, *"देवावर प्रीति करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे होय; आणि त्याच्या आज्ञा कठीण नाहीत."* येशू ख्रिस्ताच्या आज्ञाच्या द्वारे, ज्या आपल्याला दर्शवितात प्रेम कसे करावे, कश्या प्रकारे दया आणि औदार्य दाखवावे, आणि तुमच्या वैवाहिक नात्यात दुसऱ्या व्यक्तीचे हित कश्या प्रकारे जोपासावे, परमेश्वर तुमची परिस्थिती पालटून शकतो.

हा फक्त विवाह हया विषयाचा परिचय आहे. देव तुम्हाला आर्शिवादीत करो जसे तुम्ही हया अभ्यासक्रमात अग्रेसर होत जाता. माझा विश्वास आहे की परमेश्वर तुम्हाला हया विषयाला हाताळण्यासाठी अधिक बुद्धिमत्ता आणि ज्ञान प्रदान करू इच्छीत आहे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा इफिसकरांस पत्र ५:३१-३२. इफिसकरांस पत्र ५:३१ चा उतारा उत्पत्ति २:२४ पासून आहे. इफिसकरांस पत्र ५:३२ कडे पाहून, तुमच्या मते देव हया उताऱ्यात काय सांगत आहे?

**इफिसकरांस पत्र ५:३१-३२ -** *म्हणून पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या पत्नीला जडून राहील ; आणि ती उभयंता एकदेह होतील.हे रहस्य मोठे आहे पण मी ख्रिस्त व मंडळी हयांच्या संबंधाने बोलत आहे.*

२. वाचा याकोबाचे पत्र ४:४-५. ही वचने काय शिकवतात?

**याकोबाचे पत्र ४:४-५ -** *अहो अविश्वासू लोकांनो , जगाची मैत्री ही देवाबरोबर वैर आहे, हे तुम्हांस ठाऊक नाही काय? जो कोणी जगाचा मित्र होऊ पाहतो तो देवाचा वैरी ठरला आहे. जो आत्मा आपल्या ठायी वस्ती करितो त्याला आपल्याविषयी ईर्ष्या वाटते हे शास्त्राचे म्हणणे व्यर्थ आहे असे तुम्हांस वाटते काय?*

३. वाचा पेत्राचे पहिले पत्र ३:७. आपण आपल्या नवरा किंवा बायकोशी ऐक्यात व प्रेमात का चालावे?

**पेत्राचे पहिले पत्र ३:७ -** *"पतीनो, तसेच तुम्हीहि आपल्या स्त्रियांबरोबर, त्या (तुमची पत्नी) अधिक नाजूक व्यक्ति आहेत म्हणून सुज्ञतेने सहवास ठेवा; तुम्ही उभयंता जीवनरुपी कृपादानाचे समाईक वतनदार आहां, म्हणून तुम्ही त्यांना मान द्या; म्हणजे तुमच्या प्रार्थनांत व्यत्यय येणार नाही."*

४.वाचा योहान १५:५. तुमच्या जीवनाचा प्रभू ख्रिस्त असल्याखेरीज तुमचा विवाह सफल होईल का?

**योहान १५:५ -** *मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहां जो माझ्यामध्ये राहतो आणि मी ज्याच्यामध्ये राहतों तो पुष्कळ फळ देतो, कारण माझ्यापासून वेगळे असल्यास तुम्हाला काही करता येत नाही.*

५. वाचा तीताला पत्र २:४. प्रेम ही निव्वळ भावना नाही. वचनानुसार, प्रेम हे ____________________

**तीताला पत्र २:४ -** *त्यांनी तरुण स्त्रियांना असे शिक्षण द्यावे की, त्यांनी आपल्या नवऱ्यांवर व मुलांबाळांवर प्रेम करावे.*

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ५:३. जेव्हा आम्ही देवाच्या आज्ञेत चालतो, तेव्हा आपण चालतो ____________________

**योहानाचे पहिले पत्र ५:३ -** *देवावर प्रीति करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे होय, आणि त्याच्या आज्ञा कठीण नाहीत.*

७. वाचा मत्तय ७:१२. तुमच्या वैवाहिक जीवनात समस्या आहेत, हयाचे कारण आहे की कोणितरी ____________________चालत नाही.

**मत्तय ७:१२ -** *हयाकरिता लोकांनी जसे तुमच्याशी वागावे म्हणून तुमची इच्छा आहे तसेंच तुम्ही त्यांच्याशी वागा, कारण नियमशास्त्र व संदेष्ट ग्रंथ हेच होत.*

८. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १३:४ प्रेम हे:

अ. भावनिक

ब. एक प्रेमळ भावना

क. परोपकारी

**करिंथकरांस पहिले पत्र १३:४ -** *प्रीति सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीति हेवा करीत नाही, प्रीति बढाई मारीत नाही, फुगत नाही;*

# उत्तरावली

१. वाचा इफिसकरांस पत्र ५:३१-३२. इफिसकरांस पत्र ५:३१ चा उतारा उत्पत्ति २:२४ पासून आहे. इफिसकरांस पत्र ५:३२ कडे पाहून , तुमच्या मते देव हया उताऱ्यात काय सांगत आहे?

***ख्रिस्त व मंडळी हयांच्या मधील संबंधाप्रमाणे (विवाह सारखे)***

२. वाचा याकोबाचे पत्र ४:४-५. ही वचने काय शिकवतात?

***परमेश्वर आपल्या विषयी ईष्यावान आहे आणि त्याला आपण त्याच्याशी प्रामाणिक रहावे असे वाटते.***

३. वाचा पेत्राचे पहिले पत्र ३:७. आपण आपल्या नवरा किंवा बायकोशी ऐक्यात व प्रेमात का चालावे?

***जेणे करुन आपल्या प्रार्थनेंत व्यत्यय येणार नाही***

४.वाचा योहान १५:५. तुमच्या जीवनाचा प्रभू ख्रिस्त असल्याखेरीज तुमचा विवाह सफल होईल का?

***नाही***

५. वाचा तीताला पत्र २:४. प्रेम ही निव्वळ भावना नाही. वचनानुसार, प्रेम हे ____________________ .

***शिकवता येते***

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ५:३. जेव्हा आम्ही देवाच्या आज्ञेत चालतो, तेव्हा आपण ____________________ चालतो.

***प्रेमात***

७. वाचा मत्तय ७:१२. तुमच्या वैवाहिक जीवनात समस्या आहेत, हयाचे कारण आहे की कोणितरी ____________________ चालत नाही.

***प्रेमात***

८. वाचा करिंथकरांस पहिले पत्र १३:४. प्रेम हे:

***क. परोपकारी, दया***

# पाठ ११

# विवाह - भाग २

### *डॉन क्रो द्‌वारा लिखीत*

आज आपण पुन्हा लग्नाच्या विषयाकडे पाहणार आहोत आणि "लग्न म्हणजे काय?" हा प्रश्न आहे. आपण कधी याबद्दल विचार केला आहे का? बायबलच्या मते, लग्नाची आखणी करण्याची देवाची कल्पना होती. विवाह हे एकत्र जोडणे, एकता असणे, एक करणे होय. उत्पत्ति २:२४ सांगते, *"म्हणून मनुष्य आपल्या आईबापांस सोडून आपल्या बायकोला जडून राहील (ते त्यांच्यात सामील होतील व ते आपल्या बायकोला चिकटून राहतील) आणि ते दोघे एक देह होतील."* आपणास हे माहित आहे काय की विवाह जोडण्यापेक्षा, ऐक्यपेक्षा जास्त आहे? उदाहरणार्थ, १ करिंथकर ६:१५-१६ सांगते की ख्रिस्ती असूनही, जर मी बाहेर गेलो, वेश्याकडे गेलो तर मी तिच्याबरोबर एकदेह होतो. मग लग्नाबद्दल उत्पत्ति २:२४ मधील वचन विचारात घ्या. वेश्यामध्ये स्वतःला सामील झाल्याने, माझ्या पत्नीपासून आपोआप घटस्फोट होत नाही किंवा माझ वेश्याशी लग्न होत नाही कारण मी तिच्याशी संभोग केला. मग, लग्न म्हणजे काय? जर लग्न हे एक होणे आहे, जर ते एकत्र जोडणे आहे, जर ते एक देह होणे असेल तर लग्नात आणि वेश्याकडे जाण्यात काय फरक आहे? अर्थात, जर तुम्ही वेश्याकडे गेलात तर तुम्ही तिच्याबरोबर एकदेह व्हाल.

पवित्र शास्त्र सांगते की लग्न एक एकता आहे, एकत्र जोडणे आहे, ऐक्य आहे, परंतु हे त्याहीपेक्षा अधिक आहे. हे करारादवारे एकत्र येणे आहे. इब्री भाषेतील "करार" हा शब्द बेरीथ आहे आणि यात बंधन घालण्याची कल्पना आहे. ही एखाद्या व्यक्तीची अंतिम

वचनबद्धता असते, अगदी मृत्यूपर्यंतची वचनबद्धता. आता, जर मी वेश्याकडे गेलो, तर मी असे वाईट पाप केले तर तिच्याबरोबर माझे कोणतेही वचनबद्धता राहत नाही. लग्नाचा सार म्हणजे सर्व प्रथम इतरांना सोडून देणे. पवित्र शास्त्र सांगते की तुम्ही आपल्या आईबापांस सोडून आपल्या बायकोला जडून राहाल. यहेज्केल म्हणतो, *"तू माझा झालास."* ते यासाठी इतर सर्वांना सोडून देत आहे - स्वतःला यासाठी प्रतिबद्ध करणे. अर्थात, जर तुम्ही दुसऱ्या व्यक्तीकडे गेलात तर ते विवाहाच्या तत्त्वाचे, करारादृवारे किंवा वचनबद्धतेद्‌वारे आलेली एकता आणि ऐक्य यांचे उल्लंघन झाले. यहेज्केल १६:८ यास लग्नाचे एक करार म्हणतात. इफिसकर ५ मध्ये आपण शिकतो की विवाहामधे पतीने आपल्या पत्नीवर प्रेम केले पाहिजे जसे खिस्ताने मंडळीवर प्रेम केले, म्हणूनच हा एक प्रेमाचा करार आहे. प्रेमाचा हा करार असण्याचे कारण हे, की प्रेम हे विवाहातील सत्ताधारी तत्त्व आहे. सर्व गोष्टींहुन अधीक प्रेम हे विवाहाचे सत्ताधारी तत्त्व असणे आवश्यक आहे.

विवाह हा एकतेचा करार आहे. हे १ पेत्र ३:७ मध्ये असे सांगत की जर मी माझ्या पत्नीचा कमकुवत पात्र म्हणून आदर आणि प्रशंसा करीत नाही, आणि आपण जीवनातील कृपेचे एकत्र वारस आहोत हे समजत नाही, तर आपल्या प्रार्थनेत अडथळा येईल. त्याबद्दल विचार करा - विवाहसोबत्याच्या नात्यासाठी देवाने बनवलेल्या ऐक्यात आणि सुसंवादीतेने आपण चालत नाही तर आपल्या आध्यात्मिक जीवनात अडथळा येऊ शकतो. नीतिसूत्रे २:१६-१७ एक स्वछंदी स्त्रीविषयी सांगते की, जी आपल्या लग्नाचा करार सोडून देते, तिच्या तारुण्याचा मार्गदर्शक, आणि तो विवाह संबंध याला तिच्या देवाचा करार म्हणतात. ही खूप गंभीर बाब आहे. आपण एखाद्या व्यक्तीशी केलेला हा एक करार आहे, परंतु आपण देवासमोर देखील केलेला हा करार आहे. मला जेवढे लोकांची सेवा करण्यास आवडते तेवढेच देवाला प्राधान्य देणे आहे आणि ते म्हणजे माझ्या लग्नावर लक्ष देणे. लग्न हे खरोखर माझे जीवन दुसऱ्या व्यक्तीवर लक्ष देणे आहे आणि मी म्हटल्याप्रमाणे, प्रेम हे सत्ताधारी तत्त्व आहे.

मत्तय ७:१२ सांगते,की यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या असे तुम्हांला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा. कारण नियमशास्त्राच्या व संदेष्टेयांच्या शिकवणीचे सार हेच

आहे. हेच ते तत्त्व आहे ज्याने विवाहात राज्य केले पाहिजे. ह्यात स्वार्थी पण नाही, हे स्वतः बद्दल नाही, ती व्यक्ती आपल्याला काय देऊ शकते याबद्दल नाही. पवित्र शास्त्र सांगते १ करिंथकर १३:४ की प्रेम दयाळू आहे. याचा अर्थ दुसऱ्याचे कल्याण करण्याचा प्रयत्न करणे, उदार आणि दयाळू असणे आणि नेहमी दुसऱ्यासोबत सर्वोत्तम होण्यास प्रयत्न करणे.अशा प्रकारे विवाहाची रचना करण्याचे कारण असे आहे की आपला देवाबरोबर खरा नातेसंबंध कसा असावा याचे हे एक उदाहरण, एक आदर्श आहे. त्याने आम्हाला नैसर्गिकरित्या उदाहरणे दिली आहेत. त्याने आपल्याला चांगला विवाह, उत्तम विवाह कसा असावा हे दाखवले आहे, कारण त्याच्याबरोबर वास्तविक अनंत काळाचे नाते काय आहे त्याचा एक नमुना आपल्याकडे असावा अशी त्याची इच्छा आहे. विवाह हा केवळ मृत्यू होईपर्यंत असतो, ही तात्पुरती गोष्ट आहे. पवित्र शास्त्र सांगते की पुनरुत्थानामधे ते विवाह करणार नाहीत किंवा विवाहासाठी देणार नाहीत.देवाची इच्छा आहे की चांगले विवाह म्हणजे काय - प्रेमाची तत्वे - दसऱ्याना निःस्वार्थपणे देण्याचे सिद्धांत, हे आपण समजुन घ्यावे. तो म्हणत आहे, "खरोखर तुम्ही हे समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे की मी तुम्हाला माझ्याबरोबर वैवाहिक संबंधात बोलाविले आहे - तात्पुरते नात म्हणुन नाही, काही वर्षं टिकेल आणी नंतर मग निघून जाईल असं नाही, परंतु सार्वकालिक संबंध जिथे माझे सर्व प्रेम सदासर्वकाळ तुम्हाला प्रकट होईल."

मला तुम्हाला विवाहाचे काही तत्त्वे सांगु द्या.लग्न एकीकरण आहे, फक्त एक भागीदारी नाही. पवित्र शास्त्र, उत्पत्ती ४ मध्ये याबद्दल जाणणे म्हणून सांगते, आणि पेत्राचे पहिले पत्र ३:७ मध्ये जीवनरुपी कृपादानाचे समाईक वतनदार म्हणून सांगते विवाह एक करार आहे, ज्याचा अर्थ ते बंधनकारक आहे; त्यात एक वचनबद्धता आहे. पाप पहिल्या मंडळी मध्ये दाखल झाले नाही; हे पहिल्या लग्नात दाखल झाले, म्हणून आपल्याला सुचना पुस्तक मिळवणे आवश्यक आहे विवाहा विषयी मार्गदर्शन आणि प्रेमाची तत्त्वे आपल्या आयुष्यात अंमलात आणले पाहीजे. आपण नेहमी विचारतो, “प्रेम म्हणजे काय?" प्रेमाची खरी व्याख्या, एका अर्थाने, निःस्वार्थीपणा आहे. यशया ५३:६ सांगते की आपण मेंढरा प्रमाणे आहोत, आपण चुकीच्या मार्गाने गेलो होतो आणि प्रत्येकाने आपआपला मार्ग धरिला होता, परंतु

विवाहामध्ये, आपण दुसऱ्या व्यक्तीवर लक्ष केंद्रित करतो आणि त्याचे कल्याण आणि फायदा याचाच नेहमी विचार करतो.

पवित्र शास्त्र आपल्याला इफिसकरांस पत्र मध्ये असे सांगते आपल्या पत्नीवर प्रेम करणे हे आपल्या स्वतःच्या शरीरावर प्रेम करण्यासारखे आहे. आपण पती लोकानी, देवाने, आपल्याला दिलेली पत्नी, हिला प्रेम आणि आदर करायचा आहे, म्हणजे तिचे कौतुक करा. आपल्या स्वतःच्या शरीरावर प्रेम करा याचा अर्थ असा नाही की आपण नुसते बसून, हात धरून, स्वतःला कवटाळुन घ्या आणि म्हणा, "अरे मी तुझ्यावर प्रेम करतो." असे मुळीच नाही, स्वतःवर प्रेम करणे म्हणजे स्वतःचे रक्षण करणे, स्वतःला खायला घालणे आणि स्वतःची काळजी घेणे. आपण आपल्या पत्नीला कधीच कमी लेखायला नाही पाहिजे, तिला सहज घेऊन, कधीही तिच्यातील एक दुर्बलता घेऊन, ती सार्वजनिकपणे उघडकीस आणायला नाही पाहिजे, कधीही चेष्टा किंवा तिला दुखविणाऱ्या गोष्टी करायला नाही पाहिजे. जसे आपण स्वतःवर प्रेम करतो तसे तिच्यावरही प्रेम करायचे आहे.

प्रार्थनेत देवासमोर स्वतःला उचला आणि सर्व प्रथम, त्याचे आभार माना तुमच्यावर प्रेम करण्याबद्दल. मग, आपल्या जोडीदारासाठी, जो जोडीदार देवाने आणि तुम्हास दिलेला आहे. त्या समस्येचा हा एक भाग असू शकतो. होऊ शकतं की तुम्ही तुमच्या जोडीदाराचे आम्ही कौतुक केले नाही, तुम्ही कदाचित त्याला किंवा तिला कमी लेखीले आणि पवित्र शास्त्र सांगते की असे करणे मुळात स्वार्थीपणा आणि पाप आहे. इफिसकरांस पत्र ५ मध्ये असे म्हटले आहे की येशूने पाण्याप्रमाणे आपल्या शब्दाने मंडळीला धुऊन शुद्ध केले, आपल्या मंडळीशी बोलून. जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदारा बद्दल बोलता तेव्हा तुमच्या बोललेल्या शब्दांच्या पातळीवर ते उभे राहतात. जर तुम्ही म्हणाल "तु चांगली नाही, तु कुरूप आहे, तुझे वजन जास्त आहे" तर तुम्ही तुमचे वैवाहिक जीवन दबवता आणि ते ऐक्य नसून विभक्तता आणि परकीयपणा चे कारण बनवाल. परंतु जर तुम्ही यासारखे दयाळूपणे बोलले, "प्रिये, तु करते त्या गोष्टींचे मी कौतुक करतो. मी तुझी प्रशंसा करतो. मी तुझ्यावर प्रेम करतो," आणि तुमच्या कृती मधुन पण दाखवा, ह्यामुळे तुमचा जोडीदार त्या शब्दांच्या पातळीवर तसा उंच उचलला जाईल.

आज तुम्ही पाहू शकत नाही का, की तुम्ही बोललेल्या शब्दाच्या द्वारे तुमच्या वैवाहिक अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत? तुम्ही तुमच्या जोडीदाराला वर नेण्याऐवजी खाली आणले आहे का? आज मी तुमच्या साथीदाराला प्रोत्साहित करतो.प्रेम ही भावना नसते; तुम्हाला कसे वाटते त्याची पर्वा न करता प्रेम दुसऱ्या व्यक्तीचे कल्याण आणि हित शोधत असते. लाकडाच्या तुकड्यावर लाखाचे अनेक थर रंगवल्यासारखे आज पासुनच दयाळूपणे वागण्यास सुरूवात करा. अशाच प्रकारे प्रेमाची उभारणी होते - छोट्या छोट्या दयाळू कृतीने. तुमच्या जोडीदाराला प्रेमाच्या शब्दांचा, आदर देवुन, सन्मानाने, महत्व देवुन आणि बोलुन प्रारंभ करा आणि तुम्हाला एक चांगला फरक दिसेल. परमेश्वर तुम्हाला आशीर्वादीत करो जसे तुम्ही ही तत्वे अंमलात आणता.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा नीतिसूत्रे १८:२२. विवाह हे:

अ. एक चांगली गोष्ट

ब. भयानक

क. परमेश्वराला प्रसन्न करणारे

**नीतिसूत्रे १८:२२ -** *जर तुम्हाला बायको मिळाली, तर तुम्हाला चांगली गोष्ट मिळाली असे होईल. परमेवर तुमच्यावर खुश आहे असे ते दर्शवते.*

२. वाचा इब्री १३:४. विवाहातील लैंगिक संबंध (किंवा लग्नाचे अंथरूण) हे:

अ. पाप आहे

ब. घाणेरडे आणि दृष्ट

क. निर्दोष असावे

**इब्री लोकांस १३:४ -** *सर्वांनी लग्नाचा आदर करावा व अंथरूण निर्दोष असावे कारण जे व्यभिचारी व जारकर्मी आहेत अशा लोकांचा देव न्याय करील.*

३. वाचा उपदेशक ९:९. खरे किंवा खोटे: एक धार्मिक विवाह म्हणजे परमेश्वराकडून आपल्याला या जीवनात एक भेट आणि बक्षीस आहे.

**उपदेशक ९:९ -** *प्रेम असलेल्या पत्नीबरोबर आयुष्य आनंदात घालवा. तुमच्या छोट्याशा आयुष्यातील प्रत्येक दिवसाचा आनंद लुटा. देवाने तुम्हाला पृथ्वीवर छोटे आयुष्य दिले आहे आणि फक्त तेव्हढेच तुमच्याकडे आहे हे जाणून या आयुष्यात तुम्हाला जे काम करायचे आहे त्याचा आनंद लुटा.*

४. वाचा योहानाचे पहिले पत्र ३:१८. "न्यायाधीश फिलिप गिलियम म्हणाले की २८,००० बाल न्यायालयीन प्रकरणांपैकी ज्यांच्या त्यांनी निवाडा केला, ते म्हणाले की, आई वडील यांच्यात आपुलकीचा अभाव हेच, सर्वात मोठे त्यांना माहित असलेल्या बाल अपराधाचे कारण होते" (कायमचे एकत्र, पृष्ठ १५२). आपण प्रेम कसे दाखवायचे?

**योहानाचे पहिले पत्र ३:१८ -** *प्रिय मुलांनो, आपण शब्दाने किंवा जीभेने नव्हे, तर कृतीने व खरेपणाने प्रीती करावी.*

५. वाचा इफिसकरांस पत्र ५:२८. खरे किंवा खोटे: मी माझ्या पत्नीकडे दुर्लक्ष करणार नाही जसे मी माझ्या स्वतः च्या शरीराकडे दुर्लक्ष करत नाही.

**इफिसकरांस पत्र ५:२८ -** *याप्रकारे पतींनी सुद्धा आपल्या पत्नींवर असेच प्रेम करावे, जसे ते स्वतःच्या शरीरावर प्रेम करतात, जो कोणी त्याच्या स्वतःच्या पत्नीवर प्रेम करतो, तो स्वतःवर प्रेम करतो.*

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ३:१६. खरे किंवा खोटे: "मी तुझ्यावर प्रेम करतो" हे शब्द सुंदर असू शकतात जर त्यांना कृतींचा पाठिंबा असेल तर येशूने आपल्या प्रत्येक शब्दाचा पाठिंबा आपले जीवन अर्पण करून दिला म्हणून आपल्याला देखील आपली जीवन आपल्या सोबतींसाठी अर्पण करावं लागेल शक्य तितक्या व्यावहारिक मार्गाने.

तुम्हाला प्रेम करायला आवडेल असे काही व्यावहारिक प्रकार मांडा.

**योहानाचे पहिले पत्र ३:१६ -** *अशा रीतीने ख्रिस्ताने आपल्यासाठी स्वतःचा जीव दिला. यामुळे प्रेम काय आहे ते आपल्याला समजते. म्हणून आपण देखील आपल्या भावासाठी जीव दिला पाहिजे.*

७. वाचा इफिसकरांस पत्र ५:२५-२६. खरे किंवा खोटे: माझी पत्नी तशाच प्रकारे जगेल ज्याप्रकारे मी तिच्या विषयी बोलतो. मी तिला त्या संभाव्यतेकडे आणतो जे मी तिच्या विषयी बोलतो.

***इफिसकरांस पत्र ५:२५-२६ -*** *पतींनो, ज्याप्रमाणे ख्रिस्त मंडळीवर प्रीति करतो, तशी तुम्ही आपल्या पत्नीवर प्रीति करा. त्याने तिच्यासाठी स्वतःला दिले, यासाठी की, त्याने तिला देवाच्या वचनरुपी पाण्याने धुऊन निर्मळ करावे.*

८. वाचा रोमकरास ८:३८-३९. आणि योहानाचे पहिले पत्र ४:१९ खरे किंवा खोटे: आपण आकर्षित होतो ( किंवा प्रेम करतो )आपल्याला बोलले जाणारे जिव्हाळ्याचे शब्द व त्यासोबत तशी कृती पाहुन. परमेश्वराने त्याच्या प्रेमपत्रांमधून आपल्याला जिव्हाळ्याचे शब्द बोलून आम्हाला आकर्षित केले आहे, जे शास्त्र म्हणून नोंदवले गेले.

**रोमकरास ८:३८-३९ -** *कारण माझी खात्री आहे की, मरण किंवा जीवन, देवदूत, अधिकारी आत्मे हल्लीच्या किंवा भविष्यकाळात, येशूचे सामर्थ्य, उंच किंवा खाली, जगात निर्माण केलेली कुठलीही गोष्ट आपणांस देवाचे प्रेम जे ख्रिस्तामध्ये आढळते त्यापासून वेगळे करु शकणार नाही.*

**योहानाचे पहिले पत्र ४:१९ -** *पहिल्याने त्याने आपणावर प्रीती केली, म्हणून आपण (त्याच्यावर) प्रीती करतो.*

९. वाचा योहानाचे पहिले पत्र ५:३. आणि योहानाचे दसरे पत्र १:६ खरे की खोटे: प्रेम कसे करावे, हे येशूच्या आज्ञेद्वारे व्यक्त झाले आणी ओळखल्या गेले. आपण देवाच्या वचनातून प्रेमाची ही तत्त्वे शिकुन घेवु शकतो.

**योहानाचे पहिले पत्र ५:३ -** *देवप्रिती असलेली आमची प्रीति आम्ही त्याच्या आज्ञापालनाकडून दाखवू शकतो आणि त्याच्या आज्ञा फार अवजड नाहीत.*

**योहानाचे दुसरे पत्र १:६ -** *आणि त्याच्या आज्ञेत राहणे म्हणजेच प्रीति करणे होय. हीच आज्ञा आहे जी तुम्ही सुरुवातीपासूनऐकली आहे. की तुम्ही प्रीतीचे जीवन जगावे.*

१०. वाचा योहान १४:१५. खरे किंवा खोटे: प्रेम तुमच्या भावना बाबतीत नाही पण आपल्या इच्छे बाबतीत आहे. शास्त्रातील प्रत्येक आज्ञा ही मनुष्याच्या इच्छेला दिले जाते, त्याच्या भावनांसाठी कधीही नाही. देव तुम्हाला कधीच कसे वाटावे हे सांगत नाही, तर कसे वागावे हे सांगतो.

**योहान १४:१५ -** *जर तुम्ही माझ्यावर प्रीति करित असाल, तर ज्या आज्ञा मी करतो त्या तुम्ही पाळाल.*

११. वाचा गलतीकरांस पत्र ५:२२-२३. प्रेम नैसर्गिक नाही. ते शिकलेच पाहिजे आणि पवित्र आत्म्याद्वारे मानवजातीमध्ये प्रेम जन्माला आले पाहिजे. प्रेम हे एक फळ आहे:

अ. माणसाच्या विचारसरणी चे

ब. मनुष्याच्या स्वभावा चे

क. देवाच्या आत्म्या चे

**गलतीकरांस पत्र ५:२२-२३ -** *पण आत्मा या गोष्टी निर्माण करतोः प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वास, सौम्यता व आत्मसंयमन. अशा गोष्टीविरुद्ध नियमशास्त्र नाही.*

१२. वाचा इफिसकरांस पत्र ५:३१-३२. चांगला विवाह हे लहान प्रमाणात कशाचा नमुना असतो?

**इफिसकर ५:३१-३२ -** *शास्त्र सांगते त्याप्रमाणे, "म्हणून मनुष्य त्याचे वडील व आई यांना सोडील व त्याच्या पत्नीशी जडून राहील. आणि ते दोघे एकदेह होतील." हे गुढ सत्य फार महत्त्वाचे आहे आणि मी हे सांगत आहे की ते ख्रिस्त व मंडळीला लागू पडते.*

# उत्तरावली

१. वाचा नीतिसूत्रे १८:२२. विवाह हे:

***अ. चांगली गोष्ट आणि क. परमेश्वराला प्रसन्न करणारे***

२. वाचा इब्री १३:४. विवाहातील लैंगिक संबंध (किंवा लग्नाचे अंथरूण) हे:

***क. निर्दोष असावे***

३. वाचा उपदेशक ९:९. खरे किंवा खोटे: एक धार्मिक विवाह म्हणजे आपल्याला या जीवनात एक भेट आणि बक्षीस आहे परमेश्वराकडून -

***खरे***

४. वाचा योहानाचे पहिले पत्र ३:१८. "न्यायाधीश फिलिप गिलियम म्हणाले की २८,००० बाल न्यायालयीन प्रकरणांपैकी ज्यांच्या त्यांनी निवाडा केला, ते म्हणाले की, आई वडील यांच्यात आपुलकीचा अभाव हाच, सर्वात मोठे त्याना माहित असलेल्या बाल अपराधाचे कारण होते" (कायमचे एकत्र, पृष्ठ १५२). प्रेम कसे दाखवायचे?

***कृती करून आणि खरी काळजी घेऊन***

५. वाचा इफिसकरांस पत्र ५:२८. खरे किंवा खोटे: मी माझ्या पत्नीकडे दुर्लक्ष करणार नाही जसे मी माझ्या स्वतः च्या शरीराकडे दुर्लक्ष करत नाही -

***खरे***

६. वाचा योहानाचे पहिले पत्र ३:१६. खरे किंवा खोटे: "मी तुझ्यावर प्रेम करतो" हे शब्द सुंदर असू शकतात जर त्यांना कृतींचा पाठिंबा असेल तर. येशूने आपल्या प्रत्येक शब्दाचा पाठिंबा आपले जीवन अर्पण करून दिला म्हणून आपल्याला देखील आपली

जीवन आपल्या सोबतींसाठी अर्पण करावं लागेल शक्य तितक्या व्यावहारिक मार्गाने.

***खरे***

तुम्हाला प्रेम करायला आवडेल असे काही व्यावहारिक प्रकार मांडा.

७. वाचा इफिसकरांस पत्र ५:२५-२६. खरे किंवा खोटे: माझी पत्नी तशाच प्रकारे जगेल ज्याप्रकारे मी तिच्या विषयी बोलतो. मी तिला त्या संभाव्यतेकडे आणतो जे मी तिच्या विषयी बोलतो.

***खरे. इफिसकरांस पत्र ५:२६ मध्ये वापरलेला ग्रीक शब्द म्हणजे रेमा, याचाअर्थ "बोललेले शब्द"***

८. वाचा रोमकरास ८:३८-३९. आणि योहानाचे पहिले पत्र ४:१९ खरे किंवा खोटे: आपण आकर्षित होतो (किंवा प्रेम करतो) आपल्याला बोलले जाणारे जिव्हाळ्याचे शब्द व त्यासोबत तशी कृती पाहुन. परमेश्वराने त्याच्या प्रेमपत्रांमधून आपल्याला जिव्हाळ्याचे शब्द बोलून आम्हाला आकर्षित केले आहे, जे शास्त्र म्हणून नोंदवले गेले.

***खरे. देवाचे वचन आपल्याविषयी प्रेमळ शब्दांनी भरलेले आहे***

९. वाचा योहानाचे पहिले पत्र ५:३. आणि योहानाचे दुसरे पत्र १:६ खरे की खोटेः प्रेम कसे करावे, हे येशूच्या आज्ञेद्वारे व्यक्त झाले आणी ओळखल्या गेले आपण देवाच्या वचनातून प्रेमाची ही तत्त्वे शिकुन घेवु शकतो.

***खरे***

१०. वाचा योहान १४:१५. खरे किंवा खोटे: प्रेम तुमच्या भावना बाबतीत नाही पण आपल्या इच्छे बाबतीत आहे. शास्त्रातील प्रत्येक आज्ञा ही मनुष्याच्या इच्छेला दिले जाते, त्याच्या भावनांसाठी कधीही नाही. देव तुम्हाला कधीच कसे वाटावे हे सांगत नाही, तर कसे वागावे हे सांगतो.

***खरे***

११. वाचा गलतीकरांस पत्र ५:२२-२३. प्रेम नैसर्गिक नाही. ते शिकलेच पाहिजे आणि पवित्र आत्म्याद्वारे मानवजातीमध्ये प्रेम जन्माला आले पाहिजे. प्रेम हे एक फळ आहे:

***क. देवाच्या आत्म्या चे***

१२. वाचा इफिसकरांस पत्र ५:३१-३२ चांगला विवाह हे लहान प्रमाणात कशाचा नमुना असतो?

***ख्रिस्त आणि त्याची मंडळी***

# पाठ १२

# परमेश्वरीय प्रकाराची प्रीति - भाग १

## *डॉन क्रो द्वारा लिखीत*

करिंथकरास पहिले पत्र १३:१३ मध्ये असे सांगते की, *"या तीन गोष्टी राहतात: विश्वास, आशा आणि प्रीति पण यातील सर्वांत महान प्रीति आहे."* मग करिंथकरास पहिले पत्र १४:१ सांगते, *"प्रीती हे तुमचे ध्येय असू द्या आणि आत्मिक दानांची विशेषतः तुम्हास संदेश देता यावा याची मनापासून इच्छा बाळगा."* पवित्र शास्त्र सांगते प्रेमाचे अनुसरण करा, त्याचा शोध घ्या आणि त्यास आपले सर्वोच्च लक्ष्य बनवा. काही अनुवाद त्याला तुमचा सर्वात दीर्घ शोध बनवा असे म्हणतात. हीच एक गोष्ट आहे जी आपण या जीवनातून अनंतकाळा मध्ये घेऊन जाणार आहोत. आपण आपल्या मोटारी, घरे किंवा पैसा घेवुन जाणार नाही, परंतु पवित्र आत्म्याद्वारे येशू खिस्ताने आपल्या जीवनात दिलेली प्रीति आपण घेऊन जाणार आहोत. प्रीतिच एकमेव बाब आहे ज्यात सार्वकालीक महत्व आणी सार आहे.

प्रीतिचा खरा अर्थ काय आहे? जर मी म्हणतो, "मी माझ्या पत्नीवर प्रेम करतो, मला आईस्क्रीम प्रिय आहे, मला एप्पल पाय (नानकटाईचा प्रकार) प्रिय आहे." प्रीतिचे वर्णन करण्यासाठी इंग्रजीमध्ये एकच शब्द आहे, म्हणून जेव्हा मी म्हणतो की मी माझ्या पत्नीवर प्रीति करतो आणि नंतर मला मांजरी पण प्रिय आहे असे म्हणतो तेव्हा माझी पत्नी प्रभावित झाली का? अजिबात नाही. मी काय म्हणत आहे ते आपण पाहता का? जेव्हा आपण प्रेम हा शब्द वापरतो तेव्हा काही लोकांना वाटते की त्याचा अर्थ समागम असा आहे, काहींना वाटते की ती तीव्र उबदार भावना आहे - लोकांकडे प्रीति साठी सर्व प्रकारच्या व्याख्या

आहेत. ग्रीक भाषेत यासाठी चार प्रमुख शब्द आहेत. एक म्हणजे *इरोस*, जो खरोखर पवित्र शास्त्रामध्ये वापरल्या गेलेला नाही आणि तो लैंगिक आकर्षण किंवा लैंगिक प्रेम म्हणून परिभाषित केला गेला आहे. देवाने अशा प्रकारच्या प्रेमाची नियुक्ती केली जेव्हा तो म्हणाला की पुरुष आपल्या आईवडिलांना सोडील व आपल्या पत्नीशी जडून राहील व मग ते दोघे एक देह होतील. पवित्र शास्त्रामध्ये गीतरत्न नावाचे पुस्तक लैंगिक प्रेमाविषयी आहे जे देवाने लग्नाच्या नात्यात मर्यादित ठेवले आहे. इतर प्रकारची प्रीति देव म्हणतो ते सर्व मानवजातीला वापरण्यास मुक्त आहे, परंतु *इरोस* विवाह संबंधात मर्यादित आहे.

दुसऱ्या प्रकारच्या प्रीति ला *स्टोरगे* म्हणतात आणि हे कौटुंबिक नात्यातील नैसर्गिक बंधन किंवा आपुलकी आहे. नंतरचा प्रकार *फिलीओ* आहे जो *फिलिया* मुळ शब्दातुन आला आहे.नवीन करारात हा शब्द समारे बहात्तर वेळा वापरला गेला आहे. म्हणजे स्नेहाची उबदार भावना जी तीव्रतेने येते आणि जाते. बहुतेक लोक जे प्रीतिबद्दल बोलतात त्यांना वाटते की प्रीति हिच असते, “म्हणून मी प्रीतित पडतो आणि मी प्रीतितून बाहेर पडतो." जर तुमचा विवाह अश्या प्रकारावर बांधल्या गेला असेल तर त्यात काही वेळ कधी खुप उचांक असेल तर काही वेळ खाली घसरलेला असेल. त्यावर आधारित राहुन तुम्ही प्रीतित पडू शकता आणि प्रीतितून बाहेर पडू शकता.

पवित्र शास्त्र सांगते की आपण एकमेकांवर देवाच्या प्रकाराच्या प्रीतिने प्रीति केली पाहिजे,जे आहे *अगापे* प्रीति. *अगापे* प्रीति म्हणजे काय? त्याचे अनेक पैलू आहेत आणि पहिले करिंथकरास पत्र १३ मध्ये प्रीतित काय समाविष्ट आहे याची संपूर्ण व्याख्या देते. पहिले योहान ५:३ मध्ये सांगते, *“देवावर प्रीती करणे म्हणजे त्याच्या आज्ञापालन करणे.”* येशूच्या आज्ञा आपल्याला प्रीतीची अभिव्यक्ती दर्शवतात, परंतु जर मला त्याचा सारांश सांगायचा असेल तर तर मी सांगेल मत्तय ७:१२ *"यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्यात असे तुम्हास वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा, कारण नियमशास्त्राच्या व संदेष्टयांच्या शिकवणीचे सार हेच आहे."* हा त्यांचा प्रश्न नाही जे मंडळी मध्ये खालच्या दर्जाचे आहेत जे माझ्यावर प्रीति करत नाही, माझी काळजी करत नाही अस आणी तस. पवित्र शास्त्र सांगते की एखाद्याने तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हाला वाटत

असेल तसे तुम्ही प्रथम त्यांच्याशी वागा. हिच प्रीति आहे. स्वत: एवजी इतर लोकांच्या कल्याणाचा आणि फायद्याचा शोध घेणे हे आपला देह, आपल्या स्वाभविक मेंदूच्या विरुद्ध जाते. त्याला देव लागतो. हे देवाशिवाय प्रकट होऊ शकते असे मी म्हणत आहे असे समजू नका. पवित्र शास्त्र सांगते, आत्म्याचे फळ प्रीति आहे,आणि देव प्रीति आहे. तो प्रीतिचा उगम आहे आणि जो त्याच्या आज्ञांद्वारे प्रीति कशी करावी हे दाखवेल. तोच एक आहे जो आपल्याला ताकद देईल अगदी आपल्या देहाद्वारे, योग्य निवड करण्यासाठी, योग्य निर्णय घेण्यासाठी आणि योग्य तत्त्वांवर कार्य करण्यासाठी.

एके दिवशी मला बाहेर जायचे होते आणि नेहमी प्रमाणे काम केल्यावर प्रार्थना करायची होती. मी एका उद्यानात होतो, आणि मी म्हणालो, "देवा, मला खरच कुणाची तरी सेवा करायची आहे". तो खूपच उबदार दिवस होता आणि मी एका लहान मुलाला आणि एका लहान मुलीला पाळण्यावर बसलेले पाहिले. तिथे अजून एक पाळणा मोकळा होता म्हणुन मी त्याच्यावर जाऊन बसलो. मी त्या लहान मुलीकडे वळलो आणि म्हणालो, "किती चांगला दिवस आहे ना?" ती म्हणाली, "मला इंग्रजी बोलता येत नाही," आणि मी विचारले, "तुम्ही कुठून आलात?" ती रोमानियाची असल्याचे सांगितले. मला माहित होते की त्या भागात रोमानियन लोक आहेत आणि मी हे लोक माझ्याकडे पाहत असल्याचे पाहिले कदाचित मी त्यांच्या मुलांशी का बोलत आहे म्हणुन आश्चर्य करीत असतील. मी पुढे गेलो आणि म्हणालो की, “मला तुमची मदत करायची आहे." ते म्हणाले, "तुम्हाला आमची मदत करायची आहे?" तुम्ही आम्हाला मदत का करू इच्छिता? तुम्ही आम्हाला ओळखतही नाही! "मी म्हणालो, कारण देव तुम्हाला मदत करू इच्छितो." मी पहिले योहान ३:१८ प्रमाणे प्रीतिच्या तत्त्वांवर मनन करत होतो जे सांगत, *"प्रिय मुलांनो, आपण शब्दाने किंवा जीभेने नव्हे, तर कृतीने व खरेपणाने प्रीती करावी."* आम्ही केवळ आपल्या मुखाच्या शब्दांने प्रीती करू नये, तर त्याबरोबर आमच्या कृती देखील असायला पाहीजे. जरी मी सहसा माझ्या बरोहर पैसे ठेवत नसलो, तरी त्या दिवशी माझ्या खिशात थोडेसे पैसे होते. मी त्यांना गाठले, व म्हणालो "हे तुमच्यासाठी आहे, आणि त्यांना पैसे दिले. मी त्या दिवशी उपवास करत असल्याने, माझ्याजवळ थोडे अन्न होते, म्हणून मी म्हणालो, "तुमच्या कुटुंबासाठी हे काही अन्न आहे."

त्यांच्या हृदयाला स्पर्श झाला, ते म्हणाले, "कोण आहात तुम्ही?" मी म्हणालो "देवाने आज आपल्याला भेटण्यासाठी दैवी नेमणूक केली आहे, आणि मी तुला पुन्हा भेटायला येईल."

मी घरी गेलो आणि माझ्या पत्नीला त्यां रोमनी बरोबर झालेल्या भेटीविषयी सांगितले. मी आमच्या फ्रीझरमधून भाजलेला मांसाचा तुकडा काढुन शिजवला. दुस-या दिवशी मी दुकाना मधून थाळीने भरलेला बॉक्स विकत घेतला आणि परत माझ्या बायकोसह उद्यानात आलो. रोमेनीयन लोग आणि त्यांची मुले तेथे होती, मी म्हणालो, "मी तुमच्यासाठी भेटवस्तू घेऊन आलो आहे. ते भारी आहेत, म्हणून ते माझ्या गाडी मध्ये ठेवले आहे आणि जर तुम्ही मला सांगितले तुम्ही कुठे राहता तर त्या वस्तु मी तुमच्या घरी पोहोचते करेल. जेव्हा आम्ही त्यांच्या एका बेडरूमच्या छोट्याशा खोलीत आलो, मी विशेष प्रकारच्या थाळी आणि चांदीचा लेप असलेली भांडी घेतली - सर्वकाही व्यवस्थीत जमले. मी बॉक्स मधुन ते काढले आणि त्यांना एक एक देण्यास सुरुवात केली. जशी मी ते देवु लागलो, यांच्या चेहऱ्यावर अश्रू ढळू लागले आणि ती स्त्री म्हणाली, “मला रडु येतय! मला रडु येतय!” "मी म्हणालो," आमच्या घरी सोमवारी रात्री पवित्र शास्त्राचे अध्ययन आहे आणि मी तुम्हाला तेथे येण्यास आमंत्रित करू इच्छितो. “ते म्हणाले" आम्हाला यायचे आहे, पण मी म्हणालो, "मी तुम्हाला भेट वस्तु दिल्या आहेत म्हणून तुम्ही यावे असे मला वाटत नाही." ते म्हणाले, "नाही, आम्हाला येऊन तुमच्या मित्रांशी भेटायचं आहे.”

त्यांच्याकडे वाहतुकीचे साधन नसल्याने मी त्यांना माझ्या घरी घेवुन आलो आणि फार कमी वेळात देवाने त्यांना स्पर्श केला. ते इंग्रजी फार चांगले बोलू शकत नव्हते, परंतु जेव्हा आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना केली तेव्हा देवाने त्यांना स्पर्श केला होता. देवाचे प्रेम त्यांच्यावर प्रकट होत होते. लवकरच, आम्ही आणखी एका रोमेनीयन जोडप्याला भेटलो, आणि मी त्या पहिल्या जोडप्याला विचारले, "तुम्ही चलुन मला दुसऱ्या रोमानियन जोडप्याला भेटायला मदत कराल का?" त्यांनी होकार दिला आणि मला त्यांचा एक दिवस फोन आला. “श्रीमान डॉन, आम्ही तुमच्याबद्दल ऐकले. आमच्यात खूप एकाकीपण आल आहे आम्ही तुम्हाला भेटु इछीतो." म्हणून मी माझ्या रोमानियन मित्रांना घेऊन त्यांच्याकडे गेलो. मी त्यांच्यासेठी भेट वस्तू, भोजन आणि

सर्व प्रकारच्य वस्तू घेतल्या. मी हे करुन, त्यांना भेटत होतो, तेव्हा पहिल्या रोमानियन जोडीदाराच्या एकाने त्याना असे म्हटले, "तुम्हाला पवित्र शास्त्राच्या अध्ययना मध्ये जाण्याची गरज आहे, ते येशूविषयी सांगतात आणि ते खरच आश्चर्यकारक आहे!" ते म्हणाले, "एक मिनिट थांबा! आम्ही साम्यवादी देशातून आलो आहोत आणि आम्हाला माहित नाही देव आहे की नाही. आम्हाला ही येशू नावाची सामग्री नको."

मी म्हणालो, "मला एक मित्र होऊ द्या, आणि मी त्यांना शनिवार व रविवार बाहेर घेवुन जायाला सुरुवात केली आणि त्यांना कपडे, कोट आणि त्यांना आवश्यक असलेल्या वस्तू खरेदी केल्या. ते खूप लज्जित आणि अनिच्छुक होते. "बरं, तुम्हाला अंगरखाची गरज नाही का?" "हो मला गरज आहे, पण..." "मग हा अंगरखा तुमच्यासाठी घेऊया." मी कृतीच्या द्वारे त्यांच्यावर प्रेम करू लागलो, परंतु ते आमच्या पवित्र शास्त्राच्या अध्ययना मध्ये आले नाही जेव्हा मी त्यांना म्हणालो, "तिथे काही अमेरिकन लोक आहेत जे कदाचित तुम्हाला नोकरी मिळविण्यात मदत करतील." मग ते लगेच आले. त्या रात्री पवित्र शास्त्राच्या अध्ययनाच्या वेळी प्रभूला मी मूर्खपणाने काहीतरी म्हणालो, "प्रभू, आज रात्री तू मला अस्सल अन्य भाषेची भेट देणार आहेस कारण आम्ही एकमेकांशी अगदी चांगल्याप्रकारे संवाद साधू शकत नाही." त्या रात्री शास्त्राच्या अध्ययना नुसार काही अमेरिकन लोक होते ज्यांनी त्यांची साक्ष दिली. जेव्हा मी बोलू लागलो तेव्हा दुस-या रोमानियन जोडीची बाई हळूवारपणे आनंदीत व्हायला लागली आणि मला समजल की काहीतरी घडत आहे. अध्ययना नंतर मी म्हणालो, “मला तुमच्यासाठी प्रार्थना करु द्या, आणि जशी आम्ही प्रार्थना केली, अचानक देवाने त्यांना स्पर्श केला आणि खोलीतील संपूर्ण वातावरण देवाच्या प्रीतिने भरुन गेले. ती बाई म्हणाली, "तुम्हाला माहिती आहे, जेव्हा अमेरिकन बोलत होते तेव्हा मला त्यांच्या बोलण्याविषयी काहीही समजले नाही, परंतु जेव्हा आपण उठलात आणि येशूविषयी बोलू लागला तेव्हा, त्याचे आपल्यावर असलेले प्रीति, येशूने आपल्यासाठी काय केले ज्यामुळे आपण त्याच्याशी संबंध ठेवू शकतो, आपण बोललेले प्रत्येक शब्द मला समजले! मला ते अगदी बरोबर समजले! तो नक्कीच देव आहे! तो नक्कीच देव आहे!" परिणामी, फक्त रोमानियन लोकांचेच नाही तर आमच्या सर्वांचे जीवन बदलले.

माझे घर सोमवार रात्री आंतरराष्ट्रीय लोकानी भरले जाऊ लागले. रोमानियन, बल्गेरियन आणि रशियामधील लोक. देव त्यांचे जीवन बदलत होता आणि त्यांना माहित होते की आम्ही त्यांच्यावर प्रीति करतो. आमच्याकडे आफ्रिके मधुनही लोक होते. आम्ही क्वचितच एकमेकांशी बोल शकलो तरी एक गोष्ट त्यांना माहित होती - जेव्हा आम्ही प्रार्थना करतो तेव्हा देव स्वतःला त्यांना प्रकट करतो. त्याना हेहि ठाऊक होते की मी त्यांच्यावर प्रीति करतो आणि मी त्यांच्यासाठी काहीपण करेल. देवाने त्यांचे जीवन आणि इतर अनेक लोकांचे जीवन बदलले. हे घडले कारण एके दिवशी एका पार्कमध्ये, मी काही वेगळ्या रंगाचे, वेगळ्या राष्ट्रीयतेच्या लोकांना पाहिले. माझ्या मनात प्रेमळ भावना नव्हती, परंतु मला ठाऊक होते की प्रीति हिच आहे: ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या असे तुम्हांला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा. मला जे वाटते त्याकडे दुर्लक्ष करून त्यांचे कल्याण आणि फायदा मिळविण्याचा मी प्रयत्न केला आणि तुम्हाला माहित आहे काय झाले? त्यांनी त्याचे इतके कौतुक केले की त्यांच्यामध्ये माझ्यासाठी जी उठली ती म्हणजे फिलिया प्रीति, ती प्रीति ज्यामध्ये भावना आहे आणि ते मला म्हणायला लागले "मी तुमच्यावर प्रीति करतो" आणि मला मिठी मारली व माझे चुंबन घेतले. हे माझ्यामध्ये जे घडले तेच त्यांच्यासाठी भावना निर्माण करण्याचा प्रकार आहे. तुमच्या जीवनात भावना असणारी प्रीति हवी असल्यास, प्रीतिने वागा. आपणास कसे वाटते याकडे दुर्लक्ष करून इतरांचे कल्याण आणि त्यांचे हित मिळवा, आणि यामुळे भावनेने भरलेली प्रीति उत्पन्न होईल.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा पहिले योहान ५:३. देवप्रिती दिसून येते त्याच्या ________

**पहले योहान ५:३ -** *देवप्रिती असलेली आमची प्रीति आम्ही त्याच्या आज्ञापालनाकडून दाखवू शकतो आणि त्याच्या आज्ञा फार अवजड नाहीत.*

२. वाचा रोमकरांस पत्र १३:९-१०. स्पष्ट करा की या वचना मधील आज्ञा कशाप्रकारे प्रीति दर्शवते?

**रोमकरांस पत्र १३:९-१० -** *व्यभिचार करु नको, खून करु नको, चोरी करु नको, वाईटाचा लोभ धरु नको या आज्ञांमुळे मी असे म्हणतो आणि आणखी एखादी आज्ञा असेल तर ती आज्ञा जशी आपणांवर तशी आपल्या शेजारयावर प्रीति कर या शब्दात सामावलेली आहे. प्रीति शेजारयाचे वाईट करीत नाही, म्हणून प्रीति नियमशास्त्राची पूर्णता आहे.*

३. वाचा रोमकरास पत्र १२:१९-२१. आपण आपल्या शत्रूवर कशी प्रीति करू शकतो, आपल्याला तसे वाटत नसतानाही?

**रोमकरांस पत्र १२:१९-२१ -** *प्रिय बंधूंनो, सूड उगवू नका, देवाच्या रागाला वाट द्या. असे लिहिले आहे, सूड घेणे माझ्याकडे आहे. मी फेड करीन असे प्रभु म्हणतो. तुमचा शत्रु भुकेला असल्यास त्यास खावयास द्या, तहानेला असेल तर प्यावयास द्या. कारण असे केल्याने तुम्ही त्याच्या डोक्यावर निखारयांची रास कराल. वाइटाने जिंकले जाऊ नका तर चांगल्याने वाइटास जिंका.*

४. वाचा तीतास २:४. हा संदर्भ प्रीति बद्दल आपल्याला काय दर्शवितो?

**तीतास २:४ -** *यासाठी की, त्यांनी तरुण स्त्रियांना, त्यांच्या पतींवर प्रेम करण्यास, त्यांच्या मुलांवर प्रेम करण्यास शिकवावे.*

५. वाचा पहिले करिंथकर १३:४-८. प्रीतिच्या तत्त्वांचे तपशीलवार वर्णन करा.

**पहिले करिंथकर १३:४-८ -** *प्रीति गर्व करीत नाही. प्रीति सहनशील आहे, प्रीति दयाळू आहे, ती हेवा करीत नाही. प्रीति बढाई मारीत नाही. ती गर्वाने फुगत नाही. ती अयोग्य रीतीने वागत नाही. ती स्वार्थी नाही, ती चिडत नाही. तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ती ठेवीत नाही, वाईटात ती आनंद मानीत नाही. परंतु सत्याविषयी इतरांबरोबर ती आनंद मानते. सर्व काही खरे मानण्यास सिध्द असते, ती नेहमी विश्वास ठेवते. आशा धरते. नेहमी सहन करते. प्रीति कधी संपत नाही. पण भविष्य सांगण्याची दाने ती बाजूला केली जातील. इतर भाषा बोलण्याचे दान असेल तर ते थांबेल. ज्ञानाचे दान असेल तर ते बाजूला केले जाईल.*

६. वाचा पहिले योहान ३:१८. आपण प्रीतिचा सराव कसा केला पाहिजे?

**पहिले योहान ३:१८ -** *प्रिय मुलांनो, आपली प्रीति केवळ शब्दांनी बोलण्याएवढीच मर्यादित नसावी तर ती कृतीसहीत व खरीखुरी असावी.*

# उत्तरावली

१. वाचा पहले योहान ५:३. देवप्रिती दिसून येते त्याच्या ________

***आज्ञांद्वारे***

२. वाचा रोमकरास पत्र १३:९-१०. स्पष्ट करा की या वचना मधील आज्ञा कशाप्रकारे प्रीति दर्शवते.

***प्रीति त्याच्या शेजाऱ्याचे वाईट करत नाही. आपण आपल्या शेजाऱ्याला कसे प्रतिसाद द्यावे हे दाखवून प्रत्येक आज्ञा प्रीति दर्शवते.***

३. वाचा रोमकरास पत्र १२:१९-२१. आपण आपल्या शत्रूवर कशी प्रीति करू शकतो, आपल्याला तसे वाटत नसतानाही?

***जर आपला शत्रू भुकेला असेल तर आपण त्यांना खाऊ घालू: जर त्यांना तहान लागली असेल तर आपण त्यांना पिण्यास काहीतरी देऊ. आपण इतरांचा फायदा व कल्याण शोधू आणि आपल्याला कसे वाटते याकडे दुर्लक्ष करू***

४ . वाचा तीतास २:४. हा संदर्भ प्रीति बद्दल आपल्याला काय दर्शवितो?

***प्रीति शिकवली जाऊ शकते.ही केवळ भावना नाही***

५. वाचा पहिले करिंथकर १३:४-८. प्रीतिच्या तत्त्वांचे तपशीलवार वर्णन करा.

***"प्रीति गर्व करीत नाही.प्रीति सहनशील आहे, प्रीति दयाळू आहे, ती हेवा करीत नाही. प्रीति बढाई मारीत नाही. ती गर्वाने फुगत नाही. ती अयोग्य रीतीने वागत नाही. ती स्वार्थी नाही, ती चिडत नाही. तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ती ठेवीत नाही, वाईटात ती आनंद मानीत नाही. परंतु सत्याविषयी इतरांबरोबर ती आनंद मानते. सर्व काही खरे मानण्यास सिध्द असते, ती नेहमी विश्वास ठेवते. आशा धरते. नेहमी सहन करते. प्रीति कधी संपत नाही."***

६. वाचा पहिले योहान ३:१८. आपण प्रीतिचा सराव कसा केला पाहिजे?

***आपल्या शब्दांद्वारेच नव्हे तर आपल्या कृतीतुनही प्रीति करू या***

# पाठ १३

# परमेश्वरीय प्रकाराची प्रीति - भाग २

### *डॉन क्रो द्वारा लिखीत*

पृथ्वीवर आलेली प्रीतिचा येशू ख्रिस्त हा सर्वात मोठी अभिव्यक्ती होता, परंतु तरीही पवित्र शास्त्रामध्ये त्याची जी नोंद झाली आहे त्याप्रमाणे तो "मी तुझ्यावर प्रीति करतो" हे शब्द कधीही बोलला नाही. हे आश्चर्यकारक आहे न? प्रीतिची सर्वात मोठी अभिव्यक्ती कधीही "मी तुझ्यावर प्रीति करतो" असे म्हटले नाही. तुम्हाला माहित आहे का? कारण शब्दांपेक्षा प्रीति जास्त आहे; ती कृती आहे. समजा मी माझ्या बायकोला "मी तुझ्यावर प्रीति करतो" असे म्हटले आणि मग बाहेर जाऊन तिच्याविरुद्ध व्यभिचार केला, ती माझ्या शब्दांवर विश्वास ठेवेल की माझ्या कृतींवर? ती मझ्या कृतीनुसार माझ्यावर विश्वास ठेवेल, कारण ९५टक्के प्रीति ही शाब्दिक नाही. ती तुम्ही काय बोलता त्या गोष्टींमधुन नाही, तर तुम्ही काय करता यामधुन दिसते.

पहिले योहान ३:१८ मध्ये आपण वाचतो, *"आपण आपल्या शब्दांने किंवा जिभेने प्रीति करु नये* (फक्त आपल्या मुखातील शब्दांनेच प्रीति करु नये); *परंतु कृतीत आणि सत्यात"* (कंसात माझे). प्रीति हा एक कृती चा शब्द आहे. मत्तय २५:३५-३६ मध्ये येशू प्रीतिचे वर्णन, प्रीतिच्या कृतीतून करतो, "मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खायला घातले, मी तहानेला होतो तेव्हा तुम्ही मला प्यावयास दिले. मी कपड्यांशिवाय होतो आणि तुम्ही मला कपडे दिलेत. मी आजारी होतो आणि तुम्ही माझी काळजी घेतली." नंतर ४० व्या वचनात तो म्हणतो, "येथे असलेल्या माझ्या बांधवातील अगदी लहानातील एकाला तुम्ही केले, तर ते तुम्ही मलाच केले." पहा, प्रीति ही एक कृती आहे; हे ते

काहीतरी जे तुम्ही करता. इब्री लोकांस पत्र ६:१० म्हणते, *“कारण तुम्ही केलेली पवित्रजनांची सेवा, त्या सेवेत तुम्ही अजूनही दाखवीत असलेले सातत्य, तुमचे काम व त्याच्या लोकांना दानाद्वारे व इतर मदत करण्याद्वारे तुम्ही त्याच्यावर केलेले प्रीति ही सर्व विसरण्याइतका देव अन्यायी नाही.”* मत्तय २२ मध्ये,जेव्हा येशूला विचारण्यात आले की सर्वात मोठी आज्ञा कोणती आहे तेव्हा तो म्हणाला, की देवावर प्रीति करणे आणि आपल्या सहमानवा वर प्रीति करणे. या दोन आज्ञा खरोखर एकच आहेत, जर योग्यरित्या समजल्या गेल्या तर. जेव्हा तुम्ही या माझ्या बांधवातील अगदी लहानातील एकाला प्रीति करता तेव्हा येशू म्हणाला की तुम्ही खरोखर ती प्रीति त्याला दर्शवित आहात. पवित्र शास्त्र असे शिकवत आहे की व्यावहारिक रीतिमध्ये, इतरांवर प्रीति करून आपल्याला येशू ख्रिस्तावर प्रीति करण्याची एक उत्तम संधी आहे.

मागच्या पाठात मी एका उद्यानात भेटलेल्या रोमेनीयन लोकांबद्दल सांगितले. त्यांचे जीवन बदलण्याचे कारण हे होते की मी त्यांचे कल्याण आणि सुविधा शोधत होतो, मला कसे वाटले याची पर्वा न करता. ते एक भिन्न रंग आणि भिन्न राष्ट्रीयत्वाचे होते, पण मला माहित आहे की जसे येशूने केले तशी देवाची प्रीति व्यक्त होते,जेव्हा आपण त्यांच्याकडे जातो व त्यांच्या कल्याण व हितासाठी कृती करतो त्याला वधस्तम्भावर जाण्यासारखे वाटले नाही. तो म्हणाला, “पिता, जर आणखी कोणता मार्ग असेल तर तशाप्रकारे कर, तरीही माझी नव्हे परंतु तुझी इच्छा पूर्ण हो." येशूने त्याला कसे वाटले याची पर्वा न करता त्याने आपले कल्याण आणि आपला फायदा शोधला.

एके दिवशी मला रोमेनीयन लोकांचा फोन आला. त्यांना अश्रू अनावर झाले होते.ते अमेरिकेत साडे-सात वर्षापासुन राहत होते. ते आता कॅन्सस मध्ये राहत होते आणि काम करत होते. ते म्हणाले, "शेवटी आम्हाला आमच्या राजकीय आश्रय कागदपत्रांवर एक निर्णय मिळाले, ते आम्हाला अपील करण्यासाठी तीस दिवस देत आहेत आणि मग आम्हाला निर्वासित केले जाईल." ह्या देशात नेहमी राजकीय आश्रय मिळण्याची केवळ २ते५ टक्के शक्यता असते. रोमेनी लोक वकीलाकडे गेले आणि ते म्हणाले की मूलभूतपणे त्यांच्याकडे संधी नाही. आम्ही त्यांना सांगितले की आम्ही प्रार्थना करू आणि त्यांना

मदत करण्याचा प्रयत्न करू. कसे, हे मला माहित नव्हते. मला वाटलं की त्यांना परत पाठविणे हा एक मोठा अन्याय आहे - विशेषतः आता जेव्हा त्यांची मुले जेमतेम रोमानियन भाषा बोलू शकत होते.

माझ्या एका मित्राने आमच्या कोलोरॅडो कॉंग्रेसव्यक्तीशी संपर्क साधला, आणी रोमानियनचा आता कॅन्सस मध्ये वास्तव्य असल्याने, कॅन्सस मधील सिनेटचे सदस्य सॅम ब्राउनबॅकशी संपर्क साधा असे सांगीतले. ते छान झाले कारण माझी एक मैत्रीण आहे किम नावाची, जिने सिनेटचे सदस्य ब्राउनबॅकसाठी काम केले होते. मी किमशी संपर्क साधला आणि तिला या प्रकरणात काम करणारे वॉशिंग्टन डी.सी. मध्ये चार लोक मिळाले. कॅन्ससच्या सुब्लेट मधील समुदायनी त्यांना हे रोमन लोक हवे आहेत असे सांगून स्वाक्षरीची याचिका तैयार करुन रोमानियन लोकांना पाठींबा दिला." ते लोक चांगले आहेत, ते कर भरतात आणि ते कठोर परिश्रम करतात. आम्हाला ते इथे हवे आहेत." जे घडले त्याबद्दल, वृत्त पत्राचा एक लेख पूर्ण पान भरुन होता, तो एक चमत्कार होता, आणि तेथे आमच्या सरकारमधील उच्च अधिकारी होते हे समजून घेण्यासाठी की काय घडत आहे, रोमन लोकांना पुन्हा एक पत्र आले की सरकारचा निर्णय बदलला आहे व ते आता अमेरिकेमध्ये राहू शकतात.

मी कॅन्सासच्या सबलेट येथे गेलो. मी येत आहे हे माझ्या मित्रांना माहित नव्हते, आणि मी तिथे पोहोचलो तेव्हा ते फोनवर सिनेटर ब्राउनबॅकचे आभार मानत होते, त्यांचे राजकीय आश्रय घेण्यास मदत केल्याबद्दल. तो तेथे वैयक्तिकरित्या असू शकत नाही कारण तो अध्यक्ष क्लिंटन यांचा महाभियोग सुनावणी चा शेवटचा दिवस होता, परंतु एबीसी आणि एनबीसी न्यूज त्यांच्या कॅमेरा सहीत तेथे होते. जसा त्यानी फोन ठेवला तसे ते माझ्याकडे पळत आले आणि मला मिठी मारली आणि कॅमेरे लगेच माझ्याकडे वळले. ते म्हणाले, "तुम्ही कोण आहात, आणि या लोकांना तुम्ही कसे ओळखता?" मी त्यांना संपूर्ण कथा सांगितली की, मी त्यांना कसे भेटलो आणि त्यांचे कल्याण आणि फायदा करण्यासाठी कोणते प्रयत्न केले देवामुळे आणि जे येशू मत्तय ७:१२ मध्ये म्हणाला.

त्यानंतर आम्ही व्यायामषाळेत गेलो जिथे सर्वत्र लाल, पांढरे, आणि निळे फुगे लावले होते आणि देशभक्तीपर गीते गायली जात होती. जेव्हा माझे मित्र आत आले, तेव्हा प्रत्येकजण आरडाओरडा करू लागला आणि माझे मित्र रडत होते.शहरातील महापौर म्हणाले, "आज १२ फेब्रुवारी रोजी या रोमानि लोकांच्या सन्मानार्थ ज्यूकान फूमिली दिवस साजरा होणार आहे." त्यांनी अमेरिकेचा ध्वज घेतला जो सिनेटरने राजधानी वॉशिंग्टन डी.सी. मध्ये फडकवला होता त्यांच्या सन्मानार्थ त्यांना तो सादर केला. त्यांनी त्यांना कागदपत्रे देखील सादर केली ज्यात ते कायदेशीररित्या - मूलभूतपणे आयुष्यभर राहण्यास सक्षम आहेत. त्या सर्वांनी साक्ष दिली आणि नंतर मला प्रार्थना करण्यास सांगितले. मी म्हणालो, "येथे एक व्यक्ती आहे ज्याचे आज आपण आभार अजुनही पूर्णपणे मानले नाही, तो सर्वशक्तिमान परमेश्वर आहे. त्याच कोलोरॅडो स्प्रिंग्ज, सीओ, मधील एका पार्क मध्ये साडेसात वर्षांपूर्वी मी देवाला मागत होतो, त्याला सांगत होतो की मला त्या दिवशी त्याची प्रीति कोणापर्यंत तरी पोहोचवायची आहे. माझे रोमेनीयन लोकांकडे नेतृत्व झाले." नंतर मी ही गोष्ट त्यांना पुन्हा सांगितली आणि म्हणालो, "देव तुम्हाला मदत करू इच्छितो - यू.एस.ए. मध्ये आपले स्वागत आहे."

ज्या प्रकारे हे सर्व घडले तो एक चमत्कारच होता. योग्य ठिकाणी योग्य वेळी योग्य व्यक्ती मला माहित होते. एक वर्षापुर्वीच माझी मैत्रीण किम हिने अँड्यूँ वोमॅक सेवा कार्यात सिनेटचे सदस्य ब्राउनबॅकला येऊन भेटण्याची व्यवस्था केली होती. ती म्हणाली, "तुम्हाला फक्त डॉन क्रो यांना भेटण्याची गरज आहे." मला माहित नाही का मी खूप अस्वस्थ होतो. मला माहित नव्हते की देव एखाद्या कुटुंबाला मदत करण्यासाठी कशाप्रकारे गोष्टी तयार करीत आहे ज्यांच्यावर त्याने स्वतःचा प्रीतिचा खुलासा केला, फक्त येशूच्या आज्ञेमुळे की तुम्हाला एखाद्याने तुमच्यासाठी जे करावे अशी तुमची इच्छा आहे, त्यांच्यासाठी तुम्ही ते करावे. हा चमत्कार ते कधीही विसरणार नाहीत, आणि ते आज तुम्हाला सांगतील की, "हे देवामुळेच आहे." रोमानियन महिला, आंका म्हणाली, "माझा विश्वास कमी झाला, पण देव विश्वासू आहे आणि त्याने आम्हाला अमेरिकेत राहण्याची परवानगी दिली."

प्रीतिसाठी आजही असंख्य लोक आरोळी मारत आहेत. ती त्यांना मिळण्याचा एकमात्र मार्ग आहे, जेव्हा तुम्ही व मी देवाच्या वचनातील प्रीतिची तत्त्वे समजून घेण्याचा निर्णय घेऊ.प्रीति दयाळू आहे, प्रीति इतरांचे देखील कल्याण इच्छिते - जसे येशूने देखील आमचे कल्याण इच्छिले ज्यावेळी तो वधस्तंभावर गेला. प्रभू तुम्हास आशीर्वाद देवो जसे तुम्ही देवाच्या प्रीतिने प्रीति करणे म्हणजे नेमके काय या तत्त्वांना अधिक समजुन घेता.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मत्तय ७:१२. तुमच्या स्वतःच्या शब्दात सांगा, सुवर्ण नियम काय आहे.

**मत्तय ७:१२ -** *यासाठी ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या असे तुम्हांला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा. कारण नियमशास्त्राच्या व संदेष्टेयांच्या शिकवणीचे सार हेच आहे.*

२. वाचा मत्तय ७:१२. प्रीति शोधण्याचा प्रयत्न करताना, बरेच लोक योग्य व्यक्ती शोधण्यासाठी प्रयत्न करतात. तुम्ही योग्य व्यक्ती शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे किंवा योग्य व्यक्ती बनण्याचा?

३. पहिले योहान ५:३ वाचा. प्रीति ही केवळ एक भावना आहे किंवा तुम्ही जे काही करता ती प्रीति आहे?

**पहिले योहान ५:३ -** *देवाप्रती असलेली आमची प्रीति आम्ही त्याच्या आज्ञापालनाकडून दाखवूशकतो आणि त्याच्या आज्ञा फार अवजड नाहीत.*

४. वाचा पहिले योहान ३:१८. जर तुम्ही तुमच्या पत्नीला किंवा पतीला सांगितले की “मी तुझ्यावर प्रीति करतो/करते!" परंतु बाहेर जाऊन व्यभिचार केला, तर ती/तो त्या शब्दावर किंवा त्या कृतीवर विश्वास ठेवील?

**पहिले योहान ३:१८ -** *प्रिय मुलांनो, आपली प्रीति केवळ शब्दांनी बोलण्याएवढीच मर्यादित नसावी तर ती कृतीसहीत व खरीखुरी असावी.*

५. वाचा रोमकरांस पत्र ५:६-८. येशूला मरावेसे वाटले असे तुम्हाला वाटते का?

**रोमकरांस पत्र ५:६-८ -** *आम्ही जेव्हा आमचे स्वतःचे तारण करण्यासाठी अशक्त होतो तेव्हा ख्रिस्त योग्य वेळी आमच्यासाठी*

*मरण पावला. आता नीतिमान मनुष्यासाठी सुध्दा कदाचित कोणी मरणार नाही. एखादा मनुष्य चांगला असेल तर त्याच्यासाठी मरण्याचे धाडस कदाचित कोणीतरी करील. परंतु आम्ही पापी असतानाच खिस्त आमच्यासाठी मरण पावला. त्याद्वारे त्याने दाखवून दिले की, तो आमच्यावर फार प्रेम करतो.*

६. वाचा गलतीकरांस पत्र ५:२२. देवाला आपल्या जीवनाचे केंद्र केल्या शिवाय आपण खरोखर प्रीति करू शकतो का?

**गलतीकरांस पत्र ५:२२ -** *पण आत्मा या गोष्टी निर्माण करतोः प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वास.*

७. वाचा पहिले योहान ४:८. आपल्याला दुस-यावर प्रीति करण्यासाठी, देवाच्या मदतीची खरच गरज आहे कारण तोच फक्त एकमेव ____________________ आहे.

**पहिले योहान ४:८ -** *जो प्रीति करतो तो देवाचे मूल होतो आणि देवाला ओळखतो. जो प्रीति करीत नाही, त्याची देवाशी ओळख झालेलीच नाही. कारण देव प्रीति आहे.*

८. वाचा पहिले करिंथकर १३:५. खालील शब्दांमधून निवडा प्रीति काय नाही याचे हे वर्णन आहे: असभ्य, स्वार्थी, क्षमा न करणारा.

**पहिले करिंथकर १३:५ -** *ती गर्वाने फुगत नाही. ती अयोग्य रीतीने वागत नाही. ती स्वार्थी नाही, ती चिडत नाही. तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ती ठेवीत नाही.*

९. वाचा पहिले करिंथकरांस पत्र १३:८. अस काय आहे जे तुम्ही या जीवनातून पुढील जीवनात किंवा मृत्यू नंतर न्याल?

**पहिले करिंथकरांस पत्र १३:८ -** *ती नेहमी विश्वास ठेवते. आशा धरते. नेहमी सहन करते. प्रीति कधी संपत नाही. पण भविष्य सांगण्याची दाने ती बाजूला केली जातील. इतर भाषा बोलण्याचे दान असेल तर ते थांबेल. ज्ञानाचे दान असेल तर ते बाजूला केले जाईल.*

१०. वाचा नीतिसूत्रे १०:१२. पहिले करिंथकरांस पत्र १३:५ म्हणतात, “प्रीति कधी तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ठेवीत नाही.” प्रीति किती पाप झांकेल?

**नीतिसूत्रे १०:१२ -** *मत्सरमुळे वादविवाद होतात. पण प्रीति लोकांनी केलेल्या प्रत्येक चुकीच्या गोष्टीला क्षमा करते.*

# उत्तरावली

१. वाचा मत्तय ७:१२. तुमच्या स्वतःच्या शब्दात सांगा, सुवर्ण नियम काय आहे.

***ज्या गोष्टी लोकांनी तुमच्यासाठी कराव्या असे तुम्हांला वाटते त्या सर्व गोष्टी तुम्हीही त्यांच्यासाठी करा.***

२. वाचा मत्तय ७:१२. प्रीति शोधण्याचा प्रयत्न करताना, बरेच लोक योग्य व्यक्ती शोधण्यासाठी प्रयत्न करतात. तुम्ही योग्य व्यक्ती शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे किंवा योग्य व्यक्ती बनण्याचा?

***योग्य व्यक्ती बनण्याचा***

३. पहिले योहान ५:३ वाचा. प्रीति ही केवळ एक भावना आहे किंवा तुम्ही जे काही करता ती प्रीति आहे?

***देवाच्या तत्त्वां चा उपयोग करुनआपण हे करत आहोत. (आज्ञा)***

४. वाचा पहिले योहान ३:१८. जर तुम्ही तुमच्या पत्नीला किंवा पतीला सांगितले की "मी तुझ्यावर प्रीति करतो/करते!" परंतु बाहेर जाऊन व्यभिचार केला, तर ती/तो त्या शब्दावर किंवा त्या कृतीवर विश्वास ठेवील?

***तुमच्या कृती वर. शब्दांपेक्षा कृती मध्ये जास्त प्रभाव असतो***

५. वाचा रोमकरांस पत्र ५.६-८. येशूला मरावेसे वाटले असे तुम्हाला वाटते का?

***नाही, तरीही त्याने आमच्या सर्वांचे हित आणि कल्याण शोधले, त्याला कसे वाटले याबद्दल पर्वा न करता.***

६. वाचा गलतीकरांस पत्र ५:२२. देवाला आपल्या जीवनाचे केंद्र केल्या शिवाय आपण खरोखर प्रीति करू शकतो का?

***नाही***

७. वाचा पहिले योहान ४:८. आपल्याला दुस-यावर प्रीति करण्यासाठी, देवाच्या मदतीची खरच गरज आहे कारण तोच फक्त एकमेव __________ आहे.

***प्रीति***

८. वाचा पहिले करिंथकर १३:५. खालील शब्दांमधून निवडा प्रीति काय नाही याचे हे वर्णन आहे:

***असभ्य, स्वार्थी, क्षमा न करणारा. हे सर्व शब्द प्रेम काय नाही याचे वर्णन करतात***

***हे सर्व शब्द (असभ्य, स्वार्थी आणि क्षमा न करणे) वर्णन करतात की काय प्रेम नाही आहे.***

९. वाचा पहिले करिंथकरांस पत्र १३:८. अस काय आहे जे तुम्ही या जीवनातून पुढील जीवनात किंवा मृत्यू नंतर न्याल?

***प्रीति, हीच कायम टिकेल***

१०. वाचा नीतिसूत्रे १०:१२. पहिले करिंथकरांस पत्र १३:५ म्हणतात, “प्रीति कधी तिच्याविरुद्ध केलेल्याची नोंद ठेवीत नाही.” प्रीति किती पाप झांकेल?

***सर्व पाप***

# पाठ १४

# वित्त - भाग १

## *अॅन्ड्र्यू वोमॅक द्‌वारा लिखीत*

आपण आर्थिक रितीने उन्नती करावी अशी येशूची इच्छा आहे. ही प्रत्येकासाठी महत्वाची बाब आहे. जगण्यासाठी, आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि दुस-याना आशीर्वाद होण्यासाठी पैसे लागतात. देवाने या क्षेत्रात आम्हाला एकटे सोडले नाही आणि म्हटले नाही की, "मला तुमच्या आत्मीक भागाविषयी काळजी आहे, परंतु मला तुमच्या आर्थिक भागाची काळजी नाही .... तुम्ही स्वतः ते पाहून घ्या." नाही, तो तुमच्यावर प्रत्येक भागात प्रीति करतो - आत्मा, जीव आणि शरीर - आणि त्याने आपल्यासाठी तरतूद, पुरवठा केला आहे. बहुतेक लोक असे समजतात की काही प्रमाणात आर्थिक भरभराट होणे आवश्यक आहे, परंतु धर्माने मुळात विपुलतेच्या विरोधात भूमिका घेतली आहे.

हाव करण्याविरूद्ध देवाचे वचन ब-याच वेगवेगळ्या रीतिने शिकवते परंतु हे देखील स्पष्ट करते की वित्त हे एक आशीर्वाद आहे. तिसरे योहान २ मध्ये, प्रेषित योहान म्हणाला, *“प्रियानो, जसे आध्यात्मिक जीवनात तुझे चांगले चालले आहे हे मला माहीत आहे तसेच इतर बाबतीतही तुझे चांगले चालावे आणि तुझे आरोग्य चांगले असावे अशी मी प्रार्थना करतो.”* किती ठाम विधान आहे हे. योहान म्हणतो, “सर्व गोष्टींपेक्षा जास्त!” हे बोलत आहे आरोग्य, भावना, नातेसंबंध आणि वित्तपुरवठा याबद्दल. प्रभुची इच्छा आहे की तुम्ही इतर सर्व गोष्टींपेक्षा समृद्ध व्हावे आणि निरोगी रहावे. तुम्ही आत्मा. जीव आणि शरीराने समृद्ध व्हावे अशी त्याची इच्छा आहे. आपल्यासाठी हीच त्याची इच्छा आहे.

बरेच धर्मासंबंधीचे लोक असे म्हणतात की तुम्ही गरीब रहावे अशी देवाची इच्छा आहे, गरीब असणे ही एक दैवी गोष्ट आहे आणि जितके तुम्ही गरीब आहात तितके तुम्ही दैवी आहात. मी अशा प्रकारच्या विचारसरणीत वाढलो आहे, की उपदेशकां कडे जास्त प्रमाणात नसावे, खिस्ती व्यक्तीकडे नेहमी अभाव असावा. हे निश्चितच शास्त्रवचनांद्वारे सिद्ध करता येत नाही. अब्राहम त्याच्या काळात सर्वात श्रीमंत माणूस होता, म्हणूनच राजांनी त्याला तेथून जाण्यास सांगितले कारण त्याच्या मालमत्तेचा त्यांच्या देशाच्या संपत्तीवर परिणाम होत होता. इसहाक व याकोब यांच्या बाबतीतही असेच होते. योसेफ सुद्धा असा व्यक्ती होता जो श्रीमंत होता आणि त्याच्या जवळ भरपूर विपुलता होती. दावीदाने परमेश्वराला त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक खजिन्यातुन मंदिर बांधायला सोन्या-चांदीच्या, सुमारे २.५ अब्ज डॉलर्स च्या किंमती वस्तू दिल्या. दावीदाचा मुलगा, शलमोन हा पृथ्वीवर असलेला आतापर्यंतचा सर्वात श्रीमंत माणूस होता. जेव्हा तुम्ही शास्त्रानुसार पाहता,तेव्हा ज्या लोकांनी खरच देवाची सेवा केली आहे त्यांना आर्थिक दृष्टी ने आशीर्वादच मिळाला आहे.

अशा लोकांची उदाहरणे देखील आहेत ज्यांनी संघर्ष केला आणि त्याशिवाय कमी मध्ये देखील काम केले. फिलिप्पीकरास ४:१३ मध्ये पौल म्हणाला की, तो खिस्ता द्वारे सर्व गोष्टी करू शकतो आणि ज्या परिस्थितीत तो होता त्यात तो समाधानी राहण्यास शिकला होता. तो म्हणाला की दीन अवस्थेत कसे रहावे हे मी जाणतो आणि विपुलतेत कसे रहावे हेही मी जाणतो. काही प्रसंग असे होते जेव्हा देवाचे सेवक गरिबीतून आणि अडचणीतुन गेले, परंतु पवित्र शास्त्रात असे कोठेही आपल्याला सापडत नाही की गरीबी मुळे ते अधिक ईश्वरशील होते. हे सत्य नाही. आपण जगात जाऊन पाहू शकता ही गोष्ट प्रमाणित झालेली नाही. तर, होय, हे एक सत्य आहे की लोभ किवा हाव करणे हे चुकीचे आहे पहिले तीमथ्थी ६:१० मध्ये असे सांगते की, *"पैशाचे प्रेम हे सर्व वाईटाचे मूळ आहे,"* काही लोक हे वचन घेतात आणि म्हणतात की पैसा हा सर्व वाईटाचे मूळ आहे, परंतु वचनात असे म्हटले आहे की *"पैशाबद्दल प्रेम हे सर्व वाईटाचे मूळ आहे."* असे ही काही लोक आहेत ज्यांना पैशावर प्रेम आहे आणि त्यांच्याकडे एकही रुपया नाही; इतरांकडे चांगली संपत्ती असते पण त्यांच त्यावर प्रेम आहे अस नाही. ते फक्त त्याचा उपयोग करतात.

अनुवाद ८:१८ मध्ये आर्थिक समृद्धीचा खरा उद्देश दाखवते. परमेश्वर इस्राएल लोकांशी बोलत होता, जे शपथपुर्वक देऊ केलेल्या देशात प्रवेश करणार होते आणि त्यांना पूर्वी कधीही न मिळालेली संपत्ती आणि समृद्धी अनुभवायला मिळणार होती. तो त्यांना बोलला, *“पण तू आपला देव परमेश्वर ह्याचे स्मरण ठेव, कारण त्याने तुझ्या पूर्वजांशी शपथपूर्वक केलेला करार कायम राखण्यासाठी तोच तुला आजच्याप्रमाणे धनप्राप्ती करून घेण्याचे सामर्थ्य देत आहे.”* या शास्त्र वचनानुसार, समृद्धीचा उद्देश तुमच्या स्वतःच्या स्वार्थी हेतूसाठी भरपूर प्रमाणात असणे हा नाही,परंतु यामुळे देवाचा करार तुम्ही पृथ्वीवर स्थापित करू शकता म्हणून आहे. दुसऱ्या शब्दांत, देव तुम्हाला आशीर्वाद देईल जेणेकरून तुम्ही देखील दुसऱ्यासाठी एक आशीर्वाद होऊ शकाल. उत्पत्ति १२:२ मध्ये परमेश्वर अब्राहामाला बोलला, *“मी तुला आशीर्वाद देईन व तुझे नाव मोठे करीन; आणि तू एक आशीर्वाद होशील.”* तुम्ही इतर कोणासाठीही आशीर्वाद होण्यापूर्वी, तुम्ही स्वतः आशीर्वादीत व्हायला हवे.

तुम्हाला काही गोष्टींची गरज आहे आणि काही गरजा आहेत ज्या देवाला पूर्ण करायच्या आहेत, पण त्या स्वार्थी गोष्टींच्या पलीकडे आहेत. त्याला तुम्हाला समृद्ध करायच आहे जेणेकरून त्या भरभराटीतुन तो तुम्हाला एक आशीर्वाद बनवु शकेल. दुसरे करिंथकरांस पत्र ९:८ मध्ये असे सांगते, *“सर्व प्रकारची कृपा तुमच्यावर विपुल होऊ देण्यास देव समर्थ आहे; ह्यासाठी की, तुम्हांला सर्व गोष्टींत सगळा पुरवठा नेहमी होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सर्वकाही तुमच्याजवळ विपुल व्हावे.”* हे सांगते की देव तुम्हाला समृद्ध का करणार आहे - जेणेकरून तुम्ही प्रत्येक चांगल्या कार्यासाठी विपुल असे होऊ शकता. हे प्रत्यक्षात समृद्धीच्या शास्त्रीय परिभाषाप्रमाणे आहे. समृद्धी म्हणजे काय? खरचं एक छान घर असणे, एक छान कार, चांगले कपडे आणि आपल्या टेबलवर जेवण असणे हे आहे का? या वचना अनुसार, त्या तुमच्या सर्व गरजा आणि प्रत्येक चांगले कार्य पुरे होण्यासाठी भरपुर आहे. तुम्ही जर तुम्हाला वाटत असलेल्या गोष्टी देण्याकरिता तुम्ही अक्षम असाल ज्या विषयी देवाने कोणला देण्यास तुमच्या हृदयात प्रेरणा दिली असेल, किंवा आपण एखाद्यास आशीर्वाद म्हणुन मदत करु इच्छितो परंतु अक्षम आहात, तर तुम्ही पवित्र शास्त्र म्हणते त्यानुसार आर्थिक

उन्नती करीत नाही आहात. देव म्हणतो की तो तुमच्या सर्व गरजा पूर्ण करेल आणि तुम्ही प्रत्येक चांगल्या कार्यासाठी विपुल ठराल.

पवित्र शास्त्रा संबंधीत खरी समृद्धी फक्त तुमच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नाही, परंतु तुम्ही इतर लोकांना आशीर्वाद असू शकता ही आहे. जो व्यक्ती केवळ स्वत:चा विचार करतो तो खरोखर स्वार्थी आहे. जर कोणी म्हणतो *"मी देवावर वाढीसाठी विश्वास ठेवतो" तर, इतरांना ते लोभ किंवा स्वार्थी वाटू शकते, परंतु ते हेतू वर अवलंबून आहे.* जर तुम्ही देवाकडे मोठे होण्यासाठी जास्त मागितले जसे की एक मोठे घर किंवा एक चांगली कार तर, तो योग्य शास्त्र लिखीत दृष्टीकोन नाही. परंतु जर तुम्ही देवावर आर्थीक वाढीसाठी विश्वास ठेवत आहात कारण तुम्ही तुमच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यापेक्षा पहिले इतरांना देऊन त्यांचे भले करु इच्छिता, अशी तुमची मनोवृत्ती असावी हि त्याची इच्छा आहे. तुम्ही समृद्ध व्हावे अशी त्याची इच्छा आहे. तुमची भरभराट व्हावी ही त्याची इच्छा आहे.

मत्तय ६ आपल्याला आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल सांगते आणि नंतर हेही सांगते की पहिल्यांदा तुम्ही देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळविण्याचा प्रयत्न करा म्हणजे त्याबरोबर याही सर्व गोष्टी तुम्हांला मिळतील. जेव्हा तुम्ही तुमच्या जीवनात देवाला प्रथम स्थान देऊ लागाल,तेव्हा तो या सर्व गोष्टींचा पुरवठा करेल. तुमच्या सर्व गरजा पूर्ण केल्या जातील, आणि इतर लोकांसाठी तुम्ही आशीर्वाद असे व्हाल. देव तुम्हाला संपन्न करू इच्छितो, परंतु या क्षेत्रात ती खरोखर तुमच्या हेतूवर आणि तुमच्या कृतींवर अवलंबून आहे.

मी प्रार्थना करतो की, याद्वारे तुम्हांला आव्हान मिळाले आहे आणि आजपासून तुम्ही विश्वास ठेवण्यास सुरुवात करणार आहात देवाकडुन उत्तम मिळण्यास जे तुमच्या उत्कर्षासाठी आहे.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:७-८. जेव्हा तुम्ही गरजू लोकाना देता तेव्हा हा एक मार्ग आहे जो तुम्ही सिद्ध करू शकता की?

**दुसरे करिंथकरांस पत्र ८:७-८ -** *म्हणून जसे तुम्ही सर्व गोष्टीत, म्हणजे विश्वासात, बोलण्यात ज्ञानात व सर्व आस्थेत व आम्हांवरील आपल्या प्रीतीत वाढला आहा, तसे तुम्ही या कृपेतही (उदारतेने देण्यात) फार वाढावे. मी तुम्हांला आज्ञा करीत नाही, पण मला तुमच्या प्रेमच्या प्रामाणिकतेची तुलना इतरांच्या आस्थेशी करायची आहे.*

२. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:१३-१४. आपण सर्वजण मिळून देण्यास एकत्र येतो तेव्हा देवाला काय हव असत?

**दुसरे करिंथकरांस पत्र ८:१३-१४ -** *दुसऱ्याचे ओझे हलके करण्यासाठी तुमच्यावर ओझे लादावे असे नाही तर समानता असावी म्हणून. सध्याच्या काळात तुमच्या विपुलतेतून त्यांची गरज भागावी. यासाठी की नंतर त्यांच्या विपुलतेमुळे तुमच्या गरजा भागविल्या जाव्यात. मग समानता येईल.*

३. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:१३-१४. प्रत्येकाची गरज कशी पूर्ण होईल?

४. वाचा इफिसकरास पत्र ४:२८. चोर असलेल्या व्यक्तीने यापुढे चोरी करू नये त्याऐवजी काम करून स्वतःचा उदरनिर्वाह करायला सुरुवात करावी. इफिसकरास पत्र ४:२८ सुद्धा काय सांगते त्यांनी करायला पाहिजे?

**इफिसकरास पत्र ४:२८ -** *जो कोणी चोरी करीत असेल तर त्याने यापुढे चोरी करु नये. उलट, त्याने आपल्या हातांनी काम करावे यासाठी की जो कोणी गरजू असेल त्याला त्यातून वाटा देण्यासाठी त्याच्याकडे काहीतरी असावे.*

५. वाचा उत्पत्ति १३:२ आणि १२:२. परमेश्वर देव अब्राहमाला श्रीमंती देऊन त्यावर विश्वास ठेवू शकला कारण अब्राहम फक्त स्वतः विषयी विचार करीत नव्हता पण तो इतरांकरिता ____________ होता.

**उत्पत्ति १३:२ -** *त्या काळी अब्राम फार श्रीमंत झाला होता; त्याच्याजवळ पुष्कळ गुरेढोरे, शेरेडे मेंढरे, गाढवे व उंट तसेच सोने चांदी इत्यादी भरपूर होते.*

**उत्पत्ति १२:२ -** *मी तुला आशीर्वाद देईन, तूझ्या पासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुझे नाव मोठे करीन, लोक तुझ्या नावाने इतरांना आशीर्वाद देतील.*

६. वाचा पहिले तीमथ्यी ६:१७-१८. श्रीमंतांनी त्यांच्या पैशाने कोणत्या तीन गोष्टी कराव्या?

**पहिले तीमथ्यी ६:१७-१८ -** *या युगातील श्रीमंतास आज्ञा कर की, गर्विष्ठ होऊ नका. पैसा जो चंचल आहे त्यावर त्यांनी आशा ठेवू नये, परंतु देव जो विपुलपणे उपभोगासाठी सर्व पुरवितो त्यावर आशा ठेवावी. चांगले करण्याची त्यांना आज्ञा कर चांगल्या कृत्यात धनवान आणि उदार असावे. व स्वतःजवळ जे आहे त्यात इतरांबरोबर सहभागी होण्याची इच्छा असावी.*

७. देव तुमच्यावर आर्थिक बाबतीत विश्वास ठेवू शकतो का?

# उत्तरावली

१. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:७-८. जेव्हा तुम्ही गरजू लोकाना देता तेव्हा हा एक मार्ग आहे जो तुम्ही सिद्ध करू शकता की?

***तुमचे प्रेम खरे आहे***

२. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:१३-१४. आपण सर्वजण मिळून देण्यास एकत्र येतो तेव्हा देवाला काय हव असत?

***समानता, प्रत्येकाने जे शक्य आहे ते द्यावे***

३. वाचा दुसरे करिंथकरांस पत्र ८:१३-१४. प्रत्येकाची गरज कशी पूर्ण होईल?

***जेंव्हा जे शक्य आहे ते देऊन***

४. वाचा इफिसकरास पत्र ४:२८. चोर असलेल्या व्यक्तीने यापुढे चोरी करू नये त्याऐवजी काम करून स्वतःचा उदरनिर्वाह करायला सुरुवात करावी. इफिसकरास पत्र ४:२८ सुद्धा काय सांगते त्यांनी करायला पाहिजे?

***गरीब, गरजवंताना द्यायला पाहिजे***

५. वाचा उत्पत्ति १३:२ आणि १२:२. देव अब्राहामावर श्रीमंती देऊन विश्वास ठेवू शकला कारण अब्राहम फक्त स्वतःविषयी विचार करीत नव्हता पण इतरांकरिता ______________ होता.

***आशीर्वाद***

६. वाचा पहिले तीमथ्यी ६:१७-१८. श्रीमंतांनी त्यांच्या पैशाने कोणत्या तीन गोष्टी कराव्या?

***चांगलेच करावे, गरजूंना उदारपणाने द्यावे, देवाने त्यांना जे काही दिलेले आहे, ते इतरांसह सामायिक करावे***

७. देव तुमच्यावर आर्थिक बाबतीत विश्वास ठेवू शकतो का?

# पाठ १५

# वित्त - भाग २

### *अ‍ॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

मागच्या पाठात, मी स्पष्ट केले की तुम्ही समृद्ध व्हावे ही देवाची इच्छा आहे. हे कसे कार्य करते याच्या काही किल्ल्या आहेत. लूक ६:३८ म्हणतो, *"दुसऱ्यांना द्या म्हणजे तुम्हालाही दिले जाईल. तुमच्या पदरात हलवून, दाबून, ओसंडून वाहणारे उत्तम माप ओतले जाईल. जे माप तुम्ही दुसऱ्यांसाठी वापरता त्याच मापाने तुम्हांला दिले जाईल."* त्यात अनेक तत्त्वे समावलेले आहेत, परंतु तुम्ही देण्याबद्दल बोलल्याशिवाय समृद्धीबद्दल बोलू शकत नाही.

जेव्हा तुम्ही आर्थिक समृद्धीबद्दल बोलता तेव्हा बरेच लोक असे म्हणतात, "ठीक आहे, म्हणजे देव मला समृद्ध करू इच्छितो, पण माझ्याकडे ते देण्यासाठी नाही." शास्त्रा मध्ये तुम्ही पाहू शकता जिथे येशू त्या विधवेबद्दल बोलला जिने तिच्या शेवटच्या दोन नाणी अर्पणात टाकल्या. तो श्रीमंत लोकांना अमाप पैसे टाकताना पाहत होता, परंतु त्याने आपल्या शिष्यांना एकत्र बोलाविले आणि सांगितले की या बाईने त्या सर्वांपेक्षा अधिक पैसे दिले. त्याने हे सांगितले कारण त्यांनी त्यांच्या विपुलतेतून दिले, परंतु तिने तिच्या गरीबीतून दिले. देव तुमच्या देणगीच्या आकाराचे त्यांचे मौल्यवान मूल्य परखुन मूल्यांकन करत नाही तर त्याऐवजी तुमच्या देण्याच्या टक्केवारीनुसार. जेव्हा एखादी व्यक्ती "माझ्याकडे देण्यास काहीही नाही" असे म्हणते तेव्हा ते सत्य नाही. इतर काहीही नसल्यास तुम्ही तुमच्याकडे असलेले कपडे देऊ शकता. प्रत्येकाकडे देण्यासाठी काहीतरी असते, म्हणून तुमच्याकडे देण्यास काहीही नाही हा युक्तिवाद दूर करा. खरं तर, जेव्हा

तुमच्याकडे देण्यास काही नाही असं वाटत, त्याचवेळी तुम्हाला इतर वेळेपेक्षा जास्त टक्केवारीत देता येऊ शकत. असा व्यक्ती ज्याच्याकडे दहा रुपये आहेत आणि त्यातले पाच रुपये देऊन त्याने कितीतरी मोठे दान दिले आहे, ह्यापेक्षा ज्याच्याजवळ कोट्यवधी आणि कोट्यावधी शिल्लक असताना सुद्धा दहा लाख रुपयेच दिले. देवाने ते बरोबर रचले आहे जेणेकरून प्रत्येक व्यक्ती देऊ शकेल.

देव आपल्याला देण्यास का सांगतो? त्यात पुष्कळ गोष्टींचा समावेश आहे, परंतु मुख्य उद्देशांपैकी एक म्हणजे देवाची ही इच्छा आहे की तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवावा. जर देव नाही आणि जर त्याचे वचन सत्य नाही तर जेव्हा तो म्हणतो, *"द्या आणि ते तुम्हाला देण्यात येईल,"* तेव्हा तुमच्याकडे जे आहे त्याचा काही भाग घेणे आणि ते कोणाला तरी देणे हे सर्वात मूर्खपणाचे काम आहे. एक एक करत तुमच्या सर्व गरजा पूर्ण करण्याच्या ऐवजी, तुम्ही खरतर त्यापासून दूर जात आहात जर देवाने तुम्हाला आशीर्वाद देण्याचे वचन दिले नसेल. देव म्हणतो तसे करण्यासाठी विश्वासाची गरज आहे, आणि म्हणूनच त्याने तुम्हाला ते करण्यास सांगितले आहे.

लूक १६ मध्ये एक दाखला आहे,एक कारभारी ज्याने आपल्या मालकाची फसवणूक केली त्याबद्दल आणि शेवटी हे सांगते कीः तो म्हणतो की तुमच्याकडे असलेले अनीतिमान पैशावर (पैशाबद्दल बोलणे) जर विश्वासू नसाल तर खरया संपत्ती विषयी कोण तुमच्यावर विश्वास ठेवण्यास वचनबद्ध होईल? जर आपण छोट्या छोट्या गोष्टींवर देवावर पैशांच्या बाबतीत विश्वास ठेवला नसल्यास, कसे आपण आध्यात्मिक सारख्या अधिक महत्त्वाच्या मूल्य गोष्टी कशा मिळू शकतो? यासारख्या शास्त्रवचनांद्वारे पैशांना कमीतकमी कारभारी पातळी मिळते. आपण आपल्या आर्थिक पैशाबद्दल देवावर विश्वास ठेवू शकत नाही तर आपण आपल्या शाश्वत नशिबा विषयी त्याच्यावर कसे विश्वास ठेवु शकता? आपण खरोखर विश्वास कसा ठेवू शकता की येशूने आपल्या पापांची क्षमा केली आहे आणि आपण अनंतकाळ स्वर्गात घालवणार आहोत? त्या तुलनेत, आध्यात्मिक गोष्टी ज्या आपण गृहित धरल्या आहेत, पैशापेक्षा आपला परमेश्वरावरील विश्वास अधिक महत्त्वपूर्ण आहे. पैसा ही एक छोटी गोष्ट आहे, परंतु देवावर

विश्वास ठेवण्याची ही तळ पातळी आहे. नीतिसूत्रे ११:२४ म्हणते की जर एखादा माणूस उदारहस्ते देत असेल तर त्याला अधिक मिळेल. पण एखाद्याने द्यायला नकार दिला तर तो गरीब होईल जो उदार होऊन देतो त्याला लाभ होतो.

जर तुम्ही प्रथम देवाचे राज्य व त्याचे नीतिमत्त्व मिळविण्याचा प्रयत्न केला तर मग तो या गोष्टी तुमच्यात जोड करेल. जर आपण असे म्हटले की माझ्या आर्थिक मदतीसाठी, मला देव हवा आहे, मला मदत करण्यासाठी आणि आपण त्याच्या मदतीसाठी प्रार्थना करीत आहात - परंतु प्रथम देवाचे राज्य शोधत नाही आणि आपण एक विश्वासाचे एक चरण घेत नाही, आपल्या पैशाविषयी त्याच्यावर विश्वास ठेवणे आणि नंतर देत नाही तर आपण खरोखर त्याच्यावर विश्वास ठेवत नाही.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा योहान ३:१६. देव देण्यासाठी का प्रेरित झाला?

**योहान ३:१६ -** *देवाने जगावर एवढी प्रीति केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला. देवाने आपला पुत्र यासाठी दिला की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला अनतंकाळचे जीवन मिळावे.*

२. वाचा १ करिंथकरांस पत्र १३:३. आमच्या देण्यामागील कोणती प्रेरणा असणे आवश्यक आहे?

**१ करिंथकरांस पत्र १३:३ -** *तर मी काहीच नाही. आणि मी जर माझे सर्व धन गरजवांताच्या अन्नदानासाठी दिले आणि मी माझे शरीर जाळण्यासाठी दिले पण जर माझ्यात प्रीति नसली,*

३. याकोबाचे पत्र २:१५-१६ वाचा. या ववनाचा अर्थ स्पष्ट करा.

**याकोबाचे पत्र २:१५-१६ -** *जर एखादा बंधु किंवा भगिनी यांना कपड्यांची आवश्यकता असेल व त्यांना रोजचे अनसुद्धा मिळत नसेल आणि तुमच्यापैकी एखादा त्यांना म्हणतो, देवबाप तुम्हांला आशीर्वाद देवो! उबदार कपडे घाला आणि चांगले खा. पण तुम्ही त्यांच्या शरीराला जे आवश्यक ते देत नाही, तर तो काय चांगले करतो?*

४. वाचा लूक ६:३८. हे वचन तुम्हास काय सांगत आहे?

**लूक ६:३८ -** *दुसऱ्यांना द्या म्हणजे तुम्हांलाही दिले जाईल. तुमच्या पदरात हलवून, दाबून, ओसंडून वाहणारे उत्तम माप ओतले जाईल. जे माप तुम्ही दुसऱ्यांसाठी वापरता त्याच मापाने तुम्हांला दिले जाईल.*

५. वाचा इफिसकरांस १:७. देव त्याच्या संपत्ती अनुसार देतो किंवा त्याच्या संपत्तीतून देतो? फरक समजावून सांगा.

**इफिसकरांस १:७ -** *त्याच्यामध्ये खिस्ताच्या रक्ताने आम्ही स्वंतत्र केले गेलो, त्याच्या कृपेच्या समृद्धीने आम्हाला आमच्या पापांची क्षमा मिळाली आहे.*

६. नीतिसूत्रे १९:१७ वाचा. जेव्हा तुम्ही गरिबांना देता तेव्हा तुम्ही काय करता?

देव तुम्हाला परत देईल?

**नीतिसूत्रे १९:१७ -** *गरीब माणसांना पैसे देणे हे परमेश्वराला कर्ज देण्यासारखे आहे. त्यांच्याशी दयेने वागल्याबद्दल परमेश्वर परतफेड करील.*

७. वाचा स्तोत्र ४१:१३. पाच गोष्टींची नावे द्या जे गरिबांना देतात त्यांच्यासाठी देव ते करत

**स्तोत्र ४१:१-३ -** *जो दीनांची चिंता वाहतो तो धन्य! संकटसमयी परमेश्वर त्याला मुक्त करील. २. परमेश्वर त्याचे रक्षण करील. व त्याचा प्राण वाचवील; भूतलावर तो सुखी होईल, आणि तू त्याला त्याच्या वैर्यां च्या इच्छेवर सोडणार नाहीस. ३. तो रोगाने अंथरुणास खिळला असता परमेश्वर त्याला सांभाळील; तो रोगी असता तू त्याचे अंथरूण बदलतोस.*

# उत्तरावली

१. वाचा योहान ३:१६. देव देण्यासाठी का प्रेरित झाला?

***त्याचे प्रेम***

२ .वाचा १ करिंथकर १३:३. आमच्या देण्यामागील कोणती प्रेरणा असणे आवश्यक आहे?

***प्रेम म्हणजेच पर्वा न करता इतरांचे कल्याण आणि त्यांचे हित साधणे आम्हाला कसे ही वाटते तरी (मत्तय ७: १२)***

३. वाचा याकोब २:१५-१६. या ववनाचा अर्थ स्पष्ट करा.

***सर्व प्रेम ९५ % तोंडी नसलेले प्रेम असते आपण काय म्हणतो त्यात ते नाही पण आम्ही काय करतो त्या गोष्टींमध्ये आहे***

४. वाचा लूक ६:३८. हे वचन तुम्हास काय सांगत आहे?

***आपण देण्यास (मोठे किंवा लहान) जे काही उपाय वापराल त्यात प्रमाणात ते आपल्याला परत देण्यात येईल***

५. वाचा इफिसकरास १:७. देव त्याच्या संपत्ती अनुसार देतो किंवा त्याच्या संपत्तीतून देतो? फरक समजावून सांगा.

***त्याच्या संपत्तीनुसार, त्याने आम्हाला सोडवण्यासाठी सर्व काही दिले, त्याचा एकुलता एक पुत्र देखील***

६. वाचा नीतिसूत्रे १९:१७. जेव्हा तुम्ही गरिबांना देता तेव्हा तुम्ही काय करता?

***देवाला उसने देता***

परमेश्वराला देणे देव तुम्हाला परत देईल?

***होय***

७. वाचा स्तोत्र ४१:१-३. पाच गोष्टींची नावे द्या जे गरिबांना देतात त्यांच्यासाठी देव ते करतो.

***तो संकटात सापडलेल्यांची सुटका करतो. तो त्यांचे रक्षण करतो. तो त्यांना समृद्धी देतो. तो त्यांना शत्रूपासून वाचवतो. तो त्यांना बरे करतो; म्हणजेच त्यांना आरोग्याकडे परत आणतो.***

# पाठ १६

# जेव्हा आपल्या प्रार्थनांचे उत्तर मिळत नाही तेव्हा काय करावे

## *अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखीत*

जेव्हा तुमच्या प्रार्थनेचे उत्तर अनुत्तरीत होते तेव्हा तुम्ही काय करावे याबद्दल मला सांगायचे आहे आणि तुमच्या प्रार्थना "अनुत्तरीत" होत असल्या सारखे वाटते, यावर मी जोर देऊ इच्छितो. सत्य हे आहे की देव नेहमीच, विश्वासाने त्याच्या वचना प्रमाणे प्रार्थना केलेल्या कोणत्याही प्रार्थनेचे उत्तर देतो. पहले योहान ५:१४-१५ मध्ये असे म्हटले आहे: *"आणि आम्हांला देवामध्ये खात्री आहे की, जेव्हा आम्ही एखाद्या गोष्टीसाठीत्याच्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करतो, तेव्हा तो आमचे ऐकतो. अ माहीत आहे की जर तो आमचे ऐकतो,तर कोणत्याही कारणासाठी जरी आम्ही प्रार्थना केली, तर आम्हांस माहीत आहे की, जे काही आम्ही मागितले आहे ते आम्हांला मिळालेच आहे."* हा खूप आत्मविश्वास आहे. देव नेहमीच प्रार्थनेला उत्तर देतो पण उत्तर दिलेले असे नेहमी दिसत नाही. मत्तय ७:७-८ म्हणतो, *"मागा म्हणजे तुम्हांला ते देण्यात येईल. शोधा आणि तुम्हांला ते सापडेल, ठोका आणि तुमच्यासाठी दार उघडले जाईल, कारण प्रत्येकजण जो मागतो त्याला मिळते, जो शोधतो त्याला सापडते, आणि जो ठोकावतो, त्याच्यासाठी दार उघडले जाते."* ते वचन म्हणत आहेत की देव प्रार्थनेचे उत्तर देतो. तरीही आपल्यापैकी प्रत्येकजण आपल्या जीवनातील एखाद्या वेळेचा विचार करू शकतो जेव्हा आम्ही असा विश्वास धरला की एक गोष्ट चांगली गोष्ट आहे, पूर्णपणे स्वार्थी नाही किंवा देवाच्या इच्छेपलीकडे नाही, तरीही आम्हाला उत्तर दिसले नाही.

देवाचे वचन सांगते की मागा, आणि ते आपल्याला दिले जाईल. पण आपला अनुभव सांगतो की आपण मागितले, आणि ते आपल्याला मिळाले नाही. कोणते खरे आहे? उत्तर तुम्हाला आश्चर्यचकित करेल, परंतु सत्य हे आहे की कदाचित दोनही खरे आहेत. बहुतेक लोकांना वाटते, आता, *एक मिनिट थांबा, देवाचे वचन सांगते की तो उत्तर देईल आणि मी तसे पाहिले नाही.* योहान ४:२४ सांगते *"देव एक आत्मा आहे आणि जे त्याची उपासना करतात त्यांनी त्याची उपासना आत्म्याने आणि खरेपणाने केली पाहिजे."* देव आपल्या प्रार्थनेचे उत्तर देण्यासाठी आत्मीक क्षेत्रात कार्य करतो, परंतु तो प्रकट होण्यासाठी आपल्याकडून विश्वास लागतो. विश्वास हा आहे,जो आत्मीक जगातून ती गोष्ट घेतो आणि त्यांना भौतिक जगात प्रगट करतो. हेच मुळात हिब्रू ११:१ सांगते, *"विश्वास हा आशा धरलेल्या गोष्टींविषयीचा भरवसा आणि न दिसणार्या गोष्टींबद्दलची खातरी आहे."* असे म्हटले नाही की विश्वास हा अस्तित्वात नसलेल्या गोष्टींचा पुरावा आहे. त्या अस्तितत्वात आहेत, परंतु ते दृश्य, भौतिक जगात नाहीत तर अदृश्य,आत्मीक क्षेत्रात आहेत. विश्वास आत्मीक क्षेत्रात पोहोचतो आणि त्या गोष्टी भौतिक जगात ओढुन घेतो.

हे रेडिओ सिग्नलसारखे आहे. रेडिओ आणि टेलिव्हिजन स्टेशन्स सतत प्रसारित होत आहेत. तुम्ही अशा खोलीत असू शकता जिथे तुम्ही सिग्नल पाहू किंवा ऐकू शकत नाही, परंतु याचा अर्थ असा नाही की ते तिथे नाहीत. तुम्हाला रेडिओ चालू करावा लागेल आणि तो तुमच्या कंपना नुसार ट्यून करुन एकावा लागेल. मग रेडिओ ते सिग्नल्स तुम्हाला समजू शकत नसलेल्या क्षेत्रातून बाहेर काढतो आणि ते तुमच्या कानाने ऐकू शकता अशा क्षेत्रात त्यांचे पुन:प्रक्षेपण करतो. देव आमच्या प्रार्थनांना अश्याच प्रकारे उत्तर देतो:तो आत्मीक क्षेत्रात गोष्टी देतो आणि विश्वासा द्वारे, तुम्हाला त्यांच्यापर्यंत पोहोचून त्यांना भौतिक जगात आणावे लागेल. भौतिक आणि आत्मीक जग एकमेकांच्या समांतर फिरतात. देव तुमच्या प्रार्थनेद्वारे कार्य करतो आणि त्याचे उत्तर देतो, परंतु जोपर्यंत तुम्ही  न पाहिलेले आत्मीक क्षेत्र आणि आपण ज्या भौतिक जगामध्ये राहतो त्या दरम्यानचे अंतर विश्वामसाच्या द्वारे कमी करू देत नाही तोपर्यंत तुम्हाला ते भौतिक जागी प्रकट होणार नाही.

उदाहरणार्थ, दानियल, देवाचा माणूस प्रार्थना करीत होता की देव त्याला प्रकटीकरण देईल. समयाच्या अभाव कारणी मी गोष्टी चा सारांश सांगेन. प्रभूने देवदूत गॅब्रिएलला पाठविले, दानियल समोर हजर होण्यासाठी आणि त्याच्या प्रार्थनेचे उत्तर देण्यासाठी. दानियल ९:२२:२३ म्हणते, *"मला जाणून घ्यावयाच्या होत्या त्या गोष्टी समजावून घेण्यास गाब्रिएलने मला मदत केली. तो म्हणाला, "दानीएला, मी तुला ज्ञान देण्यासाठी व समजावून सांगण्यासाठी आलो आहे. तू प्रार्थनेला सुरवात करता क्षणीच, आज्ञा मिळाली व ती तुला सांगायला मी आलो. देव तुझ्यावर खूप प्रेम करतो तूला ही आज्ञा व दुष्टान्त समजेल."* मुद्दा हा आहे: दानियेलच्या प्रार्थने विषयी, गॅब्रिएलने सुरुवातीला असे सांगितले, परमेश्वराची आज्ञा त्याच्याव्दारे घेऊन जाण्यासाठी उत्तर आले. उत्तर आणण्यास किती वेळ लागला हे आपण वाचल्यास, ते तीन मिनिटांचे होते, देवाच्या आज्ञा आणि प्रत्यक्ष प्रकटीकरणच्दया दरम्यान तीन मिनिटांचा अंतर होते.

आम्ही बरीच कल्पना करतो की जर देव खरोखरच देव आहे आणि काहीतरी त्याची इच्छा आहे, हे अगदी बोटाच्या चुटकी सारखेच होते; परंतु ते खरे नाही. या प्रसंगी, देवाने आज्ञा दिली आणि ती लागू झाली हे अंतर पार करण्यासाठी गॅब्रिएलला अंदाजे तीन मिनिटे लागली. माझ्याकडे अशी सर्व कारणे नाहीत आणि ती खरोखरच आवश्यक नाही. मी सांगण्याच्या प्रयत्न करीत असलेला मुद्दा असा आहे की देवाने दिलेली आज्ञा, स्पष्ट होण्यापूर्वी जवळजवळ तीन मिनिटांचा वेळाचा अंतर होता. आता जर प्रार्थनेच्या उत्तरासाठी हा सर्वात मोठा विश्वास असेल तर, आपल्यातील बहुतेक लोक कदाचित करु शकतील, पण ते नेहमी तसे नसते.

दानियल १० मध्ये आपल्याला तोच माणूस दुसरी प्रार्थनेची विनंती करताना आढळलतो आणि यावेळी उत्तर येण्यास तीन आठवडे लागले. खूप लोक हे वाचणारे असे म्हणतील की "देवाने दानियलच्या एका प्रार्थनेला तीन मिनिटांत उत्तर का दिले आणि दुसऱ्या प्रार्थनेला तीन आठवड्यांत का?" दानियल १०:११-१२ म्हणते, *"दृष्टान्तातील माणूस मला म्हणाला, दानीएला, देव तुझ्यावर खूप प्रेम करतो मी तुझ्याशी बोलेन त्यावर काळजीपूर्वक विचार कर. उभा राहा मला तुझ्याकडेच पाठविले आहे. तो असे म्हणताच मी उभा राहिलो भीतीमुळे अजूनही*

*मी थरथर कापत होतो. मग दृष्टान्तातील माणस पुन्हा बोलू लागला तो म्हणाला, दानीएला, घाबरू नकोस ज्या दिवसापासून तू ज्ञान मिळविण्याचे व देवापुढे नम्र होण्याचे ठरविलेस, त्या दिवसापासून तो तुझी प्रार्थना ऐकत आहे. तू प्रार्थना करीत असल्यामुळेच मी तुझ्याकडे आलो."* हे दर्शविते की दानियेलच्या प्रार्थनेच्या पहिल्याच दिवसापासून देवाने आज्ञावाहक दूताला आज्ञा दिले आहे. यासाठी तीन आठवडे लागले हे उत्तर स्पष्ट आहे, पण देव विश्वासू आहे. पवित्र शास्त्र म्हणते की तो काल, आज आणि सदासर्वकाळ सारखाच आहे (इब्री१३:८).

जर आपण अध्याय ९ आणि १० एकत्र केले तर माझा विश्वास आहे की देवाने दोन्ही प्रार्थनाचे उत्तर त्वरित दिले. एकाने तीन मिनिटे घेतली आणि दुसऱ्याने तीन आठवडे घेतले, पण देव बदलू शकत नव्हता. मुद्दा असा आहे. देव आमच्या प्रार्थना उत्तर देतो. तो गोष्टी करतो, परंतु त्यात बरेच बदल होतात जेव्हा तो प्रार्थनेला उत्तर देतो आणि ज्यावेळेस उत्तरे प्रकट होतात तेव्हाच्या दरम्यान ही घटना घडते. आपल्याला विश्वास ठेवावा लागेल; विश्वासाला आत्मीक क्षेत्रात प्रवेश करणे आवश्यक आहे आणि उत्तर भौतिक क्षेत्रात आणण्यासाठी. तर विश्वास हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

तसेच, तुम्ही दानियेलच्या १० व्या अध्याया च्या १३ व्या वचनात पाहू शकता, *"पण पारसचा राजपुत्र (देवदूत) २१ दिवस माझ्याशी लढत होता व मला त्रास देत होता. पण महत्वाच्या राजपुत्रांपैकी (देवदूतांपैकी) एक मिखाएल माझ्या मदतीला आला. कारण मी तेथे अडकुन पडलो होतो."* हे शारीरिक व्यक्ती बद्दल बोलत नाही पण एक सैतानी अडथळा. सैतान हा या प्रक्रियेत आणखी एक बदल आहे. कधीकधी देव आपल्या प्रार्थनांचे उत्तर देतो, परंतु सैतान त्यांना इतर लोकांद्वारे अडथळा आणतो. उदाहरणार्थ, आपण वित्त साठी विश्वास ठेवत असल्यास, देव तुम्हाला वैयक्तिकरित्या पैसे देणार नाही. तो नाही अमेरीकाचे चलन किंवा या जगाचे कोणत्याही इतर चलनाची बनावट करणार नाही. तो स्वर्गातुन पाऊस पडतो असा पैसा आपल्या खिशात टाकणार नाही. लूक ६:३८ सांगते, *"दुसऱ्यांना द्या म्हणजे तुम्हांलाही दिले जाईल. तुमच्या पदरात हलवून, दाबून, ओसंडून वाहणारे उत्तम माप ओतले जाईल. जे माप तुम्ही दुसऱ्यांसाठी वापरता त्याच मापाने*

*तुम्हांला दिले जाईल."* देव कार्य करेल आणि आपल्या प्रार्थनेला उत्तर देईल, परंतु ते लोकांद्वारे येणार आहे. काही लोक लोभाने बांधलेले असतात आणि जर ते आपल्यावर रागावतात किंवा आपण त्यांना त्रास देण्यासाठी काही करत असाल तर सैतान त्यांच्यामार्फत आपल्या प्रार्थनेच्या आड येऊ शकतो. आपण प्रार्थना करीत असताना, विशेषतः अर्थसहाय्यांसाठी, आपल्याला हे ओळखणे आवश्यक आहे की इतर लोक आपल्या आर्थिक चमत्काराचा एक भाग असू शकतात आणि आपल्याला त्यांच्यासाठी प्रार्थना करावी लागेल.

देव विश्वासनीय आहे. कोणत्याही प्रार्थनेचे उत्तर देण्यास तो कधीही अपयशी ठरला नाही जर आपण त्याच्या वचनावर आधारित आणि विश्वासाने प्रार्थना करतो. तो नेहमी देतो, परंतु इतर बदला वर अवलंबून राहुन तुम्हाला प्रकटीकरण दिसणार नाही. मी प्रार्थना करतो की आपला विश्वास वाढविण्यात आणि आपल्याला हे कळविण्यात मदत करेल की देव तुमच्या प्रार्थनांचे उत्तर नेहमी देतो.

# अनुयायांसाठी प्रश्न आणि प्रश्नांशी संलग्न असलेली उपयुक्त वचने

१. वाचा मत्तय ७:७-८. आपण विचारल्यास आपण देवाकडून काय अपेक्षा करू शकतो?

**मत्तय ७:७-८ -** *“मागा म्हणजे तुम्हांला ते देण्यात येईल. शोधा आणि तुम्हांला ते सापडेल, ठोका आणि तुमच्यासाठी दार उघडले जाईल, कारण प्रत्येकजण जो मागतो त्याला मिळते, जो शोधतो त्याला सापडते, आणि जो ठोकावतो, त्याच्यासाठी दार उघडले जाते.*

२. वाचा मत्तय ७:७-८. जर आपण देवाचा शोध घेतला तर आपण काय अपेक्षा करू शकतो?

३. वाचा मत्तय ७:७-८. जर आपण ठोकाल तर काय होण्याची अपेक्षा करू शकतो?

४. वाचा योहान १०:३५. देवाने शब्द वचन दिले आहे त्याच्यापेक्षा काही कमी देईल का?

**योहान १०:३५ -** *ज्यांना देवाचे वचन प्राप्त झाले त्यांना जर त्याने देव म्हटले, - आणि शास्त्रलेखाचा भंग होत नाही.*

५. वाचा याकोब ४:१-३. देवाकडून प्राप्त करण्यात हे लोक अडथळा का होते?

**याकोब ४:१-३ -** *तुमच्यामध्ये भांडणे व झगडे कोठून येतात? तुमच्यामध्ये ज्या स्वार्थी भावना संघर्ष करतात त्यामधून ते येत नाही काय? तुम्हांला काही गोष्टी पाहिजे असतात पण त्या तुम्हांला मिळत नाही, म्हणून तुम्ही खून करता व दुसरया लोकांचा मत्सर करता पण तरीही तुम्हांला पाहिजे ते मिळत नाही. म्हणून तुम्ही भांडण व झगडे करता. तुम्हाला पाहिजे त्या गोष्टी मिळत नाहीत कारण तुम्ही देवाला मागता आणि जेव्हा तुम्ही मागता, तेव्हा तुम्हाला काहीही मिळत नाही, कारण तुम्ही चुकीच्या उद्देशाने*

*मागता, यासाठी की तुम्हाला जे काही मिळेल ते तुमच्या स्वतःच्या सुखासाठी वापरता.*

६. वाचा पहले पेत्र ३:७. जर तुम्ही तुमच्या सोबत्याशी वाईट वागणूक देत असाल तर आपल्या प्रार्थना जीवनात काय परिणाम होईल?

**पहले पेत्र ३:७ -** *तसेच पतींनो, तुम्ही आपल्या पत्नींबरोबर समंजसपणाने राहा. त्या जरी अबला असल्या तरी त्या देवाच्या कृपेमध्ये तुमच्याबरोबरच वारस आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्याविषयी आदर बाळग, म्हणजे तुम्ही ज्या प्रार्थना देवाला सादर करता त्यात कसलीही बाधा येणार नाही.*

७. वाचा पहले योहान ५:१४-१५. आपल्या प्रार्थनाचे उत्तर मिळण्याची किल्ली कोणती?

**पहले योहान ५:१४-१५ -** *आणि आम्हांला देवामध्ये खात्री आहे की, जेव्हा आम्ही एखाद्या गोष्टीसाठी त्याच्या इच्छेप्रमाणे प्रार्थना करतो, तेव्हा तो आमचे ऐकतो. आणि आम्हांला हे माहीत आहे की जर तो आमचे ऐकतो, तर कोणत्याही कारणासाठी जरी आम्ही प्रार्थना केली, तर आम्हांस माहीत आहे की, जे काही आम्ही मागितले आहे तेआम्हांला मिळालेच आहे.*

८. वाचा मार्क ११:२४. जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा तुम्ही काय करावे?

**मार्क ११:२४ -** *या कारणास्तव मी तुम्हांस सांगतो जे काही तुम्ही प्रार्थनेत मागाल ते मिळालेच आहे असा विश्वास धरा आणि ते तुम्हांला मिळेल.*

# उत्तरावली

१. वाचा मत्तय ७:७-८. आपण विचारल्यास आपण देवाकडून काय अपेक्षा करू शकतो?

***ते दिले जाण्याची आम्ही अपेक्षा करू शकतो***

२. वाचा मत्तय ७:७-८. जर आपण देवाचा शोध घेतला तर आपण काय अपेक्षा करू शकतो?

***सापडण्याची***

३. वाचा मत्तय ७:७-८. जर आपण ठोकाल तर काय होण्याची अपेक्षा करू शकतो?

***ते आमच्यासाठी उघडले जाईल***

४. वाचा योहान १०:३५. देवाने शब्द वचन दिले आहे त्याच्यापेक्षा काही कमी देईल का?

***नाही***

५. वाचा याकोब ४:१-३. देवाकडून प्राप्त करण्यात हे लोक अडथळा का होते?

***त्यांचे हेतू आणि हृदये चुकीची होती सर्वकाही त्यांना आणि त्यांच्यासाठी एकूण स्वार्थ हा त्यांचा हेतू होता***

६. वाचा पहले पेत्र ३:७. जर तुम्ही तुमच्या सोबत्याशी वाईट वागणूक देत असाल तर आपल्या प्रार्थना जीवनात काय परिणाम होईल?

***तुमच्या प्रार्थनेत अडथळा येतील.***

७. वाचा पहले योहान ५:१४-१५. आपल्या प्रार्थनाचे उत्तर मिळण्याची किल्ली कोणती?

***त्याच्या इच्छेनुसार विचारणे***

८. वाचा मार्क ११:२४. जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा तुम्ही काय करावे?

***विश्वास ठेवा की तुम्हाला मिळाले आहे आणि ते तुम्हाला मिळेल***

## CONTACT DETAILS

### INDIA

www.awmindia.net info@awmindia.net

### Locations:

### Hyderabad

42-343/1/188, Near Flora Hotel, Maruthi Nagar
A S Rao Nagar, Hyderabad 500 040, INDIA.
Ph: (040) 4028 0718

### Chennai

72-D, Nandhini Mahal, I Floor, Velachery Main Road
Velachery, Chennai 600 042, INDIA.
Ph: (044) 4202 1820

### Mumbai

Bethel, Plot No 305/E, Mith Chowky, Near Girdhar Park
Malad (W), Mumbai 400 064, INDIA.
Ph: +91 8976549515

### Delhi

Phone: +91 9560591787

### USA

Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs CO 80934-3333
www.awmi.net

### UK

Andrew Wommack Ministries - Europe
PO Box 4392, Walsall, WS1 9AR, ENGLAND
www.awme.net

# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार

# The Complete Discipleship Evangelism

## स्तर – ३

**(Level 3)**

**अॅन्ड्रयू वोमॅक**

आणि

**डॉन क्रो**

द्वारा लिखीत

The Complete Discipleship Evangelism
48-Lesson Course
Level 3 (16 Lessons)

Copyright ©2012, Andrew Wommack
Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs, CO 80934-333
www.awmi.net

Title in Marathi: संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार - स्तर ३
©2022 Andrew Wommack Ministries India
www.awmindia.net
info@awmindia.net

Item Code: MA 417-3/3

Published and sold in India by Charis Initiatives Pvt. Ltd.
www.charisinitiatives.com

Printed in India

Permission is granted to duplicate or reproduce for discipleship purposes on the condition that it is distributed free of charge.

# संपूर्ण अनुयायीत्व सुवार्ता प्रचार

## The Complete Discipleship Evangelism

## स्तर - ३ (Level 3)

## विषय सूची


| | |
|---|---|
| १. दैवी प्रवाह | ५ - 5 |
| २. सेवेसाठी कृपादानांचा उपयोग करणे | १२ - 12 |
| ३. चमत्कार परमेश्वराचे गौरव करतात | २२ - 22 |
| ४. ईश्वरीय नात्यांचे सामर्थ्य | ३२ - 32 |
| ५. छळ | ३७ - 37 |
| ६. राजा आणि त्याचे राज्य | ४५ - 45 |
| ७. तारण देणा-या विश्वासाचा उद्दीष्ट | ५६ - 56 |
| ८. देवाच्या नियमाचा योग्य वापर | ६३ - 63 |
| ९. नियमांच्या अधीन नाही तर कृपेच्या अधीन | ७२ - 72 |
| १०. आणखी पापांची जाणीव नाही | ८१ - 81 |
| ११. माझ्यावर प्रेम करण्यात येते आणि मी सुंदर आहे | ९१ - 91 |
| १२. तारणाचे फळ – भाग १ | ९९ - 99 |
| १३. तारणाचे फळ – भाग २ | १०८ - 108 |
| १४. शिष्यत्वाची हाक | ११६ - 116 |
| १५. तुमची साक्ष कशी वापरायची | १२४ - 124 |
| १६. शिष्यतेसाठी सर्वांचे आत्मिक दाने वापरणे | १३४ - 134 |

# पाठ १

# दैवी प्रवाह

*अॅन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखीत*

तुम्ही इतर लोकांची सेवा करण्यासाठी देवाला तुमच्याद्वारे वाहू देऊ शकता. तुमच्यामध्ये देवाचीशक्ती आणि अभिषेक आहे, परंतु तुम्ही ते इतर लोकांपर्यंत कसे पोहोचवाल? अशी अनेक वचने आहेत ज्यापासून आपण सुरुवात करू शकतो. फिलेमोन १:६ मध्ये, पौल अशी प्रार्थना करत आहे की, *"आणि असे मागतो की, तुमच्यामध्ये असलेल्या ख्रिस्त येशूमध्ये] जे काही चांगले आहे त्याचे पूर्ण ज्ञान झाल्याने तुझ्या विश्वासाचे भागीपण सफळ व्हावे."* देवाची शक्ती तुमच्याद्वारे इतर लोकांपर्यंत पोहोचवण्याची सर्वात पहिली पायरी म्हणजे तुमच्या आत असलेल्या चांगल्या गोष्टींना तुम्ही प्रथम सहमत व्हा, मान्य करा. तुमच्याकडे जे नाही ते तुम्ही देऊ शकत नाही, पण तुमच्या आत काय आहे हे एकदा तुम्हाला कळले तर गोष्टी आपोआप घडू लागतील. तुम्ही तुमचा उत्साह इतरांना सांगाल, तुमच्या आयुष्यात देवाने काय केले याची साक्ष द्याल आणि आपोआप काही लोकांना यामुळे मदत होईल.

पहिले योहान ४:७-८ मध्ये सांगत, *"प्रियजनहो, आपण एकमेकांवर प्रीती करावी, कारण प्रीती देवापासून आहे; जो कोणी प्रीती करतो तो देवापासून जन्मलेला आहे व देवाला ओळखतो. जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीती आहे."* केव्हाही तुम्हाला तुमच्याकडून दुसऱ्या व्यक्तीबद्दल प्रीती वाटेल, तर तो देव तुमच्याद्वारे त्याव्यक्तीबद्दल प्रीतित कार्यरत असतो. ग्रीक भाषेत "प्रीति" साठी चार प्रमुख शब्द आहेत; सर्वोच्च प्रकार, *अगापे* प्रीति, ही देवाची अलौकिक प्रीति आहे. एखाद्या व्यक्तीबद्दलचे आकर्षण, किंवा इच्छा आणि ही अलौकिक, सर्वोच्च प्रकारची देवाची प्रीति यातील फरक ओळखणे आवश्यक आहे. जेंव्हाही तुम्ही समजता की देवाची प्रीति तुमच्यामधुन दुसऱ्यावर वाहत आहे, तर ती स्वत: साठी, स्वतःची सेवा नाही. तुम्ही हे पहिले करिंथ १३:४-८, मधुन पडताळुन पाहु शकता, जी देवाच्या प्रकारच्या प्रीतिची पात्रता दाखवते. ती हेवा, स्वार्थी, स्वतः चीच सेवाकरणारी, सहज चिथावणी देणारी, इत्यादी नाही. तुम्ही ज्याला प्रीति म्हणता त्याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे आणि हे सुनिश्चित करणे आवश्यक

आहे की ती खरोखरच देवाची प्रीति आहे – प्रीति स्वार्थी किंवा स्वत:ची सेवा करत नाही - की एखाद्या व्यक्तीवर ते तुमच्यासाठी काय करू शकतात म्हणून तुम्ही प्रीति करत नाही. जसजसे तुम्ही यामध्ये वाढता आणि अक्षरशः त्याच्या प्रकारच्या प्रीतिला समजु लागता, तेव्हा जेव्हाही तुम्हाला वाटते की ती तुमच्यातून दुसऱ्या कोणासाठी तरी वाहत आहे, तर याचा अर्थ, तो देव, त्याची प्रीति कार्य करत आहे. एकदा की तुम्हाला तुमच्यामधुन कोणासाठी तरी देवाची प्रीति वाहत आहे असे समजले तर, तुम्हाला फक्त प्रोत्साहनाच्या शब्दाने किंवा कृतीने त्याचे अनुसरण करायचे आहे - बस काहीतरी करा.

अश्या काही वेळा आहेत जेव्हा मी प्रार्थना करत होतो की एखादी व्यक्ती माझ्या मनात येईल आणि मला त्याच्याबद्दल देवाच्या प्रकारची प्रीति आणि करुणा वाटेल. असे होण्याचे कोणतेही कारण नव्हते; ते बस अलौकिक होते. मी त्या व्यक्तीला कॉल करणे, त्यांना पत्र लिहिणे किंवा त्यांच्याशी संपर्क साधणे शिकलो आहे.जवळपास प्रत्येक वेळी ती व्यक्ती म्हणेल, "तो तुझ्याद्वारे माझ्याशी बोलत होता आणि ह्यामुळे त्याने माझ्या आयुष्याला स्पर्श केला. "तुम्हाला माहीत आहे का ते कसे झाले? असे घडले कारण मला ही प्रीति जाणवली, ही ईश्वरीय करुणा माझ्यामधुन त्या व्यक्तीबद्दल वाहते. जेव्हा मला आता असे वाटते मग, मी ओळखतो की तो मी नाही - तो देव आहे. परमेश्वर प्रीति आहे, आणि जेव्हा मी इतर लोकांवर प्रीति करतो तेव्हा तो माझ्याद्वारे इतर लोकांवर प्रीति करतो. अश्या प्रकारे येशूने सेवा केली. मत्तय १४:१४ सांगत, *"मग येशूने बाहेर येऊन मोठा लोकसमुदाय पाहिला; तेव्हा त्यांचा त्याला कळवळा आला व त्यांच्यातील दुखणेकऱ्यांना त्याने बरे केले."* ज्या प्रकारे परमेश्वराची शक्ती येशूद्वारे प्रवाहित होत होती ते त्याने ज्या लोकांची सेवा केली त्यांच्याबद्दल त्याला वाटणारा कळवळा आणि प्रीति ही होती.मत्तय ८:२-३ मध्ये, कुष्ठरोग झालेला माणूस, जो अशुद्ध होता आणि यहुदी कायद्यानुसार त्याला स्पर्श केला जाऊ शकत नव्हता (कोणीही त्याच्या संपर्कात येऊ शकत नाही, किंवा ते दूषित होऊन स्वतः अशुद्ध होतील) त्याने आपला आवाज उंचावला आणि दूरवरून येशूला आवाज दिला, *"प्रभूजी, आपली इच्छा असली तर मला शुद्ध करण्यास आपण समर्थ आहात. तेव्हा येशूने हात पुढे करून त्याला स्पर्श केला व म्हटले, माझी इच्छा आहे, शुद्ध हो; लगेच त्याचे कुष्ठ जाऊन तो शुद्ध झाला."* त्याला कुष्ठरोगी माणसाबद्दल कळवळा आला आणि त्याने त्याला स्पर्श केला. जसे तुम्ही वचनांचा अभ्यास कराल तेव्हा तुम्हाला ही करुणा, हे ईश्वरी प्रेम अनेक ठिकाणी दिसून येईल. ही केवळ भावना नसून एक करुणा, कळवळा आहे जी आपल्यातून प्रवाहित होते.

जेव्हा येशू वधस्तंभावर खिळलेला होता, तेव्हा त्याला त्याच्या सभोवतालच्या लोकांवर इतके प्रेम होते की तो म्हणाला, *"हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही"* (लूक २३:३४). हे तेच लोक होते जे त्याला वधस्तंभावर खिळत होते,

तरीही त्याला त्यांचा कळवळा आला आणि त्याने देवाला त्यांना क्षमा कर असे मागितले. आपल्याला माहित आहे की त्याच्या अंगावर शहारे आले नाहीत - ही फक्त एक भावना किंवा सवेदना नव्हती - ही एक निवड होती. तरीही, त्याला ते जाणवले आणि ते त्याने इतर लोकांपर्यंत पोहोचवले. तुमच्यापैकी प्रत्येकजण ज्याचा नवा जन्म होतो त्याच्यामध्ये देव राहतो. आपण ज्या वचनापासून सुरुवात केली आहे पहिले योहान ४:८ नुसार, देव प्रेम आहे आणि त्याला तुमच्याद्वारे इतर लोकांपर्यंत पोहोचायचे आहे. असे करण्यासाठी, तो हा कळवळा देईल. तुमच्याकडून ते इतर लोकांकडे वाहत असल्याचे तुम्हाला वाटेल आणि जेव्हा तुम्ही असे करता तेव्हा तुम्हाला प्रतिसाद देण्याची आवश्यकता असते.

तुम्हाला नेहमी काहीतरी खास करण्याची गरज नाही. "प्रभु असा म्हणतो," असे असण्याची गरज नाही. काहीवेळा, जर एखाद्या व्यक्तीबद्दल तुम्हाला सहानुभूतीची भावना आली, तर फक्त त्याच्याजवळ जा आणि आपलाप्रेमळ हात ठेवुन म्हणा, "देव तुमच्यावर प्रेम करतो आणि म्हणुन मीही करतो." मला माहित आहे की अशा परिस्थितीत जेव्हा एकदा मी चर्चमधून बाहेर पडणार होतो तेव्हा हि गोष्ट काम केली. लोक माझ्याबद्दल खोटे बोलत होते आणि एका व्यक्तीने मला जीवे मारण्याची धमकीही दिली होती. मी खूप निराश झालो होतो, "देवा, काय उपयोग? मी काय करण्याचा प्रयत्न करत आहे याचे कोणीही कौतुक करत नाही." मी यावर सैतानाशी लढत होतो आणि एका दूर अंतरावर राहणा-या मित्राचा फोन आला. तो काही मिनिटे बोलला आणि मग मी म्हणालो, "बरं, तु कशासाठी फोन केला?" तो म्हणाला, "मला फक्त फोन करून कळवायचे होते की, मी तुझ्यावर प्रेम करतो मी प्रार्थना करत होतो आणि देवाचे प्रेम तुझ्यासाठी प्रवाहित झाले. मला तुझे कौतुक वाटते," त्याने एवढेच म्हटले. माझ्या जीवनात चालू असलेल्या परिस्थितीबद्दल त्याला काहिच माहित नव्हते, परंतु देवाने त्याचा उपयोग केला. मला माहित होते की, देव त्या व्यक्तीद्वारे माझ्यावर प्रेम करत आहे, आणि त्याने यामुळे मला सेवेत ठेवले आणि माझे जीवन बदलले.

ते गहन किंवा अपरिहार्यपणे काही महान मोठे शब्द असणेच आवश्यक नाही. देव प्रीति आहे, आणि जेव्हा केव्हा तुम्ही समजता की तुमच्यातून ती प्रीति वाहत आहे तेव्हा तो दैवी प्रवाह आहे....देवाचे दैवी जीवन. जेव्हा तुम्हाला ते जाणवते, तेव्हा तुम्हाला त्याला वाहु देणे आवश्यक आहे.जा काहीतरी करा, काहीतरी बोला, एखाद्या व्यक्तीसाठी तुम्ही आशीर्वाद बना. जसे तुम्ही सहानुभूतीने प्रेरित व्हाल आणि तुमच्या सभोवतालच्या लोकांची सेवा कराल तसा तो तुमचा वापर करेल, आणि तो लोकांना बंधन मुक्त करेल.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

**टीप:** या पाठात आपण देवाने आपल्यामध्ये जे ठेवले आहे ते इतरांपर्यंत कसे पोहोचवायचे याचे परीक्षण करू

१. वाचा. फिलेमोन १:६. देवाला आपल्याद्वारे कार्य करण्यास परवानगी देण्याची पहिली पायरी कोणती आहे?

**फिलेमोन १:६ -** *"आणि असे मागतो की, तुमच्यामध्ये [असलेल्या ख्रिस्त येशूमध्ये] जे काही चांगले आहे त्याचे पूर्ण ज्ञान झाल्याने तुझ्या विश्वासाचे भागीपण सफळ व्हावे."*

२. वाचा. पहिले योहान ४:७-८ इतरांवर प्रेम करण्यासाठी खरा स्रोत काय आहे?

**पहिले योहान ४:७-८-** *"प्रियजनहो, आपण एकमेकांवर प्रीती करावी, कारण प्रीती देवापासून आहे; जो कोणी प्रीती करतो तो देवापासून जन्मलेला आहे व देवाला ओळखतो. जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीती आहे."*

३. अँड्रूयू म्हणतो, "जेव्हा तुम्हाला तुमच्यामधुन प्रीति प्रवाहित होत आहे असे वाटेल तेव्हा देव तुमच्याद्वारे प्रीतित प्रवाहित होतो." पहिले योहान ४:७-८ मधील कोणते वाक्य हे तथ्य सिद्ध करते?

४. वाचा. पहिले करिंथ १३:४-८. देव प्रेमाची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

**पहिले करिंथ १३:४-८ -** *प्रीती सहनशील आहे, परोपकारी आहे; प्रीती हेवा करत नाही; प्रीती बढाई मारत नाही, फुगत नाही;ती गैरशिस्त वागत नाही, स्वार्थ पाहत नाही, चिडत नाही, अपकार स्मरत नाही;ती अनीतीत आनंद मानत नाही, तर सत्यासंबंधी आनंद मानते; ती सर्वकाही सहन करते, सर्वकाही खरे मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरते, सर्वांसंबंधाने धीर धरते.प्रीती कधी अंतर देत नाही; संदेश असले तरी ते संपतील.भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती संपेल.*

५. वाचा. मत्तय १४:१४. इतरांची सेवा करण्यात येशू कसा प्रवृत्त झाला?

**मत्तय १४:१४ -** *मग येशूने बाहेर येऊन मोठा लोकसमुदाय पाहिला; तेव्हा त्यांचा त्याला कळवळा आला व त्यांच्यातील दुखणेकऱ्यांना त्याने बरे केले.*

६. वाचा. मत्तय २५:३७-४०.जेव्हा आपण प्रीतिने आणि कळवळ्याने इतरांसोबत वागतो, तेव्हाप्रत्यक्षात आपण कोणावर प्रीति आणि कोणाची काळजी घेतो?

**मत्तय२५ :३७-४० -** *त्या वेळेस नीतिमान त्याला उत्तर देतील की, 'प्रभूजी, आम्ही तुम्हांला केव्हा भुकेले पाहून खायला दिले? केव्हा तान्हेले पाहून प्यायला दिले?तुम्हांला परके पाहून केव्हा घरात घेतले? उघडे पाहून केव्हा वस्त्र दिले? आणि तुम्हांला आजारी अथवा बंदिशाळेत पाहून केव्हा आम्ही तुमच्याकडे आलो?' तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.'*

**इब्री ६:१० -** *कारण तुमचे कार्य व तुम्ही पवित्र जनांची केलेली व करत असलेली सेवा आणि तुम्ही देवावर दाखवलेली प्रीती, ही विसरून जाण्यास तो अन्यायी नाही.*

# उत्तरावली

१. वाचा. फिलेमोन १:६. देवाला आपल्याद्वारे कार्य करण्यास परवानगी देण्याची पहिली पायरी कोणती आहे?

***त्याने ख्रिस्त येशूमध्ये आपल्यात ठेवलेल्या प्रत्येक चांगल्या गोष्टीची स्वीकृती देण्यासाठी***

२. वाचा. पहिले योहान ४:७-८ इतरांवर प्रेम करण्यासाठी खरा स्रोत काय आहे?

***देव,कारण देव प्रेम आहे (पहिले योहान ४:८)***

३. अँड्र्यू म्हणतो, "जेव्हा तुम्हाला तुमच्यामधुन प्रीति प्रवाहित होत आहे असे वाटेल तेव्हा देव तुमच्याद्वारे प्रीतित प्रवाहित होतो." पहिले योहान ४:७-८ मधील कोणते वाक्य हे तथ्य सिद्ध करते?

***"प्रीति ही देवाची आहे" (तो ह्याचा उगम आहे)***

४. वाचा. पहिले करिंथ १३:४-८. देव प्रेमाची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

***प्रीति मंदक्रोध आणी सहनशील आहे. हे वाक्य वर्तमान काळात आहे, याचा अर्थ प्रीति नेहमी अशीच वागते. प्रीति दयाळु आहे. ती परोपकारी, दयाळु कृत्याद्वारे स्वतःला प्रदर्शीत करते. हे वर्तमान काळ दर्शवते, म्हणजे प्रीति नेहमी अशीच वागते. हेवा करत नाही. इतरांच्या चांगल्या भाग्याचा किंवा यशाचा राग बाळगत नाही. ती स्वतःबद्दल फुशारकी मारत नाही किंवा स्वतःबद्दल बढाई मारत नाही. ती गर्वीष्ठ नाही. फूगत नाही. ती स्वतः उपभोगतघेतनाही. ती गर्व करत नाही, उद्धट नाही, ती स्वतःहून योग्य काय आहे याचे उल्लंघन करत नाही. ती असभ्य नाही. ती स्वतःचा विचार करत नाही. ती स्व-केंद्रित नाही. सहजासहजी चिथावली जात नाही. ती सहजासहजी रागावलेली किंवा शीघ्र कोपी नाही. वाईट विचार करत नाही. ती इतरांच्या वाईटाचा विचार करत नाही.चुकीची नोंद ठेवत नाही. अनीतित आनंद मानत नाही. अन्यायात किंवा चुकीच्या गोष्टीत तीला आनंद होत नाही. प्रीति सत्यात आनंदी असते. सर्व गोष्टी सहन करते. तीनेहमीच आधार देते. ती कधीही हार मानत नाही. सर्व गोष्टींवर विश्वास ठेवते. प्रीति नेहमी विश्वास ठेवते. प्रीति कधीही अपयशी ठरत नाही. ती नेहमी टिकून राहते. शेवटपर्यंत टिकून राहते आणि कायम टिकते.***

५. वाचा मत्तय १४:१४. इतरांची सेवा करण्यात येशू कसा प्रवृत्त झाला?

***तो इतरांबरोबर "कळवळ्याने" प्रवृत्त झाला होता. शब्दकोशात"सहानुभूतीची भावना; दया, कीव, करुणा म्हणून कळवळीची व्याख्या केली आहे.***

6. वाचा. मत्तय २५:३७-४०. जेव्हा आपण प्रीतिने आणि कळवळ्याने इतरांसोबत वागतो, तेव्हा प्रत्यक्षात आपण कोणावर प्रीति आणि कोणाची काळजी घेतो?

***येशुची***

हिब्रू ६:१० पाहा.

# पाठ २

# सेवेसाठी कृपादानांचा उपयोग करणे

*अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखित*

तुम्हाला प्राप्त झालेली देवाची प्रीति तुम्ही घेऊन इतर लोकांसोबत ते कसे वाटु करू शकता - तुम्ही इतरांसाठी प्रभावी सेवक कसे होऊ शकता? पहिले पेत्र ४:११ मध्ये, असे सांगते, "भाषण करणाऱ्याने, आपण देवाची वचने बोलत आहोत, असे बोलावे." "देवाची वचने" हा शब्द जुन्या कराराचा संदर्भ देतो जेव्हा त्यांच्याकडे परमपवित्र स्थान होते आणि त्यांनी कराराच्या कोशात देवाचे वचन ठेवले होते. त्याला "दैविशब्द" असे म्हणतात, म्हणून जेव्हा ते "देवाचे शब्द म्हणून बोला" असे म्हणतात, तेव्हा याचा अर्थ देवाचे मुखपत्र म्हणून बोला असा आहे. तुम्ही देवाकडून बोलत आहात असे बोला. वचन पुढे असे सांगत, "सेवा करणाऱ्याने, ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करत आहोत, अशी करावी; ह्यासाठी की, सर्व गोष्टींत देवाचा गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावा; गौरव व पराक्रम हे युगानुयुग त्याचे आहेत." हे वचन काय सांगत की, तुम्हाला इतर लोकांची सेवा करण्याची गरज आहे, पण तुमच्या स्वतःच्या क्षमतेनुसार नाही तर देवाने दिलेल्या क्षमतेनुसार.

ख्रिस्तीलोकांच्या जीवनातील एक महान गोष्ट म्हणजे ही की, केवळ मी किंवा तुम्ही कोणाशी बोलतो आणि आमच्या स्वतःच्या क्षमतेनुसार त्यांना गोष्टी वाटतो असे नाही, तर देव स्वतः येतो आणि आपल्या आतमध्ये राहतो. तो आपल्यामधून बोलू लागतो आणि आपल्यातून प्रवाहाप्रमाणे वाहू लागतो. आपण अक्षरशः देवाच्या ताब्यात राहतो आणि आपल्याद्वारे देवाचा आत्मा वाहत असतो. जसे आपण इतर लोकांसोबत वाटण्यास सुरू करतो, तेव्हा आपल्याला हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की यालाच आत्म्याचे दाने असे म्हणतात आणि ते याचसाठी आहेत. देव प्रत्येक व्यक्तीला ख्रिस्ताच्या शरीरात घेतो आणि त्यांना विशिष्ट दान देतो. पहिले करिंथकरांस पत्र १२ मध्ये असे सांगत आहे की आपल्यातील प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार वेगवेगळे कृपादान देण्यात आले आहेत. वचन ४-६ मध्ये असे सांगत, "कृपादानांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी आत्मा एकच आहे; सेवा करण्याचे [कार्याचे] निरनिराळे [भिन्न] प्रकार आहेत, तरी प्रभू एकच आहे; आणि कार्याचे [कामांचे] निरनिराळे प्रकार आहेत, तरी सर्वांत सर्व कार्ये करणारा देव एकच आहे" (कंस माझे). याचा अर्थ असा

आहे की देव आपल्या सर्वांमध्ये या गोष्टीद्वारे कार्य करतो, जसे वचन ७ सांगते, "तथापि आत्म्याचे प्रकटीकरण सार्वजनिक हितासाठी एकेकाला होते," किंवा प्रत्येकाच्या हितासाठी.

ही वचने सांगतात की देवाने आपल्या प्रत्येकामध्ये अलौकिक क्षमता ठेवली आहे. तुम्हाला कदाचित ते जाणवणार नाही, तुम्ही कदाचित यासाठी जागरूक नसाल, पण हे देवाच्या वचनाद्वारे दिलेले अभिवचन आहे. जर तुम्ही शिष्यत्वाच्या सुवार्तिकतेच्या मालिकेत इथपर्यंत आला असाल, जर तुम्ही आधीच येशूला तुमच्या जीवनाचा प्रभु बनवले असेल, जर तुम्ही देवाकडून कसे प्राप्त करावे आणि ते तुमच्या जीवनात कसे लागू करावे हे शिकले असाल, तर मी आश्वासन देऊ शकतो की, पवित्र आत्म्याचे सामर्थ्य तुमच्या आत काम करत आहे. तुमच्या मध्ये इतर लोकांचे चमत्कार ठेवले आहेत. देवाने तुमच्यामध्ये चमत्काराचे बीज रूप दुसऱ्या कोणासाठी तरी ठेवले आहे. ते मोकळे करून आणि त्यांच्या जीवनासाठी उपयोगी आणणे हे तुमच्यावर अवलंबून आहे. पवित्र शास्त्र सांगते की, हे आपल्यापैकी प्रत्येकाला पवित्र आत्म्याद्वारे दिले आहे. एकही व्यक्ती सोडली गेलेली नाही. पहिले करिंथकरास पत्र १२ मध्ये आत्म्याच्या नऊ वेगवेगळ्या कृपादानांची सूची दिली आहे, जसे की ज्ञानाचे वचन, विद्येचे वचन, आत्म्यांची पारख, चमत्कार करण्याचे दान, निरोगी करण्याचे दान, इत्यादी. रोमकरांस पत्र १२ मध्ये सूचीबद्ध केलेले इतर कृपादाने आहेत. त्यांचा तुम्ही स्वतः अभ्यास करा आणि हे जाणून घ्या की, तुमच्यापैकी प्रत्येकामध्ये पवित्र आत्म्याचे स्थान आहे. विशेष अभिषेक - विशेष क्षमता - इतर लोकांची सेवा करण्यास सक्षम होण्यासाठी. प्रत्येकजण माझ्याप्रमाणे सेवा करू शकणार नाही, उदाहरणार्थ. तुमच्याकडे शिकवण्याचे दान नसू शकते, परंतु ख्रिस्ताच्या शरीरातील प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीसोबत आपला विश्वास सांगून शिकवू शकतो. असे लोक आहेत ज्यांना विशेषतः शिकवण्यासाठी पाचारण केले गेले आहे, असे लोक आहेत ज्यांना उपदेश करण्यासाठी आणि मंडळीचा पाळक होण्यासाठी पाचारण झाले आहे. रोमकरांस पत्र १२ मध्ये सूचीबद्ध केलेली आणखी एक कृपादान आहे जे सांगते की,असे लोक आहेत ज्यांच दान हे आदरातिथ्य करणे असे आहे. तुमच्यापैकी अनेकांकडे अशी एखादी क्षमता किंवा दान असू शकते, याची तुम्हाला कदाचित जाणीवही नसेल. तुम्हाला फक्त कोणाएखाद्यासाठी आशीर्वाद बनण्याची इच्छा आहे. तुम्ही अशा प्रकारचे व्यक्ती असू शकता, जे तुम्ही एखाद्या खोलीत जाता तेव्हा आजारी वाटत असलेल्या लोकांना सहजपणे जाऊन त्यांची काळजी घेता. तुम्ही त्यांना सहानुभूती व्यक्त करता, ते कोणत्या परिस्तिथीतुन जात आहेत हे तुम्हाला माहीत आहे आणि त्यांना आराम वाटावे आणि त्यांची सेवा करावी अशी तुमची इच्छा आहे. हे एक देवाचे अलौकिक दान आहे हे तुम्हाला माहीत आहे का?

रोमकरांस पत्र १२ सांगते की, काही लोकांना देण्यासाठी, पैसे कमविण्याची आणि सुवार्तेला समर्थन देण्यासाठी देण्याची क्षमता यासाठी पाचारण केले गेले आहे. ते त्यांना

मिळालेल कृपादान आहे, त्यांच्या जीवनातील हेच पाचारण आहे आणि तुमच्यापैकी काही जणांना त्याच गोष्टीसाठी बोलावले गेले आहे. तुमच्यापैकी काहींना उपदेश देण्याचे दान आहे. इतरांकडे प्रशासन सांभाळण्याचे दान असते, सामान्यत: चर्चद्वारे मदतीसाठी भेट असे म्हणून संबोधले जाते. सर्व प्रकारच्या गोष्टी केल्या जाऊ शकतात, केवळ चर्चच्या मांडणिमध्येच नाही तर लोकांशी व्यवहार करणा-या अश्या दैनंदिन आधारावर. तुमच्यापैकी असे काही आहेत ज्यांच्याकडे निराश झालेल्यांना प्रोत्साहन देण्याची क्षमता आहे, जे मी फक्त वचन शिकवण्याद्वारे कधीही करू शकणार नाही. तुमच्यामध्ये कोणाला सहजच जाऊन एखाद्याच्या भोवती हात ठेवण्याची, त्यांना आशीर्वाद देण्याची आणि त्यांना सक्षम करण्याची अलौकिक क्षमता आहे. मला जो मुद्दा मांडायचा आहे तो हा आहे की , तुम्हाला हे फक्त नैसर्गिक म्हणून पाहण्याची गरज नाही, असे म्हणत की, "ठीक आहे, तो फक्त माझ्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग आहे." तुम्ही स्वतःला या प्रकारची व्यक्ती म्हणून वर्गीकृत केले असेल, परंतु तुम्हाला माहित आहे का, देवाने तुमच्या आत तुम्हामध्ये ठेवलेल्या अलौकिक क्षमतेने तुम्हाला कृपादाने, कौशल्य आणि दृष्टीकोन दिला आहे ज्यामुळे तुम्ही काही गोष्टी करण्याकडे आकर्षित होता.

जेव्हा तुम्ही इतर लोकांची सेवा करता तेव्हा पवित्र शास्त्र सांगते की, तुम्हाला देवाने तुमच्या आत ठेवलेल्या दानाचा उपयोग करून सेवा करणे आवश्यक आहे. आपण सर्वांना सेवकगण होण्याची आवश्यकता आहे, मग ते पूर्णवेळ सेवाकार्य पेशा म्हणून असो, नोकरीकरत सेवाकार्य करणे असो किंवा आपण कुठेही असो. तुम्ही तुमच्या शेजाऱ्यांना किंवा दुकानातील लोकांना ही सेवा देत असल्यास, तुम्हाला ते देवाने दिलेल्या क्षमतेनुसार सेवा करणे आवश्यक आहे, तुमच्या स्वतःच्या क्षमतेनुसार नाही. म्हणून, मी तुम्हाला देवाचा शोध घेण्यास प्रोत्साहित करतो, त्याने तुमच्या आत ठेवलेल्या दानांना शोधून काढा, आणि जर तुम्हाला सेवाकार्यापैकी दान म्हणून बोलावले नसेल तर त्या इतर दानाना कमी लेखु नका. ओळखा की तुमच्यापैकी प्रत्येकामध्ये पवित्र आत्म्याचे स्थान आहे. तुमच्यामध्ये अलौकिक क्षमता दिलेली आहे, आणि मग हे जाणुन देवाने तुमच्या आत ठेवलेल्या दानाद्वारे इतर लोकांची सेवा करा.

त्यासाठी वेळ आणि सराव लागेल. तुम्ही पहिल्यांदाच परिपूर्ण होणार नाही, त्यामुळे सराव करण्यास घाबरू नका. जर तुम्ही चूक केली तर देव त्याच्या सिंहासनावरून पडणार नाही आणि इतर लोक तुमच्या मनातील प्रामाणिकपणा पाहतील. तुम्ही काही उत्तम प्रकारे केले नसले तरीही तुमची प्रीतिची वागणूक त्यांना सेवा देईल. इतरांची सेवा करण्यास सुरुवात करा. तुम्ही देवाचे वरदान आहात हे जाणा आणि त्याने तुम्हाला दिलेली अलौकिक क्षमता इतर लोकांसोबत वाटने सुरु करा.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. पहिले पेत्र ४:११. आपण कोणाच्या कुवतीने सेवक व्हायचे आहे?

**पहिले पेत्र ४:११ -** *भाषण करणाऱ्याने, आपण देवाची वचने बोलत आहोत, असे बोलावे; सेवा करणाऱ्याने, ती आपण देवाने दिलेल्या शक्तीने करत आहोत, अशी करावी; ह्यासाठी की, सर्व गोष्टींत देवाचा गौरव येशू ख्रिस्ताच्या द्वारे व्हावा; गौरव व पराक्रम हे युगानुयुग त्याचे आहेत. आमेन.*

२. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:४. विविध आणि भिन्न प्रकारचे आध्यात्मिक कृपादाने आहेत, परंतु त्या सर्वांचा स्रोत कोण आहे?

***पहिले करिंथकरांस पत्र १२:४ -*** *कृपादानांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी आत्मा एकच आहे.*

३. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:६. योग्य विधान निवडा.

अ. देव केवळ एकाच मार्गाने कार्य करतो

ब. देव लोकांद्वारे कार्य करतो असे विविध मार्ग आहेत

क. देव केवळ उपदेशकाद्वारे कार्य करतो

**पहिले करिंथकरांस पत्र १२:६ -** *आणि कार्यांचे निरनिराळे प्रकार आहेत, तरी सर्वांत सर्व कार्ये करणारा देव एकच आहे. [७] तथापि आत्म्याचे प्रकटीकरण सार्वजनिक हितासाठी एकेकाला होते. [८] कारण एखाद्याला आत्म्याच्या द्वारे ज्ञानाचे वचन मिळते; एखाद्याला त्याच आत्म्यानुसार विद्येचे वचन; [९] एखाद्याला त्याच आत्म्यात4 विश्वास; एखाद्याला त्याच एका आत्म्यात निरोगी करण्याची कृपादाने; [१०] एखाद्याला अद्भुत कार्ये करण्याची शक्ती; एखाद्याला संदेश देण्याची शक्ती; एखाद्याला आत्मे ओळखण्याची शक्ती; एखाद्याला विशेष प्रकारच्या भाषा बोलण्याची शक्ती व एखाद्याला भाषांचा अर्थ सांगण्याची शक्ती मिळते;*

४. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:७. खरे किंवा खोटे: पवित्र आत्म्याची उपस्थिती आणि आत्मिक कृपादाने आपल्यापैकी प्रत्येकाला सर्वांच्या भल्यासाठी दिले जातात.

५. वाचा. पहले करिंथकरांस पत्र १२:८-१०. देव लोकांना देत असलेल्या काही आत्मिक दानांची यादी आणि व्याख्या करा.

६. वाचा. रोमकरांस पत्र १२:६-८ येथे सूचीबद्ध केलेल्या आत्मिक दानांची व्याख्या करा जी देव लोकांना देतो.

**रोमकरांस पत्र १२:६-८ -** *आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत, म्हणून ईश्वरी संदेश सांगायचा असल्यास आपण तो आपल्या विश्वासाच्या प्रमाणाने सांगावा; [७] सेवा करताना सेवेत तत्पर असावे, शिकवणाऱ्याने शिक्षण देण्यात, [८] बोध करणाऱ्याने बोध करण्यात तत्पर असावे, दान देणाऱ्याने ते औदार्याने द्यावे, अधिकाऱ्याने आपले काम आस्थेने करावे, दया करणाऱ्याने ती संतोषाने करावी.*

७. यापैकी कोणतीही कृपादाने तुमच्याद्वारे कार्य करत असल्याचे तुमच्या लक्षात आले आहे का? असल्यास, ते कोणते दान आहे?

**दुसरे तीमथ्य ४:११ -** *लूक मात्र माझ्याजवळ आहे. मार्कला आपल्याबरोबर घेऊन ये, कारण तो सेवेसाठी मला उपयोगी आहे.*

**प्रेषितांची कृत्ये १३:१ -** *अंत्युखियाच्या मंडळीत बर्णबा, शिमोन निग्र, लूक्य कुरेनेकर, जो बाळपणापासून मांडलिक हेरोद राजाबरोबर वाढला होता तो मनाएन व शौल हे संदेष्टे व शिक्षक होते.*

**प्रेषितांची कृत्ये १३:१५ -** *तेव्हा नियमशास्त्राचे व संदेष्ट्यांच्या ग्रंथांचे वाचन झाल्यावर सभास्थानाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सांगून पाठवले की, "बंधुजनहो, तुमच्याजवळ लोकांकरता काही बोधवचन असेल तर सांगा."*

८. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:७. या दानांचा लाभ कोणाला होणार आहे?

**नीतिसूत्रे २२:९ -** *ज्याची दृष्टी उदार त्याचे कल्याण होते, कारण तो आपल्या अन्नातून गरिबास देतो*

**प्रेषितांची कृत्ये २०:२८ -** *तुम्ही स्वतःकडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हांला अध्यक्ष करून ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या, ह्यासाठी की, देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वतःकरता मिळवली तिचे पालनपोषण तुम्ही करावे.*

**मत्तय ५:७ -** *जे दयाळू ते धन्य, कारण त्यांच्यावर दया होईल.*

*पहिले करिंथकरांस पत्र १२:७ तथापि आत्म्याचे प्रकटीकरण सार्वजनिक हितासाठी एकेकाला होते.*

# उत्तरावली

१. वाचा. पहिले पेत्र ४:११. आपण कोणाच्या कुवतीने सेवक व्हायचे आहे?

***देवाच्या क्षमतेने***

२. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:४. विविध आणि भिन्न प्रकारचे आध्यात्मिक कृपादाने आहेत, परंतु त्या सर्वांचा स्रोत कोण आहे?

***देव/पवित्र आत्मा***

३. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:६. योग्य विधान निवडा.

***ब. देव लोकांद्वारे कार्य करतो असे विविध मार्ग आहेत***

४. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:७. खरे किंवा खोटे: पवित्र आत्म्याची उपस्थिती आणि आत्मिक कृपादाने आपल्यापैकी प्रत्येकाला सर्वांच्या भल्यासाठी दिले जातात.

***खरे***

५. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:८-१०. देव लोकांना देत असलेल्या काही आत्मिक दानांची यादी आणि व्याख्या करा.

***ज्ञानाचे शब्द = देवाकडून त्याच्या मनाचा आणि उद्देशाच्या अलौकिक प्रकटीकरण***

पाहा. प्रेषितांची कृत्ये २१:२५.

***विद्येचे शब्द = देवाकडून झालेला कोणत्याही वस्तुस्थितीचा किंवा घटनेचा अलौकिक प्रकटीकरण***

पाहा. प्रेषितांची कृत्ये ९:११-१२.

***विश्वासाचे दान = शंका किंवा तर्कविना देवावर विश्वास ठेवण्याची अलौकिक क्षमता***

पाहा. पहिले करिंथकरांस पत्र १३:२.

***निरोगी करण्याचे दान = मानवी मदत किंवा औषधांशिवाय आजार बरे करण्याची अलौकिक क्षमता***

पाहा. मार्क १६:१८.

***चमत्कारांचे कार्य = अलौकिक हस्तक्षेप जे नैसर्गिक नियमांच्या विरुद्ध चमत्कार निर्माण करतात.***

पाहा. इब्रीकरांस पत्र २:३-४.

***भविष्यवाणी = एक अलौकिक बोल, देवाकडून प्रेरित, वक्त्याद्वारे ज्ञात भाषेत बोलले जाते***

पाहा. प्रेषितांची कृत्ये ११:२७-२८ आणि पहले करिंथकरांस पत्र १४:३.

***आत्म्यांची पारख़ = आत्म्यांच्या उपस्थिती किंवा क्रियाकलापांच्या देवाकडून अलौकिक प्रकटीकरण***

पाहा. प्रेषितांची कृत्ये १६:१६-१८.

***निरनिराळ्या प्रकारच्या भाषा = एक अलौकिक उच्चार, देवाद्वारे प्रेरित, अज्ञात भाषेत (म्हणजे बोलत असलेल्या व्यक्तीला अज्ञात)***

पाहा. प्रेषितांची कृत्ये २:४-११.

***भाषांचा अनुवाद = एक अलौकिक उच्चार, देवाद्वारे प्रेरित, अज्ञात भाषेचा अर्थ लावणे***

पाहा. पहले करिंथकरांस पत्र १४:१३-१४.

६. वाचा. रोमकरांस पत्र १२:६-८ येथे सूचीबद्ध केलेल्या आत्मिक दानांची व्याख्या करा जी देव लोकांना देतो.

***भविष्यवाणी = एक अलौकिक बोल, देवाकडून प्रेरित, वक्त्याद्वारे ज्ञात भाषेत बोलले जाते***

***सेवाकार्य = इतरांची सेवा करणे, व्यावहारिक सेवा***

पाहा. दुसरे तीमथ्य ४:११.

***शिकवणे = समजावून सांगणे, स्पष्ट करणे, सूचना देणे***

पाहा. प्रेषितांची कृत्ये १३:१.

***बोध करणे = तीव्र आग्रह करणे, सल्ला देणे, प्रोत्साहन देणे, विनवणी करणे, ताकीद देणे, सांत्वन करणे किंवा चेतावणी देणे***

पाहा. प्रेषितांची कृत्ये १३:१५.

***देणे = देव आणि इतरांना दिलेल्या भेट / देणग्या उदारपणे देणे***

पाहा. नीतिसूत्रे २२:९.

***सत्ताधारी = घेऊन जाणे किंवा नेतृत्व करणे***

पाहा. प्रेषितांची कृत्ये २०:२८.

***दया = अपराधी किंवा पीडितेला दाखवलेली करुणा***

पाहा. मत्तय ५:७.

७. यापैकी कोणतीही कृपादाने तुमच्याद्वारे कार्य करत असल्याचे तुमच्या लक्षात आले आहे का? असल्यास, ते कोणते दान आहे?

८. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:७. या दानांचा लाभ कोणाला होणार आहे?

***प्रत्येकाला. इतरांना मदत करण्यासाठी तुमच्या दानांचा उपयोग करून, तुम्ही देवाला तुमच्याद्वारे कार्य करू देत आहात.***

# धड्यामधून आणखी काही वचने

**प्रेषितांची कृत्ये २७:२१-२५ -** २१. *तेंव्हा त्यांना पुष्कळ दिवस उपास पडल्यावर पौल त्यांच्यामध्ये उभा राहून म्हणाला, गृहस्थहो, खरेच तुम्ही माझे ऐकावयाचे होते, क्रेताहून निघावयाचे नव्हते, म्हणजे हे हाल व ही हानि टळली असती. २२ तरी मी आता तुम्हांस सांगतो की, धैर्य धरा; तुम्हांपैकी कोणाच्याही जिवाचा नाश होणार नाही, तारवाचा मात्र होईल; २३ कारण ज्याचा मी आहे व ज्याची मी सेवा करितो त्या देवाचा दूत गेल्या रात्री माझ्याजवळ उभा राहून म्हणाला, २४ पौला, भिऊ नको; तुला कैसरापुढे उभे राहिले पाहिजे; आणि पाहा, तुझ्याबरोबर जे तारवातून चालले आहेत ते सर्व देवाने तुला दिले आहेत. २५ म्हणून गृहस्थांनो, धैर्य धरा; माझा देवांवर भरवसा आहे की त्याने मला जसे कळविले तसेच घडेल.*

**प्रेषितांची कृत्ये ९:११-१२ -** *११. प्रभु त्याला म्हणाला, उठून नीट नावांच्या रस्त्यावर जा आणि यहूदाच्या घरी तार्सकर शौल नांवाच्या मनुष्याचा शोध कर; कारण पाहा, तो प्रार्थना करीत आहे; १२. आणि आपल्याला पुन्हा दिसावे म्हणून हनन्या नांवाचा एक मनुष्य आपणावर हात ठेवीत आहे असे त्याने पाहिले आहे.*

**पहिले करिंथ १३:२ -** *मला संदेश देण्याची शक्ती असली, मला सर्व गुजे व सर्व विद्या अवगत असल्या , आणि डोंगर ढळविता येतील इतका दृढ माझा विश्वास असला, पण माझ्या ठायी प्रीती नसली, तर मी काहीच नाही.*

**मार्क १६:१८ -** *सर्प उचलतील , व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही ; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेविले म्हणजे ते बरे होतील.*

**इब्री २:३-४ -** *तर आपण एवढ्या मोठ्या तारणाकडे दुर्लक्ष केल्यास आपला कसा निभाव लागेल? ते सांगण्याचा आरंभ प्रभूकडून झाला असून, ते ऐकणाऱ्यांनी त्याच्याविषयी आपल्याला प्रमाण पटविले; त्यांच्याबरोबर देवानेही चिन्हे, अद्‌ते व नाना प्रकारचे पराक्रम करून आणि आपल्या इच्छेप्रमाणे पवित्र आत्म्याची दाने वाटून देऊन साक्ष दिली.*

**प्रेषित ११:२७-२८ -** *२७. त्या दिवसांत यरुशलेमेहून अंत्युखियास संदेष्टे आले. २८. तेंव्हा त्यांच्यातील अगब नावांच्या मनुष्याने उठून आत्म्याच्या योगे सुचविले की, सर्व जगांत मोठा दुष्काळ पडणार आहे. (हा दुष्काळ कलौद्याच्या वेळेत पडला)*

**पहिले करिंथ १४:३ -** *संदेष्टा हा माणसांना उद्देशून उन्नती, उतेजन व सांत्वन ह्यांबाबत बोलतो.*

**प्रेषित १६:१६-१८ -** *१६. मग असे झाले की, आम्ही प्रार्थना स्थळाकडे जात असता कोणीएक मुलगी आम्हांला आढळली. तिच्या अंगांत येत असे. ती दैवप्रश्न सांगून आपल्या धन्यांना पुष्कळ मिळकत करून देत असे. १७. ती पौलाच्या व आमच्या मागे येऊन मोठ्याने म्हणाली, हे लोक परात्पर देवाचे दास आहेत; १८. असे ती पुष्कळ दिवस करीत असे; मग पौलाला अतिशय वाईट वाटले व मागे वळून तो त्या पिशाचाला म्हणाला, येशू ख्रिस्ताच्या नांवाने मी तुला आज्ञा करितो की, तूं हिच्यामधून निघून जा; आणि ते तत्काळ निघून गेले.*

**प्रेषित २:४-११ -** *४. तेंव्हा ते सर्व जण पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले. ५. त्या वेळेस आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रातील भक्तिमान यहुदी यरुशलेमेत राहत होते. ६. तो नाद झाल्यावर लोकसमुदाय एकत्र होऊन गोंधळून गेला; कारण प्रत्येकाने त्यांना आपआपल्या भाषेत बोलतांना ऐकले. ७. ते सर्व आश्चर्याने थक्क होऊन म्हणाले, पाहा, हे बोलणारे सर्व गालिली ना? ८. तर आपण प्रत्येक जण आपआपली जन्मभाषा ऐकतो हे कसे? ९. पार्थी, मेदी, एलामी, मेसोपटेम्या, यहूदीया कप्पूदुकीया, पंत, आसिया, १०. परूगिया, पफुलीया, मिसर व कुरणेच्या जवळचा लिबूवा देश हयात राहणारे, यहुदी व यहूदीयमतानुसारी असे रोमन प्रवासी, ११. क्रेतीय, अरब, असे आपण त्यांना आपआपल्या भाषांत देवाची महत्कृत्यें सांगताना ऐकतो.*

**पहिले करिंथ १४:१३-१४ -** *१३. भाषा बोलणाऱ्याने आपणाला अर्थ सांगता यावा म्हणून प्रार्थना करावी. १४. कारण जर मी अन्य भाषेत प्रार्थना केली तर माझा आत्मा प्रार्थना करितो, पण माझ्या बुद्धीचा उपयोग कोणाला होत नाही.*

# पाठ ३

# चमत्कार परमेश्वराचे गौरव करतात

*अॅन्ड्र्यू वोमॅक द्वारा लिखित*

आम्ही देवाच्या सामर्थ्याने चालणे आणि तो आपल्याला देत असलेल्या कृपादानांद्वारे इतर लोकांची सेवा करण्याबद्दल बोललो आहोत. हे खरोखर देवाचे गौरव कसे करते आणि त्याच्या अलौकिक क्षमतेचा वापर करण्याची तो आपल्याकडून अपेक्षा करतो याबद्दल मी काही गोष्टी तुम्हाला सांगू इच्छितो. यावर अनेक शास्त्र वचने आहेत ज्यापैकी मी फक्त काहींच घेउन त्यांचा उलगडा करेल. मत्तय ९ मध्ये येशूने अर्धांगवायू झालेल्या माणसाला बरे केले असे एक उदाहरण आहे आणि मी मार्क २ मध्ये त्याबद्दल अधिक खोलवररित्या सामोरे जाईन. मत्तय ९:८ सांगते, *"हे पाहून लोकसमुदाय भयचकित झाले आणि ज्या देवाने माणसांना एवढा अधिकार दिला त्याचा त्यांनी गौरव केला."* तुम्हाला माहित आहे का की आत्म्याचे विविध कृपादान - विविध चमत्कार - देवाचे गौरव करतात आणि याकरिताच त्याने आपल्याला ती चमत्कारिक क्षमता दिली आहे?

जेव्हा तुम्ही इतर लोकांना सांगायला सुरुवात करता, तेव्हा त्यांच्यात स्वाभाविक प्रवृत्ती असते, शंका घेण्याची आणि प्रश्न विचारण्याची जसे की, "बरं, तू काय म्हणतोस ते खरं आहे हे मला कसं कळणार?" मी एकदा टी एल ऑस्बोर्न, एक प्रसिद्ध सुवार्तिक, ज्याने शेकडो हजारो लोकांना तारणरूपी परमेश्वराकडे नेले, आणि मी एकदा त्यांच्या अनुभवाची चर्चा करताना ऐकले, जेव्हा तो पहिल्यांदा परदेशी मिशन क्षेत्रात होता. तेव्हा त्याने खुप प्रयत्न केला लोकांना देवा बद्धल सांगुन साक्ष देण्यासाठी, आणि त्यांनी जे सांगितले त्यावर लोकांनी विश्वास ठेवला नाही. शेवटी, एके दिवशी तो एका माणसाशी बोलत होता, तो असे म्हणाला, "पण पवित्र शास्त्र सांगते, "आणि तो माणूस म्हणाला, "तुमचे काळया रंगाचे पुस्तक इतर कोणत्याही काळ्या पुस्तकापेक्षा वेगळे आहे का?" मग टी एल ओस्बोर्न ने विचार केला, *या लोकांना पवित्र शास्त्र खरे आहे हे कसे समजेल? माझा विश्वास आहे की पवित्र शास्त्र म्हणजे देवाचे वचन आहे, पण मी हे त्यांना कसे पटवून देऊ?*

त्याने मिशन कार्यक्षेत्र पराभूत आणि निराश होऊन सोडले, घरी आले, आणि देवाचे वचन आणि प्रार्थनेद्वारे शोध घेऊ लागले. परमेश्वराने त्यांना सांगितले की त्याला त्याची दैवी अलौकिक क्षमता वापरण्याची गरज आहे. चिन्हे आणि चमत्कार हे देवाच्या वचनाचे प्रमाणीकरण करण्याच्या उद्देशाने आहेत, जे लोकांचे जीवन बदलेल. पहिले पेत्र १:२३ मध्ये असे म्हटले आहे की, *"कारण तुम्ही नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे 'देवाच्या जिवंत व सर्वकाल टिकणाऱ्या' शब्दाच्या द्वारे पुन्हा जन्म पावलेले आहात."* देवाचे वचन लोकांचे जीवन बदलते, परंतु तुम्ही असे काय करू शकता की त्यांचा विश्वास बसेल की तो खरोखर देव बोलत आहे? तर, तोच चमत्कारांचा उद्देश आहे. जेव्हा आपण उपदेश करतो आणि म्हणतो की, एखाद्या व्यक्तीला बरे व्हावे ही देवाची इच्छा आहे, तेव्हा आपण येशूच्या नावाने अधिकार घेवुन त्यांच्यावर बोलून ते त्यांच्यासाठी करून दाखवतो. त्यांचे आंधळे डोळे किंवा बहिरे कान जे उघडले आहेत ते देव असल्याचे प्रमाणित करतात. चमत्कार लोकांना बदलणार नाही, परंतु विविध चमत्कार लोकांमध्ये विश्वास निर्माण करतील की तुम्ही बोललेले शब्द देवाचे वचन आहे.

त्याचे एक शास्त्रवचनीय उदाहरण मार्क २:१-९ मध्ये आहे, जिथे पक्षाघाताने बरे झालेल्या व्यक्तीबद्दल अधिक तपशील आहे: *"काही दिवसांनी तो [येशु] पुन्हा कफर्णहूमात आला आणि तो घरी आहे असे लोकांच्या कानी पडले.तेव्हा इतके लोक जमले की दारातदेखील त्यांना जागा होईना; तेव्हा तो त्यांना संदेश देत होता.मग लोक त्याच्याकडे एका पक्षाघाती माणसाला घेऊन आले. त्याला चौघांनी उचलून आणले होते. त्यांना दाटीमुळे त्याच्याजवळ जाता येईना, म्हणून तो होता तेथले छप्पर त्यांनी उस्तरून काढले आणि वाट करून ज्या बाजेवर पक्षाघाती पडून होता ती खाली सोडली.त्यांचा विश्वास पाहून येशू पक्षाघाती माणसाला म्हणाला, "मुला, तुझ्या पापांची क्षमा झाली आहे." कित्येक शास्त्री तेथे बसले होते; त्यांच्या मनात असा विचार आला की, 'हा असे का बोलतो? हा दुर्भाषण करतो; एकावाचून म्हणजे देवावाचून पापांची क्षमा कोण करू शकतो?' ते स्वतःशी असा विचार करत आहेत हे येशूने अंतर्ज्ञानाने लगेच ओळखून त्यांना म्हटले, "तुम्ही आपल्या मनात असले विचार का आणता?'तुझ्या पापांची क्षमा झाली आहे,' असे पक्षाघाती माणसाला म्हणणे सोपे, किंवा 'ऊठ, आपली बाज उचलून चाल,' असे म्हणणे सोपे?* (कंस माझे)" सत्य हे आहे की या दोन्ही गोष्टी तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहेत. माणसाला पापांची क्षमा करणे अशक्य आहे आणि अर्धांगवायू झालेल्या दुसऱ्या व्यक्तीला बरे करणे देखील अशक्य आहे. म्हणून जर देवच तो एक हे करू शकत असेल तर तो नक्कीच दुसर पण करू शकतो म्हणजेच पापांची क्षमा आणि आरोग्य देणे.

वचन १०-१२ मध्ये येशू म्हणाला, *"परंतु मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे तुम्हांला समजावे म्हणून (तो पक्षाघाती माणसाला म्हणाला)*

*मी तुला सांगतो, "ऊठ, आपली बाज उचलून घे व आपल्या घरी जा." मग तो उठला व लगेच आपली बाज उचलून सर्वांच्या देखत निघाला; ह्यावरून सर्व जण थक्क झाले व देवाचा गौरव करत म्हणाले, "आम्ही असे कधीच पाहिले नव्हते."* येशूने बोलताना हे अगदी स्पष्टपणे सांगितले की, *"परंतु मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे तुम्हांला समजावे म्हणून (तो पक्षाघाती माणसाला म्हणाला)."* त्याने त्याला बरे केले जेणेकरून लोकांना हे समजेल की जर तो भौतिक क्षेत्रात अशा गोष्टी करू शकतो ज्या ते त्याच्या शब्दानुसार घडू शकतात, तर आत्मिक गोष्टी जसे की पापांची क्षमा देखील घडू शकते. म्हणून येशूने त्याचे शब्द प्रमाणित करण्यासाठी चमत्कार केले.

हेच इब्री २;२-३ मध्ये सांगितले आहे, *"देवदूतांच्या द्वारे सांगितलेले वचन जर दृढ झाले आणि प्रत्येक उल्लंघनाचे व आज्ञाभंगाचे यथान्याय फळ मिळाले,तर आपण एवढ्या मोठ्या तारणाकडे दुर्लक्ष केल्यास आपला कसा निभाव लागेल? ते सांगण्याचा आरंभ प्रभूकडून झाला असून, ते ऐकणाऱ्यांनी त्याविषयी आपल्याला प्रमाण पटवले;"* हे सांगते की देवाने पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने याची पुष्टी केली आहे. हे मार्क १६:२० सोबत जोडल तर, *"त्यानंतर त्यांनी तेथून निघून जाऊन सर्वत्र घोषणा केली. प्रभू त्यांच्याबरोबर कार्य करत होता व घडणाऱ्या चिन्हांच्या द्वारे वचनाचे समर्थन करत होता."* मी जो मुद्दा मांडत आहे तो हा की, देवाची इच्छा आहे इतर लोकांची सेवा करण्यासाठी तुम्ही त्याची अलौकिक क्षमता आणि शक्ती यांचा वापर करावा. तो पवित्र आत्म्याच्या दिलेल्या दानांद्वारे घडणाऱ्या चमत्कारांचा वापर करून लोकांना खात्री देतो की, तो खरोखर त्यांच्याशी बोलत आहे.शेवटी, लोकांनी त्यांच्या अंतःकरणातुन मुक्त व्हावे अशी देवाची इच्छा आहे, परंतु कधीकधी एखाद्या व्यक्तीच्या हृदयाकडे जाण्याचा मार्ग त्यांच्या शरीरातून आणि त्यांच्या भावनांमधून जातो. जर तुम्ही त्या भागांमध्ये सामोरे जाऊ शकता आणि एखाद्या व्यक्तीला मुक्त होताना पाहू शकता, तर ते स्वत:ला मोकळ करतील आणि परमेश्वराला परवानगी देतील त्यांचे उर्वरित आयुष्य आणि अक्षरशः त्यांचे संपूर्ण अस्तित्व त्याला स्पर्श करण्यासाठी.

पहिले करिंथ २:१ मध्ये पौल करिथकरांना लिहीत होता, त्यांना सांगत होता की, तो प्रथम त्यांच्याशी कसा संपर्क साधतो; *"बंधुजनहो, मी तर तुमच्याकडे आलो तो वक्तृत्वाच्या अथवा ज्ञानाच्या श्रेष्ठतेने देवाचे रहस्य तुम्हांला सांगत आलो असे नाही.कारण येशू ख्रिस्त, म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला.आणि मी तुमच्याजवळ अशक्त, भयभीत व अतिकंपित असा झालो. तुमचा विश्वास मनुष्याच्या बुद्धिमत्तेवर उभारलेला नसावा तर देवाच्या सामर्थ्यावर उभारलेला दिसावा म्हणून माझे भाषण व माझी घोषणा ज्ञानयुक्त अशा मन वळवणाऱ्या शब्दांची नव्हती, तर आत्मा व सामर्थ्य ह्यांची निदर्शक*

*होती."* त्याने हे स्पष्ट केले की, तो केवळ शब्दांवर जोर देणारे भाषण करण्यास नाही तर देवाच्या आत्म्याचे आणि सामर्थ्याचे प्रदर्शन करण्यासाठी आला आहे, त्यामुळे लोकांचा विश्वास मनुष्याच्या बुद्धीवर नव्हे तर देवाच्या सामर्थ्यावर टिकून राहील.

ख्रिस्ती लोकांमध्ये विस्मयकारक तर्क आहेत. एकदा की तुम्हाला सत्य समजले तर, तुम्हाला आश्चर्य वाटेल की तुम्ही ते कसे चुकवले आणि प्रत्येकजण ते सत्य का स्वीकारत नाही. पण ख्रिस्तीधर्म हा केवळ तर्कशास्त्र नाही... हा वास्तविक देवाचा वास्तविक अनुभव घेणे आहे. तो आज जिवंत आहे, आणि वचनात लिहिल्या प्रमाणे त्याने जसे केले होते त्याचप्रमाणे त्याला आजही सामर्थ्याच्याद्वारे स्वतःला प्रगट करायचे आहे. इब्री १३:८ सांगते, *"येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे."* येशू आला आणि तो चिन्हे आणि महत्कृत्ये आणि चमत्कारांद्वारे आपल्यामध्ये परमेश्वराने तुमच्याकरता पाठवलेला असा तो मनुष्य होता. प्रेषितांची कृत्ये १०:३८ सांगते, *"नासोरी येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला; तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वांना बरे करीत फिरला; कारण देव त्याच्याबरोबर होता."* त्याने त्याच्या शब्दाची पुष्टी केली होती, आणि ते चमत्कार लोकांना त्याच्या संदेशाकडे आकर्षित करण्याचे कारण बनले आणि त्यांनी देवाचा गौरव केला. अनेक शास्त्रवचनांमध्ये असे म्हटले आहे की, या चमत्कारांनी देवाचा गौरव झाला. आणि जर येशूला सेवा करण्यासाठी आणि लोकांचे जीवन बदलण्यासाठी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याचा उपयोग करावा लागला तर, आपण त्याच्यापेक्षा काही वेगळ करू असे आपल्याला कसे वाटू शकते? जर येशूने आपला संदेश लोकांपर्यंत पोहोंचवण्यासाठी आणि लोकांना स्वतःकडे आकर्षित करण्यासाठी चमत्कार करण्याचा उपयोग केला, तर देवाच्या अलौकिक सामर्थ्याशिवाय आपण आज जगाला पटवून देऊ असे आपण कसे विचार करू शकतो? सत्य हे आहे की चमत्कार हे देवाचे गौरव करतात. ती एक घंटा आहे जी लोकांना आकर्षित करते. ती रात्रीच्या जेवणाची घंटा वाजवण्यासारखी असते – ते अन्न आहे जे तुमच पोट भरेल, परंतु ती घंटा आहे जे तुमचे लक्ष वेधून घेते अन्नाकड़े. घंटे अभावी, काही लोक जेवण चुकवणार आहेत. बरेच लोक देवाच्या चमत्कारी शक्तीशिवाय, देव वास्तविक आहे आणि तो त्यांचे हृदय बदलू शकतो आणि त्यांच्या पापांची क्षमा करू शकतो हे समजणे चुकवीत आहेत.

मी तुम्हाला हे समजून घेण्यास प्रोत्साहित करतो की, देव आपल्यापैकी प्रत्येकाच्या द्वारे प्रवाहित होऊ इच्छितो आणि इतर लोकांच्या जीवनात आपल्याद्वारे चमत्कार घडवून आणू इच्छितो. तुमच्यापैकी काही जण म्हणतील," पण ते मला घाबरवते. मी एखाद्या व्यक्तीसाठी प्रार्थना केली आणि काय होईल जर ती व्यक्ति बरी झाली नाहीं तर? हे काम करणार हे मला कसे समजेल?" तुम्हाला हे समजणे खुप आवश्यक आहे की, तुम्ही चमत्कार करत नाही आहात; तर देव तुमच्याद्वारे करत आहे.जर चमत्कार घडला आणि

ती व्यक्ती मोकळी झाली तर ती जबाबदारी तुम्ही घेत नाही, आणि जर ते कार्य झाल नसेल तरीही तुम्ही स्वत:ला दोष लावून घेत नाही. तुम्ही फक्त प्रार्थना करा; बरे करणारा देव आहे, परंतु त्याला तुमच्यातून प्रवाहित व्हावे लागेल. देव तुमचा चमत्कारिकरित्या वापर करू इच्छितो. तुम्हाला देवाच्या वचनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे, ते इतर लोकांसाठी कसे कार्य करते ते पहा, त्या गोष्टी तुमच्या जीवनात लागू करा आणि देवाच्या चमत्कारिक, अलौकिक शक्तीना आज तुमच्यामधून वाहू द्या.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. चमत्कार म्हणजे काय?

२. वाचा मार्क २:१०-१२. येशूच्या चमत्काराने काय दाखवून दिले की त्याला काय करण्याची शक्ती आहे?

**मार्क २:१०-१२ -** *परंतु मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करण्याचा अधिकार आहे हे तुम्हांला समजावे म्हणून (तो पक्षाघाती माणसाला म्हणाला)(११)मी तुला सांगतो, "ऊठ, आपली बाज उचलून घे व आपल्या घरी जा." (१२)मग तो उठला व लगेच आपली बाज उचलून सर्वांच्या देखत निघाला; ह्यावरून सर्व जण थक्क झाले व देवाचा गौरव करत म्हणाले, "आम्ही असे कधीच पाहिले नव्हते.*

३. वाचा. मार्क १६:१५-१८ - विश्वासणारे म्हणून, आपण काय करायला हवे?

**मार्क १६:१५-१८ -** *मग त्याने त्यांना सांगितले की, "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. १६. जो विश्वास धरतो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल; जो विश्वास धरत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल. १७. आणि विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील : ते माझ्या नावाने भुते काढतील, नवनव्या भाषा बोलतील, १८. सर्प उचलतील व कोणताही प्राणघातक पदार्थ प्याले तरी तो त्यांना मुळीच बाधणार नाही; त्यांनी दुखणाइतांवर हात ठेवले म्हणजे ते बरे होतील.*

४. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:५-८ आणि १२. लोकांनी काय पाहिले आणि त्यांनी कसा प्रतिसाद दिला?

**प्रेषितांची कृत्ये ८:५-८ -** *आणि फिलिप्पाने शोमरोन शहरात जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली. ६. तेव्हा फिलिप्पाचे भाषण ऐकून व तो करत असलेली चिन्हे पाहून लोकसमुदायांनी त्याने सांगितलेल्या गोष्टींकडे एकचित्ताने लक्ष दिले. ७. कारण ज्यांना अशुद्ध आत्मे लागले होते त्यांच्यातील पुष्कळांतून ते मोठ्याने ओरडून निघून गेले; पुष्कळ पक्षाघाती व पांगळी माणसे बरी झाली.(८)आणि त्या नगरात आनंदीआनंद झाला.*

५. वाचा. प्रेषितांची कृत्ये३:१२. प्रेषित पेत्राने स्वतःच्या पवित्रतेबद्दल चमत्कार निर्माण करण्याबद्दल काय म्हटले?

**प्रेषितांची कृत्ये ८:१२ -** *तरीपण फिलिप्प देवाचे राज्य व येशू ख्रिस्ताचे नाव ह्यांविषयीची सुवार्ता सांगत असता लोकांचा विश्वास बसला आणि पुरुष व स्त्रिया ह्यांचा बाप्तिस्मा झाला.*

**प्रेषितांची कृत्ये ३:१२ -** *हे पाहून पेत्राने लोकांना म्हटले, "अहो इस्राएल लोकांनो, ह्याचे आश्चर्य का करता? अथवा आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालायला लावले आहे असे समजून आमच्याकडे निरखून का पाहता?*

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये ३:१६. चमत्कार कसे घडले?

**प्रेषितांची कृत्ये ३:१६ -** *त्याच्याच नावावरील विश्वासामुळे त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तिमान केले आहे. त्याच्याद्वारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हां सर्वासमक्ष हि शरीरसंपती प्राप्त झाली आहे. नवीन करारात चमत्कार घडल्याची उदाहरणे आहेत की जी प्रेषितांनी केलेली नाहीत?*

७. वाचा. पहिले करिंथ १:७. चमत्कारांची देणगी कधी थांबेल?

**पहिले करिंथ १:७** *असे की, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या प्रकट होण्याची वाट पाहणारे जे तुम्ही ते कोणत्याही कृपादानात उणे पडला नाहीत.*

# उत्तरावली

१. चमत्कार म्हणजे काय?

***एक असाधारण किंवा असामान्य घटना जी दैवी शक्तीचे प्रकटीकरण मानली जाते. हा नैसर्गिक नियमांवर देवाच्या शक्तीचा अलौकिक हस्तक्षेप देखील आहे.***

२. वाचा मार्क २:१०-१२. येशूच्या चमत्काराने काय दाखवून दिले की, त्याला काय करण्याची शक्ती आहे?

***पापांची क्षमा करण्याची***

३. वाचा. मार्क १६:१५-१८. विश्वासणारे म्हणून, आपण काय करायला हवे?

***सुवार्ता प्रचार करा, नविन विश्वासणारे यांचा बाप्तिस्मा करा, भुते काढा, अन्य भाषा बोला आणि आजारी लोकांना बरे करा.***

४. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८: ५-८ आणि १२. लोकांनी काय पाहिले आणि त्यांनी कसा प्रतिसाद दिला?

***त्यांनी चमत्कार पाहिले (वचन ७), त्यांनी येशूवर विश्वास ठेवला आणि पाण्याने बाप्तिस्मा घेतला (वचन १२)***

५. वाचा. प्रेषितांची कृत्ये ३:१२. प्रेषित पेत्राने स्वतःच्या पवित्रतेबद्दल चमत्कार निर्माण करण्याबद्दल काय म्हटले?

***त्याच्या स्वतःच्या पवित्रतेने किंवा शक्तीने त्या माणसाला बरे केले नाही; ते परमेश्वराचे होते.***

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये ३:१६. चमत्कार कसे घडले?

***येशूच्या नावाद्वारे आणि येशुमध्ये केलेल्या विश्वासाद्वारे.***

७. नवीन करारात चमत्कार घडल्याची उदाहरणे आहेत की जी प्रेषितांनी केलेली नाहीत?

***होय, ख्रिस्ताचा एक अनामिक अनुयायी (मार्क ९:३८-३९),फिलिप (प्रेषितांची कृत्ये ८:५-७), हनन्या (प्रेषितांची कृत्ये ९:१०-१८)***

८. वाचा. पहिले करिंथ १:७. चमत्कारांची देणगी कधी थांबेल?

***प्रभु येशूच्या येण्याच्या वेळी; म्हणजे, दुसरे आगमन जेव्हा तो परत येतो.***

# धड्यामधून आणखी काही वचने

**मार्क ९:३८-३९ -** *(३८) योहान येशूला म्हणाला, "गुरुजी, आम्ही एकाला आपल्या नावाने भुते काढताना पाहिले आणि आम्ही त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला कारण तो आपल्यापैकी नव्हता." (३९) परंतु येशू म्हणाला, "त्याला मना करू नका, कारण जो कोणी माझ्या नावाने चमत्कार करतो तो नंतर माझ्याविषयी वाईट बोलू शकणार नाही.*

**प्रेषितांचीं कृत्यें ९: १०-१८ -** *(१०) दिमष्कमध्ये येशूचा एक अनुयायी होता. त्याचे नाव हनन्या होते. प्रभु त्याच्याशी एका दृष्टान्तात बोलला: तो म्हणाला, "हनन्या!" हनन्याने उत्तर दिले, "मी आहे, प्रभु!" (११) प्रभु हनन्याला म्हणाला, "ऊठ आणि नीट नावाच्या रस्तयावर जा. तेथे यहूदाचेघर शोध व तार्ससहून आलेल्या शौल नावाच्या व्यक्तिबद्दल विचार. सध्या तो तेथे आहे व प्रार्थना करीत आहे. (१२) शौलाने दृष्टान्त पाहिला आहे. त्यात हनन्या नावाचा मनुष्य आपल्याकडे आला असून आपल्यावर हात ठेवीत आहे, असे त्याला दिसले. व त्यानंतर त्याला पुन्हा दृष्टी प्राप्त झाली, असे त्याला दिसले." (१३) परंतु हनन्याने उत्तर दिले, "प्रभु मी त्या मनुष्याविषयी अनेक लोकांच्या तोंडून ऐकले आहे. यरुशलेम येथील तुझया संतांशी तो किती वाईट रीतीने वागला हे मी ऐकले आहे. (१४) आणि आता जे तुझ्या नावावर विश्वास ठेवतात, अशा लोकांना बांधून नेण्यासाठी प्रमुख याजकाकडून अधिकारपत्र घेऊन हा शौल येथे आला आहे." (१५) परंतु प्रभु म्हणाला, "जा! एका महत्वाच्या कामाकरिता मी त्याला निवडले आहे, माझ्याविषयी त्याने राजांना, यहूदी लोकांना, आणि दुसऱ्या राष्ट्रांना सांगितले पाहिजे. (१६) माझ्या नावाकरीता ज्या गोष्टी त्याला सहन कराव्या लागतील त्या मी त्याला दाखवून देईन." (१७) हनन्या निघाला, आणि यहूदाच्या घरी गेला. त्याने शौलाच्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हटले, "शौला, माझ्या बंधू, प्रभु येशूने मला पाठविले. ज्याने तुला इकडे येत असता रस्त्यावर दर्शन दिले त्यानेच मला तुझ्याकडे पाठविले, येशूने मला पाठविले यासाठी की, तुला पुन्हा पाहता यावे व पवित्र आत्म्याने तू भरला जावास." (१८) लागलीच खपल्यासारखे काही तरी शौलाच्या डोव्ळ्यांवरुन खाली पडले, आणि त्याला पुन्हा दृष्टी आली शौल तेथून उठल्यावर त्याचा बाप्तिस्मा करण्यात आला.*

# पाठ ४

# ईश्वरीय नात्यांचे सामर्थ्य

*डॉन क्रो द्वारा लिखित*

आज आपण ईश्वरी नातेसंबंधांच्या सामर्थ्याबद्दल बोलत आहोत. जेव्हा तुम्ही याबद्दल विचार करता, तेव्हा संपूर्ण बायबल या विषयावर बोलते. उदाहरणार्थ, "चर्च" हा शब्द ग्रीक मधे '*एक्लेसिया*' असा शब्द आहे, आणि त्याचा अर्थ 'निवडलेली मंडळी' असा होतो. तुम्ही देवाच्या वचनात पाहात असता, तुम्हाला दिसेल की मंडळी, किंवा देवाच्या लोकांना एकत्र येण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्यांना एकत्र प्रार्थना करण्यास आणि एकमेकांना दररोज प्रोत्साहित करण्यासाठी उत्तेजन दिले जाते. जेव्हा ते एकत्र चालतात तेव्हा त्यांना ईश्वरी नातेसंबंधांच्या सामर्थ्याने प्रोत्साहन दिले जाते. जर तुम्ही "वडीलगण" हा शब्द देखील विचारात घ्याल, तर तो शास्त्रामध्ये बऱ्याच वेळा वापरला गेला आहे, आणि त्याचा वापर एखाद्या मोठ्या, प्रौढ व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी केला जातो. ज्याने ख्रिस्ताचे जीवन पवित्र आत्म्याच्या संगतीने जगले आहे, आणि जो त्याच्या कुटुंबात आणि त्याच्या वैवाहिक जीवनात यशस्वी होत आलेला आहे. जर मला माझ्या वैवाहिक जीवनात समस्या येत असेल, तर मला अशा व्यक्तिकडे जायचे आहे जो देवनिष्ठ आहे, ज्याला अनेक वर्षांपासून ईश्वरी ज्ञान प्राप्त झाले आहे.

आपल्याला हे देखील लक्षात घ्यायचे आहे की , शास्त्रात ख्रिस्ताच्या शरीराचे भौतिक शरीर म्हणून वर्णन केले आहे. त्याला हात, डोळे, कान आणि इतर भिन्न भाग आहेत. आपण सर्व एकमेकांचे भाग आहोत. आणि एकमेकांचा भाग म्हणून, आपण एकमेकांकडून ताकद मिळवितो. प्रत्येक अस्थिबंधन, शरीराच्या प्रत्येक भागाला स्वतःच वरदान दिलेल आहे, स्वतःच विशिष्ट कौशल्य, शक्ती आणि ज्ञान देण्याची स्वतःची पद्धत असते.

याकोब ५:१६ मध्ये पवित्र शास्त्र सांगते, *"तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपले दोष् एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते."* ईश्वरी नातेसंबंधांच्या सामर्थ्याचे हे शास्त्रातील एक उदाहरण आहे. तुम्हाला माहीत आहे की, ख्रिस्ताच्या शरीरात काहीतरी गहाळ झाले आहे. मला

असे वाटते की आम्ही विश्वासी असलेले याजकगण यावर जास्त जोर दिला आहे, म्हणजे एकमेकांकडे नाही तर थेट देवाकडे जाणे. पवित्र शास्त्र आपल्या चुका एकमेकांना कबूल करण्याबद्दल सांगते. माझा एक मित्र आहे ज्याचे नाव डॉ. लॉरेन लुईस आहे. तो एक वृद्ध गृहस्थ आहे, आणि आम्ही खूप वेळ एकत्र घालवला आहे. तो ग्रीक भाषेचा विद्वान आहे आणि तो थेट ग्रीकमधून वाचतो. जेव्हा मला पवित्र शास्त्रातून काही कळत नाही, तेव्हा मी त्याच्याकडे जातो आणि त्याला यामध्ये ग्रीक भाषांतर काय ते विचारतो, आणि तो मला माझ्या वचनासंबंधी अभ्यासात देखिल खूप मदत करतो. मी या माणसाबरोबर तासन तास घालवले आहेत. तो एक ज्ञानी व्यक्ति आहे. तो एक आध्यात्मिक आहे. त्याचा विवाह यशस्वी आहे. त्याचे यशस्वी कुटुंब आहे, आणि असे काही प्रसंग येतात जेव्हा आपण सर्वांनी आपले दोष् कबूल केली पाहिजेत. तर, मला माहित आहे की शास्त्र सांगते की आपल्याला देवासमोर आपले दोष् कबुल करायचे आहेत आणि मी असे म्हणत नाही की तुम्ही तुमच्या पापांची कबुली एखाद्याला द्यावी यासाठी की ते त्याची क्षमा देणार आहे, कारण आपल्याला यासाठी सरळ देवाकडेच जायाची गरज आहे. पण आपल्या जीवनात जबाबदारी असणे आवश्यक आहे.

ईश्वरी नातेसंबंध असण्याच सामर्थ्य हे आहे की, हे आपल्याला जबाबदार बनण्यास आणि प्रभूचा शोध घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक असलेल सामर्थ्य आहे. इब्रीकरांस पत्र मध्ये शास्त्र सांगते, जोपर्यंत “आज” म्हटलेला वेळ आहे तोपर्यंत तुम्ही एकमेकांना प्रतिदिवशी बोध करा; तुमची एकत्र संगती बंद करू नका, एकमेकाना प्रोत्साहन दया हेतू हा की, पापाच्या फसवणुकीने तुमच्यातील कोणी ‘कठीण होऊ’ नये. हे सर्व ईश्वरी नातेसंबंधांच्या महत्त्वाबद्दल बोलत आहे. नकारात्मक बाजूने बघितल तर , पवित्र शास्त्र आपल्याला अधार्मिक नातेसंबंधांबद्दल आणि त्या अधार्मिक नातेसंबंधांचा आपल्या मनावर आणि आपल्या विचारांवर कसा विपरीत परिणाम होऊ शकतो याबद्दल अनेकदा चेतावणी देते. हे जाणून घेण्यापूर्वी, आपल्याला अशा गोष्टींकडे नेले जाऊ शकते ज्यामध्ये आपण राहू नये, कारण आपण स्वतःचे रक्षण केले नाही आणि स्वतःला आत्मिक सल्लागारांनी वेढून घेतले नाही. (नीति ११:१४, १३:२०, आणि पहिले करिंथ १५:३३). पवित्र शास्त्र सांगते, *“कारण नीती व स्वैराचार ह्यांची भागी कशी होणार?”* (दुसरे करिंथ ६:१४).

तुम्ही या ख्रिस्ती जीवनात वाटचाल करत असताना, स्वतःला ईश्वरी नातेसंबंधी लोकांमध्ये वेढून घेण्यास प्रोत्साहित करा आणि जे तुमच्यावर नकारात्मक प्रभाव टाकतील त्यांच्यापासून दूर जा. आपल्या जीवनात आध्यात्मिक विश्वासणारे असणे खूप महत्त्वाचे आहे ज्यांच्या सोबत राहून आपण स्वतःला धारदार बनवू शकतो (नीतिसूत्रे २७:१७) आणि त्यांना जबाबदार असे बनू. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो , तुम्ही या गोष्टींवर विचार आणि मनन करा.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. पहिले करिंथ १५:३३. हे वचन आपल्याला नातेसंबधाविषयी काय शिकवते?

**पहिले करिंथ १५:३३ -** *फसू नका, "कुसंगतीने नीती बिघडते."*

२. वाचा पहिले करिंथ १२:१२. हे वचन आपल्याला ख्रिस्ती जीवना संबधी काय सांगते?

**पहिले करिंथ १२:१२ -** *कारण जसे शरीर एक असून त्याला अवयव पुष्कळ असतात आणि त्या शरीराचे अवयव पुष्कळ असून सर्व मिळून एक शरीर बनते, तसाच ख्रिस्त आहे.*

३. वाचा. इब्री १०:२४. इब्री लोकांस पत्र यामधून आपण ईश्वरीय नातेसंबंधाबद्धल काय शिकू शकतो?

***इब्री १०:२४-२५*** *आणि प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष देऊ. [२५ ] आपण कित्येकांच्या चालीप्रमाणे आपले एकत्र मिळणे न सोडता एकमेकांना बोध करावा, आणि तो दिवस जसजसा जवळ येत असल्याचे तुम्हांला दिसते तसतसा तो अधिक करावा.*

४. वाचा. इब्री १०:२५. नातेसंबंधांबद्दल या वचनातून आपण काय शिकू शकतो?

५. वाचा. नीतिसुत्रे ५:२२-२३. अधार्मिक नातेसंबंधांपासून आपण आपल्या अंतःकरणाचे रक्षण का केले पाहिजे?

**नीतिसुत्रे ५:२२-२३ -** *दुर्जनाला त्याची स्वत:चीच दुष्कर्मे पछाडतात; तो आपल्याच पापाच्या पाशात सापडतो. [२३] त्याला शिक्षण मिळाले नाही म्हणून तो मरतो; तो आपल्या अति मूर्खपणामुळे भ्रांत होतो.*

६. वाचा. दुसरे तीमथ्य २:२२. आपल्याला नीतिमत्त्व, विश्वास, प्रीती, शांती ह्यांच्या पाठीस कोणाबरोबर लागायचे आहे?

**दुसरे तीमथ्य २:२२ -** *तरुणपणाच्या वासनांपासून दूर पळ आणि शुद्ध मनाने प्रभूचा धावा करणाऱ्यांबरोबर नीतिमत्त्व, विश्वास, प्रीती, शांती ह्यांच्या पाठीस लाग.*

७. वाचा. इब्री लोकांस पत्र १३:७. आपण कोणाची आठवण ठेवावी आणि आपल्या जीवनाची रचना करावी?

**इब्री लोकांस पत्र १३:७ -** *जे तुमचे अधिकारी होते, ज्यांनी तुम्हांला देवाचे वचन सांगितले, त्यांची आठवण करा; त्यांच्या वर्तणुकीचा परिणाम लक्षात आणून त्यांच्या विश्वासाचे अनुकरण करा.*

## उत्तरावली

१. वाचा. पहिले करिंथ १५:३३. हे वचन आपल्याला नातेसंबधाविषयी काय शिकवते

***वाईट संगत चांगले चारित्र्य भ्रष्ट करते***

२. वाचा. पहिले करिंथ १२:१२. हे वचन आपल्याला ख्रिस्ती जीवना संबधी काय सांगते?

***भौतिक शरीराप्रमाणेच आपल्या सर्वांना ख्रिस्ताच्या शरीरातील इतर अवयवांची गरज आहे***

३. वाचा. इब्री १०:२४. इब्री लोकांस पत्र यामधून आपण ईश्वरीय नातेसंबंधाबद्धल काय शिकू शकतो?

***जे लोक ईश्वरी नातेसंबंधात आहेत ते इतरांना प्रेम आणि चांगली कामे करण्यास प्रेरित करतात.***

४. वाचा. इब्री १०:२५. नातेसंबंधांबद्दल या वचनातून आपण काय शिकू शकतो?

***आपल्याला एकत्र भेटण्याची, संगतीची आणि एकमेकांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे***

५. वाचा. नीतिसुत्रे ५:२२-२३. अधार्मिक नातेसंबंधांपासून आपण आपल्या अंतःकरणाचे रक्षण का केले पाहिजे?

***आम्ही मूर्खपणाने भरकटले जाऊ नये म्हणुन***

६. वाचा. दुसरे तीमथ्य २:२२. आपल्याला नीतिमत्त्व, विश्वास, प्रीती, शांती ह्यांच्या पाठीस कोणाबरोबर लागायचे आहे?

***जे शुद्ध अंतःकरणाने परमेश्वराचा धावा करतात त्यांच्याबरोबर***

७. वाचा. इब्री लोकांस पत्र १३:७. आपण कोणाची आठवण ठेवावी आणि आपल्या जीवनाची रचना करावी?

***तुमचे अधिकारी ज्यांनी तुम्हाला देवाचे वचन सांगितले आहे***

# पाठ ५

# छळ

*डॉन क्रो द्वारा लिखित*

मत्तय १०:१६-२३ मध्ये, येशूला त्याच्या शिष्यांना विरोधासाठी तयार करायचे होते; विरोध येणार आहेत हे त्यांनी जाणून घ्यावे अशी येशुची इच्छा होती. जे सर्व ईश्वरीय, ख्रिस्त-केंद्रित जीवन जगतात त्यांचा छळ होईल (२ तीम ३:१२). ही अशी गोष्ट नाही ज्याला तुम्ही फटकारू शकता. कदाचित शत्रू-सैतान त्यामागे असू शकतो, परंतु छळ हा नीतिमत्वासाठी उभे राहणा-यांचा एक भाग आहे. पवित्र शास्त्र सांगते की, जे ख्रिस्तामध्ये दैविक जीवन जगतात त्यांचा छळ होईल. येशू आपल्या शिष्यांना *"पाहा, लांडग्यांमध्ये मेंढरांना पाठवावे तसे मी तुम्हांला पाठवतो."* म्हणत तयार करत आहे. (मत्तय १०:१६). "पाहा" हा शब्द असे सांगतो की, "माझं ऐका, मित्रांनो. तुम्हाला हे समजावे अशी माझी इच्छा आहे. मी तुम्हाला लांडग्यांमध्ये मेंढर अस म्हणून पाठवणार आहे." मेंढ्या हे माझ्या माहितीतले सर्वात असुरक्षित, अवलंबित असे प्राणी आहेत. मेंढ्याना टोकदार दात नसतात, सापासारखे विष नसते - त्याला काही संरक्षण नसते. मेंढपाळच हा त्याचा एकमेव बचाव असतो.

मेंढपाळाची जबाबदारी लांडग्यांना मेंढरांच्या कळपापासून दूर ठेवण्याची आहे, परंतु येशू अगदी उलट म्हणत आहे: "मी तुम्हाला लांडग्यांच्या टोळ्यात मेंढरं असे पाठवत आहे." हे खरच आश्चर्यकारक नाही का? तो असे म्हणण्याचे कारण म्हणजे तो त्यांना विरोधासाठी तयार करत आहे. इफिस ६:१२ सांगत, *"कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे."* विरोध होईल, विरोध हा ख्रिस्ती जीवनाचा भाग आहे आणि तुम्ही हे जाणून घ्यावे अशी येशूची इच्छा आहे. *"म्हणून तुम्ही सापांसारखे चतुर व्हा"* (मत्तय १०:१६) असे बोलून तो तुम्हाला त्यासाठी तयार करू इच्छितो. या *"चतुर"* शब्दाचा अर्थ असा आहे की प्रत्येक परिस्थितीत, तुम्ही विनाकारण समस्या निर्माण करणार नाही, परंतु तुमच्या दिलेल्या शहाणपणाने तुम्ही चालाल. सापासारखे चतुर आणि कबुतरासारखे निरुपद्रवी व्हा.

तो नंतर म्हणतो, *"माणसांच्या बाबतीत जपून राहा;"* (मत्तय १०: १७). आपला शत्रू इतर माणसांचा वापर करणार आहे. इफिस २:२ सांगते की, *"अंतरिक्षातील राज्याचा अधिपती म्हणजे आज्ञा मोडणाऱ्या लोकांत आता कार्य करणाऱ्या आत्म्याचा अधिपती. ."* आहे. आपला विरोध करण्यासाठी, येशू ख्रिस्ताच्या उद्देशांचा विरोध करण्यासाठी आणि देवाच्या वचनाचा विरोध करण्यासाठी सैतान माणसांचा वापर करणार आहे. *"माणसांच्या बाबतीत जपून राहा; कारण ते तुम्हांला न्यायसभांच्या स्वाधीन करतील, आपल्या सभास्थानात तुम्हांला फटके मारतील,"* (मत्तय १०:१७). पौल म्हणाला, *"पाच वेळा मी यहूद्यांच्या हातून एकोणचाळीस फटके खाल्ले. येशु ख्रिस्तासाठी, येशु ख्रिस्ताच्या संदेशासाठी आणि सुवार्तेच्या संदेशासाठी."* (२ करिंथ ११:२३-२४). येशूने सांगितले की, तुम्हाला शासन मंत्र्यासमोर आणले जाईल - अगदी सरकारचा देखिल वापर कधीकधी येशू ख्रिस्ताच्या उद्देशांना विरोध करण्यासाठी केला जाईल. तुम्हाला येशूसाठी मंत्रीगण आणि राजे लोक यांच्यासमोर आणले जाईल, त्यांच्यासाठी किंवा त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी.

मी सुवार्तिकतेचा एक कोर्स शिकवत होतो, आणि मी विद्यार्थ्यांना दाखवत होतो की, ते हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सुवार्तिक पत्र आणि वैयक्तिक साक्ष कशी वापरू शकतात. मी ते स्वतः एक केले आणि पन्नास ते शंभर लोकांना पाठवले. त्यानंतर काही दिवसांनी, मला शहरातील मेरी ॲन नावाच्या एका महिलेचा फोन आला. ती म्हणाली, "तू आता यापासून सुटणार नाहीस; तू मला येशू ख्रिस्ताबद्दल सांगू शकत नाहीस; तू यापासून दूर जाऊ शकत नाहीस. तुला माझे नाव कुठे मिळाले?" मी म्हणालो, "ठीक आहे, मला ते फोन बुकमधून मिळाले आहे." ती म्हणाली, "तू लबाड आहेस! माझे नाव आणि पत्ता फोन बुकमध्ये नाही!" मी म्हणालो, "ठीक आहे, मला ते तिथूनच मिळाले." ती म्हणाली, "उद्या पोलिस तुमच्याशी संपर्क साधतील." मी मनात विचार केला, *काय पवित्र शास्त्र खरंच खरं आहे का?* आणि दुसऱ्या दिवशी पोलिसांनी माझ्याशी संपर्क साधला आणि त्यांनी माझी चौकशी करण्यात सुमारे दोन तास घालवले.

मी काय म्हणतोय ते तुम्हाला समजलं का? रस्त्यावर गुन्हेगार असताना सुद्धा पोलिसांचे दोन तास वाया जातात तिथे पोहोचण्याऐवजी. का? येशू ख्रिस्तासाठी, सुवार्तेसाठी. देवाचे वचन खरोखर सत्य आहे का? जर तुम्ही देवाच्या वचनाला धरून ठाम उभे राहिलात, जर तुमच्यात साक्ष देण्याच धाडस असेल, जर तुमच्यात येशूची घोषणा करण्याच धाडस असेल, जर तुमच्यात लोकांसमोर नीतिमानाच जीवन जगण्याच धाडस असेल, तर विरोध नक्कीच होईल. वाईट शक्ती आहेत; चांगल्या शक्ती सुद्धा आहेत. त्याच्या शिष्यांनी तयार राहावे अशी येशूची इच्छा होती.

येशूने मत्तय १०:१९ मध्ये म्हटले, *"जेव्हा तुम्हांला त्यांच्या स्वाधीन करतील तेव्हा कसे अथवा काय बोलावे ह्याची काळजी करू नका, कारण तुम्ही काय बोलावे हे त्याच घटकेस तुम्हांला सुचवले जाईल."* देवाच्या पवित्र आत्म्याने, तुम्हाला जुन्या काळातील स्तेफन सारखे शहाणपण मिळेल. तो ज्या शहाणपणाने बोलत होता ते लोक हाताळू शकले नाहीत. वचन २२-२३ मध्ये येशू म्हणतो, *"आणि माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील; तथापि जो शेवटपर्यंत टिकेल तोच तरेल. जेव्हा एका गावात तुमचा छळ करतील तेव्हा दुसऱ्यात पळून जा."* नीतिमत्वाचे विरोधी, येशू ख्रिस्ताच्या हेतूंविरुद्ध विरोधी ही एक वास्तविक बाब आहे, जर तुम्ही वचनानुसार कार्य करणारे असाल आणि फक्त ऐकणारे नसाल तर.

खुप आधी मी एका उद्यानात होतो, आणि मला एक वृद्ध स्त्री झुल्यात बसलेली दिसली. मी स्वतःशी विचार केला, ती निरुपद्रवी आहे; ती मला दुखवू शकत नाही! मी तिला विचारले की मी तिच्याबरोबर झुल्यात बसू शकतो का, आणि मी त्यात बसलो आणि तिच्याशी संभाषण सुरू करू लागलो. जेन हे तिचे नाव असे मला कळले. मी तिला म्हणालो, "तसे, जेन, तू काय काम करतेस?" ती म्हणाली, "अरे, मी म्हातारी आहे; मी आता काम करत नाही. मी निवृत्त झाली आहे." मग ती म्हणाली, "आणि तसे, तू काय करतोस?" मी म्हणालो, "मी पॅराचर्च सेवाकार्य मध्ये, पॅराचर्च संस्थेसाठी काम करतो." अचानक तिचा चेहरा बदलला. ती म्हणाली, "तू मला देवाबद्दल सांगू नकोस! तू मला येशूबद्दल सांगू नकोस! मी म्हणालो," अरे जेन, तू असं बोलू नकोस," आणि ती म्हणाली, "जर येशू ख्रिस्त समोर असता तर मी त्याच्या तोंडावर थुंकली असती!" मी म्हणालो, "जेन! तू असं बोलायला नाही पाहिजे ! तुला नक्कीच खुप त्रास झाला आहे चर्चच्या लोकांकडून म्हणुन तू अशी बोलते आहेस. जेन, मला तुला माझ्या कुटुंबाबद्दल सांगू दे." ती म्हणाली, "नाही! मी तुला सांगत आहे न की तू माझ्याशी बोलू शकत नाहीस. तू मला येशू ख्रिस्ताबद्दल आणि देवाने तुझ्या कुटुंबात काय केले याबद्दल सांगणार आहेस, आणि मी तुला असे करू देणार नाही. तू बोलू शकत नाहीस." मी म्हणालो, "जेन, कृपा करून माझं ऐक. मला तुला येशूबद्दल सांगायचे आहे." ती म्हणाली, "नाही! मी तुला गप्प बसायला सांगते आहे!"

तिच्या बाजुला बांधलेला तिचा एक छोटा कुत्रा होता, आणि ती त्याला जोरात खेचत होती जोपर्यंत की तो "अअर्ररघ" घुर्रविल आणि ती निघून गेली. येथे आपण पाहिल एक स्त्री नियंत्रणाबाहेर होती कारण तिच्यामध्ये एक दुष्ट आत्मा उठला होता, म्हणजे अवज्ञा करण्याचा आत्मा. ती त्या शत्रूच्या ताब्यात होती. मी स्वतःशी असा विचार केला, *लोक माझ्यावर ओरडण्याची मला सवय नाही. मला लोक माझ्या तोंडावर येवून काहीही बोलतील याची मला सवय नाही.* पण माझ्याकडे जेनसाठी करुणा आणि प्रीती शिवाय काहीही नव्हते. ती नियंत्रणाबाहेर गेली होती आणि मी पूर्णपणे नियंत्रणात होतो. मी घरी गेलो आणि म्हणालो, "देवा, तुला माहित आहे? सर्वात मोठा चमत्कार म्हणजे मी

नियंत्रणात होतो. जेव्हा कोणीतरी माझ्या विरुद्ध मला बोलत होते, तेव्हा माझ्याकडे प्रीती आणि करुणाशिवाय काहीही नव्हते."

जेव्हा आपण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाहेर पडू तेव्हा छळ आणि विरोध येईलच. देवाचा तोच पवित्र आत्मा जो आपल्याला येशूची घोषणा करण्यास धैर्य देतो जरीही आपल्याला नकार मिळाला, तोच आत्मा आपल्याला कोणत्याही परिस्थितीत सांत्वन आणि सामर्थ्य देईल.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. २ तीमथ्य ३:१२. जे ईश्वरीय जीवन जगतात त्यांना काय अनुभव येईल?

**२ तीमथ्य ३:१२ -** *ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करण्यास जे पाहतात त्या सर्वांचा छळ होईल;*

२. तुम्ही “छळाची” व्याख्या कशी कराल?

३. वाचा. मार्क ४:१६-१७. संकट आणि छळ कोणत्या कारणासाठी येतात?

**मार्क ४:१६-१७ -** *तसेच खडकाळ जमिनीत पेरलेले हे आहेत की, वचन ऐकताच ते आनंदाने ग्रहण करतात; [१७] तथापि त्यांच्यामध्ये मूळ नसल्याकारणाने ते अल्पकाळ टिकाव धरतात; मग वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे ते लगेच अडखळतात.*

४. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. यरूशलेममधील छळाचा परिणाम काय झाला?

**प्रेषितांची कृत्ये ८:१ -** *शौलाला तर त्याचा वध मान्य होता. त्याच दिवशी यरुशलेमेतल्या मंडळीचा फार छळ झाला, म्हणून प्रेषितांखेरीज त्या सर्वांची यहूदीया व शोमरोन ह्या प्रदेशांत पांगापांग झाली.*

**प्रेषितांची कृत्ये ८:४ -** *तेव्हा ज्यांची पांगापांग झाली होती ते वचनाची सुवार्ता सांगत चहूकडे फिरले.*

५. वाचा. मत्तय ५:१०-१२. ज्यांचा ________ साठी छळ केला जातो त्यांच्यावर आशीर्वाद आहे.

**मत्तय ५:१०-१२ -** *नीतिमत्त्वाकरता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. [११] माझ्यामुळे जेव्हा लोक तुमची निंदा व छळ करतील आणि तुमच्याविरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हा तुम्ही धन्य. [१२ ]आनंद करा, उल्लास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे आहे; कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला.*

६. वाचा. मत्तय ५:१२. जेव्हा नीतिमत्त्वाकरता विश्वासणाऱ्यांचा छळ केला जातो तेव्हा भविष्यात ते कशाची अपेक्षा करू शकतात?

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:४-५. शौल कोणाचा छळ करत होता?

**प्रेषितांची कृत्ये ९:४-५ -** *तेव्हा तो जमिनीवर पडला आणि त्याने अशी वाणी आपणाबरोबर बोलताना ऐकली की, "शौला, शौला, माझा छळ का करतोस?" [५] तेव्हा तो म्हणाला, "प्रभो, तू कोण आहेस?" त्याने म्हटले, "ज्या येशूचा तू छळ करतोस तोच मी आहे;*

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:१. खरे पाहिले तर शौल कोणाचा छळ करत होता?

**प्रेषितांची कृत्ये ९:१ -** *शौल अजूनही प्रभूच्या शिष्यांना धमक्या देणे व त्यांचा घात करणे ह्यांविषयीचे फूत्कार टाकत होता.*

९. वाचा. गलतीकरांस पत्र ६:१२. गलतीकरांस पत्र या पुस्तकातील धार्मिक नियम पाळत दैहिक सुंता करून सुवार्तेमध्ये जोडण्याचा प्रयत्न केला. असे केल्याने, त्यांनी काय टाळले?

**गलतीकरांस पत्र ६:१२ -** *जितके दैहिक गोष्टींचा डौल मिरवू पाहतात, तितके ख्रिस्ताच्या वधस्तंभामुळे स्वतःचा छळ होऊ नये म्हणूनच तुम्हांला सुंता करून घेण्यास भाग पाडतात.*

# उत्तरावली

१. वाचा. २ तीमथ्य ३:१२. जे ईश्वरीय जीवन जगतात त्यांना काय अनुभव येईल?

***छळ***

२. तुम्ही “छळाची” व्याख्या कशी कराल?

***त्रास देणे; विश्वासामुळे दुःख सहन करणे***

३. वाचा. मार्क ४:१६-१७. संकट आणि छळ कोणत्या कारणासाठी येतात?

***वचनासाठी; म्हणजे देवाचे वचन काढून घेण्यासाठी***

४. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. यरूशलेममधील छळाचा परिणाम काय झाला?

***लोक सर्वत्र जाऊन वचनाचा प्रचार करतात***

५. वाचा. मत्तय ५:१०-१२. ज्यांचा ________ साठी छळ केला जातो त्यांच्यावर आशीर्वाद आहे.

***नीतिमत्वतेसाठी***

६. वाचा. मत्तय ५:१२. जेव्हा नीतिमत्त्वाकरता विश्वासणाऱ्यांचा छळ केला जातो तेव्हा भविष्यात ते कशाची अपेक्षा करू शकतात?

***स्वर्गात मोठे प्रतिफळ***

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:४-५. शौल कोणाचा छळ करत होता?

***येशुचा***

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:१. खरे पाहिले तर शौल कोणाचा छळ करत होता?

***प्रभूचे शिष्य - (ख्रिस्ती लोकांचा)***

९. वाचा. गलतीकरांस पत्र ६:१२. गलतीकरांस पत्र या पुस्तकातील धार्मिक नियम पाळत दैहिक सुंता करून सुवार्तेमध्ये जोडण्याचा प्रयत्न केला. असे केल्याने, त्यांनी काय टाळले?

***ख्रिस्ताच्या वधस्तंभासाठी छळ सहन करणे. म्हणजे दुसऱ्या शब्दांत, त्यांनी सुवार्तेचा उपदेश केल्यामुळे होणारा छळ टाळला की तारण केवळ कृपेने ख्रिस्तावरील विश्वासाने होते.***

# पाठ ६

# राजा आणि त्याचे राज्य

*डॉन क्रो द्वारा लिखित*

जुन्या करारात, इस्राएलला इतर सर्व राष्ट्रांपेक्षा वेगळे बनवणारी गोष्ट म्हणजे तो एक ईश्वरशाही राष्ट्र होता. म्हणजे दुसऱ्या शब्दांत, तेथे थेट परमेश्वराने राज्य केले होते. (यश ४३:१५). नंतर इस्राएलच्या इतिहास बघितला तर, त्यांना जगातील इतर राष्ट्रांसारखे व्हायचे होते, म्हणजे तेथे पृथ्वीवरील राजाने राज्य केले पाहिजे असे (पहले शमु ८:५-१९). म्हणून परमेश्वराने त्यांची विनंती मान्य केली आणि त्यांच्यासाठी शौल नावाचा राजा निवडला (१ शमु १०:२४-२५). नंतर, शौलच्या अवज्ञामुळे, देवाने दाविदाला राजा म्हणून उभे केले, जो त्याच्या स्वतःच्या मनासारखा माणूस होता. (प्रेषितांची कृत्ये १३:२१-२२ आणि १ राजे १५:३).

राजा हा अदृश्य देवाचा दृश्य प्रतिनिधी असायचा (अनु १७:१४-२०). जेव्हा राजा परमेश्वराचे अनुसरण करेल तेव्हा तो आणि त्याचे राज्य समृद्ध होईल. जेव्हा राजा परमेश्वराचे अनुसरण करण्यास अयशस्वी झाला, तेव्हा तो आणि त्याचे राज्य बंदिवासात जाईल आणि त्यांचा नाश होईल. (१ शमु १५:२२-२३).

जेव्हा देवाने राजा निवडला, तेव्हा देव एका संदेष्ट्याला त्या व्यक्तिचा तेलाने अभिषेक करण्यासाठी पाठवायचा. हे असे दर्शविते की पवित्र आत्मा यावर येत आहे याला सामर्थ्य देऊन आणि तो राज्य करण्यास अभिषिक्त असा आहे. यावेळी, देवाचा आत्मा त्याच्यावर येईल आणि नीतिमत्त्वात राज्य करण्यासाठी त्याचे हृदय बदलेल, कारण देव त्याच्याबरोबर होता. (१ शमु १०:१, ६-७ आणि ९). राज्य करण्यासाठी हा जो अभिषेक आहे (किंवा राजा होण्यासाठी) तर मसीहाची संकल्पना येथूनच येते. इब्री भाषेमध्ये “अभिषिक्त” हा शब्द मशियाक (मसीहा) हा आहे आणि ग्रीक भाषेमध्ये ख्रिस्तोस (ख्रिस्त) असे भाषांतर केले आहे. जुन्या करारातील संदेष्ट्यांनी भविष्यात मसीहा (किंवा अभिषिक्त) येण्याची, आणि स्वर्गाचा देव तुमच्यावर एक राज्य स्थापन करेल ज्याचा कधीही नाश होणार नाही अशी भविष्यवाणी केली, (दानीएल २:४४, ७:१४ आणि २७). पवित्र शास्त्रामध्ये, जर तुमच्या लक्षात आले असेल की, राज्याबद्दल बोलताना येशूने यहूदी लोकांना काय म्हणायचे आहे

ते कधीही स्पष्ट केले नाही. ही जुन्या कराराची संकल्पना होती ज्याला ते आधीपासुनाच शोधत होते (यशया ९:६-७, ११:१-६; दानी २:४४,७:१३-१४,१८, आणि २७).

राज्याचा मूलभूत समज असल्याशिवाय येशूचा संदेश समजणे अशक्य आहे. राज्य हा येशुचा संदेश होता जो तो बोलला होता आणि त्याने त्याच्या शिष्यांना याचविषयी प्रचार करण्यास सांगितले होते (मार्क १:१४-१५, लूक ९:१-२, प्रेषितांची कृत्ये २८:२३-३१, लूक १६:१६, आणि मत्तय २४:१४). या संदेशाला "उद्धार" किंवा "सार्वकालिक जीवनाचा प्रस्ताव" (इब्री २:३; मत्तय १९:१६ तुलना करून १९:२३ ची; प्रेषितांची कृत्ये २८:२३-२४,२८ आणि ३०-३१) असेही म्हटले जाते. "देवाचे राज्य" या वाक्यांशामध्ये लोकांच्या एका गटाची कल्पना आहे जे राज्य देवाद्वारे राज्य केले जाईल. देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी, या अटी पूर्ण करणे आवश्यक होते. हृदयाचे परिवर्तन आवश्यक होते. हृदयातील या बदलाला पवित्र शास्त्र पश्चात्ताप असे म्हणते. हे देवाप्रती हृदयपरिवर्तन होते; म्हणजेच, ते सैतान, पाप आणि त्याचे मार्ग सोडून, परमेश्वर, ख्रिस्त याच्या मार्गांकडे वळणे होते. वळलेल्या त्या एकाला देव (येशूच्या सांडलेल्या रक्ताद्वारे कृपादान म्हणून) पापांची क्षमा आणि सार्वकालिक जीवन (रोम ६:२३) देतो. या "शुभ वार्तेला" ला "कृपेची सुवार्ता" किंवा "देवाच्या राज्याचा" प्रचार म्हणून संबोधले जाते (प्रेषित २०:२४-२५). देवाचे राज्य दर्शवले आहे. कृपा म्हणुन (मत्तय २०:१-१६) आणि ती येशूच्या सेवेद्वारे शांतीने आणि गुप्तपणे आली आहे (मत्तय १३:३३). ते राज्य भविष्यात एक दिवस तेजस्वी आणि दृश्यमान परिपूर्तीस येईल (मत्तय १३:३६-४३).

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. दानीएल २:४४. जुन्या करारातील संदेष्ट्यांनी भविष्यवाणी केली की भविष्यात, मसीहा (किंवा अभिषिक्त केलेला) येईल आणि स्वर्गातील देव एक राज्य स्थापन करेल जे:

अ. १.000 वर्ष टिकेल

ब. कधीही नष्ट होणार नाही

क. तात्पुरत असेल

**दानीएल २:४४ -** *त्या राजांच्या अमदानीत स्वर्गीय देव एका राज्याची स्थापना करील, त्याचा कधी भंग होणार नाही; त्याचे प्रभुत्व दुसऱ्याच्या हाती कधी जाणार नाही; तर ते ह्या सर्व राज्यांचे चूर्ण करून त्यांना नष्ट करील व ते सर्वकाळ टिकेल.*

२. वाचा. मत्तय ४:१७,२३. येशुचा संदेश काय होता?

**मत्तय ४:१७ -** *तेव्हापासून येशू घोषणा करत सांगू लागला की, "पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे."*

**मत्तय ४:२३ -** *नंतर येशू यहूदी लोकांच्या सभास्थानांत सुवार्तेची घोषणा करत व राज्याची सुवार्ता गाजवत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करत गालीलभर फिरला.*

३. वाचा. मार्क १:१४-१५. येशुने _______________ह्या सुवार्तेचा प्रचार केला. मार्क १:१४-१५ योहानाला अटक झाल्यानंतर येशू देवाच्या [राज्याची] सुवार्ता गाजवत गालीलात आला व म्हणाला, [१५] "काळाची पूर्णता झाली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चात्ताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा."

४. वाचा. लुका ४:४३.परमेश्वराद्वारे येशूला पाठवण्याचे कारण हे होते की_________

**लुका ४:४३ -** *परंतु तो त्यांना म्हणाला, "मला इतर गावांनाही देवाच्या राज्याची सुवार्ता सांगितली पाहिजे, कारण त्यासाठीच मला पाठवले आहे."*

५. वाचा. योहान ४:२५. शास्त्रामध्ये येशूने राज्याबद्दल बोलताना यहुद्यांना काय म्हणायचे होते ते कधीही स्पष्ट केले नाही. ही जुन्या कराराची संकल्पना होती की ते:

अ. त्याबद्दल थोडे जाणत होते

ब. कधीच याचा विचार करणार नाही

क. आधीच याच्या शोधात होते

**योहान ४:२५ -** *ती स्त्री त्याला म्हणाली, "मसीहा, ज्याला ख्रिस्त म्हणतात, तो येणार आहे हे मला ठाऊक आहे; तो आल्यावर आम्हांला सर्व गोष्टी सांगेल."*

६. वाचा. लुक ९:१-२. बारा शिष्यांनी कोणत्या तीन गोष्टी केल्या?

**लूक ९:१-२ -** *मग त्याने बारा प्रेषितांना एकत्र बोलावून त्यांना सर्व भुते काढण्याचे व रोग बरे करण्याचे सामर्थ्य व अधिकार दिला; [२] आणि त्याने त्यांना देवाच्या राज्याची घोषणा करण्यास व रोग्यांना बरे करण्यास पाठवले.*

७. वाचा. लूक १०:१-२, ८-९. येशूने सत्तर लोकांना कोणता संदेश घोषित करण्यास सांगितले?

***लूक १०:१-२*** - *ह्यानंतर प्रभूने आणखी बाहत्तर जणांना नेमून ज्या ज्या नगरात व ज्या ज्या ठिकाणी तो स्वत: जाणार होता तेथे दोघे-दोघे असे त्यांना आपल्यापुढे पाठवले. [२] तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "पीक फार आहे परंतु कामकरी थोडे आहेत; ह्यास्तव पिकाच्या धन्याने आपल्या पिकासाठी कामकरी पाठवावेत म्हणून त्याची प्रार्थना करा.*

**लूक १०:८-९ -** *कोणत्याही नगरात तुम्ही गेलात आणि त्यांनी तुमचे स्वागत केले तर ते जे वाढतील ते खा. [९] त्यात जे दुखणाईत असतील त्यांना बरे करा व त्यांना सांगा की, 'देवाचे राज्य तुमच्याजवळ आले आहे.'*

८. वाचा. लूक २३:२. यहूदीयांच्या स्वतःच्या व्याख्येनुसार, "ख्रिस्त" या शब्दाचा अर्थ ________ आहे.

**लुक २३:२ -** *आणि ते त्याच्यावर असा आरोप करू लागले की, "हा आमच्या राष्ट्राला फितवताना, कैसराला कर देण्याची मनाई करताना आणि मी स्वतः ख्रिस्त राजा आहे असे म्हणताना आम्हांला आढळला."*

९. वाचा. प्रेषितांची कृत्ये १७:७. रोमन कायद्याच्या विरुद्ध, यहुद्यांचे म्हणणे होते की, प्रेषित पौलाने शिकवले की दुसरा _________ होता तो म्हणजे _________

**प्रेषितांची कृत्ये १७:७ -** *त्यांना यासोनाने आपल्या घरात घेतले आहे, आणि हे सर्व जण कैसराच्या हुकमांविरुद्ध वागतात, म्हणजे येशू म्हणून दुसराच कोणी राजा आहे असे म्हणतात."*

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये १९:८-१०. पौल इफिसमध्ये धैर्याने बोलत होता आणि इतरांबरोबर________ वाद घालत होता.

**प्रेषितांची कृत्ये १९:८-१० -** *नंतर तो सभास्थानात जाऊन देवाच्या राज्याविषयी वादविवाद करत व प्रमाण पटवत निर्भीडपणे तीन महिने बोलत गेला. [९] मग कित्येक जण कठोर व विरोधी होऊन लोकांसमक्ष त्या मार्गाची निंदा करू लागले, तेव्हा त्याने त्यांच्यामधून निघून शिष्यांना वेगळे केले, आणि तुरन्नाच्या पाठशाळेत तो दररोज वादविवाद करू लागला. [१०] असे दोन वर्षे चालल्यामुळे आशियात राहणाऱ्या सर्व यहूदी व हेल्लेणी लोकांनी प्रभू येशूचे वचन ऐकले.*

११. वाचा. प्रेषितांची कृत्ये २८:२३-३१. ३१व्या वचनामध्ये, प्रेषित पौल काय उपदेश देत होता?

***प्रेषितांची कृत्ये २८:२३-३१ -*** *तेव्हा त्यांनी त्याला एक दिवस नेमून दिल्यावर त्या दिवशी पुष्कळ लोक त्याच्या बिऱ्हाडी आले; त्यांना देवाच्या राज्याविषयी साक्ष देण्याकरता आणि येशूविषयी मोशेच्या नियमशास्त्रावरून व संदेष्ट्यांच्या लेखांवरून खातरी करण्याकरता तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या विषयाची फोड करत होता. [२४] त्याने जे सांगितले त्यावरून कित्येकांची खातरी झाली तर कित्येक विश्वास ठेवीनात. [२५] त्यांचे आपसांत एकमत न झाल्यामुळे ते उठून जाऊ लागले, तेव्हा पौलाने त्यांना एक वचन सांगितले: "पवित्र आत्मा यशया संदेष्ट्याच्या द्वारे तुमच्या पूर्वजांबरोबर बोलला ते ठीक बोलला; ते असे की, [२६] 'ह्या लोकांकडे जाऊन सांग की, तुम्ही ऐकाल तर खरे, परंतु तुम्हांला समजणार नाही; पाहाल तर खरे, परंतु तुम्हांला दिसणार नाही;[२७] कारण ह्या लोकांचे अंतःकरण जड झाले आहे;ते कानांनी मंद ऐकतात; आणि त्यांनी आपले डोळे मिटून घेतले आहेत; ह्यासाठी की, त्यांनी डोळ्यांनी पाहू नये, कानांनी ऐकू नये, मनाने समजू नये, त्यांनी वळू नये, आणि मी त्यांना बरे करू नये.' [२८] म्हणून तुम्हांला ठाऊक असो की, 'हे देवाने सिद्ध केलेले तारण परराष्ट्रीयांकडे' पाठवले आहे; आणि ते ते श्रवण करतील." [२९] [तो असे बोलल्यावर यहूदी आपसांत बराच वादविवाद करत निघून गेले.]*

*[३०] तो आपल्या भाड्याच्या घरात पुरी दोन वर्षे राहिला, आणि जे त्याच्याकडे येत असत त्या सर्वांचे तो स्वागत करत असे. [३१] कोणापासून अडथळा न होता तो पूर्ण धैर्याने देवाच्या राज्याची घोषणा करत असे, आणि प्रभू येशू ख्रिस्ताविषयीच्या गोष्टी शिकवत असे.*

१२. वाचा. मत्तय २४:१४. जगामध्ये सर्वत्र काय संदेश द्यायचा आहे?

**मत्तय २४:१४ -** *सर्व राष्ट्रांना साक्षीसाठी म्हणून राज्याची ही सुवार्ता सर्व जगात गाजवली जाईल, तेव्हा शेवट होईल.*

१३. वाचा. प्रेषितांची कृत्ये २०:२४-२५. काहीवेळा राज्याच्या सुवार्तेला ______ ची सुवार्ता म्हणून संबोधले जाते.

**प्रेषितांची कृत्ये २०:२४-२५ -** *मी कशाचीही काळजी करीत नाही; मी आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धा करत नाही, ह्यासाठी की, मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता निश्चितार्थाने सांगण्याची जी सेवा मला प्रभू येशूपासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी. [२५] आणि आता पाहा, ज्यांच्यामध्ये मी देवाच्या राज्याची घोषणा करत फिरलो त्या तुमच्या कोणाच्याही दृष्टीस माझे तोंड पुन्हा पडणार नाही, हे मला ठाऊक आहे.*

१४. वाचा. लुक १६:१६. राज्याच्या मूलभूत गोष्टी समजण्याशिवाय येशूचा संदेश समजणे अशक्य आहे. राज्य हा संदेश होता जो येशू बोलला होता आणि त्याने त्याच्या शिष्यांना फक्त एकच सूचना दिली होती की याचा:

अ. उपदेश द्या

ब. दुर्लक्ष करा

क. मनन करा

**लुक १६:१६ -** *योहानापर्यंत नियमशास्त्र व संदेष्टे होते; तेव्हापासून देवाच्या राज्याची घोषणा केली जात आहे आणि प्रत्येक मनुष्य त्यावर आक्रमण करतो.*

१५. वाचा. मत्तय ६:१०. मुळात, देवाचे राज्य हे देवाचे सत्ता चालवणे आहे. हे या वचनात कसे व्यक्त केले आहे?

**मत्तय ६:१० -** *तुझे राज्य येवो. जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.*

१६. वाचा.कलसै १:१३-१४ आणि रोम १४:९. "देवाचे राज्य" या वाक्यांशामध्ये लोकांच्या समूहाची संकल्पना आहे जी:

अ. येशूला त्यांच्या अंतःकरणात येण्यास मागा

ब. देवाचे राज्य करणे स्वीकारा (आणि सैतानाचे नाकारा) आणि त्याची क्षमा प्राप्त करा

क. चर्चमध्ये सामील व्हा

**कलसै १:१३-१४ -** *त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले. [१४] त्या पुत्राच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.*

**रोम १४:९ -** *कारण ख्रिस्त ह्यासाठी मरण पावला व पुन्हा जिवंत झाला की, त्याने मेलेल्यांचा व जिवंतांचाही प्रभू असावे.*

१७. वाचा.मत्तय ४:१७. देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी, हृदय बदलणे आवश्यक आहे. हृदयाच्या या परिवर्तनाला पवित्र शास्त्र काय म्हणते:

अ. प्रायश्चित्त

ब. नियमांचे कार्य

क. पश्चात्ताप

**मत्तय ४:१७ -** *तेव्हापासून येशू घोषणा करत सांगू लागला की, "पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे."*

१८. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:१८. तुमच्या पापांची क्षमा मिळविण्यासाठी तुम्ही सैतानाच्या ______ ,___ कडे ________ प्रकाशाकडे वळला आहात का?

**प्रेषितांची कृत्ये २६:१८ -** *मी तुला त्यांच्याकडे पाठवतो, ह्यासाठी की, त्यांनी अंधारातून उजेडाकडे व सैतानाच्या अधिकारातून देवाकडे वळावे, म्हणून तू त्यांचे डोळे उघडावेस, आणि त्यांना पापांची क्षमा व्हावी व माझ्यावरील विश्वासाने पवित्र झालेल्या लोकांमध्ये वतन मिळावे.'*

१९. वाचा. यहेज्केल ३६:२६-२७ आणि प्रेषितांची कृत्ये ११:१५-१८. तुम्हाला नवे हृदय आणि नवा आत्मा देण्यात आला आहे का? ज्यामुळे तुम्ही देवाच्या मार्गावर चालण्यास प्रवृत्त होता?

**यहेज्केल ३६:२६-२७ -** *मी तुम्हांला नवे हृदय देईन, तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांला मांसमय हृदय देईन. [२७] मी तुमच्या ठायी माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल, माझे निर्णय पाळून त्यांप्रमाणे आचरण कराल असे मी करीन.*

**प्रेषितांची कृत्ये ११:१५-१८ -** *मी बोलू लागलो तेव्हा, जसा आरंभी आपल्यावर तसा त्यांच्यावरही पवित्र आत्मा उतरला. [१६] तेव्हा प्रभूने सांगितलेली गोष्ट मला आठवली, ती अशी की, 'योहानाने पाण्याने बाप्तिस्मा केला हे खरे; परंतु तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने होईल.' [१७] जेव्हा आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला तेव्हा जसे आपणांस तसे त्यांनाही देवाने सारखेच दान दिले; तर मग देवाला अडवणारा असा मी कोण?" [१८] हे ऐकून ते उगे राहिले आणि देवाचा गौरव करत बोलले, "तर मग देवाने परराष्ट्रीयांनाही जीवन मिळावे म्हणून पश्चात्तापबुद्धी दिली आहे."*

२०. वाचा. लुक १८:१३-१४. परमेश्वराला तुम्ही तुमच्या पापांची क्षमा मागितली आहे का?

**लुक १८:१३-१४ -** *जकातदार तर दूर उभा राहून वर स्वर्गाकडे दृष्टी लावण्यासदेखील न धजता आपला ऊर बडवत म्हणाला, 'हे देवा, मज पाप्यावर दया कर.' [१४] मी तुम्हांला सांगतो, त्या दुसऱ्यापेक्षा हा नीतिमान ठरून खाली आपल्या घरी गेला; कारण जो कोणी स्वतःला उंच करतो तो नमवला जाईल, आणि जो कोणी स्वतःला नमवतो तो उंच केला जाईल."*

# उत्तरावली

१. वाचा. दानीएल २:४४. जुन्या करारातील संदेष्ट्यांनी भविष्यवाणी केली की भविष्यात, मसीहा (किंवा अभिषिक्त केलेला) येईल आणि स्वर्गातील देव एक राज्य स्थापन करेल जे:

***ब. कधीही नष्ट होणार नाही***

२. वाचा. मत्तय ४:१७,२३. येशुचा संदेश काय होता?

***पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे***

३. वाचा. मार्क १:१४-१५. येशुने ________________ह्या सुवार्तेचा प्रचार केला.

***देवाचे राज्य***

४. लुका ४:४३.परमेश्वराद्वारे येशूला पाठवण्याचे कारण हे होते की_________

***देवाच्या राज्याची सुवार्ता सांगणे***

५. वाचा. योहान ४:२५. शास्त्रामध्ये येशूने राज्याबद्दल बोलताना यहुद्यांना काय म्हणायचे होते ते कधीही स्पष्ट केले नाही. ही जुन्या कराराची संकल्पना होती की ते:

***क. आधीच याच्या शोधात होते***

६. वाचा. लुक ९:१-२. बारा शिष्यांनी कोणत्या तीन गोष्टी केल्या?

***सर्व भूते काढली, रोगी बरे केले,देवाच्या राज्याची घोषणा केली***

७. वाचा. लुक १०:१-२, ८-९. येशूने सत्तर लोकांना कोणता संदेश घोषित करण्यास सांगितले?

***देवाचे राज्य***

८. वाचा. लुक २३:२. यहूदीयांच्या स्वतःच्या व्याख्येनुसार, “ख्रिस्त” या शब्दाचा अर्थ _________ आहे.

***राजा***

९. वाचा. प्रेषितांची कृत्ये १७:७. रोमन कायद्याच्या विरुद्ध, यहुद्यांचे म्हणणे होते की प्रेषित पौलाने शिकवले की दुसरा _________ होता तो म्हणजे _________

***राजा / येशु***

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये १९:८-१०. पौल इफिससमध्ये धैर्याने बोलत होता आणि इतरांबरोबर________ वाद घालत होता.

***देवाच्या राज्याविषयी***

११. वाचा. प्रेषितांची कृत्ये २८:२३-३१. ३१ व्या वचनामध्ये, प्रेषित पौल काय उपदेश देत होता?

***देवाचे राज्य आणि प्रभु येशू ख्रिस्ताशी संबंधित असलेल्या गोष्टी शिकवत होता***

१२. वाचा. मत्तय २४:१४. जगामध्ये सर्वत्र काय संदेश द्यायचा आहे?

***राज्याची सुवार्ता***

१३. वाचा. प्रेषितांची कृत्ये २०:२४-२५. काहीवेळा राज्याच्या सुवार्तेला ______ ची सुवार्ता म्हणून संबोधले जाते.

***देवाच्या कृपेची***

१४. वाचा. लुक १६:१६. राज्याच्या मूलभूत गोष्टी समजण्याशिवाय येशूचा संदेश समजणे अशक्य आहे. राज्य हा संदेश होता जो येशू बोलला होता आणि त्याने त्याच्या शिष्यांना फक्त एकच सूचना दिली होती की याचा:

***अ. उपदेश द्या***

१५. वाचा. मत्तय ६:१०. मुळात, देवाचे राज्य हे देवाचे सत्ता चालवणे आहे. हे या वचनात कसे व्यक्त केले आहे?

***जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही देवाच्या इच्छेप्रमाणे होवो.***

१६. वाचा.कलसै १:१३-१४ आणि रोम १४:९. “देवाचे राज्य” या वाक्यांशामध्ये लोकांच्या समूहाची संकल्पना आहे जी:

***ब. देवाचे राज्य करणे स्वीकारा (आणि सैतानाचे नाकारा) आणि त्याची क्षमा प्राप्त करा***

१७. वाचा. मत्तय ४:१७. देवाच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी, हृदय बदलणे आवश्यक आहे. हृदयाच्या या परिवर्तनाला पवित्र शास्त्र काय म्हणते:

***क. पश्चात्ताप***

१८. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:१८. तुमच्या पापांची क्षमा मिळविण्यासाठी तुम्ही सैतानाच्या ______(अधिकार किंवा सत्ता),___ कडे ________ प्रकाशाकडे वळला आहात का?

***सामर्थ्यापासून / देवा / अंधारातून***

१९. वाचा. यहेज्केल ३६:२६-२७ आणि प्रेषितांची कृत्ये ११:१५-१८. तुम्हाला नवे हृदय आणि नवा आत्मा देण्यात आला आहे का ज्यामुळे तुम्ही देवाच्या मार्गावर चालण्यास प्रवृत्त होता?

२०. वाचा. लुक १८:१३-१४. परमेश्वराला तुम्ही तुमच्या पापांची क्षमा मागितली आहे का?

# पाठ ७

# तारण देणा-या विश्वासाचा उद्दीष्ट

*डॉन क्रो द्वारा लिखित*

समजा, एखाद्या पुरुषाच्या लग्नाच्या दिवशी तो पाळकासमोर उभा असताना, पाळक अचानक हे शब्द बोलू लागला: “तुम्ही या स्त्रीला तुमची वैयक्तिक स्वयंपाकवाली, तुमचं घर साफ करायला आणि तुमची भांडी साफ़ करायला म्हणुन स्वीकारता का? तुम्ही दोघे जिवंत असे पर्यंत फरशी स्वच्छ करण्यासाठी आणि फर्निचरची धूळ घालवण्यासाठी या दिवसापासून पुढे हिला तुमची म्हणुन ठेउन घेता का?” अचानक त्याची बायको म्हणते, “थांबा! फक्त तुझ्यासाठी काम करणारी व्यक्ती म्हणून जर तुला माझी गरज असेल तर तू एक मोलकरीण ठेवू शकतोस. तू माझ्यावर प्रेम करावं आणि मी जी आहे, माझं पूर्ण व्यक्तिसहित म्हणून मला घेऊन जावं असं मला वाटतं. जर तुम्ही मला जी मी खरी आहे आपलं म्हणुन स्वीकाराल, तर मी तुमच्यासाठी ह्या सर्व गोष्टी करेल, परंतु आधी तुम्ही माझा अस्तित्वाचा स्वीकार करावा अशी माझी इच्छा आहे, तुम्ही मला स्वत:ला न स्वीकारता केवळ कामापुरता माझा लाभ घ्यावा असे मला नको.”

ए.डब्ल्यू.टोझर असे म्हणाले, “आता, हे जरा विचित्र वाटते की काही शास्त्र शिक्षकांना हे कधीच लक्षात येत नाही की, तारण देणा-या विश्वासाचा एकमेव खरा महत्वाचा उद्दीष्ट म्हणजे स्वतः ख्रिस्त आहे; ख्रिस्त हा ‘तारणकर्ता’ किंवा ख्रिस्ताच ‘प्रभुत्व’ नाही, तर स्वतः ख्रिस्त आहे. जो ख्रिस्ताच्या अश्या एका पदावर विश्वास ठेवतो त्याला परमेश्वर तारण देत नाही, किंवा ख्रिस्ताचे हे पद कधीही विश्वासाचे उद्देश म्हणून सादर केले जात नाही. आम्हाला प्रायश्चितावर, वधस्तंभावर किंवा तारणकर्त्याच्या याजकत्वावर विश्वास ठेवण्यास सांगितले जात नाही. हे सर्व ख्रिस्ताच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अवतरलेले आहेत, परंतु ते कधीही विभक्त होत नाहीत किंवा कोणता एक भाग बाकीच्यांपासून कधीही वेगळा होत नाही. ख्रिस्ताच्या या पदांपैकी एक स्वीकारण्याची आणि दुसरी नाकारण्याची आपल्याला तशी कमी परवानगी आहे. “आम्हाला परवानगी आहे,” ही धारणा आधुनिक काळातील पाखंडी मत आहे, मी पुन्हा सांगतो, प्रत्येक पाखंडी मताप्रमाणेच ख्रिस्ती लोकांमध्ये त्याचे वाईट परिणाम झाले आहेत.” (*द रुट ऑफ़ द राइचिअस,*पान ८४-८६).

तुम्हाला मुद्दा समजला का? जर आपण ख्रिस्ताचा एक भाग (त्याच्या पासूनचे फायदे), ख्रिस्ताचे इतर पद यावर भर देतो, तर ख्रिस्तावर का देत नाही? म्हणजे विवाहामध्ये तुमच्या पत्नीला तिच्या संपूर्ण व्यक्तीमत्वाला न घेता केवळ तुमची वैयक्तिक स्वयंपाकी म्हणून घेण्यासारखे आहे.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. योहान १:१२. जितक्यांनी स्वीकार केला:

अ. त्याचा (प्रभु येशु ख्रिस्त)

ब. येशु तारणारा म्हणुन

क. येशु प्रभु म्हणुन

ड. येशू याजक म्हणुन, त्यांना देवाचे पुत्र (किंवा मुले) होण्याचा अधिकार दिला.

**योहान १:१२ -** *परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.*

२. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:३१. आपल्याला कोणावर विश्वास ठेवायचा (म्हणजे भरवसा किंवा सोपवायचे) आहे?

***प्रेषितांची कृत्ये १६:३१ -*** *ते म्हणाले, "प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल."*

३. वाचा. लुक ६:४६. "प्रभु" या शब्दाचा अर्थ काय?

**लुक ६:४६ -** *तुम्ही मला 'प्रभू, प्रभू' म्हणता, पण मी जे सांगतो ते का करत नाही?*

४. वाचा. मत्तय १:२१. "येशु" या शब्दाचा अर्थ काय?

**मत्तय १:२१ -** *तिला पुत्र होईल, आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील."*

५. वाचा. लुक २३:२. "ख्रिस्त" हा शब्द काय सुचवते?

**लुक २३:२ -** *आणि ते त्याच्यावर असा आरोप करू लागले की, "हा आमच्या राष्ट्राला फितवताना, कैसराला कर देण्याची मनाई करताना आणि मी स्वतः ख्रिस्त राजा आहे असे म्हणताना आम्हांला आढळला."*

६. वाचा. रोम १:१६. या वचनानुसार, सुवार्ता किंवा चांगली बातमी ______ आहे

**रोम १:१६ -** *कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही ; कारण विश्वास ठेवणाऱ्याला प्रत्येकाला - प्रथम यहुद्याला मग हेललेण्याला - तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे.*

७. वाचा. रोम १:१-३. देवाची सुवार्ता त्याला केंद्रस्थानी आहे, किंवा संबंधित आहे.______.

त्याच्या पुत्राच विशिष्ठ पद किंवा त्याच्या संपूर्ण पुत्राशी?

**रोम १:१-३ -** *पवित्र जन होण्यासाठी बोलावलेले रोम शहरातील देवाचे प्रियजन ह्या सर्वांना, प्रेषित होण्याकरता बोलावण्यात आलेला, देवाच्या सुवार्तेकरता वेगळा केलेला, ख्रिस्त येशूचा दास पौल ह्याच्याकडून : [२ ] ह्या सुवार्तेविषयी देवाने पवित्र शास्त्रात आपल्या संदेष्ट्यांच्या द्वारे पूर्वीच वचन दिले होते. ही सुवार्ता त्याचा पुत्र येशू आपला प्रभू ह्याच्याविषयी आहे. [३ ] तो देहदृष्ट्या दावीद वंशात जन्मला.*

८. वाचा. योहान ६:५४. जेव्हा तुम्ही काही खाता तेव्हा ते काय दर्शवते?

**योहान ६:५४ -** *जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी उठवीन.*

९. वाचा. गलती ३:२७. जेव्हा कोणी एक ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतो तर त्याने परिधान केलेले आहे ____________.

**गलती ३:२७ -** *कारण तुमच्यामधील जितक्यांचा ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा झाला आहे तितक्यांनी ख्रिस्ताला परिधान केले आहे.*

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:५-६. जेव्हा शौलाचे परिवर्तन झाले तेव्हा त्याने येशूला कोणते दोन प्रश्न विचारले?

**प्रेषितांची कृत्ये ९:५-६ -** *तेव्हा तो म्हणाला, "प्रभो, तू कोण आहेस?" त्याने म्हटले, "ज्या येशूचा तू छळ करतोस तोच मी आहे; [६] तेव्हा तो थरथर कापत व आश्चर्यचकित होऊन म्हणाला "प्रभो, मी काय करावे अशी तुझी इच्छा आहे?" प्रभू म्हणाला,] "तर ऊठ व नगरात जा, म्हणजे तू काय करायचे हे तुला सांगण्यात येईल."*

११. वाचा. रोमकरास पत्र ७:४. आम्ही कोणाशी विवाह करणार आहोत?

आम्ही त्याच्या कोणत्या भागाशी विवाह केला आहे?

**रोमकरास पत्र ७:४ -** *त्याप्रमाणे, माझ्या बंधूंनो, तुम्हीही ख्रिस्ताच्या शरीराच्या द्वारे नियमशास्त्रासंबंधाने मृत झालात; अशासाठी की, तुम्ही दुसऱ्याचे म्हणजे मेलेल्यांतून जो उठला त्याचे व्हावे आणि आपण देवाला फळ द्यावे.*

१२. वाचा. तुम्ही ख्रिस्ताबरोबर चांगल्या वैवाहिक जीवनाचा आनंद घेत आहात का?

तुम्ही त्याच्यासोबत बोलता, संवाद साधता, प्रेम करता आणि त्याची आराधना करता का?

# उत्तरावली

१. वाचा. योहान १:१२. जितक्यांनी स्वीकार केला:

***अ. त्याचा (प्रभु येशु ख्रिस्त) त्यांना देवाचे पुत्र (किंवा मुले) होण्याचा अधिकार दिला***

२. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:३१. आपल्याला कोणावर विश्वास ठेवायचा (म्हणजे भरवसा किंवा सोपवायचे) आहे?

***प्रभु येशु ख्रिस्तावर***

३. वाचा. लुक ६:४६. "प्रभु" या शब्दाचा अर्थ काय?

***गुरु, शासक,मालक, ज्याला आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. या शब्दाचा अर्थ देवता देखील आहे.***

४. वाचा. मत्तय १:२१. "येशु" या शब्दाचा अर्थ काय?

***येशु म्हणजे तारणारा,उद्धारकर्ता***

५. वाचा. लुक २३:२. "ख्रिस्त" हा शब्द काय सुचवते?

***येशु आपला राजा आणि मसीहा म्हणून***

६. वाचा. रोम १:१६. या वचनानुसार, सुवार्ता किंवा चांगली बातमी ______ आहे

***ख्रिस्त स्वतः, ज्यामध्ये त्याचे सर्व हित समावले आहे***

७. वाचा. रोम १:१-३. देवाची सुवार्ता त्याला केंद्रस्थानी आहे, किंवा संबंधित आहे._______.

***परमेश्वराचा पुत्र,आपला प्रभु येशु ख्रिस्ताशी***

त्याच्या पुत्राच विशिष्ठ पद किंवा त्याच्या संपूर्ण पुत्राशी?

***त्याच्या संपूर्ण पुत्राशी***

८. वाचा. योहान ६:५४. जेव्हा तुम्ही काही खाता तेव्हा ते काय दर्शवते?

***की तुम्ही ते सर्व आत घेउन घेता,ग्रहण करता. एका अर्थाने तुम्ही जे खाता ते तुमचे जीवन, तुमची शक्ती बनते***

९. वाचा. गलती ३:२७. जेव्हा कोणी एक ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतो तर त्याने परिधान केलेल आहे ____________.

***संपूर्ण येशूला***

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये ९:५-६. जेव्हा शौलाचे परिवर्तन झाले तेव्हा त्याने येशूला कोणते दोन प्रश्न विचारले?

***तू कोण आहेस, आणि मी काय करावे अशी तुझी इच्छा आहे***

११. वाचा. रोमकरास पत्र ७:४. आपण कोणाबरोबर विवाह करणार आहोत?

***प्रभु येशु ख्रिस्ताबरोबर***

आम्ही त्याच्या कोणत्या भागासोबत विवाह केला आहे?

***त्याच्या सर्वस्वासोबत***

१२. वाचा. तुम्ही ख्रिस्ताबरोबर चांगल्या वैवाहिक जीवनाचा आनंद घेत आहात का?

तुम्ही त्याच्यासोबत बोलता, संवाद साधता, प्रेम करता आणि त्याची आराधना करता का?

# पाठ ८

# देवाच्या नियमाचा योग्य वापर

*डॉन क्रो द्वारा लिखित*

एके दिवशी जोई आणि मी तलावाकाठी बिल आणि स्टीव्ह यांच्याशी बोलत होतो. तिथे असा प्रश्न उपस्थित केला गेला की, "ज्या लोकांनी देव किंवा येशू ख्रिस्ताबद्दल कधीही ऐकले नाही अशा लोकांना देवासमोर कसे जबाबदार ठरवले जाऊ शकते?" मी म्हणालो, "बिल, समजा, तुम्ही स्टीव्हला त्याच्या घरी भेटायला गेलात, पण तो बाहेर गेलेला असता आणि त्याची बायको तिथे होती. जर तुम्ही तिच्याशी व्यभिचारी संबंध ठेवलात, तर तुमच्या मित्राच्या बायकोचा विनयभंग केल्याबद्दल तुम्हाला दोषी वाटेल का? जरी तुम्ही कधीही दहा आज्ञा बद्धल ऐकल नाही किंवा पवित्र शास्त्र वाचलेले नाही? तर मग अपराधीपणाची भावना आणि जबाबदारपणाची भावना कोठून आली?"

देवाने प्रत्येक व्यक्तीला, नियमाद्वारे आणि विवेकाद्वारे, योग्य समजण्याची आणि चुकीसाठी दोषी वाटून घेण्याची क्षमता दिली आहे. नियम आणि विवेक हे स्व-निर्णय करणारे कार्य आहेत जे एकतरं आपल्या वर्तनाच्या संदर्भात आपल्यावर आरोप करतात किंवा समर्थन करतात (रोम २:१४-१५).

बिल मला सांगत होता की तो किती चांगला माणूस होता. त्याला खरोखर कधी जीवनात तारणहाराची गरज भासली नाही. मी निर्गम २० कडे वळलो आणि दहा आज्ञा बिलसाठी वाचू लागलो. "बिल, तुझ्या आयुष्यात देव नेहमीच प्रथम आहे का, आणि तू नेहमीच त्याच्यावर जगातील कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त प्रेम केले आहे का? नाही तर, तू पहिली आज्ञा मोडली आहेस" (निर्गम २०:३). "तू कधी देवापेक्षा जास्त काही उंचावले आहे का? तसे असल्यास, तू दुसरी आज्ञा मोडली आहे" (निर्गम २०:४). "तू कधी येशू ख्रिस्ताचे नाव व्यर्थ घेतले आहे का? तू तिसरी आज्ञा मोडल्याबद्दल दोषी आहेस" (निर्गम २०:७). "तू नेहमीच देवाचा सन्मान आणि आराधना करण्यासाठी एक दिवस बाजूला ठेवला आहे का?" तू चौथी आज्ञा मोडली आहेस" (निर्गम २०:८). " तू नेहमी तुझ्या तरुणपणामध्ये तुझ्या आई वडिलांचा मान राखला आहेस का?" तू पाचवी आज्ञा मोडली आहे" (निर्गम २०:१२). "तू कधी एखाद्या व्यक्तीवर अत्यंत रागावला आहेस का? तर तू सहावी आज्ञा

मोडली आहे" (निर्गम २०:१३ ची मत्तय ५:२१-२२ सोबत तुलना करा). " तू कधी एखाद्या स्त्रीकडे पाहिले आणि तिची लालसा तू केली का? तर तू सातवी आज्ञा मोडली आहेस" (निर्गम २०:१४ ची तुलना मत्तय ५:२७-२८ सोबत करा). "तू कधी अशी एखादी वस्तू घेतली आहे जी तुझ्या मालकीची नाही? तर तू आठवी आज्ञा मोडली आहे" (निर्गम २०:१५). "तू नेहमी सत्य बोलले आहे का? नाही तर, तू नववी आज्ञा मोडली आहे" (निर्गम २०:१६). "तू कधीतरी शेजा-यांच्या मालकीच्या वस्तुंचा लोभ धरलास का? तू दहावी आज्ञा मोडली आहे" (निर्गम २०:१७). "तूला समजलं की येशूने का असे म्हटले की तो पाप्यांना वाचवण्यासाठी आला आहे?" (मार्क २:१६-१७).

आपण पुरेसे चांगले आहोत असा विचार करण्यात किंवा स्वर्गात जाण्यासाठी पुरेसे चांगले बनण्याचा प्रयत्न करण्यात समस्या ही आहे की आपण सर्वांनी दहा आज्ञा मोडल्या आहेत. याकोब २:१० आपल्याला सांगते की, जो कोणी संपूर्ण नियम पाळतो तरी ही तो फक्त एक मुद्दा पाळण्यात अपयशी ठरतो तर तो नियम मोडल्याबद्दल दोषी आहे. नियमशास्त्राचा हेतू तुम्हाला नीतिमान बनवण्यासाठी कधीच नव्हता तर ते केवळ तुमचे पाप प्रकट करण्यासाठी आहे. (रोम ३:१९-२०).

आपल्या सर्वांना तारणहाराची गरज आहे! "तारणकर्ता" या शब्दाची संकल्पना ही आहे की जो तुम्हाला तुमच्या पापाच्या शिक्षेपासून वाचवू शकतो. येशू नाशवंतांना वाचवतो जेणेकरून त्यांना अनंतकाळचे जीवन मिळावे.(मत्तय १:२१).

स्वर्गात जाण्यासाठी आपली तेवढी चांगली लायकी असण्यासाठी, आपल्याजवळ देवाच्या बरोबरीची नीतिमत्वता असणे आवश्यक आहे (२ करिंथ ५:२१). सुवार्तेची चांगली बातमी ही आहे की येशू केवळ तुमच्या पापांची क्षमा करणार नाही, तर तो – नि:शुल्कपणे - त्याचे स्वतःचे नीतिमत्व आम्हाला भेट म्हणून देत आहे (रोम ५:१७*) "कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील."*

## शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. मार्क २:१६-१७. येशू कोणाला वाचवायला आला?

**मार्क २:१६-१७ -** *तेव्हा परूश्यांतील शास्त्री ह्यांनी त्याला जकातदार व पापी लोक ह्यांच्याबरोबर जेवताना पाहून त्याच्या शिष्यांना म्हटले, "हा जकातदार व पापी लोक ह्यांच्या-बरोबर का जेवतो?" [१७] हे ऐकून येशू त्यांना म्हणाला, "निरोग्यांना वैद्याची गरज नसते, तर रोग्यांना असते; मी नीतिमानांना नव्हे तर पाप्यांना पश्चात्तापासाठी बोलावण्यास आलो आहे."*

२. वाचा. रोमकरांस पत्र २:१. जेव्हा आपण इतरांना दोष लावतो तेव्हा आपण स्वतःसाठी काय करत असतो?

का?

**रोमकरांस पत्र २:१ -** *तेव्हा हे मानवा, दोष लावणारा तू कोणीही असलास तरी स्वतः तुला सबब नाही; कारण ज्यात तू दुसऱ्याला दोष लावतोस त्यात तू स्वतःला दोषी ठरवतोस; कारण दोषी ठरवणारा तूही त्याच गोष्टी करतोस.*

३. वाचा. याकोब २:१०. जर आपण देवाचे बरेचसे नियम पाळले पण काही एक पाळता आले नाही तर आपण काय दोषी ठरतो?

**याकोब २:१० -** *कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो.*

४. वाचा. गलतीकरांस पत्र ३:१०. देवाचा नियम पाळून जर आपण नीतिमान होणार असू तर त्यातले आपण किती पाळायचे?

आणि या आज्ञा आपण किती काळपर्यंत पाळल्या पाहिजेत?

पुरेसे चांगले बनण्याचा प्रयत्न करून सुद्धा आपल्याला स्वत:ला का तारता येत नाही हे तुम्ही पाहिलेत का?

**गलतीकरांस पत्र ३:१० -** *कारण नियमशास्त्रातील कृत्यांवर जितके अवलंबून राहणारे आहेत तितके सर्व शापाधीन आहेत. कारण शास्त्रात असे लिहिले आहे की,*

*"नियमशास्त्राच्या पुस्तकात जे लिहिलेले आहे ते सर्व आचरण्यास जो कोणी टिकून राहत नाही तो शापित आहे."*

५. वाचा. गलतिकरांस पत्र २:१६. निर्दोषता ही देवाने दिलेली नीतिमत्वतेची देणगी आहे, जी एखाद्या व्यक्तीला योग्य ठिकाणी देवासमोर आणते आणि देवासोबत नात जोडते. पापी लोकांची निर्दोषता हे येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे दिलेला प्रस्ताव आहे आणि ते त्याच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे एकदाच आणि सर्वकाळसाठी पूर्ण केले जाते (१ करिंथ १५:३-४ आणि रोम ४:२५) मनुष्य कशामुळे निर्दोष ठरू शकत नाही?

एखादी व्यक्ती कशी तारली जाते?

नियमाद्वारे किती लोक निर्दोष,नीतिमान ठरतील?

**गलतिकरांस पत्र २:१६ –** *तरी मनुष्य नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीही ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला; ह्यासाठी की, आम्ही ख्रिस्तावरील विश्वासाने नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे; कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी 'मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही.'*

६. वाचा. रोमकरांस पत्र ६:१४. एक ख्रिस्ती म्हणुन तुम्ही आहात:

अ. नियमाच्या अधीन

ब. कृपेच्या अधीन

**रोमकरांस पत्र ६:१४ -** *तुम्ही नियमशास्त्राधीन नाही, तर कृपेच्या अधीन आहात, म्हणून पाप तुमच्यावर सत्ता चालवणार नाही.*

७. वाचा. यहेज्केल १८:२०. जर तुम्ही नियमशास्त्राच्या अधीन असता, तर तुमच्या पापांची शिक्षा काय असेल?

**यहेज्केल १८:२० -** *जो जीवात्मा पाप करील तोच मरेल; मुलगा बापाच्या पातकाचा भार वाहणार नाही, आणि बाप मुलग्याच्या पातकाचा भार वाहणार नाही; नीतिमानाला त्याच्या नीतिमत्तेचे फळ मिळेल; दुष्टाला त्याच्या दुष्टतेचे फळ मिळेल.*

८. वाचा. रोमकरांस पत्र ४:६-८. कृपेच्या अधीन, देव तुमच्या पापांसोबत कोणत्या तीन गोष्टी करतो?

**रोमकरांस पत्र ४:६-८ -** *ह्याप्रमाणे ज्या माणसाकडे देव कर्मावाचून नीतिमत्त्व गणतो त्याच्या धन्यतेचे वर्णन दावीदही करतो, [७] ते असे : "ज्यांच्या अपराधांची क्षमा झाली आहे व ज्यांच्या पापांवर पांघरूण घातले आहे ते धन्य. [८ ] ज्या माणसाच्या हिशेबी प्रभू पाप लावत नाही, तो धन्य.'*

९. वाचा. रोमकरांस पत्र ५:१. आता आपला न्याय झालेला आहे तर ह्याचा आपल्याला काय लाभ आहे?

**रोमकरांस पत्र ५:१ -** *ह्यास्तव आपण विश्वासाने नीतिमान ठरवलेले आहोत म्हणून आपल्याला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाबरोबर शांती आहे.*

१०. वाचा रोमकरांस पत्र ५:१. आता आपण येशूच्या रक्ताने तारले गेलो, तर आता आपण कशापासून वाचणार आहोत?

**रोमकरांस पत्र ५:१ -** *तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आपण विशेषेकरून त्याच्या द्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत.*

१०. वाचा. रोमकरांस पत्र १०:४. ख्रिस्ताने देवासमोर ___ मिळविण्याचे साधन म्हणून नियमशास्त्र संपवले.

**रोमकरांस पत्र १०:४ -** *कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला नीतिमत्त्व प्राप्त होण्यासाठी ख्रिस्त नियमशास्त्राची समाप्ती असा आहे.*

११. वाचा. १ करिंथ १:३०. देवाने येशूला आपले ____, ____, ___ आणि बनवले.

***१ करिंथ १:३० -*** *त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहात, तो देवापासून आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे;*

१३. वाचा. फिलिपैकरांस पत्र ३:९. जेव्हा तुम्ही मोशेच्या नियमानुसार जाता, तेव्हा तुम्ही तुमचे स्वतःचे ____________ मिळवण्याचा प्रयत्न करत असता.

**फिलिपैकरांस पत्र ३:९ -** *आणि मी त्याच्या ठायी आढळावे आणि माझे नीतिमत्त्व — माझे स्वतःचे नव्हे म्हणजे नियमशास्त्राच्या योगे प्राप्त होणारे नीतिमत्त्व नव्हे — तर ते ख्रिस्तावरील विश्वासाने प्राप्त होणारे नीतिमत्त्व असे असावे.*

१४. वाचा. १ करिंथ ११:१. ख्रिस्ती म्हणून, आम्ही ख्रिस्ताच्या नियमानुसार जगत आहोत. ख्रिस्ताचे नियम पाळण्यासाठी काही नियमावली नाहीत; हे एखाद्या व्यक्तीच्या प्रतिसादात जीवन जगणे असे आहे. ती व्यक्ती ___________ आहे.

**१करिंथ ११:१ -** *जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे, तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा.*

१५. वाचा. रोमकरांस पत्र ८:३. नियमशास्त्र आपल्याला कधीही वाचवू शकत नाही, नियम चुकीचा होता  असे म्हणून नाही, परंतु आपल्या _____ कमकुवतपणामुळे आपण ते पाळू शकलो नाही.

**रोमकरांस पत्र ८:३ -** *कारण नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बळ झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते साधण्याकरता देवाने आपल्या स्वतःच्या पुत्राला पापमय देहासारख्या देहाने व पापाबद्दल पाठवून देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरवली;*

# उत्तरावली

१. वाचा. मार्क २:१६-१७. येशू कोणाला वाचवायला आला?

***पापी लोकांना***

२. वाचा. रोमकरांस पत्र २:१. जेव्हा आपण इतरांना दोष लावतो तेव्हा आपण स्वतःसाठी काय करत असतो?

***स्वतःलाच दोष लावतो; म्हणजे, स्वतःलाच दोषी ठरवतो***

का?

***कारण जरी आपण इतरांना दोष देत असलो तरी ते करतात त्याच गोष्टी आपण सुद्धा करतो***

३. वाचा. याकोब २:१०. जर आपण देवाचे बरेचसे नियम पाळले पण काही एक पाळता आले नाही तर आपण कशाबद्दल दोषी ठरतो?

***आपण सर्वांविषयी दोषी ठरतो***

४. वाचा. गलतीकरांस पत्र ३:१०. देवाचा नियम पाळून जर आपण नीतिमान होणार असू तर त्यातले आपण किती पाळायचे?

***सर्व***

आणि या आज्ञा आपण किती काळपर्यंत पाळल्या पाहिजेत?

***आपण नेहमी ते पाळले पाहिजे (एकही वेळ न वगळता)***

पुरेसे चांगले बनण्याचा प्रयत्न करून सुद्धा आपल्याला स्वत:ला का तारता येत नाही हे तुम्ही पाहिलेत का?

***होय***

५. वाचा. गलतिकरांस पत्र २:१६. निर्दोषता ही देवाने दिलेली नीतिमत्वतेची देणगी आहे, जी एखाद्या व्यक्तीला योग्य ठिकाणी देवासमोर आणते आणि देवासोबत नात जोडते.

पापी लोकांचे निर्दोषता हे येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे दिलेला प्रस्ताव आहे आणि ते त्याच्या मृत्यू आणि पुनरुत्थानाद्वारे एकदाच आणि सर्वकाळसाठी पूर्ण केले जाते (१ करिंथ १५:३-४ आणि रोम ४:२५) मनुष्य कशामुळे निर्दोष ठरू शकत नाही?

***त्याचे स्वत:चे कार्य करून; म्हणजेच, नियमशास्त्राचे कार्य***

एखादा व्यक्ती कशी तारली जाते?

***येशु ख्रिस्तावर विश्वास (निष्ठा) ठेवून***

नियमाद्वारे किती लोक निर्दोष,नीतिमान ठरतील?

***एकही देह नाही; म्हणजे, कोणीच नाही***

६. वाचा. रोमकरांस पत्र ६:१४. एक ख्रिस्ती म्हणुन तुम्ही आहात:

***ब. कृपेच्या अधीन***

७. वाचा. यहेज्केल १८:२०. जर तुम्ही नियमशास्त्राच्या अधीन असता, तर तुमच्या पापांची शिक्षा काय असेल?

***मरण***

८. वाचा. रोमकरांस पत्र ४:६-८. कृपेच्या अधीन, देव तुमच्या पापांसोबत कोणत्या तीन गोष्टी करतो?

***त्यांना माफ करतो, त्यांना झाकून टाकतो, आणि माझ्यावर त्यांचा दोष लावत (टाकत) नाही***

९. वाचा. रोमकरांस पत्र ५:१. आता आपला न्याय्य झालेला आहे तर ह्याचा आपल्याला काय लाभ आहे?

***देवाबरोबर शांती (तो आमच्यावर क्रोधित नाही)***

१०. वाचा. रोमकरांस पत्र ५:१. आता आपण येशूच्या रक्ताने तारले गेलो, तर आता आपण कशापासून वाचणार आहोत?

***क्रोध – (आमच्या पापांसाठी न्याय)***

११. वाचा. रोमकरांस पत्र १०:४. ख्रिस्ताने देवासमोर ___ मिळविण्याचे साधन म्हणून नियमशास्त्र संपवले.

***नीतिमत्व***

१२. वाचा. १ करिंथ १:३०. देवाने येशूला आपले _________ बनवले.

***ज्ञान, नीतिमत्त्व , पवित्रीकरण, आणि खंडणी***

१३. वाचा. फिलिपैकरांस पत्र ३:९. जेव्हा तुम्ही मोशेच्या नियमानुसार जाता, तेव्हा तुम्ही तुमचे स्वतःचे ____________ मिळवण्याचा प्रयत्न करत असता.

***नीतिमत्व***

१४. वाचा. १ करिंथ ११:१. ख्रिस्ती म्हणून, आम्ही ख्रिस्ताच्या नियमानुसार जगत आहोत. ख्रिस्ताचे नियम पाळण्यासाठी काही नियमावली नाहीत; हे एखाद्या व्यक्तीच्या प्रतिसादात जीवन जगणे असे आहे. ती व्यक्ती ________ आहे.

***ख्रिस्त***

१५. वाचा. रोमकरांस पत्र ८:३. नियमशास्त्र आपल्याला कधीही वाचवू शकत नाही, नियम चुकीचा होता असे म्हणून नाही, परंतु आपल्या _____ कमकुवतपणामुळे आपण ते पाळू शकलो नाही.

***देहाच्या***

# पाठ ९

# नियमांच्या अधीन नाही तर कृपेच्या अधीन

*डॉन क्रो द्वारा लिखित*

मी एका स्त्रीचे स्वप्न पाहिले जिला तिने केलेल्या सर्व गोष्टींसाठी (तिच्या पापांसाठी) शिक्षा होत आहे. बाजूला तिच्या मागे एक माणूस लागला आणि जेव्हा जेव्हा ती चूक करेल तेव्हा तो तिरस्काराने आपले डोके हलवायचा, बेल्ट काढायचा आणि तिला मारायचा. जर तिने चुकीचे शब्द बोलले किंवा काही चुकीचे केले तर तो तिला शिक्षा करायचा. ती हसण्याचा आणि चांगली वृत्ती ठेवण्याचा प्रयत्न करत होती, परंतु ती अश्या गोष्टी करत राहिली ज्यामुळे तिला त्रास होईल. त्या काही मोठ्या गोष्टी नव्हत्या, परंतु हा माणुस तिला चुकीचे करताना पाहिल्यास प्रत्येक छोट्या गोष्टीसाठी सुद्धा तिला मारहाण करत होता. हे खुप निराशजनक वाटत होते. तिला अडचणीत आणणा-या गोष्टी करण्यापासून ती स्वत:ला रोखू शकत नव्हती. मला आठवते तिला असे पाहून तिच्याबद्दल मला वाईट वाटले. मला तिला नेहमी मारहाण करणाऱ्या त्या क्षुद्र माणसापासून दूर करण्यास मदत करायची होती. आणि मग मी झोपेतून जागा झालो.

मी देवाच्या कृपेचा, देवाच्या अप्राप्त, अपात्र कृपेचा आणि क्षमतेचा विचार करू लागलो. जेव्हा आपले अंतःकरण कृपेने स्थापित असते, तेव्हा आपण आता आपल्या कामगिरीद्वारे देवाची स्वीकृती मिळविण्याचा प्रयत्न करत नाही किंवा त्याचे नियम आपल्या स्वतःच्या शक्तीने आणि क्षमतेनुसार पाळण्याचा प्रयत्न करत नाही. देवाचा नियम मोडल्याने आपण मिळवलेल्या मारहाणीपासून आपण शेवटी सुटू शकलो. येशूनेच आपली सुटका केली आहे.

कृपादृष्टी या शब्दाचा विचार करा. याचा अर्थ एखाद्याची मान्यता, समर्थन किंवा आशीर्वाद मिळणे असे आहे. जेव्हा तुम्हाला कोणाची मर्जी हवी असते, तेव्हा तुम्ही काय करता? तुम्ही त्यांना आनंद होईल असे सर्व काही बोलण्याचा प्रयत्न करता आणि ते नाराज होणार असे काहीही न बोलता. तो नेहमी एक चांगला अभिनय आहे. ते साध्य करणे खरोखर नेहमी शक्य आहे का? हे गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध करण्यासारखे आहे. तुम्ही

थोड्या काळासाठी हे करू शकता, परंतु शेवटी, तुम्ही अयशस्वी व्हाल. ते तुमच्यापेक्षा जास्त बलवान आहे.

मी तसाच त्या स्वप्नातील स्त्रीबरोबर संबंधित आहे. मला असे वाटले की जेव्हा मी सर्वकाही बरोबर करण्याचा प्रयत्न केला परंतु एक छोटीशी चुक झाली आणि मी अयशस्वी झालो. मला वाटले की जर मी दिवसभर कुठे न चुकता ते करू शकलो असतो तर मी काहीतरी साध्य केले असते. पण नाही, माझ्या उणिवांमुळे मी नेहमीच अपूर्ण राहिलो. मला वाटले की मी माझ्या स्वर्गीय पित्याला- देवालाच फ़क्त निराश केले नाही तर आता मी स्वतःला सुद्धा दोष दिला पाहिजे आणि स्वतःला मारून घेतले पाहिजे. मी स्वत:च हरलो होतो. मी माझ्या क्षमतेवर आणि अक्षमतेवर लक्ष केंद्रित केले होते. दर्जा मिळवण्यासाठी कधीही पुरेसे चांगले करू शकलो नाही, मला ह्यातून सोडावण्यासाठी कोणीतरी हवे होते!

देवाने त्याच्या दयेने आम्हाला मदत पाठवली! त्याचे नाव येशू आहे. देवाने त्याला आपल्यापासून आणि त्याचे नियम पूर्ण करण्याच्या आपल्या शक्तीहीन प्रयत्नांपासून मुक्त करण्यासाठी पाठवले. आम्ही जे नियम पाळू शकत नाही त्याची शिक्षा येशूने घेतली, म्हणून आम्हाला मरावे लागणार नाही, परंतु मुक्त होऊन त्याच्याबरोबर अनंतकाळचे जीवन मिळू शकेल. येशूने आपल्याला स्वत:च नीतिमत्व भेट म्हणुन दिलं आहे जेणेकरून आपण देव पित्यासमोर नीतिमान आणि पवित्र असे जाऊ शकू आणि नियमांच्या सर्व गरजा पूर्ण करू शकू. देवाने येशुच्या मृत्यू, दफन आणि पुनरुत्थानाद्वारे आपल्यासाठी जे केले त्यामुळे आपल्याला देव पित्याबरोबर शांती मिळाली आहे. आपल्यावर देवाची कृपादृष्टी आहे, अप्राप्त आणि अपात्र (आपली पात्रता नसताना) आहे. ती आहे कृपा.

यावर विश्वास ठेवून, तुमचे हृदय निःसंशयपणे स्थिर झाले पाहिजे, हे जाणून की त्याने हे केले कारण तो तुमच्यावर प्रेम करतो. त्याच्या कृपेने तुमचे हृदय सुदृढ, सुरक्षित, स्थिर आणि दृढ करा; म्हणजेच, येशूमध्ये आणि त्याच्याद्वारे विपुल जीवन जगण्यासाठी आपल्याला आवश्यक असलेले सर्व काही त्याने आपल्याला दिलेले आहे याविषयी प्रश्न किंवा शंका न बाळगता स्थापित व्हा.

आपल्या विश्वासाचा उत्पादक आणि पूर्ण करणारा येशू याजकड़े लक्ष देण्याऐवजी जर आपण आपल्या उणीवा, चुका आणि पापांकडे लक्ष देत राहिलो तर आपले मन दुःखी आणि शक्तीहीन होईल की आपण देवाकडून काही प्राप्त करू शकतो. आपण अंतःकरणाने विश्वास ठेवतो आणि त्याचे नीतिमत्व आणि कृपा प्राप्त करतो. आपली

अंतःकरणे पूर्णपणे त्याचीच असली पाहिजेत, समर्पित. तेव्हाचं आपण पूर्ण केले जाऊ आणि विश्रांतीत राहू.

*“सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे.”* (नीतिसूत्रे ४:२३).

## शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. या पाठात "कृपेची" व्याख्या कशी केली आहे?

२. जेव्हा आपले हृदय कृपेने स्थापित होते, तेव्हा आपण यापुढे आपल्या _______ द्वारे देवाची स्वीकृती मिळविण्याचा प्रयत्न करत नाही.

३. वाचा. इब्री १०:१४. डॉनच्या उणिवांमुळे तो नेहमी अपूर्ण राहायचा. या वचनानुसार आपण परिपूर्ण कसे बनतो?

**इब्री १०:१४ -** *कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.*

४. वाचा. रोमकरांस पत्र ५:१७. येशूने आपल्याला नीतिमत्वाचे _______ दिले जेणेकरून आपण देव पित्यासमोर नीतिमान आणि पवित्र असू आणि नियमांच्या सर्व आवश्यकता पूर्ण करू शकू.

**रोमकरांस पत्र ५:१७ -** *कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील.*

५. वाचा. यशया २६:३. आपल्या विश्वासाचा उत्पादक आणि पूर्ण करणारा येशू यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जर आपण आपल्या उणीवा, चुका आणि पापांवर लक्ष केंद्रित करत राहिलो तर आपली अंतःकरणे दुःखी होतील आणि आपण देवाकडून काही प्राप्त करू शकतो यावर विश्वास ठेवण्यास शक्तीहीन होतील. आपण आपले मन कशावर स्थिर ठेवले पाहिजे?

**यशया २६:३ -** *ज्याचे मन तुझ्या ठायी स्थिर झाले आहे त्याला तू पूर्ण शांती देतोस, कारण त्याचा भाव तुझ्यावर असतो.*

६. वाचा. इफिसकरांस पत्र ३:१७. आपली अंतःकरणे पूर्णतः त्याचीच असली पाहिजे. म्हणजे तेव्हा आपण ______आणि ____ राहू.

**इफिसकरांस पत्र ३:१७ -** *ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून,*

७. वाचा. रोमकरांस पत्र ४:५. तारण हे एक मिळवलेले प्रतिफळ असे आहे की देवाच्या कृपेची विनामूल्य भेट आहे?

**रोमकरांस पत्र ४:५ -** *पण जो काम करत नाही तर अभक्ताला नीतिमान ठरवणाऱ्यावर विश्वास ठेवतो त्याचा विश्वास नीतिमत्त्व असा गणण्यात येतो.*

८. रोमकरांस पत्र ५:१७. नीतिमत्वता (परमेश्वरासमोर उभे राहण्याची योग्यता) ही एक देणगी आहे. तुम्हाला भेट दिलेल्या गोष्टीसाठी काम करावे लागते का? तुम्ही ती भेटवस्तू कशी स्वीकारता?

**रोमकरांस पत्र ५:१७ -** *कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील.*

९. वाचा. रोमकरांस पत्र ६:२३. या वचनात परमेश्वराच्या कृपेची मोफत देणगी कोणती आहे?

**रोमकरांस पत्र ६:२३ -** *कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे.*

१०. वाचा. तीत ३:५. तुमची किती चांगली कामे आणि कृत्ये तुमच्या तारणासाठी योगदान देतात?

**तीत ३:५. -** *तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले.*

११. वाचा. रोमकरांस पत्र ६:१४. देवाच्या कृपे अधीन असणे म्हणजे काय, हे तुमच्या स्वतःच्या शब्दात स्पष्ट करा.

**रोमकरांस पत्र ६:१४. -** *तुम्ही नियमशास्त्राधीन नाही, तर कृपेच्या अधीन आहात, म्हणून पाप तुमच्यावर सत्ता चालवणार नाही.*

१२. वाचा. रोमकरांस पत्र ११:६. जर देवाचे आशीर्वाद आपल्याला कृपेने दिले असतील तर ते आपल्या __________ द्वारे नाहीत.

**रोमकरांस पत्र ११:६ -** *आणि जर हे कृपेने राहिले असेल तर ते कर्मांनी नाही; नाहीतर कृपा ही कृपा असणार नाही. [पण जर ते कर्माने असेल तर मग कृपा नाही, असली तर कर्म हे मग कर्म नाही.]*

१३. वाचा. रोमकरांस पत्र ३:२४. ह्या वचनाचा अर्थ तुमच्या स्वतःच्या शब्दात स्पष्ट करा.

**रोमकरांस पत्र ३:२४ -** *देवाच्या कृपेने ख्रिस्त येशूने खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या द्वारे ते विनामूल्य नीतिमान ठरतात.*

१४. वाचा. इफिसकरांस पत्र १:७. आमच्या पापांची क्षमा ____________ नुसार होती.

**इफिसकरांस पत्र १:७ -** *त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे.*

# उत्तरावली

१. वाचा. या पाठात “कृपेची” व्याख्या कशी केली आहे?

***अप्राप्त, अपात्र कृपादृष्टी आणि देवाची क्षमता***

२. जेव्हा आपले हृदय कृपेने स्थापित होते, तेव्हा आपण यापुढे आपल्या _______ द्वारे देवाची स्वीकृती मिळविण्याचा प्रयत्न करत नाही.

***कामगिरी***

३. वाचा. इब्री १०:१४. डॉनच्या उणिवांमुळे तो नेहमी अपूर्ण राहायचा. या वचनानुसार आपण परिपूर्ण कसे बनतो?

***येशूच्या अर्पणाद्वारे , त्याने कायमचे परिपूर्ण केलेले आहे***

४. वाचा. रोमकरांस पत्र ५:१७. येशूने आपल्याला नीतिमत्वाचे _______ दिले जेणेकरून आपण देव पित्यासमोर नीतिमान आणि पवित्र असू आणि नियमांच्या सर्व आवश्यकता पूर्ण करू शकू.

***दान***

५. वाचा. यशया २६:३. आपल्या विश्वासाचा उत्पादक आणि पूर्ण करणारा येशू यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी जर आपण आपल्या उणीवा, चुका आणि पापांवर लक्ष केंद्रित करत राहिलो तर आपली अंतःकरणे दुःखी होतील आणि आपण देवाकडून काही प्राप्त करू शकतो यावर विश्वास ठेवण्यास शक्तीहीन होतील. आपण आपले मन कशावर स्थिर ठेवले पाहिजे?

***आपली मने प्रभुवर केंदित, स्थिर असली पाहिजे***

६. वाचा. इफिसकरांस पत्र ३:१७. आपली अंतःकरणे पूर्णतः त्याचीच असली पाहिजे. म्हणजे तेव्हा आपण_____ आणि ______ राहू.

***संपन्न होऊ आणि विश्रामात***

७. वाचा. रोमकरांस पत्र ४:५. तारण हे एक मिळवलेले प्रतिफळ असे आहे की, देवाच्या कृपेची विनामूल्य भेट आहे?

***देवाच्या कृपेची विनामूल्य भेट***

८. रोमकरांस पत्र ५:१७. नीतिमत्वता (परमेश्वरासमोर उभे राहण्याची योग्यता) ही एक देणगी आहे. तुम्हाला भेट दिलेल्या गोष्टीसाठी काम करावे लागते का?

***नाही***

तुम्ही ती भेटवस्तू कशी स्वीकारता?

***केवळ तिथे जाऊन ते घेऊन***

९. वाचा. रोमकरांस पत्र ६:२३. या वचनात परमेश्वराच्या कृपेची मोफत देणगी कोणती आहे?

***सार्वकालिक जीवन (सार्वकालिक मरणाऐवजी)***

१०. वाचा. तीत ३:५. तुमची किती चांगली कामे आणि कृत्ये तुमच्या तारणासाठी योगदान देतात?

***एकही नाही***

११. वाचा. रोमकरांस पत्र ६:१४. देवाच्या कृपे अधीन असणे म्हणजे काय, हे तुमच्या स्वतःच्या शब्दात स्पष्ट करा.

***आपल्या पापांच्या पात्रते नुसार आपल्याला मिळत नाही आहे तर उलट ख्रिस्ताद्वारे देवाचे सर्वोत्तम मिळत आहे. नीतिमत्वता, स्वीकृती, क्षमा हे आपले आहेत (हे सर्व देवाच्या दयेची देणगी म्हणून)***

१२. वाचा. रोमकरांस पत्र ११:६. जर देवाचे आशीर्वाद आपल्याला कृपेने दिले असतील तर ते आपल्या _________ द्वारे नाहीत.

***कर्मांच्या***

१३. वाचा. रोमकरांस पत्र ३:२४. ह्या वचनाचा अर्थ तुमच्या स्वतःच्या शब्दात स्पष्ट करा.

***नीतिमत्व (निर्दोषता) ही देवाच्या कृपेची मोफत देणगी आहे जी विश्वासणा-याना ख्रिस्ताच्या वधस्तंभावर मुक्त करण्याच्या कार्यामुळे दिलेली आहे.***

१४. वाचा. इफिसकरांस पत्र १:७. आमच्या पापांची क्षमा __________ नुसार होती.

***कृपेच्या समृद्धीप्रमाणे***

# पाठ १०

# आणखी पापांची जाणीव नाही

*डॉन क्रो द्वारा लिखित*

एके दिवशी एका मद्यधुंद माणसाने आपली गाडी घेतली, आणि त्याने चुकीच्या दिशेने गाडी चालवायला सुरुवात केली, समोरा- समोर येणा-या दुसऱ्या कारमधील लोकांशी टक्कर झाली. या अपघातात एका अठरा वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. या मुलीच्या कुटुंबाने त्या माणसावर खटला दाख़ल केला आणि खटल्यात १.५ कोटी रुपये जिंकले.

पैसे घेण्याऐवजी कुटुंब ९३.६ लाखावरच तयार झाले. त्या माणसाने ही रक्कम एका विशिष्ट पद्धतीने द्यावी, अशी त्यांची इच्छा होती. दारूच्या नशेत असलेल्या माणसाने आपण काय केले ते आठवावे अशी त्यांची इच्छा होती. त्याने मारलेल्या मुलीच्या नावे चेक लिहून दर आठवड्याला शंभर रुपये द्यायचा आणि कुटुंबाला पाठवायचा. तुम्हाला असे वाटेल की ९३.६ लाखाचा ठराव १.५ कोटीच्या प्रमाणात एक चांगला करार असेल. सुरुवातीला आठवड्यातून शंभर रुपये भरणे त्याला सोपे होते, पण थोड्या दिवसांनी त्याने मारलेल्या मुलीच्या नावाने चेक लिहून पाठवणे हे सगळ त्याच्या विचारावर वर्चस्व गाजवू लागले. त्याने मारलेल्या मुलीचा विचार करून दर आठवड्याला तो निराशेमध्ये जात असे.

काही वर्षांनंतर, त्याने पैसे पाठवणे पूर्णपणे बंद केले. कुटुंबाने त्याला पुन्हा न्यायालयात नेले आणि त्याला रक्कम परत भरण्याचे चालु करण्याचा आदेश दिले. गेल्या सहा-सात वर्षांत त्याने चार ते पाच वेळा पैसे पाठवणे थांबवले. तथापि, प्रत्येक वेळी त्याला पुन्हा कोर्टात नेण्यात आले आणि त्याला पुन्हा पैसे भरण्यास सुरुवात करण्यास भाग पाडले.

कुटुंबाने सांगितले की ते आता त्याच्यावर रागावलेले नाहीत, परंतु त्यांना फक्त त्याने जे केले होते त्याची आठवण करून द्यायची होती.

आपण याबद्दल विचार केल्यास, ते कुटुंब तसेच पैसे देणारा तो माणूस दोघे देखील बंधनात होते. दर आठवड्याला त्यांना त्यांच्या नुकसानीची आठवण करून देणारा धनादेश मिळतो, त्यामुळे एका अर्थाने ते त्यांच्या मुलीच्या मृत्यूलाही मागे टाकू शकत नव्हते.

तो माणूस आता "क्रूर आणि असामान्य शिक्षा" म्हणून कुटुंबावर खटला भरत आहे. तो म्हणतो, "हे असे करणे मला मारत आहे! हे माझे जीवन नष्ट करत आहे! मी कधीही हा भूतकाळ मागे ठेवू शकत नाही आणि माझ्या आयुष्यात पुढे जाऊ शकत नाही".

या कथेच्या निगडीत, मी बऱ्याच ख्रिस्ती लोकांना भेटलो आहे ज्यांना असे वाटते की ते ह्या सारख्या न्यायाच्या अधीन आहेत. त्यांना "येशूने सर्व खंडणी भरली" असे सांगितले होते, परंतु तरीही त्यांना असे वाटते की त्यांना धार्मिक कर्तव्यांचे साप्ताहिक पैसे द्यावे लागतील, नाहीतर देव त्यांचा स्वीकारणार नाही.

## शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. ह्या प्रकारे सुरू असताना या व्यक्तिचे त्या कुटुंबातील लोकांसोबत कसे नाते असू शकते?

२. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१. नियम काय करू शकत नाही?

**इब्रीकरांस पत्र १०:१-२ -** *तर मग ज्या पुढे होणाऱ्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांची नियमशास्त्रात छाया आहे, वास्तविक स्वरूप नाही; म्हणून ते प्रतिवर्षी नित्य अर्पण केल्या जाणाऱ्या त्याच त्याच यज्ञांनी जवळ येणाऱ्यांना पूर्ण करण्यास केव्हाही समर्थ नाही. [२] ते समर्थ असते तर एकदा शुद्ध झालेल्या उपासकांना त्यानंतर पापाची भावना नसल्याने ते यज्ञ करणे बंद झाले नसते काय?*

३. वाचा इब्रीकरांस पत्र १०:१. हे वचन काय सांगते जे आपल्याला असे सूचित करते की जुन्या कराराचे अर्पणे आपल्याला परिपूर्ण बनविण्यासाठी अपुरे होते?

४. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:२. जर खरोखरच पापाचा सामना करू शकणारे अर्पण आले तर ते आराधकांसाठी काय करेल?

५. नशेत असलेल्या चालकावर काय सक्ती करण्यात आली?

६. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४. देव त्याच्या लोकांना याद्वारे परिपूर्ण करतो:

अ. चांगले कामे केल्याने

ब. नियमित चर्चला गेल्याने

क. दहा आज्ञा पालनकेल्याने

ड. येशुच्या अर्पणाने (बलिदान)

**इब्रीकरांस पत्र १०:१४ -** *कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.*

७. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४. येशूचे अर्पण (विश्वासाने मिळालेले) विश्वासणाऱ्याला परिपूर्ण करते:

अ. पुढच्या वेळी ते पाप करेपर्यंत

ब. त्यांच्या मागील पापांपासून

क. कायमचे

८. वाचा. उत्पती २०:१-१८. या कथेत उल्लेख केलेले दोन पुरुष कोण आहेत?

**उत्पती २०:१-१८ -** *[१] अब्राहामाने तेथून नेगेबकडे प्रवास करून कादेश व शूर ह्यांच्या दरम्यान मुक्काम केला आणि काही दिवस गरार येथे वस्ती केली. [२] आपली बायको सारा हिच्याविषयी अब्राहामाने सांगितले की, "ही माझी बहीण आहे,' तेव्हा गरारचा राजा अबीमलेख ह्याने माणसे पाठवून सारेला आणले. [३] देव रात्री स्वप्नात येऊन अबीमलेखाला म्हणाला, "तू जी ही स्त्री आणली आहेस तिच्यामुळे तुझा अंत झालाच म्हणून समज, कारण ती नवऱ्याची बायको आहे." [४] अबीमलेख काही तिच्यापाशी गेला नव्हता, म्हणून तो म्हणाला, "प्रभू, तू नीतिमान राष्ट्राचाही संहार करणार काय? [५] 'ती माझी बहीण आहे' असे तो म्हणाला नाही काय? तसेच 'तो माझा भाऊ आहे' असे तीही म्हणाली नाही काय? मी सात्त्विक मनाने व स्वच्छ हातांनी हे केले आहे." [६] देवाने त्याला स्वप्नात म्हटले, "तू सात्त्विक मनाने हे केले हे मलाही ठाऊक आहे, आणि माझ्याविरुद्ध तुझ्याकडून पाप घडू नये म्हणून मी तुला आवरलेही; म्हणून मी तुला तिला स्पर्श करू दिला नाही. [७] आता त्या मनुष्याची बायको त्याला परत दे, कारण तो संदेष्टा आहे; तो तुझ्यासाठी प्रार्थना करील आणि तू वाचशील. पण जर तू तिला परत दिले नाहीस, तर तू व तुझे जे आहेत ते सगळे खचीत मरतील." [८] मग अबीमलेखाने मोठ्या पहाटेस उठून आपल्या सर्व सेवकांना बोलावून ह्या सर्व गोष्टी त्यांच्या कानी घातल्या; तेव्हा ती माणसे फार घाबरली. [९] अबीमलेखाने अब्राहामाला बोलावून आणून म्हटले, "तू हे काय केलेस? मी तुझा असा कोणता अपराध केला की तू माझ्यावर व माझ्या राज्यावर असे महापातक आणलेस? करू नये असे वर्तन तू माझ्याशी केलेस." [१०] अबीमलेख अब्राहामाला आणखी म्हणाला, "ही गोष्ट करण्यात तुझ्या मनात होते तरी होते?" [११] अब्राहाम म्हणाला, "ह्या ठिकाणी देवाचे भय अगदी नाही, म्हणून हे लोक माझ्या बायकोसाठी माझा घात करतील असे मला वाटले. [१२] शिवाय ती खरोखर माझी बहीण लागते, म्हणजे ती माझ्या बापाची मुलगी; पण माझ्या आईची ती मुलगी नाही म्हणून ती माझी बायको झाली. [१३] देवाने मला माझ्या बापाचे घर सोडून भ्रमण करायला लावले तेव्हा मी तिला म्हणालो, 'माझ्यावर एवढी कृपा*

*कर की आपण जिकडे जाऊ तिकडे, हा माझा भाऊ आहे असे माझ्याविषयी सांग." [१४] मग अबीमलेखाने मेंढरे, बैल, दास व दासी आणून अब्राहामाला दिली आणि त्याची बायको साराही त्याला परत दिली. [१५] अबीमलेख म्हणाला, "पाहा, माझा देश तुला मोकळा आहे; तुला वाटेल तेथे राहा." [१६] तो सारेला म्हणाला, "पाहा, मी तुझ्या भावाला रुप्याची एक हजार नाणी देत आहे; त्यांच्या योगे तुझ्याबरोबरच्या सगळ्या लोकांसमोर तुझी भरपाई होईल. ह्या प्रकारे सर्वांसमक्ष तुझा निर्दोषीपणा सिद्ध झाला आहे." [१७] मग अब्राहामाने देवाची प्रार्थना केली, तेव्हा देवाने अबीमलेख, त्याची बायको व त्याच्या दासी ह्यांना बरे केले, आणि त्यांना मुले होऊ लागली. [१८] कारण अब्राहामाची बायको सारा हिच्यामुळे परमेश्वराने अबीमलेखाच्या घराण्यातल्या सर्व स्त्रियांची गर्भाशये अगदी बंद केली होती.*

९. वाचा. उत्पती २०:२ आणि ५. या कथेत खोटे बोलणारा आणि समोरच्याला फसवणारा माणूस कोण होता?

**उत्पती २०:२ -** *आपली बायको सारा हिच्याविषयी अब्राहामाने सांगितले की, "ही माझी बहीण आहे,' तेव्हा गरारचा राजा अबीमलेख ह्याने माणसे पाठवून सारेला आणले.*

*उत्पती २०:५ - 'ती माझी बहीण आहे' असे तो म्हणाला नाही काय? तसेच 'तो माझा भाऊ आहे" असे तीही म्हणाली नाही काय? मी सात्त्विक मनाने व स्वच्छ हातांनी हे केले आहे."*

१०. वाचा. उत्पती २०:७. मला खात्री आहे की देवाने अब्राहमाच्या कृतीला मान्यता दिली नाही. पण देवाने कोणाची बाजू घेतली, अब्राहम की अबीमलेख?

का? वाचा. उत्पती १५:१,१८; आणि याकोब २:२३.

**उत्पती २०:७-** *आता त्या मनुष्याची बायको त्याला परत दे, कारण तो संदेष्टा आहे; तो तुझ्यासाठी प्रार्थना करील आणि तू वाचशील. पण जर तू तिला परत दिले नाहीस, तर तू व तुझे जे आहेत ते सगळे खचीत मरतील."*

**उत्पती १५:१ -** *ह्या गोष्टी घडल्यावर अब्रामाला दृष्टान्तात परमेश्वराचे वचन प्राप्त झाले ते असे : "अब्रामा, भिऊ नको. मी तुझी ढाल आहे, तुला मोठे प्रतिफळ मिळेल."*

**उत्पती १५:१८ -** *त्या दिवशी परमेश्वराने अब्राहामाशी करार करून सांगितले, "मिसराच्या1 नदीपासून ते महानदी फरात येथ-पर्यंतचा प्रदेश मी तुझ्या संतानास देतो.*

**याकोब २:२३ -** *"अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला, आणि ते त्याला नीतिमत्त्व असे गणण्यात आले;" आणि त्याला 'देवाचा मित्र' म्हणण्यात आले, हा शास्त्रलेख पूर्ण झाला.*

११. वाचा. उत्पती २०:७. आणि १७-१८. अब्राहामाची चूक असली तरी, देवाने कोणाला कोणासाठी प्रार्थना करणार असे सांगितले?

अ. अब्राहाम अबीमेलेखसाठी प्रार्थना करणार होता

ब. अबीमेलेख अब्राहामासाठी प्रार्थना करणार होता

क. ते एकमेकांसाठी प्रार्थना करणार होते

**उत्पती २०:७-** *आता त्या मनुष्याची बायको त्याला परत दे, कारण तो संदेष्टा आहे; तो तुझ्यासाठी प्रार्थना करील आणि तू वाचशील. पण जर तू तिला परत दिले नाहीस, तर तू व तुझे जे आहेत ते सगळे खचीत मरतील."*

**उत्पती २०:१७-१८ -** *मग अब्राहामाने देवाची प्रार्थना केली, तेव्हा देवाने अबीमलेख, त्याची बायको व त्याच्या दासी ह्यांना बरे केले, आणि त्यांना मुले होऊ लागली. [१८] कारण अब्राहामाची बायको सारा हिच्यामुळे परमेश्वराने अबीमलेखाच्या घराण्यातल्या सर्व स्त्रियांची गर्भाशये अगदी बंद केली होती.*

१२. वाचा. रोमकरांस पत्र ८:३१. जरी आपण कधी कमी पडून अपयशी झालो तरी आपल्या बाजूने कोण आहे?

**रोमकरांस पत्र ८:३१-** *तर मग ह्या गोष्टीवरून आपण काय म्हणावे? देव आपल्याला अनुकूल असल्यास आपल्याला प्रतिकूल कोण?*

१३. वाचा. रोमकरांस पत्र ४:८. जरी आपण चुका केल्या तरी देव काय करणार नाही असे म्हणतो?

**रोमकरांस पत्र ४:८ -** *ज्या माणसाच्या हिशेबी प्रभू पाप लावत नाही, तो धन्य.'*

१४. वाचा. इब्रीकरांस पत्र ८:१२-१३. नवीन करारामध्ये, देवाने काय करणार नाही असे अभिवचन दिले?

**इब्रीकरांस पत्र ८:१२-१३ -** *कारण मी त्यांच्या अनीतीच्या कृत्यांविषयी क्षमाशील होईन, आणि त्यांची पापे मी ह्यापुढे आठवणारच नाही." [१३ ] त्याने 'नवा' असे म्हटल्यावर पहिल्या कराराला जुना असे ठरवले आहे; आणि जे जुने व जीर्ण होत आहे, ते नाहीसे होण्याच्या बेतात आले आहे.*

१५. वाचा. इफिसकरांस पत्र २:५ आणि ८ -९. आपले तारण कसे झालेले आहे?

**इफिसकरांस पत्र २:५ -** *ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले, (कृपेने तुमचे तारण झालेले आहे);*

**इफिसकरांस पत्र ८-९ -** *कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; [९] कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही.*

१६. वाचा. तीत ३:५. आपले तारण कसे झालेले नाही?

आपले तारण कसे झाले आहे?

**तीत ३:५ -** *तेव्हा आपण केलेल्या नीतीच्या कृत्यांनी नव्हे तर नव्या जन्माचे स्नान व पवित्र आत्म्याने केलेले नवीकरण ह्यांच्या द्वारे त्याने आपल्या दयेनुसार आपल्याला तारले.*

१७. वाचा. इफिसकरांस पत्र १:६. त्याच्या ______ द्वारे आपल्याला तारल्याबद्दल आपण अनंतकाळपर्यंत देवाची स्तुती करू. कारण त्याने आपल्याला त्याच्या प्रिय (येशू ख्रिस्त) मध्ये ______ आहे.

**इफिसकरांस पत्र १:६ -** *त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.*

# उत्तरावली

१. ह्या प्रकारे सुरू असताना या व्यक्तिचे त्या कुटुंबातील लोकांसोबत कसे नाते असू शकते?

***अक्षमा,कटुता आणि भांडनाने भरलेल नात***

२. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१. नियम काय करू शकत नाही?

***जे उपासना करतात त्यांना परिपूर्ण करणे (उणीव किंवा दोष नसलेले)***

३. वाचा इब्रीकरांस पत्र १०:१. हे वचन काय सांगते जे आपल्याला असे सूचित करते की जुन्या कराराचे अर्पणे आपल्याला परिपूर्ण बनविण्यासाठी अपुरे होते?

***ते सतत पुनरावृत्ती करत होते - दररोज, साप्ताहिकपणे, मासिकरित्या. त्यांची पुनरावृत्ती करत होते या वस्तुस्थितीवरून हे सिद्ध झाले की ते पापाच्या समस्येला कायमस्वरूपी हाताळू शकत नाहीत.***

४. इब्रीकरांस पत्र १०:२. जर खरोखरच पापाचा सामना करू शकणारे अर्पण आले तर ते आराधकांसाठी काय करेल?

***यामुळे त्यांना यापुढे पापाची भावना राहिली नसती (नेहमीच अपयशाने मात)***

५. नशेत असलेल्या चालकावर काय सक्ती करण्यात आली?

***नेहमी केलेल्या पापाचा विचार करणे***

६. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४. देव त्याच्या लोकांना याद्वारे परिपूर्ण करतो:

***ड. येशुच्या अर्पणाने (बलिदान)***

७. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४. येशूचे अर्पण (विश्वासाने मिळालेले) विश्वासणाऱ्याला परिपूर्ण करते:

***क. कायमचे***

८. उत्पती २०:१-१८. या कथेत उल्लेख केलेले दोन पुरुष कोण आहेत?

***अब्राहम आणि अबीमलेख***

९. वाचा. उत्पती २०:२ आणि ५. या कथेत खोटे बोलणारा आणि समोरच्याला फसवणारा माणूस कोण होता?

***अब्राहम***

१०. वाचा. उत्पती २०:७. मला खात्री आहे की देवाने अब्राहमाच्या कृतीला मान्यता दिली नाही. पण देवाने कोणाची बाजू घेतली, अब्राहम की अबीमलेख?

***अब्राहम***

का? वाचा. उत्पती १५:१,१८; आणि याकोब २:२३.

***कारण अब्राहमाबरोबर देवाने करार केलेला होता आणि तो देवाचा मित्र होता***

११. वाचा. उत्पती २०:७. आणि १७-१८. अब्राहामाची चूक असली तरी, देवाने कोणाला कोणासाठी प्रार्थना करणार असे सांगितले?

***अ. अब्राहाम अबीमेलेखसाठी प्रार्थना करणार होता***

१२. वाचा. रोमकरांस पत्र ८:३१. जरी आपण कधी कमी पडून अपयशी झालो तरी आपल्या बाजूने कोण आहे?

***देव***

१३. वाचा. रोमकरांस पत्र ४:८. जरी आपण चुका केल्या तरी देव काय करणार नाही असे म्हणतो?

***हिशेबी पाप लावणार नाही, म्हणजे, आमची पापे आमच्या विरुद्ध गणणार नाही***

१४. वाचा. इब्रीकरांस पत्र ८:१२-१३. नवीन करारामध्ये, देवाने काय करणार नाही असे अभिवचन दिले?

***देव आमची पापे ह्यापुढे आठवणारच नाही किंवा त्यांना आमच्या विरुद्ध गणणार नाही***

१५. वाचा. इफिसकरांस पत्र २:५ आणि ८-९. आपले तारण कसे झालेले आहे?

***त्याच्या कृपेने म्हणजे आपल्यासाठी असलेले त्याचे अपात्रतेचे उपकार आणि दया***

१६. वाचा. तीत ३:५. आपले तारण कसे झालेले नाही?

***आम्ही केलेल्या नीतिच्या कृत्यांनी***

आपले तारण कसे झाले आहे?

***त्याच्या दयेनुसार. त्याने आपल्याला नवीन जन्माने धुतले आणि त्याच्या पवित्र आत्म्याने आपल्याला नवीन बनवले.***

१७. वाचा. इफिसकरांस पत्र १:६. त्याच्या ______ द्वारे आपल्याला तारल्याबद्दल आपण अनंतकाळपर्यंत देवाची स्तुती करू. कारण त्याने आपल्याला त्याच्या प्रिय (येशू ख्रिस्त) मध्ये __________ आहे.

***कृपे / स्वीकारले***

# पाठ ११

# माझ्यावर प्रेम करण्यात येते आणि मी सुंदर आहे

*डॉन क्रो द्वारा लिखित*

एके दिवशी, मायकल माझ्या ऑफिसमध्ये त्याच्या एका सहकारी विद्यार्थ्याबद्दल काही अत्यंत गोपनीय माहिती सांगण्यासाठी आला. केरिस बायबल कॉलेज येथे मी माझ्या एका सत्रात व्याख्यान देत असताना असे दिसून आले की पॅट्रिशिया तिच्या स्वतःच्या बुकमध्ये काही नोट्स लिहित होती. तिच्या नोट्समध्ये असे विधान होते: "माझ्यावर प्रेम करण्यात येते, मी सुंदर आहे," इत्यादी. पॅट्रिशिया देखील अश्या प्रकारची व्यक्ती होती जी नेहमी स्वत:कडे लक्ष वेधून घ्यायची तिच्या राहणीमानाद्वारे. पॅट्रिशियाने हे शब्द व्यक्त करण्याचे खरे कारण म्हणजे तिला आपण कोणाला प्रिय आहोत किंवा सुंदर आहोत असे वाटले नाही, परंतु तिला नेहमी नाकारले गेले आणि कोणी तिच्यावर प्रीति करत असे वाटले नाही.

मनुष्य म्हणून, आपल्या सर्वांच्या समान मूलभूत गरजा आहेत - प्रेम, स्वीकार आणि आपली किंमत असल्याची इच्छा, तसेच स्वत:चं काही महत्त्व असल्याची भावना असणे आणि आपण देवाच्या समोर योग्य आहोत हे जाणून घेणे. आज बरेच धर्म आपल्याला प्रेम नसलेले, मूल्य नसलेले आणि तुम्ही स्वीकारले जात नाही असे दर्शवतात. विश्वासणाऱ्यांच्या विरूद्ध सैतान वापरत असलेल्या सर्वात मोठ्या गडांपैकी एक म्हणजे अपराधीपणाची आणि दोषी भावना आहे, त्यासोबतच आपल्याला त्याबद्दल आध्यात्मिक भावना निर्माण होते आणि या सर्व गोष्टीं आपल्याला आध्यात्मिक आहे असे वाटू लागते.

येथे एक प्रश्न आहे: तुमच्यापैकी किती जण जेव्हा पहिल्यांदा येशूकडे आलात तेव्हा तुम्हाला असे सांगण्यात आले होते की तो तुमच्यावर प्रेम करतो इतकेच नाही, तर त्याला स्वीकारून तो तुमचा परिपूर्ण नीतिमत्वता बनेल? किंबहुना, तो ज्या नीतिमत्वतेचा पुरवठा करेल ती सर्व नीतिमत्वता असेल जी तुम्हाला आवश्यक असेल (१ करिंथ १:३० सांगते, *"त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहात, तो देवापासून आपल्याला ज्ञान म्हणजे*

*नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे")* *ही सुवार्तेमधली चांगली बातमी अशी आहे: "कारण मला [ख्रिस्ताच्या] सुवार्तेची लाज वाटत नाही; कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला — प्रथम यहूद्याला मग हेल्लेण्याला — तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे. कारण तिच्यात देवाचे नीतिमत्त्व विश्वासाने विश्वासासाठी प्रकट झालेले आहे; "नीतिमान विश्वासाने जगेल" ह्या शास्त्रलेखाप्रमाणे हे आहे"* (रोमकरांसपत्र १:१६-१७). *"पण जो काम करत नाही तर अभक्ताला नीतिमान ठरवणाऱ्यावर विश्वास ठेवतो त्याचा विश्वास नीतिमत्त्व असा गणण्यात येतो"* (रोम ४:५). देवाने आपल्याला इतर गोष्टीवर तंतोतंत विश्वास ठेवण्यासाठी बोलावले नाही, परंतु त्याच्यावर एक आत्मविश्वास, भरवसा आणि अवलंबून असलेला विश्वास यासाठी बोलावले आहे.

देव तुमच्यावर पूर्वीपेक्षा अजुन जास्त प्रेम करू शकत नाही जेवढ जास्त तो अगोदरच तुमच्यावर करतो. तो प्रीति आहे (पहिले योहान ४:८). परंतु हो, तुम्ही ते अधिक प्राप्त करू शकता, ते अधिक जाणवू शकता आणि अधिक अनुभवू शकता. जितका तुम्ही ह्यावर विश्वास कराल तितके तुम्ही स्वतःला देवावर प्रेम करू लागले असे अनुभवाल. पवित्र शास्त्र सांगते, "पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली, म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो." (१ योहान ४:१९). या गोष्टींचा विचार करा, त्यावर विश्वास ठेवा आणि ते प्राप्त करा!

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. रोमकरांस पत्र ८:३८-३९. प्रेषित पौलाला कशाची खात्री पटली?

**रोमकरांस पत्र ८:३८-३९ -** *कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले, [३९] उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही.*

२. मी जेव्हा बायबल कॉलेजमध्ये होतो तेव्हा आमचे एक प्राध्यापक होते ज्यांनी काही नोट्स पाठवल्या होत्या ज्यात असे म्हटले होते की: "निर्दोषता ही न्यायिक कृती आहे ज्याद्वारे देव जो कोणी विश्वास ठेवतो त्याला नीतिमान घोषित करतो, नीतिमान बनवत नाही." नंतर मी स्वतः या शास्त्रवचनांचा अभ्यास करत असताना, मला खात्री पटली की निर्दोषता ही नीतिमत्वते पासून मिळालेली देणगी आहे जी तुम्हाला देवाच्या दृष्टीने नीतिमान बनवते. रोमकरांस पत्र ५:१९ वाचा. येशू ख्रिस्ताच्या आज्ञापालनाद्वारे (नियम पाळणे आणि वधस्तंभावर जाणे) पुष्कळ लोक:

अ. नीतिमान घोषित केल्या जाईल

ब. विचारकेल्या जाईल नीतिमान असल्याचा

क. नीतिमान ठरतील

**रोमकरांस पत्र ५:१९ -** *कारण जसे त्या एकाच मनुष्याच्या आज्ञाभंगाने पुष्कळ जण पापी ठरले होते, तसे ह्या एकाच मनुष्याच्या आज्ञापालनाने पुष्कळ जण नीतिमान ठरतील.*

३. वाचा. २ करिंथकरास पत्र ५:२१. ज्याला [येशूला] पाप ठाऊक नव्हते [त्याने कधीही पाप केले नाही] त्याला त्याने [परमेश्वराने] तुमच्या-आमच्या करता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण देवाचे ___________ (कंस माझे)

**२ करिंथकरास पत्र ५:२१ -** *ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या-आमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे.*

४. वाचा. कलसै १:२१-२२ – येशू ख्रिस्त पृथ्वीवर आला आणि आपल्या पापांसाठी मरण पावला. यामुळे, आपण देवाच्या उपस्थितीत पवित्र, निर्दोष आणि निष्पाप लोक म्हणून उभे आहोत:

अ. आपल्या जोडीदाराच्या दृष्टीने

ब. आपल्या मित्रांच्या दृष्टीने

क. देवाची दृष्टीने

**कलसै१:२१-२२ -** *जे तुम्ही पूर्वी परके व दुष्कर्मे करत मनाने वैरी झाला होता,[२२] त्या तुमचा आता त्याने स्वतःच्या रक्तमांसाच्या देहात मरणाच्या द्वारे समेट केला आहे, ह्यासाठी की त्याने तुम्हांला पवित्र, निष्कलंक व निर्दोष असे आपणासमोर उभे करावे.*

५. वाचा इफिसकरांसपत्र १:६. देवाच्या कृपेसाठी आपण अनंतकाळपर्यंत त्याची स्तुती करू कारण त्याने आपल्याला _____ आहे.

**इफिसकरांसपत्र १:६ -** *त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.*

६. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४ येशू आणि त्याच्या वधस्तंभावरील बलिदानाद्वारे, आपण किती काळासाठी परिपूर्ण झालो आहोत?

अ. तुम्ही पुन्हा पाप करत नाही तोपर्यंत

ब. तुम्ही चर्चमध्ये जाईपर्यंत

क. कायमचे

**इब्रीकरांस पत्र १०:१४-१७ -** *कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे. [१५] पवित्र आत्माही आपल्याला साक्ष देतो, कारण हे म्हटल्यावर, [१६] परमेश्वर म्हणतो, "त्या दिवसांनंतर जो करार मी त्यांच्याबरोबर करीन तो हा : मी आपले नियम त्यांच्या मनात घालीन, आणि ते त्यांच्या हृदयपटांवर लिहीन. [१७] आणि "त्यांची पापे व त्यांचे स्वैराचार मी ह्यापुढे आठवणारच नाही."*

७. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१५-१७. नविन करारामध्ये देवाने आपल्याला अभिवचन दिले आहे की, तो आपली पापे आठवणार:

अ. जेव्हा कधी आपण एखाद पाप करू

ब. जेव्हा आपण आपला दशमांश दिला नाही

क. कधीच नाही

८. वाचा. रोमकरांस पत्र ६:१-२. देवाची कृपा आपल्या सर्व पापांपेक्षा मोठी आहे. देवाची कृपा महान असल्याचे दर्शविण्यासाठी आपण पाप करत राहावे का?

**रोमकरांस पत्र ६:१-२ -** *तर आता आपण काय म्हणावे? कृपा वाढावी म्हणून आपण पापात राहावे काय? [२] कधीच नाही! जे आपण पापाला मेलो ते आपण ह्यापुढे त्यात कसे राहणार?*

९. वाचा. इब्रीकरांस पत्र ९:१२. येशूने आपल्यासाठी कोणत्या प्रकारची मुक्ती (आपल्या पापांच्या दंडातून मुक्ती) मिळवली?

अ. तात्पुरती मुक्ती

ब. अर्धवट मुक्ती

क. सार्वकालीक मुक्ती

**इब्रीकरांस पत्र ९:१२ -** *आणि बकरे व वासरे ह्यांचे नव्हे, तर स्वत:चे रक्त अर्पण करून एकदाच परमपवित्रस्थानात गेला, आणि त्याने सार्वकालिक मुक्ती मिळवली.*

१०. वाचा. रोमकरांस पत्र ८:३३. देवाच्या निवडलेल्यांविरुद्ध आरोप लावू शकेल अशा एखाद्याचे नाव सांगा.

**रोमकरांस पत्र ८:३३ -** *देवाच्या निवडलेल्या लोकांवर दोषारोप कोण ठेवील? देवच नीतिमान ठरवणारा आहे.*

११. वाचा. रोमकरांस पत्र ८:३४. देवाच्या लोकांना दोष देवू शकणाऱ्या (म्हणजे न्यायनिवाड्यात आणू शकणाऱ्या) व्यक्तीचे नाव सांगा.

**रोमकरांस पत्र ८:३४-३५ -** *तर दंडाज्ञा करणारा कोण? जो मेला इतकेच नाही, तर मेलेल्यांतून उठला आहे, जो देवाच्या उजवीकडे आहे आणि जो आपल्यासाठी मध्यस्थीही करत आहे तो ख्रिस्त येशू आहे. [३५] ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ती, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तलवार ही विभक्त करतील काय?*

१२. वाचा. रोमकरांस पत्र ८:३५. एखाद्या ख्रिस्तीव्यक्तीला देवाच्या प्रेमापासून वेगळे करू शकेल अशा एका व्यक्तीचे नाव सांगा.

**रोमकरांस पत्र ८:३५ -** *ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ती, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तलवार ही विभक्त करतील काय?*

१३. रोमकरांस पत्र ८:३१. या शिष्यत्वाच्या पाठाचा निष्कर्ष काय आहे?

**रोमकरांस पत्र ८:३१ -** *तर मग ह्या गोष्टीवरून आपण काय म्हणावे? देव आपल्याला अनुकूल असल्यास आपल्याला प्रतिकूल कोण?*

# उत्तरावली

१. वाचा. रोमकरांस पत्र ८:३८-३९. प्रेषित पौलाला कशाची खात्री पटली?

***त्याला खात्री होती की कोणतीही गोष्ट आपल्याला देवाच्या प्रेमापासून वेगळे करू शकत नाही – न ही जीवन किंवा मृत्यू, देवदूत किंवा आत्मे, वर्तमान किंवा भविष्य, अधिपतिची वरची शक्ती किंवा खालीअसलेली शक्ती. आपला प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आढळलेल्या देवाच्या प्रेमापासून आपल्याला काहीही वेगळे करू शकत नाही.***

२. मी जेव्हा बायबल कॉलेजमध्ये होतो तेव्हा आमचे एक प्राध्यापक होते ज्यांनी काही नोट्स पाठवल्या होत्या ज्यात असे म्हटले होते की: "निर्दोषता ही न्यायिक कृती आहे ज्याद्वारे देव जो कोणी विश्वास ठेवतो त्याला नीतिमान घोषित करतो, नीतिमान बनवत नाही." नंतर मी स्वतः या शास्त्रवचनांचा अभ्यास करत असताना, मला खात्री पटली की निर्दोषता ही नीतिमत्वते पासून मिळालेली देणगी आहे जी तुम्हाला देवाच्या दृष्टीने नीतिमान बनवते. रोमकरांस पत्र ५:१९ वाचा. येशू ख्रिस्ताच्या आज्ञापालनाद्वारे (नियम पाळणे आणि वधस्तंभावर जाणे) पुष्कळ लोक:

***क. नीतिमान ठरतील***

३. वाचा. २ करिंथकरास पत्र ५:२१. ज्याला [येशूला] पाप ठाऊक नव्हते [त्याने कधीही पाप केले नाही] त्याला त्याने [परमेश्वराने] तुमच्या-आमच्या करता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण देवाचे __________ (कंस माझे).

***ख्रिस्ता मध्ये नीतिमत्व असे व्हावे***

४. वाचा. कलसै १:२१-२२ – येशू ख्रिस्त पृथ्वीवर आला आणि आपल्या पापांसाठी मरण पावला. यामुळे, आपण देवाच्या उपस्थितीत पवित्र, निर्दोष आणि निष्पाप लोक म्हणून उभे आहोत:

***क. देवाची दृष्टीने***

५. वाचा इफिसकरांसपत्र १:६. देवाच्या कृपेसाठी आपण अनंतकाळपर्यंत त्याची स्तुती करू कारण त्याने आपल्याला _____ आहे.

***त्याच्या पुत्रामध्ये (म्हणजे ख्रिस्त) स्वीकारले आहे***

६. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१४ येशू आणि त्याच्या वधस्तंभावरील बलिदानाद्वारे, आपण किती काळासाठी परिपूर्ण झालो आहोत?

***क. कायमचे***

७. वाचा. इब्रीकरांस पत्र १०:१५-१७. नविन करारामध्ये देवाने आपल्याला अभिवचन दिले आहे की, तो आपले पापे आठवणार:

***क. कधीच नाही***

८. वाचा. रोमकरांस पत्र ६:१-२. देवाची कृपा आपल्या सर्व पापांपेक्षा मोठी आहे. देवाची कृपा महान असल्याचे दर्शविण्यासाठी आपण पाप करत राहावे का?

***कधीच नाही!***

९. वाचा. इब्रीकरांस पत्र ९:१२. येशूने आपल्यासाठी कोणत्या प्रकारची मुक्ती (आपल्या पापांच्या दंडातून मुक्ती) मिळवली?

***क. सार्वकालीक मुक्ती***

१०. वाचा. रोमकरांस पत्र ८:३३. देवाच्या निवडलेल्यांविरुद्ध आरोप लावू शकेल अशा एखाद्याचे नाव सांगा.

***एकही नाही***

११. वाचा. रोमकरांस पत्र ८:३४. देवाच्या लोकांना दोष देवू शकणाऱ्या (म्हणजे न्यायनिवाड्यात आणू शकणाऱ्या) व्यक्तीचे नाव सांगा.

***एकही नाही***

१२. वाचा. रोमकरांस पत्र ८:३५. एखाद्या ख्रिस्तीव्यक्तीला देवाच्या प्रेमापासून वेगळे करू शकेल अशा एका व्यक्तीचे नाव सांगा.

***एकही नाही***

१३. रोमकरांस पत्र ८:३१. या शिष्यत्वाच्या पाठाचा निष्कर्ष काय आहे?

***म्हणजे देव आपल्यासाठी आपल्या बाजूने आहे आणि कोणीच आपल्या विरुद्ध येऊ शकत नाही***

# पाठ १२

# तारणाचे फळ – भाग १

*डॉन क्रो द्वारा लिखित*

विश्वासाची एक - वेळची कृती पुढे चालू ठेवली नाही तर ती आपला "बचाव" करू शकते का? तो विश्वास अनियमित झाला तर तरीही अभिवचन प्राप्त होऊ शकत का? अब्राहामने देवावर विश्वास ठेवला आणि तो त्याच्यासाठी नीतिमत्व म्हणून गणला गेला (उत्पत्ति १५:६). जर अब्राहामाचा विश्वास अनियमित झाला (थांबला), तर त्याला गणन्यात आलेली नीतिमत्वता थांबेल का?

पवित्र शास्त्रातून, आपल्याला माहित आहे की "विश्वास" ही संपूर्ण एक-वेळची क्रिया *(एओरिस्ट काळ)* म्हणून सुरू होते परंतु ग्रीक *वर्तमानकाळाद्वारे* पुढे आणल्याप्रमाणे ख्रिस्ती जीवनात चालू राहते. ज्या आज्ञा वर्तमानकाळात दिलेल्या आहेत त्याची सतत किंवा पुनरावृत्ती करणे अपेक्षित आहेत. वर्तमान काळ वापरून जर आपण बायबल वाचकांना खालील शब्द किंवा वाक्यांश देऊ तर आम्ही बायबलच्या परिच्छेदांबद्दल त्याची किंवा तिची समज लक्षणीयरीत्या वाढवू. हे शब्द आहेत: ***वारंवार; म्हणजे, सतत, सारख, नेहमीप्रमाणे, सवय किंवा जीवनशैली म्हणून किंवा अखंडपणे.***

खालील परिच्छेद बघा आणि ग्रीक वर्तमानकाळाचा त्यांच्यावर कसा परिणाम होतो ते विचारात घ्या:

**योहान ३:१६ - देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास** [वर्त्तमान काळ: विश्वास करतो आणि विश्वास करणे चालू ठेवतो] **ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.** (कंस माझे)

**इब्रीकरांस पत्र १०:१४ - कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.** [*वर्त्तमान काळ: जे वेगळे केले जातात आणि नेहमी वेगळे केले जातात, त्या एका अर्पणाने कायमचे परिपूर्ण केले आहे.* न्यू किंग जेम्स आवृत्ती मध्ये

*"पवित्र होत आहे"* सांगते. न्यू इंटरनेशनल आवृत्ती सांगते *"पवित्र केले जात आहे"*]. (कंस आणि जोर माझे)

**१ योहान ३:९ - जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही;** *[वर्त्तमान काळ: म्हणजे, तो पश्चात्ताप करणारे अंतःकरण दाखवून आपली जीवनशैली म्हणून पाप करत नाही]* **कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते;** *[वर्तमान: देवाचे बीज राहते आणि नेहमीसाठी राहते]* **आणि त्याच्याने** *[वर्तमान काळ: त्याची जीवनशैली म्हणून किंवा अखंडपणे]* **पाप करवत नाही, कारण तो देवापासून जन्मला आहे.** (कंस माझे)

**मार्क १:१५ - काळाची पूर्णता झाली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे; पश्चात्ताप करा** *[वर्तमान काळ: म्हणजे, पश्चात्ताप करा आणि परिस्थिती किंवा गरज निर्माण झाल्यावर पश्चात्ताप करणे सुरू ठेवा],* **आणि विश्वास ठेवा** *[वर्तमान काळ: म्हणजे,विश्वास ठेवा आणि चालू ठेवा विश्वास करणे]* **सुवार्तेवर.** (कंस माझे)

**योहान ५:२४ - मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्याच्यावर विश्वास ठेवतो** *[वर्तमान काळ: आणि विश्वास ठेवणे चालू ठेवतो]* **त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे.** (कंस माझे)

**लुक १५:७ - त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या** *[वर्तमान काळ: आणि पश्चाताप करणे चालु ठेवतो]* **एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो.** (कंस माझे)

**प्रेषितांची कृत्ये १७:३० - अज्ञानाच्या काळांकडे देवाने डोळेझाक केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा** *[वर्त्तमान काळ: आणि पश्चात्ताप करणे चालू ठेवावे]* **अशी तो माणसांना आज्ञा** *[वर्तमान काळ: आणि आज्ञा करत राहतो]* **करतो.** (कंस माझे)

**योहान ६:४७ - मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, जो माझ्यावर विश्वास ठेवतो** *[वर्त्तमान काळ: आणि विश्वास ठेवणे चालू ठेवतो]* **त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे.** (कंस माझे)

**रोमकरांस पत्र ४:५ - पण जो काम करत नाही तर अभक्ताला नीतिमान ठरवणार्‍यावर विश्वास ठेवतो** *[वर्त्तमान काळ: आणि विश्वास ठेवने चालू ठेवतो]* **त्याचा विश्वास नीतिमत्त्व असा गणण्यात येतो.** (कंस माझे)

**प्रेषितांची कृत्ये २६:२० - तर पहिल्याने दिमिष्कातील लोकांना व यरुशलेमेत, अवघ्या यहूदीया देशात व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करत आलो की, पश्‍चात्ताप करा** *[वर्त्तमान काळ; आणि पश्चाताप करणे चालू ठेवा]* **आणि पश्‍चात्तापास शोभतील अशी कृत्ये [वर्त्तमान काळ: आणि कामे किंवा कृत्ये करणे चालू ठेवा जे तुमचा पश्चाताप सिद्ध करतात] करून देवाकडे वळा** *[वर्त्तमान काळ: आणि वळणे चालु ठेवा]* (कंस माझे)

**निष्कर्ष:** वर्तमान काळ हा शास्त्रात शेकडो वेळा वापरल्या गेला आहे. या विषयाशी संबंधित सर्व शास्त्र वचने दाखवण्याचा माझा हेतू नाही. विश्वासाद्वारे तारणाबद्दलचे सत्य हे आहे की ते निरंतरचे आहे आणि हे आर्मिनिवाद आणि कॅल्व्हिनिवाद दोन्ही धर्मशास्त्राद्वारे शिकवले जाते, जरी ते वेगवेगळ्या दृष्टीकोनातून आलेले आहेत.

केल्विनवाद, जो शाश्वत सुरक्षिततेचा दावा करतो, असे शिकवतो की खरे विश्वासणारे अडखळू शकतात किंवा पडू शकतात, परंतु तरीही ते ख्रिस्ती विश्वासात टिकून राहतील (पहिले करिंथ ११:८). जे शाश्वत सुरक्षेवर विश्वास ठेवतात त्यांचा असाही विश्वास आहे की खऱ्या ख्रिस्ती लोकांनी पापासाठी मरण अनुभवले आहे आणि ते पापात राहणे पुढे चालू ठेवणार नाहीत (रोम ६:१-३). जे नंतर ख्रिस्तापासून पूर्णपणे दूर होतील ते दाखवतात की त्यांचा खरोखरचं नविन जन्म झालेला नव्हता (पहिले योहान २:१९).

आर्मीनियन धर्मशास्त्र शिकवते की खरे विश्वासणारे ख्रिस्ती विश्वासामध्ये पडू शकतात. ते सामान्यतः विश्वास ठेवतात आणि हे असे शिकवतात की जे विश्वासामध्ये दूर जातात ते त्यांचे तारण गमावतात किंवा हरवून बसतात. त्यांची ही व्यवस्था तथाकथित ख्रिस्तीलोकांना (केवळ नावानेच असलेले) सतत बंडखोरी किंवा मुद्दाम केलेल्या पापात राहण्यासाठी मुभा देत नाही, ज्यामुळे त्यांचा पश्चात्ताप सिद्ध होईल असे कोणतेही फळ न दिसल्याने.

प्रेषित योहान म्हणाला, *"आपल्या ठायी पाप नाही असे जर आपण म्हणत असलो, तर आपण स्वतःला फसवतो, व आपल्या ठायी सत्य नाही"* (पहिले योहान १:८), पण तो असेही म्हणाला, *"जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही"* (पहिले योहान ३:९). येथे आपल्यासाठी विरोधाभास आहे, परंतु शास्त्रामध्ये विसंगती नाही. सर्व ख्रिस्ती पाप करतात (पहिले योहान १:८), परंतु सर्व ख्रिस्ती आज्ञा देखील पाळतात (पहिले

योहान २:३). पाप आणि दैहिकता अजूनही ख्रिस्तीलोकांमध्ये आहेत, परंतु पाप हे त्यांचे स्वामीत्व किंवा वेगळे गुणधर्म असू शकत नाहीत (पहिले योहान ३:९). खरा पश्चात्ताप आणि विश्वास यासाठी मानसिक परिवर्तन, हृदय परिवर्तन, दिशा परिवर्तन आवश्यक आहे, जरी ते परिपूर्ण नसले तरी (प्रेषित २६:१८ आणि पहिले योहान १:८). "फळ" हे अजूनही विश्वासाची वास्तविकता आणि प्रामाणिकपणाची एक चाचणी असे आहे. विश्वास ही एक दृढ अलौकिक खात्री आहे जी खऱ्या विश्वासणा-यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवते आणि त्यांच्या सोबतच्या कृतींवर परिणाम दाखवते. हे इब्रीकरांस पत्र मधील विश्वासाच्या उदाहरणांवरून दिसून येते, अध्याय ११, ज्याचा परिणाम संबंधित कृतींमध्ये होतो. दुसऱ्या शब्दांत, आपण जे करतो ते आपण ज्यावर विश्वास ठेवतो त्याचा परिणाम असतो. याकोब २:१८ सांगत, *"क्रियांवाचून तू आपला विश्वास मला दाखव, आणि मी आपला विश्वास माझ्या क्रियांनी तुला दाखवीन."*

जेव्हा प्रेषित कार्याबद्दल नकारात्मक पद्धतीने बोलतात, तेव्हा ते "नियमशास्त्राच्या कार्यांचा" संदर्भ घेतात; म्हणजे, कोणीही हे काही कमवून किंवा काम करून त्यांचे तारण मिळवण्यासाठी करत आहे.

पवित्र शास्त्र तारणाच्या फळाविषयी देखील बोलते, जी चांगली कामे किंवा विश्वासाची कामे आहेत. ती कृत्ये किंवा कामे आहेत जी पश्चात्ताप आणि विश्वासाद्वारे कृतीत येतात (प्रेषितांची कृत्ये २६:२०, मत्तय ३:७-१०,१ थेस १:३, आणि याकोब २:१४-२६), ते तारणाचा पुरावा दर्शवतात. पश्चात्ताप आणि विश्वास या दोघांमध्ये व्यक्त होणारे ऐक्य असे आहे की त्या दोघांना एकच फळ किंवा पुरावा आहे: चांगली कामे. आपण चांगल्या कृतींद्वारे तारले जात नाही, परंतु आपण चांगल्या कामांसाठी तारले गेले जातो (इफिस २:८-१० द्वारे आणि साठी तारले गेलो ह्या फरक ओळखण्यासाठी). कार्ये ही विश्वासाच्या वास्तविकतेची चाचणी आहे आणि कृपा ज्याचा परिणाम शेवटी एखाद्याच्या जीवनावर आणि कृतींवर होत नाही ही देवाची खरी कृपा मानली जाऊ शकत नाही (तीत २:११-१२). येशू शिकवतो की फळाद्वारे, खरे विश्वासणारे ओळखले जातील (मत्तय 3:८,७:१६-२०,२५:३४-४०; योहान १३:३५,१४:२३; प्रेषितांची कृत्ये २६:२०; रोम २:६-११; याकोब २:१४-१८; आणि १ योहान ३:१०).

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. आज्ञा ज्या वर्त्तमान काळामध्ये दिलेल्या आहेत त्या ________ अपेक्षित आहे.

२. वाचा. योहान ३:१६. ग्रीक वर्त्तमान काळानुसार,योहान ३:१६ काय सांगते?

**योहान ३:१६ -** *देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.*

३. वाचा. पहिले योहान ३:९. जो कोणी देवापासुन जन्मला आहे तो पाप करत नाही.याचा अर्थ काय?

**पहिले योहान ३:९ -** *जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही; कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते; त्याच्याने पाप करवत नाही, कारण तो देवापासून जन्मलेला आहे.*

४. वाचा. लुक १५:७ एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होतो जो__________.

**लूक १५:७ -** *त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो.*

५. वाचा प्रेषितांची कृत्ये १७:३० देव सर्वांनी सर्वत्र _______________ करावा अशी आज्ञा देतो.

**प्रेषितांची कृत्ये १७:३० -** *अज्ञानाच्या काळांकडे देवाने डोळेझाक केली, परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चात्ताप करावा अशी तो माणसांना आज्ञा करतो.*

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:२०. हे वचन काय सांगत आहे?

**प्रेषितांची कृत्ये २६:२० -** *तर पहिल्याने दिमिष्कातील लोकांना व यरुशलेमेत, अवघ्या यहूदीया देशात व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करत आलो की, पश्चात्ताप करा आणि पश्चात्तापास शोभतील अशी कृत्ये करून देवाकडे वळा.*

७. वाचा. पहिले योहान २:३. देवासोबत वैयक्तिक नातेसंबंध असल्याचा, म्हणजेच त्याला ओळखल्याचा परिणाम काय होतो?

**पहिले योहान २:३ -** *आपण त्याच्या आज्ञा पाळल्या तर त्यावरून आपणांस कळून येते की, आपण त्याला ओळखतो.*

८. वाचा. याकोब २:१८. याकोब म्हणतो, " तू आपला विश्वास क्रियांवाचून (जे करणे अशक्य आहे) मला दाखव, आणि मी आपला विश्वास ________________ तुला दाखवीन.

**याकोब २:१८ -** *कोणी म्हणेल, "तुझ्या ठायी विश्वास आहे, आणि मला क्रिया आहेत." क्रियांवाचून तू आपला विश्वास मला दाखव, आणि मी आपला विश्वास माझ्या क्रियांनी तुला दाखवीन.*

९. वाचा. पहिले थेस्सलनीकाकरांस पत्र १:३. विश्वासाद्वारे पुढे केलेल्या कार्यांना किंवा कृतींना _____ असे संबोधले जाते.

**पहिले थेस्सलनीकाकरांस पत्र १:३ -** *आपल्या देवपित्यासमोर तुमचे विश्वासाने केलेले काम, प्रीतीने केलेले श्रम, व आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावरच्या आशेमुळे धरलेला धीर ह्यांचे आम्ही निरंतर स्मरण करतो.*

१०. वाचा. गलतीकरांस पत्र २:१६, २१. नियमांची कार्ये ही अशी कामे आहेत जी लोक तारण किंवा __________ मिळविण्याच्या प्रयत्नात करतात (वचन २१). ते तारण देऊ शकत नाहीत, त्यांच्याकडे तारण करण्याची शक्ती नाही.

**गलतीकरांस पत्र २:१६ -** *तरी मनुष्य नियमशास्त्रातील कृत्यांनी नीतिमान ठरत नाही, तर येशू ख्रिस्तावरील विश्वासाच्या द्वारे ठरतो, हे जाणून आम्हीही ख्रिस्त येशूवर विश्वास ठेवला; ह्यासाठी की, आम्ही ख्रिस्तावरील विश्वासाने नीतिमान ठरावे, नियमशास्त्रातील कृत्यांनी नव्हे; कारण नियमशास्त्रातील कृत्यांनी 'मनुष्यजातीपैकी कोणीही नीतिमान ठरणार नाही.'*

***गलतीकरांस पत्र २:२१ -*** *मी देवाची कृपा व्यर्थ करत नाही, कारण जर नीतिमत्त्व नियमशास्त्राच्या द्वारे असले तर ख्रिस्ताचे मरण विनाकारण झाले.*

११. वाचा रोमकरांस पत्र २:७-१०. हे वचने कोणत्या दोन गटांच्या लोकांच्या फळाचे वर्णन करतात?

**रोमकरांस पत्र २:७-१० -** *म्हणजे जे कोणी धीराने सत्कर्मे करत राहून गौरव, सन्मान व अक्षयता ही मिळवण्याचा प्रयत्न करतात, त्यांना तो सार्वकालिक जीवन देईलच; [८] परंतु जे तट पाडणारे आहेत व सत्याला न मानता अनीतीला मानतात त्यांच्यावर क्रोध व कोप, संकट व क्लेश येतील. [९ ] म्हणजे दुष्कृत्य करणारा मनुष्य, प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी अशा प्रत्येकाच्या जिवावर ती येतील; [१०] पण सत्कृत्य करणारा प्रत्येक, प्रथम यहूदी आणि मग हेल्लेणी, ह्यांना गौरव, सन्मान व शांती ही मिळतील.*

# उत्तरावली

१. आज्ञा ज्या वर्त्तमान काळामध्ये दिलेल्या आहेत त्या __________ अपेक्षित आहे.

***चालु ठेवण्याच्या, किंवा पुन्हा करत राहण्याच्या, वापर करण्याच्या***

२. वाचा. योहान ३:१६. ग्रीक वर्त्तमान काळानुसार,योहान ३:१६ काय सांगते?

***देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो (वर्तमान काळ: विश्वास ठेवतो आणि विश्वास ठेवणे चालू ठेवतो) त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.***

३. वाचा. पहिले योहान ३:९. जो कोणी देवापासुन जन्मला आहे तो पाप करत नाही.याचा अर्थ काय?

***जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही; कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते; त्याच्याने पाप करवत नाही (वर्त्तमान काळ: म्हणजे तो त्याच्या जीवनशैलीमध्ये पाप करणे चालू ठेवत नाही, पश्चाताप न झालेले दर्शवत) , कारण तो देवापासून जन्मलेला आहे.***

४. वाचा. लूक १५:७ एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होतो जो __________.

***पश्चाताप करतो***

५. वाचा प्रेषितांची कृत्ये १७:३० देव सर्वांनी सर्वत्र __________ करावा अशी आज्ञा देतो.

***पश्चाताप करावा आणि पश्चाताप करणे चालू ठेवावे***

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:२०. हे वचन काय सांगत आहे?

***तर पहिल्याने दिमिष्कातील लोकांना व यरुशलेमेत, अवघ्या यहूदीया देशात व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करत आलो की, पश्चात्ताप करा (वर्त्तमान काळ: आणि पश्चाताप करणे चालु ठेवा) आणि पश्चात्तापास शोभतील अशी कृत्ये करून (वर्त्तमान काळ: आणि तुमचे काम आणि कृत्ये चालु ठेवा जे पश्चाताप दर्शवतात) देवाकडे वळा (वर्त्तमान काळ: आणि वळने चालू ठेवा).***

७. वाचा. पहिले योहान २:३. देवासोबत वैयक्तिक नातेसंबंध असल्याचा, म्हणजेच त्याला ओळखल्याचा परिणाम काय होतो?

***तो सांगतो ते आपण करतो, त्याच्या आज्ञाचे पालन करत***

८. वाचा. याकोब २:१८. याकोब म्हणतो, " तू आपला विश्वास क्रियांवाचून(जे करणे अशक्य आहे) मला दाखव, आणि मी आपला विश्वास _______________ तुला दाखवीन.

***क्रियांनी, किंवा जे मी करतो त्याद्वारे***

९. वाचा. पहिले थेस्सलनीकाकरांस पत्र १:३. विश्वासाद्वारे पुढे केलेल्या कार्यांना किंवा कृतींना _____ असे संबोधले जाते.

***विश्वासाचे कार्ये***

१०. वाचा. गलतीकरांस पत्र २:१६, २१. नियमांची कार्ये ही अशी कामे आहेत जी लोक तारण किंवा ___________ मिळविण्याच्या प्रयत्नात करतात (वचन २१). ते तारण देऊ शकत नाहीत, त्यांच्याकडे तारण करण्याची शक्ती नाही.

***नीतिमत्वता***

११. वाचा रोमकरांस पत्र २:७-१०. हे वचने कोणत्या दोन गटांच्या लोकांच्या फळाचे वर्णन करतात?

***विश्वासणारे आणि अविश्वासणारे***

# पाठ १३

# तारणाचे फळ – भाग २

*डॉन क्रो द्वारा लिखित*

या शास्त्रवचनाकडे लक्ष द्या: *"ह्यावरून देवाची मुले व सैतानाची मुले उघड दिसून येतात. जो कोणी नीतीने वागत नाही तो देवाचा नाही, व जो आपल्या बंधूवर प्रीती करत नाही तोही नाही."* (पहिले योहान ३:१०) त्यात असे म्हटले नाही की, "अशा प्रकारे आपण स्वतःला तारतो." ते सांगत, *"ह्यावरून आपण* ***समजतो की कोण*** *देवाचे मुले आहेत"* (पहिले योहान ३:१०, विशेष जोर माझे).

येशू असे म्हणाला, *"ह्यास्तव तुम्ही त्यांच्या फळांवरून* ***त्यांना ओळखाल"*** (मत्तय ७:२०, विशेष जोर माझे).

पवित्र शास्त्रात, देव दोन प्रकारे तारणाविषयी बोलतो: (१) की तारण कृपेने विश्वासाद्वारे होते (इफिस २:८-९) आणि (२) प्रत्येक तारलेल्या व्यक्तीने केलेल्या चांगल्या कृत्यांच्या संदर्भाने (इफिस २:१०). विश्वासणा-यांच्या फळाबद्दल बोलण्यास आपण का घाबरतो? पवित्र शास्त्र अशा विषयापासून दूर जात नाही. आपण देवाच्या राज्यात आणि देवाच्या सत्तेखाली आहोत हे ***आपण कसे ओळखू शकतो*** ते येथे आहे:

**पहिले योहान २:३-५ - आपण त्याच्या आज्ञा पाळल्या तर** *त्यावरून आपणांस कळून येते* **की, आपण त्याला ओळखतो. " मी त्याला ओळखतो" असे म्हणून त्याच्या आज्ञा जो पाळत नाही तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही. जो कोणी त्याच्या वचनाप्रमाणे चालतो, त्याच्यामध्ये देवाची प्रीती खरोखर पूर्णत्व पावली आहे.** *ह्यावरून आपल्याला कळून येते की,* **आपण त्याच्या ठायी आहोत.** (विशेष जोर माझे).

जर **तुम्हाला माहित असेल** की तो नीतिमान आहे, तर **तुम्हाला माहीत आहे** की जो कोणी योग्य ते करतो तो त्याच्यापासून जन्मला आला आहे (पहिले योहान २:२९). (याला अर्थ नाही का? देव आणि ख्रिस्ताचे स्वभाव नीतिमत्वता आहे आणि जो कोणी

नीतिमत्वतेचे आचरण करतो तो प्रत्येकजण त्याच्या स्वभावात देवासोबर सामायिक असल्याचा पुरावा देत आहे किंवा जसे योहान म्हणतो, त्याच्यापासून जन्म झाला आहे).

**पहिले योहान ३:५-१० - तुम्हांला माहीत आहे की, आपली पापे हरण करण्यासाठी तो प्रकट झाला; त्याच्या ठायी पाप नाही. जो कोणी त्याच्या ठायी राहतो तो पाप करत नाही.** *[ग्रीक भाषेमध्ये, हे वर्तमान काळामध्ये दिले आहे; हे चालू क्रिया, किंवा नियमितता, कार्य सांगते. पवित्र शास्त्र वाचक शब्दांचा पुरवठा करून उताऱ्याबद्दलची त्यांची समज लक्षणीयरीत्या वाढवू शकतात: सतत, वारंवार, पुन्हा पुन्हा, अखंडपणे, सतत, चालू ठेवा, प्रथेनुसार, सवयीने, जीवनशैली म्हणून.]* **जो कोणी पाप** [वर्त्तमान काळ] **करतो त्याने त्याला पाहिले नाही व त्याला ओळखलेही नाही. मुलांनो, कोणी तुम्हांला बहकवू नये; जसा तो नीतिमान आहे तसा नीतीने चालणाराही** *[वर्त्तमान काळ: पुन्हा-पुन्हा, सतत करतो]* **नीतिमान आहे. पाप करणारा** *[वर्त्तमान काळ: सवयीप्रमाणे जशी त्यांची स्वभावत: जीवनशैली]* **सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला. जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही** *[वर्त्तमान काळ: म्हणजे, त्यांची जीवन शैली म्हणुन, पश्चाताप न झाले हृदय दर्शवून];* **कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते; त्याच्याने पाप करवत नाही** *[वर्त्तमान काळ: अखंडपणे],* **कारण तो देवापासून जन्मलेला आहे. ह्यावरून देवाची मुले व सैतानाची मुले उघड दिसून येतात. जो कोणी नीतीने वागत नाही** *[वर्त्तमान काळ]* **तो देवाचा नाही, व जो आपल्या बंधूवर प्रीती करत नाही** *[वर्त्तमान काळ]* **तोही नाही** (कंस आणि विशेष जोर माझे). *(योहान म्हणतो, "ह्यावरून देवाची मुले व सैतानाची मुले उघड दिसून येतात." जे नीतिमत्वता आणि प्रेम यांना रोजच्या जीवनात उपयोगात आणत नाहीत ते दाखवतात की त्यांच्यात देव पित्याचा स्वभाव नाही. नवीन जन्माचा पुरावा आवश्यक नाही का?)*

**पहिले योहान ३:१४ - आपण बंधुजनांवर प्रीति करतो ह्यावरून** *आपल्याला कळून येते की, आपण* **मरणातून निघून जीवनात** *आलो आहोत. जो प्रीति करत नाही तो मरणात राहतो.* [विशेष ज़ोर माझे]

**पहिले योहान ४:६ - आपण देवाचे आहोत; जो देवाला ओळखतो तो आपले ऐकतो** *[प्रेषीतांचे];* **जो देवाचा नाही तो आपले** *[प्रेषीतांचे]* **ऐकत नाही.** *ह्यावरून* **सत्याचा आत्मा** [किंवा आत्मा] **कोणता व भ्रांतीचा आत्मा कोणता हे आपण ओळखतो.** (कंस आणि विशेष जोर माझे)

**पहिले योहान ४:८ - जो प्रीति करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीति आहे.** *(प्रीति हे विश्वासणा-यांचे चिन्ह आहे, कारण देवाचा स्वभावच प्रेम आहे.)*

**पहिले योहान ५ :२ - आपण देवावर प्रीति करतो** *[वर्त्तमान काळ: आणि त्यावर प्रीति करणे चालु ठेवत]* **व त्याच्या आज्ञा पाळतो** *[वर्त्तमान काळ: आणि पाळने चालू ठेवतो]* **तेव्हा त्यावरून आपल्याला कळून येते की, आपण देवाच्या मुलांवर प्रीती करतो.**

**पहिले योहान ५:१८-१९ - जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही** *[वर्त्तमान काळ: जीवनशैली म्हणुन, एक पश्चाताप न झालेले हृदय दर्शवित], हे आपल्याला ठाऊक आहे;* **जो देवापासून जन्मला तो (ख्रिस्त) त्याला सुरक्षित ठेवतो** *[किंग जेम्स आवृती – त्याला स्वत:ला राखतो, वर्त्तमान काळ: आणि त्याला स्वत:ला राखूनठेवणे चालू ठेवतो]* **आणि त्या दुष्टाचा संपर्क त्याला होत नाही. आपण देवापासून आहोत हे आपल्याला ठाऊक आहे; सगळे जग त्या दुष्टाला वशं झाले आहे.** (कंस आणि विशेष जोर माझे)

**प्रेषित योहानाने या सर्व गोष्टी आपल्यासोबत का शेअर केल्या आहेत?** *देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लिहिले आहे.* आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर विश्वास ठेवीत राहावे. (पहिले योहान ५:१३).

*निष्कर्ष:* नीतिमत्वता, पवित्रता, प्रीति, देवाच्या आत्म्याचे फळ हे तुमच्या नवीन जन्माचे पुरावे आहेत. अधार्मिक जीवनशैलीचा सराव करत तुम्ही त्याचे (देवाचे) आहात यावर तुमचा स्वत:चा विश्वास बसवू शकत नाही. सदसद्विवेकबुद्धी दोष देते, आणि तेथे मग देवावर भरवसा नसतो. प्रेषित पेत्र तुम्हाला तुमच्या पाचारण आणि निवडीची खात्री करण्यासाठी सल्ला देतो (दुसरे पेत्र १:१०); म्हणजेच, गौरवशाली सुवार्तेशी सुसंगत जीवनशैलीद्वारे तुम्ही खरोखरच त्याचे आहात याची खात्री तुमच्या हृदयाला द्या. मी असे म्हटले नाही की, "असेच आमचे तारण झाले आहे"; मी म्हणालो, *"आम्ही त्याचे आहोत हे आम्हाला अश्याद्वारे कळते."*

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१३ आणि १८-२२. पहिले योहान मध्ये, योहान खऱ्या विश्वासणाऱ्यांचे “फळ” किंवा पुराव्याबद्दल बोलत आहे. हे सर्व मुद्दे हृदयातून उद्भवतात. जेव्हा एखाद्या विश्वासणाऱ्याचे हृदय योग्य नसल्याचे आढळून येते (जसे की शिमोनाचे), तेव्हा त्यांनी काय करावे?

**प्रेषितांची कृत्ये ८:१३ -** *स्वतः शिमोनानेही विश्वास धरला व बाप्तिस्मा घेऊन तो फिलिप्पाच्या सहवासात राहिला; आणि घडत असलेली चिन्हे व महापराक्रमाची कृत्ये पाहून तो थक्क झाला.*

**प्रेषितांची कृत्ये ८:१८-२२ -** *मग प्रेषितांचे हात ठेवल्याने पवित्र आत्मा मिळतो हे पाहून शिमोनाने त्यांना पैसे देऊ करून म्हटले, [१९] “ज्या कोणावर मी आपले हात ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळावा असा अधिकार मलाही द्या.” [२०] तेव्हा पेत्र त्याला म्हणाला, “तुझ्या रुप्याचा तुझ्याबरोबर नाश होवो, कारण द्रव्य देऊन देवाचे दान मिळवण्याचा तू विचार केलास. [२१] ह्या गोष्टीत तुला भाग किंवा वाटा नाही; कारण तुझे अंतःकरण देवाच्या दृष्टीने नीट नाही. [२२] तू ह्या आपल्या दुष्टतेचा पश्चात्ताप करून प्रभूजवळ विनंती कर म्हणजे तुझ्या अंतःकरणातल्या कल्पनेची तुला कदाचित क्षमा होईल.*

२. वाचा. दुसरे पेत्र १:५-११. देवाने पाचारण केलेल्या आणि निवडलेल्यांपैकी एक व्यक्ती खरोखरच तो आहे याचे प्रमाण किंवा पुरावा काय आहे?

**दुसरे पेत्र १:५-११ -** *ह्याच कारणास्तव तुम्ही होईल तितका प्रयत्न करून आपल्या विश्वासात सात्त्विकतेची, सात्त्विकतेत ज्ञानाची, [६] ज्ञानात इंद्रियदमनाची, इंद्रियदमनात धीराची, धीरात सुभक्तीची, [७] सुभक्तीत बंधुप्रेमाची व बंधुप्रेमात प्रीतीची भर घाला; [८] कारण हे गुण तुमच्यामध्ये असून ते वाढते असले तर, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या ओळखीविषयी तुम्ही निष्क्रिय व निष्फळ ठरणार नाही, असे ते तुम्हांला करतील. [९] ज्याच्या अंगी ते नाहीत तो आंधळा आहे, अदूरदृष्टीचा आहे, त्याला आपल्या पूर्वीच्या पापांपासून शुद्ध झाल्याचा विसर पडला आहे. [१०] म्हणून बंधूंनो, तुम्हांला झालेले पाचारण व तुमची निवड दृढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करा. असे तुम्ही केल्यास तुमचे पतन कधीही होणार नाही; [११] आणि अशा प्रकारे आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या सार्वकालिक राज्यात जयोत्सवाने तुमचा प्रवेश होईल.*

३. वाचा. मत्तय २५:३४-४०. या वचनामध्ये विश्वासणा–याचे कोणते गुण सांगितले आहेत?

**मत्तय २५:३४-४० -** *[३४] तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, 'अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या; [३५] कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायला दिले, तान्हेला होतो तेव्हा मला प्यायला पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, [३६] उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आलात, बंदिशाळेत होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे आलात.' [३७] त्या वेळेस नीतिमान त्याला उत्तर देतील की, 'प्रभूजी, आम्ही तुम्हांला केव्हा भुकेले पाहून खायला दिले? केव्हा तान्हेले पाहून प्यायला दिले? [३८] तुम्हांला परके पाहून केव्हा घरात घेतले? उघडे पाहून केव्हा वस्त्र दिले? [३९] आणि तुम्हांला आजारी अथवा बंदिशाळेत पाहून केव्हा आम्ही तुमच्याकडे आलो?' [४०] तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, 'मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.'*

४. वाचा. योहान १३:३५. येशूचे शिष्य कशाने ओळखले जातात?

**योहान १३:३५ -** *तुमची एकमेकांवर प्रीती असली म्हणजे त्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहात."*

५. वाचा. मत्तय ७:२१-२३. हे लोक देवाच्या राज्यापासून दूर का गेले?

**मत्तय ७:२१-२३ -** *मला 'प्रभूजी, प्रभूजी' असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल. [२२] त्या दिवशी पुष्कळ जण मला म्हणतील, 'प्रभो, प्रभो, आम्ही तुझ्या नावाने संदेश दिला, तुझ्या नावाने भुते घालवली व तुझ्या नावाने पुष्कळ महत्कृत्ये केली नाहीत काय?' [२३] तेव्हा मी त्यांना स्पष्ट सांगेन की, 'मला तुमची कधीच ओळख नव्हती; अहो अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापुढून निघून जा.'*

६. वाचा.योहान १४:२३. जर एखादा व्यक्ती येशूवर प्रीति करतो तर तो व्यक्ति काय करील?

**योहान १४:२३ -** *येशूने त्याला उत्तर दिले, "ज्याची माझ्यावर प्रीती असेल तो माझे वचन पाळील, माझा पिता त्याच्यावर प्रीती करील आणि आम्ही त्याच्याकडे येऊन त्याच्याबरोबर वस्ती करू.*

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:२०. हे वचन काय सांगत आहे?

**प्रेषितांची कृत्ये २६:२० -** *तर पहिल्याने दिमिष्कातील लोकांना व यरुशलेमेत, अवघ्या यहूदीया देशात व परराष्ट्रीय लोकांत मी उपदेश करत आलो की, पश्चात्ताप करा आणि पश्चात्तापास शोभतील अशी कृत्ये करून देवाकडे वळा.*

८. वाचा. याकोब २:१७. जर तुमचा विश्वास सत्कर्मे किंवा कृती करण्यात नसेल, तर तो कसा विश्वास आहे?

**याकोब २:१७ -** *ह्याप्रमाणे विश्वासाबरोबर जर क्रिया नाहीत तर तो जात्या निर्जीव आहे.*

# उत्तरावली

१. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१३ आणि १८-२२. पहिले योहान मध्ये, योहान खऱ्या विश्वासणा-यांचे "फळ" किंवा पुराव्याबद्दल बोलत आहे. हे सर्व मुद्दे हृदयातून उद्भवतात. जेव्हा एखाद्या विश्वासणा-याचे हृदय योग्य नसल्याचे आढळून येते (जसे की शिमोनाचे), तेव्हा त्यांनी काय करावे?

***तुमच्या पापाचा (दुष्टपणाचा) पश्चात्ताप करा आणि तुमच्या अंतःकरणातील विचारांची क्षमा व्हावी म्हणून देवाला प्रार्थना करा***

२. वाचा. दुसरे पेत्र १:५-११. देवाने पाचारण केलेल्या आणि निवडलेल्यांपैकी एक व्यक्ती खरोखरच तो आहे याचा प्रमाण किंवा पुरावा काय आहे?

***ते त्यांच्या विश्वासात आत्म्याचे सर्व गुण व त्यांच्या नवीन स्वभावाचे गुण दर्शवतात***

३. वाचा. मत्तय २५:३४-४०. या वचनामध्ये विश्वासणा–याचे कोणते गुण सांगितले आहेत?

***विश्वासणा–यांकडून होणारी व्यावहारिक कामे - जसे भुकेल्यांना अन्न देणे, इतरांचा आदरातिथ्य करणे, निराधारांना कपडे देणे, आजारी व्यक्तींची काळजी घेणे, तुरुंगात असलेल्यांपर्यंत पोहोचणे इत्यादी***

४. वाचा. योहान १३:३५. येशूचे शिष्य कशाने ओळखले जातात?

***प्रीती जी ते एकमेकांबद्धल दर्शवतात***

५. वाचा. मत्तय ७:२१-२३. हे लोक देवाच्या राज्यापासून दूर का गेले?

***ते लोक़ अधर्माचे काम करणारे होते. ग्रीक भाषेमध्ये येथे, वर्तमान काळ वापरला जातो, जो सूचित करतो की अधर्म ही त्यांची जीवनशैली, त्यांचा स्वभाव होता. येशू म्हणाला की तो त्यांना कधीच ओळखत नाही. ते हरवलेले धार्मिक लोक होते ज्यांचे हृदय कधीच बदलले नव्हते, मनाचा बदल ज्याने ते देवाकडे वळले असते.***

६. वाचा.योहान १४:२३. जर एखादा व्यक्ती येशूवर प्रीति करतो तर तो व्यक्ति काय करील?

***त्याच्या वचनांचे पालन करेल किंवा तो जे सांगतो ते करेल***

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये २६:२०. हे वचन के सांगत आहे?

***तुमच्या कार्यांद्वारे तुमचा पश्चाताप प्रमाणित करा***

८. वाचा. याकोब २:१७. जर तुमचा विश्वास सत्कर्मे किंवा कृती करण्यात नसेल, तर तो कसा विश्वास आहे?

***निर्जीव विश्वास, न तारलेला विश्वास***

# पाठ १४

# शिष्यत्वाची हाक

*अॅन्ड्रयू वोमॅक द्वारा लिखित*

आज आपण शिष्य असणे आणि इतर लोकांना शिष्य कसे बनवायचे याबद्दल बोलणार आहोत. मी तुम्हाला आठवण करून देऊ इच्छितो की प्रभुने आम्हाला लोकांचे परिवर्तन करण्यास नव्हे, लोकांना येशूला त्यांचा प्रभु म्हणून कबूल करण्यास आणि पापांची क्षमा मिळण्यासाठीच नव्हे तर शिष्य बनवण्याची आज्ञा दिली आहे. जरी ते पहिले दोन अत्यावश्यक आहेत, आणि मी हे अजिबात कमी लेखत नाही, खरा उद्देश नविन जन्म घेण्याच्या पलीकडे जाणे आणि परिपक्वताकडे जाणे हा आहे. शिष्य असलेल्या ख्रिस्ती लोकांचे ध्येय, जाऊन इतर लोकांना शिष्य बनवणे हे असले पाहिजे.

येशूने आपल्याला म्हटले जा आणि शिष्य बनवा, लोकांमध्ये परिपक्वता आणण्यासाठी आणि पुनरुत्पादन करण्यास सक्षम होण्यास सांगितले. आमच्या आजच्या चर्चच्या युगाने हे केले नाही. ज्यांना आपण पाळक किंवा देवाचा सेवक म्हणतो त्यावर लोकांचा नविन जन्म करण्याची जबाबदारी टाकलेली आहे. आमच्याकडे सुवार्तिक आहेत जे आजूबाजूच्या भरपूर भागात फिरतात, मोठी सभा घेतात आणि हजारो लोक प्रभूसाठी तारणाचा निर्णय घेताना दिसतात. जरी त्यांच्यापैकी काही खरोखरच नविन जन्म घेत नसले तरी ते फक्त त्यांच्या भावनेनुसार निर्णय घेतात, मला खात्री आहे की असेही लोक आहेत जे खरोखरच नविन जन्माचा अनुभव घेतात आणि ते परमेश्वराशी वैयक्तिक नाते जोडतात. तथापि, बऱ्याच वेळा, पुढे जाणे आणि शिष्य बनणे यावर जोर दिला जात नाही, आणि हा तसा देवाचा हेतू नाही.

मी याची तुलना लहान मुलांवर प्रेम करणाऱ्या एका व्यक्तीशी करतो. हे पूर्णपणे बेजबाबदारपणा असेल जर बाळ असणे, त्याच्या किंवा तिच्याबद्दल उत्साही असणे, परंतु केवळ त्याचा किंवा तिचा जन्म होई पर्यंतच. जेव्हा तुम्हाला मूलं होतं तेव्हा तुम्हाला त्या मुलाला प्रशिक्षित करण्याची आणि वाढवण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. आम्ही लोकांना सांगतो, "महत्वाची गोष्ट आहे नविन जन्म घेणे, येशूला तुमचा प्रभु म्हणून कबूल करणे." असे झाल्यावर, आम्ही त्यांच्या पाठीवर थाप मारतो आणि म्हणतो, "आता तुम्ही

ख्रिस्ती आहात. देवावर विश्वास ठेवा, पवित्र शास्त्राचा अभ्यास करा आणि बाकी सर्व काही ठीक होईल." ही अशी देवाची इच्छा नाही.

यामुळे, आपण असे लोक तयार केले आहेत, ज्यांपैकी अनेकांनी स्वत:ला परमेश्वराबरोबर मनापासून वचनबद्ध केले आहे, परंतु त्यांच्यात परिपक्वता नाही. ते त्यांच्या विश्वासाचे पुनरुत्पादन करू शकत नाहीत कारण त्यांना मदत करण्यासाठी कोणतीही सामग्री नाही. येशूसाठी सकारात्मक साक्षीदार होण्याऐवजी ते प्रत्यक्षात नकारात्मक साक्षीदार बनतात. त्याचा हेतू आहे की आपण बाहेर जाऊन लोकांपर्यंत अशा प्रकारे पोहोचावे की ते पूर्ण शिष्य बनतील आणि इतरांवर त्यांचा विश्वास पुन्हा निर्माण करू शकतील.

जर तुम्ही दर सहा महिन्यानी एका व्यक्तीला प्रभूकडे नेले, आणि त्यांना शिष्य केले की ते त्यांच्या विश्वासाचे पुनरुत्पादन करू शकणारे प्रौढ ख्रिश्चन बनले, तर सहा महिन्यांच्या शेवटी फक्त दोन ख्रिस्ती असतील. मग, जर तुमच्यापैकी प्रत्येकाने एका व्यक्तीला प्रभूकडे नेले, स्वतःला वेगळे करुन, त्यांना सहा महिने शिष्यत्वाचे शिक्षण दिले, तर एका वर्षाच्या शेवटी चार ख्रिस्ती होतील. हे अशा व्यक्तीशी तुलना करता येत नाही जो भव्य सुवार्ता सभा घेतो आणि एक हजार लोकांना येशुकडे तारणासाठी नेऊ शकतो आणि त्यांना येशूची कबुली देण्यास भाग पाडू शकतो. बहुतेक लोक म्हणतील, "ठीक आहे, या शिष्यत्व पद्धतीमुळे पहिल्या वर्षी फक्त चार लोक परिवर्तित होतात, तर दुसरी पद्धत एक हजार लोक परिवर्तित करते. आम्हाला दुसऱ्या पद्धती सोबत जाणे योग्य राहील." जो मनुष्य एक हजार लोकांना परमेश्वराकडे नेऊ शकतो त्याने ३५,००० लोकांना परमेश्वराकडे नेले असेल. ते चांगले काम आहे, आणि कोणीही त्यावर टीका करणार नाही; परंतु जगाच्या लोकसंख्येच्या तुलनेत ते फक्त बादलीतल्या एक थेंब पाण्याप्रमाणे आहे. मुळात, चर्च अश्याच प्रमाणे कार्य करत आहे.

जर आपण शिष्यत्वावर जोर दिला, तर जी व्यक्ती दर सहा महिन्यांनी एका व्यक्तीला प्रभूकडे घेऊन जाते आणि ते दोघेही असेच करत राहतील, तर साडेबारा वर्षांच्या अवधीत ते जगाच्या लोकसंख्येपेक्षा जास्त प्रचार करतील. काही लोकांना असे वाटते की ते अस शक्य नाही, परंतु मी तुम्हाला आव्हान देतो ते तुम्ही करून बघा. मी त्याच गणीत केलेल आहे, आणि साडेबारा वर्षांच्या अवधीत, एक व्यक्ती दर सहा महिन्यांनी दुसऱ्या व्यक्तीला शिष्य बनवते, त्यांना ख्रिस्ताच्या शरीराचे पुनरुत्पादक सदस्य बनवते व साडेपाच अब्ज लोकांना प्रचार करू शकते, साडेबारा हजार असलेले लोक इतर दुस-या पद्धतीबरोबर.

जर आम्ही तुम्हाला अशा ठिकाणी पोहोचवू शकलो जिथे तुम्ही केवळ विजय आणि परिपक्वता अनुभवली नाही तर बाहेर जाऊन इतर लोकांमध्ये ते पुनरुत्पादित करण्याची

इच्छा ठेवून, जर तुम्ही प्रशिक्षणार्थी ऐवजी प्रशिक्षक झालात, तर येथे काही गोष्टी आहेत ज्या घडू शकतात ते ह्या की एका व्यक्तीने ही संकल्पना पकडली, परिपक्वतेच्या ठिकाणी प्रभूचे अनुसरण केले आणि दुस-या व्यक्तीला शिष्य करण्यास सुरुवात केली. जर तुम्ही हे दर वर्षी फक्त एका व्यक्तीसोबत केले असेल तर, एका वर्षाच्या शेवटी, तुम्ही आणि तुम्ही शिष्य केलेली व्यक्ती असे – दोन असतील. दोन वर्षांच्या शेवटी, चार होतील. परंतु, जर तुम्ही हे असेच करत राहिलात, तर दहा वर्षांच्या शेवटी १,०२४ लोक असतील जे शिष्य बनले असतील आणि ख्रिस्ताच्या शरीराच्या अवयवांचे पुनरुत्पादन करत असतील. तुम्ही चालू ठेवल्यास, मूळत: फक्त एका व्यक्तीने हे प्राप्त केले, तर वीस वर्षांच्या शेवटी दहा लाखांहून अधिक लोक जे तारण पावलेले आणि शिष्य झालेले असतील. हे खरचं खुप अप्रतिम आहे. ही गुणाकाराची पद्धत आहे जी प्रभु येशुने स्थापित केली आहे - जाऊन शिष्य बनवा, आणि न की जाऊन परिवर्तित करा. लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी देवाच्या राज्याचा विस्तार करण्याचा हा आतापर्यंतचा सर्वोत्तम मार्ग आहे, परंतु आपली मानसिकता त्वरित मिळणारे निराकरण शोधत असते.

किती लोक मोठ्या भव्य धर्मसभेमध्ये जातात, देवाला वचनबद्ध होतात, आता ख्रिस्ती असल्याची घोषणा करतात, तरीही रागं, कटुता आणि मत्सर करतात आणि नकारात्मकतेला साक्षीदार बनतात? जर आपल्याला आकडेवारी मोजायची असेल, तर किती लोक खर्‍या सुवार्तेपासून दूर गेले आहेत कारण त्यांनी ख्रिस्ती धर्माची घोषणा करणारा कोणीतरी व्यक्ती पाहिला आणि विचार केला, *मी चर्चमधील ढोंगी लोकांपेक्षा चांगला आहे. मला त्याची गरज नाही.*

संपूर्ण मुद्दा असा आहे की शिष्यत्व ही देवाने जगाला सुवार्ता सांगण्यासाठी स्थापित केलेली पद्धत आहे. जोपर्यंत तुम्ही वचनात टिकत नाही तोपर्यंत सत्य तुम्हाला मुक्त करत नाही (योहान ८:३१-३२). प्रत्येक व्यक्तीसाठी देवाची हीच इच्छा आहे जेणेकरून ते त्याच्या पूर्णतेचा अनुभव घेऊ शकतील, परंतु ती सुवार्तिकतेची पद्धत देखील आहे जी त्याने स्थापित केली आहे. ज्याने कोणी ठरवले की हा काम करण्याचा मार्ग नाही त्याने ह्या ऐवजी दुसरी पद्धत वापरली आणी ते कार्य अपयशी ठरले.

मी प्रार्थना करतो की देव तुम्हाला शिष्यत्वाचे हे मूल्य दर्शविण्यासाठी तुमच्या हृदयाशी बोलेल. मी तुम्हाला पुढे जाण्यासाठी आणि स्वत: शिष्य होवून इतर लोकांना शिष्य बनण्यास प्रोत्साहित करतो.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की येशूने कोणालाही “ख्रिस्ती” होण्यासाठी कधीही बोलावले नाही, परंतु त्याचे आवाहन लोकांना “शिष्य” होण्यासाठी होते. शुभवर्तमानांच्या पुस्तकांमधून (मत्तय, मार्क, लूक, योहान) पाहा आणि एका स्वतंत्र कागदावर, येशूचे शिष्यत्वासाठी बोलावणे दर्शविणारी अनेक शास्त्रवचने शोधा आणि सूचीबद्ध करा.

२. प्रेषितांची कृत्ये पुस्तकात, लोकांना “ख्रिस्ती” होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले नव्हते, तर त्यांचे आवाहन “शिष्य” होण्यासाठी होते. प्रेषितांची कृत्ये पुस्तकात पाहा, आणि एका स्वतंत्र कागदावर, लोकांना शिष्यत्वासाठी बोलावले आहे हे दर्शविणारी अनेक शास्त्रवचने शोधा आणि सूचीबद्ध करा.

३. शास्त्रामध्ये, “शिष्य (अनेक शिष्य)” हा शब्द एकूण २७३ वेळा वापरला गेला आहे. पूर्ण शास्त्रामध्ये, ख्रिस्ती(अनेक ख्रिस्ती) हा शब्द एकूण तीन वेळा वापरला गेला आहे. पवित्र शास्त्रात “ख्रिस्ती(अनेक ख्रिस्ती)” हा शब्द तीन वेळा वापरला जाणारा शब्द शोधा आणि एका वेगळ्या कागदावर लिहा.

४. वाचा. मत्तय १०:२५. या वचनानुसार शिष्य म्हणजे काय?

**मत्तय १०:२५ -** *शिष्याने गुरूसारखे व दासाने धन्यासारखे व्हावे, इतके त्याला पुरे. घरधन्यास बालजबूल म्हटले तर घरच्या माणसांना कितीतरी अधिक म्हणतील?*

५. वाचा. लुक १४:२६. खरे किंवा खोटे: खरे किंवा खोटे: येशूचे शिष्य असणे म्हणजे दुसऱ्याच्या संपूर्ण आयुष्यासाठी स्वतःचे जीवन बिनाशर्त बलिदान करणे असे आहे.

**लूक १४:२६ -** *जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको, मुले, भाऊ व बहिणी ह्यांचा आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही.*

६. वाचा. लुक १४:३३. खरे किंवा खोटे: किमान काही गोष्टींमध्ये, येशूचे शिष्य असणे म्हणजे येशूच्या दाव्याला प्रथम स्थान देणे म्हणजे सर्व गोष्टींचा शब्दशः त्याग करणे.

**लूक १४:३३ -** *म्हणून त्याचप्रमाणे तुमच्यापैकी जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही.*

७. वाचा. मत्तय १९:२९. खरे किंवा खोटे: प्रत्येकजण ज्याने येशूसाठी आपले घरे, भाऊ, बहिणी, वडील, आई, पत्नी, मुले किंवा जमीन सोडली आहे, त्यांना शंभरपट जास्त मिळेल आणि सार्वकालिक जीवनाचा वारसा मिळेल.

**मत्तय १९:२९ -** *आणखी ज्या कोणी घरे, भाऊ, बहिणी, बाप, आई, मुले किंवा शेते माझ्या नावाकरता सोडली आहेत त्याला शंभरपटीने मिळून सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल;*

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये १४:२२. खरे किंवा खोटे: शिष्यांनी विश्वासात राहणे आवश्यक आहे.

**प्रेषितांची कृत्ये १४:२२ -** *आणि शिष्यांची मने स्थिरावून त्यांनी त्यांना असा बोध केला की, 'विश्वासात टिकून राहा; कारण आपल्याला पुष्कळ संकटांत टिकून देवाच्या राज्यात जावे लागते.*

९. वाचा इब्रीकरांस पत्र १०:१४. खरे किंवा खोटे: शिष्यत्वावर जोर देणाऱ्या शास्त्रवचनांवर काहींचा खरा आक्षेप असा आहे की "ख्रिस्ती" होण्यासाठी कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही (ते कृपेद्वारे आहे), परंतु "शिष्य" होण्यासाठी वास्तविक त्याग आणि वचनबद्धता आवश्यक आहे. सत्य हे आहे की ख्रिस्तानी मिळविलेल्या मुक्तीसाठी आपल्याकडून कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही; हे परिपूर्ण आहे आणि याला आपल्याकडून कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही, परंतु ख्रिस्ताचे पाचारण नेहमीच आपल्या संपूर्ण आणि परिपूर्ण जीवनासाठी होता.

**इब्रीकरांस पत्र १०:१४ -** *कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.*

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये ११:२६. खरे किंवा खोटे: ख्रिस्तापासूनचे पाचारण दोन प्रकारच्या विश्वासणाऱ्यांसाठी नव्हते, ख्रिस्ती होवून दैहिक जीवन जगण्यासाठी आणि काही शिष्य बनण्यासाठी. प्रत्यक्षात पाहिले तर, ख्रिस्ती आणि शिष्य एकच असायला हवे होते.

**प्रेषितांची कृत्ये ११:२६ -** *त्याचा शोध लागल्यावर त्याने त्याला अंत्युखियास आणले. मग असे झाले की, त्यांनी तेथे वर्षभर मंडळीमध्ये मिळूनमिसळून बऱ्याच लोकांना शिकवले; आणि शिष्यांना 'ख्रिस्ती ' हे नाव पहिल्यांदा अंत्युखियात मिळाले.*

११. वाचा. मत्तय २८:१९. विश्वासणाऱ्यांना येशूचा आदेश होता की, जा आणि करा:

अ. शिष्य

ब. सर्व राष्ट्रांचे परिवर्तन

**मत्तय २८:१९ -** *तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; [२० ] जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे."*

१२. वाचा. मत्तय २८:२०. खरे किंवा खोटे: विश्वासणाऱ्यांनी इतरांना येशूने आज्ञापिलेल्या प्रत्येक गोष्टीचे पालन करण्यास शिकवावे.

१३. वाचा. योहान १:१२. खरे किंवा खोटे: येशूने त्याचे लाभ (क्षमा, निर्दोषता इत्यादी.) देऊ केले परंतु स्वत: त्या व्यक्तीला न स्वीकारता नाही.

**योहान १:१२ -** *परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.*

# उत्तरावली

१. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की येशूने कोणालाही "ख्रिस्ती" होण्यासाठी कधीही बोलावले नाही, परंतु त्याचे आवाहन लोकांना "शिष्य" होण्यासाठी होते. शुभवर्तमानांच्या पुस्तकांमधून (मत्तय, मार्क, लूक, योहान) पहा आणि एका स्वतंत्र कागदावर, येशूचे शिष्यत्वासाठी बोलावणे दर्शविणारी अनेक शास्त्रवचने शोधा आणि सूचीबद्ध करा.

२. प्रेषितांची कृत्ये पुस्तकात, लोकांना "ख्रिस्ती" होण्यासाठी आमंत्रित करण्यात आले नव्हते, तर त्यांचे आवाहन "शिष्य" होण्यासाठी होते. प्रेषितांची कृत्ये पुस्तकात पहा, आणि एका स्वतंत्र कागदावर, लोकांना शिष्यत्वासाठी बोलावले आहे हे दर्शविणारी अनेक शास्त्रवचने शोधा आणि सूचीबद्ध करा.

३. शास्त्रामध्ये, "शिष्य (अनेक शिष्य)" हा शब्द एकूण २७३ वेळा वापरला गेला आहे. पूर्ण शास्त्रामध्ये, ख्रिस्ती (अनेक ख्रिस्ती) हा शब्द एकूण तीन वेळा वापरला गेला आहे. पवित्र शास्त्रात "ख्रिस्ती (अनेक ख्रिस्ती)" हा शब्द तीन वेळा वापरला जाणारा शब्द शोधा आणि एका वेगळ्या कागदावर लिहा.

***प्रेषितांची कृत्ये ११:२६, २६:२८ आणि पहिले पेत्र ४:१६***

४. वाचा. मत्तय १०:२५. या वचनानुसार शिष्य म्हणजे काय?

***शिष्य तो असतो जो आपले शिक्षक किंवा गुरुसारखा बनतो***

५. वाचा. लुक १४:२६. खरे किंवा खोटे: येशूचे शिष्य असणे म्हणजे दुसऱ्याच्या संपूर्ण आयुष्यासाठी स्वतःचे जीवन बिनाशर्त बलिदान करणे असे आहे.

***खरे***

६. वाचा. लुक १४:३३. खरे किंवा खोटे: किमान काही गोष्टींमध्ये, येशूचे शिष्य असणे म्हणजे येशूच्या दाव्याला प्रथम स्थान देणे म्हणजे सर्व गोष्टींचा शब्दशः त्याग करणे.

***खरे***

७. वाचा. मत्तय १९:२९. खरे किंवा खोटे: प्रत्येकजण ज्याने येशूसाठी आपले घरे, भाऊ, बहिणी, वडील, आई, पत्नी, मुले किंवा जमीन सोडली आहे, त्यांना शंभरपट जास्त मिळेल आणि सार्वकालिक जीवनाचा वारसा मिळेल.

***खरे***

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये १४:२२. खरे किंवा खोटे: शिष्यांनी विश्वासात राहणे आवश्यक आहे.

***खरे***

९. वाचा इब्रीकरांस पत्र १०:१४. खरे किंवा खोटे: शिष्यत्वावर जोर देणाऱ्या शास्त्रवचनांवर काहींचा खरा आक्षेप असा आहे की "ख्रिस्ती" होण्यासाठी कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही (ते कृपेद्वारे आहे), परंतु "शिष्य" होण्यासाठी वास्तविक त्याग आणि वचनबद्धता आवश्यक आहे. सत्य हे आहे की ख्रिस्तानी मिळविलेल्या मुक्तीसाठी आपल्याकडून कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही; हे परिपूर्ण आहे आणि याला आपल्याकडून कोणत्याही प्रयत्नांची आवश्यकता नाही, परंतु ख्रिस्ताचे पाचारण नेहमीच आपल्या संपूर्ण आणि परिपूर्ण जीवनासाठी होते.

***खरे***

१०. वाचा. प्रेषितांची कृत्ये ११:२६. खरे किंवा खोटे: ख्रिस्तापासूनचे पाचारण दोन प्रकारच्या विश्वासणाऱ्यांसाठी नव्हते, ख्रिस्ती होवून दैहिक जीवन जगण्यासाठी आणि काही शिष्य बनण्यासाठी. प्रत्यक्षात पाहिले तर, ख्रिस्ती आणि शिष्य एकच असायला हवे होते.

***खरे***

११. वाचा. मत्तय २८:१९. विश्वासणाऱ्यांना येशूचा आदेश होता की, जा आणि करा:

***अ. शिष्य***

१२. वाचा. मत्तय २८:२०. खरे किंवा खोटे: विश्वासणाऱ्यांनी इतरांना येशूने आज्ञापिलेल्या प्रत्येक गोष्टीचे पालन करण्यास शिकवावे.

***खरे***

१३. वाचा. योहान १:१२. खरे किंवा खोटे: येशूने त्याचे लाभ (क्षमा, निर्दोषता इत्यादी.) देऊ केले परंतु स्वत: त्या व्यक्तीला न स्वीकारता नाही.

***खरे***

# पाठ १५

# तुमची साक्ष कशी वापरायची

*डॉन क्रो द्वारा लिखित*

आज मला तुमच्याशी वैयक्तिक साक्ष वापरण्याबद्दल बोलायचे आहे. प्रेषितांची कृत्ये ५:४२ सांगते, *"आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकवण्याचे व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजवण्याचे त्यांनी सोडले नाही."* लक्षात घ्या की सुरुवातीच्या चर्चचे शिष्य दररोज मंदिरात भेटत होते आणि घरोघरी ते येशूला ख्रिस्ताविषयी शिकवत आणि प्रचार करत होते. अनेकांना घरोघरी किंवा दारोदारी जाण्याचा प्रकार काही वेगळा किंवा अस्वस्थ असा वाटतो. प्रत्यक्ष बाहेर जावून, शिष्यत्वासाठी दरवाजे उघडून आणि लोकांना परिवर्तित झालेले आणि येशू ख्रिस्ताकडे वळताना पाहून आपण शिकलेल्या काही गोष्टी मला सांगायच्या आहेत.

हे तुम्हाला सांगितले गेले आहे तितके कठीण नाही, आणि शास्त्रवचनांमध्ये माझ्या लक्षात आलेली एक गोष्ट म्हणजे प्रेषित पौलाने एका अपरिवर्तित व्यक्तीशी बोलताना तीन वेळा वैयक्तिक साक्ष वापरली. प्रेषितांची कृत्ये ९,२२, आणि २६ मध्ये, त्याने त्याची साक्ष दिली, त्याचा अनुभव सांगितला आणि तो अविश्वासू लोकांशी बोलत असताना त्याचे काय झाले. येशू ख्रिस्ताचा संदेश इतर लोकांपर्यंत पोहोचवण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे आम्ही "चालती-प्रार्थना" असे म्हणतो. आम्ही एका दारात जातो, ठोठावतो आणि त्यांना सांगतो, "आम्ही या भागात फक्त लोकांसाठी प्रार्थना करत आहोत. देव प्रार्थना ऐकतो आणि त्याचे उत्तर देतो यावर आमचा विश्वास आहे, आणि आम्हाला वाटले की तुम्हाला तुमच्या कुटुंबात काही समस्या - आरोग्य किंवा इतर समस्या आहेत का? तर आम्ही तुमच्यासाठी प्रार्थना करू इच्छितो." कधीकधी ते म्हणतात "ठीक आहे, होय, मला एक समस्या आहे" आणि आम्ही प्रार्थना करावी अशी त्यांची इच्छा आहे; इतर वेळी ते थोडे अस्वस्थ किंवा लाजतात आणि म्हणतात, "नाही, आमच्याकडे या वेळी प्रार्थना विनंत्या नाहीत." मग आम्ही त्यांना आमची वैयक्तिक साक्ष सांगू लागतो.

मी म्हणतो, "माझ्या लक्षात आले की तुम्हाला मुले आहेत. मला माझे स्वतःचे तीन मुले आहेत. १४ डिसेंबर १९८१ रोजी माझ्या मुलींचा जन्म झाला, ज्या जुळ्या होत्या. दुसरी जुळ मुल मृत जन्माला आली." ते उत्तर देतात, "अरे, मला त्याबद्दल ऐकून खूप वाईट

वाटले." मग मी म्हणतो, "वाईट वाटुन घेऊ नका. पुढे काय झालं ते मी तुम्हाला सांगतो." मी कथा सांगू लागतो. जन्माला येणाऱ्या दुस-या जुळ्याचा पायाळू जन्म झाला; म्हणजेच, तिचा प्रथम पाय बाहेर होता. जन्माच्या प्रक्रियेत कधीतरी तिच्यापासून ऑक्सिजन कापला गेला. ती मरणारं मूल अशी जन्मली होती; म्हणजेच ती मृत जन्मली होती.

सुईणीने तिला उचलले, तिला चापट मारली (तिला जमेल तितके जोरात मारले), फुफ्फुसातुन मशीनद्वारे द्रव्य काढले जर फुफ्फुसात काही असेल तर म्हणुन, तिने शक्य ते सर्व प्रयत्न केले आणि शेवटी हार मानली. मी इतर वडिलांसारखा होतो. मी नुकतीच माझी मुलगी गमावली - मी काय करणार आहे? या टप्प्यावर, मी मग मध्येच दारातील एकत्र असलेल्या लोकांना म्हणतो, "मला तुम्हाला विचारायचे आहे, तुम्ही कधी पवित्र शास्त्र थोड़ेफार वाचले आहे का?" ते म्हणतात "हो, मी थोडे वाचले आहे" किंवा कधीकधी उत्तर येत "नाही, बिलकुल नाही." मी स्पष्ट करतो, "मी विचारण्याचे कारण असे आहे की शास्त्रामध्ये प्रेषितांची कृत्ये १०:३८ मध्ये सांगते की येशू लोकांसाठी चांगल्या गोष्टी करत गेला, ज्यांना सैतानाने पछाडले होते त्यांना बरे केले, कारण देव त्याच्याबरोबर होता. काय घडले ते मी तुम्हाला सांगणार आहे. तुम्ही ते स्वीकारू शकता किंवा तुमच्यासाठी जो काही अर्थ आहे त्यानुसार ते सोडून पण देऊ शकता, परंतु माझे बाळ मेले होते, आणि मी विचार करत होतो की काही दिवसात आपण तिला पुरवून येऊ. मी मनात विचार केला, मला फक्त तिला एकदा कुशीत धरायचे आहे. तिला उचलायला गेलो. तिला एक दुष्ट शक्ती घेरून होती हे मला समजले, ज्याला पवित्र शास्त्रामध्ये एक दुष्टात्मा असे म्हटले आहे. त्याने मला सुद्धा शारीरिकरित्या त्यात जोडले आणि मला क्षणार्धात पक्षघात सारखे जाणवलं. जेव्हा ते घडले तेव्हा लगेच मी म्हणालो, 'येशू ख्रिस्ताच्या नावाने, अशुद्ध आत्म्या,मी तुला आज्ञा देतो, या बाळाला सोड, आणि मी येशूच्या नावाने या बाळामध्ये जीवनाची आज्ञा देतो.' त्या लहान बाळाने, जिने कधीही श्वास घेतला नव्हता, श्वास घेतला, तिने एक श्वास घेतला आणि नंतर पुन्हा श्वास घेणे थांबवले. मी पुन्हा म्हणतो, 'येशू ख्रिस्ताच्या नावाने, हे अशुद्ध आत्म्या, मी तुला आत्ताच या बाळापासून दूर जाण्याची आज्ञा देतो, आणि जीवन तिच्यात येवो!' यावेळी तिने अनेक वेळा श्वास घेतला, श्वास घेत गेली आणि असे श्वास घेणे चालूच ठेवले."

मी ज्या व्यक्तीशी बोलत आहे त्या व्यक्तीला मी नावाने हाक मारतो आणि म्हणतो, "तुम्हाला माहिती आहे, सुमारे तीन मिनिटांच्या कालावधीनंतर, मेंदूला ऑक्सिजन न मिळाल्याने व्यक्तीच्या मेंदूला नुकसान होते. पण आता माझी मुलगी सर्व बाबतीत पूर्णपणे सामान्य आहे. आम्ही तिचे नाव विटा ठेवले आहे, ज्याचा लॅटिन भाषेमध्ये अर्थ आहे 'जीवन', कारण देवाने तिच्यासाठी काय केले याची कथा आम्हाला तिला सांगायची होती. त्याने तिच्यात पुन्हा जीवन आणले. तेव्हापासून मी पवित्र शास्त्राचा खूप अभ्यास केला

आहे आणि मला हेच कळले आहे की: माझ्या मुलीवर जसे अशुद्ध आत्म्याचा घेराव असणे हे खरे आहे त्याप्रमाणेच अंधकाराचे राज्य आहे, सैतानाचे वर्चस्व आणि त्याचे राज्य आहे आणि देवाच्या प्रिय पुत्राचे राज्य सुद्धा आहे.

"जेव्हा येशू पृथ्वीवर आला, तेव्हा त्याने पश्चात्ताप करुन आणि त्याच्यावरील विश्वासाद्वारे लोकांना अंधाराच्या राज्यातून स्वतःच्या राज्यात बोलावण्यास सुरुवात केली - पापांची क्षमा प्राप्त करून आणि त्याला अनुसरण्यास. मला माहित नाही की तुमचा काय विश्वास आहे, पण मी तुम्हाला फक्त माझ्या कुटुंबात आणि माझ्या आयुष्यात काय घडले ते सांगत आहे. आम्ही तुमच्या दारात आलो याचे खरे कारण मला तुम्हाला सांगायचे आहे. येशूने आम्हाला शिष्य बनवायला सांगितले. मला जाणवले की बरेच लोक आज व्यस्त आहेत आणि चर्चमध्ये जाऊ शकत नाही किंवा जाऊ इच्छित नाही. जर तुम्हाला चर्चमध्ये काही प्रश्न असेल, तर तुम्ही मध्येच हात वर करून म्हणू शकत नाही, 'अहो पाळक साहेब (किंवा गुरू), तुम्ही आत्ता जे बोलला त्याचा अर्थ काय?' तर, म्हणूनच आम्ही तुमच्या दारात येत आहोत. दहा मिनिटांत, आमच्याकडे देवाच्या वचनातून एकाग्रतेने शिकवले जाते. मग आम्ही वचनाकडे जातो आणि आपल्याला सर्व व्यवस्थित समजले आहे याची खात्री करण्यासाठी काही प्रश्न विचारतो. हा खरोखर एकमेकांसोबतचा संवाद आहे जिथे कोणीही कधीही न समजल्यास प्रश्न विचारू शकतो आणि हो, आम्ही लोकांना प्रचार करत नाही किंवा शास्त्र काय म्हणते ते सांगत नाही, तर काही प्रश्न विचारून ते काय सांगते ते शोधण्यात त्याना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत.

"तुम्हाला तसे करण्याची इच्छा आहे का? आम्ही तुमच्या सोयीनुसार वेळ ठरवू, इथे तुमच्या घरी येऊ, आणि फक्त तुमच्याशी बोलून तुम्हाला पाठ शिकवू. जर तुम्हाला पहिल्या पाठातून काही समजले नाही, जर ते तुम्हाला काही कामी आले नाही, प्रोत्साहित करू शकले नाही आणि तुमची उभारणी करू शकले नाही, तर तुम्हाला आमचा चेहरा तुमच्या दारात पुन्हा कधीही दिसणार नाही. आम्ही तुम्हाला त्रास देण्यासाठी, तुम्हाला चर्च किंवा कोणत्या संस्थेत सामील करून घेण्यासाठी किंवा अश्या इतर कोणत्याही गोष्टीसाठी आलो नाही. आम्ही फक्त तुम्हाला हे सांगायला आलो आहोत की येशू ख्रिस्ताने तुमच्यासाठी वैयक्तिकरित्या काय केले आणि तुम्हाला देवाचे वचन तुमच्या स्वतःसाठी समजून घेण्यास मदत करावयास म्हणुन. पवित्र शास्त्रामध्ये अशा अनेक गोष्टी आहेत ज्या आम्हाला पूर्णपणे माहित नाहीत किंवा समजत नाहीत, परंतु आम्ही तुम्हाला एक छोटासा अभ्यास देण्यासाठी येथे आलो आहोत. तुम्हीला तो करायला आवडेल का? "बऱ्याच लोकांनी "होय, मला आवडेल" असे म्हटले आहे, म्हणून आम्ही त्यांच्या घरी जाऊन शिष्यत्वाचे पाठ देणे सुरू करण्यासाठी एक वेळ निश्चित केली. मी ज्याला "मायक्रोवेव्ह इव्हेंजेलिझम" म्हणतो ते करण्यासाठी आम्ही येथे नाही, जिथे त्यांचे हात जोडून, त्यांना

एक छोटी प्रार्थना करायला लावा आणि हयात ते काय करत आहेत हे देखील त्याना समजत नाही. आम्ही शिष्यत्वाच्या पाठांचे अनुसरण करतो आणि त्यांना ख्रिस्त आणि त्याला वधस्तंभावर खिळलेला हे समजून घेण्यास मदत करतो.

मी एका पाळकाला आमच्या शिष्यत्वाच्या पाठांबद्दल सांगितले आणि तो म्हणाला, "डॉन, पहिल्या पाठानंतर काय होते?" पहिल्या पाठानंतर, त्या व्यक्तीला समजते की येशू ख्रिस्ताला प्रतिसाद देण्यासाठी आणि त्याने दिलेली दयाळूपणा आणि क्षमा प्राप्त करण्यासाठी त्याला काय करण्याची आवश्यकता आहे. आम्ही जास्त दबाव टाकणारे विक्रेते असे नाही. हा आमचा दृष्टीकोन नाही, परंतु पहिल्या पाठातून त्यांना त्यांच्या मनापासून काय करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव होईल. मग त्याने विचारले, "ठीक आहे, पाठ १५ नंतर काय होते?" मी म्हणालो, "१५व्या पाठानंतर, जर एखादी व्यक्ती आमच्याबरोबर राहिली असेल, तर त्यांनी त्यांच्या पापांबद्दल पश्चात्ताप केला असेल आणि पाण्याने बाप्तिस्मा घेतला असेल आणि पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा घेतला असेल. आम्ही असे घडताना पाहत आहोत, पाठ १५ नंतर नाही, परंतु पाठ ६ नंतरही."

मत्तय २८ मध्ये, येशूने राष्ट्रांमध्ये जाऊन शिष्य बनवण्यास सांगितले आणि या प्रक्रियेत, पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावाने त्यांचा बाप्तिस्मा करा असे सांगितले. शिष्य बनवण्याच्या दरम्यान, आम्ही अविश्वासणा-याना येशू ख्रिस्त आणि त्याला वधस्तंभावर खिळलेले हे सगळ समजून सांगतो. हे दर आठवडे असे समजवत असतांना, आम्ही त्यांच्याशी एक नाते निर्माण करतो, मैत्रीचे. ते लोक मग आमच्यावर प्रीति करायला लागतात आणि विश्वास ठेवतात. आम्ही त्यांच्याकड़े उपदेश करण्यासाठी न जाता, देवाचे वचन सांगण्यासाठी जातो. आम्ही शास्त्रवचन वाचतो, कधी त्यांना ते वाचायला लावतो आणि अशा प्रकारे प्रश्न विचारतो की त्यांना स्वतः देवाच्या वचनातून उत्तरे दिसतील. दर अश्या आठवडयानंतर, आम्ही पाहतो की लोक अशा ठिकाणी येत आहेत जिथे ते उघडपणे ख्रिस्ताची कबुली देण्यास इच्छुक असतात कारण आता त्यांना माहित आहे की त्याला स्वीकारणे, त्याचे अनुसरण करणे आणि त्याच्याशी वचनबद्ध असणे याचा अर्थ काय आहे. आजच्या अनेक सुवार्तिक पद्धतींपेक्षा ते खूप वेगळे आहे.

हरवलेल्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही ज्या मार्गाने जातो ते सर्व प्रथम वैयक्तिक साक्षीने जातो आणि आपल्यापैकी प्रत्येकाची वैयक्तिक साक्ष असते. अनेक वेळा आम्ही स्वतःच्या पत्रिका लिहितो. मी "माझ्या मुलीचा मृत्यू" नावाचे एक लिहिले आहे, जे मी अनेकदा लोकांच्या दारात सोडतो. आमच्या शिष्यत्वाच्या इव्हँजेलिझम टीममधील इतर लोकांनी सुद्धा काही पत्रिका लिहिल्या आहेत, जसे की, "एक मुक्त झालेला गुलाम" जो रोझ याने लिहिलेल आहे, जों हा दारु आणि ड्रग्सच्या आहारी गेला होता आणि रॉकी फॉरी लिखित, "डोप व्यसनाचा मृत्यु," जो ड्रग्सच्या आहारी गेला होता,

तो पंधरा वर्षांचा होता तेव्हापासून आणि मग येशूने त्याला मुक्त केले. या साक्ष आम्ही लोकांच्या दारात सांगतो.

काही लोकं म्हणतात, "पण माझ्याकडे अशी तगड़ी साक्ष नाही. मला आठ मिनिटांनंतर माझ्या बाळाला मेलेल्यातून उठवलेलं दिसलं नाही." मला माहीत आहे की बऱ्याच लोकांकडे अशा प्रकारच्या साक्ष नाहीत. तुमच्याकडे अँड्र्यू वोमॅक सारखी साक्ष असू शकते ज्याच्याकडे देवाचे सामर्थ्य त्याचे जीवन टिकवून ठेवते, ज्याने त्यांच्या बालपणात, बहुतेक लोक ज्या पाप, वाईट आणि अधार्मिकतेचा सामना करतात त्यापासून त्याला दूर ठेवले. आपल्यापैकी प्रत्येकाची एक साक्ष आहे आणि जर तुम्हाला वाटत नसेल की तुमची साक्ष पुरेशी प्रभावी आहे, तर माझ्या साक्षीचा वापर करा. जेव्हा आम्ही प्रथम आमच्या शिष्यत्व सुवार्तिक संघांची सुरुवात केली आणि लोकांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात केली, तेव्हा जों रोझने माझी साक्ष वापरली. काही दिवसामध्ये, तो माझी साक्ष माझ्यापेक्षा चांगल्या रितीने सांगु लागला, म्हणून मग मी फक्त म्हणालो, "अरे, जों, चल आता आणि माझ्या सोबत काय झाले ते सांगा."

जर प्रेषित पौलाने हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नवीन करारात तीन वेळा वैयक्तिक साक्ष वापरली असेल, तर तुम्ही सुद्धा तसे करू शकता. आज आपल्याकडे सर्व प्रकारचे प्रोग्राम असलेले संगणक आहेत; शब्द रचना परिपूर्ण असे, मायक्रोसॉफ्ट वर्ड किंवा काहीही. तुमच्या स्वतःच्या वैयक्तिक साक्षीची पत्रिका तयार करणे खूप सोपे आहे. असे म्हणणे अधिक प्रभावी आहे, "हे मी शास्त्राच्या पुस्तकांच्या दुकानातून विकत घेतलेली गोष्ट नाही. हे माझ्या स्वत: बाबतीत घडले ते मी तुमच्याबरोबर शेअर करत आहे."

मला इच्छा आहे की तुम्ही बसून तुमची वैयक्तिक साक्ष लिहायला सुरुवात करावी – तुमच्या सोबत असे काय झाले – कसे तुम्ही येशू ख्रिस्ताकडे आलात. मग तुमची ती साक्ष एखाद्याला सांगा जणू तुम्ही ती एखाद्याच्या दारात सादर करत आहात.

तुम्हाला या विषयावर अधिक माहिती हवी असल्यास, माझ्या वेबसाइटवर जा: www.krowtracts.com आणि "तुमचा विश्वास शेअर करण्याच्या सूचना" वर अधिक माहिती पाहा. तुमची वैयक्तिक साक्ष लिहा, ती सादर करण्याचा सराव करा आणि "तुमचा विश्वास इतराना सांगण्यासाठी सूचना" चा अभ्यास करा. फक्त ते वाचून नाही - तुम्ही त्याचा अभ्यास करणे फार महत्वाचे आहे - जसे तुम्ही बाहेर जाता आणि राष्ट्रांना सुवार्ता सांगता, एका वेळी एक व्यक्ती. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. वाचा. मार्क १६:१५. कोणाला सुवार्ता घोषित करायचे आहे?

**मार्क १६:१५ -** *मग त्याने त्यांना सांगितले की, "सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा.*

२. वाचा. मत्तय २८:१९-२०. आपण कोणाला शिष्य करावे?

***मत्तय २८:१९-२० -*** *तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा; त्यांना पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या; [२०] जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा; आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.आमेन."*

३. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:५, २६; १६:१३-१५,२३; आणि २०:२०-२१. सुवार्तिकता कोठे झाली?

**प्रेषितांची कृत्ये ८:५ -** *आणि फिलिप्पाने शोमरोन शहरात जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली.*

**प्रेषितांची कृत्ये ८:२६ -** *इकडे प्रभूच्या दूताने फिलिप्पाला म्हटले, "ऊठ, जी वाट यरुशलेमेपासून गज्जाकडे जाते त्या वाटेने दक्षिणेकडे जा; ती ओसाड आहे."*

**प्रेषितांची कृत्ये १६:१३-१५ -** *मग शब्बाथ दिवशी आम्ही वेशीबाहेर नदीकाठी, जेथे प्रार्थना होत असते असे आम्हांला वाटले तेथे जाऊन बसलो; आणि ज्या स्त्रिया तेथे जमल्या होत्या त्यांच्याबरोबर बोलू लागलो. [१४] तेथे लुदिया नावाची कोणीएक स्त्री होती; ती थुवतीरा नगराची असून जांभळी वस्त्रे विकत असे; ती देवाची भक्ती करणारी होती. तिने आमचे भाषण ऐकले; तिचे अंत:करण प्रभूने असे प्रफुल्लित केले की, पौलाच्या सांगण्याकडे तिने लक्ष दिले. [१५] मग तिचा व तिच्या घराण्याचा बाप्तिस्मा झाल्यावर तिने अशी विनंती केली की, "मी प्रभूवर विश्वास ठेवणारी आहे असे जर तुम्ही मानत आहात तर माझ्या घरी येऊन राहा." तिच्या आग्रहास्तव ती विनंती आम्हांला मान्य करावी लागली.*

**प्रेषितांची कृत्ये १६:२३ -** *मग पुष्कळ फटके मारल्यावर त्यांना बंदिशाळेत टाकून त्यांनी बंदिशाळेच्या नायकाला त्यांना बंदोबस्तात ठेवण्याचा हुकूम केला.*

**प्रेषितांची कृत्ये २०:२०-२१ -** *जे हितकारक ते तुम्हांला सांगण्यात आणि चार लोकांत व घरोघरी शिकवण्यात मी कसूर केली नाही. [२१] पश्चात्ताप करून देवाकडे वळणे व आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे ह्यासंबंधाने यहूदी व हेल्लेणी ह्यांना मी साक्ष देत होतो.*

४. वाचा. मार्क ४:११-१२. खरे रूपांतरण होण्यापूर्वी, एखाद्या व्यक्तीने हे करणे आवश्यक आहे:

अ. पाहा

ब. ओळखा

क. ऐका

ड. समजून घ्या

इ. वरील सर्व

**मार्क ४:११-१२ -** *तो त्यांना म्हणाला, "देवाच्या राज्याचे रहस्यदान तुम्हांलाच दिले आहे; परंतु बाहेरच्यांना सर्वकाही दाखल्यांनी सांगण्यात येते; [१२] ह्यासाठी की, त्यांनी पाहून घ्यावे पण त्यांना दिसू नये, ऐकून घ्यावे पण त्यांना कळू नये, त्यांच्या मनाचा पालट होऊ नये व त्यांना क्षमा मिळू नये."*

५. वाचा प्रेषितांची कृत्ये २८:२३-२४. जेव्हा पौलाने शुभवर्तमानाबद्दल लोकांना स्पष्टीकरण दिले आणि साक्ष दिली, तेव्हा येशूच्या दाव्यांची लोकांना खात्री पटवण्यासाठी त्याने असे किती काळ केले?

**प्रेषितांची कृत्ये २८:२३-२४ -** *तेव्हा त्यांनी त्याला एक दिवस नेमून दिल्यावर त्या दिवशी पुष्कळ लोक त्याच्या बिऱ्हाडी आले; त्यांना देवाच्या राज्याविषयी साक्ष देण्याकरता आणि येशूविषयी मोशेच्या नियमशास्त्रावरून व संदेष्ट्यांच्या लेखांवरून खातरी करण्याकरता तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्या विषयाची फोड करत होता. [२४ ] त्याने जे सांगितले त्यावरून कित्येकांची खातरी झाली तर कित्येक विश्वास ठेवीनात.*

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:१४. जेव्हा कोणी खरोखर ख्रिस्ताकडे वळतो तेव्हा काय उघडले गेले पाहिजे?

**प्रेषितांची कृत्ये १६:१४ -** *तेथे लुदिया नावाची कोणीएक स्त्री होती; ती थुवतीरा नगराची असून जांभळी वस्त्रे विकत असे; ती देवाची भक्ती करणारी होती. तिने आमचे भाषण*

*ऐकले; तिचे अंत:करण प्रभूने असे प्रफुल्लित केले की, पौलाच्या सांगण्याकडे तिने लक्ष दिले.*

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये २:३७. जेव्हा एखाद्या व्यक्तीचे अंत:करण उघडले जाते आणि त्यांना जाणीव होते तेव्हा काय होते?

***प्रेषितांची कृत्ये २:३७ -*** *हे ऐकून त्यांच्या अंतःकरणास चुटपुट लागली आणि ते पेत्र व इतर प्रेषित ह्यांना म्हणाले, "बंधुजनहो, आम्ही काय करावे?"*

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:३१. आणि २:३८. आणि मग एखाद्या व्यक्तीने काय करावे?

**प्रेषितांची कृत्ये १६:३१ -** *ते म्हणाले, "प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल."*

**प्रेषितांची कृत्ये २:३८ -** *पेत्र त्यांना म्हणाला, "पश्चात्ताप करा व तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या; म्हणजे तुम्हांला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.*

९. वाचा. प्रेषितांची कृत्ये २:४२. आणि योहान ८:३१-३२.

**प्रेषितांची कृत्ये २:४२ -** *ते प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासात, भाकर मोडण्यात व प्रार्थना करण्यात तत्पर असत.*

**योहान ८:३१-३२ -** *ज्या यहूद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला त्यांना येशू म्हणाला, "तुम्ही माझ्या वचनात राहिलात तर खरोखर माझे शिष्य आहात; [३२ ] तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील."*

१०. वाचा. रोमकरांस पत्र १०:१४-१५. उलट क्रमाने (या वचनांमध्ये), एखादी व्यक्ती ख्रिस्ताकडे कशी येते?

**रोमकरांस पत्र १०:१४-१५ -** *तर ज्याच्यावर त्यांनी विश्वास ठेवला नाही त्याचा धावा ते कसा करतील? ज्याच्याविषयी त्यांनी ऐकले नाही त्याच्यावर ते विश्वास कसा ठेवतील? घोषणा करणाऱ्यांवाचून ते कसे ऐकतील? [१५ ] आणि त्यांना जर पाठवले नाही तर ते घोषणा तरी कशी करतील? "चांगल्या गोष्टींची (शांतीची) सुवार्ता सांगणाऱ्यांचे चरण किती मनोरम आहेत!" असा शास्त्रलेख आहे.*

# उत्तरावली

१. वाचा. मार्क १६:१५. कोणाला सुवार्ता घोषित करायचे आहे?

***संपूर्ण सृष्टीला, प्रत्येक व्यक्तीला***

२. वाचा. मत्तय २८:१९-२०. आपण कोणाला शिष्य करावे?

***सर्व राष्ट्रांतील लोकांना***

३. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:५, २६; १६:१३-१५,२३; आणि २०:२०-२१. सुवार्तिकता कोठे झाली?

***शहरांमध्ये, नदीकाठी, तुरुंगात, सार्वजनिक ठिकाणी आणि घरोघरी***

४. वाचा. मार्क ४:११-१२. खरे रूपांतरण होण्यापूर्वी, एखाद्या व्यक्तीने हे करणे आवश्यक आहे:

***इ. वरील सर्व***

५. वाचा प्रेषितांची कृत्ये २८:२३-२४. जेव्हा पौलाने शुभवर्तमानाबद्दल लोकांना स्पष्टीकरण दिले आणि साक्ष दिली, तेव्हा येशूच्या दाव्यांची लोकांना खात्री पटवण्यासाठी त्याने असे किती काळ केले?

***सकाळपासून संध्याकाळपर्यंत, बहुधा सहा ते आठ तास***

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:१४. जेव्हा कोणी खरोखर ख्रिस्ताकडे वळतो तेव्हा काय उघडले गेले पाहिजे?

***अंतःकरण, मनुष्याच्या अस्तित्वाचा सर्वात महत्वाचा केंद्र भाग***

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये २:३७. जेव्हा एखाद्या व्यक्तीचे अंतःकरण उघडले जाते आणि त्यांना जाणीव होते तेव्हा काय होते?

***जर त्यांनी योग्य प्रतिसाद दिला तर ते विचारतील, "मी काय करायला पाहिजे?"***

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये १६:३१. आणि २:३८. आणि मग एखाद्या व्यक्तीने काय करावे?

***पश्चात्ताप करा आणि प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा आणि बाप्तिस्मा घ्या***

९. वाचा. प्रेषितांची कृत्ये २:४२. आणि योहान ८:३१-३२.

***प्रेषिताच्या शिकवणीत (शिक्षण) सुरू ठेवा. शिकणे सुरू ठेवा***

१०. वाचा. रोमकरांस पत्र १०:१४-१५. उलट क्रमाने (या वचनांमध्ये), एखादी व्यक्ती ख्रिस्ताकडे कशी येते?

***कोणालातरी पाठवले जाते. एखाद्याला कोणीतरी उपदेश करतो किंवा घोषणा करतो. मगच ते ख्रिस्ताचा संदेश ऐकतात, ते विश्वास ठेवू शकतात. ते विश्वास ठेवतात म्हणुन, ते तारणासाठी प्रभुचे नाव घेतात.***

# पाठ १६

# शिष्यतेसाठी सर्वांचे आत्मिक दाने वापरणे

*डॉन क्रो द्वारा लिखित*

प्रत्येकाला देवापासून मिळालेले दान इतरांना शिष्य बनवण्यासाठी वापरले जाऊ शकतात. आम्ही अनेक वर्षांपासून या शिष्यत्व कार्यक्रमात मोठ्या यशाने काम करत आहोत, नव्याने जन्म घेऊन, पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा घेऊन आणि पाण्याने बाप्तिस्मा घेतल्याने लोकांचे जीवन बदललेले पाहून. एके दिवशी मी एका मित्राशी बोलत होतो आणि म्हणालो, "आपण कुठेतरी कमी पडत आहोत – काही ठिकाणी भेगा पडत आहेत." तो म्हणाला. "मला वाटलं सगळं छान चाललंय. तुला असं काय म्हणायचंय?"

मला तुम्हाला सांगायचे आहे की आंतरिक चर्च कसे तयार करायचे - जिथे लोक फक्त बसतात, पाळकांचा संदेश ऐकतात आणि घरी जातात - एक बाह्य चर्च असत जिथे ते चर्चच्या इमारतीच्या चार भिंतींकडे येतात. ही वास्तविक आकडेवारी आहे: सर्व ख्रिस्तीलोकांपैकी ९५ टक्के लोकांनी कधीही कोणालाही सुवार्तेद्वारे प्रभूकडे नेले नाही आणि ९० टक्के सुवार्तिक प्रचारकानी ख्रिस्ती लोकांकडे निर्देशित केले आहे. चर्चची इमारत जगातील सर्वात मोठ सुवार्ता क्षेत्र आहे. आम्ही लहान मुलांच्या रविवार शाळेच्या खोल्यामध्ये प्रचार करतो, आणि आम्ही पवित्र जागी प्रचार करतो. ज्या पद्धतीने आम्ही इमारतीत प्रचार करतो, त्यावरून तुम्हाला वाटेल की चर्चलाच परिवर्तनाची गरज आहे.

कॉन्स्टँटाईनच्या नेतृत्वाखाली तिसऱ्या शतकापर्यंत चर्चच्या इमारती अस्तित्वात आल्या नाहीत. तेव्हापासून, हरवलेल्यांपर्यंत पोहोचण्याइतपत, चर्च जणू आतल्या इमारतींच्या भिंतींमागे लपल्यासारखे होते. आतल्या चर्चला बाह्य चर्चमध्ये बदलण्यासाठी आम्ही त्या भिंतींच्या पलीकडे पोहोचू इच्छितो. सांख्यिकीयदृष्ट्या, आमच्या इमारतींच्या चार भिंतींच्या पलीकडे पोहोचणारे केवळ ०.५ टक्के (एक टक्क्यांपेक्षा कमी) कार्यक्रम आहेत. ते म्हणतात की आज युनायटेड स्टेट्स अमेरिकेमध्ये हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्याची योजना आहे असा कोणताही मोठा संप्रदाय नाही. आमच्या चर्च इमारतींच्या बाहेरील लोकांपर्यंत पोहोचणे आणि त्यांना शिष्य करणे हा ख्रिस्ती धर्माचा एक महत्वाचा भाग आहे ज्याचा पुन्हा शोध घेण्याची गरज आहे.

रेफॉरमेशनद्वारे, मार्टिन ल्यूथरने विश्वासाद्वारे नीतिमत्वतेचे प्रकटीकरण चर्चच्या लक्षात आणुन दिले. १८०० च्या दशकात, जॉन वेस्ली द्वारे मोठ्या प्रमाणात सुवार्तिकतेचा प्रचार झाला. परंतु यावरून ही असे दिसते की प्रेषितांच्या काळापासून वैयक्तिक रित्या एक व्यक्ति-एक शिष्य आणि सुवार्तिकता पुन्हा तशी तयार गेली नाही. तुम्ही म्हणाल, "मला कसे करायच माहित नाही." या पद्धतीद्वारे, आम्ही तुम्हाला कसे ते नक्कीच दाखवू - हे खूप सोपे आहे. तुमची साक्ष वापरून लोकांसोबत काम करणे आणि दारात नवीन लोकांना भेटणे किती सोपे आहे हे आम्ही तुम्हाला दाखवू. हेच ते आहे ज्यावर मी लक्ष केंद्रित करू इच्छितो. ही आहे चांगली बातमी.

तुम्हाला जे करायचे आहे तेच कसे करायला आवडेल, दुसऱ्यानी तुम्हाला काय करायचे आहे असे न सांगता (जे त्यांच्या इच्छेप्रमाणे तुम्हाला करायच नसत), पण तुम्हाला नक्की काय करायचे आहे? आम्ही त्याबद्दल बोलत आहोत. जेव्हा मी लोकांना शिष्यत्व इव्हँजेलिझम कसे कार्य करते हे दाखवतो, असे म्हणुन की, "पाहा, आम्ही हे करत आहोत: आम्ही लोकांच्या जीवनाला स्पर्श करत आहोत. त्यांचे तारण होत आहे, नविन जन्म होत आहेत, पवित्र आत्म्याने भरले जात आहेत आणि पाण्याने बाप्तिस्मा घेत आहेत." लोक म्हणतात, "वाह छान आहे!" पण जर मी म्हणालो, "आता, तुमच्यापैकी किती जणांना माझ्यासोबत जायचे आहे, "कदाचित तुमच्यामधून दोनशेपैकी तीन लोक तयार होतील, कारण बाकीचे घाबरले आहेत किंवा ते कसे करायचे हे त्यांना माहित नाही. किंवा, जर मी म्हणालो, "बरं ठीक आहे, विसरा याला. याची काळजी करू नका; आता तुम्हाला घाबरण्याची गरज नाही. आम्ही बाहेर जाऊन पवित्र शास्त्राचे अध्ययन घेऊ आणि तुमच्यासाठी शिष्यत्वाचे पाठ देणे तयार करू." किती जणांना शिकवायला आवडेल? मग तिथे दहा किंवा बारा असतील असे म्हणणारे - "होय, मला शिकवायचे आहे." पण त्यापलीकडे ते जाणार नाही.

आम्ही तुम्हाला दाखवू इच्छितो की, ख्रिस्ताच्या शरीरातील प्रत्येक देणगी, दान हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांच्यावर प्रीति करण्यासाठी आणि शिष्य करण्यासाठी कशी वापरली जाऊ शकते. येथे प्रत्येक दानाचा उपयोग होईल, आणि ते सर्व कृपादाने केवळ ख्रिस्ताच्या शरीरात असलेले, स्थानिक चर्चमध्ये आढळतात. तुमच्यापैकी काही म्हणतात, "मला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळण्यासाठी, कोणाला आरोग्यासाठी आणि अशा इतर गोष्टींसाठी प्रार्थना करायला आवडते." ठीक आहे, आमच्या शिष्यत्वात अशी वेळ येते जेव्हा आम्ही तुम्हाला फक्त त्याच हेतूसाठी बोलावू शकतो.

इतर लोक म्हणतात, "मला ते सहज अस वाटत नाही, "पण तुम्ही केक बेक करू शकता का? तुम्ही कार्ड पाठवू शकता का? तुम्ही फोन कॉल करू शकता का? आपण कुंपण रंगवू शकता? ज्या एकट्या आईलोकांना आम्ही वचनाची सेवा देत

आहोत तिच्यासाठी तुम्ही आया बनून, तिला स्वतःला एक तास मोकळा देऊ जेणेकरून ती घराबाहेर पडू शकेल असं तुम्ही करू शकता का? तुम्ही व्यावहारिक गोष्टी करू शकता का? मध्यस्थी करण्याबद्धल काय? तुमच्यापैकी काहींना मध्यस्थीची प्रार्थना करण्यासाठी बोलावले जाते. आम्ही तुम्हाला ज्या लोकांमध्ये सेवाकार्य करत आहोत ते दाखवू, तुम्हाला त्यांची नावे देऊ, आणि तुम्ही एकट्याने किंवा गटांसोबत त्यांच्यासाठी प्रार्थना आणि मध्यस्थी करू शकता, आणि दर आठवड्याला बाहेर जाणाऱ्या शिष्यत्व इव्हँजेलिझम टीमसाठी सुद्धा.

शिष्य बनवण्यास इथे प्रत्येकासाठी काम करण्यास आणि इतरांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. आमच्याकडे एक कार्यक्रम आहे जिथे प्रत्येक आत्मिक दान वापरले जाऊ शकते. आम्ही एक शिक्षक आणि शिक्षकाचे सहाय्यक यांचे संघ विकसित करत आहोत जे शिष्यत्वाच्या क्षमतेने सेवा करतील. नंतर मदत सेवाकार्यातुन दोन लोक त्यांच्या मागे व्यावहारिक गोष्टी करण्यासाठी येतील, जसे की अन्न देणे, केक बेक करणे किंवा सर्वकाही कसे चालले आहे हे पाहण्यासाठी फोन कॉल करणे. आमच्याकडे असे लोक आहेत जे आमच्यासाठी आणि आम्ही ज्या लोकांमध्ये सेवा करतो त्यांच्यासाठी मध्यस्थी प्रार्थना करतात.

तुम्हाला माहीत आहे का आम्ही काय पाहत आहोत? आम्ही पाहत आहोत देव लोकांचे जीवन बदलताना कारण त्यांचे पाळकत्वाद्वारे संगोपन केले जात आहे आणि त्यांची काळजी घेतली जात आहे, कारण देवाची प्रीति त्यांच्यावर दाखवली जात आहे. आणि हे सेवाकार्याचे काम कोण करतंय माहीत आहे का? ज्यांनी ते करायला पाहिजे ते करत आहे म्हणजे - लोकं करत आहेत. इफिसकरांस पत्र ४:११ सांगते की प्रेषित, संदेष्टा, सुवार्तिक, पाळक आणि शिक्षक यांना आपण संतांना परिपूर्ण करण्यासाठी दिले गेले आहे जेणेकरून ते सेवेचे कार्य करू शकतील. चर्च सेवाकार्याचे काम करत आहे, केवळ समोरचा माणूस "पाळकच" नाही. जेव्हा पाळक चर्चच्या लोकांना सेवेच्या कार्यासाठी शिकवतो आणि सुसज्ज करतो आणि मग जेव्हा ते जातात आणि ते कार्य करतात, त्यात खरे यश आहे.

मला अजुन स्पष्ट करू द्या. जर आम्ही दुसऱ्या राष्ट्रावर युद्ध घोषित केले आणि आमचे राष्ट्राध्यक्ष म्हणाले, "आम्ही युद्धात बरेच लोक गमावले आहेत, म्हणून मी सैन्य काढून टाकण्याचा आणि फक्त सेनापतींना तेथे लढण्यासाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे." तर बाकीच जग आपल्यावर हसतील, आणि खरोखर इथे तेच घडत आहे. सैतान आमच्यावर हसत आहे कारण आम्ही सेनापतींना, पाचपदरी सेवाकार्यांना हे सर्व करण्यासाठी पाठवले आहे. "त्यांना ते करू द्या - आम्ही त्यांना ते करण्यासाठी पैसे देत आहोत." असे काही म्हणतील. सैन्य विकसित करण्यात आपण येथे अपयशी ठरलो

आहोत. देवाला ते सैन्य विकसित करायचे आहे, आणि आपल्या प्रत्येकाचे आत्मिक दाने शिष्यत्व सुवार्तिकतेमध्ये वापरले जाऊ शकतात.

आम्हाला एक सैन्य तयार करण्यासाठी मदत करायची आहे, जे शिष्य बनवण्यासाठी शक्तिशाली साधनांनी सुसज्ज आहे – हे केवळ आमच्या शहरापुरतच नाही - तर जगभरात पोहोचवत जाणारे कार्य. हे आपण विकसित केलेल्या साधनांद्वारे, शिष्यत्वाच्या पाठांद्वारे आणि देवाने आपल्याला दिलेल्या सर्व धोरणाद्वारे केले जाऊ शकते. देव तुम्हाला आशीर्वादीत करो जसे आपण प्रत्येकजण आपल्या आत्मिक दानांचा वापर हरवलेल्यांची सेवा करण्यासाठी, नवीन विश्वासणारे तयार करण्यासाठी आणि राष्ट्रांना जाऊन शिष्य बनवण्याची येशूची आज्ञा पाळण्यासाठी एकत्र येतो.

# शिष्यत्वाचे प्रश्न आणि प्रश्नांसह उपयोगासाठी शास्त्रवचने

१. सुवार्तेचा प्रचार, शिष्य बनवणे आणि हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही ज्या प्रकारे समूह एकत्र करतो त्याचे थोडक्यात वर्णन खालीलप्रमाणे आहे. तुमच्या चर्चचे लोकं यापैकी कोणत्याही समुहासाठी नोंदणी करू शकते. जर तुम्ही नेहमी या सानिध्यात राहणे चालु ठेवल्यास, तुमच्या सर्व आत्मिक दानांचा उपयोग सेवाकार्यासाठी करून, तुम्ही एखाद्या व्यक्तीला देवाच्या राज्यामध्ये आणि फार लवकर परिपक्वतेमध्ये आणू शकता. खाली दिलेली प्रश्नावली आहे जी तुम्ही तुमच्या चर्च सदस्यांना द्यायची आहे. त्यानंतर त्यांचा पाठपुरावा घेण्यासाठी इतर आणखी संघ आयोजित करा.

मला हे करण्यात स्वारस्य आहे: (एक किंवा अधिक तपासा)

______ नवीन लोकांशी त्यांच्या दारात जाऊन संपर्क साधणे

______ मध्यस्थी: हरवलेल्या आणि शिष्यत्व इव्हँजेलिझम समुहांसाठी प्रार्थना करणे.

______ गरजू कुटुंबांना अन्न किंवा इतर वस्तू देणे

______ फोन किंवा भेटीद्वारे इतरांशी संपर्क साधणे

______ दयाळू सुवार्तिकता: इतरांसाठी अन्न तयार करणे, कार्ड पाठवणे, कोणत्याही प्रकारे मदत करणे

______ एकल माता आणि मुलांसोबत काम करणे

______ चर्चला वाहतूक पुरवणे, इत्यादी.

______ इतर: मला ________________ करायचे आहे.

२. शिष्यत्वाचा पाठ शिकवल्यानंतर वापरल्या जाणाऱ्या शिष्यत्वाच्या पाठपुराव्याचा नमुना खालीलप्रमाणे आहे. हा फॉर्म पाळक किंवा अधिकार असलेल्यांना किती धडे शिकवले गेले आहेत आणि प्रत्येक अभ्यासाचे परिणाम दर्शवेल.

शिष्यत्व फॉलो-अप रिझल्ट फॉर्म

भेटीची/पाठाची तारीख:

धडा शिकवणारी व्यक्ती(अनेक व्यक्ती):

भेट दिलेल्या/शिकवलेल्या व्यक्तींची नावे:

सादरीकरणाचे ठिकाण:

पाठाचा विषय:

हा अभ्यास कसा झाला?

३. वाचा. याकोब १:२२. जर आपण देवाचे वचन फक्त ऐकतो पण ते कधीच आचरणात आणले नाही, तर आपण काय केले आहे?

याकोब १:२२ - वचनाप्रमाणे आचरण करणारे असा, केवळ ऐकणारे असू नका; अशाने तुम्ही  स्वतःची फसवणूक करता.

४. वाचा. मत्तय ७:२४-२७. सुज्ञ माणूस होण्यासाठी, आपण केवळ येशूचे म्हणणे ऐकले पाहिजे असे नाही तर आपण काय केले पाहिजे?

**मत्तय ७:२४-२७ -** *ह्यास्तव जो प्रत्येक जण ही माझी वचने ऐकून त्याप्रमाणे वागतो तो कोणाएका सुज्ञ मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर खडकावर बांधले; [२५] मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला, व त्या घरास लागला; तरी ते पडले नाही, कारण त्याचा पाया खडकावर घातला होता. [२६] तसेच जो कोणी माझी वचने ऐकून त्याप्रमाणे वागत नाही तो कोणाएका मूर्ख मनुष्यासारखा ठरेल; त्याने आपले घर वाळूवर बांधले; [२७] मग पाऊस पडला, पूर आला, वाराही सुटला, व त्या घरास लागला; तेव्हा ते पडले, अगदी कोसळून पडले."*

५. वाचा. इफिसकरांस पत्र ४:११-१२. सेवेचे कार्य कोणी करायचे आहे?

**इफिसकरांस पत्र ४:११-१२ -** *आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले; [१२] ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांना सेवेच्या कार्याकरता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरता सिद्ध करावे.*

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. सर्वत्र उपदेश करायला कोण गेले?

**प्रेषितांची कृत्ये ८:१ -** *शौलाला तर त्याचा वध मान्य होता. त्याच दिवशी यरुशलेमेतल्या मंडळीचा फार छळ झाला, म्हणून प्रेषितांखेरीज त्या सर्वांची यहूदीया व शोमरोन ह्या प्रदेशांत पांगापांग झाली.*

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. सर्वत्र उपदेश करायला कोण गेलं नाही?

**प्रेषितांची कृत्ये ८:४ -** *तेव्हा ज्यांची पांगापांग झाली होती ते वचनाची सुवार्ता सांगत चहूकडे फिरले.*

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये ११:१९-२२. नवीन करारातल्या सुरुवातीच्या मंडळीमध्ये, विश्वासणाऱ्यांनी सेवेचे कार्य केले आणि त्याचे पालन प्रेषितांचे नेतृत्व आणि निर्देशांद्वारे केले गेले. आज आपल्या मंडळीमध्ये, हे पुढारीत्वता आहे जे या गोष्टी सुरू करते आणि नंतर विश्वासणारे त्याचे अनुसरण करतात. प्रेषितांची कृत्ये ११:१९-२२ हे विधान कसे सत्यता सिद्ध करते?

**प्रेषितांची कृत्ये ११:१९-२२ -** *स्तेफनावरून उद्भवलेल्या छळामुळे ज्यांची पांगापांग झाली होती ते फेनिके, कुप्र व अंत्युखिया येथपर्यंत फिरून यहूद्यांना मात्र देवाचे वचन सांगत असत. [२०] तरी त्यांच्यापैकी कित्येक कुप्री व कुरेनेकर होते; ते अंत्युखियात येऊन प्रभू येशूची सुवार्ता हेल्लेणी लोकांनाही सांगू लागले. [२१] तेव्हा प्रभूचा हात त्यांच्याबरोबर होता आणि पुष्कळ लोक विश्वास धरून प्रभूकडे वळले. [२२] त्यांच्याविषयीचे वर्तमान यरुशलेमेतल्या मंडळीच्या कानी आले तेव्हा त्यांनी बर्णबाला अंत्युखियास पाठवले.*

९. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:१४-१८. ख्रिस्ताच्या शरीराचा प्रत्येक भाग आवश्यक आहे. आपण आपली आपापसात तुलना करू नये. त्याएवजी, ख्रिस्ताप्रती पूर्ण वचनबद्धता म्हणजे सर्व काही करणे नव्हे तर देवाने तुम्हाला जे करण्यास सज्ज केले आहे ते करणे. या पाठात तुम्हाला मिळालेल्या माहितीचे तुम्ही काय कराल?

*पहिले करिंथकरांस पत्र १२:१४-१८ - कारण शरीर म्हणजे एक अवयव असे नव्हे, तर अनेक अवयव असे आहे. [१५] जर पाय म्हणेल, "मी हात नाही म्हणून मी शरीराचा नाही," तर त्यावरून तो शरीराचा नाही असे होत नाही. [१६] जर कान म्हणेल, "मी डोळा नाही म्हणून मी शरीराचा नाही," तर त्यावरून तो शरीराचा नाही असे होत नाही. [१७] सबंध शरीर डोळा असते तर ऐकण्याची क्रिया कशी झाली असती? सबंध शरीर कानच असते तर हुंगण्याची क्रिया कशी झाली असती? [१८] तर देवाने आपल्या इच्छेप्रमाणे शरीरामध्ये प्रत्येक अवयव लावून ठेवला आहे.*

# उत्तरावली

१. सुवार्तेचा प्रचार, शिष्य बनवणे आणि हरवलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही ज्या प्रकारे समूह एकत्र करतो त्याचे थोडक्यात वर्णन खालीलप्रमाणे आहे. तुमच्या चर्चचे लोकं यापैकी कोणत्याही समुहासाठी नोंदणी करू शकते. जर तुम्ही नेहमी या सानिध्यात राहणे चालु ठेवल्यास, तुमच्या सर्व आत्मिक दानांचा उपयोग सेवाकार्यासाठी करून, तुम्ही एखाद्या व्यक्तीला देवाच्या राज्यामध्ये आणि फार लवकर परिपक्वतेमध्ये आणू शकता. खाली दिलेली प्रश्नावली आहे जी तुम्ही तुमच्या चर्च सदस्यांना द्यायची आहे. त्यानंतर त्यांचा पाठपुरावा घेण्यासाठी इतर आणखी संघ आयोजित करा.

मला हे करण्यात स्वारस्य आहे: (एक किंवा अधिक तपासा)

______ नवीन लोकांशी त्यांच्या दारात जाऊन संपर्क साधणे

______ मध्यस्थी: हरवलेल्या आणि शिष्यत्व इव्हँजेलिझम समुहांसाठी प्रार्थना करणे.

______ गरजू कुटुंबांना अन्न किंवा इतर वस्तू देणे

______ फोन किंवा भेटीद्वारे इतरांशी संपर्क साधणे

______ दयाळू सुवार्तिकता: इतरांसाठी अन्न तयार करणे, कार्ड पाठवणे, कोणत्याही प्रकारे मदत करणे

______ एकल माता आणि मुलांसोबत काम करणे

______ चर्चला वाहतूक पुरवणे, इत्यादी.

______ इतर: मला ________________ करायचे आहे.

२. शिष्यत्वाचा पाठ शिकवल्यानंतर वापरल्या जाणाऱ्या शिष्यत्वाच्या पाठपुराव्याचा नमुना खालीलप्रमाणे आहे. हा फॉर्म पाळक किंवा अधिकार असलेल्यांना किती धडे शिकवले गेले आहेत आणि प्रत्येक अभ्यासाचे परिणाम दर्शवेल.

शिष्यत्व फॉलो-अप रिझल्ट फॉर्म

भेटीची/पाठाची तारीख:

धडा शिकवणारी व्यक्ती(अनेक व्यक्ती):

भेट दिलेल्या/शिकवलेल्या व्यक्तींची नावे:

सादरीकरणाचे ठिकाण:

पाठाचा विषय:

हा अभ्यास कसा झाला?

३. वाचा. याकोब १:२२. जर आपण देवाचे वचन फक्त ऐकतो पण ते कधीच आचरणात आणले नाही, तर आपण काय केले आहे?

***आपण स्वतःची फसवणुक केली आहे***

४. वाचा. मत्तय ७:२४-२७. सुज्ञ माणूस होण्यासाठी, आपण केवळ येशूचे म्हणणे ऐकले पाहिजे असे नाही तर आपण काय केले पाहिजे?

***त्यानुसार वागले पाहिजे***

५. वाचा. इफिसकरांस पत्र ४:११-१२. सेवेचे कार्य कोणी करायचे आहे?

***सगळे संत, पाळकगण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विशिष्ट वर्गातील लोकच नाहीत***

६. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. सर्वत्र उपदेश करायला कोण गेले?

***इतर प्रदेशात विखुरलेले सगळे विश्वासणारे***

७. वाचा. प्रेषितांची कृत्ये ८:१ आणि ४. सर्वत्र उपदेश करायला कोण गेलं नाही?

***प्रेषित. यावरून आपण पाहतो की नवीन कराराची सुरुवातीची मंडळी शिष्यत्व आणि सुवार्तिकतेसाठी जबाबदार राहत होती.***

८. वाचा. प्रेषितांची कृत्ये ११:१९-२२. नवीन करारातल्या सुरुवातीच्या मंडळीमध्ये, विश्वासणाऱ्यांनी सेवेचे कार्य केले आणि त्याचे पालन प्रेषितांचे नेतृत्व आणि निर्देशांद्वारे केले गेले. आज आपल्या मंडळीमध्ये, हे पुढारीत्वता आहे जे या गोष्टी सुरू करते आणि नंतर विश्वासणारे त्याचे अनुसरण करतात. प्रेषितांची कृत्ये ११:१९-२२ हे विधान कसे सत्यता सिद्ध करते?

***मंडळीने नवीन विश्वासूंच्या परिवर्तनाबद्दल ऐकले आणि त्यांना मदत करण्यासाठी बर्नबाला पाठवले (वचन २२)***

९. वाचा. पहिले करिंथकरांस पत्र १२:१४-१८. ख्रिस्ताच्या शरीराचा प्रत्येक भाग आवश्यक आहे. आपण आपली आपापसात तुलना करू नये. त्याऐवजी, ख्रिस्ताप्रती पूर्ण वचनबद्धता म्हणजे सर्व काही करणे नव्हे तर देवाने तुम्हाला जे करण्यास सज्ज केले आहे ते करणे. या पाठात तुम्हाला मिळालेल्या माहितीचे तुम्ही काय कराल?

***आशापूर्वक, बाहेर जाऊन आणि इतरांना मदत करण्यासाठी माझ्या दानांचा उपयोग करुन ते आचरणात आणणे***

## CONTACT DETAILS

### INDIA

www.awmindia.net        info@awmindia.net

### Locations:

### Hyderabad

42-343/1/188, Near Flora Hotel, Maruthi Nagar
A S Rao Nagar, Hyderabad 500 040, INDIA.
Ph: (040) 4028 0718

### Chennai

72-D, Nandhini Mahal, I Floor, Velachery Main Road
Velachery, Chennai 600 042, INDIA.
Ph: (044) 4202 1820

### Mumbai

Bethel, Plot No 305/E, Mith Chowky, Near Girdhar Park
Malad (W), Mumbai 400 064, INDIA.
Ph: +91 8976549515

### Delhi

Phone: +91 9560591787

### USA

Andrew Wommack Ministries Inc.
PO Box 3333, Colorado Springs CO 80934-3333
www.awmi.net

### UK

Andrew Wommack Ministries - Europe
PO Box 4392, Walsall, WS1 9AR, ENGLAND
www.awme.net